# “माधवराव पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरण- एक अभ्यास (इ.स.१७६१ ते इ.स.१७७२)”

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
इतिहास विभाग

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला
शोधप्रबंध

संशोधक

श्री. राजेंद्र भिमाजी सातपुते

मार्गदर्शक
प्रा. डॉ. एस. पी. शिंदे

सप्टेंबर २०१६

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री.राजेंद्र भिमाजी सातपुते यांनी **,“माधवराव पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरण– एक अभ्यास (इ.स.१७६१ ते इ.स.१७७२)”** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.)२००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : सातारा | मार्गदर्शक
दिनांक :

(प्रा. डॉ. एस. पी. शिंदे)

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री.राजेंद्र भिमाजी सातपुते यांनी **,"माधवराव पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरण– एक अभ्यास (इ.स.१७६१ ते इ.स.१७७२)"** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.)२००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : सातारा

दिनांक :

मार्गदर्शक

(प्रा. डॉ. एस. पी. शिंदे)

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विभागात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी हा शोध प्रबंध सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. या माझ्या कार्याला अनेकांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि प्रत्यक्षात सहकार्य मिळालेले आहे. त्याच्याबद्दल कृतज्ञताभाव व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

“माधवराव पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरण–एकअभ्यास (इ.स.१७६१ते इ.स.१७७२)” या विषयावर संशोधन काम पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक मा.प्रा. डॉ. एस. पी. शिंदे यांनी मला मार्गदर्शन केले. त्यांनी मला माझे विचार स्वतंत्रपणे मांडू दिले, पण लेखन प्रभावी होण्यासाठी तसेच त्यात सुत्रबद्धता आणण्यासाठी योग्य त्या ठिकाणी अनमोल अशा सूचना केल्या. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मी माझे काम पूर्ण करू शकालो. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. तसेच मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे. तसेच संशोधन करण्याची मूळ प्रेरणा प्रा.डॉ.सी.जे.अभंग यांनी दिली आहे. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

सातारा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष मा. शरदराव चव्हाण, उपाध्यक्ष मा.संभाजीराव नलावडे व इतर पदाधिकारी यांची प्रेरणा व मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. त्या सर्वाचे मनःपूर्वक आभार मानतो. तसेच प्रा.डॉ.नलिनी वाघमारे, इतिहास विभाग प्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे व प्रा.डॉ विनायक जाधव, प्रा.डॉ.सदाशिव गावडे, प्रा.डॉ.दिलीप गायकवाड ,प्रा.पी. व्ही. सातपुते, प्रा .पी .डी. कांबळे, प्रा. डॉ. रवींद्र चव्हाण, प्रा.गौतम काटकर, प्रा. डॉ. विजय पवार, प्रा. जमीर मोमीन, प्रा.युवराज जाधव,प्रा.डॉ.भरत जाधव, प्रा.डॉ. सुरेश गायकवाड, श्री.मानसिंगराव कुमठेकर, प्रा.डॉ.दत्तात्रय कोरडे, प्रा.डॅा.संजय सरगडे या सर्वानी मला मदत केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी व आभारी आहे.

माझ्या संशोधन कार्याला सतत प्रेरणा व मदत करणारे माझ्या महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच माझ्या महाविद्यालयातील माझे सर्व सहकारी प्राध्यापक वृंद आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी संशोधनासाठी मला वेळोवळी सहाय्य केले, त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

माझ्या संशोधन कार्यासाठी इतर अनेकांचे सहकार्य लाभले. त्यामध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील ग्रंथालय,मिरज येथील खरे ग्रंथालय छत्रपती शिवाजी

कॉलेज ग्रंथालय, छत्रपती प्रतापसिंह महाराज नगर वाचनालय,सातारा, कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा येथील ग्रंथालय, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे ग्रंथालय, तसेच मुंबई पुराभिलेखागार मुंबई, पेशवे दप्तर पुणे, पुणे अभिलेखागार पुणे ,भारत इतिहास संशोधन मंड्ळ पुणे या ठिकाणी मला जी माहिती उपलब्ध झाली, याबद्दल मी ग्रंथालयांचे आभार मानतो.

माझ्या संशोधन कार्यात माझ्या कुटुंबाचे फार मोठे योगदान आहे. माझी आई श्रीमती सरस्वती भिमाजी सातपुते व वडील कै .भिमाजी लक्ष्मण सातपुते यांचे आशीर्वाद आणि माझी पत्नी सौ. मनिषा राजेंद्र सातपुते हिची प्रेरणा, प्रोत्साहन, चिंरजीव प्रतिक व गौरव सातपुते आणि भाऊ प्रा.सोमनाथ सातपुते यांनीही मला खूप मदत केली आहे. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

शोधप्रबंधाचे सुबक व आकर्षक टायपिंग करून देण्याचे काम समृद्धी टायपरायटींगचे प्रोप्रा. सौ.वैशाली कोरडे (वहिनी) यांचेही मी मनापासून आभार मानतो आणि धन्यवाद देतो.

अभ्यासक

श्री.राजेंद्र भिमाजी सातपुते

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ● | प्रमाणपत्र | I |
| ● | प्रतिज्ञापत्र | II |
| ● | प्रमाणपत्र | III |
| ● | ऋणनिर्देश | IV-V |
| १. | मराठयांचा दक्षिणेत प्रवेश | १ ते ४२ |
| | प्रबंधाचे शीर्षक, स़ंशोधन विषयाची निवड, संशोधनाची गरज व | |
| | विषयाचे महत्त्व, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संदर्भ साहित्याचा | |
| | आढावा, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, सिंद्धात | |
| | कल्पना, संशोधनाची पद्धत, संशोधन आराखडा | |
| २. | तिसरे पानिपतचे युद्ध व माधवराव पेशवे | ४३ ते ८१ |
| ३. | माधवरावांची दक्षिणेकडील पहिली व दुसरी स्वारी | ८२ ते १६२ |
| ४. | माधवरावांची कर्नाटकावरील तिसरी स्वारी | १६३ ते २२१ |
| ५. | माधवरावांची दक्षिणेकडील चौथी व पाचवी स्वारी | २२२ ते २८९ |
| ६. | उपसंहार | २९० ते ३२० |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ३२१ ते ३२८ |
| | परिशिष्टे | ३२९ ते ३४१ |
| | नकाशे | ३४२ ते ३५० |
| | छाया–चित्रे | ३५१ ते ३५३ |

प्रकरण पहिले

# मराठयांचा दक्षिणेत प्रवेश

१.१ प्रस्तावना

१.२ प्रबंधाचे शीर्षक

१.३ विषय निवड

१.४ संशोधनाची गरज व विषयाचे महत्त्व

१.५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१.६ संदर्भ साहित्याचा आढावा

१.७ संशोधनाची उद्दिष्टे

१.८ संशोधनाची गृहितके

१.९ सिंद्धात कल्पना

१.१० संशोधनाची पद्धत

१.११ संशोधन आराखडा

१.१२ दक्षिणेकडील कर्नाटक प्रदेश

१.१३ छत्रपती शाहू महाराज

१.१४ पेशवाईचा उदय व मंत्रिमंडळ

१.१५ छत्रपती शाहू, पहिले बाजीराव पेशवे व दक्षिण धोरण

१.१५.१ बाजीरावाची कर्नाटकावरील पहिली स्वारी

१.१५.२ बाजीरावाची कर्नाटकावरील दुसरी स्वारी

१.१५.३ कोल्हापूरच्या संभाजीस निजामाची चिथावणी व पालखेडची लढाई

१.१६ छत्रपती शाहू, नानासाहेब पेशवे व दक्षिण धोरण

१.१६.१ बाळाजीरावास पेशवेपदाची प्राप्ती

१.१६.२ पेशव्यांकडे सत्तेचे हस्तांतर

१.१६.३  नानासाहेब पेशव्यांच्या काळात विसाजी कृष्णचा उदय

१.१७   छत्रपती शाहूनंतरचे नानासाहेबांचे दक्षिण धोरण

१.१७.१  श्रीरंगपट्टणची स्वारी

१.१७.२  कर्नाटकची दुसरी स्वारी

१.१७.३  पेशव्यांची तिसरी कर्नाटक स्वारी

१.१७.४  सावनूरची स्वारी

१.१७.५  श्रीरंगपट्टणची स्वारी

१.१७.६ बळवंतराव मेहेंदळयांची कर्नाटकातील कामगिरी

१.१७.७  विसाजीची व गोपाळराव पटवर्धनाची कर्नाटकमधील कामगिरी

१.१८  समारोप

# प्रकरण पहिले

# मराठयांचा दक्षिणेत प्रवेश

## १.१ प्रस्तावना

छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकामध्ये महाराष्ट्र हा बहामनी राज्यामध्ये विभागलेला असताना आपल्या वडिलांच्या जहागिरीमध्ये स्वतंत्र मराठी राज्याची स्थापना केली, त्यामुळे मराठ्यांचा दक्षिण भारतातील आदिलशाही, कुतुबशाही व उत्तरेतील मोगल बादशाही यांच्याशी संघर्ष झाला. शिवाजी महाराजांनी मराठी राज्याच्या विस्ताराबरोबर आपल्या प्रशासनाची चौकट तयार केली. इ.स.१६७४ मध्ये आपला राज्याभिषेक करवून अष्टप्रधान मंडळ निर्माण केले त्या अष्टप्रधान मंडळापैकी एक प्रधान म्हणजे पेशवा होय.पेशवा हा फार्सी शब्द असून त्याचा मराठी अर्थ 'मुख्यप्रधान' हा होतो.शिवाजी महाराजांनी आपला पहिला पेशवा म्हणून मोरोपंत पिंगळे याची नेमणूक केली. राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहिम हाती घेतली .वेलूर,जिंजीसह कर्नाटकचा क ाही भाग जिंकून घेतला व मराठी राज्याची सीमा दक्षिण समुद्रास मिळाली. कर्नाटकात शिवाजी महाराजांनी नवीन राज्यव्यवस्था निर्माण करून त्या ठिकाणी हरजीराजे महाडिक यास नेमले.अविश्रांत परिश्रमाचा परिणाम होऊन ३ एप्रिल १६८० रोजी शिवाजी महाराजांचा रायगडावर मृत्यू झाला.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांनी मराठयांच्या राज्याचे संरक्षण करून मोगल बादशहाला कडवी झुंज दिली. परंतु मोगल बादशहा औरंगजेबाचे २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर येथे मृत्यू झाला.ही घटना मध्ययुगीन भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारी ठरली. या घटनेनंतर मोगल साम्राज्याच्या इतिहासाला व मराठी राज्याला वेगळे वळण लागले.१८ व्या शतकाचा इतिहास म्हणजे खऱ्या अर्थाने मराठयांचा इतिहास आहे परंतु तो परकीय इतिहासकारांनी निराशाजनक व चुकीच्या पध्दतीने इतिहास लिहिला आहे. त्यामुळे या इतिहासाने मराठयांमध्ये प्रेरणा किंवा चैतन्य निर्माण होत नाही.जोपर्यंत दक्षिण भारताच्या इतिहासाचे खऱ्या अर्थाने लिखाण होत नाही तोपर्यंत मराठयांचा इतिहास हा पूर्ण होऊ शकत नाही .

१८ व्या शतकामध्ये मराठयांचा खऱ्या अर्थाने उत्तर व दक्षिण भारतामध्ये साम्राज्यविस्तार झाला होता. हा साम्राज्यविस्तार करण्याचे काम ज्या पेशव्यांनी केले त्यामध्ये

बाळाजी विश्वनाथ,बाजीराव पहिला,बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे, थोरले माधवराव पेशवे,दुसरा बाजीराव इत्यादी. पेशव्यांच्या मालिकेमध्ये माधवराव पेशव्यांचे स्थान श्रेष्ठ दर्जाचे आहे. प्रामाणिकपणा, न्यायीवृत्ती, कामाचा उरक, हिशोबीपणा ,प्रजाहितदक्षता, निर्भिडवृत्ती, शिस्तीचा भोक्ता इत्यादी  राज्यकर्त्यांना आवश्यक असणारे सर्वच गुण त्यांच्या अंगी होते.सन १७६१ चे पानिपतचे तिसरे युध्द हे भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे ठरले.छत्रपती शाहूंच्या काळात बाळाजी विश्वनाथांने आणलेल्या सनदांमुळे मराठ्यांना दक्षिणेतील सहा सुभ्यातून चौथाई व सरदेशमुखी वसुलीचे हक्क मिळाल्याने,मराठ्यांनी ते हक्क प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी दक्षिण धोरण आखले परिणामी मराठ्यांचे सोंधे, बिदनूर, म्हैसूर, अर्काट, सावनूर, कर्नुल, कडप्पा, शिरा इत्यादी  सत्ताधिशासोबत मराठ्यांचा संबंध आला त्यामुळे मराठी राज्यांचे १८ व्या शतकामध्ये साम्राज्यात रूपांतर झाले.

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषय निवड ,संशोधनाची गरज व विषयाचे महत्त्व ,संशोधनाची व्याप्ती व मर्यादा ,संदर्भ साहित्याचा आढावा,संशोधनाची उद्दिष्टे ,संशोधनाची गृहितके ,सिंद्धात कल्पना ,संशोधनाची पद्धत, संशोधन आराखडा ,दक्षिणेकडील कर्नाटक प्रदेशाविषयी ,छत्रपती शाहू महाराज व बाळाजी विश्वनाथची कामगिरी,पेशवाईचा उदय व मंत्रिमंडळाचे नुतनीकरण,छत्रपती शाहू, पहिले बाजीराव पेशवे व दक्षिण धोरण,बाजीरावाची कर्नाटकावरील पहिली स्वारी, बाजीरावाची कर्नाटकावरील दुसरी स्वारी,कोल्हापूरच्या संभाजीस निजामाची चिथावणी व पालखेडची लढाई, छत्रपती शाहू, नानासाहेब पेशवे व दक्षिण धोरण,बाळाजीरावास पेशवेपदाची प्राप्ती, पेशव्यांकडे सत्तेचे हस्तांतर,नानासाहेब पेशव्यांच्या काळात विसाजी कृष्णचा उदय, छत्रपती शाहूनंतरचे नानासाहेबांचे दक्षिण धोरण,श्रीरंगपट्टणची स्वारी,कर्नाटकची दुसरी स्वारी, पेशव्यांची तिसरी कर्नाटक स्वारी,सावनूरची स्वारी,श्रीरंगपट्टणची स्वारी,बळवंतराव मेहेंदळयांची कर्नाटकातील कामगिरी,विसाजीची व गोपाळराव पटवर्धनाची कर्नाटकमधील कामगिरी इत्यादी घटकांच्या आधारे दक्षिणेकडील प्रदेश म्हणजेच कर्नाटकचा प्रदेश होय, हे शहाजीराजे भोसले पासून ते नानासाहेब पेशवे पर्यंतच्या कालखंडातील घटनांचा थोडक्यात आढावा घेऊन १८ व्या शतकामध्ये मराठी राज्याचे साम्राज्यात कसे रूपांतर झाले याची माहिती या प्रकरणामध्ये  देण्यात आली आहे.

### १.२ प्रबंधाचे शीर्षक

### “माधवराव पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरण–एक अभ्यास (इ.स.१७६१ ते इ.स. १७७२)”

### १.३ विषय निवड

संशोधनासाठी विषय निवडतना ज्या विषयाचा अद्याप सर्वांगीण अभ्यास झालेला नाही तसेच ज्या विषयासबंधी प्रकाशित व अप्रकाशित संदर्भ साधने विपुल प्रमाणात उपलब्ध होण्याची शक्यता असते असाच विषय निश्चित केला जातो.‘माधवराव पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरण – एक अभ्यास इ. स. १७६१ ते १७७२’ हा एक विषय आहे. माधवराव पेशव्यांचा जन्म १६ फेब्रुवारी १७४५ रोजी सावनूर जिल्हा धारवाड येथे झाला. गोपिकाबाई या हुशार व बुद्धिमान मातेच्या मार्गदर्शनाखाली मोडी, बालबोध लेखन वाचनादी शिक्षण पार पडले. थोरला भाऊ विश्वासराव यांचा पानिपत येथे झालेल्या मृत्यूमुळे नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूनंतर एका महिन्याने सातारच्या छत्रपतीकडून माधवरावांना वयाच्या १६ व्या वर्षी पेशवे पदाची प्राप्ती झाली.त्यांची कारकीर्द ही११ वर्षांची आहे.त्यातील पहिली २ वर्षे तर राघोबादादा बरोबर यादवी संघर्षात गेली तर शेवटची एक ते दोन वर्षे ही स्वत:च्या आजारपणातच गेली परिणामी माधवराव पेशव्यांना सात ते आठ वर्षांचीच कारकीर्द मिळाली. या कालखंडात त्यांनी अखंड उद्योग करून पानिपत युद्धाने झालेली मराठ्यांची हानी भरून काढली तसेच मराठी सत्तेचे वर्चस्व उत्तर व दक्षिण भारतात निर्माण केले म्हणून पीएच.डी. प्रबंधासाठी मी “माधवराव पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरण–एक अभ्यास(इ.स.१७६१ते इ.स.१७७२)” हा विषय निवडला आहे.

पेशव्यांनी विविध सरदारांशी चर्चा करून आपले दक्षिण धोरण विविध हेतूपूर्तीसाठी आखले व पद्धतशीरपणे राबविलेले दिसून येते त्यावेळी मराठी राज्यामध्ये अस्थिरता निर्माण झाली होती. उत्तर व दक्षिण भारतामध्ये मराठयांच्या अनेक शत्रूंनी उचल खाल्ली होती. याशिवाय पेशव्यांच्या घरामध्ये गृहकलह सुरू झाला होता. अशा बिकट परिस्थितीत माधवराव पेशव्यांना मराठयांच्या राज्याची जबाबदारी घ्यावी लागली. माधवराव पेशव्यांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी आपली सत्ता उत्तर व दक्षिण भारतात मजबूत करून मराठयांचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले होते. तिसऱ्या पानिपतच्या पराभवाच्या पार्श्वभूमीवर हैद्राबादच्या निजामाने पुण्यावर स्वारी केली होती. माधवराव पेशव्याने निजामाचा गोदावरी नदीच्या काठी राक्षसभुवन

येथे पराभव केला व मराठी राज्याची सूत्रे आपल्या हाती घेतली त्यानंतर माधवरावाने उत्तर भारतात मराठयांचे वर्चस्व निर्माण केले तर दक्षिण भारतात निजाम, हैदरअली, इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच या परकीय सत्तांचा बंदोबस्त करून तिसऱ्या पानिपतच्या पराभवाचा कलंक धुवून काढला. आपल्या कर्तृत्वाची व बुद्धीमत्तेची चुणूक दाखवून मराठयांच्याच इतिहासात नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानामध्ये आपली कारकीर्द अविस्मरणीय ठरविली. अशा या थोर माधवराव पेशव्यांचा राजयक्ष्मा या रोगाने १८ नोव्हेंबर १७७२ रोजी थेऊर येथे मृत्यू झाला.

### १.४ संशोधनाची गरज व विषयाचे महत्त्व

माधवराव पेशव्यांनी दक्षिण धोरण का आखले. दक्षिण भारतातील कर्नाटक या एकाच प्रांतावर वारंवार मोहिमा का काढाव्या लागल्या त्याचा शोध घेणे. दक्षिण धोरणाचा चिकित्सक अभ्यास करणे, मोहिमांमध्ये कोणती युद्ध तंत्रे वापरली, कर्नाटक संघर्षामध्ये माधवरावांना मिरजेच्या पटवर्धन सरदारांनी कोणती मदत केली. दक्षिण भारतातील हैदरअलीच्या संघर्षामध्ये मुरारराव घोरपडयांनी कोणती कामगिरी बजावली होती. दक्षिण भारतातील धोरण आखत असताना पुणे, सातारा, मिरज, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी कोणत्या स्थानिक घटना घडल्या होत्या. दक्षिण धोरणाचा मराठी राज्याला कोणता फायदा झाला. दक्षिण धोरणाचे मराठी राज्यावर व कर्नाटक प्रांतावर कोणकोणते परिणाम झाले. याविषयी माधवराव पेशव्यांचे कार्य दुर्लक्षित राहिले आहे. कारण माधवराव पेशवे यांचे चरित्र अनेकांनी लिहिले परंतु दक्षिण धोरणावर आजतागायत कोणी प्रकाश टाकलेला नाही. १८ व्या शतकाच्या इतिहासामध्ये माधवराव पेशव्यांचे धोरण अतिशय महत्त्वाचे होते. कारण मराठयांच्या इतिहासातील पेशव्यांच्या मालिकेतील माधवराव पेशव्यांचे स्थान खूपच महत्त्वाचे आहे. जोपर्यंत दक्षिण भारतातील मराठयांच्या इतिहासाचे लेखन होत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने मराठयांचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही असे वाटते. माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणावर अभ्यास होणे गरजेचे आहे. कारण स्थानिक इतिहासावरच राष्ट्रीय इतिहास उभा राहू शकतो म्हणूनच माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणाचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

आधुनिक काळामध्ये मानव हा इतिहासाचा केंद्रबिंदू झाला आहे तसेच इतिहासाचे स्वरूप बदलले आहे आणि व्याप्तीही वाढलेली आहे. अलिकडच्या काळामध्ये मराठयांच्या इतिहासाची अनेक संदर्भ मोडी लिपी, इंग्रजी, पोर्तुगीज, व फ्रेंच या परकीय भाषेमध्ये उपलब्ध

होत आहेत. जसजशी साधने उपलब्ध होत जातात तसतसा इतिहासही बदलत जातो म्हणजेच इतिहासाचे पुनर्लेखन होणे आवश्यक आहे त्यामुळेच हा विषय मी प्रबंधासाठी निवडला आहे.

### १.५संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत संशोधन हे माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणावर प्रकाश टाकणारे आहे. इ.स.१७६१ ते इ.स.१७७२ या कालखंडापर्यंत प्रस्तुत विषयाचा अभ्यास केला आहे. सन १७६१ च्या तिसऱ्या पानिपत युद्धाने भारताच्या इतिहासावर दूरगामी परिणाम झाले. मराठी राज्यामध्ये अराजक व अस्थिरता निर्माण झाली होती. माधवराव पेशव्यांनी दक्षिण भारतातील कर्नाटक या एकाच प्रांतावर वारंवार मोहिमा का काढल्या त्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. दक्षिण धोरणामध्ये माधवराव पेशव्यांना विविध मराठा सरदारांनी मदत केली त्याची माहिती देण्यात आली आहे. दक्षिण धोरण आखत असताना सातारा, मिरज, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी कोणकोणत्या स्थानिक घटना घडल्या यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे . माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणाचे मराठी राज्याला कोणते फायदे झाले व त्याचे काय परिणाम झाले. कर्नाटक प्रांतावर कोणते परिणाम झाले. माधवराव पेशव्यांनी दक्षिण भारतात मराठी सत्तेचा वर्चस्व कसे निर्माण केले. दक्षिण धोरणामध्ये हैदरअली व माधवराव पेशवे यांनी कोणती युद्धनिती वापरली याची माहिती देण्यात आली आहे. पेशवे व निजाम संबंधाचा आढावा घेण्यात आला आहे. माधवराव पेशव्यांच्या कार्यकर्तृत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे व मराठयांच्या इतिहासामध्ये नवीन भर टाकण्याचा प्रयत्न केला आहे. १८ व्या शतकाच्या इतिहासाची नव्याने पुर्नमांडणी चालू आहे त्यादृष्टीने माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणाचे चिकित्सक मूल्यमापन करून १८ व्या शतकातील मराठयांच्या दक्षिण धोरणाचे योगदान स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

### १.६ संदर्भ साहित्याचा आढावा

“माधवराव पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरण–एक अभ्यास (इ.स.१७६१ तेइ.स.१७७२)” या विषयावर यापूर्वी सलगपणे संशोधन झालेले नाही. आतापर्यंत झालेल्या लिखाणात स.अ.सहस्त्रबुद्धे यांनी १९४८ मध्ये श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांचे चरित्र लिहिलेले उपलब्ध आहे तसेच ए.सी.बॅनर्जी यांचे १९३८ मधील पेशवा माधवराव पहिला या दोन्ही पुस्तकातून खूपच त्रोटक माहिती आलेली आहे. त्याचप्रमाणे मराठयांचे इतिहासकार गो.स.सरदेसाई यांनी

मराठी रियासत खंड – ५ मध्ये हैदर नायकाशी संग्राम या आशयाचे एक छोटेशे प्रकरण लिहिले आहे. एस.डी.कर्णिक यांनी ' इकॉनॉमिक्स लाईफ ऑफ इन महाराष्ट्रा अंडर पेशवा माधवराव '१९७६ मध्ये या विषयावर पीएच.डी.प्रबंध मुंबई विद्यापीठास सादर केला आहे. तसेच इतर छोटया मोठया वेगवेगळया पुस्तकातून माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणाची सविस्तर अशी माहिती उपलब्ध होत नाही. मावळणकर अे.अे. यांनी ' लाईफ अॅण्ड टाईम ऑफ पेशवा माधवराव पहिला ' या विषयावर पीएच.डी.प्रबंध मुंबई विद्यापीठास १९३० मध्ये सादर केलेला आहे त्यामध्ये दक्षिण धोरणावर सविस्तर माहिती आलेली नाही.

अलिकडच्या काळामध्ये नुकतेच डॉ.आचार्य धनंजय यांनी थोरले माधवराव पेशवे–२०११ यांचे चरित्र लिहिले आहे परंतु माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणावर कोणीच वस्तुनिष्ठ लिखाण आजपर्यत केलेले नाही परिणामी  माधवराव पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरण व त्याचे मराठी राज्यावर आणि कर्नाटक प्रांतावर कोणकोणते परिणाम झाले हे त्यांचे कार्य आजतागायत दुर्लक्षित राहिले आहे. पुणे अभिलेखागार मध्ये पेशव्यांनी लिहलेली विविध पत्रे, अप्रकाशित व प्रकाशित कागदपत्रांचा वापर करण्यात आला आहे. तसेच माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणासाठी ग.चि.वाड यांना संपादित केलेली माधवराव पेशव्यांची रोजनिशी भाग– १ व २ उपयुक्त ठरला. गो.स.सरदेसाई यांनी संपादित केलेली पेशवे दप्तरातील निवडक खंड ३७ व ३९ आणि इतर यांचा उपयोग झाला. खरे.वा.वा.यांनी संपादित केलेली ऐतिहासिक लेखसंग्रह खंड १ ते ६ पेशव्यांच्या दक्षिण धोरणावर चांगला प्रकाश टाकण्यासाठी उपयोगी ठरले.

कुलकर्णी मधुकर रामचंद्र यांचा 'नाना फडणीसाच्या प्रशासन व्यवस्थेखालील मराठी राज्यशासनाचे स्वरूप ' पुणे विद्यापीठ १९८४ हा प्रबंध माधवरावास नानाने केलेली मदत यासाठी उपयुक्त ठरला . राजवाडे वि.का. यांनी संपादित केलेली मराठयांच्या इतिहासाची साधने काही खंड उपयुक्त ठरले. याशिवाय इतर प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा आधार घेण्यात आला. त्याचप्रमाणे संशोधक मासिक, भारत इतिहास संशोधन मंडळाचे त्रैमासिक, समाजप्रबोधन पत्रिका इत्यादी व इतर  संदर्भ ग्रंथाचा आधार घेण्यात आला आहे.

**१.७ संशोधनाची उद्दिष्टे**

१. माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणाचा चिकित्सक अभ्यास करणे.

२. दक्षिण भारतातील कर्नाटक या एकाच प्रांतावर माधवराव पेशव्यांनी वारंवार मोहिमा का काढल्या त्यामागील कारणांचा शोध घेणे.

३. माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणामध्ये निरनिराळया मराठा सरदारांनी केलेल्या कामगिरींचा अभ्यास करणे.

४. दक्षिण विषयक धोरण आखत असताना पुणे, सातारा, मिरज, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी कोणकोणत्या स्थानिक महत्त्वाच्या घटना घडल्या यांचा शोध घेणे.

५. दक्षिण विषयक धोरणामध्ये माधवराव पेशवे व निजाम यांच्या संबंधाचा अभ्यास करणे.

६. दक्षिण धोरणातील कर्नाटक संघर्षामध्ये हैदरअली व माधवराव पेशवे यांनी कोणकोणती युद्धनिती वापरली याचा शोध घेणे.

७. दक्षिण धोरणामध्ये माधवराव पेशवे व परकीय सत्ता(इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच) यांच्या संबंधाचा शोध घेणे.

८. माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणाचे मराठी राज्याला झालेले फायदे व परिणाम यांचा अभ्यास करणे.

९. माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणाचे कर्नाटक प्रांतावर कोणकोणते परिणाम झाले यांचा शोध घेणे.

१०. दक्षिण धोरणाच्या अनुषंगाने माधवराव पेशव्यांच्या कर्तृत्वाचा शोध घेणे.

## १.८ संशोधनाची गृहितके

१. माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणामुळे मराठी राज्याला अनेक फायदे झालेले आहेत.

२. दक्षिण धोरणामध्ये अनेक मराठा सरदारांनी योगदान दिलेले आहे.

३. दक्षिण धोरण आखत असताना पुणे, सातारा, मिरज, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी अनेक स्थानिक घटना घडलेल्या आहेत.

४. दक्षिण धोरणामुळे माधवरावांनी पानिपत पूर्वीचे मराठी सत्तेचे प्रभूत्व दक्षिणेत निर्माण केल्याचे दिसते.

५. पेशव्यांच्या मालिकेत माधवराव पेशव्यांचे स्थान श्रेष्ठ दिसून येते.

६. दक्षिण धोरणाचे मराठी राज्यावर जसे परिणाम झाले तसेच दक्षिण भारतावर झाल्याचे दिसून येते.

७. दक्षिण धोरणाच्या अनुषंगाने माधवरावांच्या अंगी असलेल्या विविध गुणांची माहिती मिळते.

### १.९ सिंद्धात कल्पना

१. माधवराव पेशव्यांनी पूर्वी झालेल्या मराठी सत्ताधिशांच्या दक्षिणेकडील धोरणातील चुका दुरूस्त करण्यासाठी दक्षिण धोरण आखले होते.

२. माधवराव पेशव्यांनी दक्षिणेतील स्थानिक सत्ताधीश व परकीय सत्ता यांच्याशी मुत्सद्देगिरीच्या जोरावर आपले दक्षिण धोरण यशस्वी करण्याचा प्रयत्न केला होता.

३. माधवराव पेशव्यांनी मराठा सरदारांची एकजूट करून त्या सरदारांचे कर्तृत्व व मर्यादा ओळखून त्यांच्या मदतीने आपले दक्षिण धोरण राबविले होते.

४. दक्षिण धोरणामध्ये हैदरअली व माधवराव पेशवे यांच्या युद्धनितीतून माधवराव पेशव्यांचे युद्धकौशल्य, नेतृत्व व इतरही गुण स्पष्ट होतात.

५. माधवराव पेशव्यांनी आपले दक्षिण धोरण आखत असताना मराठा राज्यातील विविध स्थानिक समस्या सोडविल्या आहेत.

### १.१० संशोधनाची पद्धत

वरील विषयाच्या प्रबंधाच्या संशोधनासाठी ऐतिहासिक साधन शोध(Heuristic Method) पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. विषयाचे लेखन करीत असताना प्रामुख्याने प्राथमिक अप्रकाशित व प्रकाशित साधनांचा आधार घेण्यात आला आहे. तसेच पुणे, सातारा, कोल्हापूर, मिरज येथील सार्वजनिक वाचनालयातील अहवाल, पुस्तके, त्रैमासिके इत्यादी दुय्यम संदर्भ साधनांच्या आधारे विषयाची मांडणी करण्यात आली आहे. सर्व प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधने वापरण्यापूर्वी त्याचे बाहयरंग व अंतरंग परीक्षण करून संबंधित विषयाची मांडणी केली आहे.

### १.११ संशोधन आराखडा

प्रस्तुत विषयाचा पुढील प्रकरणानुसार अभ्यास केला जाणार आहे.

१. प्रकरण पहिले :– मराठयांचा दक्षिणेत प्रवेश

२. प्रकरण दुसरे :– तिसरे पानिपत युद्ध व माधवराव पेशवे

३. प्रकरण तिसरे :– माधवरावांची दक्षिणेकडील पहिली व दुसरी स्वारी

४. प्रकरण चौथे :– माधवरावांची दक्षिणेकडील तिसरी स्वारी

५. प्रकरण पाचवे :– माधवरावांची दक्षिणेकडील चौथी व पाचवी स्वारी

६. प्रकरण सहावे :– उपसंहार

**प्रकरण पहिले :– मराठयांचा दक्षिणेत प्रवेश**

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषय निवड ,संशोधनाची गरज व विषयाचे महत्त्व ,संशोधनाची व्याप्ती व मर्यादा ,संदर्भ साहित्याचा आढावा,संशोधनाची उद्दिष्टे ,संशोधनाची गृहितके ,सिंद्धात कल्पना ,संशोधनाची पद्धत, संशोधन आराखडा ,दक्षिणेकडील कर्नाटक प्रदेशाविषयी ,छत्रपती शाहू महाराज व बाळाजी विश्वनाथची कामगिरी,पेशवाईचा उदय व मंत्रिमंडळाचे नुतनीकरण, छत्रपती शाहू, पहिले बाजीराव पेशवे व दक्षिण धोरण,बाजीरावाची कर्नाटकावरील पहिली स्वारी, बाजीरावाची कर्नाटकावरील दुसरी स्वारी,कोल्हापूरच्या संभाजीस निजामाची चिथावणी व पालखेडची लढाई, छत्रपती शाहू, नानासाहेब पेशवे व दक्षिण धोरण, बाळाजीरावास पेशवेपदाची प्राप्ती, पेशव्यांकडे सत्तेचे हस्तांतर,नानासाहेब पेशव्यांच्या काळात विसाजी कृष्णचा उदय, छत्रपती शाहूनंतरचे नानासाहेबांचे दक्षिण धोरण,श्रीरंगपट्टणची स्वारी,कर्नाटकची दुसरी स्वारी, पेशव्यांची तिसरी कर्नाटक स्वारी,सावनूरची स्वारी,श्रीरंगपट्टणची स्वारी,बळवंतराव मेहेंदळयांची कर्नाटकातील कामगिरी,विसाजी कृष्ण व गोपाळराव पटवर्धनाची कर्नाटकमधील कामगिरी इत्यादी घटकांच्या आधारे दक्षिणेकडील प्रदेश म्हणजेच कर्नाटकचा प्रदेश होय, हे शहाजीराजे भोसले पासून ते नानासाहेब पेशवे पर्यंतच्या कालखंडातील घटनांचा थोडक्यात आढावा घेऊन १८ व्या शतकामध्ये मराठी राज्याचे साम्राज्यात कसे रूपांतर झाले याची माहिती या प्रकरणामध्ये देण्यात आली आहे.

**प्रकरण दुसरे :– तिसरे पानिपत युद्ध व माधवराव पेशवे**

तिसऱ्या पानिपतच्या युद्धाने भारताच्या इतिहासावर दूरगामी परिणाम घडून आले. यामध्ये प्रामुख्याने नानासाहेब पेशव्यांचा झालेला मृत्यू, दक्षिण भारताच्या राजकारणात हैदर अलीचा झालेला उदय,हैद्राबादच्या निजामाचा झालेला उदय,उत्तरेत मराठी सत्तेच्या वर्चस्वाला निर्माण झालेले आव्हान व इंग्रजी सत्तेचा उदय, प्रचंड जिवित व वित्तहानी ,कर्नाटकच्या राजकारणावर झालेला परिणाम इत्यादीचा समावेश होतो. माधवराव पेशव्यांचा जन्म, बालपण व शिक्षण, माधवरावास पेशवे पदाची झालेली प्राप्ती, मराठी राज्याची स्थिती, मराठी राज्य स्थिर

करण्यासाठी माधवरावाने केलेले विविध प्रयत्न व सुधारणा, उत्तर भारता ऐवजी दक्षिण धोरण का आखले ,दक्षिण धोरण स्वीकारण्याची विविध कारणे इत्यादी घटकांची माहिती या प्रकरणात देण्यात आली आहे.

**प्रकरण तिसरे :– माधवरावांची दक्षिणेकडील पहिली व दुसरी स्वारी**

या प्रकरणामध्ये माधवराव पेशव्यांनी आखलेल्या दक्षिणेकडील पहिल्या कर्नाटक मोहमेची पार्श्वभूमी, कर्नाटक मोहिमेचा उदय व स्वारीचे उद्देश, माधवराव पेशव्यांनी स्वारीची केलेली तयारी, मोहिमेतील, सातारा, मिरज, कोल्हापूर इत्यादी ठिकाणच्या महत्त्वाच्या स्थानिक घटना, मराठा सरदारांनी माधवरावास केलेली मदत, बाळापूरच्या लढाईत हैदरअलीचा झालेला पराभव, माधवरावाने पहिली मोहिम अर्धवट का सोडली व माधवरावाचे पुण्याला आगमण, गृहकलह व राक्षसभुवनच्या लढाईत निजामाचा केलेला बंदोबस्त, राक्षसभुवनची लढाई, हैदरअलीच्या सन १७६२ नंतरच्या आक्रमक कारवाया, माधवराव पेशव्यांनी स्वारीची केलेली तयारी, दुसऱ्या कर्नाटक मोहिमेचे उद्देश, प्रत्यक्ष मोहिमेला सुरूवात, चिकोडी, मनोली व कागल जिजाबाईच्या हवाली, हैदरअलीच्या चाललेल्या मसलती, माधवराव पेशवे व हैदरअली यांच्या संघर्षातील झालेल्या लढाया, रट्टेहळ्ळीची लढाई, सावनूर व हावेरीची लढाई, धारवाडचा वेढा, जडीहनवटीची लढाई, अनवडीची लढाई, रघुनाथरावाची भूमिका व अनंतपूरचा तह, दुसऱ्या कर्नाटक मोहिमेचे यश अर्थात मराठी राज्याला झालेला फायदा इत्यादी घटकांची माहिती देण्यात आलेली आहे.

**प्रकरण चौथे :– माधवरावांची दक्षिणेकडील तिसरी स्वारी**

या प्रकरणामध्ये माधवराव पेशव्यांनी कर्नाटकाहून परत आल्यानंतर नागपूरचे जानोजी भोसले व बारामतीचे बाबुजी नाईक व भवानराव प्रतिनिधी या विरोधकांचा कसा बंदोबस्त केला. निजामाशी मैत्रीचा तह, कर्नाटक मोहिमेच्या उदयाची पार्श्वभूमी, माधवराव पेशव्यांनी स्वारीची केलेली तयारी व स्वारीचा उद्देश, प्रत्यक्ष मोहिमेला प्रारंभ, शिरे व मदगिरीची प्राप्ती, बाळापूर व चेनरायदुर्गाची प्राप्ती करून मराठयांनी हैदर अलीच्या तावडीतून संस्थाने कशी सोडवली. दक्षिण तुंगभद्रेचा तट कसा काबीज केला. माधवराव पेशव्यांनी आपली मोहिम आटोपती क ा घेतली व हैदरअलीशी तह, माधवराव पेशव्यांचे पुण्याला आगमण आणि मराठी राज्याला झालेला फायदा इत्यादी घटनांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**प्रकरण पाचवे :– माधवरावांची दक्षिणेकडील चौथी व पाचवी स्वारी**

या प्रकरणामध्ये माधवराव पेशव्यांनी दक्षिणेकडील चौथी मोहिम का आखली. या मोहिमेची पार्श्वभूमी, हैदरअलीचा मुराररावावर छापा व मुराररावाची समयसुचकता, माधवराव पेशवे व इंग्रज संबंध, हैदरअलीच्या आक्रमक कारवाया, रघुनाथराव व जानोजी भोसल्यांचा बंदोबस्त, दक्षिणेकडील चौथ्या स्वारीचे हेतू कोणते होते. माधवराव पेशव्यांनी मोहिमेची केलेली पूर्वतयारी, प्रत्यक्ष मोहिमेला सुरूवात व महत्त्वाच्या लढाया, गुर्रमकोंडयाची लूटालूट व भैरवदुर्गची प्राप्ती, गोपाळराव पटवर्धनावर हैदरअलीचा छापा व सुटका ,माधवराव पेशव्यांची योजना आणि मुलबागल व कोल्हारची प्राप्ती, पेशव्यांची योजना आणि निजगल व देवरायदुर्गची प्राप्ती, चिकबाळापूर व इतर ठाण्यांची प्राप्ती आणि विजयाची क ारणे, माधवराव पेशव्यांस नाना फडणीसाने केलेली मदत, माधवराव पेशव्यांस मुरारराव घोरपडयांनी केलेली मदत,माधवराव पेशव्यांनी मोहिम आटोपती का घेतली .

माधवरावाने दक्षिणेची व्यवस्था कशी लावली. दक्षिण मोहिमेचे नेतृत्व त्रिंबक मामा पेठयांकडे व माधवराव पेशव्यांचे पुण्यास आगमण, मराठा सरदारांचा हैदरला शह, गुर्रमकोंडयाची मोहिम व मीररेझाची कैद, माधवराव पेशव्यांची दक्षिणेकडील पाचव्या स्वारीची तयारी, मोहिमेला सुरूवात व पेशव्यांचे पुण्यास आगमन, त्रिंबकमामा पेठयांची कामगिरी व पेशव्यांचे दक्षिण धोरण, मोतीतलावाची लढाई, हैदरची सर्वत्र दाणादाण व श्रीरंगपट्टणचा वेढा, माधवरावांच्या दक्षिण धोरणामध्ये परकीय सत्तेची मदत, हैदरअलीचा मराठयांशी तह व मराठी राज्याला झालेला फायदा, माधवराव पेशव्यांचा मृत्यू इत्यादी घटनांची माहिती या प्रकरणामध्ये देण्यात आलेली आहे.

**प्रकरण सहावे :– उपसंहार**

या प्रकरणामध्ये “माधवराव पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरण–एक अभ्यास (इ.स.१७६१ ते इ.स.१७७२)” या कालावधीत उपलब्ध झालेल्या अप्रकाशित व प्रकाशित, दुय्यम संदर्भ साधनांच्या आधारे तसेच संशोधनासाठी निवडलेल्या कागदपत्रांच्या आधारे मूल्यमापन केले आहे. या सर्व प्रकरणाच्या आधारे प्रबंधाचे उद्देश स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

## १.१२ दक्षिणेकडील कर्नाटक प्रदेश

'कर्नाटक' ही संज्ञा मध्ययुगात मराठयांच्या राजक ारणात आजच्या सारखी काटेकोरपणे भाषिक राज्याच्या अर्थाने वापरली जात नव्हती. आजचे आंध्रप्रदेश,कर्नाटक तेलंगण,तामिळनाडू आणि के रळ याप्रदेशाला कर्नाटक म्हटले जाई. ज्या देशात कानडी भाषेचा मुख्यत्वे प्रचार आहे तो'कर्नाटक देश'होय. मुस्लिमांनी दक्षिण भारतात राज्ये स्थापन केली तेव्हा त्या लोकांनी कृष्णेपासून रामेश्वरापर्यंत सर्वच प्रदेशास 'कर्नाटक' ही संज्ञा दिली होती. कर्नाटक म्हणजे कानडी भाषेच्या व्याप्तीचा प्रदेश, कृष्णानदीच्या दक्षिणेपासून या प्रदेशाची सुरूवात होते. हिंदुस्थानात पश्चिमेस असणाऱ्या पर्वतरांगाना सह्याद्री तर पूर्वेकडील असणाऱ्या डोंगर रांगाना बालाघाट म्हणतात.बाला म्हणजे उंच व पाईन म्हणजे सखल या फारशी संज्ञा त्यावेळी प्रचारात होत्या,त्यामुळे बालाघाट व पाईनघाट हे शब्द पूर्व किनाऱ्यावरील प्रदेशात वापरीत असत.[१] या दक्षिणेकडील प्रदेशात मुख्यत: चार भाषा अस्तित्वात होत्या. तेलगू, तामिळ,मल्याळम व कानडी अशी त्यांची नावे होती. तेलगू भाषेच्या प्रदेशाला तेलंगण,तामिळ भाषेच्या प्रदेशाला द्रविडदेश,पश्चिमेस घाटाखालील प्रदेशास मलबार व हे तीन प्रदेश सोडून मधल्या राहिलेल्या भागाला 'कर्नाटक' या नावाने ओळखले जात होते. सध्याचे बेळगाव, धारवाड, विजापूर व गुलबर्गा हे जिल्हे कर्नाटकाचेच भाग आहेत व ते महाराष्ट्राला लागून आहे.प्राचीन काळी दक्षिण हिंदुस्थानात विजयनगर सारखे प्रबळ हिंदू राज्य विद्यमान होते. त्यावेळी जमाबंदीच्या कामकाजावर निरनिराळया ठिकाणी अंमलदार नेमण्यात आले होते. ते अंमलदार दक्षिणेतील राज्य नष्ट झाल्यावरही आपली वंशपरंपरागत वतने सांभाळून राहिले त्यांना 'पाळेगार' म्हणजे संस्थानिक ही संज्ञा प्राप्त झाली होती.[२] कर्नाटकातील जिल्हयाच्या ठिकाणी काही पाळेगार होते त्यांना 'देसाई' ही संज्ञा प्राप्त झाली होती म्हणजे या पाळेगारांपैकी काहींना देसाई म्हणण्याचा प्रघात पडला होता.[३]

कर्नाटकात मराठयांचा प्रवेश प्रथम शहाजीराजे भोसले यांच्या रूपाने झाला. विजापूरच्या बादशहाकडून त्यांची बालाघाटच्या बंदोबस्तासाठी नेमणूक झाली होती.फौजेच्या खर्चाकरिता त्यांना शिरे, होस्कोट, कोलार, बाळापूर व बंगळूर (बेंगलोर) असे पाच परगणे मिळाले होते तसेच पाईन घाटापैकी म्हणजे द्रविड देशांपैकी आरणी, वेलोर, व जिंजी हे किल्ले आणि तंजावर संस्थान काबीज केले होते. [४] छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकानंतर

कर्नाटक मोहिम हाती घेवून वेलोर, जिंजी,तंजावर खेरीज पाईनघाट व अनेक किल्ले जिंकून मराठयांची सत्ता प्रथम स्थापन केली.[५] १८व्या शतकात मराठयांच्या वैभवाचा कळस होऊन गेला. मराठी भाषा ही सार्वभौम राज्याची भाषा होऊन बसली.मराठी सरदारांशी खंडणीबद्दल, पत्रव्यवहार करणे,त्यांच्या भेटी घेऊन नजराणे देणे,त्यांच्या जवळ कुमक मागणे,इत्यादी प्रसंगाकरिता तिकडील राजे राजवाडयास मराठी ब्राम्हण कारकून ठेवण्याशिवाय गत्यंतरच नव्हते.[६] मोगल बादशहा औरंगजेबाने दक्षिण हिंदुस्थानात कर्नाटकातील काही भागावर आपली सत्ता स्थापन केली होती.दक्षिणेत मोगलांच्या वर्चस्वाखालील प्रदेशांचे त्यांनी सहा सुभे निर्माण केले होते त्यांची नावे १. खानदेश २. वऱ्हाड ३. औरंगाबाद ४. बेदर ५. हैद्राबाद (गोवळकोंडे), ६. विजापूर अशी होती.

मोगलांनी कर्नाटकात जितका प्रदेश प्राप्त केला होता तितक्या सगळया प्रदेशाचा समावेश ते हैद्राबाद व विजापूर या दोन सुभ्यांमध्ये करीत गेले.एकाला हैद्राबाद कर्नाटक व दुसऱ्यास विजापूर कर्नाटक अशी नावे त्यांनी दिली.मोगल बादशहाच्या प्रभावाखाली निजामउलमुल्क यास दक्षिणेतील मोगलांचा प्रतिनिधी म्हणून सत्तासुत्र दिल्यानंतर या सहा सुभ्यावर निजामाची सत्ता प्रभाव गाजवू लागली.[७] मोगलांच्या दक्षिणेतील सुभेदारांच्या हाताखाली मुलकी व फौजदारी कामाकरिता बादशहाने ठिकठिकाणी आपले अधिकारी नियुक्त केले होते.ते पुढे वंशपरंपरागत सामर्थ्यवान होऊन नबाबी कारभार चालवू लागले.कर्नाटकात असे पाच नबाब १८ व्या शतकात विशेष सामर्थ्यवान होते, ते म्हणजे शिरे, कर्नूल, कडाप्पा, सावनूर व अर्काट होय.अर्काटच्या नबाबाचे राज्य कर्नाटक बालाघाटावर होते.विजापूरच्या सुलतानांकडून शहाजीस कर्नाटकात जहागीर होती तिचा समावेश शिऱ्याच्या हद्दीत होत होता.सावनूरच्या नबाबाचे राज्य बरेच विस्तृत असून त्याचा अंमल कृष्णा व तुंगभद्रा या दोन नद्यामधील प्रदेशावर होता. याशिवाय आणखी अनेक संस्थाने कर्नाटकात स्वतंत्र असल्यासारखी होती. म्हैसूर, बिदनूर, चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी, अनगुंदी व रायदुर्ग यांचा त्यात समावेश होता. या शिवाय तंजावरचे संस्थान व घोरपडे यांनी स्थापन केलेले गुत्तीचे संस्थान ही दोन मराठयांची संस्थाने कर्नाटकात होती.[८]

## १.१३ छत्रपती शाहू महाराज

छत्रपती संभाजीपुत्र शाहू यास मोगल सुभेदार झुल्फिकारखानाने नोंव्हबर १६८९ मध्ये महाराष्ट्राची राजधानी रायगड ताब्यात घेतल्यावर शाहू व मातोश्रीस औरंगजेबाने आपल्या कैदेत ठेवले होते.औरंगजेबाने शाहूस चांगले वागविले.२० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यू झाला व त्याच्या मुलांमध्ये बादशाहीसाठी संघर्ष सुरू झाला.दक्षिण सुभ्यापैकी गोवळकोंडा व विजापूर हे दोन भाग कामबक्ष यासकडे होते.पण दिल्लीचे तख्त ताब्यात घेऊन स्वत: बादशहा व्हावे असे शहाजादा मुअज्ञमला वाटत होते. म्हणून त्याला उत्तरेत जाणे गरजेचे होते परंतु उत्तरेत गेल्यावर मराठे दक्षिणेत आपला अंमल निर्भयपणे होऊ देणार नाही तसेच उत्तरेत ही त्रास देण्यास कमी करणार नाही.तेव्हा मराठयांना काही काळ गुंतवूण ठेवणे आवश्यक होते. तो उद्योग म्हणजे आपसात भांडत राहणे हा होय.[९]

झुल्फिकारखानाच्या सांगण्यावरून शाहूची सुटका केल्यास तो दक्षिणेत जाऊ न ताराबाईशी भांडून आपला हिस्सा घेईल. याकरिता ताराबाईशी झगडा करावा लागेल, दोन पक्ष निर्माण होतील,दोन्ही बाजूस मराठे सरदार विभागले जातील, या संघर्षात मराठयांची शक्ती खर्ची पडेल. हा झुल्फिकारखानाचा सल्ला आजमशहाला पटला आणि त्याने ८ मे १७०७ रोजी शाहूस सोडून दिले,त्यावेळी बादशहाची छावणी नेमाड प्रांतात दोराह येथे होती.[१०] शाहूस मुक्त करण्यापूर्वी आजमशहाने जो करार केला होता ,तो असा शाहू राजांनी बादशाही ताबेदारीत राहून दक्षिणचे राज्य साध्य करावे, प्रसंग पडेल तेव्हा बादशहाची कुमक व सेवा करावी.मातोश्री येसुबाई,संभाजी महाराजांच्या इतर राण्या,सावत्र बंधुना (मदनसिंग) ओलीस दाखल बादशहाचे ताबीन ठेवावे. चौथाई, सरदेशमुखीचे हक्क दक्षिणच्या सहा सुभ्यातून वसूल करावे. त्याच्या सनदा मागाहून पाठविण्यात येतील तूर्त दोनशे स्वार रांगडेबरोबर घेऊन जावे.[११] शाहूची सुटका झाल्यावर ते दक्षिणेत (महाराष्ट्रात) येण्यास निघाले. ते खानदेशात पोहचले तेव्हा त्यांस विजागर येथे मोहनसिंग रावळ स्वारांसह मिळाला. अबू पांडे हा दुसरा सरदार येऊन मिळाला. जून १७०७ मध्ये शाहू लांबकानीस पोहोचले व तेथून त्यांनी महाराष्ट्रात प्रवेश केला. लांबकानीच्या मुक्कामी शाहूस परसोजी भोसले येऊन मिळाला.येथून शाहूने अनेक सरदारांना पत्रे लिहिली. महाराष्ट्राचा खरा राजा मीच असून माझ्या भेटीस येऊन आपली स्वामीनिष्ठा व्यक्त करा. जुलै महिन्यात शाहूने लांबकानी सोडले व ऑक्टोबर मध्ये अहमदनगरला येऊन पोहचले, मार्गात

त्यांना अनेक मराठे सरदार येऊन मिळाले. अहमदनगरहून शाहूने ताराबाईस निरोप पाठविला 'आम्ही स्वदेशी येत आहोत आता राज्य आम्ही करू'.[१२] प्रारंभी शाहूराजांनी महाराणी ताराबाईशी तडजोड करण्याचे प्रयत्न केले परंतु यश आले नाही. पुण्याजवळ राजगुरूनगर (खेड) येथे झालेल्या लढाईत शाहूचा विजय झाला. यावेळी धनाजी जाधव सारखा मातब्बर सेनापती शाहूस मिळाला,यानंतर खंडोबल्लाळ चिटणीस व बहिरोपंत पिंगळे हे प्रतिष्ठित सरदार ही शाहूस येऊन मिळाले.[१३] शाहूची राजकीय कारकीर्द बळकट करण्याचे काम बाळाजी विश्वनाथ यांचे आहे. यांच्यापासूनच पेशवाईचा कालखंड सुरू होतो.बाळाजी विश्वनाथ हे मुळचे कोकणातील श्रीवर्धनचे देशमुख होते. मोगलांची चाकरी स्वीकारून ते देशावर(घाटावर) आले. इ.स.१६९९ मध्ये पुणे, अहमदनगर, दौलताबाद येथे सरसुभेदार म्हणून त्यांनी काम केले.[१४] मोगल बादशहा औरंगजेबाचा इ.स.१६९५-१६९९ या काळात ब्रम्हपुरी येथे मुक्काम होता त्यावेळी शाहूमहाराजांची व बाळाजी विश्वनाथाची पहिली भेट झाली होती.[१५] पुढे शाहूराजांच्या खरेपणाविषयी खात्री बाळाजी विश्वनाथाने धनाजी जाधवास करून दिली व त्याने स्वत:ला शाहुंच्या सेवेत वाहून घेतले.१२ जानेवारी १७०८ रोजी छत्रपती म्हणून शाहूराजांचा साताऱ्याला राज्याभिषेक झाला.[१६] यावेळी शाहूने अष्टप्रधानांच्या नेमणूका केल्या. बहिरोपंत पिंगळे - पेशवे, धनाजी जाधव - सेनापती, नारोशंकर -सचिव, रामचंद्रपंत पांडे - मंत्री, महादजी गदाधर - सुमंत, अंबुराव हणमंते - अमात्य, होनाजी अनंत -न्यायाधीश, मुदगल भट - पंडितराव.[१७] पुढे धनाजी जाधवाच्या मृत्यूनंतर जून १७०८ मध्ये शाहूने बाळाजी विश्वनाथाला आपला पक्ष बळकट केलेल्या मदतीचे इनाम म्हणून त्यास २० ऑगस्ट १७११ रोजी 'सेनाकर्ते' ही पदवी बहाल केली, पुढे धनाजीचा पुत्र चंद्रसेन जाधव हा ताराबाईच्या पक्षाला मिळाला होता. दमाजी थोरात आणि कृष्णराव खटावकर या मराठी सरदारांनी बंडावा मांडला होता, पण बाळाजीने या सर्व बंडखोरांचा निर्धारपूर्वक नि:पात केला. बहिरोपंत पिंगळे या शाहूच्या प्रधानाला कान्होजी आंग्रने अटक करून नेल्याने शाहूला एका कर्तबगार प्रधानाची गरज होती. परशुराम प्रतिनिधी व खंडोबल्लाळ चिटणीस या अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करून शाहूने १७ नोंव्हबर १७१३ रोजी मौजे मांजरी, प्रांत पुणे या ठिकाणी बाळाजीस पेशवाईची वस्त्रे दिली. त्याने आपले सहकारी आबाजीपंत पुरंदरे यास मुतालकी व रामजीपंत भानू यास फडणवीसी शाहूकडून मिळवून दिली.[१८] मराठयांच्या राजकारणात झालेला पेशव्यांचा उदय ही एक क्रांतिकारी घटना मानावी

लागेल. मोगलांच्या कैदेतून सुटून आलेल्या शाहूचा बाळाजी विश्वनाथ कर्तबगार, एकनिष्ठ, विश्वासू सहकारी होता. पेशवेपद आपल्याच घराण्यात टिकून राहावे एवढी कामगिरी त्याने बजावली व अत्यंत अस्थिर आणि गुंतागुंतीच्या परिस्थितीत धीमेपणाने मार्ग काढून त्याने शाहूचे मराठी राज्यात आसन स्थिर केले.मराठा मंडळातील सरंजामदाराच्या देशभक्तीला आवाहन करून मराठी राज्य दृढ करण्यासाठी शाहूला पाठिंबा देण्यास भाग पाडले. शाहूच्या सार्वभौम अधिकाराची स्थापना करून बाळाजी विश्वनाथाने आपले लक्ष मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेकडे वळवले. [१८अ]

## १.१४ पेशवाईचा उदय व मंत्रिमंडळ

छत्रपती शाहू महाराजाच्या अधिपत्याखाली बाळाजी विश्वनाथाने जुने नाकर्ते मंत्री काढून टाकून मंत्रिमंडळ सुटसुटीत व कामाचा उरक असणारे बनविले. या नव्या व्यवस्थेत पेशवा हा छत्रपती खालोखाल कार्यकारी सत्ताप्रमुख बनला. जुन्या प्रधान मंडळात सचिव, प्रतिनिधी आणि सेनापती कायम ठेऊन उर्वरित खाती पेशव्यांनी आपल्या हाती घेतली. बाळाजी विश्वनाथाने मराठी राज्याची जी दूरदृष्टीने निर्णय घेऊन व्यवस्था लावून दिली.ती लक्षात घेतली असता, स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजांखालोखाल यांची कर्तबगारी मानावी लागेल हा रियासतकर सरदेसाईंचा अभिप्राय योग्य वाटतो. [१८ब] शाहूच्या सार्वभौम अधिकाराची स्थापना करून बाळाजी विश्वनाथाने आपले लक्ष मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेकडे वळवले. पुढे २८ फेब्रुवारी १७१४ रोजी केवळ मुत्सद्देगिरीच्या जोरावर बाळाजीने सरखेल कान्होजी आंग्रेस शाहूमहाराजांच्या पक्षात आणले,यावेळी दिल्ली दरबारात मोगल बादशाही मध्ये सत्तेसाठी चढाओढ सुरू होती. मोगल तख्तावर यावेळी सय्यद बंधूच्या मदतीने फरूखसीयर बादशहा बनला होता. पण कालांतराने या बादशहाला सय्यदबंधुच्या वर्चस्वाखाली धास्ती वाटू लागली. मोगल बादशहाने सय्यदबंधूचा नाश करण्याचे अनेक प्रयत्न केले,हे लक्षात घेऊन सय्यदबधुंनी मराठयांशी मैत्री केली. शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथाच्या सल्ल्याने सय्यदबंधुशी तह करून दिल्लीची कामगिरी मोठया उत्साहाने स्वीकारली. मराठयांच्या मदतीने सय्यदबधुंनी दिल्लीचा कारभार आपल्या ताब्यात घेऊन रफिजीत नावाच्या राजपुत्राला गादीवर बसविले. या नव्या बादशहाकडून दक्षिणेतील सहा सुभ्यातून चौथाई वसुलीचे फर्मान, मराठयांच्या सरदेशमुखीचे हक्काचे फर्मान शाहु महाराजांकडे शिवाजी महाराजाच्या वेळेचे

स्वराज्य कायम केल्याचे फर्मान मार्च १७१९ रोजी मराठयांना प्राप्त झाले.[१९] या शिवाय छत्रपती शाहूची आई राणी येसुबाई, जानकीबाई व इतर मंडळी जी मोगलांच्या कैदेत होती, त्यांची सुटका करण्यात आली. कराड, कोल्हापूरच्या स्वारीहून परत आल्यानंतर पेशवे बाळाजी विश्वनाथ सासवडला गेले. सततची दगदग करून त्यांचे शरीर थकले होते तसेच वृध्दावस्था यामुळे २ एप्रिल १७२० रोजी बाळाजी विश्वनाथाचा मृत्यू झाला.[२०] शाहू संबंधी एक आक्षेप घेतला जातो, शाहूने शिवकालीन सार्वभौम कल्पनेस तिलांजली दिली. दिल्लीच्या बादशहाच्या सनदा स्वीकारून आपल्या सार्वभौमत्वास मर्यादा निर्माण केल्या.शाहू हा सार्वभौम छत्रपती न मानता बादशाही सुभेदार मानला पाहिजे असा आक्षेप रियासतकार सरदेसाई घेतात [२१]

हा शाहूवरील आक्षेप पाहता त्यात तथ्य वाटते परंतु खोलवर विचार केला असता दुसरी बाजूही लक्षात येते.बाळाजी विश्वनाथाने मुघलांच्या सहा सुभ्यातील चौथाई, सरदेशमुखीच्या सनदा आणल्या शाहू बादशहाचा मांडलीक असता तर त्याला अशा स्वरूपाचा हक्क मिळू शकला नसता.सनदेच्या मोबदल्यात छत्रपती किंवा पेशव्याने बादशहासाठी कोणतीही कामगिरी पत्करली नाही.केवल बादशहाला मदत करण्याच्या आश्वासनावर मुघल प्रदेशातील सहा सुभ्यातून प्रथम आर्थिक आणि नंतर राजकीय वर्चस्व निर्माण करण्याची संधी या सनदेने शाहूस मिळू शकली. या सनदेमुळे छत्रपती, पेशवा आणि त्यांचे सरंजामदार यांच्या राजकीय प्रतिष्ठेत कसलाही बदल वा वैगुण्य निर्माण झाल्याचे दिसून येत नाही. [२२]

## १.१५ छत्रपती शाहू , पहिले बाजीराव पेशवे व दक्षिण धोरण

बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूनंतर त्याचे थोरले पुत्र बाजीराव यास १७ एप्रिल १७२० रोजी पेशवेपद शाहू महाराजांकडून प्राप्त झाले त्यावेळी ते १९ वर्षाचे होते. [२३] बाजीराव पित्यासोबत वावरलेले असल्याने त्यांना राजकारणाचा अनुभव प्राप्त झाला होता. मराठयांनी आक्रमक धोरणाचा अवलंब करावा,जेणेकरून उत्तरेतील सुपीक प्रदेश अंमलाखाली आणता येईल व अर्थप्राप्तीही होईल यांवर त्यांनी भर दिला. आपल्या नव्या योजनांना साथ देणारे नवे सरदार पुढे आणले.[२४]बाजीरावाचे चढाईचे धोरण मात्र श्रीपतराव प्रतिनिधी व त्यांच्या पक्षाला आवडत नव्हते, त्यांचे म्हणणे असे की, आताच चढाईचे धोरण स्वीकारल्यास नुकत्याच झालेल्या यादवी युध्दातून महाराष्ट्र मोकळा होईल व एकदा हल्ला झाला की, लोकांना दैन्य अवस्था प्राप्त होऊन त्यात नष्ट होऊ त्यामुळे हे चढाईचे धोरण व मोगलांची कुरापत

काढण्याचे धोरण त्यांना पसंत नव्हते.शाहुमहाराजांना ही विचारसरणी मान्य होती. शिवाय मोगलांनी आपल्यावर उपकार केले त्यांच्यावर चढाई करणे त्यांना बिलकुल पसंत नव्हते. प्रतिनिधीचे म्हणणे की, आपले राज्य बाल्यावस्थेत असून चढाईचे धोरण स्वीकारून आत्मनाश ओढवून घेणे योग्य नाही. मोगल पातशाही रक्षून राज्यविस्तार साधावा असेच शाहूचे धोरण होते.[२५] असे असले तरी १७१९च्या स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी या बादशाही सनदांनी मोगल प्रदेशावर चौथाईचे हक्क मराठयांना मिळाले होते, त्याची अंमलबजावणी करत असताना कर्नाटक प्रांत आपल्या ताब्यात यावा अशी शाहू महाराजांची इच्छा होती म्हणून कर्नाटकच्या हद्दीवरील अक्कलकोटचा प्रदेश त्यांनी आपले मानसपुत्र फत्तेसिंगराव भोसले यास जहागिर म्हणून दिला. हेतू हा होता की, कर्नाटक प्रदेशावर फत्तेसिंगाची नजर राहिल. कर्नाटकात जोपर्यंत मुसलमान सत्ता दृढ झाली नाही, तोपर्यंत तो प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली राहिल असे शाहुमहाराजास वाटत होते.कर्नाटकातील पठाण सरदारांचा बंदोबस्त करून किंवा खंडण्या घेण्याचे काम निजामाने दरवर्षी केले. शाहूला निजामाचे कर्नाटकातील पठाणांवरील वजन नामशेष करून निजामाऐवजी मराठे त्यांचे धनी आहेत असे दाखवायचे होते.[२६]

### १.१५.१ बाजीरावाची कर्नाटकावरील पहिली स्वारी

निजाम मात्र दक्षिणेत मराठयांना चौथाई वसुलीमध्ये अडचणी आणत असे. मराठेशाहीत गृहकलहाचा फायदा घेऊन सातारकर व कोल्हापूरकर यांना तो म्हणत असे की, तुम्ही दोघांपैकी खरा छत्रपती कोण शाहू की संभाजी ? हे प्रथम ठरवा आणि मग माझ्याकडे चौथाई मागा. बाजीरावाने निजामाच्या या टाळाटाळीच्या वृत्तीला रणांगणावर उत्तर दिले आणि मराठयांचा खरा छत्रपती शाहूच आहे म्हणून चौथाई शाहूलाच दिली पाहिजे असे त्याने सुनविले.[२७] बाजीरावाची व निजामाची पहिली भेट ४ जानेवारी१७२१ रोजी चिखलठाण येथे झाली. भेटीचा विषय शाहू महाराजास चौथाई, सरदेशमुखीची सहा सुभ्याची जी सनद दिली त्याचा अंमल कसा करावा हा असावा.ही भेट झाल्यानंतर कालांतराने निजामाने १४ जानेवारी १७२१ रोजी दक्षिणेचा सुभेदार या हुद्दयावरून दोन फर्माने काढली. एकाने बिदर प्रांताहून चौथाई वसूल करण्यास शाहूस मुभा देऊन दुसऱ्या फर्मानाने शाहूस सरदेशमुखीच्या सहा सुभ्यातील वसुलीचा हक्क मान्य करण्यात आला.[२८] बाजीरावाने कर्नाटकातील चित्रदुर्गाची पहिली स्वारी ही पुणे येथून २० नोंव्हबर१७२५ ला सुरू केली. इंदापूर, परिंडा , पंढरपूर मार्गे

निजामाच्या सरहद्दीवरून विजापूर, बिज्जरगी, कोप्पल मार्गे चित्रदुर्गाला पोहोचली.या स्वारीत मराठी फौजांनी तुंबलेल्या खंडण्या वसूल केल्या. चित्रदुर्गाहून परत येताना बाजीराव पेशवे हरपनहल्ली व गदग, गोकाक मार्गाने सातान्यास २२ मार्च १७२६ ला पोहचले.[२९]

### १.१५.२ बाजीरावाची कर्नाटकावरील दुसरी स्वारी (श्रीरंगपट्टणची स्वारी)

या दुसऱ्या स्वारीची सुरूवात २३ ऑक्टोबर १७२६ रोजी झाली. सर्व मराठी फौजा श्रीरंगपट्टणास गेल्या व वाटेत बेळगाव, बिदनूर वगैरे प्रांताच्या खंडण्या वसूल केल्या आणि श्रीरंगपट्टणास एक महिना राहून शिरोळे, कापशी या मार्गे मराठी फौजा साताऱ्यास आल्या.[३०] याच स्वारीमध्ये सोंधेकर मराठयांना शरण आले व त्यांना शाहुमहाराजांच्या सांगण्यावरून अभय दिले.[३१] दोन्ही स्वाऱ्यामध्ये शाहुमहाराजांच्या मर्जीनुसार मुरारराव घोरपडे होते. मराठयांना त्यांचा विशेष उपयोग झाला. यानंतरच त्यांचे वडील शाहू महाराजांच्या दरबारी येऊ लागले. तमाम पाळेगारांकडून खंडण्या वसूल केल्या. श्रीरंगपट्टणकरांकडून एकवीस लाख रूपये खंडणी घेतली व २७ एप्रिल १७२७ ला स्वारी साताऱ्यात येऊन पोहचली.[३२]

### १.१५.३ कोल्हापूरच्या संभाजीस निजामाची चिथावणी व पालखेडची लढाई

बाजीराव कर्नाटकच्या मोहिमेमध्ये गुंतलेले असताना व दक्षिणेत मराठयांचे अर्थात शाहूचे वर्चस्व निर्माण होत असल्याने निजाम हा अस्वस्थ होत होता म्हणून त्याने कोल्हापूरच्या संभाजीस हाताशी धरून शाहू विरूद्ध उठाव करण्यास सुरूवात केलेली दिसून येते. २४ सप्टेंबर १७२६ रोजी संभाजी राजे स्वत: निजामास जाऊन मिळाले ते निजामाबरोबर तीन वर्षे होते. मातोर्श्री राजसबाई या त्यांच्या गैरहजेरीत कारभार पाहत होत्या.[३३] निजामाच्या व संभाजीच्या सरदारांनी शाहुच्या मुलखात धुमाकूळ घालण्यास सुरूवात केली. निजामाचा सरदार तुर्कताजखान याने सन १७२६–१७२७ च्या उन्हाळयात शाहूच्या मुलूखात संगमनेरजवळ जाळपोळ व लुटालुट केली. निजामाने श्रीपतराव प्रतिनिधी मार्फत शाहूस असे कळविले की, आपण तुमच्या विरूद्ध नाही, तुमचा पेशवाच भानगडी करतो त्याचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. तुर्कताजखानाबरोबर रंभाजी निंबाळकर, धीराजी पवार, उदाजी चव्हाण इत्यादी सरदार सातारच्या आसपासच्या मुलखात धुमाकुळ घालू लागले त्यांनी रहिमतपूरवर हल्ला करून रावजी जाधव यास ठार मारले. यावेळी धनाजी जाधवाचा हस्तक व्यासोराव हा शाहूचा भक्त होता त्याने कोल्हापूरच्या सैन्यात फुट पाडण्याची कामगिरी केली. निजामाने संभाजी हे मराठी

राज्याचे छत्रपती आहे अशी व्दाही फिरवली होती. यावेळी संभाजी पुणे प्रांतात फिरले तेव्हा ठिकठिकाणी लोकांनी त्यांचा गौरव केला व त्यांच्याकडून सनदा घेऊ लागले.[३४] सन १७२७ च्या पावसाळयापूर्वी वरील प्रकार सिध्द होऊन शाहूची सत्ता जणू संपुष्टात येत आहे असे पाहून शाहूची तारांबळ उडाली त्यामुळे बाजीरावास त्यांनी कर्नाटकच्या स्वारीहून परत बोलाविले तसेच उत्तरेत गेलेल्या उदाजी पवार, कंठाजी कदम, पिलाजी जाधव इत्यादी सरदारांना परत येण्याविषयी आज्ञापत्रे पाठविली होती.[३५]

**निजामाचा पालखेड येथे पराभव –**

छत्रपती शाहूने निजामाशी श्रीपतराव प्रतिनिधीमार्फत समझोता करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना अपयश आले म्हणून शाहूने बाजीरावास निजामावर चालून जाण्यास सांगितले व त्याने २७ ऑगस्ट १७२७ रोजी सातारा सोडले . नंतर छत्रपती शाहूने निजामाबरोबर लढाई सुरू झाल्याचे १३ ऑक्टोबर१७२७ रोजी जाहीर केले. निजामाने सुद्धा लढाईची तयारी केली, त्याने आपल्या हालचाली गुप्त ठेवल्या होत्या. आपण औरंगाबादेस जात आहोत असे जाहीर करून तो जुन्नरच्या रोखाने चालला होता. सप्टेंबर महिन्या मध्ये त्याने सुलतानजी निंबाळकरासह म्हसवड वरून साताऱ्यावर चाल केली. ऐवजखान हा औरंगाबादहून चालून आला होता.बाजीरावाने मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, तुकोजी पवार इत्यादी सरदार जीवास जीव देणारे तयार केले होते.[३६]

पुण्याचा बंदोबस्त फाजलबेगवर सोपवून निजामाने लोणी, पारगाव, सुपे, पाटस, बारामती इत्यादी ठाणे तोफखानाच्या जोरावर काबीज करून तो अहमदनगर येथे गेला. बाजीरावा जवळ तोफखाना नव्हता,त्याने सैन्यासह सप्टेंबरमध्ये पुण्याहून निघून पुणतांबे जवळ गोदावरी नदी उतरून जालना व शिंदखेड लुटले. तेव्हा सरदार ऐवजखान बाजीरावासमोर आला त्याचा त्याने पराभव केला व पुढे माहूर, मंगलूर, वासिम हे तालुके जिंकून घेतले. निजाम पुन्हा पुण्याच्या बाजूने जात आहे असे समजताच बाजीरावाने आपण बुऱ्हाणपूर जाळणार अशी अफवा उठवली व १४ फेब्रुवारी १७२८रोजी औरंगाबादवर चढाई केली. हे निजामाला कळताच पुण्याहून लगबगीने निघाला. गोदावरी मार्गे जाऊन बाजीरावाला मैदानात गाठून आपल्या तोफखान्याच्या जोरावर त्याच्याशी उघडया मैदानात झुंज दयावी व त्याचा धुव्वा उडवावा अशी निजामाची योजना होती पण बाजीरावाने गनिमीकाव्याचे युध्द खेळून निजामाचा प्रदेश उध्वस्त

केला व त्याच्या फौजेस दाणावैरण मिळू नये अशी युक्ती केली. रस्त्यात नदीनाले होते त्याचे उतार अडविणे आणि निजामाला औरंगाबाद पासून २० मैल अंतरावर असलेल्या पालखेड गावी कोंडले. पालखेडला निजामाच्या सैन्याभोवती मराठी सैन्याने गराडा घातला. निजामाचे बाहेरच्या जगाशी असणारे दळणवळण व संपर्क तोडला , त्याची उपासमार होऊ लागल्याने त्याने आपला सरदार ऐवजखान याचे मार्फत तहाचे बोलणे करून तह केला.[३७] ६ मार्च १७२८ रोजी मुंगीशेवगाव जवळ बाजीरावाच्या मागणीप्रमाणे निजामाने तह केला. याला मराठयांच्या इतिहासात विशेष महत्त्वाचे स्थान आहे. या तहाने बाजीरावाने दोन गोष्टी साध्य केल्या एक निजामाचे खच्चीकरण आणि दुसरी कोल्हापुरच्या संभाजी राजाची छत्रपती शाहू पुढे शरणागती. या प्रकरणामुळे बाजीरावा बद्दल शाहूचा आत्मविश्वास आणि प्रेम वाढीस लागले.[३८] या तहाची १७ कलमे आहेत.

छत्रपती शाहू महाराजांचे दक्षिण धोरण पहात असताना त्यांनी कोल्हापूरच्या छत्रपती संभाजीबरोबर समझोता करून जो १३ एप्रिल १७३१ रोजी वारणेचा तह केला त्यालाही मराठयांच्या इतिहासामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. कारण या तहाने १७०७ पासून महाराष्ट्रातात चालू असलेली यादवी संपुष्टात आली. वारणेच्या तहाची कलमे – हा तह छत्रपती शाहू महाराजांनी संभाजी राजास लिहून दिलेला आहे.

१. इलाखा वारूण महाल तप्त संगम दक्षिण तीर कुल दुतर्फा मुलुख दरोबस्त देखील ठाणी व किल्ले तुम्हास दिले असत.
२. तुंगभद्रेपासून तहत रामेश्वर संस्थाने निम्मे आम्हांकडून ठेवून निम्मे तुम्हांकडे करार करून दिली असत.
३. किल्ले कोप्पल तुम्हांकडे दिला, त्याचा मोबदला तुम्ही रत्नागिरी आम्हांस दिला.
४. वडगावचे ठाणे पाडून टाकावे.
५. तुम्हांशी जो वैर करतील त्यांचे पारिपत्य आम्ही करावे.तुम्ही आम्ही एक विचारे राज्यवृध्दी करावी.
६. वारणेच्या व कृष्णेच्या संगमापासून तहत निवृत्तीसंगम तुंगभद्रेपावेतो दरोबस्त देखील गड, ठाणी तुम्हांकडे दिली असत.
७. कोकण प्रांत सालशी पलीकडे पंचमहाल अकोले पावेतो दरोबस्त तुम्हांकडे दिले असत.

८. इकडील चाकर तुम्ही ठेवू नये, तुम्हांकडील चाकर आम्ही ठेवू नये.

९. मिरज प्रांत, विजापूर प्रांताची ठाणी देखील आथणी, तासगांव वगैरे तुम्ही आमचे स्वाधीन करावी. याप्रमाणे एकूण नऊ कलमे करार करून तहनामा दिला असे, सदरहू प्रमाणे आम्ही चालू यास अंतर होणार नाही या तहाने कोल्हापुरचे राज्य निर्माण झाले.[३९]

## १.१६ छत्रपती शाहू ,नानासाहेब पेशवे व दक्षिण धोरण

छत्रपती शाहूच्या दरबारात सन १७२४ मध्ये श्रीपतराव प्रतिनिधीने आपले म्हणणे मांडले की,मराठयांनी प्रथम दक्षिण दिग्विजय करावा .दक्षिणेत आपली सत्ता निर्माण करावी आणि मग उत्तरेत जावे त्यांचे कोणी ऐकले नाही. छत्रपती शाहूने बाजीरावास उत्तरेत जाण्याची मुभा दिली व कर्नाटक मामला फत्तेसिंगराव भोसल्यावर सोपविला,त्यांनी एक स्वारी कर्नाटकावर काढली व दुसरी स्वारी बाजीरावाने चित्रदुर्गाची काढली होती त्यानंतर बाजीरावाने उत्तरेत मराठयांचे वर्चस्व निर्माण केले व निजामाचा पराभव केला हे कार्य करत असतांनाच पहिले बाजीराव पेशवे २८ एप्रिल १७४० रोजी मृत्यू पावले.[४०] तत्पूर्वी छत्रपती शाहूने सन १७३९–४० मध्ये रघुजी भोसले व इतर सरदार पन्नास हजार फौजेनिशी कर्नाटकच्या स्वारीस पाठविले होते. याप्रसंगी त्यास गुत्तीचे मुरारराव घोरपडे येऊन मिळाले होते,त्यांच्याशी झुंजण्यात अर्काटचा नवाब दोस्तअलीखान तयार झाला परंतु त्यांनी त्याचा पराभव करून त्यास मारून टाकले व त्याची फौज लुटून घेतली, नंतर त्या प्रांती चोहोकडे लुटालूट करण्यास सुरूवात केली. तेव्हा दोस्तअलीचा मुलगा सफंदरअलीने त्यास खंडणी देऊन वाटेस लावले. दोस्तअलीचा जावई चंदासाहेब हा त्रिचनापल्ली बळकावून बसला होता. तो आपणापासून सारे राज्य घेईल अशी भीती सफंदरअलीला वाटत होती म्हणून त्याने मराठयांशी राजकारण करून चंदासाहेबावर स्वारी केली ,त्यांनी त्रिचनापल्ली तीन महिने लढून काबीज केली व तो प्रांत मुरारराव घोरपडयांच्या स्वाधीन करून व चंदासाहेबाला कैद करून साताऱ्याला आणले.[४१]

### १.१६.१ बाळाजीरावास पेशवेपदाची प्राप्ती

बाजीराव २८ एप्रिल १७४० रोजी मरण पावल्यावर मराठी राज्याचे पेशवेपद आपणास मिळावे याकरिता खटपट करणारे बाबूजी नाईक बारामतीकर (सावकार) प्रमुख होते.त्यांचा सावकारीचा धंदा कित्येक वर्षापासून तेजीत होता,त्याने छत्रपती शाहू, रघुजी भोसले यासारख्या मातब्बर लोकांना कर्जाऊ रकमा दिल्या होत्या पण तो लढवय्या व कर्तबगार

म्हणून शून्य होता. म्हणूनच छत्रपती शाहूनी बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेबास २५ जून १७४० रोजी पेशवाईची वस्त्रे समारंभपूर्वक दिली .नानासाहेबाला विरोधक खूप होते. त्यांना लगाम घालण्यासाठी छत्रपती शाहूनी त्याजपुढे दरबारात भाषण केले ते असे 'बाळाजीपंत लहान आहे मसलत उभी करील,जाईल, हुडपणा करील,तर पत गेली असे न होता याजला संभाळून,मसलतीस एकदिल होऊन याचा लौकिक होईल,असे तुम्ही करून दाखवा' छत्रपती शाहूचे हे मागणे दरबारी मंडळीनी मान्य केले.[४२] बाळाजीस पेशवेपद दिल्यावर छत्रपती शाहूनी पेशवेपदासाठी झुंजणाऱ्या बाबूजी नाईकास कर्नाटकचा मामला दिला होता. वास्तविक कर्नाटक सुभा हा विजापूर, भागानगर, तुंगभ्रदा व रामेश्वर मधील सर्व प्रदेश हा छत्रपती शाहूच्या खाजगीचा होता. त्या सर्व प्रदेशात मुलुखगिरी करण्याचा हक्क बाबूजी नाईक बारामतीकर यास छत्रपती शाहूने १९ जुन १७४३ च्या हुकुमान्वये दिला व त्या मोबदल्यात बाबूजी नाईकाने दरसाल छत्रपती शाहूस सात लाख रूपये दयावयाचे असून शिवाय पाच लाख रूपये खंडणी तंजावर राजाकडून घेऊन दयायची बाबूजी नाईकने कबूल केले होते.[४३] कर्नाटक क्षेत्र आपणांस मिळाल्यावर बाबुजी नाईकाने दोन स्वाऱ्या केल्या.पहिल्या स्वारीत त्याला निजामाकडून विरोध झाला तसेच त्या प्रांती कित्तूर, नवलगुंद, शिरहट्टी, हावनूर, डंबल येथील देसाई व पाळेगार काही बाबूजी नाईकाला अंमल बसू देईना. दुसरी स्वारी सन १७४५ मध्ये केली त्यावर कर्नाटकचा नवाब अन्वरूद्दीन याने कडाडून हल्ला चढविला व बाबूजी नाईकास पळवून लावले. बाबूजी नाईक परत आल्यावर छत्रपती शाहूची भेट घेतली व आपणास कर्ज झाल्याचे सांगितले. कर्नाटक मामल्यापैकी दोन वर्षाचे चौदा लाख व तंजावरचे पाच लाख मिळून एकूण १९ लाख रूपये छत्रपती शाहूस वसूल करून जो सरदार देण्याचे कबूल करील त्यास कर्नाटक मामला देण्याचे छत्रपती शाहूने कबूल केले. नानासाहेब पेशव्यांनी कर्नाटकातील या प्रश्नांची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी दर्शविताच इ.स.१७४६ मध्ये छत्रपती शाहूने कर्नाटक प्रश्नांची जबाबदारी नानासाहेब पेशव्यांवर सोपविली. ती पार पाडण्यासाठी पेशव्यांनी आपले चुलतबंधू सदाशिवराव भाऊ यांची रवानगी कर्नाटकात केली होती. ही मोहिम ५ डिसेंबर १७४६ रोजी सुरू झाली या मोहिमेत सदाशिवरावभाऊंना मार्गदर्शन करण्यास महादोबा पुरंदरे व सखारामबापू बोकिल यांना पाठविण्यात आले होते.[४४]यावेळी सदाशिवरावभाऊंचे वय १६ वर्षाचे होते.त्यांनी तुंगभद्रेपर्यंत स्वारी करून सावनूरकर नवाब, कित्तूर, परसगड, गोकाक, यादवाड, बागलकोट,

बदामी, नवलगुंद,तोरगल, हरीहर, बसवापट्टण इत्यादी अनेक पाळेगारांकडून खंडणी वसूल केली. भाऊसाहेबांच्या रोजकिर्दीवरून त्यांनी या स्वारीत एक लाख ६० हजार रूपये वसूल केले आणि स्वारीकरिता २० हजार रूपये खर्च केले. [४५] १५ डिसेंबर १७४९ रोजी छत्रपती शाहूमहाराजांचा मृत्यू झाल्यानंतर पेशव्यांचे स्थान अधिक प्रभावशाली बनले. नानासाहेब पेशव्यांना मनुष्य स्वभावाची उत्तम पारख होती. राजकारणासाठी योग्य असणाऱ्या व्यक्तिंचा उपयोग ते मोठया कुशलतेने करून घेत असत यामुळे त्यांच्या काळात अनेक होतकरू सरदार सत्तेत सक्रिय झाले. पेशवे दुसऱ्यांच्या मनातील उद्‌देश जाणून घेण्यात पटाईत होते.[४६]

### १.१६.२ पेशव्यांकडे सत्तेचे हस्तांतर

छत्रपती शाहूच्या अंतिम इच्छेप्रमाणे ताराबाईचा नातू रामराजा मराठयांचा पाचवा छत्रपती झाला. भट घराण्याकडे वंशपरंपरेने राज्याची मुखत्यारी जावून छत्रपती हा नामधारी राहणे ही गोष्ट ताराबाईस मान्य नव्हती. नानासाहेब पेशव्यांच्या काळात ताराबाईने बंडखोरीच्या कारवाया मोठया प्रमाणात सुरू केल्या.छत्रपती शाहूने आपल्या अंतकाळी नानासाहेबास मराठी राज्याची मुखत्यारी दिलेली असल्याने ताराबाईच्या कारवायांना म्हणावे तसे यश येईनासे झाले व दैनंदिन प्रशासन ठप्प झाले. राजकारणाची ही झालेली कोंडी फोडण्यासाठी मराठी सत्तेचे केंद्र साताऱ्याहून पुण्यास आणणे एवढाच पर्याय पेशव्यांपुढे उरला. मुखत्यारीने मराठी राज्याचा कारभार करण्यास मराठा मंडळाने अधिकृतपणे नानासाहेब पेशव्यास संमती सन १७५० साली दिली. खऱ्या अर्थाने पेशवाईस येथपासून प्रारंभ झालेला दिसतो. [४७]

### १.१६.३ नानासाहेब पेशव्यांच्या काळात विसाजी कृष्णचा उदय

विसाजीचे मुळ निवासस्थान कोकणातील राजापूर प्रांतातील मौजे तेरवण हे होय. त्याच्या पित्याचे नाव कृष्णाजी तसेच कुळनाव चिंचलकर हे होते.कृष्णाजीला दोन मुले होती. थोरल्याचे नाव विठ्ठलपंत व धाकटयाचे नाव विसाजीपंत. विसाजीपंत वयात आल्यावर पुण्यास निर्वाहासाठी सावकारी व्यवसाय करू लागले. सुरूवातीला विसाजीने घोडी घेऊन शिलेदारी करून निर्वाह करण्याचा प्रयत्न केला पण या व्यवसायात त्यांना जम बसला नाही. सदाशिवराव भाऊंच्या हुजऱ्याशी त्यांनी मैत्री वाढविली व हुजऱ्याच्या ओळखीने विसाजीपंत भाऊसाहेबांची चाकरी करू लागले.[४८] विसाजीपंत कामात हुशार व बुध्दीमान आहे, असे भाऊसाहेबांच्या ध्यानात आले ,त्यांना त्यांच्या योग्यतेनुसार काम दयावे असा त्यांनी निश्चय केला. दौलतराव

काटे यांच्याकडे सरकारी पागा होती. त्यांच्याकडील दरखदार मृत्यू पावल्यामुळे नानासाहेबांनी विसाजीचे निरीक्षण केले व दौलतराव काटयांच्या पागेचे दरखदार म्हणून त्यांची नियुक्ती केली. येथून विसाजीपंताच्या कार्याला सुरूवात झाली व पुढे त्यांना 'बिनीवाले' हा हुद्दा मिळाला. मराठयांच्या सैन्याच्या आघाडीला जी फौज असे त्यास 'बिन' असे म्हणत. विसाजीने आपली हिंमत व शौर्य अनेक वेळा प्रदर्शित केल्यामुळे नानासाहेबांनी त्यांची योजना बिनीमध्ये केली म्हणून त्यास बिनीवाले असे नामाभिमान मिळाले.[४९]

## १.१७ छत्रपती शाहूनंतरचे नानासाहेबांचे दक्षिण धोरण

बाबूजी नाईकाची कर्नाटकसंबंधी कटकट नानासाहेब पेशव्यांच्या मागे छत्रपती शाहूच्या निधनापर्यंत चालू होती. सांगोला तहानंतर कर्नाटक मामला स्वत: पेशव्यांकडे डिसेंबर १७५० मध्ये आला व यापुढे नानासाहेब पेशव्यांनी कर्नाटकात जातीने लक्ष घातले. फत्तेसिंग भोसल्यांनी पेशव्यांना पाठिंबा दिला.नानासाहेब पेशव्यांचे कर्नाटकात चाललेल्या इंग्रज–फ्रेंच झगडयांकडे बारीक लक्ष होते.नासिरजंगाचा खून होऊन कर्नाटकात अराजकता निर्माण झाली होती. त्याचा फायदा घेऊन बिदनूरकर व सावनूरकर यांनी आपले हातपाय पसरण्यास सुरूवात केली होती. सावनूरच्या नबाबाने नानासाहेब पेशव्यास खंडणी देण्याचे नाकारले होते त्यामुळे पेशव्यांना कर्नाटक स्वारीवर निघणे भाग पडले तसेच पेशव्यांच्या कर्नाटकातील वकीलांनी पेशव्यांविरूध्द तयार होत असलेले वातावरण नानासाहेब पेशव्यास पत्राने कळविले होते.[५०] नानासाहेब पेशवे सदाशिवरावभाऊसह ३१ जानेवारी १७५१ रोजी कर्नाटक स्वारीवर निघाले मार्गात सलाबतजंगाची भेट घेऊन त्याची मागणी मान्य केली. या नंतर नानासाहेब पेशवे सावनूरवर जाण्याच्या बेतात होते परंतु ताराबाईच्या सांगण्याने दमाजी गायकवाड हा सातार्‍यास चालून येत असल्याचे कळल्याने ते २४ एप्रिल १७५१ रोजी सातार्‍यास परत आले व नंतर निजामाशी झालेले युध्द, सलाबतजंगाशी झालेला तह यामध्ये नानासाहेब पेशवे १७५२ पर्यंत गुंतून राहिले.[५१] नानासाहेब पेशव्याने २५ नोव्हेंबर १७५२ रोजी निजामासोबत झालेल्या भालकीच्या तहाची हकीकत छत्रपतीला अभिमानाने सांगितली त्याबद्दल पेशव्यांचे अभिनंदन छत्रपती रामराजाने केले.[५२]

### १.१७.१ श्रीरंगपट्टणची स्वारी (८ जानेवारी १७५३ते १२ जून १७५४)

भालकीचा तह हा नानासाहेब पेशव्यांच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा होता. कारण या तहात एक कलम असे होते की, कर्नाटकचा प्रश्न हा निजाम व पेशवे यांनी एकमताने ठरवावा. उभयतांनी बरोबर स्वारीस जाऊन अंमल बसवावा त्यामुळे पेशव्यांनी कर्नाटक मोहिम हाती घेतली होती परंतु निजामाला अनेक अडचणींमुळे पेशव्यांबरोबर फौज पाठविता आली नाही.[५३] 'जिकडे कार्य विशेष तिकडे श्रीकृपेने जाणे होईल' असे एक वाक्य पेशव्यांच्या अनेक पत्रात दिसून येते त्या धोरणाने नानासाहेब पेशव्याने सन १७५३ मध्ये कर्नाटकात स्वारी केली. नानासाहेबाची नजर उत्तरेपेक्षा दक्षिणेतील कर्नाटकीय प्रदेशावर जास्त होती. उत्तरेत जसे शिंदे, होळकर, बाजीरावाचे हस्तक बनले तसे पुरंदरे, पानसे, रास्ते, मेहेंदळे, पटवर्धन, बिनीवाले असे अनेक सरदार नानासाहेबांच्या धोरणाने पुढे आले.[५४] या सर्व सरदारांवर सदाशिवरावभाऊंचा प्रभाव होता. भाऊंची तडफदार वृत्ती नानासाहेब पेशव्यांना कर्नाटकच्या कारभारात कामास आली तसेच दक्षिणेत कार्यरत असणाऱ्या सरदारांनी ही राष्ट्रकार्यात मोलाचे योगदान दिले आहे. मराठयांचे मुख्य काम हे कर्नूल, अर्काट, कडाप्पा, शिरे व सावनूर या पाच नबाबांवर चौथाई लागू करावयाची होती. हे काम करत असतांना मराठयांचा श्रीरंगपट्टण, बेदनूर व सोंधे या ठिकाणच्या सत्त्ताधिकाऱ्यांशी त्यांचा संबंध आला. दरम्यान इंग्रज व फ्रेंचाचा प्रवेशही यावेळी हिंदी राजकारणात झाला होता.गुत्तीचे मुरारराव घोरपडे युरोपियनांच्या व्यवहारात गोवले गेले होते. अशा राजकीय पार्श्वभूमीवर नानासाहेब पेशव्याने नबाबांकडे, फ्रेंच्याकडे व मुरारराव घोरपडे यांच्याकडे संधान साधण्याचा प्रयत्न सुरू केला होता. कर्नाटकातील राजकारणाची सर्व माहिती पेशव्यांचा वकील शामराव यादव हा पाठवित असे.[५५] श्रीरंगपट्टणहून खंडणी घेऊन परत येताना २० मार्च १७५३ रोजी मराठयांनी होळीहुन्नरचा किल्ला घेतला,नंतर धारवाड काबीज केले व कोल्हापुरास येऊन भाऊसाहेबांची भेट घेतली तेव्हा करवीर छत्रपतींनी भिवगड, पारगड, वल्लभगड व कलानिधी हे चार किल्ले व खानापूर प्रांत भाऊसाहेबांच्या हवाली केला नंतर सासवडहून स्वारी पुण्यास परत आली.[५६]

### १.१७.२ कर्नाटकची दुसरी स्वारी (२ जानेवारी १७५४-४ जून १७५४)

नानासाहेब पेशवे जून १७५३ नंतर कर्नाटकात १७५४ पर्यंत गेले नव्हते.या काळात मुरारराव घोरपडयांनी व इतर मराठे सरदारांनी आपले उदयोग या भागामध्ये सुरू केले

होते.मुराररावाने सन १७४० च्या कर्नाटक मोहिमेमध्ये रघुजी भोसलेला मदत केली होती म्हणून त्रिचनापल्ली त्याच्या ताब्यात दिली होती. मुरारराव घोरपडे काही वेळा इंग्रजांची तर काही वेळा फ्रेंचाची बाजू घेऊन कर्नाटकातील घडामोंडीचा फायदा करून घेत होता. नानासाहेब पेशव्याने कर्नाटकमध्ये न जाता कर्नाटक मामला आपणांस दयावा अशी इच्छा त्याने नानासाहेब पेशव्यास कळविली होती परंतु पेशव्यांनी कर्नाटक मामला आपल्याकडे ठेवून घेतल्याने मुरारराव घोरपडयांची निराशा झाली, तरीही मुराररावांनी नानासाहेब पेशव्यांचा हस्तक म्हणून कामगिरी बजावण्याचे कबूल केले.[५७] चंदासाहेबाचा पराभव करण्यासाठी मुरारराव घोरपडयांनी इंग्रज व फ्रेंचास मदत केली व दोन्ही परकीय सत्तांना आपला दबदबा बसेल एवढा पराक्रम केला. चंदासाहेब मारल्याची बातमी मुरारराव घोरपडयाने ताराबाईस कळविली यात त्याचा हेतू हा असावा की, करवीर छत्रपतीने कर्नाटक मामला आपल्या स्वाधीन करावा . इंग्रज व कर्नाटकचा नबाब यांच्या संघर्षात मुराररावाने मध्यस्ती करून दोघांकडूनही पैसे घेतले तसेच फ्रेंचा बरोबर तह केला. नंतर इंग्रजाविरूध्द लढले व शेवटी इंग्रज-फ्रेंच संघर्षात हातातून गेलेली त्रिचनापल्ली पुन्हा मिळविली. या घडामोडी नानासाहेब पेशव्यांच्या वकिलाने कळविल्या व पेशव्यास कर्नाटकात त्वरित येण्याविषयी लिहिले म्हणून नानासाहेब पेशवे कर्नाटक स्वारीवर निघाले. हरपनहल्ली, बागलकोट, बिदनूर इत्यादी संस्थानिकांकडून ३ लाख ६ हजार एवढी खंडणी पेशव्यांनी वसूल केली. ज्या-ज्या पाळेगारांनी खंडणी दिली त्या त्या पाळेगारांना अभय देऊन नानासाहेब पेशवे ४ जून १७५४ रोजी पुण्यास परत आले.[५८]

### १.१७.३ पेशव्यांची तिसरी कर्नाटक स्वारी (ऑक्टोबर १७५४ – १२ एप्रिल १७५५)

सन १७५४ मध्ये नानासाहेब पेशवे,सदाशिवरावभाऊ व महादजी पुरंदरे यांच्यासह स्वारीवर निघाले.त्यावेळी निजाम म्हैसूरच्या सीमेवर येऊन ठेपला होता. त्याच्या मनात आपण व नानासाहेब पेशवे दोघे मिळून म्हैसूरवर स्वारी करावी असे होते तसेच निजामाने हैद्राबादमध्ये नुकताच हजर झालेल्या बुसीलाही बोलावले होते व तो सामील होऊन त्याने म्हैसूरच्या दलवाईस पत्र लिहिले की, दख्खनच्या सुभेदारास खंडणीची बाकी न पोहोचल्यास सुभेदार मराठयांना सामील होऊन म्हैसूरचा नाश करतील या तंबीचा परिणाम म्हणून निजाम सलाबतजंग यास ५२ लाख रूपये खंडणी दिली. नानासाहेब पेशव्यांना ही बातमी समजताच पेशव्यांनीही म्हैसूरकडे खंडणीची मागणी केली. बुसीने निजाम व दलवाई तर्फे भेटून पेशव्यांची

समजूत काढली व पेशवे पुण्याला आले परंतु नानासाहेब पेशव्यांचे सरदार महादोबा पुरंदरे ऐनापूर गावी (अथणी, बेळगाव जिल्हा) पेशव्यांपासून वेगळे होऊन बेदनूरास गेले व त्याला समशेरबहादूर, अंताजी माणकेश्वर हे सैन्यासह येऊन मिळाले. त्यांनी सोंधे, बिदनूर, बसवापट्टण, चित्रदुर्ग इत्यादी लहान मोठया पाळेगारांकडून खंडण्या वसूल केल्या.महादजी पुरंदरे यांचे नानासाहेब पेशव्यांशी बिघडून त्याने मराठयांची नोकरी सोडली व श्रीरंगपट्टणच्या नोकरीत गेला. या घटनेनंतर कर्नाटकातील अनेक सत्ताधिश मैत्रीचे संबंध तोडून नानासाहेब पेशव्यां–विरूध्द एक गट निर्माण झाला व या गटाने सावनूरकरास पेशव्यांविरूध्द चिथावले.[५९]

### १.१७.४ सावनूरची स्वारी (२० ऑक्टोबर १७५५–१९ जुलै १७५६)

मुझफरजंग व सावनूरच्या नबाबाने मुरारराव घोरपडे यास आपल्या गटात ओढून नानासाहेब पेशव्यांची कर्नाटकातून सत्ता उखडून टाकण्याचा डाव आखला होता म्हणून नानासाहेब पेशवे व भाऊसाहेब पेशव्यांनी सन १७५६ मध्ये सावनूर मोहिम हाती घेतली. मागच्या तहात बागलकोटचा किल्ला नबाबाने मराठयांस देऊ केला होता,पण तो अद्याप मराठयास मिळाला नव्हता तो यावेळी काबीज करण्यात आला. भागानगरहून सलाबतजंग ही नानासाहेब पेशव्यास येऊन मिळाला. सावनूरच्या नबाबाने अनेक महिने संघर्ष केला परंतु त्याच्या साथीदाराने काहीच मदत न केल्याने शेवटी मुरारराव घोरपडे मार्फत तो पेशव्यास शरण येऊन तह केला. या तहात नानासाहेब पेशव्यास अकरा लाख रूपये खंडणी मिळाली. शिवाय सोंधे, बिदनूर प्रांतातून खंडणी घेण्याचा हक्कही मिळाला, तसेच खंडणीची रक्कम मिळेपर्यंत बंकापूरचा किल्ला मराठयांच्या हवाली केला. यानंतर नानासाहेब पेशव्यांनी गोपाळराव पटवर्धनाबरोबर दहा हजार सैन्य देऊन सोंधेकरांपासून खंडणी घेण्यास पाठविले व त्यांनी आठ लक्ष रूपये खंडणी देण्याचे कबूल केले,अडीच लाख रोख व बाकीच्या रकमेबद्दल मर्दनगड(फोंडा) किल्ला ओलीस दिला. स्वराज्यांपैकी अतिशय महत्त्वाचा किल्ला पुन्हा मराठयांच्या हाती आला. नानासाहेब पेशव्यांची स्वारी सावनूरहून निघून इतर संस्थानिकांकडून खंडणी घेत पुण्यास परत आली.दहा वर्षापूर्वी स्वराज्याची सरहद्द कृष्णेवर होती ती तुंगभद्रेपर्यंत जाऊन पोहचली.[६०] नानासाहेब पेशव्यांचे मनात जे हेतू होते ते या मोहिमेने साध्य झाले असे म्हटले पाहिजे. कारण या मोहिमेतच पेशव्यांनी मुराररावाबरोबर समझोता केला, निजामाच्या दरबारातून बुसीची हकालपट्टी करावयाची होती ती पूर्ण झाली. कारण त्याला

लालीच्या बोलावण्यावरून पाँडिचेरीला जावे लागले तसेच सावनूरच्या नबाबाचा पराभव केला इत्यादी.

### १.१७.५ श्रीरंगपट्टणची स्वारी (१ जानेवारी १७५७ –१५ जून १७५७)

कर्नाटक स्वारी करण्याचे नानासाहेब पेशव्यांचे मुख्य दोन उद्देश होते एक मराठयांची सत्ता वाढविणे, दुसरा म्हणजे संस्थानिकांकडून खंडण्या गोळा करणे.[६१] स्वारीचे तात्कालिक कारण म्हणजे म्हैसूर दरबारातील राजकारण होय. तेथील राजा व मंत्री यांच्यातील झगडा इतका विकोपास गेला की, राजाने नानासाहेब पेशव्यांची ताबडतोब मदत मागितली म्हणून पेशवे ६० हजार सैन्यासह स्वारीस निघाले.[६२] तिकडे गेल्यावर मुरारराव घोरपडेही येऊन मिळाला. नानासाहेब पेशवे मार्गातील संस्थानिकांकडून खंडण्या वसूल करीत श्रीरंगपट्टणास आले त्यावेळी दलवाई, म्हैसूरचा दिवाण व नंदाराजा यांची घाबरगुंडी उडाली, त्यावेळी हैदरअली हा दिंडीगल येथे होता त्यास परत बोलावले. मराठयांनी राजाकडे थकलेली खंडणी मागितली, तेव्हा तिजोरीत पैसा नाही कोठून देणार अशी त्याने अगतिकता प्रकट केली म्हणून सदाशिवरावभाऊंच्या सांगण्यावरून मराठयांनी श्रीरंगपट्टणच्या किल्ल्यास वेढा दिला व २७ दिवस तोफांचा भडिमार केला.[६३] नंदराजाने नानासाहेब पेशव्यांना निमंत्रण पाठविले व पेशव्यांनी एक कोटी खंडणीची मागणी केली. एवढी खंडणी मागणार नाही असे नंदराजास वाटत होते. मराठयांनी जे गोळे सोडले त्यापैंकी एक गोळा श्रीरंग देवालयाच्या कळसास लागून कळस मोडला. हे अशुभ समजून नानासाहेब पेशव्यांनी म्हैसूरकरांतर्फे महादेव वीरकर (सावकार) याची मध्यस्थी मान्य केली.[६४] तूर्त २६ लाख रूपये घेण्याचे पेशव्याने मान्य केले. तिजोरीत पैसा नसल्याने ५ लाख रोख बाकीचे पैसे पूर्ण करेपर्यंत दलवाईने १४ परगणे मराठयांस लावून दिले.[६५] त्या सुपीक चौदा परगण्यांची नावे– नागमंगल, बेळूर, किकेरी, चेनरायपट्टण, कडूर, बाणावर, हरनहल्ली, होनवल्ली, तुरविकिरे, कंदिकिरे, चिकनायकहल्ली, कडबा, केळूर, हुलियादुर्ग या प्रमाणे दलवाईशी तह करून या परगण्यात कमाविसदार नेमून शिरे प्रांती स्वारी केली. शिरे, होस्कोट, बाळापूर, कोलार, बेंगळूर हे परगणे एकमेकांस लागून ते 'स्वराज्या पैकी ' होते. [६६] नानासाहेब पेशवे, शिरे, बिनापट्टण इत्यादी सुभे घेत १५ जून १७५७ रोजी पुण्यास आले. म्हैसूरहून परत येताना बळवंतराव मेहेंदळे यास सहा हजार स्वारानिशी कर्नाटकात

ठेवले.अशाप्रकारे नानासाहेब पेशव्यांनी सन १७५२–१७५७ या पाच वर्षात दक्षिणेकडे मराठयांच्या राज्याच्या सीमा वाढविल्या होत्या.

### १.१७.६. बळवंतराव मेहेंदळयांची कर्नाटकातील कामगिरी (८मे १७५७ – फेब्रुवारी १७५८)

नानासाहेब पेशव्याने कर्नाटक मोहिमेवरून परत येण्यापूर्वी बळवंतराव मेंहदळे यास कर्नाटकातील संस्थानिकांकडून खंडणी वसूल करण्याची कामगिरी सोपविली होती. याचवेळी कर्नाटकात इंग्रजांना फ्रेंचाचा पराभव करण्यासाठी मराठयांची मदत गरजेची होती म्हणून ती त्यांनी बळवंतराव मेहेंदळयांकडे मागितली परंतु त्याने नकार दिला. कोलार घेऊन बळवंतरावांनी अर्काटकडे खंडणीची मागणी केली. मुराररराव घोरपडे हे ही बरोबर होते.

कर्नाटकच्या नबाबास इंग्रजांची मदत न मिळाल्याने त्याने मराठयांस काही रूपये देऊन समजूत काढली. कडाप्पाच्या नबाबानेही इंग्रजांकडे मदतीची मागणी केली परंतु इंग्रज–फ्रेंच संघर्ष सुरू झाल्याने त्यांनी मदतीस नकार दिला. कडाप्पाचा नबाब खंडणी देण्याचे लांबणीवर टाकू लागला म्हणून मराठयांनी कडाप्पा किल्ल्यास वेढा दिला. नबाबाने प्रतिकार केल्यामुळे भीषण लढाई होऊन त्यात नबाब मजीदखान गोळी लागून ठार झाला. मराठयांनी शहरात शिरून लाखो रूपयांची संपत्ती गोळा केली. त्यानंतर नबाबाचा भाऊ अब्दुल नजीबखान याने लढाई सुरू केली. मराठयांच्या जबरदस्त माऱ्यापुढे त्याचा टिकाव न लागता त्याने तहाची बोलणी लावली तसेच राज्याचा निम्मा मुलूख मराठयांस देऊन तह केला. बळवंतराव मेहेंदळयांनी आपला वकील श्रीरंगपट्टणला खंडणी मागण्यासाठी पाठविला होता. म्हैसूरच्या दलवाईशी बोलणी चालू असतानाच नानासाहेब पेशव्यांकडून तातडीने बोलावणे आल्याने ते फेब्रुवारी १७५८ मध्ये पेशव्यांस येऊन मिळाले.[६७] कडाप्पाचा विजय बळवंतराव मेहेंदळयांनी मराठी सरदारांच्या नेतृत्वाखाली मिळवल्याने त्यांची फारच प्रशंसा झाली. या विजयाची वार्ता पेशव्यांना कळविल्यानंतर नानासाहेब पेशवे आपल्या कर्नाटकातील मुख्य सरदार बळवंतराव मेहेंदळेस लिहतात, तुम्ही मागे राहून सडया फौजा पुढे पाठविल्या हे फार उत्तम गोष्ट या उपरी सर्वांचे समाधान करणे ,ज्यांनी कामकाजे केली त्यांस उमेदवार करणे न घडणे ते ईश्वराने घडविले बाहेर दबाव, वजन फार वाढले यश आल्यासारखा मुलूख हाती घेऊन बंदोबस्त करणे नंतर अदोनीचा अंमल रगडून बल्लारी घेऊन चित्रदुर्गाचे पारिपत्यास जाणे व सारा मुलूख निर्वेध करावा.[६८]

### १.१७.७ विसाजी कृष्ण व गोपाळराव पटवर्धनाची कर्नाटक मधील कामगिरी

कडाप्पाच्या नबाबाबरोबर तह केल्यानंतर बेदनूर आणि कर्नुल येथील खंडणी वसूल करण्याकरिता बळवंतरावांनी विसाजीस सैन्य देऊन पाठविले. विसाजीने खंडणी व दरबार खर्च मागितला, काही कुरबुरीनंतर नोव्हेंबर १७५७ मध्ये बिदनूरच्या राजाने खंडणी दिली. ती घेऊन विसाजी गेले आणि व्यंकटगिरी, बल्लारी, अनंतपूर, कालहस्ती, रायदुर्ग, व चित्रदुर्ग या संस्थानिकांकडून खंडण्या गोळा केल्या.[६९] तिथून ते अदोनीला आले. मार्च १७५८ पर्यंत विसाजीने व्यंकटगिरी, जनालताडपूरी, या संस्थानिकांकडून खंडण्या वसूल केल्या आणि श्रीरंगपट्टणास जाण्यासाठी फौज पाहिजे ती पाठवावी अशी मागणी पेशव्यांकडे केली.[७०] विसाजी इ.स.१७५८ मध्ये नानासाहेब पेशव्यांना कळवितात, स्वामींचे मर्जीनरूपच येथील करणारांचे लक्ष आहे. खंडणीदंडणीही स्वामीच्या प्रतापे करून आदमासेच झाल्या आहेत व राहिल्या आहेत, त्याही करून घेतो. फार फार जपोन संसार करतात या प्रमाणे येथील प्रकार करीत आहोत. दुरून कोठवर लिहावे सेवेसी आलियावर निवेदन करू तेव्हां चित्तास येईल.राजश्री बळवंतराव मेहेंदळे धनियाच्या कामास फार जपतात.[७१] कर्नाटकातील प्रदेशातून जास्तीत जास्त पैसा प्राप्त व्हावा अशी नानासाहेब पेशव्यांची अपेक्षा होती, ती पूर्ण करताना विसाजीस फार मेहनत घ्यावी लागत होती. ज्या सैन्याच्या जोरावर ते आपले काम करीत होते. त्या सैनिकांच्या गरजांकडे लक्ष देणे हे त्यांचे कर्तव्य होते. अत्यंत काटकसरीने त्यांना मोहिम हाताळावी लागत होती तरीही पेशव्यांचे आर्थिक हित जोपासण्याचा प्रयत्न त्यांनी केला. नानासाहेब पेशव्यांनी एकाच वेळी उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान या दोन्ही प्रदेशांवर मराठयांचे सार्वभौमत्व प्रस्थापित करावयाचे प्रयत्न चालविले होते, पैसा प्रामुख्याने कर्नाटकातील प्रदेशातून प्राप्त व्हावा अशी पेशव्यांची इच्छा होती. ही अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न विसाजाने केला.[७२] हे कार्य चालू असतानाच नानासाहेब पेशव्यांचा निजामाशी संघर्ष सुरू झाल्याने पेशव्यांनी कर्नाटकातून आपल्या सरदारास परत बोलाविले त्यामुळे श्रीरंगपट्टणचा गुंता अर्धवट तसाच सोडून व श्रीरंगपट्टणची त्या वर्षाची खंडणी न घेता मराठयांना परत यावे लागले.[७३] या विषयी पेशवे दप्तरात एक अप्रकाशित पत्र उपलब्ध आहे ते पुढीलप्रमाणे– २१ जून १७५८ रोजी विसाजीने मुक्काम सुभा रहिमतपूर येथून नानासाहेब व भाऊसाहेब यांना पाठविलेल्या पत्रात त्याने, 'कृष्णा नदी पार करून तेथून नीरा नदीपार करून सेवेसी सत्वर

येतो असे कळविले होते त्यावरून जून १७५८ मध्ये विसाजी कर्नाटक प्रदेशाहून परत आले हे सिद्ध होते.[७४] त्यानंतर विसाजीने नानासाहेब पेशव्यांस निजामाच्या संघर्षात मदत करून अहमदनगरचा किल्ला जिंकून दिला. या घटनेमुळे पेशवे निजाम संघर्ष अधिकच वाढला. निजामाचा आक्रमक पवित्रा लक्षात घेऊन सदाशिवरावभाऊने मराठयांच्या फौजा बेदरकडे पाठविल्या त्या उदगीर स्थानी पोहोचल्या.११ जानेवारी १७६० रोजी निजामाशी संघर्ष सुरू झाला यात विसाजीचा वाटा होता. ३ फेब्रुवारी १७६० रोजी उदगीरची लढाई झाली यात मराठयांचा विजय झाला .निजामाने तहाची याचना केली. निजाम व मराठे यांच्यात ११ फेब्रुवारी १७६० रोजी तह झाला.[७५]

विसाजी कर्नाटकाहून परतल्यानंतर तेथील काही संस्थानिकांनी मराठयांना विरोध सुरू केला होता, पूर्वी कबूल केलेली खंडणी देण्याचे टाळू लागले. अशा संस्थानिकांवर पुन्हा जरब बसविणे आवश्यक होते म्हणून नानासाहेब पेशव्यांने दक्षिणेची जबाबदारी १७ मार्च १७६० रोजी वीस हजार फौजेसह विसाजीकृष्ण व गोपाळराव पटवर्धनांच्या नेतृत्वाखाली दिली तसेच सदाशिवरावभाऊने उत्तरेकडे प्रस्थान केले. [७६] या मोहिमेत विसाजीला हैदर अलीशी संघर्ष करावा लागला. हैदरची म्हैसूरचे राज्य बळकावयाची वृत्ती प्रधान खंडेरायास अजिबात आवडली नाही. प्रधान या नात्याने त्याने राजाला योग्य सल्ला देण्याचे काम केले. म्हैसूरच्या कार्यकारी मंडळात असे काही सदस्य होते की, ज्यांचा हैदरला विरोध होता. यात सचिव व्यंकटपट्टया, खजिनदार विरण्णा चेट्टी व अनय्याशास्त्री यांचा समावेश होता. या सदस्यांनी खंडेरायाशी संपर्क साधून हैदरअलीला पदच्युत करावयाचे ठरविले व खंडेरायाने त्यांना साथ दिली.[७७] याचवेळी म्हैसूरच्या परिसरात मराठयांच्या फौजा खंडणी गोळा करीत होत्या. खंडेरायाने विसाजीशी संपर्क साधून मराठयांच्या मदतीने हैदरअलीचा पाडाव करण्याची योजना आखली परंतु ती अपयशी ठरली.[७८] या नंतर पुढे तीन महिने पर्यंत मराठयांचा हैदरअलीशी जबर संग्राम चालला होता. या संग्रामामध्ये हैदरअलीला श्रीरंगपट्टणला पळून जाण्यास भाग पाडले होते त्यात मुख्य वाटा विसाजीकृष्ण व गोपाळराव पटवर्धनाचा होता. या हैदरअलीच्या पलायनावर भाष्य करणारे विसाजीचे एक अप्रकाशित पत्र पेशवे दप्तरामध्ये उपलब्ध आहे,त्यात विसाजी लिहितो की,श्रीरंगपट्टणची खंडणी गुदस्ता राजश्री गोपाळरावजींच्या कराराप्रमाणे दयावयास संस्थानिक रूजू असता, हैदर नाईकाने गतवर्षी गोपाळरावास लढाई दिली होती

त्यामुळे फारच शेर होऊन बेहोष झाला होता आणि खंडणी न दयावी यैसा विचार करून खबरदारीने पट्टणच्या शुक्रवारपेठेत बसला होता.सरंजाम बेमबलग यास्तव केवळ त्यासी झुंजनेच म्हटल्यास ठीक पडणार नाही, बरसातीचे दिवस व माणूस जाया का करावे, सामदामे करून कार्य करावे या अर्थे संस्थानिकांसही थोडे बहुत सांगून पाठावयाचे ते पाठविले व मागाहून तीन–चार हजार फौज पारपत्य उत्तम प्रकारे करावे या उद्‌देशाने पाठविली, ती फौज पोहचताच सरकारची फौज आली संस्थानिक व हे एक झाले. या उपरी आपला प्राण वाचत नाही यैसी दहशत खाऊन आवासान न धरवता येकटा बायकामुले टाकून रात्रीचा पळून बेंगलूरास गेला.शेर तो झाला होताच,परंतु धन्याच्या प्रतापापुढे त्याच्याने टिकाव धरितो यैसे नाही, यामुळे भयभीत होऊन पळून गेला.[७९]

विसाजी हैदर अलीचे पारिपत्य करीत असताना त्याचे लक्ष अर्काट प्रांताकडे सुध्दा होते.अर्काट प्रांतात यावेळी मोहम्मद अली हा नबाब होता ,त्याचे व इंग्रजांचे सख्य होऊन मराठयां विरूध्द राजकीय डावपेच सुरू होते. त्यांनी फ्रेंचाना पाँडेचरीत चारही बाजूने कोंडीत पकडले होते त्यामुळे फ्रेंचांनी मराठा सरदार विसाजी कृष्णशी संपर्क साधून मराठयांची मदत मागितली होती.विसाजीने फ्रेंच्याची ही मागणी कबूल केली होती.[८०] या मोबदल्यात त्याने एक पंधरा कलमी करार फ्रेंच्यांकडून मान्य करून घेतला होता. त्यातील महत्त्वाची कलमे – चंदीचा किल्ला साधन सामुग्रीसहित पेशव्यांना मिळावा,फ्रेंच्यांच्या मदतीस पाठविलेल्या पेशव्यांच्या फौजेचा खर्च फ्रेंचांनी दयावा, पेशव्यांनी फ्रेंचाना मदत मागितली तर जेथे गरज भासेल तेथे २००० फौजेसह तोफखाना व बारूद साहित्य पाठवावे,याचा खर्च पेशवे देतील,पण कर्नाटकात मदतीस बोलावले तर मात्र फ्रेंच्यांनी फौजेचा खर्च मागू नये. पेशव्यांच्या शत्रूंना फ्रेंच्यांनी आश्रय देवू नये, शत्रूचे पारिपत्य दोघांनी मिळून करावे इत्यादी. या यादीचा तपशील अभ्यासला असता असे दिसते की,विसाजीने युरोपीयन शक्तिशी ज्या प्रकारची राजकीय नीती अंमलात आणली त्यानुसार पेशव्यांना अधिकाधिक लाभ होईल हा उद्देश विसाजीचा होता व हा तह १७ सप्टेंबर १७६० रोजी झाला होता.[८१] विसाजीने फ्रेंचांशी केलेल्या या राजकारणाची जाणीव मोहम्मदअली व इंग्रजांना समजताच त्यांना भीती वाटू लागली व त्यांनी लगेच मराठयांशी संपर्क साधला. इंग्रजांनी विसाजीस समजावले की, तो जर आपली सर्व फौज घेवून स्वदेशी जाण्यास तयार असेल तर इंग्रज मराठयांना वीस लाख रूपये हप्त्या हप्त्याने देतील.अर्थात हा प्रस्ताव त्याने

कबूल केलेला असावा व त्याच्या हातात काही रक्कम देण्यात आलेली असावी असा उल्लेख म्हैसूरच्या इतिहासात आढळतो.[८२] नोंव्हेबर १७६० मध्ये नानासाहेब पेशव्यांच्या आज्ञेनुसार गोपाळराव कर्नाटकातून परत आले होते. १४ जानेवारी १७६१ मध्ये उत्तरेत मराठयांचा तिसऱ्या पानिपत युध्दात पराभव झाल्याने जानेवारी १७६१ मध्ये विसाजीनेही परतण्याचा निर्णय घेतला. मे १७६१ मध्ये विसाजीने आपल्या परतीच्या प्रवासात कित्तूर प्रांतातील राजकीय समस्या सोडविल्या त्यानंतर तो कृष्णा नदी पार करून पुण्यास आला. [८३] कर्नाटकात मराठयांचा प्रभाव निर्माण करण्यात विसाजीकृष्ण व गोपाळराव पटवर्धन यांनी आपले सारे कर्तृत्व पणाला लावले होते. कर्नाटकात मराठयांची सत्ता विस्तारली,पण नानासाहेब पेशव्याने या प्रदेशात मराठयांचा अंमल स्थायी स्वरूपात निर्माण करण्यासाठी निश्चित स्वरूपाची कारभार विषयक यंत्रणा न राबविल्यामुळे, मुख्य सरदारांच्या अनुपस्थितीत कर्नाटकात बेबंदशाही माजली त्यामुळे मराठयांनी केलेल्या परिश्रमाचे मूल्य धुळीस मिळाले. वास्तविक पाहता मराठयांनी कर्नाटकात एवढा जबरदस्त प्रभाव निर्माण केला होता की, तो प्रभाव नष्ट करणे युरोपियन शक्तिनांही सहज शक्य नव्हते असे मान्य केले होते.[८४]

## १.१८ समारोप –

मध्ययुगामध्ये औरंगाबाद ते मद्रासच्या समुद्र किनारपट्टीच्या प्रदेशाला दख्खनचा प्रदेश म्हणून ओळखले जात होते व त्याला कर्नाटक ही संज्ञा वापरली जात होती. आजचे आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ व महाराष्ट्र राज्यांचा त्यामध्ये समावेश होतो. कर्नाटकात मराठयांचा प्रवेश प्रथम शहाजी राजे भोसले यांच्यारूपाने झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकानंतर कर्नाटक मोहिम हाती घेऊन वेलोर, जिंजी, तंजावर व पाईनघाटापर्यत अनेक किल्ले जिंकून मराठयांचे राज्य स्थापन केले. दक्षिणेत मोगलांच्या वर्चस्वाखाली सहा सुभे होते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर १८ व्या शतकात शिरा, कर्नूल, कडाप्पा, सावनूर व अर्काट हे पाच नबाब सामर्थ्यशाली होते. तंजावर व गुत्ती ही मराठयांची दोन संस्थाने कर्नाटकात होती.

छत्रपती शाहूने १२ जानेवारी १७०८ रोजी राज्याभिषेक करून घेतला.मराठयांच्या इतिहासात पेशव्यांचा उदय ही एक क्रांतिकारी घटना मानावी लागेल. बाळाजी विश्वनाथाने मुघलांच्या दक्षिणेतील सहा सुभ्यातून चौथाई, सरदेशमुखीच्या सनदा आणल्या. सनदांच्या

वसुलीच्या निमित्ताने मराठयांचा दक्षिणेशी संबंध आला. बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूनंतर छत्रपती शाहूने मोगल पातशाही रक्षून राज्यविस्तार साधावा या हेतूने दक्षिण धोरण आखले.सन१७४३ च्या हुकुमान्वये शाहूने बाबूजी नाईकाला कर्नाटकची जबाबदारी सोपविली त्याने दोन स्वाऱ्या काढल्या परंतु अपयश आले व १९ लाख रूपये खंडणी थकली. कर्नाटक प्रांत आपल्या ताब्यात असावा अशी त्यांची इच्छा होती म्हणून फत्तेसिंगराव भोसल्यांना अक्कलकोटचा प्रदेश जहागीर म्हणून दिला. पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या नेतृत्त्वाखाली कर्नाटकात १७२५ ला पहिली चित्रदुर्गाची स्वारी काढली. सोंधे, बिदनूर, हरपनहळळी, गदग, गोकाक इत्यादी ठिकाणच्या थकलेल्या खंडण्या वसूल केल्या तसेच १७२६ च्या दुसऱ्या श्रीरंगपट्टणच्या स्वारीमध्ये अर्काट व इतर पाळेगाराकडून खंडण्या वसूल केल्या. या दोन्ही स्वाऱ्यात बाजीरावाने पश्चिम व मध्य कर्नाटकात मराठयांनी आपले चौथाई व सरदेशमुखीचे हक्क लागू केले. दक्षिणेत हैद्राबादच्या निजामाचे आर्थिक व राजकीय हितसंबंध गुंतले होते. निजामाने छत्रपती शाहू व कोल्हापूरच्या संभाजी यांच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. बाजीराव पेशव्याने निजामाच्या पालखेड येथे २७ ऑगस्ट १७२७ रोजी पराभव केला. छत्रपती शाहू व संभाजी यांच्यामध्ये वारणेचा तह १३ एप्रिल १७३१ रोजी होऊन यादवी संपुष्टात आली.

पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर इ.स.१७४० मध्ये छत्रपती शाहूने नानासाहेब यास पेशवे म्हणून नेमले म्हणून १७४६ पासून शाहूने कर्नाटक प्रांताची जबाबदारी नानासाहेब पेशव्यांवर सोपविली. छत्रपती शाहूच्या मृत्यूनंतर पेशव्यांचे स्थान हे बलशाली बनले. १७५० पासून मुखत्यारीने मराठी राज्याचा कारभार करण्यास मराठा मंडळाने अधिकृतपणे नानासाहेब पेशव्यांना संमती दिली. इ.स.१७५२ ते १७५७ या पाच वर्षाच्या कालावधीत श्रीरंगपट्टण, सावनूर, इत्यादी पाच मोहिमा काढून राज्याच्या सीमा वाढविल्या होत्या. नानासाहेब पेशव्यांच्या काळात दक्षिणेत विसाजी कृष्ण बिनीवाले, गोपाळराव पटवर्धन, बळवंतराव मेहंदळे, मुरारराव घोरपडे इत्यादी सरदार निर्माण झाले. विसाजी कृष्ण व गोपाळराव पटवर्धन यांनी मराठयांचा प्रभाव निर्माण करण्यामध्ये आपले सर्वस्व पणाला लावले. थोडक्यात राज्याची आर्थिक घडी बसविण्याचा प्रयत्न केला परंतु कर्ज कमी न होता वाढलेले दिसते. नानासाहेब पेशव्यांनी सन १७५७ पासून कर्नाटकाकडे दुर्लक्ष केल्यानेच दक्षिणेत म्हैसूरच्या हैदरअलीचा व इतर पाळेगारांचा मराठयांना विरोध सुरू झाला. नानासाहेब पेशव्याने एकाचवेळी उत्तर व दक्षिण

मोहिम आखल्याने मराठयांचा दक्षिणेत तुंगभद्रेपर्यंत साम्राज्यविस्तार झाला. दक्षिणेतील पैसा मराठयांना मिळाला पण कायमचा अमंल निर्माण करण्यामध्ये नानासाहेब पेशव्यांना काही अंशी अपयश आले हे मान्य करावे लागते.

## संदर्भ


१) सरदेसाई गो.स.मराठी रियासत पेशवा बाळाजीराव,खंड–४,सुधारित आवृत्ती, मुंबई १९९०, पृ.११०

२) खरे.वा.वा.,ऐतिहासिक लेखसंग्रह,भाग२,कुरूंदवाड भाऊ नाना छापखाना ,मिरज १९०८, पृ.६३६

३) सरदेसाई गो.स. उपरोक्त, पृ.११०

४) खरे वा. वा., उपरोक्त,भाग–२, पृ.६३८

५) सरदेसाई गो.स. उपरोक्त , पृ.११०

६) खरे वा.वा. उपरोक्त, भाग–२,पृ.६३९

७) सरदेसाई गो.स.उपरोक्त , पृ.११०

८) कित्ता, पृ.११२

९) खोबरेकर वि. गो.,मराठ्यांचा इतिहास भाग–२, म.रा.सा.सं.मंडळ;मुंबई १९८८ पृ.६

१०) कित्ता पृ .७

११)सरदेसाई गो.स.मराठी रियासत,पुण्यश्लोक शाहू पेशवा बाळाजी विश्वनाथ खंड–२,सुधारित आवृत्ती ,मुंबई १९८९ ,पृ.२१–२२

१२) खोबरेकर वि. गो.,उपरोक्त भाग–२ पृ.७

१३) राजवाडे वि.का.मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड–१८, मुंबई १९१४ ले.४६

१४)सरदेसाई गो.स.उपरोक्त, मराठी रियासत खंड–२, पृ.२७८

१५) Sarkar J.N., History of Aurangajeb, Vol. V, Calcutta ,1948, p.6

१६) राजवाडे वि.का.,मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड–२१, ले.३२८

१७)राजवाडे.वि.का.,मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड–२०,पुणे शके,१८३७, ले.४४

१८) कुलकर्णी अ.रा.,पुण्याचे पेशवे राजहंस प्रकाशन, पुणे ,१९९९, पृ.१८

१८अ) रानडे एम.जी.,मराठी सत्तेचा उदय, मुंबई १९६१ ,पृ.१४०

१८ब)सरदेसाई गो.स. मराठी रियासत मध्य विभाग,खंड–४,मुंबई १९९०,पृ.१२७– १३०

१९)सरदेसाई गो.स.मराठी रियासत खंड–३,पुण्यश्लोक शाहू पेशवा बाळाजी विश्वनाथ पेशवा बाजीराव, सुधारित आवृती ,मुंबई १९८९ पृ.१४०, १६३

२०) खोबरेकर वि.गो.,उपरोक्त , भाग–२ पृ.४५

२१) SardesaiG.S.,New History of the Marathas Vol.II(1707-1772) Second Edition, Phonix Publication,Bombay,1958,P.57.

२२) इंडियन हिस्ट्री कॉंग्रेस, प्रासेडींग १९६०, पृ.२९१

२३) सरदेसाई गो.स. उपरोक्त मराठी रियासत खंड–३,पृ. १६३

२४) सरदेसाई गो.स., पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद , खंड– ७, मुंबई १९३१ ,पृ.६४

२५) खोबरेकर वि.गो., उपरोक्त , भाग–२ पृ.७४

२६) टिपणीस.मरा.(संपा.)का.ना.साने,शाहू महाराजांचे चरित्र,पुणे शके १८४२, पृ.६३,

२७) कुलकर्णी अ.रा.,उपरोक्त , पृ.२५

२८) इंडियन हिस्ट्री रेकॉर्ड कॉंग्रेस व्हॉ.१७, पृ.२१२,१३

२९) राजवाडे वि.का.,संपा.,मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड–२, वाई १९०० पृ.५३

३०) Duff Grant, History of the Maratha, Vol.I, London 1921 P.494

३१) वाड.ग.चि .द.ब.पारसनीस संपा.शाहू.रोजनिशी,भाग१ मुंबई १९१७.पृ.१९६

३२) सरदेसाई गो.स., पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद , खंड– २१, मुंबई ,लेखं,५८

३३) राजवाडे वि.का.,मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड–८, पुणे,१९०३, लेख.६४, ९६

३४) सरदेसाई गो.स. उपरोक्त , मराठी रियासत खंड–३, पृ.१०१

३५) वाड.ग.चि .द.ब.पारसनीस संपा.शाहू रोजनिशी,उपरोक्त ,पृ.२५, २६

३६) सरदेसाई गो.स., पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद ,खंड– १०, मुंबई , लेख ५०

३७)सरदेसाई गो.स.,पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद ,खंड–१५,मुंबई १९८८ ,लेख २९

३८) कुलकर्णी अ.रा.,उपरोक्त, पृ.२५

३९) मा.वि.गुजर ,संपा.करवीर घराण्याच्या इतिहासाची साधने, भाग–२, पृ.३४, ३५

४०) खोबरेकर वि .गो., उपरोक्त पृ.१४०

४१) खरे वा.वा.,ऐतिहासिक लेखसंग्रह,भाग२,कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना मिरज१९०८ पृ.६४८

४२) खोबरेकर वि. गो., उपरोक्त, भाग–२ पृ.१४७

४३) सरदेसाई गो.स.,पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद खंड ४० मुंबई १९३४, लेख २८

४४) पुरंदरे कृ.वा. (संपा.) पुरंदरे दप्तर, भाग-१, पुणे १९२१ ले. ५९

४५) खोबरेकरं वि.गो. मराठ्यांच्या स्वा-यांचे मुक्काम,इतिहास मंडळ ,मुंबई १९७६ ,पृ.२८६

४६)सरदेसाई गो.स. मराठी रियासत, पेशवा बाळाजीराव, खंड ४,सुधारित आवृत्ती,मुंबई १९९०,पृ.६८१

४७) राजवाडे वि. का.,मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १, वाई १८९८ पृ.५०

४८) बेंद्रे.वा.सी.,(संपा.)महाराष्ट्र इतिहासाची साधने,खंड१,प्रथमआवृत्ती,मुंबई १९६६पृ.१३९

४९) पारसनीस द.बा.,इतिहास संग्रह व ऐतिहासिक चरित्रे, खंड-२, पृ.१११

५०) सरदेसाई गो.स,पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद,खंड २८ मुंबई,१९३३,लेख ६३, ६६, १०४, १०८

५१) खोबरेकर वि.गो., उपरोक्त, भाग-२ पृ.२०८

५२) वाड.ग.चि .द.ब.पारसनीस संपा.शाहू.रोजनिशी,भाग१,मुंबई १९१७ , पृ.११६

५३) राजवाडे वि.का., उपरोक्त , खंड १, वाई १८९८ लेख. १४५

५४) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड-४, सुधारित आवृत्ती ,मुंबई १९९० पृ.३५५

५५)सरदेसाई गो.स.,पेशवे दफ्तरातन निवडलेले कागद ,खंड२८मुंबई ,१९३३, लेख ८२

५६) राजवाडे वि.का.,मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड २, वाई १९९० पृ. १२६

५७)सरदेसाई.गो.स., उपरोक्त ,खंड-२८,ले. ६१, ३५

५८) खोबरेकर वि.गो., उपरोक्त ,भाग-२ पृ.२१०

५९) कित्ता, पृ.२११

६०) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग-२ पृ.६५१, ६५२

६१) सरदेसाई गो.स.,पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद खंड-२७मुंबई ,१९३३,लेख१२७, १३५

६२) वाड.ग.चि,द.ब.पारसनीस(संपा.) पेशवा बाजीराव रोजनिशी, भाग२,मुंबई ,१९०६ पृ.९३

६३) राजवाडे वि.का.,मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड-२, वाई १९९० लेख. १४१

६४) राजवाडे.वि.का,मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड,३ कोल्हापूर १९०१ लेख.१३८,१५५

६५)Wilks Mark, Historical Sketches of the South of India, Vol.I,London, 1810, P.359

६६) खरे वा.वा., उपरोक्त, भाग–२ ,पृ.६५३

६७) खोबरेकर वि.गो., भाग–२ ,उपरोक्त पृ.२१५

६८) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड–४, सुधारित आवृत्ती ,मुंबई १९९० पृ.३६६

६९) सरदेसाई गो.स., उपरोक्त ,खंड–२८, लेख २०२, २०४

७०) कित्ता, ले.२१०, २१६

७१) सरदेसाई गो.स.उपरोक्त , खंड–२८,लेख २१४

७२) सरायकर सुनिता,विसाजीकृष्ण बिनीवाले काळ आणि कर्तृत्व,नागपूर,२००७ पृ.२९

७३) खरे वा.वा., उपरोक्त, भाग–२ पृ.६५३–५५

७४) पुणे अभिलेखागार अप्रकाशित.सं. नि.का. रूमाल ७ पुडके नं ५, पत्र क्र. ३७९२

७५) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड–४, सुधारित आवृत्ती ,मुंबई १९९० पृ.३४७

७६) खरे वा.वा. , उपरोक्त , भाग–२ , पृ.६६७

७७) Sinha N.K., Haidar Ali, Calcutta, 1941, P.29

७८) सरदेसाई गो.स.,पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद,खंड–२८मुंबई,१९३३, लेख २६२

७९) पुणे अभिलेखागार अप्रकाशित .सं .नि.का. रूमाल १२ पुडके नं ४, पत्र क्र. ७९४९

८०) खरे वा.वा.,उपरोक्त , भाग–२, पृ.६८२

८१) ऐतिहासिक टिपण, ४, पृ.७३

८२)Wilks Mark, Historical Sketches of the South of India,History of Mysoor,Vol.I¸ London,1810, P.425-426

८३) सरदेसाई गो.स.,पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद,खंड–२१मुंबई ,१९३१लेख २७७

८४) पिसुर्लेकर पांडुरंग,(संपा) पोर्तुगीज मराठे –संबंध, भाग–६, पृ.४५

प्रकरण दुसरे

# तिसरे पानिपतचे युद्ध व माधवराव पेशवे

२.१ प्रस्तावना

२.२ तिसऱ्या पानिपत युद्धाचे परिणाम

२.२.१ नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू

२.२.२ म्हैसूरच्या प्रदेशात हैदर अलीचा उदय

२.२.३ दक्षिणेत निजामाचा उदय

२.२.४ इंग्रजी सत्तेचा उदय

२.२.५ प्रचंड जीवित व वित्तहानी

२.२.६ कर्नाटकच्या राजकारणावरील परिणाम

२.२.७ पानिपत युद्धातील पराभव

२.३ माधवरावाचा जन्म, बालपण व शिक्षण

२.४ माधवरावास पेशवेपदाची प्राप्ती

२.५ मराठी राज्याची स्थिती

२.६ मराठी राज्य व माधवराव पेशवे

१) गोपिकाबाईची योजना

२) लष्करी सुधारणा

३) आर्थिक सुधारणा

४) राज्याच्या मुलकी व दिवाणी कारभारात सुधारणा

५) पुणे शहरात कोतवालीस प्रारंभ

६) आरमार व तोफखाना विषयक सुधारणा

७) इंग्रजाशी तहाचे यशस्वी राजकारण

८) निजामाशी संघर्ष व तह

२.७ दक्षिणेची निवड

२.८ दक्षिण धोरण

२.९ समारोप

# प्रकरण दुसरे

# तिसरे पानिपतचे युद्ध व माधवराव पेशवे

## २.१ प्रस्तावना

तिसऱ्या पानिपतच्या युद्धाने भारताच्या इतिहासावर दुरगामी परिणाम घडून आले. यामध्ये प्रामुख्याने नानासाहेब पेशव्यांचा झालेला मृत्यू, दक्षिण भारताच्या राजकारणात हैदर अलीचा झालेला उदय,हैद्राबादच्या निजामाचा झालेला उदय,उत्तरेत मराठी सत्तेच्या वर्चस्वाला निर्माण झालेले आव्हान व इंग्रजी सत्तेचा उदय, प्रचंड जीवित व वित्तहानी ,कर्नाटकच्या राजकारणावर झालेला परिणाम इत्यादीचा समावेश होतो. माधवराव पेशव्यांचा जन्म, बालपण व शिक्षण, माधवरावास पेशवे पदाची झालेली प्राप्ती, मराठी राज्याची स्थिती, मराठी राज्य स्थिर करण्यासाठी माधवरावाने केलेले विविध प्रयत्न, तसेच सुधारणा, उत्तर भारता ऐवजी दक्षिण धोरणाची निवड, दक्षिण धोरण स्वीकारण्याची विविध कारणे इत्यादी घटकांची माहिती या प्रकरणात देण्यात आली आहे.

## २.२ तिसऱ्या पानिपत युद्धाचे परिणाम

इ.स.१७६०मध्ये सदाशिवराव भाऊच्या नेतृत्वाखाली मराठयांची फौज उत्तरेकडे पाठविण्यात आली होती.उदगीर व पानिपत या दोन लढायांच्या मधल्या काळात नानासाहेबाने पैठणच्या वाखरे घराण्यातील राधाबाई या नऊ वर्षाच्या देशस्थ मुलीशी आपल्या वयाच्या चाळीसाव्या वर्षी दिनांक २७ डिसेंबर १७६० रोजी लग्न केले. यावेळी भाऊसाहेब पानिपतावर अब्दलीचा पेच कसा सोडवावा या विवंचनेत होते. मराठी सैन्याची उपासमार होत होती तर इकडे नानासाहेब पेशव्यांचा सिद्धटेक ठिकाणी मुली पाहण्याचा सोहळा कित्येक महिने चालला होता. दाखवावयास आलेल्या मुलीना प्रवास खर्च,कपडे,काही शिधा व सामुग्री दिली जात असे.पेशवे दप्तरात असे उल्लेख आढळतात की, बाजीराव माणकेश्वराची मुलगी पाहावयास आणली होती,तिला निरोप दिला.उचेगाव परगणे आंबड येथील कुलकर्णी यांची मूल पाहावयास आणली या दोघींना प्रत्येकी ५० रूपये देऊन तूर्त घरास जावयास निरोप दिला. हे पैसे सरकारी 'पोता'(खजिना)तून दिले. पुण्याजवळच्या नांदेड गाव मधून 'बाबूराव ठाकर नांदेडकर' यांची कन्या लष्करात पहावयास आणली ती माघारी पाठविली इत्यादी सात मुलीस खर्चास ५० रूपये दिले.[१]

### २.२.१ नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू

१४ जानेवारी १७६१ च्या तिसऱ्या पानिपत युद्धात मराठयांचा दारूण पराभव ही नानासाहेब पेशव्यांच्या जीवनातील अत्यंत दुःखद घटना होय. लग्न समारंभ आटोपून सन १७६१ च्या जानेवारीमध्ये ते सदाशिवराव भाऊच्या मदतीसाठी आपल्या सैन्यासह उत्तरेकडे निघाले व ते भेलसा या ठिकाणी पोहचले. दिनांक २४ जानेवारी १७६१ रोजी एक सावकार काशीद पत्र घेऊन भेटला. त्यात 'दोन मोती गलत, दस बीस अश्राफत रूपयोंकी गणति नाही असा सांकेतिक मजकूर आढळला.'[२] या त्रोटक मजकुरावरून विश्वासराव, सदाशिवरावभाऊ व काही सरदार आणि शिपाई पानिपतावर गारद झाल्याची धक्कादायक बातमी समजली त्यानंतर दररोज दिल्लीच्या बातम्या येऊ लागल्यामुळे नानासाहेब पेशव्यांने दिल्लीकडे जाण्याचा निर्णय घेतला.पेशवे सिरोजच्या उत्तरेस ३२ मैलावर असलेल्या कछौर येथे पोहचले व तेथे सुमारे दीड महिना मुक्काम करून राहिले.या काळात त्यांनी पानिपत येथून परतलेल्या मंडळीचा परामर्श घेतला. नानासाहेब पेशव्यांची प्रकृती अतिशय क्षीण झालेली होती. यावेळी मल्हारराव होळकर त्यास भेटले, त्याच्याच सल्ल्याने नानासाहेब पेशव्यांने माघारी परतण्याचा निर्णय घेतला.[३] वाटेत शक्य असेल तेवढी राज्याची पडझड सावरण्याचा त्यांनी प्रयत्न केला. गोदावरी काठी टोक्यास आपल्या पित्याचे श्राद्ध दिनांक १६मे १७६१ रोजी उरकून जूनच्या आरंभी ते पुण्यास पोहचले. पुण्याच्या लकडी पुलाचे काम त्यांनी सुरू केले होते, ते सहा दिवसाच्या आत पूर्ण करून घेतले.दिनांक १८ जून१७६१ रोजी स्वारी पर्वतीच्या बंगल्यात जाऊन राहिली तेथे प्रकृती अधिक बिघडून लोकांस शिवीगाळी करू लागले.कारभार विपरित होऊ लागला.पुत्रशोक व बंधुशोक अंतकाळी गोपिकाबाई व नाटकशाळा पलीकडे खोलीत होत्या. काळ झाला तेव्हा रघुनाथराव जवळ आले त्यांनी मांडी दिली, माधवरावही होते. मंगळवारी ज्येष्ठ वद्य ६ म्हणजेच २३ जून १७६१ रोजी दीड प्रहर रात्री देहावसन झाले. मरताना त्यांच्या तोंडी भाऊ भाऊ भाऊ वाचून दुनिया दौलत व्यर्थ हेच शब्द होते.[४] लकडी पुलाजवळ अंत्यविधी केला,तेथेच वृंदावन आहे. थोडक्यात पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचा एक परिणाम म्हणजे त्याच्या धक्क्याने नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू झाला.

### २.२.२ म्हैसूरच्या प्रदेशात हैदर अलीचा उदय

सन१७६१च्या तिसऱ्या पानिपतच्या युद्धानंतर पहिला माधवराव पेशवा झाला.प्रो. ए.सी.बॅनर्जी मते,'पहिला माधवराव पेशवा हा श्रेष्ठ पेशवा होता व त्याचे लक्ष उत्तरेपेक्षा दक्षिणेकडे जास्त होते'.रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई म्हणतात,पानिपतच्या आरिष्टानंतर दक्षिणेत हैदरअलीचा उदय झाला ही घटना मराठयांच्या दृष्टीने अतिशय चिंतेची बाब होती. दक्षिणेत म्हैसूरच्या राज्यामध्ये अर्थात कर्नाटकामध्ये मराठयांना उपद्रव देणाऱ्या हैदरअली बद्दल थोडी माहिती असणे आवश्यक आहे. हैदर अलीचा जन्म हा इ.स.१७२२ मध्ये झाला असे मानतात. हैदर अलीचे वडील फत्तेमहमंदखान, आजा महंमदअली, मामा इब्राहिम व हैदर अलीचा भाऊ शहाबाज हे सर्व म्हैसूर राज्याच्या सैन्यामध्ये पायदलात नाईक होते.हैदरअली हा म्हैसूरकरांच्या पायदलात एक नाईक होता. म्हैसूरचा अल्पवयीन राजा चिक्क कृष्णराज हा आपला राज्यकारभार देवराज व नंदराज या दोघांच्या सल्ल्यानुसार चालवित होता. देवराज यास सर्वाधिकाराचा मान होता. नंदराजा हा सैन्यावरचा मुख्य अधिकारी व प्रधान ही दोन्ही कामे पाहत होता.नंदराजाचा हैदरअलीवर अतिशय लोभ होता, त्याचाच फायदा घेऊन हैदरअलीने खोटे हिशोब दाखवून अमाप संपत्ती मिळविली होती.या संपत्तीच्या जोरावरती त्याने कवायती फौजा व तोफखाना उभारला.हैदरअलीची हुशारी व धडक पाहून इ.स.१७५५ मध्ये त्याला दिंदिगलचा सुभेदार नेमले होते.[५]

मराठयांनी इ.स.१७५७ मध्ये नानासाहेब पेशव्यांच्या नेतृत्वाखाली म्हैसूरवर स्वारी करून श्रीरंगपट्टणला वेढा दिला तेव्हा म्हैसूरकरांनी मराठयांशी तह करून वेढा उठविण्यास मराठयांना भाग पाडले होते. तहात ३२ लक्ष रूपये मराठयांना देण्याचे नंदराजाने कबूल केले होते त्यापैकी नंदराजाने रोख ५ लाख रूपये दिले व बाकीच्या रक्कमेच्या फेडीकरिता मराठयांना म्हैसूर राज्यापैकी उत्तम सुपीक चौदा परगणे लावून दिले. त्या परगण्याची नावे – नागमंगल, बेळूर, किकरी, चेनरायपट्टण, कडूर बाणावर, यकनहळ्ळी, होनवल्ली, तुरविकिरे, कंदीकिरे, चिक्कनायकनहळ्ळी, कडप्पा ,नेलूर व हुलियादुर्ग इत्यादी मराठयांनी या चौदा परगण्यात कमाविसदार नेमले व त्याच्या रक्षणाकरिता थोडी फौज ठेविली. शिरे,होसकोट, बालापूर, कोलार व बंगळूर हे एकमेकास लागून असलेले शिवकालीन स्वराज्यापैकी परगणे ताब्यात घेतले तसेच अर्काट, शिरे, कडप्पा, कर्नूल, सावनूर येथील नबाबाकडून मराठयांनी खंडण्या घेतल्या.

शिरे संस्थान खालसा करून तिथे मराठयांनी आपली पावसाळी छावणी उभारली होती. कडप्पाच्या नबाबाशी पुढीलवर्षी युद्ध चालू असता हैदरच्या सांगण्यावरून नंदराजाने मराठयांना चौदा परगण्यातून हुसकावून लावले. या म्हैसूरकरांच्या आगळिकीबद्दल त्याचे पारिपत्य करण्यास पेशव्यांनी गोपाळराव पटवर्धनास पाठविले होते. हैदरअली हा या परचक्राचे निवारण करण्याकरिता पुढे सरसावला व त्यास सैन्याधिकार देऊन म्हैसूर दरबाराने मराठयांशी लढत देण्याचे सांगितले.[६]

हैदरअलीने गोपाळरावाशी मोठया हिकमतीने व जिद्दीने टक्कर दिली.दोघांनी ही आपल्या सैन्याची नासाडी न होऊ देता लढाई चालू ठेवली होती. शेवटी तह झाला त्यानुसार असे ठरले की,३२ लाख रूपये रोख देऊन मराठयांनी १४ परगण्यातून निघून जावे. नंदराजाकडून १६ लाख रुपये घेऊन हैदरने बाकीच्या सोळा लाखाकरिता म्हैसूरकडील मराठी सावकार वीरकर याचा मराठयांना हवाला दिला तेव्हा मराठी फौज म्हैसूर सोडून निघून गेली.हैदरने त्या परगण्यात तात्काळ आपले माणसे पाठवून अमंल बसविला त्यामुळे हैदरच्या पराक्रमाचा म्हैसूरच्या दरबारात बोलबाला झाला,त्याने म्हैसूरच्या निम्म्या राज्यावर ताबा मिळविला होता.संबंध राज्य ताब्यात घेण्यासाठी त्याने कुभांड रचून नंदराजास हाकलून लावले व स्वतः सरसेनापती बनला. नंदराजास हैदरच्या म्हैसूरचे राज्य जिंकून घेण्याच्या कपटनीतीचा सुगावा लागताच त्याने मराठी सरदार विसाजीपंत बिनीवाले व गोपाळराव पटवर्धन यांच्या साहयाने हैदरअलीचा नायनाट करण्याचा व्यूह रचला, त्या प्रमाणे मराठी सैन्य हैदरवर चालून गेले.मराठे व हैदर यांच्यामध्ये चकमकी झाल्या, यात हैदरच्या प्रसंगावधानामुळे व कावेबाजपणामुळे आणि मर्दुमकीमुळे हैदर बचावला व त्याच्या नशीबाने त्याला साथ दिली. हैदरअलीचा पराभव होत असतानाच पानिपतच्या पराभवाच्या वार्ता कानी येऊ लागल्याने मराठयांनी हैदरच्या तहाच्या अटी मान्य केल्या.हैदरअलीने बारा महाल मराठयांना कबूल केले त्यानंतर मराठे घाईने स्वदेशी परतले हे हैदरच्या पथ्यावर पडले.कर्नाटकाकडे मराठयांची पाठ वळताच हैदरने नंदराजास, प्रधान खंडेराय व राजा चिक्ककृष्णराज या तिघांना कैदेत टाकून म्हैसूरचे राज्य बळकाविले. शिरे प्रांत व तुंगभद्रेकडील इतर स्वराज्याचा मुलूख त्याने मराठयांपासून हिसकावून घेतला. कर्नाटकातील बहुतेक पाळेगारांकडून खंडणी वसूल केली. जाळपोळ,लुटालूट आणि कत्तल या साधनाचा उपयोग हैदरने प्रत्येक स्वारीत केला. हैदरअलीने

आपली सत्ता वाढविण्यासाठी निजामअलीचा भाऊ बसालतजंगाची मदत घेतली, त्यास हैदरच्या मदतीने कर्नाटकात स्वतंत्र राज्य निर्माण करावयाचे होते व त्याने मराठयांच्या ताब्यातील शिरे आपल्या ताब्यात घेतले. ऑक्टोबर १७६१ मध्ये दोघांच्या संयुक्त सैन्याने होसकोट, दोडबाळापूर ही ठाणी घेतली. गुत्तीच्या मुरारराव घोरपडे यावर हल्ला करून त्यास पराभूत केले. मुरारराव घोरपडे यांचे अर्धे राज्य खालसा करून आपल्या राज्यास जोडले.[७]

पुढे हैदरअलीने आपले लक्ष उत्तरेकडील ठाण्याकडे वळविले. कोदीकोंडा, पेनुकोंडा व मदकिसरे हया जागा इत्यादी जिंकून घेतल्या.रायदुर्ग, हरपनहळ्ळी,चित्रदुर्ग येथील पाळेगारांनी हैदरअलीस खंडण्या दिल्या.हैदरअलीच्या या धोरणामुळे मराठयांचे दरसाल पन्नास लाख रूपये कर्नाटकातून येणाऱ्या खंडणीचे बुडाले.[८] अशाप्रकारे पानिपतच्या युद्धाचा परिणाम म्हणून दक्षिण भारताच्या राजकारणात म्हैसूरच्या राज्यात हैदरअलीचा उदय झाला.

## २.२.३ दक्षिणेत निजामाचा उदय

पानिपतच्या तिसऱ्या युद्धाने उत्तरेतील मराठयांच्या वर्चस्वाला जसा हादरा बसला व त्याचा दक्षिणेत परिणाम दिसून आला.पानिपतच्या पराभवाचा सर्वाधिक आनंद हा हैद्राबादच्या निजामअलीस झाला.भारतातील सर्वात प्रबळ मानल्या जाणाऱ्या मराठयांचे शौर्य, दरारा व वर्चस्व जणू काही संपुष्टात आले असे त्याला वाटत होते.पानिपतच्या पराभवाच्या धक्क्याने नानासाहेबाचा मृत्यू होऊन पेशव्यांच्या घरामध्ये गृहकलह निर्माण होऊन पुण्यात गोंधळ निर्माण झाला होता. ३ फेब्रुवारी १७६०रोजी सदाशिवराव भाऊने निजामाचा उदगीरच्या लढाईत पराभव केला होता व त्याच्याकडून साठ लक्षाचा मुलूख मराठयांच्या राज्यात समाविष्ट केला होता. हे नुकसान त्याला जाचत होते.[९] पुण्याच्या पेशव्यांच्या भाऊबंदकीने पोखरलेल्या व कमकुवत झालेल्या मराठी सत्तेवरती स्वारी करून आपला गेलेला मुलुख परत मिळविण्यासाठी मराठयांवर चाल करून जाण्याची तयारी करू लागला होता. रायचूर,दुआबातील पंचमहाल नावाचा निजामकडून मिळालेला भाग फत्तेसिंग भोसल्याकडे वहीवाटीस होता. तो २० नोव्हेंबर १७६० रोजी मरण पावल्यावर या प्रदेशावर निजामाने स्वारी केली. त्यास अडविण्यासाठी पेशव्याने रघुनाथरावास निजामावर पाठविले. या मराठे–निजाम संघर्षात गोपाळराव पटवर्धन आघाडीवर होते. रघुनाथरावाजवळ २५ हजाराची फौज होती त्याने पटवर्धनास मदत करावयास हवी होती, पण तसे न करता नानासाहेबाच्या मृत्यूची बातमी ऐकल्यावर तो आपली

स्वारी सोडून परत आला.[१०] निजामाचा सरदार लाला ब्रिजलाल याने पंचमहालाचा प्रदेश काबीज करून अक्कलकोटच्या प्रदेशावर स्वारी केली आणि पेशव्यांचा नळदुर्ग किल्ला जिंकून घेतला.निजाम स्वतः सैन्य व तोफखाना घेऊन सोलापूरच्या रोखाने चालू लागला.जुलै १७६१ मध्ये निजाम बेदर येथे जावून पोहचला, त्याच्या दुसऱ्या भागाचा रोख पुण्यावर चालून येण्याचा होता.[११]

अशाप्रकारे पानिपतच्या पराभवाचा फायदा घेऊन दक्षिण भारतात हैद्राबादच्या निजामाने हैदरअलीच्या मदतीने आपले स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता व त्याने राघोबा दादाशी संधान बांधून मराठयांच्या प्रदेशावर चालून येण्याची योजना आखली होती अर्थात दक्षिणेत निजामाचे प्रस्थ वाढले होते.कारण अनेक मराठे सरदार त्याला जाऊन मिळत होते.

## २.२.४ इंग्रजी सत्तेचा उदय

पानिपतच्या रणभूमीवरील मराठयांच्या निर्णायक पराभवामुळे त्यांच्या उत्तरेतील वर्चस्वाला जबरदस्त हादरा बसला.पेशवा पहिला बाजीराव आणि नानासाहेब पेशवा या पेशव्यांच्या कारकिर्दीत इ.स.१७२३ पासून १७६० पर्यत उत्तर भारतात सातत्याने वाढ होत गेलेल्या मराठी सत्तेला तडा जावून,मराठी सत्ता संपुष्टात आल्याचे चित्र निर्माण झाले. पानिपतच्या युद्धानंतर मुघल राजधानी दिल्लीसह संपूर्ण भारतात अराजकता निर्माण झाली. नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूने भारतीय राजकाराणात पोकळी निर्माण झाली.मराठयांच्या बिकट परिस्थितीचा फायदा घेऊन उघड उघड मराठयांच्या विरोधात उत्तर भारतात जाट, रोहिले, बुंदेले आणि राजपुतांनी आपापल्या भागातील मराठा सरदारांविरूद्ध उठाव करण्यास सुरूवात केली.'मराठयांना नर्मदा पार दक्षिणेकडे पिटाळून लावण्याची भाषा छोटे मोठे रजपूत राजे आत्मविश्वासपूर्वक बोलू लागले. माळवा, बुंदेलखंडात मराठयांना कडव्या प्रतिकाराचा सामना करावा लागला.'लुटारू' मराठयांबाबतची अप्रिती ,असंतोष उत्तर भारतात उफाळून आला.[१२] पाानिपत युद्धाचा खरा परिणाम म्हणजे मोगल राज्यासाठी भांडणाऱ्या मराठे व मुसलमानात दोघेही दुर्बल झाले व नवीन उदयास येणाऱ्या इंग्रजी सत्तेला वाव मिळाला.१४ जानेवारी १७६१ ला पानिपतचे युद्ध झाले व दुसऱ्याच दिवशी मेजर कॉरनॅककडून मोगल बादशहाचा पराभव झाला पुढे १६ जानेवारीला आठ महिन्याच्या संघर्षानंतर पाँडेचरी इंग्रजांनी जिंकली. मोगल,

मराठे व फ्रेंच सत्ता दुबळया झाल्या व इंग्रज विजयी होऊन साम्राज्याची वाटचाल करू लागले.मराठयांची उत्तर भारतातील घोडदौड काही काळ रोखली गेली. बंगाल, बिहार व पंजाब मराठयांच्या हातून गेले.प्लासीच्या लढाईने लावलेल्या इंग्रजी सत्तेच्या रेपांची मुळे पानिपतामुळे बळकट झाली.[१३]

पानिपतच्या युद्धाचा सर्वात जास्त फायदा हा इंग्रजांना झाला.कारण जोपर्यंत मराठयांची सत्ता प्रबळ होती तोपर्यत व्यापारी सवलती मिळवून मैत्रीचे करार करून आपला व्यापार वाढता ठेवण्याचे धोरण इंग्रजांचे दिसून येते.हिंदुस्थानातील विविध सत्ताधिश,त्यांचे बलाबल, परस्परसंबंध, तेथील दरबारातील निरनिराळे राजकीय प्रवाह यांचा त्यांनी बारकाईने अभ्यास चालू ठेवलेला दिसून येतो.पनिपतानंतर पेशव्यांची केंद्रसत्ता दुर्बल झालेली पाहून त्यांनी आत्मविश्वासाने भारतीय राजकारणात प्रवेश केलेला दिसून येतो.[१४] पानिपतच्या युद्धाने मराठयांच्या उत्तरेकडील राजकारणाच्या वर्चस्वाला धक्का बसला व त्याचा परिणाम दक्षिण भारतावर देखील झाला व याचा फायदा नवीन उदयास येणाऱ्या परकीय अर्थात इंग्रजी सत्तेने घेतला असे दिसून येते.

### २.२.५ प्रचंड जीवित व वित्तहानी

तिसऱ्या पानिपतच्या युद्धाचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे मराठयांची झालेली जीवित व वित्तहानी हा होय. पानिपतावर कर्तबगार मराठयांची एक पिढी गारद झाली . हजारोंच्या संख्येने मराठा सैन्यदळे युद्धभूमीवर लढता, लढता ठार झाले.पेशव्यांची संपूर्ण हुजरात(सैन्य) शिंद्याची रणझुंजार फौज आणि स्वामीनिष्ठ इब्राहिमखान गारद्याचे पायदळ रणंगणावर मरण पावले. पानिपतच्या समरभूमीवर जवळपास एक लक्ष मराठयांची कत्तल झाली. ‘दोन मोत्ये गळाली,२७ मोहरा गमावल्या व चांदी आणि तांब्याची नाणी किती गेली याची गणतीच नाही. पानिपतच्या पराभवाची बातमी महराष्ट्रावर कोसळली तेव्हा शोक नाही असे एकही घर उरले नाही.[१५] गोविंदपंत बुंदेले,दत्ताजी शिंदे,अंताजी माणकेश्वर गंधे, समशेरबहाद्दर,बापू बल्लाळ फडके,यशवंतराव पवार, विश्वासराव, सदाशिवराव भाऊ, इत्यादी सरदारांची एक कर्ती पिढी गारद झाली. पानिपतच्या युद्धात जशी जीवित हानी झाली तशीच वित्तहानी ही झाली. मराठी राज्याच्या १८व्या शतकातील आर्थिक स्थितीचा विचार केला असता तर आर्थिक दिवाळखोरी ही कायमची दिसून येते.थोरल्या बाजीरावाने ब्रम्हेंद्रस्वामीस लिहीलेली पत्रे तसेच नानासाहेब

पेशव्यांच्या सर्वच मोहिमा या पैसा मिळण्याकरीताच होत्या असे म्हटले तरी योग्य होईल तरी सुद्धा पानिपतानंतर दीड करोड रूपयाचे कर्ज असल्याचा उल्लेख आढळतो.[१६] या युद्धात मराठयांचे सैन्य सुमारे ५० हजार होते. छावणीत बाजरबुणगे नोकर–चाकर मजूर मिळून एक लाख माणसे होते.सैनिकापैकी अंदाजे दहा हजार माणसे आपला जीव बचावून परत आले होते व ते सोडून बाकी रणागंणावर पडले. जिंवत सापडलेल्या बायका मुलांना गुलाम करून विकण्यात आले. पुरूषांची कत्तल करण्यात आली. रणातून जे पळाले त्यापैकी काही बचावले त्यामध्ये नाना फडणीस, महादजी शिंदे, मल्हारराव होळकर इत्यादीचा समावेश होता.पानिपतावर मराठयांचा एकंदर दीड लाख माणसांचा संहार झाला .अब्दाली रोहिले इत्यादी सुमारे ३०–४० हजार सैन्य ठार झाले असावे, अनेक घोडे ठार झाले ,एक धान्य सोडले तर मराठयांच्या छावणीत सामान भरपूर होते.दुकाने, तंबू, राहुटया व बाजार ही सर्व विविध सामुग्रीनी भरलेले होते.युद्ध सामुग्री आणि खजिना यांची मराठयांना काळजी नव्हती.ही कोटयावधी रूपयांची संपत्ती पठाणांच्या हाती सापडली होती.पानिपतात प्रेतांचा खच पडला, सदशिवरावभाऊ ,विश्वासराव यांच्या प्रेतास काशिराजच्या साहयाने अग्नि दिला होता. अनेक मराठयांना शुजाउद्दौलाने आश्रय दिला होता.[१६अ] थोडक्यात या युद्धात मराठयांची मोठया प्रमाणावर जीवित व वित्तहानी झालेली दिसून येते व मराठयांच्या इतिहासावर त्याचा दूरगामी परिणाम झाला .

## २.२.६ कर्नाटकच्या राजकारणावरील परिणाम

पानिपतच्या तिसऱ्या यद्धात मराठयांचा पराभव झाला याचा परिणाम दक्षिण भारतातील राजकारणावर ही झालेला दिसून येतो. नानासाहेब पेशव्यांनी विसाजी कृष्ण व गोपाळराव पटवर्धन यांना कर्नाटकातून माघारी सन१७६१ मध्ये बोलावून घेतले होते. ते कर्नाटकातून माघारी आल्यानंतर त्यांच्या अनुपस्थित तेथे कसा गोंधळ माजला या विषयीच्या वार्ता पेशव्यांचा खबऱ्या मुकुंद श्रीपती याने पेशव्यांना कळविल्या आहेत त्यानुसार कर्नाटकातील पाळेगारांनी मराठयांचे वर्चस्व झुगारून दिले.सर्वाची शक्ती एकवटून मराठयांना शह देण्याचा प्रयत्न सुरू झाला. जगदेव सरकार तालुक्यात हैदरच्या मदतीने अजीजखानाने धुमाकूळ घातला होता. निजामाचा भाऊ बसालतजंग याने ही वज्रकरू या तालुक्यास उपद्रव देणे सुरू केले होते. मराठयांच्या प्रभावाखाली असणारी खेडी लुटण्याचा ही सपाटा पाळेगारांनी सुरू

केला होता त्यामुळे रयत धास्तावून आपला प्रदेश सोडून जावू लागली होती.हैदर अलीने श्रीरंगपट्टण जवळची सर्व ठाणी जिंकून घेतली होती. अशा प्रकारचे सविस्तर वृत्त मुकुंद श्रीपती याने पाठविले होते.[१७] पानिपतच्या पराभवाची बातमी कर्नाटकात पसरली व म्हैसूरने मराठयांना काहीही खंडणी देवू नये असे नंदराजानला सुचविले एवढेच नव्हे तर मराठयांना दिलेले सर्व परगणे परत घ्यावेत असाही सल्ला त्याने दिला. नंदराजानेही तशीच कारवाई सुरू केली. जानेवारी १७६१ नंतर हैदरअली आणि नंदराज यांना कर्नाटकात मोकळे रान मिळाले.राजा हा हैदरअलीच्या वर्चस्वाखाली गेला होता आणि हैदर म्हैसूरचा सुलतान बनण्याचे स्वप्न पहात होता. पानिपतच्या पराभवामुळे मराठयांना कर्नाटकात येण्याची शक्ती उरली नाही असे हैदरअलीला वाटत होते.[१८]१४ जानेवारी १७६१ रोजी फ्रेंचाची पाँडिचरी इंग्रजानी जिंकून घेतली या दिवशी मराठयांचा अब्दालीकडून पराभव झाला.[१९]

पानिपतचा पराभव व अंतर्गत गृहकलहाने पोखरून निघालेल्या व अस्थिर बनलेल्या मराठा सत्तेला नेस्तनाबूत करण्याच्या निर्धाराने निजामअली आपल्या सर्व शक्तिनिशी कामास लागला. कर्नूल,कडप्पा आणि सावनूर येथील नबाबांना विविध प्रलोभने दाखवून निजामअलीने त्यांच्याशी मैत्रीपूर्ण सलोख्याचे संबंध स्थापित केले.भोसले राजवंशाचीच शाखा असलेल्या गुत्तीच्या मुरारराव घोरपडे,हणमंतराव निंबाळकर व रामचंद्र जाधव यासारख्या स्वार्थी , मतलबी ,संधी साधू व दिशाहीन मराठा सरदारांना निजाम अलीने पाहता पाहता आपल्या गोटात खेचले व पेशव्यांचा रायचूर दुआबातील प्रदेश काबीज करण्याचा सपाटा निजामाने सुरू केला.[२०]

## २. २.७ पानिपत युद्धातील पराभव

पनिपतचे तिसरे युद्ध हे भारतीय इतिहासातील महत्त्वाचे पर्व मानले पाहिजे. जगाच्या इतिहासाचे समालोचन करताना इतिहासकार टॉइन्बीला मराठयांच्या इतिहासातील ज्या तीन गोष्टींचा उल्लेख करावा लागला, त्यातील एक म्हणजे १७६१ मधील पानिपतची लढाई होय. या लढाईत मराठयांची संपूर्ण वाताहत होऊनही मराठे नष्ट झाले नव्हते. खुद्द नानासाहेब पेशवे प्रचंड सैन्यानिशी ग्वाल्हेर पर्यंत जाऊन पोहचले होते. पुन्हा मराठयांशी युद्ध खेळण्याच्या केवल कल्पनेनेच अब्दलीच्या पोटात भीतीचा गोळा उठला होता.मराठयांशी तह करण्यासाठी तो आतूर झाला.पानिपतचे युद्ध जिंकूनही अब्दालीच्या सैन्याला लूट न मिळाल्याने लुटीच्या आशेवर जगणाऱ्या अब्दलीच्या दुराणी सैन्याने बंड पुकारले.अब्दलीच्या सैन्याला दीड वर्षापासून

पगार मिळाला नसल्याने दुरणी सैनिकांनी पुकारलेल्या बंडाने उग्र स्वरूप धारण केले.सैन्याने लढण्यास नकार दिला व अब्दाली पेचात सापडला, कशीबशी सैन्याची समजूत घालून अब्दालीने दिल्लीचा निरोप घेतला.आर्थिकदृष्टया त्याचा फायदा झाला नाही. दिल्लीची अभिलाषा त्याला कधीच नव्हती फक्त सतलजपर्यत पंजाब प्रांत असावा एवढीच त्याची मागणी होती. २०मार्च१७६१ रोजी दिल्ली सोडून जाताना त्याने नानासाहेब पेशव्यांकडे आपल्या वकिलाबरोबर मैत्रीपूर्ण सलोख्याचे पत्र व मानाची वस्त्रे माळव्यात पाठविली होती [२१]

मराठेशाहीतील महाराष्ट्र ातील कर्तबगार पिढी गारद झाली असली तरी मेजर इव्हॅन्स बेल यांच्यामते,'पानिपतची लढाई सुद्धा मराठयांनी अभिमानास्पद व कीर्तीस्पद अशीच घटना समजली पाहिजे.मराठे सर्व हिंदी लोकांसाठी हिंदुस्थान या ध्येयासाठी लढले पण दिल्ली, अयोध्या व दक्षिणेतील प्रबळ मुसलमान सत्ताधिश मात्र यावेळी कारस्थाने करीत,आपल्याच चैनीत दंग होऊन एका बाजूस बसले व मराठयांचा युद्धातील पराभव झाला तरी विजयी अफगाण जे यानंतर एकदा परत गेले,ते हिंदी राजकारणात ढवळाढवळ करण्यासाठी पुन्हा कधीही आले नाहीत'. रॉलिन्सन पानिपताबद्दल म्हणतात की, विशिष्ट परिस्थितीचा विचार करता इतिहासातील एखादा पराजय विजया इतकाच समाधानकारक म्हणावा लागेल. मराठयांच्या सर्व इतिहासात त्यांच्या फौजेने राष्ट्रातील सर्वोत्तम शिलेदारांसह पानिपतच्या घनघोर रणक्षेत्रात आपल्या देशाच्या व धर्माच्या वै–याशी लढताना जे मरण पत्करले,त्याहून जास्त गौरवास्पद मरण इतिहासात क्वचितच नोंदले गेले असेल.[२२]

पानिपतच्या युद्धात मराठे संपले असा जो गैरसमज आहे तो दूर करून १८व्या शतकाच्या इतिहासाची नव्याने मांडणी झाली पाहिजे .कारण या घटनेनंतर माधवराव पेशव्यांने आपल्या कर्तृत्वाने मराठी राज्याची गेलेली पत , दरारा उत्तर व दक्षिण भारतामध्ये निर्माण केलेला दिसून येतो.

## २.३ माधवरावाचा जन्म, बालपण व शिक्षण

माधवराव पेशव्यांच्या आईचे नाव गोपिकाबाई,वडिलांचे नाव नानासाहेब पेशवे होते. गोपिकाबाई ही वाईच्या भिकाजी नाईक रास्ते(गोखले) यांची कन्या होती.११ जानेवारी १७३० रोजी गोपिकाबाई व नानासाहेबांचे श्री क्षेत्र वाई येथे थाटात लग्न झाले. समारंभास छत्रपती शाहू महाराज स्वतः हजर होते. लग्नाला त्याकाळी १,१९,८२५ रूपये बारा आणे खर्च झाला अशी

नोंद आहे. नानासाहेब व गोपिकाबाई यांना एकूण पाच मुले झाली त्यापैकी यशवंत व मोरेश्वर हे दोघे अल्पवयीन ठरले उर्वरित मुलात विश्वासराव जेष्ठ , दुसरा माधवराव आणि धाकटा नारायणराव होता.[२३] श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांचे पहिले मराठीत चरित्र श्री सखाराम अच्युत सहस्त्रबुद्धे यांनी इ.स.१९३८ साली लिहले त्यामध्ये त्यांचा जन्म १६ फेब्रुवारी १७४५ रोजी झाला एवढाच उल्लेख आहे.[२४] परंतु त्यांच्या जन्माची सविस्तर माहिती दुर्मिळ दिलेरजंगी या पुस्तकात दिली आहे ,त्यावरून सावनूर(जिल्हा धारवाड) येथे माधवरावांचा जन्म झाला. तहनामा ठराव जाहल्यावर आपशेत भेटण्याची तजवीज करून नानासाहेब पेशवे यांनी अब्दुल हकीमखाँ साहेब बहाद्दूर दलेरजंग यांचे भेटीस नानासाहेब यांची स्वारी निघाली. मोठया समारंभाने रात्रीची वेळी सबब दोन कोसा परियंत मशाली लावल्या होत्या व दारू चंद्रजोती लाविल्या होत्या.जसे की रात्र दिवसाचा भेद न दिसावा. ज्यावेळी नानासाहेबाची स्वारी जवळ येताच नवाबसाहेब यांनी पुढे जाऊन मोठे संतोषाने भेट घेतली.उभयतांनी एकच गादीवर बसून स्नेहाच्या गोष्टी बोलून गेले.लोक म्हणतात की ,नानासाहेब पेशव्यांची बायको गरोधर होती,ती त्याच दिवशी प्रसूत झाली.पूत्रोछाह झाला तेणे करून नानासाहेब संतोष होऊन बहुतेकास इनाम दिले. पुत्राचे नाव माधवराव ठेविले. बाळ व बाळंतिणीस सावनूरात ठेऊन आपण खुद्द फौजेसह निघून गेले.नबाब साहेबांनी बाळंतिणीचे व मुलाचे चांगल्या रितीने संरक्षण करून काही दिवसानंतर त्यास उंची वस्त्रे देवून मुलाचे अंगावर जवाहीर व मोत्याचे दागिने ठेऊन बरोबर लोक वगैरे देवून पुण्यास रवाना केले. या कारणाने माधवराव नवाबसाहेबास मामा म्हणत होते.[२५]

इ.स.१७४५ मध्ये नानासाहेबांच्या सावनूर मोहिमेमध्ये माधवरावांचा जन्म सावनूर येथे (जि.धारवाड) झाला.त्याकाळात खानदानी आणि कर्तबगार घराण्यातील मुलांचे शिक्षण म्हटले म्हणजे घरातील वडील माणसांच्या अर्थात गोपीकाबईच्या सान्निध्यात जे काही मिळेल तेवढेच असे. पेशव्यांच्या घराण्यात लहान मुलांना योग्य गृहशिक्षण देण्याकडे कटाक्ष असे. मोडी,बालबोध लेखन, वाचन, हिशोब, थोडेसे संस्कृत, घोडयावर बसणे व शस्त्रात प्राविण्य मिळविणे याच्या पलिकडे त्यावेळच्या शिक्षणाची फारशी प्रगती नव्हती. माधवरावाच्या लहानपणात घरात नानासाहेब, सदाशिवराव भाऊ व रघुनाथराव यासारखेकर्ते पुरूष असल्याने विशेषतः सदाशिवराव भाऊंच्या कडक आणि शिस्तीच्या स्वभावामुळे माधवरावांचा स्वभाव

लहानपणापासूनच कडक, तरतरीत, व शिस्तीचा असा होता.[२६]माधवरावाची मुंज त्र्यंबक मामा पेठे यांनी १४ फेब्रुवारी१७५२ रोजी पुण्यात केली.माधवरावाचा विवाह हा नाशिकच्या शिवाजी बल्लाळ जोशी यांच्या कन्या रमाबाईशी इ.स.१७५३ मध्ये झाला. त्यावेळी रमाचे वय चार वर्ष होते व माधवरावाचे वय आठ वर्षाचे होते.वास्तविक माधवरावाचे लग्न दुसऱ्या एका मुलीशी ठरले होते. तशा आशयाच्या लग्न चिठ्ठयाही गेल्या होत्या पण काही अडचणीमुळे ते मोडले त्यामुळे रमा त्यांच्या पदरी पडली.त्यांचे वैवाहिक जीवन फार सुखाचे गेले नाही व त्यांना राजकारणाचे धडे प्रसंगानुसार मिळत गेले. नानासाहेबांच्या पानिपतच्या प्रसंगात ही ते सहभागी झाले होते. [२७]

## २.४ माधवरावास पेशवेपदाची प्राप्ती

२३ जून १७६१ रोजी पेशवा नानासाहेब पर्वतीवर मरण पावले त्यावेळी पेशव्यांच्या कुटुबांत रघुनाथराव दादा हा एकच पुरूष असून वडीलकीच्या नात्याने राज्याचा भार अंगावर घेऊन मराठयांचे नाव उज्वल राखण्याची तयारी व तत्संबंधाची जबाबदारी आता त्याच्यावर होती.बायकात वडिल गोपिकाबाई,दादापेक्षा निदान दहा वर्षांनी मोठी, मानी व करारी स्वभावाची होती पण या दोघांचे विचारप्रवाह भिन्न दिशांनी वाहू लागले .दादा चंचल स्वभावाचा होता. सर्वांचे म्हणणे ऐकून व सल्लागाराची लायकी ओळखून स्वतःचे निश्चित मत बनविण्याची ताकद त्याच्या अंगी नसल्यामुळे त्यास नेहमी दुसऱ्याच्या तंत्राने चालावे लागे. शिवाय आपण मोठे कर्तबगार अशी त्याला फार मोठी घमेंड होती म्हणून नानासाहेबांच्या मृत्यूनंतर सर्व कारभार आपल्या हाती ठेवावा,आपण पेशवा व्हावे असे त्यास वाटू लागले.माधवराव लहान, त्याल काय समजते या विचाराने आलेल्या संधीचा उपयोग करून पेशवाईपद घ्यावे आणि पानिपतचे अपयश धुऊन काढण्यासाठी लगोलग उत्तरेत जावे असा विचार दादाने ठरविला. त्याने बादशहा व शुजाउद्दौला यांस पत्रे लिहून गोपाळराव बर्व्यांचे मार्फत उत्तरेचे संधान चालू केले.[२८]

परंतु पुण्यात जवळच्या एकाही व्यक्तीला दादाचा हा मनोदय योग्य वाटला नाही. माधवरावाचे वय लहान सोळा वर्षाचे असले तरी, नानासाहेबाच्या वंशाकडेच पेशवाई चालवी असा आशय सर्व जाणत्या माणसांचा व्यक्त झाला.एकानेही दादाच्या विचाराला अनुकुलता दर्शविली नाही यामुळे प्रथम दादाची नाउमेद झाली.गोपिकाबाईस लोक भिऊन असत तिचा विचार माधवरावास वस्त्रे देऊन दादांनी त्याचे साहय करावे असा होता,तोच सर्वांस पसंत पडला.पानिपतचे अरिष्ट दादाच्या अव्यवस्थेमुळे उद्‌भवले, त्यात भाऊसाहेबांची कसूर नव्हती

असा सामान्य ग्रह प्रचलित होता अर्थात वस्त्रांच्या बाबतीत माधवरावाला उघड विरोध करण्याचे धाडस दादाचे झाले नाही.माधवरावास पेशवाईची वस्त्रे देण्याचा निश्चय झाल्यावर वस्त्रांच्या व्यवस्थेसाठी मंडळी पुण्याहून सातार्‍यास रवाना झाली.त्यांनी सर्व सिद्धता केल्यावर माधवरावाने एकटयाने जाऊन वस्त्रे घ्यावी असा पहिला विचार होता.तो बदलून रघुनाथराव दादानेही बरोबर जावे असे ठरले त्यानुसार दोघेही सातार्‍यास गेले.ताराबाईच्या संमतीने छत्रपती रामराजाकडून सोमवार आषाढ वदय.३ ता.२० जुलै १७६१ रोजी माधवरावास पेशवाईची वस्त्रे मिळाली बरोबर रघुनाथराव दादा, सखाराम बापू ,आबा पुरंदरे, नाना फडणीस ,त्रिंबकराव पेठे अशी मंडळी असून त्याच वेळी आबा पुरंदरे यास मुतालिकीची व सखाराम बापूस दिवाणगिरीची वस्त्रे देण्यात आली.'दरबारी कारभारी सखारमपंत व बाबूराव फडणीस असून उभयतांचे एक मत आहे.सखारामपंत करार म्हणतात, दादा द्यावे म्हणतात.'वस्त्रांचा हा विधी सातार्‍यास पार पडल्यावर मंडळी पुण्यास आली.रामराजा ताराबाईच्या अटकेत होता त्यास स्वतंत्र करून कर्‍हाड व वाई प्रांताचा कारभार द्यावा असे विचार चालू होते परंतु ताराबाईने ही गोष्ट घडू दिली नाही व पुढे १० डिसेंबर १७६१ रोजी तिचे देहावसान झाले.[२९]

## २.५ मराठी राज्याची स्थिती

माधवरावास २० जुलै १७६१ रोजी पेशवाईची वस्त्रे मिळाली, यावेळी माधवरावाचे वय १६ वर्षाचे होते. माधवराव वयाने लहान व अनुभवी नसूनही त्याला समज चांगली होती. मराठी राज्याची परिस्थिती फार संकटमय होती.खजिन्यात पैसा नव्हता ,मराठयांच्या शत्रूंनी चहूकडे अडचणीचा फायदा घेण्याचा प्रयत्न सुरू केला होता.दक्षिणेत निजाम व म्हैसूरचा हैदरअली यांचा अग्रक्रम होता.पूर्वीची अनुभवी माणसे गारद झाली होती.[३०] उत्तरेत रोहिले, पठाण, अफगाण, जाट यांनी मराठयांच्या विरोधात आक्रमक धोरण स्वीकारले होते. अशा स्थितीत पेशव्यांच्या घरातील कर्त्यासवरत्या अनुभवी असणार्‍या माधवराव पेशव्यांच्या चुलत्याने अर्थात रघुनाथरावाने विचारीपणाने राज्यकारभारात पेशव्यांना सहकार्य केले असते,तर मराठयांसमोर निर्माण झालेल्या संकटाना तोंड देता येणे शक्य होते परंतु सहकार्य न देता आपल्या पुतण्याला सतत विरोध करण्यात रघुनाथरावाने पुरूषार्थ मानला.एवढेच नव्हे तर सर्व शत्रूंना फूस देऊन त्यांच्याशी सतत संपर्क ठेऊन व माधवरावाविरूद्ध प्रोत्साहन देण्याचा उद्योग त्याने चालू ठेऊन,दुटप्पी धोरण स्वीकारले होते. त्यामुळे कारभारातील एकसूत्रीपणा बिघडला व तणाव

उत्पन्न होऊन उघड–उघडपणे रघुनाथराव व माधवराव असे दोन पक्ष निर्माण झाले.[३१] माधवराव आपल्या एका पत्रात लिहीतात की, निजाम अली व हैदरअली हे दोन मोठे शत्रू याखेरीज हबशी याचाही पेच कोकण प्रांतात. ऐसे तिहेरी पेचामुळे दौलत मोठी संकटात आहे.

पानिपतच्या पराभवामुळे पुणे शहराच्या विकासाला खिळ बसली होती.कारण लोकांमध्ये निजामाच्या स्वारीचे भय निर्माण झाले होते.युद्धात मराठयांची एक कर्तबगार पिढी गारद झाल्याने प्रचंड जीवित व वित्तहानी होऊन मराठयांचे लष्करी खच्चीकरण झाले होते तसेच तोफखाना,दारूगोळा यांचा नाश होऊन मराठयांची तिजोरी रिकामी झाली होती. मराठयांच्या आरमाराची पड्झड होऊन पश्चिम किनारपट्टी असुरक्षित बनली होती. दक्षिण भारतामधील अनेक संस्थानिक, पाळेगार यांनी मराठयांचे वर्चस्व झुगारून देऊन खंडणी थकवली होती. उत्तरेत व दक्षिणेत मराठयांचा लौकिक व दरारा संपुष्टात आला होता.प्रशासन यंत्रणा डबघाईला आली होती. पेशवे घरात राघोबाच्या रूपााने गृहकलह सुरू झाला होता. कर्नाटकामध्ये हैदरअलीने मराठयांच्या स्वराज्यातील मुलुखावर आक्रमण करण्याचा सपाटा चालविला होता.त्याच्याकडून तो मुलूख सोडविणे, आपल्या राज्यातील निरनिराळया सरदारामध्ये एकीकरण घडवून आणणे व त्यांना राष्ट्रकार्यामध्ये सहभागी करून घेणे.मराठे सरदारांचा संघ जोरदार करून मराठयांचे वैभव ,दरारा, वर्चस्व व जरब उत्तरेत व दक्षिणेत निर्माण करणे ही सर्व कामे माधवराव पेशव्यांना करावयाची होती.पेशव्यांना असंख्य अडचणी होत्या व या तरुण पेशव्यांचे वय फक्त सोळा वर्षाचे होते.यावरती त्यांनी मात कशी केली व पानिपतच्या अपयशाचा कलंक कसा धुवून काढला. मराठी राज्य स्थिर करण्यासाठी कोणत्या उपाय योजना केल्या हे पाहणे महत्वाचे आहे.

## २.६ मराठी राज्य व माधवराव पेशवे

### १) गोपिकाबाईची योजना

माधवरावास पेशवाईची वस्त्रे मिळाल्यानंतर ते पुण्याला गेल्यानंतर राघोबाने आपला रंग पालटला व माधवरावास विरोध सुरू केला तेव्हा मराठी सरदारात दोन गट पडले होते. रघुनाथरावास सखाराम बापू बोकील हा मदत करता होता.यावेळी माधवरावाने काही दिवस नमते घेतलेले दिसून येते.कारण माधवरावाचा स्वभाव हा विवेकी व समजंस असल्याने त्याने राघोबादादास लगामी ठेवले.[३२]कारण मराठी राज्यात अस्थिरता होती व या कामात

माधवरावाला त्याच्या आईने म्हणजे गोपिकाबाईने मदत केल्याचे दिसून येते.गोपिकाबाईने त्रिंकबकराव पेठे व बाबूराव फडणीस यांची दिवाणगिरीच्या कामावर नियुक्ती केली व दोघास दादासाहेबांनी सल्लामसलत देत जावी.अशाप्रकारे काका–पुतण्यातील संघर्ष वाढू नये म्हणून गोपिकाबाईने ही योजना मुत्सद्देगिरीने कार्यवाहीत आणलेली दिसून येते.[३३]

## २) लष्करी सुधारणा

पानिपतच्या युद्धात मराठी लष्कराची हानी झाली होती. या विषयी रियासतकार सरदेसाईनी मराठी रियासत खंड ५ मध्ये फक्त ठिकाण–ठिकाणच्या सरदारास फौज व पैसा घेऊन सामील होण्याचे हुकूम दिले असे म्हटले आहे त्यांची नावे दिलेली नाहीत,त्याचा शोध घेतला असता माधवरावांच्या रोजनिशीमध्ये त्याचा उल्लेख आढळतो. परगणे अथणीच्या उदाजी चव्हाणास फौजेचा सरंजाम दिला आहे, त्रिंबक शिवदेव यास तीन हजार स्वारांचा तैनात करार करून दिला आहे व महिपतराव कवडे यास पण दोन हजार फौज ठेवायची सनद दिली आहे.[३४] याशिवाय माधवरावाने विसाजी कृष्ण बिनिवाले, शहाजी भोसले, विठ्ठल शिवदेव, दमाजी गायकवाड अशा नामवंत सरदारास आपापल्या फौजा व पैसा घेऊन मोहिमेत सहभागी होण्याचे आदेश दिले होते व त्यानुसार सर्व सरदारांनी तत्परतेने माधवरावांच्या आदेशाचे पालन केल्याने सत्तर हजाराची फौज जमा झाली होती.[३५]

## ३) आर्थिक परिस्थिती

माधवराव पेशव्याने चौथाई, सरदेशमुखी, सरजांम दयावा असा करार करून आर्थिक घडी बसविण्याचा प्रयत्न केला तरीही आर्थिक पेच कायम राहिलेला दिसतो.गोपिकाबाईस लिहिलेल्या पत्रात माधवराव पेशवा लिहीतो,'राज्याचा तणाव तुटत चालला आणि पैसा असता तर इतकेही पेच सांभाळून सर्व गोष्टी निट झाल्या असत्या पण पैसा नाही तेव्हा फौजा कशाच्या आधारावर ठेवाव्यात? फौजा नाही तर दौलत कशी राहणार? यासाठी पेशवाई मिळाल्यानंतर माधवरावाने चौथाईची रक्कम सरदारांनी सरकारात येऊन भरावी असे ही आदेश दिलेले दिसून येतात.[३६] पेशवेपदावरती आल्यानंतर माधवरावांपुढे अनेक समस्या होत्या. मराठी राज्याची आर्थिक स्थिती बिकट होती.आर्थिक घडी बसविण्याकरिता माधवरावाने शेती ,उद्योगधंदे,चलनपध्दती ,सैन्यव्यवस्था व इतर करव्यवस्था इत्यादी सुधारणा केलेल्या दिसून येतात.माधवराव पेशव्यांच्या काळात शेती हा प्रमुख व्यवसाय होता.इतर उद्योगधंदे लहान

स्वरूपात असल्याने कराचा मुख्य बोजा हा शेतीवरच होता.तरी सुध्दा शेतसाऱ्या विरूध्द ओरड त्यावेळी झालेली दिसत नाही . [३७] शिवाय प्रत्येक गावात अनेक पड जमिनी असत त्या लागवडीखाली आणण्यासाठी माधवरावांनी बरेच प्रयत्न केलेले दिसून येतात. याविषयी अनेक हुकूम त्यांच्या रोजनिशित सापडतात.उदा. प्रांत बागलाण येथे पुर्वीचे दोन बंधारे होते एक बंधारा बहुत दिवस झाला वाहून गेला.येथील बागायतीस त्यामुळे पाटाचे पाणी जात नाही ते पाट बांधण्याकरिता राघो नारायण कुलकर्णी हा उमेदवार आहे. खर्च ८ ते १० हजार रूपये येईल गावाचे उत्पन्न पाच हजार तो बंधारा बांधल्यास ८ हजार ५०० रूपये होण्याचा संभव तरी राघो नारायण कुलकर्णी यांने बांधावा ,त्यास त्याबद्दल १०० बिघे नविन बागायत जमिनीमागे दहा बिघे इनाम याप्रमाणे ४० बिघे जमीन इनाम देण्याचा करार केला आहे.राघो नारायणने पदरचे पैसे खर्च करून बंधारा बांधावा .त्याचा फायदा तो, गावकरी व सरकार या त्रिवर्गाने घ्यावा. रयतेतील लोकांना स्वावलंबी व कर्तृत्ववान बनविण्याचा हा मार्ग प्रशंसनिय वाटतो.तुंगभद्रेच्या कालव्याचा बंधारा पावसाने फुटला आहे.तो बांधण्याबद्दल २००० होन दिले आहेत.तरी बंधारा पक्का चांगला चौकशीने बांधावा म्हणून कमाविसदार परगणे कोपल ,तालुके धारवाड यास सनद दिली आहे तसेच श्रीबनेश्वर येथील धरण बांधण्याचे काम ८०० रूपयात करावयाची आज्ञा लक्ष्मण कृष्ण यास दिली आहे.त्यापैकी रोख ४०० रूपये सरकारातून दिले, बाकीचे ४०० रूपये ज्यास धरणाचे पाणी मिळणार त्यापासून दामाशाहीने घ्यावे,दिक्कत न करणे.माधवरावांनी अशाप्रक ारे शेतकऱ्यांना उत्तेजन दिल्याचे दिसते. शेती सुधारण्यासाठी ठिकठिकाणी विहीरी व तलाव बांधणे सरकारी खर्चाने केलेले दिसून येतात. उदा. परगणे शिरवळ नजीक घाट खंबाटकीचा येथे सरकारी धर्मशाळा व विहीर आहे त्यास थोडे पाणी आहे, सबब जाजती विहीर खणावयाची आज्ञा केली आहे व ३०० रूपये पुणे प्रांताकडून खर्च लावून दिला आहे.[३८]

माधवराव पेशव्यांच्या काळात प्रत्येक गावाची खंडणी सरकार ठरवित असे. त्याप्रमाणे वसूल करण्याची जबाबदारी कमाविसदार, मामलेदार व खोत यांच्यावर पडत असे. गावाच्या खंडणीचा मक्ता लिलावाने देण्याची वहिवाट पुर्वी होती अशी अनेकांची कल्पना आहे पण ती खरी नाही. कारण प्रत्येक गावाची जमीन मोजून तिच्या कसदारीप्रमाणे जमिनीची खंडणी ठरविल्याची दिसते.सन १७६४ मध्ये भिकाजी विश्वनाथ हवालदार तर्फ चाकण व देशमुख ,देशपांडे प्रांत जुन्नर यांनी येऊन सांगितले की जुन्नर प्रांत मोगलांनी लुटला व

जाळला.सुभेदारांनी रयतेला सवलती द्याव्यात पण सुभेदार पहाणी करण्यास आले नाहीत. पेरणीचा हंगाम चालला म्हणून रयतेस कौल द्यावा व त्यावरून पुढील सवलती दिल्या.जी गावे जळाली व त्यातील गुरे, वैरण, दाणा जळाला त्या गावाला संबंध वर्षाचा सारा माफी, जी गावे अर्धवट जळाली व लुटली गेली त्यांना एक वर्षापर्यंत एक तृतीयांश सारा माफी, जी गावे त्यांनी खंडणी दिल्यामुळे बचावली त्यांना एक वर्ष साऱ्याची निम्मी माफी, ज्या गावाना मुळीच इजा पोहचली नाही त्यापासून भर आकार घ्यावा.पुढील आकारणी प्रत्येक गावाची स्थिती पाहून ठरविण्यात येईल.[३९]नव्या कुळांना जुन्या कुळापेक्षा जास्त सवलती मिळत.पडीक जमीन लवकर लागवडीखाली आणण्यासाठी उत्तेजन म्हणून या सवलती दिल्या जात तसेच शेतात हत्तीची झुंज लावल्यामुळे व डेरे दिल्यामुळे पिकाची खराबी झाली तर त्याची नुकसान भरपाई शेतकऱ्याला दिली जात असे.शेती खेरिज उद्योगधंदे व व्यापार विषयक सुधारणाही माधवरावांनी काळाची पावले ओळखून पुण्यात व इतरत्र दारूगोळा तयार करण्याचे उपक्रम सुरू केले.नाशिक येथे बाणाचा नवा कारखाना अधिकारी शिवाजी बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली १४ नोव्हेंबर १७६५ रोजी सुरु केला होता तसेच अहमदाबाद व बागलकोट येथेही कारखाना सुरू केला होता.म्हणजे स्वराज्यात नवे रोजगार मिळून शेकडो हजारो लोक पोटास लावले ते असे.तोफखान्याचा उद्योग वाढीस लागावा म्हणून पेशव्यांनी उत्तेजन दिल्याचे दिसून येते.सन १७६२–६३ साली माधवराव पेशवे कारभार नुकताच पाहू लागले होते.तेव्हा मोगलांनी पुणे प्रांतात स्वारी करून पुणे शहर जाळले व गावे उद्ध्वस्त झाली. हे संकट निघून गेल्यावर त्याची आबदानी करणे हे पेशव्यांचे कर्तव्य होऊन बसले, तेव्हा शहरातून पळून गेलेले व्यापारी व उदमी यांना परत रहावयास येऊन आमदानी व्हावी म्हणून, कोकणातून तांदूळ, मीठ वगैरे येईल त्यास जकातीचा तगादा न करणे, भुसाऱ्यास जकात घेण्याचा शिरस्ता नाही. गुरेढोरे, दंग्यात लुटली गेली ,सबब पुण्यात अगर हरएक गावी कुणी बैल, टोणगे विकत घेतील त्यास शिंगोटी मागू नये. वाणी, उदमी देशातून तुप, हळद, तेल, गुळ असे जिन्नस घेऊन येतात, त्यास दसऱ्यापर्यंत जकात निम्मे घेत जाणे व निम्मे माफ करीत जाणे.सवलती देऊन व्यापारी व कारागिरांना पेशव्यांनी उत्तेजन दिले. कोणतेही सरकारचे मुख्य काम म्हणजे रयतेचे बाहेरील शत्रूपासून संरक्षण व राज्यात सुव्यवस्था ही दोन्ही कामे माधवरावांनी उत्तम बजावली होती.सैन्य व्यवस्था चांगली ठेवण्याकडे त्यांचे विशेष लक्ष असे.किल्ल्याच्या बंदोबस्तासाठी कायम अधिकारी व काही किल्ल्यावर कायम

फौजेची ठाणी होती.सैन्य भरती करताना विशेष काळजी घेतली जात असे. प्रत्येक माणसाची चेहरापट्टी, प्रकृती पाहून वेतन ठरविले जाई.पेशवे सरकारांना जमा खर्चाची तोंड मिळविणी करणे कठीण जाई. माधवरावांना अनेकवेळा कर्ज काढावे लागले परंतु ही कर्ज थोड्या मुदतीची असत.कर्जासाठी दरमाहे दरसदे १ रूपये ते १। रूपये व्याज द्यावे लागत असे. सन१७६३–६४ मध्ये सातान्याच्या सावकारास पत्र की,खर्चाची ओढ आहे. खासा स्वारी देशास आल्यावर तुमच्या ऐवजाचा निकाल करून देऊ तूर्त लिहिल्याप्रमाणे परसराम नाईक अनगळ, भिकाजी नाईक रास्ते व सदाशिवराव नाईक रास्ते यांनी प्रत्येकी २५ हजार रूपयाचा भरणा करावा.पेशवे काळात टांकसाळी बऱ्याच होत्या. पुणे येथे सरकारी टांकसाळ होती.सन १७६५–६६ मध्ये पांडुरंग मुरादने विदीत केले की, धारवाड येथे पुरातन होन वगैरे नाणे खरे होत होते.अलिकडे जमिनदारांनी घरोघरी टांकसाळा घालून खोटे नाणे करीत आहेत.यामुळे सरकारात बट्टा, तोटा येत आहे. याकरता हल्ली जागोजागच्या टांकसाळी बंद करून एकजागी धारवाड येथे टांकसाळ घालून मोहोर दिल्ली शिक्क्याप्रमाणे होन, एकेरी रूपया फुलचरी अर्काट प्रतीचा येणेप्रमाणे खरे नाणे करण्याचा करार करून ११ कमाविसदारास, २१ जमिनदारास, १९ साहुकारास, २१ घटकर, आणकर व कारागिर व इतर ९ असे एकूण ८० पत्रे पाठविली आहेत. माधवरावांच्या काळात आर्थिक स्थितीचा विचार करता हल्लीच्या वस्तूपेक्षा स्वस्ताई होती.सन १७७०–७१ मध्ये काही जिनसाचे भाव जोंधळे १ रूपया ६।। ते ६।।। पायली, हरभरे १ रूपया ३।।। पायली, गहू १ रूपयास ३।। पायली, तांदूळ १ रूपया २।। पायली, तुप ७ रूपये १ मण, गुळ व तंबाखू १।। रूपयास १ मण, चर्मी जोडा ८ आणे, ८ बैल १३० रूपये, १ रूपयास ५ नारळ, १ म्हैस ३० रूपयास मिळत होती.[४०]

## ४) राज्याच्या मुलकी व दिवाणी कारभारात सुधारणा

माधवराव पेशव्याने सन १७६३ च्या राक्षसभुवन लढाई नंतर राज्याचा मुलकी कारभार हा नाना फडणीस यास सोपविला. नानासाहेबाच्या काळात मराठयांच्या राज्यकारभाराचे केंद्र पुणे हे बनले होते त्यांनी पुण्यात अनेक सुधारणा केल्या होत्या. बाळशास्त्री गाडगीळ यांची मुख्य न्यायाधीश म्हणून नेमणूक केली होती. या बाबतीत अत्यंत महत्त्वाच्या व कायमच्या अशा सुधारणा माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत झाल्या त्यांनी सुप्रसिद्ध रामशास्त्री प्रभुणे यांना मुख्य न्यायाधीश नेमले व त्यांच्या हाताखाली स्वतंत्र न्याय खाते निर्माण करून न्यायाची

अमंलबजावणी उत्तम होण्याकरिता नवीन कायदे कानून करण्याचा अधिकार रामशास्त्री यांना दिला. रामशास्त्री हे सातार्‍याजवळच्या कृष्णा नदीकाठी माहुली या खेडेगावचे राहणारे होते, त्यांनी आपल्या लौकिकास साजेशी कामगिरी केल्याने आजतागायत त्यांचे नाव उत्तम न्यायाधीश म्हणून सर्व महाराष्ट्राभर आहे.[४१]

## ५) पुणे शहरात कोतवालीस प्रारंभ

छत्रपती शाहूच्या मृत्यूनंतर मराठा राजकारणाचे केंद्र सातार्‍याहून पुण्यात आले. पुणे शहर मराठी साम्राज्याची राजधानी झाली. पुण्याचे वैभव दिवसेंदिवस वाढत गेले. पुण्याचा नावलौकिक हिंदुस्थानात झाला तथापि अजून ही पेशव्यांच्या शासन व्यवस्थेत पोलिसखाते स्वतंत्रपणे अस्तित्वात आलेले पाहायला मिळत नाही.[४२] सन १७६१पनिपतच्या आघाताने पेशव्यांची सत्ता मुळासकट हादरली. पुण्याच्या विकासाला निश्चितच थोडी खिळ निर्माण झाली. माधवराव पेशव्याने अल्पकाळात दक्षिण व उत्तरेत मराठयांचा दरारा निर्माण करून मराठी राज्याची घडी बसविली. या राजकीय स्थैर्याने पुण्याच्या विकासाला पुन्हा गती मिळत गेली. माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत पुणे राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक उलाढालीचे प्रमुख केंद्र झाले. देशाच्या कानाकोपर्‍यातून विद्वान, शास्त्रीपंडीत, कसबी कारागीर, व्यापारी, कलावंत यांचा ओघ पुण्याकडे वाहू लागला. नविन पेठा ,बाजरपेठा वसविल्या जावून पुण्याची लोकसंख्या वाढत गेली. या वाढत्या लोकसंख्येबरोबर निर्माण होणारे शांतता, सुव्यवस्था, आरोग्य इत्यादी प्रश्न पेशव्यांना सोडवावे लागले. पुणे शहराची ही अंतर्गत व्यवस्था पाहणार्‍या स्वतंत्र अधिकार्‍याची गरज या काळात भासू लागली. बाळाजी नारायण केतकर यास माधवरावाने पुणे शहराचा कोतवाल म्हणून नेमले.[४३] बुधवार पेठेत कोतवालाची चावडी निर्माण केली होती.शहराच्या विविध भागात तिच्या शाखा असून रात्री अकरा वाजता तोफ होऊन शहरातील सर्व व्यवहार बंद होत तसेच पहाटे ४ वाजता पुन्हा तोफ झाल्यावर पुणेकर नागरिक आपले नित्याचे व्यवहार सुरू करीत असत. दरम्यानच्या काळात रस्त्यातून भटकणार्‍यास कोतवालाचे गस्तीचे शिपाई चौकीत पहाटे पर्यत डांबून ठेवीत असत. पुणे कोतवालीच्या खात्याची उभारणी आणि विकास माधवराव पेशव्यांच्या काळातच झाला होता.[४४]

इ.स.१७६४–७१ या सात वर्षाच्या काळात पुण्याचे कोतवाल म्हणून गिरमाजी, बळवंत पेंडसे, केशवराव बल्लाळ, आप्पाजीराम आणि जनार्दन हरी यांची नेमणूक केली होती. पुण्याच्या

पेशवे दप्तरातील कागदपत्रात माधवराव पेशव्यांनी इ.स.१७६८ मध्ये जनार्दन हरी यास पाच वर्षे कोतवालकीचा मक्ता दिलेला आहे. या नेमणुकीच्या कागदातच त्याने कोणती कामे करावीत याची एक कलमबंदीच आढळून येते,त्यानुसार शहरात रात्री गस्ती पाहारे ठेवावेत, व्यापाऱ्यांकडून कर वसूल करणे, दस्तऐवज तयार करणे, यांचा अंतर्भाव असून सरतेशेवटी शहराच्या व्यवस्थेसंबंधी जी कामे उत्पन्न होतील ती त्याने चोख पार पाडावीत. त्या काळी कोणी कितीही प्रतिष्ठित असला तरी त्याची भीड कोतवालाने बाळगू नये. अशी कोतवालास सक्त ताकीद केली आहे. याच पत्रात यावेळी पुणे दरबारात प्रामुख्याने वावरणाऱ्या नाना फडणीसास उद्देशून केलेली आज्ञा विशेष महत्त्वाची आहे. शहरासंबंधीची कामे इतर कोणाकडून परस्पर करवून न घेता ती कोतवालाकडूनच करून घ्यावी. या आज्ञोवरून पुणे शहराचा कोतवाल खास नाना फडणीसाच्या नियंत्रणाखाली या वेळेपासून होता असे दिसते. प्रारंभीच्या काळातील कोतवालीच्या कामाचे स्वरूप आणि शिस्त स्पष्ट करून दाखविणारे हे पत्र असल्याने महत्त्वाचे मानावे लागते. पुणे शहराच्या दैनंदिन प्रशासनाची कामे उरकण्यास कोतवालाच्या मदतीस फडणीस, दफ्तरदार, मुजूमदार,पोतनीस ,अमीन, कारकून आणि १३२ शिपायांची नेमणूक करण्यात आलेली दिसून येते.[४५]

## ६) आरमार व तोफखाना सुधारण्यासाठी प्रयत्न

नानासाहेब पेशव्यांनी इंग्रजांची मदत घेऊन सन १७५६ मध्ये तुळाजीचे आरमार बुडविले व त्यास कैद करून ठेवले होते.[४६] पानिपतच्या युद्धाच्या धक्क्याने नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यू झाला व माधवरावास सातारच्या छत्रपती रामराजाकडून पेशवाइची वस्त्रे मिळाली यावेळी मराठयांच्या आरमाराची व तोफखान्याची स्थिती फारसी समाधानकारक नव्हती. माधवरावाने तोफखाना व आरमाराची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला.[४७] त्यांनी आनंदराव धुळप यास सनद दिली की, सदाशिव रघुनाथ जोग यास आरमाराच्या मदतीसाठी पाठविले होते परंतु त्यास साल गुदस्ता बरे वाटत नव्हते. सबब तो घरी राहिला ,त्याचे वेतन राहिले ते पावते करणे. तसेच पुढच्या वर्षी सन१७६५ मध्ये आबाजी नाईक बोरकर यास तालुके रत्नागिरी येथे पाच  गलबते, त्याची सरदारी सांगितली आहे. त्याप्रमाणे करार करून सनद सादर केली असे तरी पाच गलबतांची सरदारकीची चाकरी यांच्याकडून घेऊन त्यांचे वेतन पावते करावे म्हणून मोरारजी शिंदे यास सनद दिली आहे. सन १७६६ मध्ये माधवरावाने

जगन्नाथ नारायण यास सुभा आरमार येथील कारभार सांगून पाठविले आहे. त्यास सालीना तैनात दोन हजार रूपये याशिवाय दोन आसामी कारकूनांच्या लिहण्यास तैनात सालिना चारशे रूपये सिंहगडाहून आरमाराकडे नेमणूकीस पाठविल्या आहे. आनंदराव धुळप यास सनद की सुभा आरमार येथील बंदोबस्त एक हाती जरूर झाला पाहीजे सरदारकीचा बंदोबस्त तुम्हाकडे आहे परंतु कारभाराचा बंदोबस्त एक हाती नाही. दर्यामध्ये टोपीकरांची बद नजर तेव्हा गहाळ माणूस दूर होऊन चांगल्या माणसाची जंगजोड होऊन शिलशिला शिलपोस असावा.आरमार जर्जर झाले आहे त्याची मरामत झाडून झाली पाहीजे. पेशजी बाळाजी हरी यास अमीन सांगून पाठविले आहेत, हे गैर माहित ते काम माहितगार खेरीज होणार नाही. हे जाणून राजश्री नारायण यास आरमाराचा एक्त्यार कारभाराचा देऊन पाठविला आहे तरी तुम्ही हे एक विचारे राहून कारभार यांच्या हातून करून घेणे.[४८]

माधवरावाने मराठयांच्या मोडकळीस आलेल्या आरमाराकडे लक्ष दिले व दुरूस्तीचे कार्य हाती घेतले. बाळाजी हरी यास अमीन, जगननाथ हरी यास कारभारी व आंनदराव धुळप यास आरमार सुभा अशी रचना करून अमीनच्या अंकीत फडणीस ,कारखानीस, जमादार, हशमीस इत्यादी अधिकारी होते.आरमार प्रशासनाची माधवरावाने उत्तम नियमावली तयार केली.अमीनास रोजचा हिशोब तपासणे, नोकरांची हजेरी तपासणे, रजा व रूजू होणाऱ्यांची नोंद ठेवणे, नवीन भरती यादी, सर्व देवघेवीचा खरेदीचा व विक्रीचा व्यवहार इत्यादी कामे त्यास नेमून दिली.[४९] अमीन हा सर्व सागरावरच्या सैनिकांची वर्षाच्या सुरूवातीला तपासणी करत असे व त्या संबधीचा आपला अहवाल पेशवे सरकारला पाठवत असे.[५०] इंग्रजांच्या आरमारावरील लढाऊ लोक शिस्तवार व कामात वाकबर अशी मराठयांची खात्री होती. यास्तव त्यांच्याशी लढण्याचा प्रसंग आपल्या आरमारास आल्यास त्यातील आपली माणसे ही तशीच पाहिजेत.[५१]या करिता माधवराव पेशव्यांनी आनंदराव धुळप यास सनद दिली आहे की, राजकारणी कामाचे माणूस सरदार वगैरे काही ठेवायचे असतील तर ते कदीम लोकांपैकी गहाळ असतील ते दूर करून त्याऐवजी बेहडयास जाजती न होता उपयोगी असतील ती ठेवणे व आंग्याचे शिलकी जर्जर झालेल्या आरमाराची मरामत करण्याची ताकीद दिली होती.[५२] या आरमाराचा उपयोग माधवरावाने आपल्या हैदरअलीवरील दुसऱ्या स्वारीत केला होता.

**तोफखाना विषयक सुधारणा –**

सन १७६१ च्या तिसऱ्या पानिपत युद्धात मराठयांच्या तोफखान्याने दगा दिला, ही गोष्ट लक्षात घेऊन माधवराव पेशव्यांने पुण्यात व इतरत्र तोफखान्याची नविन सिद्धता केली व दारूगोळयाची तरतूद जरूर झाली पाहिजे. सोरा मिळत नाही तो दक्षिण भारतातील कडप्पा येथून मिळवावा. पुण्यातील कारखाना चालीस लावावा.गोळयाची तरतूद करावी. सुतार, लोहार लावून गाडे बनवावे ,नव्या तोफा ओतावयास बाळाजी वामन यास पाठविले आहे. मुंबईस माणसे पाठवून तोफा व माहिती आणावी. ठिकठिकाणच्या जायबंदी झालेल्या तोफा असतील त्या आणून आटवाव्यात आणि पंचरस काढावे. सत्वर काम चालीस लावावे अशा मजकु राची पत्रे नाना फडणीस व स्थानिक अमंलदारास लिहिलेली आढळतात.[५३]

कर्नाटकच्या दुसऱ्या मोहिमेमध्ये माधवराव पेशव्यांने इंग्रजाकडून तोफा घेतल्या, त्या तपासून घेण्यास महाप्रयास पडले व हाती आल्यावर त्या रणक्षेत्रावर आल्यावर लागू करताना अडचणी पडल्या आणि ठिकाणी आल्यावर लागू करतांना असे आढळून आले की, इंग्रजांनी निरूपयोगी झालेल्या तोफा आपल्या गळयात बांधल्या हा अनुभव आल्याने इंग्रजांचा नाद माधवरावाने सोडून दिला. तोफा दारूगोळयाचे स्वतःचे कारखाने ठिकठिकाणी बनविले.[५४] मौजे आंबेगव्हाण तर्फ ओतूर प्रांत जुन्नर येथे गरनाराळयाचा कारखाना घातला आहे. त्यास त्याच्या बेगमी बद्दल साळीचा कोंडा खंडी पन्नास दिला असे तरी शिवनेरीपैकी मौजे मजकुरी पोहचून देणे म्हणून रामचंद्र नारायण यास सनद दिली आहे.[५५] तोफखान्याच्या कारखान्यासाठी चोंडसी माती पाहिजे, त्यास मौजे वडवली प्रांत साष्टी येथील माती चांगली असल्यास उत्तम तेथे नसल्यास दुसरे गावी जेथे माती उत्तम असेल तेथे कारखाना घालून चोंडसी एक हजार पत्र पावताच चांगल्या कारागिरापासून तयार कराव्यात व पुण्यास पाठवाव्याात म्हणून ही रामजी महादेव यास सनद दिली आहे.[५६] तोफांचा एक कारखाना अहमदाबाद येथे होता परंतु माधवरावांनी खुद्द पुण्यास सन १७६९ मध्ये कारखाना सुरू केला. हा कारखाना फार मोठा असून शुक्रवार पेठेत पानशेच्या वाडयाशेजारी घातला होता त्यामध्ये नवीन तोफा ओतीत व जुन्या दुरूस्त करीत असे. कारखान्यामध्ये दीडशे माणूस कामावर असून ते भिन्न जातीचे व व्यवसायाचे होते. म्हणजे स्वराज्यात नवे रोजगार मिळून शेकडो, हजारो लोक पोटाला लावले ते असे.[५७] सदाशिव शेट कासार तोफेचा कारागीर पुण्यात तोफखान्याचे पश्चिमेस शुक्रवार पेठेत

घर बांधून राहिला आहे. त्यास घराचा सारा माफ केला असे तरी कासार मजकूरास घरांचे साऱ्यास तगादा न करणे म्हणून शिवराम रघुनाथ यास सनद दिली आहे. माधवरावाने जसे तोफखान्याकडे लक्ष दिले तसेच त्यासाठी लागणाऱ्या दारूगोळयाकडेही लक्ष दिलेले दिसून येते. आनंदराव भिकाजी रास्ते कमविसदार परगणे बागलकोट यांचे नावे सनद सरकारात दारूचे प्रयोजन आहे. याकरिता बागलकोट येथे दारूचा कारखाना घालून नविन दारू खंडी पन्नास जल्दीने तयार करून ठेवणे. सदरहू दारूस ऐवज लागेल. तो परगणे मजकूर येथील बाकीच्या ऐवजी खर्च करून किफायतशीर पडेल असे करणे म्हणून सनद दिली आहे.[५८]दारूगोळयाविषयी माधवराव पेशवे किती दक्ष होते त्याविषयी १८ डिसेंबर१७६९ चे पत्र– बदरूद्दीन दारूवाला याजपासून कसबे वैजापूर व ममदापूर येथे दारू पाऊणशे खंडी खरेदी करावायचा करार साल ग्गा करून तुम्हास दारूचे कारखान्यावर पाठविले आहे त्यास बावन खंडी दारू तयार होऊन तुमचे पदरी माप पडेल म्हणून तुम्ही लिाा ते कळले बाकी तेवीस खंडी दारू राहिली ते हल्ली दर पावणेचारशे प्रमाणे घ्यावयाचा करार करून तूर्त ऐवज पाठविला येणे प्रोा. रूपये ५५३ रोख बद्रुद्दीन दारूवाला याज जवळ दिले. रुपये १९०० हुंडी गंगाधर गोविंद याची येथे घेऊन गोविंद भिकाजी याजवर वैजापूरची हुंडी  अलहिदा पाा असे, तरी घेऊन जरूर पावल्याचे उत्तर पाठविणे आणि तेवीस खंडी दारू दुबारी सोऱ्याची चांगली करावायचा करार केला असे, तरी चांगली दारू दुबारी करवून माप घेऊन लिहून पाठविणे ,दारू वाईट होती म्हणून हुजूर विदित झाले याकरिता चौकशी करून घेत जाणे.[५९]

माधवरावाने हैदरअलीच्या दुसऱ्या स्वारीत गोपाळराव पटवर्धनाबरोबर जय व फत्तेमुबारक या दोन तोफा पुढे पाठ्वून दिल्या होत्या आणि जयवंती व ज्वालाभवानी या दोन तोफ ा आनंदराव भिकाजी रास्ते यास पाठवून देण्याची सनद दिली आहे.[६०] माधवराव पेशव्यांच्या वेळी हैदरअलीवरील चौथ्या स्वारीत हर तोफा ओढण्यास दिडशे बैल लागत होते. रणमंड्ळ तोफ पुण्याहून म्हैसूरकडे नेण्यात आली ,ही वीस शेर गोळयाची होती. तोफाबरोबर गाडदी, कामठी, दर्यावर्दी, खलासी, सुतार, लोहार इत्यादींना लढाईवर जावे लागत असे.अर्थात त्यामुळे त्यांना रोजगार मिळत असे.एक–एक मोहिम वर्ष–दीड वर्ष चालत असे. चौथी मोहिम ही अडीच वर्ष सुरू होती.[६१]

## ७) इंग्रजाशी तहाचे यशस्वी राजकारण

माधवरावास पेशवे पदाची वस्त्रे मिळाल्यानंतर मराठयांच्या राज्यामध्ये अस्थिरता, अराजक व गोंधळ निर्माण होऊन मराठयांच्या अनेक शत्रूनी डोके वर काढले होते तसेच राघोबाने पेशवे पदासाठी गृहकलह सुरू केल्याने माधवराव पेशवे यांनी काही काळ राघोबाच्या सल्ल्याने कामकाज करण्याचे ठरविले,त्यातुन माधवराव पेशवे व इंग्रज यांच्यामध्ये तह घडून आला.तो प्रकार असा इ.स.१७६१ मध्ये निजामअली हा पुण्यावर चालून येत आहे. असे पाहून रघुनाथरावाने मुंबईकर इंग्रजाकडून दारूगोळा व सैनिकी मदत मागितली. मुंबईच्या इंग्रजांनी ही चालून आलेली संधी न दवडता १४ सप्टेंबर १७६१रोजी मराठयांशी एक व्यापारी करार केला, त्याकरारा मध्ये एकूण सहा कलमे असून

१) व्यापाऱ्यास व जहाजास मराठयांच्या मुलूखात त्रास होता कामा नये.

२) जे मराठी अधिकारी इंग्रजी व्यापाऱ्यास त्रास देतील त्यांना शिक्षा करावी.

३) मराठयाकडे जे युरोपियन सैनिक असतील त्यांना इंग्रजाच्या स्वाधीन करावे.

४) मराठे सैनिक फितूर होऊन इंग्रजांच्या आश्रयास गेले असतील त्यांना इंग्रजानी मराठयांच्या स्वाधीन करावे.

५) रामजी पंताने सिद्दीचा घेतलेला प्रदेश त्यास परत करावा व एकमेकांच्या ताब्यात असलेले कैदी ज्याचे त्यास परत करावे.

६) उंदेरीचा किल्ला इंग्रजांच्या स्वाधीन करावा.

या कराराने इंग्रजांनी मराठयांकडून अनेक सवलती घेतल्या मात्र सैनिकी मदत केली नाही. हा करार झाल्यावर माधवराव पेशव्यांनी इंग्रजाकडे अतित्वरेने मदत मागितली.[६२] त्यानंतर रघुनाथरावाने देखील आपला वकील बाजी गंगाधर यास इंग्रजाकडे पाठविले त्याने इंग्रजाकडे दोन हजार सैनिक व पंधरा तोफांची मदत पेशव्यास करावी. त्या मोबदल्यात पेशव्याने एक लाख रूपये इंग्रजास खर्चास द्यावे.पुण्यास फौज आल्यावर मराठयांनी दीड लाखाचा उत्पन्नाचा प्रदेश इंग्रजास लावून द्यावा. इंग्रजाच्या फौजेच्या मदतीने विजय झाल्यास पेशव्याने इंग्रजांना दोन लाख रूपये द्यावे.[६३] मुंबईच्या इंग्रजांना वाटत होते की, आपल्या मदती शिवाय मराठयांना निजामावर विजय मिळविणे शक्य नाही म्हणून त्यांनी पेशव्याकडे ज्या अटी सुचविल्या होत्या त्यातील प्रमुख अटी म्हणजे इंग्रज ,निजाम व सिद्दीचा पाडाव करण्यास मदत

करतील पण त्या मोबदल्यात पेशव्याने इंग्रजाना साष्टी बेट द्यावे. माधवराव पेशवे यांनी त्यास मान्यता दिली नाही म्हणून मुंबईच्या इंग्रजांनी बंगालच्या इंग्रजांना मद्रास येथील आपल्या बांधवास मराठयांविरूद्ध निजाम अलीस मदत करण्याचे सांगितले.[६४] याचे माधवराव पेशवे यांना आश्चर्य वाटले परंतु या तहाच्या दरम्यान माधवराव पेशवे यांनी इंग्रजांच्या मागण्या अमान्य करण्याचे पत्र १७ जानेवारी १७६२ रोजी पाठविले. यावरून माधवराव पेशवे यांनी संकट समयी इंग्रजाशी यशस्वी राजकारण करून मराठी राज्याला स्थैर्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

## ८) निजामाशी संघर्ष व तह

पानिपतच्या पराभवाने दक्षिणेत निजामाचा उदय झाला होता व त्याने पेशव्यांचे नळदुर्गाचे ठाणे जिंकून घेऊन आपला मोर्चा सोलापूरकडे वळवून निजाम जुलै १७६१ मध्ये बिदर येथे पोहचला होता. निजामाच्या आक्रमक धोरणाचा सामना करण्याकरिता माधवराव पेशवे यांना पेशवाईची वस्त्रे घेऊन साताऱ्याहून परतल्यानंतर त्वरीत फौजा जमा करावयास सुरूवात करावी लागली. माधवराव पेशवे यांनी विसाजी कृष्ण, शहाजी भोसले, विठ्ठल शिवदेव, दमाजी गायकवाड इत्यादी नामवंत सरदारांना आपल्या फौजा व सैन्य घेऊन मोहिमेत सहभागी होण्याचे आदेश दिले होते.[६५]त्यानुसार सर्व सरदारांनी आदेशाचे पालन केले त्यामुळे ७० हजार फौज जमा झाली. या फौजेसह माधवराव पेशवे व रघुनाथराव पुण्याहून ७ ऑक्टोबर १७६१ रोजी निजामावर आक्रमण करण्यास निघाले.अहमदनगर जिल्हयातील सिद्धटेक, मांडवे, अष्टी या ठिकाणी मुक्कामकरीत २५ ऑक्टोबर १७६१ रोजी नागच्याचा घाट उतरून रघुनाथराव व सर्व फौज माहूरच्या रोखाने गेली.औरंगाबाद परगण्यावर मराठयांनी आक्रमण केले. ही बातमी निजामास कळताच तो आपला पुण्याचा मार्ग सोडून राजधानीचे संरक्षण करण्यासाठी लगबगीने परतला.निजामा विरूद्धच्या सर्व मोहिमेत विसाजी कृष्ण बिनीवाले यांचा सहभाग होता परंतु माधवराव पेशवे यांनी मात्र त्यांना प्रामुख्याने निजाम अलीच्या पाठलागावर ठेवले होते. ३ ऑक्टोबर १७६१ मध्ये विसाजी हा रामचंद्र तात्यास लिहीतात की, 'श्रीमंतानी आम्हास सोलापूरकडे रवाना केले आहे.समागमे पाच सात हजार फौज व राजश्री भीवराव याचा तोफखाना सुद्धा आहे.आज धारूरचा घाट चढून येणार होतो परंतु नबाब धारूरात ठाणे घालणार यास्तव तेथे मुक्काम त्याचा आहे.उदया नबाबाचे कुच होऊन जाणार त्याचे होऊन गेल्यावर वर्तमान आले म्हणजे आम्ही घाट चढोन मजल दरमजल काटी मारडीच्या सुमारे

जातो. आम्ही सोलापूरच्या गीर्दन वाईस राहणार यशास नवल विशेष लिहून पाठविणे.[६६]या पत्राचा आशय लक्षात घेता असे दिसते की, निजामाच्या हालचाली विषयी संपूर्ण महिती विसाजीस होती.ही माहिती त्याने रामचंद्रतात्यांच्या माध्यातून पेशव्यांपर्यत पोहचविण्याचा प्रयत्न केला. याच बरोबर स्वतःच्या योजनेची ही माहिती दिली होती.निजामाची दुसरी फौजही पुण्यावर चालून येण्याच्या तयारीत होती. माधवराव पेशवे ही ससैन्य तोफखान्यासह पुण्याहून निघाले.निजामाने आपले सामान सुमान औरंगबाद येथे ठेवून जलदगतीने पुणे गाठण्याचा निर्णय केला.[६७] रघुनाथराव व माधवराव शहागडाच्या मैदानात उभय पक्षाचे सैन्य एकमेकांजवळ आले. निजाम अलीने २३ नोव्हेंबर १७६१ रोजी औरंगाबाद सोडले होते आणि गनिमाला मारीत मारीत पुण्याहून ७ कोसपर्यंत पोहचले. वाटेत टोक्याचे म्हणजे आताचे कायगाव टोके (प्रवरासंगम व गोदावरी नदीच्या काठी) येथील हिंदूचे क्षेत्र होते. तेथील मंदीरे फोडून ते गाव निजामाने पूर्णपणे उद्ध्वस्त केले. पुण्याची पण तिच स्थिती झाली असती ,पुण्याजवळ १४ मैलावर मोगल फौज आल्याचे कळताच पुण्यातून सावकार व खजिना सिंहगडास गेला पण इतक्यात रामचंद्र जाधव व अलिखानाचा धाकटा भाऊ मीर मोघल हे दोघेही मराठयास येऊन मिळाले.[६८]

निजामाने हिंदूची केलेली विटंबना व अत्याचार पाहता त्याच्या चाकरीत असलेले उदाजी चव्हाण (अथणी) रामचंद्र जाधवराव हे मराठयांचे सरदार नाराज झाले व ते निजामास सोडून पेशव्यांस मिळण्याचा विचार करू लागले.[६९] रामचंद्र जाधव नासिरजंगास सोडून मराठयांकडे आला व दुसऱ्या दिवशी २५ नाव्हेंबर १७६१ रोजी मोठी लढाई झाली त्यामुळे निजामाची बाजू कमकुवत झाली तरी ही निजामने पुण्यावर आक्रमण केले. हा संघर्ष ३० नाव्हेंबर १७६१ रोजी झाला.[७०] यावेळी पुण्याचे लोक घाबरून गेले होते व त्यांनी सिंहगड, पुरंदर ,लोहगड ,राजमाची अशा किल्ल्याचा आश्रय घेतला. पेशव्यांचा जवाहीरखाना व खजिना पुरंदरास हलविण्यात आला होता. जामदारखाना व सिलेखाना सिंहगडास रवाना केला होता. किल्ल्याच्या संरक्षणाचा उत्तम बंदोबस्त मराठयांनी केला होता. रघुनाथरावाने किल्ल्याचे रखवालीच्या ताकीदी चहुकडे पाठविल्या. उभय पक्षाचे कासीद व बातमीदार पकड्ले जाऊ लागले. ८ डिसेंबर १७६१ रोजी मोगल हा चासेवर येऊन राहिला.जून्नरपासून अहमदनगर पर्यत मोठी धामधूम उडाली होती.१४ डिसेंबर रोजी निजामाने एकाएकी श्रीगोंद्यावर चाल केली.शिंद्याचे हवेलीत भूमिगत द्रव्य सापडेल या समजूतीने बेलदाराकडून सर्व हवेली व गुप्तधन

खणून काढले परंतु ऐवज काही मिळाला नाही.[७१] तेथून पुढे मराठे व मोगल झगडत लोणी उरूळीपर्यंत आले. वाटेत लहान मोठे संघर्ष होत होते.निजामाबरोबर सलाबतजंग, विनायकदास, मुरादखान व जानोजी भोसले इत्यादी प्रमुख सरदार होते. उरूळीस निजामाचे सहा मुक्काम झाले, यावेळी निजामचे संपूर्ण पारिपत्य करावे असे सर्व मराठा सरदारांना वाटत होते परंतु यावेळी रघुनाथरावाने निजामाशी अंतस्थ संपर्क साधून वाटाघाटी करण्याच प्रयत्न केला. त्यासाठी निजामाकडून मुरादखान, हणमंतराव, आनंदराव निंबाळकर हे सरदार दादास भेटले. ५ जानेवारी १७६२ रोजी माधवराव पेशवे लिहीतो 'निजामअलीशी लढाई असता जेर होऊन त्यांनी संदर्भ लावला रामचंद्र जाधव व मोगल अली फुटून आले चाळीस लक्षाचा मुलूख निजामापासून घेऊन सल्ला केला.[७२] निजाम व मराठे यांच्यात खालील अटीवर तह झाला. तो उरळीचा तह म्हणून प्रसिध्द आहे.

**उरळी तहाच्या अटी (कलमे)–**

१. रामचंद्र जाधवरावास निजामाकडून मिळाला होता, तो प्रदेश व कल्याणचा किल्ला हे निजामाने पेशव्यांना दयावे. या मोबदल्यात १७ लक्षाचा बिदरकडील प्रदेश व नळदुर्गाचा किल्ला पेशव्यांनी निजामास द्यावा.

२. मीर मोगलच्या हिश्याचा २० लाखाचा प्रदेश निजामाने पेशव्यास हवाली करावा व मीर मोगल याने पेशव्यांजवळ राहावे. अशा ठरल्या होत्या.[७३]

निजाम साफ बुडत असताना त्यास तहाच्या अटीवर आधर देऊन रघुनाथरावाने जीवनदान दिलेले गोपाळराव पटवर्धन, बाबूजी नाईक बारामतीकर इत्यादी सरदारास आवडले नाही. यामुळे राज्यकारभारात दुही उत्पन्न झाल्याचे दिसून आले. यावेळी सखाराम बापू बोकील हा रघुनाथरावाचा कारभारी होता. मोगलास न दुखविता सलूख घडून आणला तर माधवराव पेशव्यांशी होणाऱ्या पुढील भांडणात आपणास हैद्राबादच्या निजामाची मदत मिळेल हा दुष्ट हेतू मनात ठेवून दादा व बापू यांनी निजामापासून चाळीस लाख रूपयांचा मुलूख घेऊन हा तह घडवून आणला होता.[७४] यावेळी माधवराव पेशवे रघुनाथरावास विरोध करू शकले नाहीत. कारण गोपीकाबाईने रघुनाथरावास सुचविले होते की, प्रसंग कठीण दिसतो तर मोगलांशी तह करून मोकळे व्हावे. दादाने हे मान्य केले तसेच याचवेळी दक्षिण भारतातील राजकारणाच्या हैदरअलीच्या बातम्या ही पेशव्यांस येत होत्या म्हणून माधवरावाने निजामाशी तह मान्य केला.

या प्रमाणे पेशवाईची वस्त्रे मिळाल्यापासून जानेवारी १७६२ पर्यत मराठयांच्या राज्याला काही प्रमाणात स्थैर्य मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. व यानंतर माधवराव पेशव्यांनी आपले दक्षिण धोरण हे पद्धतशीरपणे राबविलेले दिसून येते.

## २.७ दक्षिणेची निवड

माधवराव पेशव्यांनी पेशवाईची वस्त्रे मिळाल्यानंतर आपले कार्यक्षेत्र म्हणून दक्षिण भारतातील कर्नाटक विषयक धोरण का आखले किंवा निवड केली याविषयी माहिती मिळण्याचा प्रयत्न उपलब्ध साधन सामुग्रीच्या आधारे या ठिकाणी करावयाचा आहे. नानासाहेब पेशव्यांनी इ.स.१७५० नंतर दक्षिणेकडे लक्ष दिले व त्यांनी इ.स.१७५३–१७५७ या कालखंडामध्ये श्रीरंगपट्टण,सावनूर ,श्रीरंगपट्टण, सावनूर अशा पाच मोहिमा काढून दक्षिणेत वर्चस्व निर्माण केले होते. नानासाहेब पेशव्यांना आर्थिक संपत्ती प्रामुख्याने कर्नाटकातून मिळावी असे वाटत होते म्हणून त्यांनी आपले दक्षिण धोरण आखले होते परंतू सन१७५७ च्या सावनूरच्या मोहिमेनंतर नानासाहेबाचे दक्षिणेकडे दुर्लक्ष झाले व त्यांनी दक्षिणेची जबाबदारी बळवंतराव मेहंदळे, विसाजी कृष्ण  व गोपाळराव पटवर्धन यांच्याकडे सोपविली होती. यांनी सन १७६० पर्यत दक्षिणेत मराठयांचे वर्चस्व निर्माण करून, त्यांच्याकडून काही प्रमाणात खंडणी घेऊन फ्रेंचाशी मैत्रीचा करार करून व हैदरअलीशी तह करून गोपाळराव व विसाजी कृष्ण दक्षिणेतून स्वराज्यात आले होते.[७५]

पेशवे दप्तर खंड २८ मध्ये पत्र लेखांक क्र.२८२ उपलब्ध आहे हे पत्र मुकुंद श्रीपती याने विसाजी कृष्ण कर्नाटकातून माघारी परतल्यानंतर पाठविले आहे.तेथे कसा गोंधळ माजला आहे. याविषयी वार्ता त्याने माधवराव पेशव्यांना कळविली आहे.त्यानुसार, ' कर्नाटकातील पाळेगारांनी मराठयांचे वर्चस्व झुगारून दिले. ते मर्यादा विसरून वर्तणूक करू लागले. कडप्याचा नबाबाने पुन्हा दक्षिणेतील सत्ताधाऱ्यांचे संघटन घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू केला होता. सर्वाची शक्ती एकवटून मराठयांना शह देण्याचा प्रयत्न सुरू झाला होता. जगदेव सरकार तालुक्यात हैदरच्या मदतीने अजीजखानाने धुमाकूळ घातला होता, निजामाचा भाऊ बसालतजंगानेही वज्रकरू तालुक्यात उपद्रव देणे सुरू केले होते. मराठयांच्या प्रभावाखाली असणारी खेडी लुटण्याचा सपाटा पाळेगारांनी सुरू केला होता. त्यामुळे रयत धास्तावून

आपला प्रदेश सोडून जावू लागली होती.हैदर अलीने श्रीरंगपट्टण जवळची म्हैसूरची सर्व ठाणी जिंकून घेतली होती. अशा प्रकारचे एक पत्र पाठविले आहे.[७६]

तसेच मुंकूद श्रीपती याने जून १७६१ मध्ये पेशव्यांना दुसरे पत्र पाठविले आहे. त्यानुसार मराठयांच्या नोकरीत असलेले स्थानिक लोक नोकरी सोडून हैदरअली कडे गेले, पेशव्यांनी कर्नाटकातील मराठयांची सत्ता मिळविण्यासाठी सैन्य रवाना करावे अशी विनंती मुकुंद श्रीपतीने पेशव्यांना केली आहे. [७७] अशाच प्रकारचे एक पत्र पेशवे दप्तरात खंड ३८ पत्र क्र.७४ वर छापले आहे. हे पत्र लक्ष्मण वेकोजी याने माधवराव पेशव्यास लिहीले आहे. त्यातील आशय, 'नबाब बसालतजंगाने एक दोन ठाणी घेतली आहे.आम्हास खंडणी विषयी पैगाम करतात, नबाबाने शिऱ्याचा मनसुबा हैदरअलीकडे लावला आहे. पट्टणकरांचा व हैदर अलीचा कजिया अद्याप वारला नाही, आम्हाकडून एक भला माणूस व तीन जोडया देवून आपणाकडे रवाना केले आहेत. संस्थानिकांची व तुमची स्पर्धा बहुतांचे तुम्ही वाईट, मागील बाकी पैकी संस्थानिकाकडे खंडणी आहे, हैदरखान व नबाब मिळाल्यास मनसबा भारी पडेल, तुम्ही खुद्द सामान सहीत कुमकेस येणे.....[७८] गोपिकाबाईची चिंता ही माधवरावाचा जम बसवून देण्याचा असून पटवर्धन, रास्ते, दक्षिणेकडील सरदारांचा ओढा उत्तरेकडेच्या कारभारत नव्हता.उत्तरेतील कारभार सुधारण्याची थोडी उत्कंठा फक्त रघुनाथरावाची होती. पानिपतच्या संहारामुळे ते जोखीम अंगावर घ्यायला पुष्कळांची मने कचरत होती. उत्तरेकडे शिंदे, होळकर, भोसले,बुंदेले, खेर हे डोईजड असून त्यांच्यावर शह बसविणे अवघड होते. पानिपतचे अपयश धुवून काढणे हा पहिला कार्यभाग त्यांच्यापुढे ठळक होता.दक्षिणेत हैदरअली एकदम प्रकट झाला होता.कोणत्याही कामाला पैसा पाहिजे,पैसाची जवळची पैदास कर्नाटकातून व्हायची,तसेच त्या पैदासीचे हस्तक पटवर्धन, रास्ते, विसाजी कृष्ण बिनीवाले, वगैरे जिव्हाळ्याचे व घरचे सरदार, उत्तरेतील कारभार निकडीचा परंतु दूरचा पल्ला, शत्रू अनेक, हस्तक विस्कळीत अशा स्थितीत चर्चा केल्यावर तुर्तास प्रथम वर्ष सहा महिने दक्षिणेचा कार्यभार उरकावा म्हणून माधवराव पेशव्याने उत्तरेऐवजी दक्षिणेकडच्या कारभाराची निवड केली.[७९]

वरील साधनाशिवाय पेशवे दप्तरामध्ये संशोधनासाठी निवडलेले कागद दप्तर क्र.५४ पुडका क्र.१ मधील खंडणीचे करार यादी झाडा यातील पत्रे अभ्यासली असता असे दिसून येते की,संस्थान बल्लारी येथील रामप्पा नाईक याने रामचंद्र नाईक यांचे मार्फत करार केला

होता.सन१७५९–६०, संस्थान अनंतपूर येथील सिद्दराम नाईक हाडे याने खंडणीचा करार केला होता. ६ एप्रिल १७६१ अर्काट येथील संस्थानिकाने विसाजीमार्फत केलेला करार जानेवारी १७६१ संस्थान हरपनहळ्ळीच्या सोमेशेखर नाईक याने गोपाळराव गोविंद यांचेमार्फत केलेला करार तसेच १३ फेब्रुवारी १७६० संस्थान कणकगिरी येथील बाकी ऐवजाबद्दलचा बाबूराव नारायण यांनी केलेला करार ,१९ मे १७६० संस्थान कर्नूल येथील नबाब मुनवरखान याने केलेला करार ,१७६०–६१ संस्थान सुरापूर येथील बिहारी यांचे मार्फत झालेला करार,२३ मार्च १७६० संस्थान बंगळूर येथील नजप्पा नाईक याने गोपाळराव गोविंद यांचेमार्फत केलेला करार,२५फेब्रुवारी १७६१ संस्थान गुर्रमकोंडा येथील नायडू याने आप्पाजी त्रिंबक कमाविसदार यांच्या मार्फत केलेला करार ,७ ऑक्टोबर १७६० तसेच संस्थान अर्काट, अनगुंदी, अनंतपूर इत्यादी ठिकाणच्या खंडणीची बाकीची यादी १६ मार्च १७६०,याशिवाय शिरे तालुक्यातील विसाजी कृष्णाजीने संस्थानिकाकडून वसूल केलेल्या खंडणीचा झाडा–१७५९–६०,श्रीरंगपट्टण येथील खंडणीचा करार १७६०–६१ इत्यादी संदर्भ साधनाच्या आधारे उत्तर व दक्षिणेच्या परिस्थितीवर प्रकाश पडतो.[८०] याच आधारे माझ्या मते, माधवराव पेशव्यांनी दक्षिण धोरणच का स्वीकारले त्याची कारणे पहाणे महत्त्वाचे आहे.

## २.८ दक्षिण धोरण स्वीकारण्याची कारणे

१. पानिपतच्या संहारामुळे मराठयांचे सरदार उत्तरेत जाण्यासाठी तयार नव्हते व रघुनाथरावाने उत्तरेत जाण्याची तयारी दाखविली होती म्हणून माधवराव पेशव्याने दक्षिणेची निवड केली.

२. उत्तरेतील सरदार शिंदे, होळकर, भोसले, बुंदेले, खेर, जाट हे डोईजड असून त्यांच्यावर शह बसविणे अवघड होते. कारण ते मराठयांच्या राजधानी पुण्यापासून दूर होते.

३. कोणत्याही माहिमेला पैशाची गरज असते परंतु पानिपतमध्ये आर्थिक व जीवित हानी झाल्याने मराठी राज्याची तिजोरी रिकामी झाली होती. ती भरून काढण्यासाठी दक्षिण धोरण स्वीकारले असावे.

४. गोपिकाबाईला माधवरावाची राज्य स्थिर करण्याविषयी चिंता होती.तसेच तिला दक्षिण भारतातील राजकीय परिस्थितीची माहिती होती कारण नानासाहेब पेशव्यांच्या कर्नाटक

मोहिमेमध्ये ती सहभागी झाली होती म्हणून तिने माधवरावास दक्षिण मोहिमेसाठी तयार केले असावे.कारण माधवराव हा आईचा निस्सिम भक्त होता.

५. नानासाहेब पेशव्यांनी दक्षिण धोरण आखून मराठी राज्यासाठी पैसा हा कर्नाटकातून मिळावा यासाठी प्रयत्न केले होते त्याचेच धोरण पूर्णत्वास नेहण्यासाठी माधवराव पेशव्यांने दक्षिण धोरण स्वीकारले .

६. दक्षिणेमध्ये मराठयांचे सरदार गोपाळराव पटवर्धन, विसाजी कृष्ण बिनीवाले व आनंदराव भिकाजी रास्ते इत्यादीचा ओढा होता म्हणून यांनीच नव्याने पेशवेपदावर विराजमान झालेल्या माधवरावास दक्षिणेची जबाबदारी स्वीकारावी असे सांगितले असावे.

७ .सन १७६० नंतर मराठयांचे दक्षिणेकडे दुर्लक्ष झाल्याने म्हैसूर मध्ये हैदरअलीचा उदय झाला होता व त्याने श्रीरंगपट्टणजवळची मराठयांची ठाणी जिंकून घेतली होती. ती ठाणी सोडवावी व मराठयांचे वर्चस्व निर्माण करावे.

८. कर्नाटकातील पाळेगार व कडाप्याच्या नबाबाने मराठयांचे वर्चस्व झुगारून देवून तेथील सत्ताधाऱ्यांच्यामध्ये संगठन घडवून आणण्याचा प्रयत्न चालविला होता. तो थांबवण्यासाठी दक्षिण मोहिम स्वीकारणे आवश्यक होते.

९. हैदरअलीने दक्षिणेतील मराठयांच्या मांडलिक संस्थानिकाकडून जबरदस्तीने खंडण्या वसूल केल्या होत्या त्यामुळे संस्थानिकामध्ये हैदरअली विषयी दहशत निर्माण झाली होती. ते प्रदेश सोडून जावू लागली होती.अशा संस्थानिकामध्ये मराठयांविषयी आस्था निर्माण करण्यासाठी दक्षिण धोरण आखले असावे.

१०. दक्षिणेमध्ये हैदरअली प्रमाणे निजामाचा उदय झालेला होता. बसालतजंग व हैदरअली दक्षिणेमध्ये ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होते त्यांचे ऐक्य निर्माण झाले असते तर मराठयांना दक्षिणेत वर्चस्व निर्माण करणे अवघड गेले असते म्हणून त्यांचे ऐक्य निर्माण होण्याआधीच दक्षिण धोरण स्वीकारावे.

११. मुकुंद श्रीपती व लक्ष्मण वेकोजी यांनी माधवराव पेशव्यास सैन्यासह दक्षिणेत संस्थानिकांच्या मदतीसाठी बोलावले होते म्हणूनच माधवराव पेशव्यांने आपले दक्षिण धोरण निश्चित केले .

१२. दक्षिणेतील मराठयांचे अनेक संस्थानिक, पाळेगार व मामलतदार ,कमाविसदार हे मराठयांची नोकरी सोडून हैदरला व निजामाला जावून मिळाले होते त्यांना पुन्हा मराठी राज्यामध्ये आणावे व हैदरअलीचा बंदोबस्त करावा .

१३. दक्षिणेत हैदरअली व निजामाप्रमाणेच इंग्रज व फ्रेंच या परकीय सत्ता होत्या. मराठयांचे व फ्रेंचाचे मैत्रीचे संबंध होते. या मैत्री कराराचे इंग्रजानी उल्लंघन करून पानिपतच्या पराभवाच्या दुसऱ्याच दिवशी फ्रेंचाची पाँडेचरी जिंकून घेतली होती यामुळे दक्षिणेत फ्रेंचाना मदत करावी व इंग्रजाना धडा शिकवावा या साठी माधवरावाने दक्षिण धोरण स्वीकारले .

१४. दक्षिणेतील बल्लारी, अनंतपूर, अर्काट, हरपनहळ्ळी, कणकगिरी, कर्नुल, सुरापूर, बंगळूर, गुर्रमकोंडा, अनगुंदी, शिरे, सावनूर, श्रीरंगपट्टण, होसकोट, बाळापूर, रायदुर्ग, बिदनूर इत्यादी संस्थानिकांनी मराठयांची खंडणी थकविली होती.त्यामुळे थकलेली खंडणी वसूल करून मराठी राज्याची रिकामी झालेली तिजोरी भरून काढावी.

१५. म्हैसूरच्या हैदरअलीने मराठयांना १४ सुपिक परगण्यातून हुसकावून लावले होते तसेच मांडलिक संस्थानिकांना उपद्रव देण्यास सुरूवात केली होती.त्यामुळे दक्षिणेतून मराठयांना मिळणारी पन्नास लाख रूपये खंडणी बुडाली होती.

१६. दक्षिणेकडील प्रदेश हा मराठयांच्या राजधानीपासून जवळ पडत होता त्यामुळेच दक्षिणेकडील विविध संस्थानिकांची हैदरअलीच्या अधिपत्या खालून सुटका करावी व मराठयांचे पानिपतपूर्वीचे प्रभुत्व निर्माण करून हैदरअलीचा बंदोबस्त करावा.इत्यादी विविध कारणांच्या परिपूर्तीसाठी माधवराव पेशव्याने उत्तरे ऐवजी आपले दक्षिण धोरण स्वीकारले .

## २.९ समारोप

सन १७६१ च्या पानिपत युद्धाने भारताच्या इतिहासावर दूरगामी परिणाम घडून आले. नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू व लहान वयात माधवरावास पेशवे पदाची प्राप्ती झाली. दक्षिणेत हैदरअलीचा व निजामाचा झालेला उदय, इंग्रजी सत्तेचा भारतात उदय झाला. मराठयांची प्रचंड जीवित व वित्तहानी झाली होती. मराठयांची एक कर्तबगार पिढी गारद झाली. कर्नाटकातील पाळेगारांनी मराठयांचे वर्चस्व झुगारून देण्याचा प्रयत्न केला. पानिपतच्या युद्धात मराठे संपले

हा जो गैरसमज आहे तो दूर करून १८ व्या शतकाच्या इतिहासाची नव्याने मांडणी झाली पाहिजे. माधवरावाचा जन्म, बालपण, शिक्षण व २० जुलै १७६१ रोजी पेशवाईची वस्त्रे मिळाली त्यावेळी मराठी राज्याची स्थिती संकटमय होती. उत्तर व दक्षिणेत मराठयांचा लौकीक व दरारा संपुष्टात आला होता तसेच मराठी राज्यात अस्थिरता होती. या कामात गोपिकाबाईने मुत्सेद्देगिरीने काका–पुतण्यातील संघर्ष सोडविण्याची योजना कार्यवाहीत आणली. मराठी राज्याची आर्थिक घडी बसविण्याकरिता माधवराव पेशव्यांनी शेती, उद्योगधंदे, सैन्यव्यवस्था चलनपद्धती इत्यादी सुधारणा केल्या. शेती सुधारणेसाठी ठिकठिकाणी विहिरी व तलाव सरकारी खर्चाने बांधले. पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी उत्तेजन म्हणून विविध सवलती दिल्या. माधवराव पेशव्यांनी काळाची पावले ओळखून पुण्यात व इतर ठिकाणी तोफखाना व दारूगोळा तयार करण्याचे उद्योगधंदे सुरू केले, व्यापारी व कारागिरांना उत्तेजन दिले.

मराठी राज्याच्या न्यायाधीश पदी रामशास्त्री प्रभुणे यांची तर मुलकी कारभारपदी नाना फडणीस यांची नेमणूक करून पेशव्यांनी मुलकी व दिवाणी कारभारात सुधारणा केली. पुणे कोतवालीच्या खात्याची उभारणी व विकास माधवराव पेशव्यांच्या काळातच झाला. माधवरावांनी सत्तेवर आल्यानंतर मराठयांच्या मोडकळीस आलेल्या आरमाराकडे लक्ष दिले व दुरूस्तीचे कार्य हाती घेतले. माधवराव पेशव्यांनी मराठी राज्याच्या संकटसमयी इंग्रजाशी यशस्वी राजकारण करून मराठी राज्याला स्थैर्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला. दक्षिणेत निजामाशी संघर्ष करून पेशव्यांनी १७६२ च्या उरळीच्या तहानंतर आपले दक्षिण धोरण पद्धतशीरपणे राबविलेले दिसून येते. माधवराव पेशव्यांनी विविध कारणांच्या परिपूर्तीसाठी उत्तरेऐवजी आपले दक्षिण धोरण स्वीकारले होते.

## संदर्भ


१) सरदेसाई गो.स पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद खंड–२,मुंबई१९३०,लेख१५९,१६१

२) राजवाडे वि.का. मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ३, कोल्हापूर १९०१ लेख. २१०

३) खोबरेकर वि.गो. मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम, इतिहास मंडळ मुंबई ,१९७६पृ.१९८

४) सरदेसाई गो.स. मराठी रियासत,खंड ४ नवीन आवृत्ती, मुंबई ,१९९०, पृ.६७४

५) खरे य.वा. मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १,मिरज, १९२७ पृ.५१

६) सरदेसाई गो.स. उपरोक्त ,मराठी रियासत,खंड ४ पृ. ६७

७) खोबरेकर वि.गो.,मराठ्यांचा इतिहास भाग २ मुंबई ,१९८८ पृ.६९६

८) सरदेसाई गो.स पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद खंड–२७,मुंबई,लेख ४

९) सरदेसाई गो.स. उपरोक्त , मराठी रियासत,खंड ४ पृ.३४९

१०) पगडी सेतु माधवराव(संपा.अनु.)मराठे व निजाम उर्दू फारसी साधने पुणे,१९६१ पृ.८१

११) कित्ता, पृ.५४

१२) आचार्य धनजंय,थोरले माधवराव पेशवे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर,प्रथम आवृती, २०११ पृ.३

१३) कुलकर्णी.अ.रा.,खरे.ग.ह.मराठयांचा इतिहास खंड२, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती पुणे, १९८५, पृ.२१४

१४) कित्ता, पृ.२१४–१५

१५) खरे य.वा., उपरोक्त , खंड–१ पृ.३

१६) भारत इतिहास संशोधन मंडळ वर्ष १८, अंक ४, पृ.११२, १३

१६अ) फाटक न.र.,पगडी(संपा.)पानिपतचा संग्राम, मुंबई १९६१, पृ.५९,७९

१७) सरदेसाई गो.स पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद.,खंड–२८ मुंबई१९३० लेख २८२

१८) गर्गे स.मा. हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेकडील इतिहास, पुणे १९८३ पृ.१५३

१९) खोबरेकर वि.गो उपरोक्त, भाग २ पृ.२१८

२०) आचार्य धनजंय, उपरोक्त , पृ.१४

२१) कित्ता, पृ.२

२२) कुलकर्णी अ.रा.,खरे ग.ह., उपरोक्त पृ.२१५

२३) देशपांडे सु.र., मराठेशाहीतील मनस्विनी, मेहता प्रकाशन ,पुणे २००५पृ.९४, ९५

२४) सहस्त्रबुद्धे स.अ.,श्रीमंत थोरले माधवराव पेशवे मुंबई १९३८, पृ.१

२५) भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रयमासिक वर्ष ६३, पृ.३,४

२६) सहस्त्रबुद्धे स.अ.,उपरोक्त , पृ.९

२७) कुलकर्णी अ.रा.,पुण्याचे पेशवे,राजहंस प्रकाशन,पुणे २००८ पृ.५५

२८)सरदेसाई गो.स.(संपा.)स.मा.गर्गे मराठी रियासत,छ. रामराजा निग्राहक माधवराव खंड ५ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९० पृ.२८

२९) राजवाडे वि.का.,मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १ वाई, १८९८,ले.२८९

३०) सरदेसाई गो.स. उपरोक्त ,मराठी रियासत,खंड–५पृ.२९

३१) खोबरेकर वि.गो., उपरोक्त , भाग २ पृ.२८२

३२) राजवाडे वि.का., उपरोक्त , खंड १ पृ.८

३३) देशपांडे सु.र., उपरोक्त ,पृ.१००

३४) वाड ग.चि.थोरले माधवराव पेशवे,रोजनिशी भाग१, इंदिराप्रेस पुणे,१९११ पृ.३०६,२२३

३५) खोबरेकर वि.गो., उपरोक्त , भाग २ पृ.२९४

३६) भारत इतिहास संशोधन मंडळ, वर्ष १६, अंक ४, पृ.९६

३७) भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक वर्ष १५,अंक २, पृ.६७

३८) वाड.ग.चि.थोरले माधवराव पेशवे, रोजनिशी भाग–२,इंदिराप्रेस पुणे,१९११ पृ.१६–१८,२७८

३९) भावे वा.कृ.पेशवेकालीन महाराष्ट्र,भा.इ.अ.परिषद दिल्ली, १९७६, पृ.३३५

४०) कांबळे.आर.जी.(संपा.) शोधनिबंधसंग्रह, मराठाकालीन सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवन, (सातपुते आर.बी.), माधवराव पेशव्यांचे आर्थिक धोरण,पाटण,२०१४ पृ.१२२–१२३

४१) सहस्त्रबुद्धे स.अ., उपरोक्त , पृ.३२०

४२) वाड.ग.चि. उपरोक्त रोजनिशी भाग–२, पृ.२३१

४३) कित्ता पृ. ६२९

४४) कित्ता , पृ.२३३

४५) पुणे अभिलेखागार अप्रकाशित रूमाल क्रमााक ५६७, बंडल क्र.२, पत्र क्र.१

४६)भावे वा.कृ. उपरोक्त , पृ.४३१

४७) जोशी आर.एल.,शोधाकंन अंक–१, जुलै २०१२, पृ.२५२

४८)वाड.ग.चि.,उपरोक्त,रोजनिशी भाग–१ पृ.३३८–३४२

४९)Sen Surendranath,Administrative System of the Maratha's,Calcutta, K.P.Bagchi & Company Third Edition 1976.P.426

५०) Banerjee A.C.,Peshwa Madharao I,A Mukherjee & Co-Operative Limited, Calcutta 1968.P.189

५१) भावे वा.कृ. उपरोक्त, पृ.४३३

५२) वाड.ग.चि उपरोक्त ,रोजनिशी भाग–१, पृ.२३

५३) सरदेसाई गो.स, पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद.,खंड–३९ मुंबई१९३४,लेख ३७, ७०, ७३

५४) सरदेसाई गो.स. उपरोक्त मराठी रियासत खंड–५ ,पृ.२४१

५५) वाड.ग.चि उपरोक्त , रोजनिशी भाग–१पृ.३३२

५६) कित्ता, पृ.१३५

५७) भावे वा.कृ., उपरोक्त , पृ.४२६

५८) वाड.ग.चि,थोरले माधवराव पेशवे,रोजनिशी भाग–२, इंदिराप्रेस पुणे,१९११ पृ.३३८

५९) सरदेसाई गो.स पेशवे दफ्तरातून निवड्लेले कागद.,खंड–३७ मुंबई१९३४, लेख १८०

६०) वाड.ग.चि, उपरोक्त ,रोजनिशी भाग–१ पृ.३२८

६१) भावे.वा.कृ, उपरोक्त ,पृ.४२६, २७

६२) Bombay Archives, Public Department Diary No.-37 of 1761¸ P.672

६३) Bombay Archives, Public Department Diary No.-37of 1767 P.720-21

६४) Bombay Archives, Public Department Diary No.-8, of 1762¸ P.54

६५) खोबरेकर वि.गो., उपरोक्त , भाग–२पृ.२९४

६६) पुणे अभिलेखागार अप्रकाशित दप्तर क्रमाक १७, पुडका क्र.१, पत्र क्र.९१२८

६७) सरदेसाई गो.स. उपरोक्त मराठी रियासत, खंड–५ पृ.३२

६८) पगडी सेतु माधवराव, मराठे व निजाम, पुणे १९६१  पृ.८१

६९)पगडी सेतु माधवराव(संपा.वअनु.)निजाम व मराठे,उर्दू फारशी साधने,पुणे१९६१ पृ.५४

७०)The Chronology of Modern Hyderabad 1720-1890 Published by the Central Records Office Hyderabad, 1954

७१)सरदेसाई गो.स उपरोक्त , मराठी रियासत, खंड–५  पृ.३३

७२) सरदेसाई गो.स पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद.,खंड–२० मुंबई१९३१, ले.१२०

७३)पगडी सेतु माधवराव,निजाम व मराठे उर्दूफारसी साधने, वर्ष १९६१, पृ.२२३

७४) राजवाडे वि.का.(,संपा.)वा.गो.आपटे ,म.इ.सा.खंड १० पुणे,१९०९ ले.२

७५) खरे वा. वा., ऐतिहासिक लेखसंग्रह,भाग२,कुरुंदवाड भाऊ नाना, छापखाना, १९०८, पृ.२६७, २८२, २८३

७६) सरदेसाई गो.स पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद.,खंड–२८मुंबई१९३३, पत्र लेखांक क्र.२८२

७७) कित्ता, ले.३३२

७८) सरदेसाई गो.स पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद.,खंड–३८ मुंबई१९३४, ले.७४

७९) सरदेसाई गो.स उपरोक्त, मराठी रियासत, खंड–५ पृ.७४

८०) पेशवे दफ्तर.क्रमांक–५४, पुडका क्र.१, पत्र क्र.२४०७७–२४१९८

## प्रकरण तिसरे

# माधवरावांची दक्षिणेकडील पहिली व दुसरी स्वारी

* प्रस्तावना

३.१ पहिल्या कर्नाटक मोहिमेची पार्श्वभूमी

३.२ पहिल्या कर्नाटक मोहिमेचे उद्‌देश

३.३ कर्नाटकावर पहिली स्वारी

३.४ स्वारीतील महत्त्वाच्या स्थानिक घटना

३.५ बाळापूरच्या लढाईत हैदरअलीचा पराभव

३.६ कर्नाटकची पहिली स्वारी अपूर्ण

३.७ कोल्हापूरच्या दत्तक विधानाचा प्रश्न व माधवरावाचे पुण्याला आगमन

३.८ गृहकलह व निजामाचा बंदोबस्त

३.९ हैदरअलीच्या कारवाया

३.१० दुसरी कर्नाटक स्वारी

३.११ दुसऱ्या कर्नाटक स्वारीचे उद्‌देश

३.१२ प्रत्यक्ष मोहिमेला सुरूवात

- ३.१२.१ चिकोडी, मनोली व कागल जिजाबाईच्या हवाली
- ३.१२.२ हैदरच्या हालचाली

३.१३ माधवराव पेशवे व हैदरअली यांच्यातील लढाया

- ३.१३.१ रट्टेहळ्ळीची लढाई
- ३.१३.२ हैदरअली झाडीत व त्याची रसद तोडण्यात विसाजी कृष्णला यश
- ३.१३.३ माधवराव पेशव्यांची कर्नाटकात छावणी
- ३.१३.४ सावनूर व हावेरीची लढाई

३.१३.५ धारवाडचा वेढा व जडीहनवटीची लढाई

३.१३.६ अनवडीची लढाई

३.१४ रघुनाथरावची भूमिका व अनंतपूरचा तह

३.१५ दुसऱ्या कर्नाटक मोहिमेचे यश

३.१६ समारोप

## प्रकरण तिसरे

# माधवरावांची दक्षिणेकडील पहिली व दुसरी स्वारी

## * प्रस्तावना –

या प्रकरणामध्ये माधवराव पेशव्यांनी आखलेल्या दक्षिणेकडील पहिल्या कर्नाटक मोहमेची पार्श्वभूमी,पहिल्या कर्नाटक मोहिमेच्या स्वारीचे उद्देश,माधवराव पेशव्यांनी स्वारीची केलेली तयारी. मोहिमेतील, सातारा, मिरज, कोल्हापूर इत्यादी ठिकाणच्या महत्त्वाच्या स्थानिक घटना,मराठा सरदारांनी माधवरावास केलेली मदत,बाळापूरच्या लढाईत हैदरअलीचा झालेला पराभव,माधवरावांची पहिली मोहिम अपूर्ण,माधवरावाचे पुण्याला आगमन,गृहकलह व राक्षसभुवनच्या लढाईत निजामाचा केलेला बंदोबस्त.राक्षसभुवनची लढाई, हैदरअलीच्या कारवाया, माधवराव पेशव्यांची दुसरी कर्नाटक स्वारी, दुसऱ्या कर्नाटक मोहिमेचे उद्देश, कर्नाटक मोहिमेला सुरूवात, चिकोडी,मनोली व कागल जिजाबाईच्या हवाली, हैदरअलीच्या चाललेल्या हालचाली,माधवराव पेशवे व हैदरअली यांच्यातील झालेल्या लढाया, रट्टेहळळीची लढाई, सावनूर व हावेरीची लढाई, धारवाडचा वेढा, जडीहनवटीची लढाई, अनवडीची लढाई, रघुनाथरावाची भूमिका व अनंतपूरचा तह, दुसऱ्या कर्नाटक मोहिमेचे यश अर्थात मराठी राज्याला झालेला फायदा इत्यादी घटकांची माहिती देण्यात आलेली आहे.

## ३.१ पहिल्या कर्नाटक मोहिमेची पार्श्वभूमी

मराठयांचा पानिपतच्या लढाईत झालेला पराभव व माधवरावांस पेशवाईची मिळालेली वस्त्रे आणि निजामाचा मराठयांशी सन १७६०–६२ या काळातील झालेला संघर्षामुळे दक्षिण रिकामी पडली होती. या काळात म्हैसूरमध्ये हैदरअलीचा उदय झाला. जानेवारी १७५९ च्या मराठयांच्या बातमी पत्रामध्ये असे म्हटले आहे की, ‘म्हैसूरचा जिंकलेला भाग अधिक चांगल्या रितीने मजबूत करण्यास मराठयांना वेळ मिळाला नाही.[१] वास्तविक पाहता कर्नाटकमध्ये विसाजीपंत व गोपाळराव पटवर्धन यांनी मराठयांचा दरारा निर्माण करून हैदरला निष्प्रभ केलेले होते. परंतु पानिपतच्या पराभवाची वार्ता दक्षिणेत येऊन धडकली व त्याला अतिशय आनंद झाला होता. हैदरपासून बारामहाल प्रांत व रोख तीन लक्ष रूपये देण्याचे त्याने कबूल केले व मराठयांना मार्गस्थ केले.[२] कर्नाटकात इंग्रज, फ्रेंच यांचा संघर्ष सुरू असतांना विसाजीने फ्रेंचाना मदत केली व मैत्रीचा तह केल्याने इंग्रजाना भिती निर्माण झाली ,त्यांनी विसाजीपंताना

सांगितले की, तू जर आताच्या आता सर्व सैन्यासह स्वदेशी जाशील तर हप्त्या–हप्त्याने आम्ही वीस लाख रूपये तुझ्या पदरात घालू. विसाजीने ज्याअर्थी कबूल केले त्याअर्थी पहिल्या हप्त्याची रक्कम पदरात पडल्यानंतर आपला तळ हलविला व तेवढयावरच समाधान मानून तो जानेवारीच्या शेवटी कर्नाटकाहून परत आला.[३] मराठे कर्नाटकातून गेल्यानंतर खंडेरावाने निराश न होता हैदरशी संघर्ष चालू ठेवला.शेवटी खंडेरावाने एके दिवशी हैदराअलीस सर्व सैन्यानिशी लढाईस उभे राहणे भाग पाडले.दोघांचे सैन्य समान होते परंतु फ्रेंचाच्या सैन्याने हैदराअलीस मदत केली. तरीही खंडेरावाने त्यांचा पूर्ण पराभव केला. प्रतिस्पर्धी आपणास ऐकत नाही हे पाहून हैदरने एक विलक्षण कावा केला. एके दिवशी रात्री तो दोनशे स्वार बरोबर घेऊन नंदराजा राहता होता त्या गावी गेला, त्याच्या पायावर डोके ठेवून गहिवरून म्हणाला की, महाराज तुमचे मजवर अनंत उपकार झाले. पण मी तुमच्याशी अत्यंत कृतघ्नपणे वागलो. ज्या अधिकाराने मी तुमच्याशी वैर केले,तुमची विटंबना केली तो अधिकार आता माझ्या दिवाणाने हिसकावून घेतला आहे.माझी बायका –पोरे, कोट – किल्ले,सारी संपत्ती त्याच्या हाती लागली आहे.युद्धात पराभूत झालेली माझी फौज मला सोडून गेली.हे सर्व माझ्या नमक हरामीचे फळ आहे ,अशी माझी खात्री झाली आहे.पश्चात्तापाने मी तुम्हाला शरण आलो आहे.मला अधिकार दौलत काही नको. या पापाची पूर्वीप्रमाणे मजवर कृपा झाली म्हणजे सर्व काही मिळाले.[४] नंदराजास हे सगळे खरे वाटून हैदरअलीच्या म्हणण्याप्रमाणे खंडेराव दिवाणाच्या बंडाचा बिमोड करून टाका हे त्याने कबूल केले व त्याने राज्यात जिकडे तिकडे जाहीरनामे लावले की,आपण ‘सर्वाधिकारी’आहोत ‘दलवाई’ हैदरनाईक यांचे व आपले एकमत आहे. खंडेराव लबाड मनुष्य असून राज्यात बंडाचा झेंडा उभारून फिरतो, त्याचे उत्तमरीतीने पारिपत्य करण्याचा आम्हा दोघांचा विचार आहे. याकरिता सर्व इनामी सरदार व शिपाई लोकांनी आम्हांस ताबडतोब येऊन मिळावे. या युक्तीने पुष्कळ जुने नोकर हैदरअलीस जावून मिळाले होते.[५]यानंतर हैदरअलीने खंडेरावाचा पराभव केला,त्याच्या ताब्यात फक्त राजधानी राहिली होती. हैदरने नंदराजास सांगणे पाठविले की, खंडेराव हा माझा नोकर आहे. तो माझ्या हवाली तुम्ही केला पाहिजे. फौजेच्या खर्चाबद्दल सरकारकडे माझी करोडो रूपये बाकी राहिले आहेत. ते आताच्या आता मला मिळाले पाहिजे,यावेळी नंदराजाची स्थिती बिकट होती. राज्यही जाणार आणि प्राणही जाणार असा विचार करून त्याने खंडेरावास हवाली करण्याचे कबूल केले.

त्याचबरोबर आपणास फक्त तीन लक्ष होनाचा उत्पन्नाचा मुलूख खर्चाकरिता तोडून दयावा, बाकीचे राज्य हैदराने सांभाळावे हा ठराव होताच खंडेराव हैदरच्या स्वाधीन झाला, त्यास मरे पर्यत लोखंडी पिंजऱ्यात ठेवले होते. अशा रीतीने राजा नंदराज व खंडेराव यांचा निकाल लावून राजधानीमध्ये आपला मेहुणा मखदुमअली यास काही निवडक विश्वासू सैन्यासह बंदोबस्ता करिता नेमून तो सप्टेंबर १७६१ मध्ये बंगळूरास आला.[६] बसालतजंग हा निजामअलीस फार भीत असे त्यामुळे तो पेशव्यांच्या आश्रयाने व मर्जी संपादून अडोनी मध्ये राहत असे. परंतु पानिपतामध्ये मराठयांची सत्ता लयास गेली असे समजून त्याने निरनिराळया प्रांतातील राज्य बळकविण्यास सुरूवात केली. जून १७६१ मध्ये बसालतजंगाने शिऱ्याचे प्रस्थ कमी करण्याचे धोरण आखले ते संस्थान मराठयांच्या ताब्यात होते. त्याने सिटाडेल या ठाण्याची टेहळणी करून ते घेण्यासाठी हैदर अलीस मदतीसाठी बोलावले.[७] नबाब बसालतजंग व हैदरअली विषयी कर्नाटकातील माहिती पेशवे दप्तरामध्ये उपलब्ध आहे, त्यानुसार नबाब बसालतजंग याने वज्रकरू, राजवल, इडपनगल वगैरे दोन चार लहान ठाणी घेवून राजश्री लक्ष्मण केदारजी यास सांगोन पाठविले की, लक्ष रूपये खंडणी देणे, त्यांनी साफ सांगोन पाठविले आम्ही काही पाळेगार नाही.' नवाब आम्हास खंडणी विसी पैगाम करतात. लक्ष रूपया ऐवजी तोफांचे गोळे आहेत. नवाबाने शिरे तालुक्यात पाळेगारांच्या गावास मोर्चे बंदी करून तेथील खंडणी घेवून शिऱ्यास येवयाचा मनसुबा करून हैदरअलीकडे संदर्भ लावला आहे.आपण ही एक-दोन दिवसात शिऱ्यास जाऊन मोर्चे देतो.'तुम्ही खुद सामाना सहित कुमकेस येणे.आम्ही तर मीर फैजुलाखान (निजामाचा भाऊ) याजकडे दोन-तीन हजार फौज व तोफा देवून शिरे यास रवाना करणार.उभयतांचे एकमत होवून नवाब शिरे याजवळ चार कोसाच्या तफावतीने येऊन उतरलेत.नवाबाच्या लष्करातून वरचेवर बातमी आणीत असतो.पटणकराचा व हैदरअलीचा कजिया अदयाप वारला नाही. हैदरखान नवाबास मिळाल्यास मनसुबा भारी पडेल. यास्तव आम्हाकडून एक भला माणूस व तीन जोडया देवून आपणाकडे रवाना केले आहेत.कित्येक लिहणे ते लिहले आहे. बसालतजंगास न मिळावे आपले जागा रहावे येणेकरून श्रीमंताचा स्नेह सारोधार चालेल. संस्थानिकांची व तुमची स्पर्धा, बहुतांचे तुम्ही वाईट, एक श्रीमंताने कृपा संपादल्याने तुमचे सर्व प्रकारे कल्याण आहे. मागील बाकी

खंडणी पैकी संस्थानिकाकडे आहे त्यापैकी लाख दोन लाख रगात करुन देऊ. हरप्रकारे बसालतजंगाची गाठ पडावी म्हणून प्रयत्न करीत आहोत.धन्याचे पुण्येकडून होईल ते खरे.'[८]

शिरे,होसकोट,बाळापूर वगैरे मराठयांच्या ताब्यात असलेले प्रांत हस्तगत केले त्यामुळे कर्नाटकात हैदरअलीचा चांगलाच वचक निर्माण झाला. निजामाचा भाऊ अदवानीचा कारभारी होता, तो हैदरअलीला साहय करीत असे. गुत्तीचा मराठी सरदार मुरारराव घोरपडे मोठा मातब्बर समजला जाई. पण त्यालाही पराभूत करून हैदरने नरम केले.कडप्पा, कर्नूल, अर्काट, सावनूर, येथील नबाबांकडून व सोंधे, चित्रदुर्ग, रायदुर्ग इत्यादी हिंदू संस्थानिकापासून त्याने कोटयावधी रूपयांची खंडणी वसूल केली. हैदरअलीच्या या आक्रमक धोरणाच्या बातम्या माधवराव पेशव्यांस कळत नव्हत्या,अशातला प्रकार नव्हता. ते निजामाशी संघार्ष करण्यात गुंतले असल्याने हैदरच्या प्रतिकारासाठी पेशव्यांना सवड मिळाली नाही. निजाम अलीशी उरळीचा तह केल्यानंतर जानेवारी १७६२ मध्ये मराठयांची स्वारी कर्नाटकाकडे वळली होती.[९] माधवराव पेशव्यांनी सन १७६१ मध्ये पेशवेपद घेतल्यानंतर आपल्या सत्तेचा लवकर जम बसविला आणि पानिपतच्या पराभवाने मरगळलेली मराठयांची मने नवीन स्वारीसाठी तयार केली .

## ३.२ पहिल्या कर्नाटक मोहिमेचे उद्देश

मराठे–मोगल संघर्षात निजामाला उरळीच्या मुक्कामी मराठयांनी जर्जर केले होते. त्याने तहाचे बोलणे लावले, त्यावेळी बाबूजी नाईक बारामतीकर, गोपाळराव पटवर्धन, रामचंद्रराव जाधवराव इत्यादी सरदारांचे म्हणणे पडले की, या प्रसंगी मोगल आयता सापडला आहे ,तर त्याचा समूळ नाश करावा किंवा पुष्कळ मुलूख तरी घ्यावा परंतु रघुनाथराव व सखाराम बापू यांनी त्यांचे म्हणणे न ऐकता तह ठरविला व त्यात उलट २७ लक्षाचा मुलूख मोगलास परत दिला.[१०] हा तह सौम्य अटींवर करण्यात आला होता. ही गोष्ट अनेक मराठा सरदारांना आवडली नाही. यामुळे कारभारात दुही उत्पन्न झाल्याचे दिसून आले. त्यावेळी सखाराम बापू हा रघुनाथरावाचा मुख्य सल्लागार होता. पुढे मागे पेशवाई मिळवण्यासाठी संधी प्राप्त झाली तर त्यावेळी निजामाचे साहय उपयोगी पडावे. हा विचार सखाराम बापूने रघुनाथरावास पटवून दिला.[११] सखारम बापू हा कपटी , लोभी व मुत्सद्दी होता. दरबारात हा एकटाच देशस्थ मुत्सद्दी दूसरे कोकणस्थ सरदार व मुत्सद्दी. त्रिंबकमामा पेठे, बाबूराव फडणीस ,गोपाळराव

पटवर्धन, बाबूजी नाईक बारामतीकर, आनंदराव रास्ते इत्यादी. गोपिकाबाई व माधवराव पेशव्यांनाही हा तह आवडला नव्हता. मोगल परत गेल्यावर बाबूजी नाईकाने साफ सांगितले की, सखारामपंत जोपर्यंत दिवाणगिरीच्या जागी आहे. तोपर्यंत आपण मुळीच नोकरी करणार नाही. इतके सांगून तो लष्करातून चालता झाला. गोपाळराव पटवर्धनाने ही तगादा लावला की, फौज ठेवण्याबद्दल मला आजपर्यंत कर्ज झाले आहे त्याचा निकाल करून द्या आणि कबूल केल्याप्रमाणे मिरज माझ्या हवाली करून द्या, तेव्हा रघुनाथराव आपला मुख्य अधिकार सोडून देऊन रागावून स्वस्थ घरी बसून राहिले. सखाराम बापूने दिवाणगिरीचा राजीनामा दिला. गोपिकाबाईने असे ठरविले की, त्रिंबकमामा पेठे व बाबूराव फडणीस यांनी दिवाणगिरीचे काम करावे. दादांनी या दोघां दिवाणास सल्ला मसलत देत जावे, त्यांनी मान्य केल्यासारखे दाखविले नंतर दक्षिण प्रांती म्हणजे कर्नाटकावर स्वारी करण्याचा निश्चय ठरला.[१२]

**स्वारीचे उद्देश –**

१) गोपाळराव पटवर्धनांना मिरज द्यावी.

२) शिरे, कित्तूर, बेदनूर, धारवाड, सोंधे, हरपनहळळी,चित्रदुर्ग इत्यादी संस्थानिकांकडून खंडणी वसूल करावी.

३) हैदरअलीच्या धामधुमीचा बंदोबस्त करावा.

४) छत्रपती रामराजाची स्वतंत्र व्यवस्था लावून द्यावी.

५) करवीरच्या जिजाबाईच्या दत्तक विधानाचा प्रश्न सोडवावा.

६) शत्रूच्या ताब्यात गेलेली संस्थानिकांची सोडवणूक करावी.[१३] इत्यादी हेतूच्या परिपूर्तीकरिता माधवराव व रघुनाथराव यांनी पहिली कर्नाटक मोहिम हाती घेतली होती.

## ३.३ कर्नाटकावर पहिली स्वारी

गोपिकाबाईच्या योजनेप्रमाणे दक्षिणेची मोहिम निश्चित झाल्यावर पेशव्यांनी स्वारीची तयारी केलेली दिसून येते. त्यांनी राज्याचा कारभार हा बाबूराव व नाना फडणीस यांच्यावर सोपविला तसेच कारकून म्हणून हरीपंत बल्लाळ फडके यास नेमले. हे बाळभंट नावाच्या भिक्षुकाचे पुत्र होते. त्यांचा भाऊ बापू हा पानिपतच्या लढाईत मारला गेला होता. पेशव्यांनी कारकुनाच्या जागी त्यांची नेमणूक केली, त्यांच्यावर माधवरावाची विशेष मर्जी होती.त्यामुळे मृत्यू समयी त्यांनी आपल्या श्रीवर्धनच्या देशमुखीचे वतन त्यास इनाम दिले.[१४]

राज्यकारभाराच्या व्यवस्थेनंतर माधवरावांनी लष्कराच्या जमवा–जमवीकडे लक्ष दिलेले दिसून येते. इ.स.१७६२ मध्ये परगणे अथणी महाल व तालुका येथील उदाजी चव्हाण यास सनद दिली आहे.त्यामध्ये एकूण नऊ कलमे असून एक कलम महत्त्वाचे आहे. ते म्हणजे–२४६ आसामी यामध्ये ९० बारगीर, ८३ बाजेलोक ७३ खासदार असून ४ हत्ती, २ घोडे व एक उंट यांचा संरजामाचा खर्च सविस्तर देऊन परगणे अथणी वगैरे महालापैकी चौकशीने खर्च करणे म्हणून सनद दिली आहे. या सनदेमध्ये मामलत तुम्हाकडे सांगितली, त्या महाली ठाण्यास शिबंदी आहे. प्यादे, आसामी, करार–२१०० असून सालीना तैनात हा १,२८,६३० रूपये दिला आहे.[१५] अशाच प्रकारची दुसरी सनद ही त्रिंबक शिवदेव यांचे नावे दिली आहे की, तुमचे पथक, स्वार तीन हजार तैनात करून, जाबता दिला आहे. त्यास सरंजाम पेशजीचे कमाविसदाराकडून मामलत दूर करून तुम्हांकडे सरंजाम महाल आठ व एक गाव फौजेच्या बेगमीस तुम्हांकडे सरंजाम करार करून दिला असे, फौज ठेवून सेवा करणे, सदरहू महालाचा व सरंजामाचा खंड इनामे इतबारे जमा करून हिशोब सरकारात समजावून महालाची शिबंदी व महाल मजकूर नेहमी खर्च सालबादची नेमणूक आहे. त्याप्रमाणे खर्च करणे.बाकी ऐवज राहील तो सरकारात जमा करणे.[१६]तसेच महिपतराव कवडे याचे नावे सनद की, तुम्हास १७६२ साल मजकूरी पासून फौज ठेवायची आज्ञा केली आहे. स्वार २००० खुद्द तुमची नेमणूक आणि ५०० आवजी कवडे बिन आनंद कवडे. एकूण २५०० स्वारास रूपये –२५० प्रमाणे ६,२५,००० ऐन आकार स्वारास ,२५०० खुद्द तुमचा खर्च,५०० आवजी कवडे १८,७५० सरदारीच्या डौलास नेहमी कारकून व दिवाण आहेत त्यास सालीना खर्च, एकूण रूपये ६,७३,७५० इत्यादी सालीना करार केला आहे.[१७] अशाप्रकारे विविध मराठे सरदारांना फौजेचा सरंजाम तैनात दिलेला दिसून येतो.

या लष्करामध्ये पायदलातील शिपाई व स्वतःचे घोडे व हत्यार बाळगून लढणारा तो शिलेदार,दुसऱ्यांचे घोडे व हत्यारे घेऊन भाडोत्री लढणारा तो राऊत,फौज म्हणजे घोडेस्वारांची तर पायदलात प्यादे, हेटकरी व गाडदी असे भेद दिसून येतात. हेटकरी हे उत्तम बरकंदाज म्हणजे बंदुकीने लढणारे असत.गाडदी म्हणजे रजपूत, पठाण व जाट वगैरे परदेशी असे. शिलेदारांपैकी नामांकित असतील त्यास एकांडे असे म्हणत. या एकांड्या पैकी काही पुढे पथक्ये बनत.पथक्या म्हणजेच पुष्कळ स्वार पदरी बाळगणारा सरदार.पथक्या मध्येही इतलाखी

व सरंजामी असे दोन भेद असत.फौजेच्या खर्चासाठी सरकारी पोत्यातून(खजिना) नक्त नेमणूक ज्यांना मिळे ते इतलाखी सरंजामदार व फौजेच्या खर्चसाठी ज्यांना स्वतंत्र मुलूख तोडून दिलेला असे ते सरंजामी सरदार होय. माधवराव पेशव्यांच्या काळामध्ये शिंदे, होळकर, पटवर्धन वगैरे सरंजामी बनले. त्यापूर्वी त्यांची पथके ही इतलाखी होती.[१८] वार्षिक वेतनापैकी एक चतुर्थांश किंवा तिजाई रक्कम शिलेदारास आगाऊ देण्यत येत असे तिला 'नालबंदी 'असे म्हणत.बाकीची रक्कम लष्करात हजर झाल्यावर दर आठवडयास ठराविक हप्त्याने देण्यात येत असे या हप्त्यास 'रोजमुरे 'म्हणत.पेशवाईत शिलेदारास घोडे,माणूस पाहून दोनशे पासून तीनशे पर्यंत पगार देण्यात येत असे. मुख्य सरदाराला त्याचा लौकीक व दर्जा लक्षात घेऊन पाचशे रूपयापासून लक्षावधी रूपयापर्यत पगार देण्यात येत असे .सरदारांच्या पगारास 'जात तैनात' किंवा नुसते तैनात असे शब्द मराठी कागदपत्रातून दिसून येतात.[१९]

माधवराव पेशव्यांची स्वारीची तयारी चालू असतानाच पुण्यात बाबूराव फडणीस व त्रिंबक मामा पेठे या दोघांनी हुजरात जमविण्याची व्यवस्था केली. हुजरात म्हणजे पेशव्यांची फौज होय. सर्व सैन्य पुण्यात जमा होईपर्यंत महिना पंधरा दिवसाचा कालावधी विविध भागातून सैन्य येण्यासाठी लागत असे. या कालावधीत माधवराव पेशव्यांची सिद्धटेक, जेजुरी, मोरेश्वर, थेऊर व कुरकुंभ येथील देवांची दर्शने घेण्यात घालवली. त्या काळात पाच देवांची दर्शने घेणे यास 'पंचयात्रा' करणे असे म्हणत असे.[२०] या स्वारीच्या वेळी पेशव्यांच्या लष्करामध्ये विंचुरकर, नारोशंकर, सखाराम बापू, धोंडो दत्तात्रय, नरसिंगराव धायगुडे, आनंदराव गोपाळ, आनंदराव रास्ते, रामचंद्र गणेश कानडे, महिपतराव कवडे, शहाजी भापकर, शहाजीराजे अक्कलकोटकर, आबा पुरंदरे, गोपाळराव पटवर्धन, त्रिंबक मामा पेठे, बाबूजी नाईक बारामतीकर इत्यादी सर्वाची मिळून सहा–सात हजारांची फौज जमली होती. श्रीमंतानी या मोहिमेत पंधरा हजार हुजरात नेमली होती. ही वरील सर्व जहागिरदाराची मिळून एकंदर चाळीस हजाराची फौज जमा झाली.[२१] जानेवारी १७६२ मध्ये माधवराव, रघुनाथराव व त्रिंबकमामा पेठे यांनी कर्नाटकाची दक्षिण मोहिम हाती घेतली होती. याची माहिती म्हैसूरचा इतिहास लिहणाऱ्या विल्क्सनने आपल्या ग्रंथात दिली नाही.[२२] तसेच मराठयांचा आद्य इतिहासकार ग्रँट डफ हा आपल्या 'History of the Maratha's' या ग्रंथामध्ये म्हणतो की, या मोहिमेचा नेता हा रघुनाथराव होता व त्याला त्रिंबकराव व पेशव्यांनी सहाय्य केले. पेशव्यांनी भरीव अशी योजना

निजामाविरूद्ध आखली व त्यास सर्वांनी उत्तेजन दिले.[२३] म्हणजे ग्रँट डफने चुकीची माहिती दिली आहे. ही मोहिम निजामाविरोधी नव्हती, तर ही हैदरअली विरोधी होती तसेच या मोहमेचे नेतृत्व रघुनाथरावाकडे नसून ते माधवराव पेशव्यांकडे होते याची माहिती पेशवे दप्तराच्या खंड–३७ पत्र क्र.३ मध्ये सापडते. श्रीमंताचा मुक्काम चिकोडी पलिकडे पाच कोसावर आहे. उभयता श्रीमंत तुंगभद्रा तीरापर्यंत जावून कर्नाटक प्रांती दबाव बसवून खंडणी त्या प्रांतात करावी, तुंगभद्रा तीरापुढे न जावे येणे प्रमाणे तुर्त मजकूर दिसून येतो. श्रीमंताजवळ तुर्त कारभारी राजश्री बाबूराव नाईक, रामचंद्र गणेश व दिनकरपंत वगैरे शागीई मंडळी करीत आहे. हे पत्र सखाराम बापूने बाबूराव फडणीसास लिहिलेले आहे.हे पत्र दिनांक २ फेब्रुवारी १७६२ या तारखेचे आहे.[२४]

## ३.४ स्वारीतील महत्त्वाच्या स्थानिक घटना

पेशवे स्वारीवर निघाले म्हणजे त्यांच्याबरोबर त्यांचे कारभारी ही जात असे. त्यांचे डेरे प्रथम गारपिरावर म्हणजेच आताच्या पुणे जिल्हयाच्या कलेक्टराची कचेरी आहे तेथून जवळच आहे. ही खूण पेशव्यांची हुजरात ,शिलेदार, सरंजामदार यांचे सैन्य एकत्र येऊन मिळण्याची होती. या ठिकाणावर त्याचा तळ पडला म्हणजे फौज जमण्यास महिना–पंधरा दिवसाचा अवधि लागत असे. या काळात मागे उल्लेख केल्याप्रमाणे पेशवे हे पंचयात्रा करीत असे. त्यानंतर जानेवारी १७६२ मध्ये माधवराव, रघुनाथराव व त्रिंबकमामा आणि सखाराम बापू इत्यादी सर्व मोहिमेवर निघाले.[२५] या मोहिमेवर निघण्यापूर्वी गोपिकाबाईने राज्याचा कारभार सखाराम बापू व बाबूराव फडणीस यांच्याकडे सोपवला .कर्नाटक मोहिमेवर माधवराव व रघुनाथराव यांना जाण्यास सांगितले हे सखाराम बापूस आवडले नव्हते, म्हणून ते या मोहिमेत फारसे सहकार्य करत नव्हते व ते मोहिमेच्या पाठीमागे राहिलेले दिसून येतात. ते सासवडच्या ठिकाणी मागे राहतात.[२६] माधवराव पेशवे सैन्यासह कूच करून आपली मोहिम पुढे चालू ठेवतात. इंदापूर, फलटण, सालप्याच्या घाटातून ही स्वारी सातारा पर्यत आली असावी. कारण या काळातील त्यांच्या रोजनिशीवरून मुक्कामाची फारसी माहिती मिळत नाही. परंतु पुढे त्यांनी सातारा या ठिकाणी केलेली महत्त्वाची घटना म्हणजे'छत्रपती रामराजाची स्वतंत्र व्यवस्था माधवरावाने लावून दिली. ताराबाई जिवंत असेपर्यत रामराजा हा साताऱ्यावर तिच्या कैदेतच होता. परंतु १० डिसेंबर १७६० रोजी ताराबाईचे निधन झाले त्यामुळे सुरूवातीला माधवरावास गृहकलह व

निजामाशी संघर्ष या घटनामुळे सातार्‍याच्या छत्रपतीकडे लक्ष देता आले नाही.परंतु आता त्यांनी दक्षिणेकडील आपली पहिली मोहिम हाती घेतली होती म्हणून त्यांनी छत्रपतीचा प्रतिबंध दूर करून त्यास खाली वाडयात राहून कारभार करण्याची सोय करून दिली.माधवरावाने सन १७६२ च्या आरंभी छत्रपतीस स्वंतत्रता दिली. त्रिंबक सदाशिव म्हणजेच नाना पुरंदरेचा पुत्र महिपतराव याला सातारा येथे आपल्या वतीने छत्रपतीची व्यवस्था ठेवण्यास नेमले.[२७] माझ्या मते या मोहिमेतील हे माधवरावांचे पहिले महत्त्वाचे काम आहे. यावेळी त्यांची छत्रपती रामराजाशी चर्चा होऊन दक्षिण परिस्थिती ,सातारच्या परिस्थितीची जाणीव माधवरावांना आली व त्यानंतर त्यांनी आपला मोर्चा शिखर शिंगणापूरच्या महादेवाकडे वळविला आणि मार्गातील सरदारांना वठणीवर आणण्याचे काम व मराठी राजवटी विषयी स्थैर्य निर्माण करण्याचे काम केले .

या मोहिमेच्या हालचाली विषयी माहिती देणारे पत्र कोल्हापूरच्या जिजाबाईला गंगाधर दामोधर याने १६ फेब्रुवारी १७६२ रोजी लिहीले आहे. ते पुढीलप्रमाणे–' विज्ञापना राजश्री रघुनाथपंत यांचे लष्कर दहीवडीवर गुरूवारी मुक्काम तेथून रायजी माने भादोलकर यांचा लेक येसाजी माने याने आजच आपले घरास आला त्याने सांगितले जे मजल दरमजल येत आहेत. समागमे मोगल अली, रामचंद्र जाधव व राजश्री माधवराव व गोपाळराव यैसे आहेत. चाळीस हजार पावेतो जमाव आहे त्यास पुढे रा माधवराव व गोपाळराव आहेत ते माघे दोन कोसाचे तीन कोसाचे आंतराने आहेत. त्यांचे लष्कराचे वाणी पेठेस गूळ घ्यावयासी आला त्याने इटे (विटा) भाळवणीवर लष्कर सोडले. येरलेचे किनार्‍याने उतरले आहेत लोक कुंडल पावतो आली होती. सवेसी श्रवण व्हावे याकरिता विनंती लिहिली आहे.आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तवणूक करू बातमीस माणसे रवाना केली आहेत. बातमी जे येईल ते सेवेसी लिहतो.[२८] वरील पत्रावरून असे दिसून येते की,माधवराव पेशव्यांचा मुक्काम हा दहिवडीवर गुरूवारी आहे. याच मुक्कामात येसाजी माने त्यांना मजल दरमजल भेटण्यास येत आहे. त्यावेळी माधवराव पेशव्याबरोबर रामचंद्र जाधव व मोगल अली, गोपाळराव पटवर्धन इत्यादी सरदार आहेत. एकूण चाळीस हजाराची फौज आहे.सर्वात पुढे माधवराव पेशवे व गोपाळराव पटवर्धन आहे तसेच जिजाबाईचा प्रतिनिधी शेषोपंत ही आहे.पेशव्यांच्या लष्कराचा वाणी हा पेठेस गुळ घेण्यासाठी आला आहे.म्हणजे याही ठिकाणी ग्रँट डफचे विधान'मोहिमेचे नेतृत्व रघुनाथरावाकडे होते.' हे

खोटे ठरताना दिसून येते.[२९] या मोहिमेमध्ये गोपिकाबाई हया वडुथ पर्यंत पेशव्यांच्या सोबत होत्या व त्रिंबकमामा पेठे हे वडुथावरून पेशव्यांच्या लष्करास मिळण्यासाठी दहिवडीकडे गेले तर सखाराम बापू हा मागे सासवडी आहे.हे पत्र त्रिंबक भास्कर याने नारोशंकर यास पाठविले आहे.[३०]

दहिवडीच्या मुक्कामानंतर पेशव्यांची स्वारी भाळवणीवर मुक्कामास असल्याचे दिसून येते.लष्कराचा वाणी हा सैन्यास गुळ खरेदी करण्यासाठी इटे(विटा) भालवणीवर आला होता तसेच नंतर येरळा नदीच्या किनाऱ्याने ही स्वारी पुढे कुंडल(पलूस) पर्यंत आली होती, नंतर सांगली व मिरज या ठिकाणी पोहचली होती.[३१] या ठिकाणी एक गोष्ट प्रखरपणे दिसून येते.ती म्हणजे सैन्याची प्रवासात मुख्य अडचण ही पाण्याची होती.वाहते पाणी असल्यावाचून माणसे व जनावरे यांचा उदरनिर्वाह चालत नसे म्हणूनच सैन्याची मोहिम ही शक्य तितक्या नदयाच्या काठा–काठानेच मार्ग काढताना दिसून येते.उदा. निरा, कृष्णा, येरला इत्यादी होय.

*** मिरज पटवर्धनांच्या हवाली**

पहिल्या कर्नाटक मोहिमेमध्ये गोविंद हरी पटवर्धन व त्याचा पुत्र गोपाळराव हे माधवरावाचे मुख्य संरक्षक असून अडीअडचणीत त्यांची मदत हुकमी होती. परंतु त्यांना स्वतःचे मजबूत स्थळ राहावयास नव्हते. त्यासाठी मिरजेचे ठाणे आपल्यास देण्याचा गोविंद हरीने गोपिकाबाईकडे आग्रह धरला होता.यावेळी माधवरावाने फेब्रुवारी १७६२ मध्ये मिरज गोविंद हरीच्या कब्जात दिले.तेथे माधवरावाचा सासरा शिवाजी बल्लाळ जोशी बंदोबस्तास होता. तो ते ठिकाण सोडीना,तेव्हा माधवरावाने स्वतः मिरजेस जाऊन जोशी यास काढून ते स्थळ गोविंद हरीच्या कब्जात दिले.गोविंद हरीने त्वरित तेथे लगेच आपली अशी मजबुती केली की, सहसा ते स्थळ पुन्हा दुसऱ्यांच्या हाती लागू नये. हा प्रकार रघुनाथराव व सखारामबापू यांना आवडला नाही.क ारण माधवरावाचा पक्ष बळावणे त्यांना रूचले नसावे. मिरज पटवर्धनांच्या हवाली करून माधवराव व त्रिंबकराव पुढे कर्नाटकात गेले. मिरज मुक्कामी माधवराव पेशव्यांनी गोविंद हरी पटवर्धन यांना दोन सनदा दिल्या आहेत.एक– गोविंद हरी यांचे नावे सनद की, ठाणे मंगळवेढे पेशजीपासून तुमच्याकडे होते. त्यात साल मजकुरी ठाणियाची घालमेल सरकारातून झाली होती. परंतु तुम्ही बहुत दिवसाचे घरचे हे जाणून, तुम्हांवर कृपाळू होऊन तुम्हास ठाणे मंगळवेढे सालमजुरी राहण्यास दिले असे तरी ठाणे मजकुरी तुम्ही सुखरूप राहणे.

याशिवाय दुसरी सनद 'कर्यात ऐनापूर येथील निमे अमंल मिरज तालुका तुम्हांकडे व उदाजी चव्हाणांचा अंमल सरकारात घेऊन, नागोराम यास कमाविसी सांगितली. त्यास कर्यात मजकुराच्या निमेनिम गावाच्या दोन वाटण्या कराव्या. त्याजपैकी एक वाटणी तुम्ही घेणे, एक वाटणीचा अमंल नागोराम करतील याप्रमाणे सरकारातून करार करून दिला असे. तरी लिहल्याप्रमाणे वर्तणूक करणे म्हणून गोविंद हरी यांचे नावे सनद दिली आहे.[३२]

मिरजेची व्यवस्था लावल्यानंतर माधवराव पेशवे कर्नाटकच्या दिशेने जावू लागले. मार्गात पुढे अथणीचे ठाणे लागते त्या ठिकाणच्या उदाजी चव्हाणचा मुकाशियाचा अमंल होता. तो सरकारात घेऊन नागोराम यास कमाविसी सांगितली व बावटी दर रूपये साडेबावीस व निमे जकात देणे म्हणून जमिनदार, देशमुख व देशपांडे यांचे नावे परगणे हवेली,विजापूर, इंडी, तांबे, हळसंगी, जत व करजगी अशा एकूण सात सनदा दिल्या आहे,म्हणजेच अथणी व आसपासच्या भागामध्ये मराठी राज्याचा अमंल बसविण्याचे काम माधवरावाने केल्याचे दिसून येते.[३३]अथणी नंतर माधवराव पेशव्यांनी आपला मोर्चा चिकोडीकडे वळविल्याचा दिसून येतो. या ठिकाणच्या मुक्कामी त्यांच्याबरोबर सखाराम बापू, रघुनाथराव, रामचंद्र गणेश,बाबूजी नाईक इत्यादी मराठे सरदार असून श्रीमंत राजश्री दादासाहेब व रावसाहेब कर्नाटक प्रांती अर्काटकडे जाणार असे उल्लेख पेशवे दप्तरात सापडतो.[३४]परंतु स्वारीमध्ये माधवराव व रघुनाथराव यांचे पटेना चिकोडीच्या मुक्कामाहून रघुनाथराव मार्च मध्ये पुण्यास आले .येताना मार्गात ते सातारचे छत्रपती रामराजा यांची व्यक्तिगत (गुप्त) भेट घेऊन आले होते. त्रिंबकमामा पेठयाने स्वारीहून हा प्रकार गोपिकाबाईस कळविला की, 'तीर्थरूपांनी माझी रवानगी कर्नाटक प्रांती केली. दौलतीस या काळी पेच फार पडले आहेत. त्र्यंबकराव समंजस एकनिष्ठ, खावंदांचे कार्यास जपणारे, मेहनती, युक्तीस मनुष्यास न चुकणारे त्यांचे आमचे मन मिळून गेले, पण बाबूराव फडणीस कारभारात नसतील तर मामांची एकटयाची उमेद नाही. तीर्थरूपांची मर्जी एकप्रकारची, त्यास रक्षून सर्वाक्षी सोय केली तर कार्यास पडेल. मल्हारराव होळकर देशी आले आहे. ते आणखी पेच पाडण्यास चुकणार नाहीत. सबब आपण मल्हाररावचा व बाबूरावाचा एकविचार अगोदर पासून जपून करावा.'[३५]

चिकोडी नंतर माधवराव पेशवे सैन्यासह तुंगभद्रा नदीच्या काठावरील ठाणे काबीज करण्याचा प्रयत्न करतात परंतु या विषयी मराठयांचा आद्य इतिहासकार ग्रँट डफ म्हणतो,

'रघुनाथरावाचा हेतू जितक्या लवकर होईल तितक्या लवकर तुंगभद्रा गाठून तेथून नजराणा घेण्याचा होता.कारण तो प्रांत मराठयांच्या जाचक बंधनातून मुक्त झाला होता.माधवराव पेशवा त्या नदीच्या काठापर्यंत फारसा गेला नाही, त्याने ती नदी कधीच पार केली नाही, असे म्हटले आहे.[३६] परंतु ग्रँट डफचे ते म्हणने योग्य नसून चिकोडी मुक्कामाहूनच रघुनाथराव पुण्याकडे माघारी फिरले होते. त्यामुळे रघुनाथराव तुंगभद्रा नदीपर्यंत गेले नाही परंतु माधवराव पेशवे सैन्यासह चिकोडीवरून पुढे कर्नाटकाकडे गेल्याचे दिसून येते.त्या विषयीचे पत्र पेशवे दप्तरामध्ये (खंड क्र.३७ पत्र क्र.५) उपलब्ध आहे.त्यानुसार पो. माधवराव बल्लाळ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणे.खासा स्वारी कितूर प्रांती आली. कितूरच्या ठाण्याला मोर्चे दिले. ठाणे जेर होऊन देसाई रा गोपाळराव पटवर्धन यांच्यामार्फत भेटीस आला. खंडणी ही मातब्बर झाली. या उपरी सोंधे, बिदनूरच्या सरहदेस जात आहोत. येथून निर्गम करून हरपनहळ्ळी, चित्रदुर्गाकडे जाऊन तेथील गुंता उरकून उपरांत खासा स्वारी होणार.सविस्तर तीर्थरूपास लिहले आहे त्यावरून कळेल(पत्र एवढेच अपूर्ण लिहले आहे.)[३७]या पत्रावरून माधवराव पेशवे त्या प्रांतात गेले व खंडणी वसूल केली असे दिसून येते तसेच कित्तूरचे ठाणे हे घटप्रभा नदीच्या काठी असून हरपनहळ्ळी व चित्रदुर्ग हे दोन्ही ठाणे तुंगभद्रा नदीच्या काठी आहे.या वरून ग्रँट डफचे म्हणणे योग्य वाटत नाही व माधवरावाने हैदरअली क डील मराठयांचे घेतलेले प्रांत परत घेण्याचा उदयोग सुरू केला होता हे ही दिसून येते.

## ३.५ बाळापूरच्या लढाईत हैदरचा पराभव

कर्नाटकची पहिली स्वारी करण्यापूर्वी माधवराव पेशव्यांनी मुरारराव घोरपडयांशी मैत्रीचे संबंध जोडले होते. मुरारराव घोरपडेच्या सहकार्यां शिवाय कर्नाटकची मोहिम यशस्वी होणार नाही. अशी त्यांची खात्री झाली होती म्हणून कर्नाटकच्या स्वारीवर निघण्यापूर्वी त्यांनी मुराररावाशी पत्रव्यवहार केला होता आणि आपल्या स्वारीसंबंधी त्यांना कल्पना दिली होती.या संदर्भात रियासतकार सरदेसाईंनी म्हटले आहे की,'कर्नाटकच्या संबंधात मुराररावाचे प्रस्थ भारी असून त्यास वश केल्याशिवाय माधवरावांचा उदयोग टिकावू होण्याजोगा नव्हता. पेशव्यांनी मुराररावास हैदरअलीवर चालून जाण्याची सूचना केली, त्याप्रमाणे २० मार्च १७६२ रोजी मुराररावांच्या फौजांनी हैदरवर चढाई केली. बाळापूर येथे दोन्ही फौजांची मोठी लढाई झाली आणि त्यात हैदरअलीचा पराभव झाला. या विजयामुळे मराठयांचा आत्मविश्वास वाढला.

माधवरावांना ही कर्नाटकात मुराररावासारखा बलवान सेनानी हैदरशी चांगली लढत देऊ शकेल असा विश्वास वाटला. पेशव्यांची फौज आल्यावर हैदरअली पळून बेंगलूरला जात आहे. त्याचे पारिपत्य उत्तम प्रकारे होईल अशी सर्वांनाच उमेद वाटू लागली. या स्वारीमध्येच माधवराव पेशव्यांची व मुरारराव घोरपडयांची मैत्री झाली ती शेवटपर्यंत टिकून राहिली हे विशेष म्हटले पाहिजे.[३८] बाळापूरच्या लढाईत हैदरचा मुराररावाने पराभव केला एवढाच मजकूर रियासतीमध्ये दिसून येतो.[३९] या विषयीचे सविस्तर वृत्तांत पेशवे दप्तराच्या पत्रामध्ये दिसून येतो. तो पुढीलप्रमाणे पो.छ.८, रामजान चैत्र मु।। तुंगभद्रा (म्हणजेच २० मार्च १७६३) सेवेसी विसाजी बाबूराव विज्ञापना, राजश्री मुरारराव घोरपडे ममलकतदार यांही राजश्री सिवराव घोरपडे व खंडेराव घोरपडे या समागमे दोन अडीच हजार फौज छ.२० साबानी देऊन गुडी बिडयाहून सिलगडेस पाठविली.तेथून तीस कोसावर बाळापूर आहे. त्यांनी जमाव सुद्धा बाळापूरास दोन कोसावर येऊन उभे राहतात.हैदरखानाने मोर्चे लावले असता मोर्चे कायम करून बंदोबस्त करून तीन हजार फौज, हजार बार तुरक स्वार, दोनशे लहान तोफ घेऊन स्वार मात्र पुढे आले. हैदरखानाने फौज तोंडावर देऊन दुतर्फा लढाई झाली. हैदरखानाकडील लोक ठार, जखमी झाले.हे वर्तमान शनिवारी सायंकाळी रायास कळण्यास रात्र झाली. रविवारी एकादशी प्रातःकालीच स्वार होऊन बालापूरच्या रोखे नाईकजी थोरात, मुंकुदराव वेंकटगिरीकर, किरकोळ लोक शे पन्नास घेऊन उदलकोंडा दो कोसावर तेथून सिलगटे पाच कोस तेथपर्यंत जाऊन रानोजी देवकर, थोराता कडील याजबरोबर पंचवीस राऊत देऊन पुढे सिलगटियास पाठविले.तेथे लोक जमा झालेले त्यास घेऊन सिवराव घोरपडे व आणखी लोक पाच–सहा कोस रायाचा मु।। कोडीकोड तेथे पाठविले. रावही व फौजही गुडीबिडयांत आहे.तेथून बाळापूर पाच कोस आहे.राजश्री गोपाळराव सबनीस या समागमे रायाकडील दोन हजार प्यादा व बाळापूर याजकडील जमाव करून नंदीगडास पाठविले. बाळापूर जेर झाले आहे, कडप्पेकरांनी रायाकडे सांड्णीस्वार पाठविला आहे .बसालतजंग सिधवटा आले.त्यासी झुंजावे लागते,तुम्हाकडील उपराला यावा म्हणून कडपेकरांनी लिहले आहे.अबदुल मजीदखानचा लेक यासी बाहेर काढावे म्हणून योजना करून गेले आहेत.महमद अलीखान अर्काटात आहे.नेलूर सर्वांपलिकडे जाऊन बंदोबस्ती करून माघारे अर्काटास आले. येलूरास येणार आहे. हैदरखानाकडे रायाचे पन्नास घोडे व पाडाऊ लोक गेले आहेत. रायांनी भस्मांगी पाहाडी किला

घेतला होता. तो हैदरखानाने मागती घेतला ,गरीब कोन्ही फकीर येतात ते सांगतात. त्यासी चौकिया मातबर ठेवीले आहे. सिवराव घोरपडे यास पाच हलक्या जखमा झाल्या आहेत. पाडाऊ गेले नाहीत. जुजले फार, लोकांनी कमी केली नाही. खंडेराव घोरपडे वगैरे लोकही, स्वामीची स्वारी तुंगभद्रा तीरास आहे म्हणून मोठी आवाई झाली आहे, त्यावरून हैदरखानाने मोर्चे पुढे सरकाविले, खंदक भरितात. रायाकडील लोक प्यादे ,यासी जुमच खाऊ देत नाही. सरकारची फौज आल्याने हैदरखान पळून बेंगरूळास जात आहे. सरकारकडून आनंदराव कैवारकर वकील त्याजपासी होता त्यास बेंगरूळास पाठविले..... गेलेली ठाणी हस्तगत होतील, हैदरखानचे पारिपत्य उत्तम प्रकारे होऊन येईल. जासूद जोडया नाहीत याजकरीता अर्जुनदार हरकारा जोडीबरोबरी विनंती पत्र लिहून पाठविले आहे. यास पाच रूपये देऊन पाठविले आहे.[४०]

बाळापूरच्या लढाईत हैदरअलीचा पराभव झाल्यानंतर माधवराव पेशव्यांनी त्या प्रांतातील पाळेगाराकडून खंडण्या वसूल केल्या तसेच कोपलचा किल्ला ही मराठयांच्या अधिपत्याखाली आणला त्याची नोंद त्यांच्या रोजनिशीमध्ये पुढील प्रमाणे सापडते .'जावजी जाधव हवालदार व कारकून किल्ले कोपल यांचे नावे सनद की, किल्ले मजकूर तुम्हाकडून दूर करून राजश्री रामचंद्र जाधवराव सेनापती यास साल मजकूरापासून दिला असे, तरी मशारनिलेचे हवालदार येतील त्यांचे हवाला किल्ला करून पावलियांचे कबज घेणे आणि तुम्ही जमावसुद्धा हुजूर येणे म्हणून पाठविले.[४१] माधवराव पेशव्यांना मोहिमेवर निघून तीन महिने होऊन गेले होते.या मोहिमेविषयीचे पत्र त्यांनी रामशास्त्री यांना पुढील प्रमाणे लिहिले आहे– (६ एप्रिल १७६२)' श्री वेदशास्त्र संपन्न राजश्री रामशास्त्री स्वामीचे सेवेशी विद्यार्थी माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावे विशेष खासा स्वारी कर्नाटकच्या बंदोबस्तास आली. कित्तूकर देसायाचे पारिपत्य करून खंडणी घेऊन सोंध्याच्या सरहदेस आलो. तेथील खंडणीचा निर्गम करून घेतला.बिदरूरचेहि मातब्बर झाले. खंडणी विल्हे लाविली. लहानमोठी संस्थाने राहिली. ती चुकऊन घेऊन पर्जन्यकालाचा अंदाज पाहून माघारी फिरोन देशास येऊ,आपल्यास कलावे यास्तव लिहिले आहे. आपले संतोष वृत्त लिहित जावे बहुत काय लिहू हे विनंती.'[४२]

## ३.६ कर्नाटकची पहिली स्वारी अपूर्ण

जानेवारी १७६२ मध्ये माधवराव पेशव्यांनी त्रिंबकराव पेठे यासारख्या मराठे सरदारांसह कर्नाटक मोहिम आखली होती. त्यांनी फेब्रुवारी मध्ये मिरज पटवर्धनांच्या हवाली करून, कोल्हापूरच्या काही भागातून खंडणी वसूल केल्या होत्या नंतर अथणी, कित्तूर, बेदनूर, सोंधा इत्यादी ठिकाणाहून खंडण्या वसूल केल्या होत्या. मराठयांची ठाणी हैदरच्या ताब्यातून सोडविण्याचा प्रयत्न केला.[४३] त्रिंबकरावाच्या साहयाने माधवरावाने धारवाडपासून तुंगभद्रा नदीपर्यत खंडण्या वसूल केल्या. यावेळी रघुनाथराव व गोपिकाबाई यांचे उघडपणे भांडण सुरू झाले होते. शिवाय पावसाळाही जवळ येऊ लागला होता म्हणून माधवराव पेशव्यांनी आपली स्वारी अर्धवट सोडून त्यांना पुण्यास परत यावे लागले.[४४] एप्रिल १७६२ मध्ये माधवराव पेशवे पुण्याकडे येण्यास परत फिरले. येताना मार्गातील लहान लहान संस्थानिकाकडून खंडणी वसूल करून मराठी राज्याचा अमंल बसवित माधवराव पेशवे एप्रिल १७६२ मध्ये जेजुरी या ठिकाणी येऊन पोहचले.

## ३.७ कोल्हापूरच्या दत्तक विधानाचा प्रश्न व माधवरावाचे पुण्याला आगमन

नानासाहेबाच्या मृत्यूनंतर माधवराव पेशवे सत्तेवर आले. ताराबाई कडून त्यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली. करवीरच्या गादीचा प्रश्न सुटला नाही. २० डिसेंबर १७६० रोजी कोल्हापूरचे छत्रपती संभाजी मरण पावले होते. संभाजी राजांना मूलबाळ नव्हते त्यामुळे दत्तकाचा प्रश्न निर्माण झाला. नानासाहेबाच्या मते सातारा व कोल्हापूर या गादया एकच आहेत. तेव्हा गादया एक कराव्यात माधवरावाचे सुरूवातीला तेच मत होते परंतु जिजाबाईनी नानासाहेबांनी निवडलेला मुंगीकर भोसल्याचा मुलगा करवीर राज्याचा राजा म्हणून नापसंत ठरविला होता. त्यांनी खानवटकर भोसले घराण्यातील शहाजीराजे यांचा मुलगा माणकोजी याची करवीराचा राजा म्हणून निवड करून त्याला राजवाडयात आणले. आपण त्याला दत्तक घेत आहोत म्हणून त्यांनी पुण्यास कळविले. परंतु पुणे दरबाराकडून त्यांच्या दत्तकास मान्यता मिळण्याची फारच थोडी शक्यता होती. म्हणून त्यांनी पुण्यास जाऊन तो प्रश्न धसास लावण्याचा निर्णय घेतला होता. पुढे १७ एप्रिल १७६२ च्या अक्षय तृतियेच्या सुमुहर्तावर त्यांनी पुण्याचे प्रस्थान केले. जेजुरी येथे माधवराव पेशवे व राघोबादादा हे दोघे जिजाबाईच्या सामोरा गेले. त्या भेटीत दत्तकाचा प्रश्न निघाला होता. माधवराव आणि त्यांचे काका रघुनाथराव दादा

जिजाबाईंना म्हणाले की,'सातारा आणि पन्हाळा ही दोन्ही राज्ये पृथक नसून वास्तविक एकच आहेत. कौटुंबिक कारणाने द्वैतभाव होता तो संपला.' हे ऐकताच जिजाबाई संतप्त झाल्या त्या पेशव्यांना म्हणाल्या की, 'असे आहे तर राज्य आपले स्वाधीन करून घ्या व आमची खर्चाची बेजमी करून महायात्रेची तयारी करा.[४५] पुढे २७ एप्रिल१७६२ रोजी जिजाबाई व माधवराव यांची दत्तक घेण्यासंबधी चर्चा झाली.[४६] जिजाबाईच्या या बोलण्याचा माधवराव पेशव्यांच्या मनावर परिणाम झाल्या वाचून राहिला नाही. त्यांनी जिजाबाईच्या इच्छेनुसार खानवटकर भोसले घराण्यातील शहाजीराजे यांच्या मुलास करवीरचा राजा म्हणून मान्यता देण्याचा निर्णय घेतला.त्याचे विश्लेषण वासुदेव शास्त्री खरे यांनी असे केले आहे. 'माधवराव हे नानासाहेबाहून अधिक धोरणी होते. त्यांचा बंधू विश्वासराव व चुलत चुलता सदाशिवराव भाऊ दोघे पानिपतावर कामास आले होते. त्यांच्या मृत्यूने त्यांचे पिते नानासाहेबही मरण पावले होते. त्यामुळे त्यांना करवीर राज्याशी वैरभाव चालू ठेवणे हितावह वाटले नाही.[४७] करवीरच्या जिजाबाईच्या दत्तकाचा प्रश्न सोडविल्यानंतर माधवराव पेशवे १३ जून १७६२ रोजी पुण्यास येऊन पोहचले. मात्र पुन्हा कर्नाटकात जाऊन हैदरचा पराभव करण्याचा त्यांचा निश्चय होता.

## ३.८ गृहकलह व निजामाचा बंदोबस्त

कर्नाटकातून माधवराव पेशवे पुण्याला आल्यानंतर गोपिकाबाई व रघुनाथराव यांचे भांडण विकोपाला गेले होते.आपला मुलगा गादीचा खरा वारस असताना त्याने रघुनाथरावाच्या हुकमतीत राज्य चालवावे हे तिला आवडत नव्हते. तिने दादा व बापू यांचे महत्त्व नाहीसे करण्याचा प्रयत्न चालविला होता.माधवरावास ही या गृहकलहाचा तिटकारा आला होता. अशातच एक अफवा पसली की,गोपिकाबाईने गोपाळराव पटवर्धनाच्या विचारे दादास कैद करण्याचा उद्योग चालविला आहे. या अफवेने घाबरून रघुनाथराव नाशिकला गेले तेथूनच आपल्या पक्षीय मंडळास विचुंरास जमविण्याविषयी पत्रे लिहिली. त्यानुसार निजामाचा मुरादखान व नागपूरकर जानोजी भोसले यास मिळून माधवराव पेशव्याविरूद्ध दादांनी नविनच घाट रचला.[४८] दादांसाहेबांनी फौज जमविण्यास सुरूवात केली. निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर आपल्या फौजा घेऊन दादास सामील झाला, मल्हारराव रास्ते व गमाजी यमाजी ही सामील झाले.[४९] फौजेसह रघुनाथराव १४ सप्टेंबर१७६२ रोजी अहमदनगरला पोहचला. माधवरावास रघुनाथरावाच्या हालचालीची कल्पना येताच त्यांनी ही संघर्ष करण्याची तयारी केली.

आपल्याकडे त्रिंबकराव पेठे, गोपाळराव पटवर्धन, आनंदराव रास्ते, मल्हारराव होळकर, पिराजी नाईक निंबाळकर, विसाजी कृष्ण इत्यादी सरदारांस सैन्यासह बोलावून घेतले. चुलते व पुतणे यांच्यातील पहिला संघर्ष ७ नोव्हेंबर १७६२ रोजी घोडनदीवर झाला. या संग्रामात दोन्हीकडील सैनिक जखमी झाले तर दुसरा संग्राम हा आळेगावच्या तळावर झाला. यावेळी पेशव्यांच्या फौजेचा पाठलाग रघुनाथरावाच्या फौजानी केला. विनाकारण होणारी हानी टाळण्यासाठढी स्वतः पेशव्यांनी समेट घडविण्याचा प्रयत्न केला. रघुनाथरावाच्या इच्छेप्रमाणे ते स्वतः स्वाधीन झाले.त्यामुळे पेशवाईचा कारभार तात्पुरता रघुनाथरावाच्या हाती गेला [५०] या गृहकलहामध्ये माधवरावाने सयंमाने व कौशल्याने परिस्थिती हाताळल्यामुळे चुलत्या पुतण्यातला वाद काही काळ तरी मिटला. यावेळी झालेल्या कराराप्रमाणे मराठी राज्याची मुखत्यारी राघोबाने सांभाळावी असे ठरले.राघोबाने सर्व आपली विश्वासाची माणसे नेमून कारभार करण्यास सूरूवात केली. यावेळी नाना फडणीसाची तीन पिढयाची फडणीसी रद्द होवून ती चिंतो विठ्ठल रायरीकरास देण्यात आली.[५१]

माधवराव आपणहून चुलत्याच्या स्वाधीन झाल्याने मुत्सद्दी व लढवय्ये यांना आवडले नाही. या संघर्षात दादास मदत करण्यास निजामअली आला होता. त्यास दादांनी मेजवानी देऊन २३ नोव्हेंबर रोजी बोलावून स्नेह राखला व उदगिरच्या तहात घेतलेली ८५ लक्षाची जहागीर व दौलताबाद किल्ला त्याला परत देऊन सल्ला केला. या ठिकाणी एकमताने असे ठरले की, मराठे व निजाम यांनी एकत्र येऊन निजामअलीचा काटा काढावा.[५२] रघुनाथरावांने संपूर्ण सत्ता आपल्या हातात आल्यावर राज्यकारभारात मोक्याच्या जागी आपली माणसे नेमली. सखाराम बापू व नीळकंठ महादेव पुरंदरे यांना मुख्यमंत्री नेमले. सखाराम बापूस सिंहगड राहण्यास व नऊ लक्षाची जागीर दिली. पुरंदरे यास पेशव्यांकडील पुरंदर किल्ला दिला. प्रतिनिधी पद भवानराव यांच्याकडून दूर करून आपल्या अल्पवयीन मुलगा भास्करराव यास दिले. त्याचे मुतालिक म्हणून नारोशंकर यास नेमले. जानराव निंबाळकरास अहमदनगर,पिराजी निंबाळकरास नेवासे वगैरे महाल लावून दिले. तसेच नाना पुरंदरे याची मामलत काढून घेतली व त्यास देशत्याग करून जाण्यास सांगितले. बाबूजी नाईकास शिव्याशाप देऊन बारामतीस घालविले. रघुनाथरावाकडे निर्विघ्नपणे पेशवेपद चालू राहावे अशी त्याच्या चाहत्यांची इच्छा होती. पेशवाईची वस्त्रे छत्रपतीकडून मिळतात म्हणून छत्रपती पदावर दादाच्या पक्षातील

नागपूरच्या रघुजी भोसले यास बसवावे. तसेच पेशवाईची वस्त्रे देण्यास प्रतिनिधी लागतो. तो ही दादासाहेबाचा अल्पवयीन मुलाकडे द्यावे. ही निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदरची कल्पना दादा व बापू यांनी अंमलात आणली.[५३] रघुनाथरावाने माधवराव पेशव्यांच्या पक्षातील लोकांवर सूड उगविण्यास सुरूवात केली.दादाची प्रथम वक्रदृष्टी पटवर्धनांकडे वळली. त्यांनी हैदरअलीवरील स्वारीस जाण्यासाठी निघून वाटेत पटवर्धनांकडील मिरज घेण्याचा मनसुबा रचला. गोपळरावास त्याची चाहूल लागताच, गोपाळराव पटवर्धन यांनी माधवराव पेशव्यांशी बिघाड झाल्यावर करवीरच्या जिजाबाईला कोरेगाव भीमतीर येथून पत्र लिहिले आहे. त्यामध्ये निजामाच्या आश्रयास जाण्याकरिता निघालो होतो. पण करवीरने जर आश्रय दिला तर तिकडे जाण्यास तयार होतो.आपणासारखे सरदार या राज्यातून दुसरीकडे गेल्याने राज्याचा नाश कधीही झाला नाही असा झाला. थोरले शाहू महाराजांनी राज्य संपादिले ते लयास जाण्याचा योग दिसतो. असे त्यांनी पत्राच्या शेवटी म्हटले आहे.[५४]

जिजाबाईने गोपाळराव पटवर्धनास आश्रय दिला नाही कारण तिला माधवराव पेशव्यांचे कर्तृत्व माहित होते. तसेच आपण गृहकलहामध्ये पडू नये असे तिला वाटत होते म्हणून पटवर्धन हे निजामास जावून मिळाले. त्याच बरोबर भवानराव प्रतिनिधी त्याचा मुतालिक गमाजी यमाजी, नरसिंगराव धायगुडे, पिराजी नाईक निंबाळकर इत्यादी अनेक लहान मोठे सरदार दादांवर नाराज होऊन मोगलास जाऊन मिळाले. जानोजी भोसल्याने ही निजामाकडे सूत्र लावले होते. माधवराव पेशव्यांच्या विरोधात निजाम व जानोजी भोसले राघोबाला जाऊन मिळाले होते. परंतु त्यांना रघुनाथरावाच्या कर्तबगारीची जाणीव होती. त्यामुळे त्यांनी आपसात संगनमत करून पेशव्यांवर आक्रमण करण्याचे ठरविले.गमाजी यमाजीने निजामास सातारा ताब्यात घेऊन तिथे जानोजी भोसले यास छत्रपती म्हणून नेमण्याचा सल्ला दिला .निजामाला ही कल्पना आवडली. त्याने जानोजी व निजामअली यांच्यात 'साठ चाळीशीचा' तह केला. यानुसार जितका नवीन मुलूख व खंडणीचा पैका मिळेल त्याच्या दहा वाटण्या कराव्यात व त्यापैकी सहा निजामाने तर चार भोसल्याने घ्याव्यात असे ठरले.[५५] पेशव्यांच्या पक्षातील अनेक मराठा सरदार रघुनाथरावाच्या वागण्यामुळे दुखावले गेले व त्यापैकी काहीजण निजामाला जाऊन मिळाले.परंतु विसाजी कृष्णचा समावेश त्यामध्ये नव्हता. विसाजी हा पेशव्यांसी एकनिष्ठ

राहिला होता.[५६]अनेक मराठा सरदारांच्या पाठिंब्यामुळे निजामाचे धैर्य वाढले व त्याने पेशव्यांशी लढाई करण्याची जय्यत तयारी केली आणि आपल्या मागण्या पेशव्यास कळविल्या.

१. भीमे पलिकडील सर्व मुलुख निजामाचे हवाली करावा.
२. पेशव्यांचे ताब्यातील निजामाकडून घेतलेले महत्त्वाचे किल्ले व स्थळे पेशव्यांनी आपले हवाली करावी.
३. पेशव्याने आपला कारभार निजामाच्या सल्ल्याने करावा.

या मागण्यांमुळे सर्वच मराठा सरदारांनी आपापसातील भेद विसरून एकजुटीने निजामाशी गनिमी पद्धतीने लढण्याचे ठरविले.[५७] माधवराव पेशव्यांनी गनिमी काव्याच्या लढाईत वाकबगार असणाऱ्या मल्हारराव होळकरास बोलावून घेतले. पेशव्यांच्या फौजांनी २३ फेब्रुवारी १७६३ रोजी औरंगाबादच्या रोखाने वाटचाल सुरू केली. नेवासे परगण्यातील लोहगाव, निंबगाव या ठिकाणाहून जाळपोळ करीत औरंगाबाद परगण्यातील पेंडापूर याठिकाणी १ मार्च रोजी सर्व फौजा पोहोचल्या व तेथून मोगलांचा मुलुख उध्वस्त करीत ७ मार्चला औरंगाबादला पोहचल्या. मल्हारराव होळकर ही १२ मार्चला येऊन मिळाला. रघुनाथरावाने १३ मार्चला औरंगाबाद शहरावर हल्ला केला. परंतु तो सफल झाला नाही. मुरादखान शहर रक्षण करीत होता त्याने मराठयांस दोन लक्ष रूपये देऊन शहरास उपद्रव देऊ नये असा करार केला.[५८]

मराठा फौजा देवपूर, असलगाव, बिदलीवरून जळगावातील जामनेर गावी पोहचल्या व तेथून वऱ्हाडात जाण्याचा विचार करून मुलूख लुटीत सर्व फौजा २० मार्च १७६३ रोजी मलकापूर येथे पोहचल्या. मराठयांनी या शहरातून चाळीस हजार खंडणी प्राप्त केली. त्यांच्या पाठलागावर निजाम व जानोजी भोसले होतेच त्यांनी पिंपळगाव पर्यत मराठयांचा पाठलाग केला नंतर निजामाने परत वळून पुण्याची वाट धरली.[५९] पुण्यावरील मोगलांच्या फौजेचे नेतृत्व जानोजी भोसले व गमाजी यमाजी करत होते. त्यांनी लोकांकडून भले मोठे दंड वसूल केले. शिवाय लूट करावयाची ती केलीच, पर्वतीच्या मूर्ती फोडल्या, धर्मशाळा जाळल्या. एका महिन्यापर्यत जाळपोळ व लुटालूट चालू होती. ४ मे रोजी निजामाने लोहगडची पेठ लुटली.[६०] निजामाने सासवड परगण्यात खंडण्या घेतल्या, पुणे जाळून फस्त केले. पावसाळयात मुक्काम तळेगाव येथे केला. याला उत्तर म्हणून पेशवे सैन्यासह भागानगरकडे गेले. मराठयांनी मे १७६३ मध्ये भागानगरची लुट केली. ८ मे रोजी पेशवे मेदक येथे पोहचले.[६१] हैद्राबादहून निघून मराठे

फारूखनगर, नळदुर्ग आणि धारूरच्या वाटेने पुढे गेले. शिवणपेठ, दुपगळ, खराताबाद इत्यादी ठिकाणे लुटली. २२ व २३ मे १७६३ रोजी मराठयांनी कलमन घाटात मुक्काम केला. ही वार्ता निजामअलीस कळताच तो आपला प्रदेश वाचविण्यासाठी पुण्याहून हैद्राबादकडे येण्यास निघाला. १ ते ४ जून १७६३ पर्यंत मराठयांचा मुक्काम निजाम कोंडयावर होता. त्यानंतर १९जुलै रोजी माधवराव पेशवे सैन्यासह सोलापूर जवळील तांदूळवाडीस आले,यावेळी पावसाळा सुरू झाला होता .तरीही दोन्ही फौजा एकमेकांना शह देण्याचा प्रयत्न करीतच होत्या. ८ ऑगस्ट १७६३ रोजी निजामाचे सैन्य गोदावरीच्या काठी 'राक्षसभुवन' येथे पोहचले.[६२]

*** राक्षसभुवनची लढाई**

माधवराव पेशव्यांस ही बातमी कळताच त्यांनी ९ ऑगस्ट रोजी मोगलापासून ८ कोस अंतरावर असलेल्या मांदल मोही येथे आपला मुक्काम केला. त्यावेळी गोपाळराव पटवर्धन व जानोजी भोसले, यांच्याशी पेशव्याने संपर्क साधून त्यांना आपल्या बाजूस वळविण्यात यश मिळविले. त्याच बरोबर निजाम अलीचा भाऊ बसलतजंग याचेशी करार करून त्याला ही आपल्या बाजूस वळविले.[६३] यावेळी गोपाळरावाने आपला तापटपणा सोडून दिला व माधवरावास जावून मिळाले. त्यावेळी माधवरावाने त्यास पुन्हा मिरजेची सनद दिली व त्याबरोबरच पुणतांबे, अष्टे, तासगाव, बंकापूर, लक्ष्मेश्वर इत्यादी महाल व ठाणी यांच्या सनदा पुन्हा दिल्या. जहागिर हाती येताच पटवर्धनावर दुसरे संकट आले ते म्हणजे हैदरने तुंगभद्रेच्या आसपासच्या बंकापूर ,नवलगुंद, हुबळी, लक्ष्मेश्वर इत्यादी  तालुक्यात जाळपोळ, लुटालूट व अत्याचार सुरू केला होता. त्यामुळे हैदरच्या ताब्यात गेलेला आपला मुलूख व बंधू मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन यांना सोडवून आणण्यास काय उपाय करावे याचा विचार करण्यास त्यांना वेळच मिळाला नाही.[६३.१] तसेच जानोजी भोसल्याचा सरदार पिराजी नाईक निंबाळकर जो निजामाच्या पक्षात होता त्यास आपल्याकडे सामील केले. अशारितीने मोगलांच्या सैन्यात फुट पाडली. मोगलांचे सैन्य ऑगस्ट महिन्यात राक्षसभुवनवर होते. त्यांच्यावर तोफखान्यासह माधवराव पेशव्याने आक्रमण केले.[६४] राक्षसभुवन येथे निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर हा पंधरा हजार फौज व तोफखाना घेऊन प्रतिकारासाठी सज्ज होता. त्याच्यावर १० ऑगस्ट १७६३ रोजी पेशव्याने सैन्यासह त्वेषाने हल्ला केला. चार–सहा घटका निकराचे युद्ध घेऊन या संघर्षात विठ्ठल सुंदर, विनायकदास व खंदारचा राजा गोपाळदास मारले गेले.[६५] मोगलांच्या वीस तोफा

मराठयांच्या ताब्यात आल्या. हत्ती, घोडे, उंट, बैल, डेरे, राहुटया इत्यादी सामान मराठयांच्या हाती सापडले. निजामाचा पराभव झाला. निजाम स्वतःगोदावरी ओलांडून पलीकडून आपल्या सैन्याची वाताहत उघडया डोळयांनी पाहत होता. गोदवरीला मोठा पूर असल्याने मराठे तातडीने पलीक डे जावू शकत नव्हते त्यामुळे गोदावरी नदीमुळे नबाबाला जीवनदान मिळाले असे म्हटले जाते .

मराठयांना मिळालेल्या या यशाचे श्रेय माधवराव पेशव्यांच्या मुत्सद्दी राजकराणाच्या धोरणाला, व शौर्याला दिले पाहिजे.[६६] रघुनाथरावाने प्रांजलपणाने गोपिकाबाईस लिहून कळविले आहे की, 'चिरंजीव रायांनी यंदा मेहनतीत व शिपाईगिरीत कमी केली नाही, आम्हापेक्षा अधिक जाहले. इतकी दिवस त्यांनी लढाई देखिली नव्हती. पहिली लढाई पाहिली. त्यात सर्व प्रकारे तरतूद अधिक केली. यांचा पुढे कर्तेपणाचा भरवसा आम्हास आला. साप्रंत काराभार चिंरजीवच करीत आहेत.' या पत्रावरून माधवराव पेशव्यांच्या कर्तबगारीची जाणीव होते व त्यांनी राक्षसभुवन येथे केलेल्या पराक्रमाची ही माहिती मिळते.[६६.१] या लढाईच्यावेळी गोपाळराव पटवर्धनासारखा नावाजलेला सरदार माधवरावाच्या मदतीला नसताना सुद्धा पेशव्यांनी हे यश इतर सरदारांच्या मदतीने प्राप्त केले. यामध्ये विसाजी कृष्ण बिनिवाले, मल्हारराव होळकर,रघुनाथराव इत्यादीनी पेशव्यांची पाठराखण मोठया मेहनतीने केलेली दिसून येते.निजामाचा पूर्ण पराभव करण्यासाठी माधवराव पेशवे औरंगाबादवर चालून गेले. त्यांना निजामाचा पूर्ण पराभव करता आला नाही. कारण याच वेळी कर्नाटकात हैदरअलीने आक्रमक कारवाया सुरू करून धुमाकूळ घातला होता. त्याकडे लक्ष देणे त्यांना आवश्यक होते. २५ सप्टेंबर १७६३ रोजी निजामाशी तह केला .या तहानुसार उदगीरच्या लढाईत मराठयांना जो प्रदेश प्राप्त झाला होता.तोच प्रदेश या तहानुसार पुन्हा प्राप्त केला. याशिवाय नवीन २२ लक्ष उत्पन्नाचा प्रदेश मिळून ८२ लक्ष उत्पन्नाचा प्रदेश मराठयांना प्राप्त झाला.[६७] राक्षसभुवनच्या लढाईत निजमाच्या विरोधात मराठयांनी पराक्रम केला. त्यात काही सरदार जखमी व ठार झाले. त्यांना काही रूपये खर्चास दिल्याची नोंद माधवराव पेशव्यांच्या रोजनिशी पुढीलप्रमाणे सापडते.' जखमी ठार जाहले त्यास खर्चास –रूपये.

४८० पागा हुजूर निसबत माधवराव रामचंद्र
३४० बारगीर

१५ राजाराम चव्हाण जखम तलवारेची बाहुल्यावर भारी सबब रू.

१५ राघोजी डफळे जखम भाल्याची गळयाजवळ

१० मलजी घोगरे-तलवारेची उजव्या मनगटास

१० काशिबा कटके घोडा अंगावर पडला सबब रू.

१० शेख जैनउद्दीन जखम तलवारेची उजव्या पायास पोटरीवर

१०लक्ष्मण बड्वे जखम दगडाची

१० इमामखान म्हसवडकर जखम बाणाची डाव्या पायाच्या गुडघ्यास

६० बहिरजी घाटगे जखमा भारी सबब रू.

१०० बच्याजी महादेव जखम तलवार उजव्या बाहुल्यावर, रू.

२५जावजी जगथाप जखमा गोळीच्या दोन्ही तलहातास सबब रू.

७५ शिवाजी पाटील गोळी लागूनठार- सबब रू.

३४० रूपये एकूण

१४० शिलेदार

२५ नथेखान जखम तरवार उजव्या हाताला कोपराजवळ

५० हाजी आरब जखम भाल्याची गळयाजवळ तलवारीची डाव्या हातावर

१५ हुसेनखान म्हसवडकर जखम भाल्याची डावे हातावर

५० बाळोजी पवार, संभाजी मोरे तलवारीच्या भारी जखमा.

१४०

६४ निसबत सुर्याजी अदमणे

५० बाबूराव गुरव जखमी तलवारेची मनगटास हाड फोडून थोडासा राहिला जखम मोठी सबब रू.

१४ घोडी जखमी झाली सबब रू.

६४ रूपये

४७ मोगल दिमत हुसेन बेग

१५बाजीअली जमादार हत्तीने सोंड मारली

१५आगा अहमद वल्लद इनुसबेग जखम तरवार

१० फाजल बेग जख़म तरवार पाठीवर

७ अलादादखान गुडघ्यास जखम

४७

एकूण ५९१ रू.बीड परगणे निसबत हैबतराव निंबाळकर याबाबती सरदेशमुखीचा ऐवज सालगुदस्ता येणे. त्यापैकी महादशेट वीरकर यांनी हवाला घेतला आहे. [६८]

याशिवाय गणेश विठ्ठलच्या नावे सनद की. माधवराव नरसी दिमत पागा हुजूर निजामअलीच्या लढाईत जखमी झाले, सबब अहमदनगर येथे रवाना केले. बरोबर पागेची घोडी व उंटे आहेत

त्यास दाणा वैरणची बेगमी– कलम–१ सवातीन मन दीड पायली पैकी हरभरे निमे बाजरी जोपर्यंत राहतील तोपर्यंत देत जाणे.

कलम – २ वैरणीस कुरण नेमून देणे. गवत कापून आणतील.एकूण दोन कलमे करार करून दिली असे, याप्रमाणे देत जाणे व जागा चांगली राहावयास देऊन लाकूडफाटे हरएक साहित्य करून देत जाणे म्हणोन सनद दिली आहे.[६९] राक्षसभुवन येथे झालेल्या लढाईत माधवराव पेशव्याने विजयाचे पारडे आपल्या बाजूला झुकविल्याने राघोबाने माधवरावाचे कर्तृत्व खुल्या मनाने मान्य केले. पुन्हा माधवराव पेशवा मुखत्यारीने कारभार पाहू लागताच त्यांनी नाना फडणीसास मराठी राज्याची फडणीसीची दरक ५ ऑक्टोबर १७६३ रोजी सांगितली. माधवरावाच्या या प्रशासकीय बदलामुळे पेशवा व कारभारी एकचित्त एकमेकास पूरक ठरून मराठी राज्याला दिशा निश्चित मिळाली असे म्हणता येईल.[७०]

राक्षसभुवनची लढाई ही मराठयांच्या इतिहासात महत्त्वाची मानली जाते. मराठयांचा प्रभाव कायम असल्याचे ते निदर्शक होते. या विजयाने मराठयांमध्ये अधिक उत्साह निर्माण झाला व आत्मविश्वास वाढला. माधवराव पेशव्यांविषयी मराठा सरदारांच्या मनात आदरभाव वाढला. तसेच माधवराव हेच मराठी राज्याचे नेतृत्व करू शकतात ही जाणीव सरदारांमध्ये निर्माण झाली. मराठी सरदारांनी आपल्या कर्तृत्त्वाला नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला. माधवराव पेशव्याने विविध व्यक्तींचे स्वभाव भेद व मतलब ओळखून सर्वास राज्याच्या कामी लावले. माधवराव पेशव्यांचा दरारा , वचक दक्षिण व उत्तरेच्या राजकरणावर बसला. इथून रघुनाथराव मागे पडून मराठी सत्तेची सूत्रे माधवरावाकडे आली.[७१] राक्षसभुवनाच्या विजयानंतर दसऱ्यापर्यत म्हणजे १६ ऑक्टोबर १७६३ पर्यंत माधवराव पेशव्यांनी स्वतः औरंगाबाद प्रांतात फिरून तहाची व सरदारांची व्यवस्था लावली. त्यानंतर पेशवे माळवाडी, कातर्डे, निमगाव, गांजीभोयरे, संविदेणे, तुळापूर मार्गे पुण्यास परत आले.[७२] माधवराव पेशवे पुण्याला आल्यानंतर मराठी राज्याचा मुलकी व लष्करी अधिकार त्यांच्याहाती एकत्रित होणे हे राज्यहिताचे ठरले. या काळात पेशवे राज्याचे अंतर्गत आणि परराष्ट्रीय धोरण स्वतःच्या अधिकारात ठरवू लागले.[७३] त्यांनी अंतर्गत धोरणामध्ये प्रामुख्याने मुलकी व लष्करी सुधारणांकडे लक्ष दिले तर परराष्ट्रीय धोरणामध्ये दक्षिण भारतातील कर्नाटक प्रदेशाकडे लक्ष दिल्याचे दिसून येते.पेशवे काळामध्ये कायमचे दप्तर व स्वारीतील चालते दप्तर असे दोन प्रकार होते. चालते दप्तर हे नेहमी

पेशव्यांच्याबरोबर मोहिमेत बाळगले जाई.[७४] फडणीसाच्या दरकासंबंधी नाना फडणीस व मोरोबा फडणीस यांच्यात इ.स.१७६३ मध्ये वाद निर्माण झाला होता. तेव्हा माधवरावाने चालत्या दप्तराची मुख्त्यारी मोरोबादादा फडणीस यास दिली. ती १७७८ पर्यंत त्यांच्याकडेच होती नंतर मात्र नानाने मोरोबास राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक करून अहमदनगच्या किल्ल्यात ठेवले. तेव्हापासून दोन्ही प्रकारच्या दप्तराची मुख्त्यारी नानाकडे आली होती [७५]

## ३.९ हैदरअलीच्या कारवाया

माधवराव पेशवे पहिल्या कर्नाटक मोहमेवरून १३ जून १७६२ रोजी पुण्याला परत आले होते. तेव्हापासून माधवरावास जवळ–जवळ दोन वर्षे रघुनाथरावा बरोबर गृहकलह व हैद्राबादच्या निजामाशी संघर्ष करण्यामध्ये गेली होती. या संघर्षाच्या काळामध्ये हैदरअलीला दक्षिण पूर्णपणे मोकळी मिळाली होती. त्याने आपल्या आक्रमक कारवाया सुरू केल्या व दक्षिणेतील संस्थानिकांना उपद्रव देण्यास सुरूवात केली होती. मराठयांची  कर्नाटकाहून पाठ फिरताच हैदरने शिरा, बाळापूर इत्यादी नविन जिंकलेल्या सुभ्यावर अमंल बसविण्यास सुरूवात केली .बाळापूर जवळ चिकबाळापूर हे शहर आहे. तेथील संस्थनिकाने मुराररराव घोरपडयांचा स्नेह संपादला होता. घोरपडयांचा मुलुख चिकबाळापूर प्रमाणेच शिऱ्याच्या सुभ्या लगत असल्याने हैदरचा दोघांस त्रास होऊ लागला. म्हणून दोघांनीही हैदरशी झुंजण्याची तयारी केली. शेवटी युद्ध होऊन त्या दोघांचा पराभव झाला. चिकबाळापूर काबीज करून तेथील संस्थानिकास जवळच नंदिदुर्ग म्हणून पहाडी किल्ला आहे. त्याच्या आश्रयास जाणे भाग पडले. घोरपडयांपासून मडकशिरे, कोडिकोंडा, पेनकोंडा ही ठाणी घेतली. मुराररराव घोरपडयांना पेशवे अथवा इतर कोणाकडून मदत न आल्याने पराभव पत्करावा लागला. हैदरने त्याचा मोठा प्रदेश जिंकून घेतला. गुत्तीचे मुख्य ठिकाण मात्र मुराररावाच्या हाती राहिले. हैदरने खंडेराव घोरपडे आणि इतर काही प्रमुख लोकांना पकडून कैदेत टाकले. पेशवे पुण्याला परतले व मुराररावाचा पराभव झाला. या दोन गोष्टीमुळे हैदरला आकाश ठेंगणे वाटू लागले.[७६] औरंगजेबाच्या सुभ्यास(विजापूरी कर्नाटक या पोट सुभ्यास) ज्या संस्थानिकांच्या खंडणीचे उत्पन्न लावून दिले होते.त्या संस्थानिकापासून ती खंडणी 'शिऱ्याचा नबाब' म्हणून हैदरने वसूल करण्याचा बेत केला. या संस्थानिकामध्ये रायदुर्ग, हरपनहळळी व चित्रदुर्ग येथील संस्थानिक प्रमुख होते.त्यापैकी रायदुर्गकराने आपणहून हैदरकडे खंडणी पाठविली. दरडावणीचे पत्र जाताच

हरपन्नहळ्ळीकरांकडूनही खंडणी आली. परंतू चित्रदुर्गकरांनी हैदरास जुमानले नाही. म्हणून हैदरने मुलूखावर स्वारी करून दोन लक्ष दंड वसूल केला.[७७] त्यानंतर हैदरचे लक्ष बिदनूरकडे गेले. बिदनूरचा राजा बसवाप्पा नाईक हा १७५५ मध्ये मरण पावल्याने त्याच्या गादीवर त्याचा दत्तक मुलगा चनबसवय्या हा अल्पवयीन असल्याने राणी व निंबय्या नावाचा प्रधान राज्याचा कारभार चालवीत होते. हैदरने१७६३ च्या प्रारंभी चित्रदुर्गकरांचे सैन्य बरोबर घेऊन मसलतीनुसार बिदनूरची मोहिम हाती घेतली.त्या प्रांतात प्रवेश करताच त्याने तोतयाकडून जाहीरनामे लावले की,'आपण बिदनूरच्या गादीचे खरे वारस आहोत. सर्व लोकांनी आम्हास येऊन मिळावे. येथील त्यास बक्षीस मिळेल न येतील त्यास शिक्षा केली जाईल'.[७८]

मार्गातच शिमोग्याच्या किल्ला लागला तो हैदरने घेतला.तेथे त्याला एक लक्ष होन सापडले, राणीने हैदरास याच ठिकाणी सांगून पाठविले की, तुम्ही परत जाल तर मी तुम्हास चार लक्ष होन देईन. परंतु हैदरने न ऐकता बिदनूरपासून १५ कोसावर कुमसी हे ठाणे घेतले. तेव्हा बिदनूरचा माजी कारभारी लिंगण्णा तेथे कैदेत होता.तो त्याच्या हाती लागला. त्याने राजधानीस जाण्याच्या चोरवाटा व द्रव्य कोठे किती मिळेल यांची माहिती हैदरास दिली. तेथूनच पुढे अनंतपूरचे ठाणे होते. ते हैदरने घेतले तेथे राणीकडून पुन्हा निरोप आला की, १४ लक्ष होन देते तुम्ही परत जा. शेवटी राणी १८ लक्ष देण्यास तयार झाली. परंतु लिंगण्णाने सांगितले की, सारे राज्य आणि यापेक्षा दसपट द्रव्य तुम्हांस मिळेल तुम्ही पुढे चला. वाटेत हैदरास शेपन्नास लोकांची एक चौकी लागली. तेथील लोकांस धरून हैदरने त्यांचे कान, नाक कापून त्यांना सोडून दिले. ते लोक बिदनूरस पोहचताच एकच गडबड उडली. हजारो लोक भयाने शहर सोडून रानात पळून गेले. नंतर हैदरने शहरात लूट होऊ दिली नाही तर नाक्या नाक्यावर पहारे ठेऊन शहरातील प्रत्येक घरास कुलूप लावून व्यवस्थित रीतीने प्रत्येक घरातील मालाची मोजदाद केली. त्यावेळी एकंदरीत एक कोटी वीस लक्षाचा माल सापडला होता. बिदनूरच्या राज्याची पूर्व सीमा चित्रदुर्गाच्या राज्यास लागली होती. तेथपासून ते पश्चिमेस समुद्रापर्यंत सर्व राज्य हैदराच्या स्वाधीन झाले. हैदरने बिदनूरच्या राणीस तिचा यार, बाल राजा सोमशेखर व तोतया या सर्वांना पकडून शिरे प्रांती मदगिरी नावाच्या किल्ल्यावर कैदेत टाकले.बिदनूरचे राज्य जिंकल्याने हैदरचा उत्कर्ष झाला. हे राज्य व शिऱ्याचा सुभा आणि बेंगळूर माझे खासगत म्हणजे 'स्वराज्य' असून बाकीचे माझ्या अमंलाखालील आहे. ते

म्हैसूरच्या राजाचे आहे असे तो म्हणत असे या शहराला (बिदनूर) त्याने 'हैदरनगर' असे नाव दिले. तेथे त्याने टांकसाळ स्थापन करून 'हैदरी' व 'बहादुरी' होन पाडण्याची सुरूवात केली. या नवीन राज्यातच समुद्रकाठी 'होनावर' बंदर होते. तेथे त्याने गोदी बांधून आरमार तयार करण्याचा हुकूम दिला.

बिदनूर प्रांत हा घाटमाथ्यावर असून तिथे नऊ महिने पाऊस पडतो व तीन महिने ऊन असते. त्यामुळे हैदर हिवतापाने बरेच दिवस आजारी पडला होता म्हणुन हैदरास ठार मारून त्याच्या जाचामधुन आपला देश मुक्त करण्याचा बिदनूरच्या लोकांनी बेत केला. हैदरचे कारभारी ही त्यात सामील झाले. परंतु कटाचा सुगावा हैदरास लागतच त्याने कटातील तीनशे आसामीस धरून शहराच्या नाक्या–नाक्यावर नेऊन फासावर चढविले. त्या दिवसापासून बिदनूरच्या राज्यात फितूर अथवा दंगा म्हणून कधी झालाच नाही .अशाप्रकारे हैदरने बिदनूरचे संस्थान बुडविले.[७९] बिदनूरच्या वायव्येस कारवार जिल्हयात सोंधे संस्थान होते. ते घेण्यासाठी हैदरने मीर फैजुलाखानाबरोबर काही सैन्य देऊन डिसेंबर १७६३ मध्ये त्याला रवाना केले. ती फौज येताच सोंध्याचा संस्थानिक गोव्याच्या पोर्तुगीज लोकांकडे पळून गेला. त्याची ठाणी व तालुके हैदरच्या सैन्याने थोडयाच दिवसात काबीज करून त्या संस्थानात आपला अमंल बसविला.[८०] हैदरने १७६३ मध्ये मराठ्यांच्या ताब्यातील हवेरीचा किल्ला जिंकून व तेथून सावनूरवर चाल केली. सावनूरचा नवाब हा पेशव्यांचा मांडलिक होता.[८०.१] त्यास आपणाकडे वळवून घेण्यासाठी हैदरने प्रयत्न केला. पण त्या नबाबास हैदरची कीर्ती अलीकडे चांगलीच माहित झाल्याने व तुंगभद्रे पलिकडील संस्थानिकांची त्याने काय काय दुर्दशा केली आहे. हे त्यास माहित असल्याने त्याने खंडणी देण्याचे साफ नाकारले. तेव्हा सन १७६३ च्या एप्रिल महिन्यात हैदरने मीर फैजुला बरोबर फौज देऊन सावनूरवर पाठविले. त्याने येताच रट्टेहळ्ळी, मिश्रीकोट, हुबळी ही ठाणे घेतली.[८१]

सावनूरच्या नबाब अब्दुल हकीमखान याने फौज जमविण्यास तजवीज केली आणि भास्करराव नरगुंदकर, दौलतराव घोरपडे, गजेंद्रगडकर व मनोळीचे शिंदे यास मदतीस बोलविले. नंतर नबाब व मराठे सरदार मिळून सात–आठ हजार फौज मीर फैजुलाच्या मुकाबल्यास निघाली. यावेळी हैदरही निवडक सैन्य व तोफांचा उत्तम संरजाम घेऊन निघाला व सावनूरच्या जवळच एका डोंगराच्या आड येऊन लपून बसला .दुसरे दिवशी मीर फैजुलाने

सावनूरवर हल्ला केला. उभयपक्षी युद्ध होत असताना हैदरने ही तोफांचा भडीमार केला. त्यामुळे नबाब व मराठे सरदार यांच्या सैन्याची दाणादाण होऊन फार लोक मारले गेले.जे जिवंत राहिले त्यांनी आपापल्या ठिकाणाकडे पळ काढला. मोठया कष्टाने नबाब जीव बचावून सावनूरास आला आणि शहराचे दरवाजे लावून घेऊन स्वस्थ बसला.[८२] नंतर सैन्यासह हैदर तेथे आला व थोडयाच दिवसात सावनूर त्याने काबीज केले. त्यानंतर अब्दुल हकीमखान निरूपाय होऊन हैदरास शरण गेला. सावनूरच्या नबाबावर हैदरने तह लादला, त्यानुसार नबाबाने दरवर्षी हैदरला खंडणी दयावी, मराठयांचा बंकापूरचा किल्ला सावनूरकरांकडे होता तो त्यांनी हैदरला दयावा. याशिवाय नबाबाने ६००० फौजेनिशी हैदरला मदत करावी [८२.१] व खंडणी देऊन हैदरचा अंकीत म्हणून घेण्यास कबूल झाला. हैदरने दोन लक्ष होन खंडणी घेण्याचा ठराव केला. त्यापैकी सत्तर हजाराचा नबाबने भरणा केला. फक्त नबाबांचा वाडा मात्र त्याकडे ठेऊन बाकी सर्व शहरात हैदरने आपल्या गारदयांच्या चौक्या ठेवल्या. नंतर हैदरने सावनूर पासून तीन कोसावर बंकापूर आहे. तो किल्ला मिरजेच्या पटवर्धनाच्या जहागिरीत होता. तेथे गोविंदपंत सखदेव किल्लेदार होता. त्या किल्ल्यास हैदरने वेढा दिला. देशाहून मदत येईल या आशेवर गोविंदपंताने हिंमत धरून सव्वा महिना किल्ला झुंजविला. परंतु मदत न आल्याने निराश होऊन बंकापूर शत्रूच्या हवाली करणे त्यास भाग पडले.[८३]

बंकापूरचा बंदोबस्त हा उत्तम असावा असे हैदरच्या मनात आल्याने त्याने त्या किल्ल्याची चांगली डागडुजी केली. भोवताली खंदक खणला, धान्य व दारूगोळा वगैरे सामानाची तरतूद केली. गाड्दी, पाच हजार माणसे रक्षणार्थ ठेऊन त्यावर परशुराम घोरपडे सांवशीकर हा सरदार नेमला. हुबळी, मिश्रीकोट ही ठाणी या पूर्वी त्याच्या हाती आली होती. आजपर्यंत हैदरचा पराजय म्हणून कोठेच झाला नाही. ज्या किल्ल्यास वेढा दिला तो किल्ला त्याच्या स्वाधीन झाल्या शिवाय राहिला नाही. तो जवळ आल्यामुळे उत्तर कर्नाटकातील किल्लेदार व देसाई त्याच्या भितीनेच लटलटा कापू लागले होते. उत्तर कर्नाटक जिंकण्याचे काम त्याने मीर फैजुलावर सोपविले व स्वतः बेदनूरास निघून गेला.[८४] मीर फैजुलाने धारवाडास शह दिला. पटवर्धानांची जहागिर सांभाळण्यासाठी त्या प्रांती मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर हा राहिला होता. त्याचा पराभव होऊन मीर फैजुलाने धारवाड हस्तगत करून मेघश्यामरावास कैदी म्हणून हैदरकडे रवाना केले. यानंतर मीर फैजुलाने शिरहट्टीचे

ठाणे घेतले. याचप्रमाणे गदग, नवलगुंद, श्रीमंतगड, हुलीगड, कलघटगी व इतर ठाणी भराभर पडत चालली. ऑक्टोबर १७६३ मध्ये त्याने धारवाड काबीज केले.[८५]

हैदरअलीच्या आक्रमक कारवायांमध्ये विशेष म्हणजे मराठयांचा इंग्रजांशी सलोख्याचा तह झालेला असताना ही मुंबईकर इंग्रजांनी हैदरअलीस मराठयांविरूद्ध मदत करण्याचे ठरवून त्यास शस्त्रास्त्रे व दारूगोळा पुरविण्याचे ठरविले. मराठी सत्तेला पायबंद घालण्यासाठी अर्काटच्या नबाबास युद्धनौका बांधण्यास मदत केली तसेच हैदरअलीने निजामअलीशी त्यास नजराणा पाठवून दोस्ती केली व पुण्याला पेशव्यांकडे मेहदी अलीखान नावाचा आपला वकील पाठवून मैत्री करण्याचा प्रयत्न केला होता.[८६]कोप्पल येथे रामचंद्र नारायण हुपरीकर हा मामलेदार होता. त्याने व नरगुंदचा भास्करराव याने मात्र शत्रूच्या सैन्याला दाद दिली नाही. ही दोन स्थळे सोडून सारा धारवाड जिल्हा शत्रूच्या ताब्यात गेला. त्याने कित्तूरच्या देसाई पासून खंडणी घेतली नंतर क्रमाक्रमाने त्यांच्या स्वाऱ्या वर्धा, मलप्रभा व घटप्रभा या नदया ओलांडून जवळ जवळ कृष्णा तीरापर्यंत होऊ लागल्या. घाटाखाली सारा कारवार जिल्हा, त्यांच्या हाती लागल्याने गोवेकर फिरंगी, वाडीचे सावंत व विजयदुर्गचा पेशव्यांचा सुभेदार यांस जबरदस्त धास्ती उत्पन्न झाली.[८७]

सारांश माधवराव पेशव्यांची जून १७६२ नंतरची दोन वर्षे रघुनाथराव व निजाम यांच्याशी संघर्ष करण्यात गेली असल्याने हैदरअलीने दक्षिणेत आपला प्रभाव निर्माण केला.गुत्तीच्या घोरपडयाकडून बहुतेक प्रदेश जिंकून आपल्या राज्यास जोडला.बिदनूरच्या राज्य हस्तगत केले,सोंधे संस्थान जिंकून आपल्या राज्याला जोडले. मीर फैजुलाच्या साहाय्याने हैदरने सावनूर, हुबळी, मिश्रीकोट, धारवाड व घाटाखालील कारवार जिल्हा हे सर्व प्रदेश हस्तगत केले. त्यामुळे म्हैसूर राज्याची सरहद्द जवळजवळ कृष्णा नदीस भिडली. पहिल्यांदा मराठी राज्यावर दक्षिणेकडून आक्रमणे होण्याचा धोका हैदर अलीच्या रूपाने निर्माण झाला होता.कारण यापुर्वी मराठी राज्यावर उत्तरेकडूनच आक्रमणे होत होती. या आक्रमणाचा बंदोबस्त करण्यासाठी पेशव्यांनी केलेल्या तयारीचा आढावा पुढील घटकामध्ये घेण्यात येणार आहे.

## ३.१० माधवराव पेशव्यांची दुसरी कर्नाटक स्वारी

मोगलावरील स्वारीतून परत आल्यानंतर माधवराव पेशवे पुण्यास आले.त्यांनी विश्रांती न घेता हैदरअलीच्या विरोधी करावयाच्या कर्नाटक मोहिमेची तयारी सुरू केली.सर्व प्रथम त्यांनी मराठी राज्याचा कारभार नाना फडवीसांवर सोपविलेला दिसून येतो.कागदपत्रावर तारीख घालणे, हिशोब तपासणे, या पारंपारिक कामापेक्षा खूपच वेगळे आणि अधिक जबाबदारीचे काम माधवरावाने नानाफडवीसांवर सोपविण्यास सुरूवात केली. नाना फडवीसाने स्वारीवर गेलेल्या पेशव्यास पैसा, दारूगोळा, तोफा, पुस्तके, अलंकार, औषधे इत्यादी वळोवेळी पुरवली आहे. तसेच धारवाडच्या वेढयात मृत्यू पावलेल्या हरी परशराम सोमण यांच्या घरी समाचार घेऊन पेशव्यांच्या वतीने सांत्वन नानाने केले आहे.सरकारी अनुष्ठाने, ब्राह्मण भोजने, बांधकामे, दानधर्म इत्यादीची व्यवस्था पाहणे, पेशव्यांच्या कुटुंबातील नारायणराव, रमाबाई (पेशव्यांची पत्नी) पार्वतीबाई व कुटुंबाची इतर बायका मंडळी पुण्यात राहिली होती. त्यांचा सांभाळ करणे,सर्व कारखान्यावर देखरेख करणे, कुंटुंबाच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे, हत्तीच्या खुराकासाठी पुण्याजवळ उसाची लागवड करणे.येथपासून तर सोनाराने सरकारी हिरा हरवला आहे, त्यांच्या बायका मुलास कैदेत टाकणे. इत्यादी अनेक कामाचा समावेश आढळतो.[८८] यावरून माधवराव पेशव्यास नानाफडवीसांचे गुण दिसून आले असावे.त्यांना माणसांची पारक उत्तम होती म्हणूनच त्यांनी प्रत्येक व्यक्तीचा स्वभावभेद व स्वार्थ ओळखून त्यांना मराठी राज्याच्या कारभारामध्ये सामावून घेतलेले दिसून येते.

माधवराव पेशव्यांनी लष्कराच्या तयारीकडेही लक्ष दिल्याचे दिसून येते, त्यांनी राजश्री आनंदराव धुळप यास पत्र पाठविले आहे. ते ६ जुलै १७६३ रोजीचे आहे त्यानुसार ‘अखंडित लक्ष्मी आलकृंत राजमान्य श्राो. माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सु।। आर्बा सितैन मया व अलफ तुम्ही पत्र पाठविले पावले. सातारा प्रांते धामधुमीचे प्रसंगामुळे सरकारची सनद सादर झाली. यारून २०० लोक तिवऱ्याचे घाटे रवाना केले आहेत. त्यास त्या लोकांनी कोणत्या मार्गे यावे, निभाव पडेल असे त्या मार्गास दोघे माहितीगार माणसे पाठवावी, म्हणून लिहले .राजश्री सदासिव यमाजी कराड प्रांते गेले आहेत. सातारियास यावयास लोकांस वाटेचा काही पेच नाही. तिवऱ्याचे घाटे येता किले वासोटा याचे लोकांची मात्र बातमी राखून यावे. पुढे बामणोलीस कोणी वासोटकर वगैरे असले तर तो शह चुकवून यावे म्हणजे अलीकडे काही गुंता

नाही. तर वासोटकरांचा मात्र पेच घाट सांभाळून सावधपणे रातबिरात खबरदारीने राहून लोक सातारियास येऊन पोहच करणे जाणिजे छ. २४ जिल्हेज बहुत काय लिहणे[८९] या पत्रावरून असे दिसते की, माधवरावाने २०० माणसे सातान्यास पाठविले आहे.त्यांना आनंदराव धुळप यांनी सातान्यास सावधपणे पोहचते करावे अशी आज्ञा दिली आहे. याशिवाय माधवरावांनी विविध मराठा सरदारांस सनदा दिलेल्य दिसून येतात.पिराजी नाईक निंबाळकरास पाच हजार चागलीं फौज बाळगावी आत आढ्ळाचे लोक व करोल,भालेकरी वैगरे चांगले बाळगावे.[९०] आपाजीराव व बाबूराव व धारराव जोत्याजीराव पाटणकर सरक रातून नालबंदी मोगलाईत गेले परंतू खळोजीराव पाटणकर यांनी चागली फौज बाळगून सरक रात चाकरी के ली [९१] दादूखान टोके यास जातीस व फौजेस तैनात सालीना १,०७,००० रुपायाचा देवून इमानेइतबारे सरक ारात चाक री एक निष्ठे ने क रीत जाणे.[९२] तसेच या मोहिमेमध्ये माधवराव पेशव्यांनी शिवचंद,पेमसिंग व मोहनसिंग बेलदार यांना सामावू न घेतले व दर पालास पाच रुपये प्रमाणे सरक रात घेण्याचा क रार के ल्याचे दिसून येते .[९३]

१८व्या शतकामध्ये मराठी सैन्य व्यवस्थेचे पेंढारी हे खास वैशिष्टये मानावे लागेल. नानासाहेब पेशव्यांच्या काळापासुन मराठी लष्करातून यांचा वाढता वापर सुरू झाला. शत्रूची रसद तोडणे, शत्रूला लुटून दहशत बसविणे इत्यादी कामी यांचा उपयोग केला जात असे. पेंढान्यात विविध जाती–जमातीचे लोक दिसून येतात.आपल्या लुटीतील १/६ भाग प्रमुख सेनापतीला दयावा लागे. पेशवे सरकार पेंढान्या पासून 'पालपट्टी' नावाचा कर वसूल करत असल्याची नोंद मराठी कागदपत्रातून मिळते.[९४] माधवराव पेशव्यांनी आपल्या लष्करात पेंढान्यांना सामावून घेतल्याचे दिसून येते. त्यांनी ञ्यंबकराव ढमढेरे यांचे नावे सनद दिली आहे की, लष्करात तुमचे गोटात पेंढारी यांची पाले सुमारे पन्नास राहावयाची आज्ञा केली असे, तरी पन्नास पाले तुम्ही आणून ठेवणे, जाजती आणली तर दर पालास रूपये तीन प्रमाणे अगर जशी लुट मिळेल त्याजप्रमाणे पालपट्टी घेतली जाईल.[९५] शिलेदार आणि बारगीर हे पेशवाईतील सैन्य व्यवस्थेचे वैशिष्टये होते.शिलेदार हे अत्यंत विश्वासू, धाडसी असून हंगामी सैनिक मानले जात असे. हातघाईच्या लढाईमध्ये शत्रूवर तुटून पडणारे, शिलेदार एकांडे या नावाने पेशवाईत मोठया संख्येने दिसून येतात. बारगीर ही पेशवे सरकारची कायमची फौज म्हणता येईल.दारूगोळा आणि घोडे त्यांना सरकारकडून मिळत असे. बारगीरात सर्व जाती जमातीचे व

धर्माचे लोक दिसून येतात. त्यांच्या तैनातीत गडी, आचारी इत्यादी खाजगी नोकर सरकारकडून मंजूर केलेले दिसून येतात.[९६] घर पागा हे देखील पेशवाईतील सैन्य व्यवस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य दिसून येते. त्या काळात कुणीही सधन गृहस्थ पदरी ५ ते ५० स्वार बाळगीत असे. मोहिम निघाली की, अशा घर पाग्यास स्वारीत सामील होण्याची पत्रे पेशव्यांकडून पाठविली जात असे. प्रत्येक स्वारामागे मालकाला ३०० रूपये मिळत असे. या पैशातून पुढील वर्षी आणखी सरदार नेमले जत असे. अत्यंत प्रतिष्ठित व लाभदायक असा हा व्यवसाय पेशवाईमध्ये धनिकासाठी निर्माण झाला होता.[९७] याशिवाय माधवराव पेशव्यांनी राजश्री जानोजीराव धुळप गोसावी आरमार सुभा प्रमुख यास ही आरमारासह या मोहिमेत सहभागी होण्याविषयी पत्र पाठविल्याचे दिसून येते. त्यानुसार कोकणपट्टीत सोंधे, बिदनूर याप्रमाणे हैदरनाईकांनी ठाणी घेतली आहेत. ती काबीज करून तो प्रांत सरकारच्या अमंलात आणावा ही मसलत तुम्हास सांगितली आहे. तरी तुम्ही व फिरंगी व सावंत एकत्र येऊन जलमार्गे व खुष्कीने जिकडून साधेल तिकडून प्रांत सर करणे. सरकारी कामकाज झाल्यावरी तुमचे मनोदयानुरूप उर्जित केले जाईल[९८] तसेच माधवरावाने हैदरअलीच्या आक्रमक धोरणाला पायबंद घालण्याच्या दृष्टीने सन १७६३ च्या अखेरीस गोपाळराव पटवर्धन यास कर्नाटकात रवाना केले व स्वतः कर्नाटकाच्या स्वारीची जय्यत तयारी सुरू केली होती.[९९] मराठा सरदारांची फौज व पथके पुण्याला जमा होण्यास २–३ महिन्याचा अवधी होता. या काळात माधवराव पेशव्यांनी काही महत्त्वाची कामे पार पाडली. त्यामध्ये महत्त्वाचे म्हणजे ताराबाईचा नातू रामराजा यास माधवराव पेशव्याने १७६३ मध्ये राज्याभिषेक केला . सातारच्या किल्ल्याची फडणीशी नाना फडणीसाकडे असल्याने छत्रपतीची देखभाल करण्याचे काम माधवरावाने नानाला सांगितले. बाबूराव कृष्ण आपटे या अत्यंत विश्वासू स्नेहयास नानाने आपल्या वतीने साताऱ्यास ठेवले. छत्रपतीची देखभाल करण्याचे अत्यंत जोखमीचे काम बाबूरावाने अत्यंत निष्ठेने सावधपणे अखेरपर्यंत पार पाडले आहे.[१००] माधवराव पेशव्यांनी आनंदराव भिकाजी रास्ते यास सनद दिली आहे की, तुम्हा समागमे सरकारच्या तोफा आहेत. त्यापैकी जय व फत्तेमुबरख दोन्ही तोफा राजश्री गोपाळराव गोविंद पटवर्धन यांच्या स्वारीकडे दिल्या आहेत. बाकी जयवंती व ज्वालाभवानी दोन्ही तोफा हुजूर पाठवून देणे.[१०१] एकंदरीत माधवराव पेशव्यांनी स्वारीची प्रचंड तयारी केलेली दिसून येते.यासाठी त्यांना तीन महिन्याचा

अवधी लागला होता. त्यांच्या सैन्यात विठ्ठलराव विंचुरकर, नारोशंकर, सखारामबापू, धोंडो दत्तात्रय, नरसिंगराव धायगुडे, आनंदराव गोपाळा सुपेकर, आनंदराव रास्ते, विसाजी कृष्ण बिनिवाले, रामचंद्र गणेश, शहाजी भापकर, शहाजीराजे अक्कलकोटकर, आबा पुरंदरे, घोरपडे इचलकरंजीकर, महिपतराव कवडे, इतक्याची पथके हजर होती. याशिवाय सर्व सरदार आपापल्या पथकाबरोबर स्वतंत्रच आले होते. पटवर्धनांपैकी गोपाळराव, परशुरामभाऊ, नीलकंठराव, कोन्हेराव, वामनराव, मोराबा आबा, नारायणराव, धोंडोपंत आणि यादवाडकर पटवर्धनापैकी, अंताजी विठ्ठल हे स्वारीत होते. सर्वांची मिळून सहा–सात हजार फौज व श्रीमंतांनी पंधरा हजार हुजरात नेमली होती. सर्व जहागीरदारांची मिळून एकंदर चाळीस हजाराची फौज जमली होती. याशिवाय माधवराव पेशव्यांनी गुत्तीच्या मुरारराव घोरपडे व सावनूरच्या नबाबास तुंगभद्रा तीरावर सैन्यासह येऊन मिळण्याचे कळविले होते. तसेच सैन्यामध्ये पेंढारी, मावळे व हेटकरी या जातीचे पायदळ ही बरोबर घेतलेले होते.[१०२] परंतु या मोहिमेविषयी पेक्सिटो याने चुकीची माहिती दिली आहे. तो म्हणतो की, माधवराव पेशव्यांनी फेब्रुवारी १७६४ मध्ये कृष्णा नदी कधीच पार केली नाही. परंतु माधवरावाने मोठे सैन्य आणि असंख्य बंदुकधारी गोळा केले. त्याच्या मतानुसार पेशव्यांकडे ८०,००० सैन्य व ६० बंदुकधारी होते.[१०३] तसेच या दुसऱ्या कर्नाटक मोहिमेला वासुदेव शास्त्री खरे हे आपल्या मराठी राज्याचा उत्तरार्ध खंड–१ व ऐतिहासिक लेखसंग्रह खंड–२ मध्ये पहिलीच हैदरअलीवरील स्वारी म्हणतात ते योग्य नसून ती माधवराव पेशव्यांची दुसरी कर्नाटक मोहिम आहे.[१०४]

या मोहिमेची तयारी व नेतृत्व या विषयी ग्रँट डफने चुकीची माहिती दिली आहे. त्याच्यामते या सैन्याचे नेतृत्त्व करण्याचा मुख्य अधिकार स्वतःकडे ठेवण्याबाबत माधवराव पेशव्यांनी आग्रह धरला.त्याचे काका रघुनाथराव हे पुण्यातच राहून यावेळी सरकार चालवीत होते. शेवटी रघुनाथरावाने होकार देईपर्यंत सखाराम बापूने पेशव्यांच्या या बतावणीला पाठिंबा दिला. रघुनाथरावाने रागाने पुणे सोडले व नासिक जवळील आनंदवल्ली येथे जाऊन निवांत राहिले.[१०५] परंतु हे खरे नाही. शरीर अशक्त झाल्यामुळे व शीण आल्यामुळे मोगलाविरूद्ध मोहिम चालली असतानाच दादासाहेब वारंवार बोलून दाखवित की, एवढी मोहिम झाली म्हणजे रावसाहेबाकडे सर्व कारभार सोपवून देऊन आपण स्नान संध्या करण्याकरिता गोदावरी तीरी जाऊन राहणार. रावसाहेबांनी या स्वारीत निघताना चुलत्यास बरोबर येण्याविषयी फार आग्रह

केला होता. परंतु विश्रांती घेण्याचा त्यांचा निश्चय पक्का ठरला असल्याने ते रावसाहेबांचा सुखासमाधानाने निरोप घेऊन नासिकास गेले.[१०६] तसेच स्वारीच्या पूर्वी माधवरावाने रघुनाथरावाला त्यांच्या खाजगी खर्चाकरीता काही महाल व इनामगावे लावून दिली होती. त्याची नोंद त्यांच्या रोजनिशीमध्ये पुढील प्रमाणे आहे. रूपये ३,०५,०००– गोदातीर

३५,०००परगणे नासिक

५०,०००परगणे वणी दिंडोरी

४०,००० परगणे सिन्नर

३०,००० परगणे कुंभारी

२५,००० परगणे त्रिबंक

१०००००प्रांतबागलाण

रूपये २,३०,००० नर्मदातीर

१,२०,०००सरकारहंडे

१,००००परगणे कान्हापूर

१,००,००० परगणे खांडवे

रूपये २८,२०० – भीमातीरी

१२००० कसबे खेड

५००० कडूस

१२०० मौजे अपटी तुळजापूरजवळ

३००० मौजे पारगंद

७००० कसबे केंदूर .

एकूण ५,६३,२०० रूपये महालाची बेरीज आजमासे किल्ले त्रिंबक येथील कब्ज व खाजगी खर्च मिळोन दिले असे. सदर महालाचा सरसुभा चिंतो विठ्ठल रायरीकर यास सांगितला आहे. याप्रमाणे करार यादी खुद्द रावसाहेबांनी करून दिली आहे.[१०७]

## ३.११ दुसऱ्या कर्नाटक स्वारीचे उद्देश

माधवराव पेशव्यांनी कर्नाटक स्वारीची प्रचंड तयारी केली.दुसऱ्या कर्नाटक स्वारीचे उद्देश पुढीलप्रमाणे

१. हैदरअलीच्या म्हैसूर राज्याची सरहद्द पार कृष्णा नदीपर्यंत येऊन भिडली होती.त्याच्या आक्रमणाला पायबंद घालणे.

२. हैदरअलीने मराठयांच्या ताब्यातील गुत्ती, सावनूर, बिदनूर, सोंधे, कर्नूल,कडाप्पा यासारखी संस्थाने जिंकून घेतली होती ती त्याच्या तावडीतून सोडविणे.

३. कर्नाटकातील लहान–लहान संस्थानिकांकडून खंडणी वसूल करणे.

४. करवीरच्या जिजाबाईच्या महालांचा म्हणजेच चिक ोडी,मनोली व कागलचा बंदोबस्त लावून देणे.

५. पानिपतपूर्वीचा आपल्या वडीलांचा दहा वर्षापूर्वीचा दरारा दक्षिणेत निर्माण करणे.

६. म्हैसूरच्या हैदरअलीने मराठयांची खंडणी थकविली होती. ती वसूल करणे व हैदरअलीचा बंदोबस्त करणे .

## ३.१२ प्रत्यक्ष मोहिमेला सुरूवात

हैदरअलीच्या आक्रमक कारवायांना पायबंद घालण्यासाठी डिसेंबर १७६३ च्या अखेरीस गोपाळराव पटवर्धन यास माधवरावांनी कर्नाटकात रवाना केले व स्वारीची जय्यत तयारी झाल्यानंतर संपूर्ण तयारी सह माधवराव पेशवे ५ जानेवारी १७६४ रोजी कर्नाटकच्या स्वारीवर निघाले.[१०८] राज्याचा कारभार त्यांनी नाना फडणीसावर सोपविला. मोरोबा फडणीस, हरीपंत फडके, या मुत्सद्दीना नाना फडणीसाच्या मदतीकरीता पुण्यातच ठेवले. पेशव्यांनी स्वत:सोबत रास्ते, बिनिवाले,रामचंद्र गणेश कानडे, महिपतराव कवडे, अक्कलकोटकर भोसले, आनंदराव सुपेकर, विठ्ठलराव विंचुरकर, इचलकरंजीकर घोरपडे इत्यादी निवडक सरदार घेतले.[१०९] तसेच सखाराम बापू बोकील हा सदाशिवराव भाऊंच्या स्वारीपासून कर्नाटक प्रांताचा माहितीगार म्हणून प्रसिद्ध होता.शिवाय आपल्यामागे त्यास पुण्यास ठेवणे धोक्याचे होते म्हणून माधवरावाने त्यास आपल्या स्वारीबरोबर घेतले.[११०]

माधवराव पेशव्यांनी मुख्य कारभारी म्हणून सखाराम बापू व मुत्सद्दी म्हणून कृष्णराव बल्लाळ काळे यांना स्वारीत घेतले होते.आबा पुरंदरे जरी नाशिकला असले तरी त्यांचे पथक हरी गोपाळ याजबरोबर स्वारीत होते.पौष महिन्यात माधवराव स्वारीस निघाले.ते घाट चढून सातारा प्रांती आले व तेथून शिखर शिंगणापूर येथे शंभू महादेवाचे स्थान आहे.त्या रोखे चालले. विठ्ठल विंचूरकर व नारोशंकर यास श्रीमंतानी पूर्वी हिंदुस्थानात पाठविण्याचा बेत केला होता.तो आता रहित करून त्यांना सैन्यासह लवकर निघून येण्याचा हुकूम केला. तोपर्यंत दक्षिण महाराष्ट्रात फिरुन बारीकसारीक कामे आटोपून घ्यावी व फौजेच्या खर्चाकरीता पैका मिळवावा, नंतर धारवाडकडे जावून हैदरशी गाठ घ्यावी. असा श्रीमंताचा मनसुबा ठरला होता. त्याप्रमाणे ते शंभूमहादेवास जाऊन तेथून नाझऱ्यावरून चिकोडीकडे चालले होते. तेव्हा पटवर्धनांच्या कारकूनाने येऊन विनंती केली की, या मार्गे लष्कर गेले तर आमचा मुलूख तुडविला जाईल, त्यावरून तो रस्ता टाळून श्रीमंत जत प्रांती गेले.[१११]

### ३.१२.१ चिकोडी, मनोली व कागल जिजाबाईच्या हवाली

मराठयांचा मोगलाशी नुकताच जो तह झाला होता त्यात इंडी, तांबे,आलमले, बागेवाडी, अबजलपूर हे महाराष्ट्राच्या आग्नेय सीमेवरचे परगणे पेशव्यांस मिळाले होते. त्या परगण्यात अंमल बसविण्यासाठी पेशव्यांनी गोपाळराव पटवर्धनास पाठविले होते. विठ्ठलराव विंचूरकरची नेमणूक कागलचे ठाणे घेणेसाठी केली होती. त्याचे कारण कोल्हापूरची जिजाबाई हिने शेषोनारायण रूईकर म्हणून हुक्केरीचा मामलेदार होता. त्यापासून काही कर्ज काढले होते व त्याच्या फेडीकरीता चिकोडी, मनोली व कागल हे तीन तालुके त्याजकडे लावून दिले होते. परंतु त्या ठिकाणच्या जमीनदारांनी राणीची मालकी नाकबूल केली व शेषोनारायणचा अंमल बसू दिला नाही. चिकोडीचा देसाई हा सामर्थ्यवान होता. कागलमध्ये घाटगे पूर्वीपासून बळावले होते. मनोलीस शिंदे फौज बंद असून त्यांना पटवर्धनांचा आश्रय होता. या तिघांचे पारिपत्य करण्याचे सामर्थ्य राणीत नसल्याने तीन तालुके हातातून गेले व शेषोपंताचा पैका बुडाला. त्यामुळे घाटगे व शिंदे यांवर राणीचा फार राग होता.तीनही ठाणी घेऊन देण्याविषयी शेषोपंताची पुण्याच्या दरबारी बरेच दिवस खटपट चालली होती. राणीची ही पेशव्यांजवळ इतकी सक्तीची रदबदली होती की, तुमची ठाणी घेऊन हवाली करून देईन. अशी पेशव्यांनी राणीजवळ शपथ घेतली होती. परंतु सुरूवातीला तीन वर्षे त्यांना सवडच मिळाली नाही.यंदा मात्र कर्नाटकात जाता

जाता राणीस ठाणी घेऊन देण्याचे त्यांनी ठरविले होते. त्याबद्दल असा करार झाला होता की, ठाणी हाती आल्यावर शेषोपंताने तीन लाख व राणीने चार लाख रूपये फौजेच्या खर्चाकरीता पेशव्यांस दयावे. या ठरावाप्रमाणे विंचूरकर व गोपाळराव दोहीकडे दोन कामावर गुंतले होते ते परत येईपर्यंत माधवराव पेशवे तूर्त जत प्रांती गेले. जत येथे डफळे व पोळ यांनी गेल्या चार वर्षात बराच बंडावा माजविला होता. त्यावर जरब बसवून रावसाहेबांनी तो प्रांत आपले मामा आनंदराव रास्ते यास जहागीर दिला व नंतर पेशवे विजापूरकडे वळले.[११२]

विजापूर या ठिकाणी चव्हाणांचे प्राबल्य होते व ते मोगलांचा आश्रय करून त्याची जहागीर खाऊन त्याच्या सैन्यात चाकरी करीत. या चव्हाणास हुसकावून लावण्यास गेल्या चार वर्षात पेशव्यांना वेळ मिळाला नव्हता. या प्रसंगी माधवरावांनी चव्हाणांचा बंदोबस्त करून विजापूरात आपले ठाणे बसविले. या ठिकाणी नारोशंकर ही सैन्यासह येऊन मिळाला. नंतर लष्कर विजापूरहून परत फिरून पुन्हा कृष्णातीरी येडूर मांजरी येथे आले. चिकोडी तालुक्याची नागरमनोळी सुद्धा सर्व ठाणी फौज जाताच भराभर कौलास आली.रावसाहेबांनी ती शेषोपंताच्या हवाली केली.[११३] माधवरावांनी शेषोनारायण यांच्याकडे मामलत म्हणून असलेला हुकेरी प्रांत व फुटगाव ही ठाणी सरकारात नजर केली. ती पावली म्हणून जिजाबाईने माधवरावास पुढीलप्रमाणे पत्र पाठविले–'उपरी राजश्री शेषोनारायण यांजकडे हुकेरी प्रांत व फुटगाव सरकारची ठाणी मामलत होती ते तुम्ही राजश्री बाळाजी केशव व रामचंद्र महादेव यांचे विदयमाने सरकारात नजर केली. त्या प्राो साहेबाचे सेवेसी सारी झाडेनिसी पावली. तुम्हास कळावे यास्तव आज्ञा केली असे.[११३.१] कागल व कोगनोळी विंचूरकरांनी घेतली होती. ते ही लष्करास मिळण्यास परत निघाले होते.एक मनोलीचे ठाणे मात्र राणीच्या कराराप्रमाणे दयावयाचे होते ते धारवाडच्या वाटेवर होते.मुलुखगिरीस आत चैत्र व वैशाख हे दोनच महिने राहिले असल्याने माधवरावाने विंचूरकर व गोपाळराव यास जल्दीने निघून येण्याची ताकीद केली व स्वतः जल्दीने मनोलीकडे चालले. तिकडे जाण्यास वाटेत एक मोठी बारी लागते. ही बारी पाच्छापूरापासून निसरगीपर्यंत वीस मैलाची होती.हिला पूर्वी पेशवाईत 'मनोलीची बारी' असे म्हणत असत.बारीचा रस्ता अरूंद व खडकाळ असल्याने लष्कर जाण्यास फार अडचणीचा होता.सर्वत्र कीर्र झाडी पसरली होती. बारीच्या अलीकडे वंटमुरीचे ठाणे आहे .ते घेऊन घोडगिरीवरून बारी पार होऊन होगलच्या ओढयावर रावसाहेब एक दिवस मुक्काम करून

राहिले.[११३.२] तो गाव मनोलीकरांचा असल्याने तोफा लावून लुटून फस्त करण्यात आला, तेथून स्वारी मुरगोडास जाऊन मनोलीस दाखल झाली. तिथे कृष्णाबाई शिंदे होती. तिने किल्ला झुंजविण्याचा प्रयत्न केला. माधवरावांनी किल्ल्यास मोर्चे लावले.चार दिवसात किल्ल्याच्या खंदकापर्यंत मोर्चे गेले. आता हल्ला करून किल्ला ताब्यात येणार इतक्यात पटवर्धानंच्या मध्यस्तीने कृष्णाबाई शरण येऊन तिने पेशव्यांच्या हवाली किल्ला केला. तो त्यांनी शेषोपंताच्या ताब्यात दिला. हा संघर्ष आठ दिवस चालला होता. या विषयीचे पत्र मनोलीहून महादजी विष्णुने बाजी पंत दाजी यास एप्रिल १७६४ रोजी लिहले आहे.[११४] स्वारीवर निघून माधवराव पेशव्यांस जवळ–जवळ चार महिने झाले होते. यातील मोठा त्यांचा काळ हा सैन्य जमा करण्यात व स्वारीच्या पुढील तरतुदी करण्यात गेला. त्यांच्याबरोबर सखाराम बापू हा कारभारी होता. तो पैका खात असे हे जरी खरे असले तरी त्याच्या इतका जुना, अनुभवी, सावरलेला मुत्सद्दी आता कोणी राहिला नव्हता. या स्वारीत सुद्धा त्याच्या अकलेचा माधवरावास फार उपयोग झाला असला पाहिजे.[११५]

मराठयांची आपणावर स्वारी होणार हे हैदरअली पूर्णपणे जाणून होता.माधवरावाने स्वारीची केलेली तयारी व सोबत घतलेले निवडक सरदार याचा अंदाज त्यास होता. हैदरअली हा शूर, पराक्रमी, महत्त्वाकांक्षी, उत्तम सेनानायक, मुत्सद्दी व दूरदर्शी होता. आपले ध्येय गाठण्यास तो कधी ही कचरत नसे. कावेबाजपणा व कपटविद्या यात तो तरबेज असून कृतघ्नपणातही निष्णात होता. मराठयांचा गनिमी कावा त्याने आत्मसात केला होता.[११६] रावसाहेबांनी असी मसलत योजली होती की, यंदा मुलुखगिरीचे दिवस आता थोडे राहिले. याकरिता तूर्त धारवाड व भोवतालची ठाणी घ्यावी. हैदर नाईक ३०–४० लाख रूपये खंडणी देईल तर बंकापूर, सोंधे व बिदनूर त्याकडेच राहू दयावीत.तुर्त तह करून परत जावे. दसरा झाल्यावर पुन्हा स्वारी करून त्याचे पुरते पारिपत्य करावे.हैदरअली खंडणी देण्यास मुळीच कबूल नसेल तर छावणी करून त्याची पुरती खोड मोडल्याशिवाय परत जावू नये. अशी योजना पेशव्यांची होती.[११७]

### ३.१२.२ हैदरअलीच्या हालचाली

मराठयांच्या लष्करात काय चालले आहे याची बातमी हैदरअलीस हरहमेशा मिळत होती व त्यानुसार तो आपले बेत पक्के करत होता.माधवराव पेशवे पुण्याहून निघाले तेव्हा हैदरने आपल्या मुलुखाचा बंदोबस्त केला. श्रीरंगपट्टणचा बंदोबस्त त्याने मखदुम अलीवर सोपविला तसेच शिरे प्रांताच्या बंदोबस्तास आपला मेहूणा मीररेझा यास पाठविले. चिकबाळापूरचा पाळेगार व त्याचा मित्र मुरारराव घोरपडे आणि मीररेझा यांची लढाई सुरू झाली होती. हैदरअली तीस हजार गारदी, बारा हजार स्वार, पन्नास तोफा, सुमारे वीस हजार कानडी प्यादे इतक्या सामानानिशी बिदनूरास राहिला होता. सोंधे संस्थानावर हैदरचे सैन्य चालून गेले. तेव्हा तेथील देसाई पळून पोर्तगीजांच्या आश्रयास गेला. तेथील ठाणी घेण्यात हैदरअलीची फौज गुंतली असता पेशव्यांची स्वारी कर्नाटकाकडे येऊ लागली ,तेणे करून सोंधेकरास धीर आला व त्यांनी एकदम चाहोकडून बंड सुरू केले.त्यास पेशव्यांकडून प्रोत्साहन मिळाले होते. ते बंड मोडण्यासाठी हैदरने लालखान या सरदारास पाठविले परंतु ,सोंधेकरांना पोर्तुगीज, मलबार मधील नायर यांचे पाठबळ मिळाल्याने त्यांनी लालखानाचा बाणावशीच्या घाटामध्ये पराभव केला. हे पराभवाचे वर्तमान हैदरअलीस कळताच त्याने धारवाड प्रांतातील मीर फैजुला यास ताबडतोब सोंध्यावर रवाना केले. त्याने देसाई यास हुसकावून लावून प्रांतात पुन्हा अमंल बसविला व शिवेश्वर, सदाशिवगड, अंकोला हे किल्ले जिंकून घेतले आणि खोलगड नावाचा मजबूत किल्ल्याला वेढा दिला. हा संघर्ष चालू असतानाच [११८] मराठयांची फौज मनोलीपर्यंत आल्याची बातमी समजताच त्याच्या मनाची चलबिचल सुरू झाली. मराठयांशी कृष्णानदीवर येऊन झुंजण्याची त्याची उमेद आता राहिली नाही. सर्व सरदारास बोलावून घेऊन,त्यांच्या सल्ल्याने मसलत ठरली की,मराठयांसमोर मैदानात उभे राहून लढण्याचे धाडस न करता जंगलाचा व डोंगराचा आश्रय करून आपण राहावे.तेथून फौजेच्या टोळया टोळयाने मराठयांवर छापे घालावे. मराठयांना हैराण करावे. आपण बिकट जागेवर छावणी करून राहणार .मराठयांची नुसती घोडेस्वारांची फौज येऊन काय करणार.पायदल व तोफखाना त्यांच्याजवळ म्हणावा असा नाही. मुलुखगिरीचे फक्त दोनच महिने राहिले आहेत.इतक्यात बंकापूर व धारवाड सारखी मुख्य ठाणी आहेत तेवढी हर प्रयत्नाने राखावी. बारीक–सारीक ठाणी शत्रूकडे गेली तरी चिंता नाही. पावसाळा सुरू झाला म्हणजे मराठयांस परत जाणे भागच आहे. या प्रांतात छावणी होणे

अशक्य आहे. ते परत गेल्यावर सारा मुलुख आपलाच आहे. झालेली नुकसानी भरून काढू. दसरा झाल्यावर ते पुन्हा चालून येतील तर त्यावेळचे त्यावेळेस पाहता येईल. याप्रमाणे हैदरची मसलत होती.[११९]

## ३.१३ माधवराव पेशवे व हैदरअली यांच्यातील लढाया

हैदरअलीने बिकट जागी बिदनूरच्या दाट झाडीजवळ रट्टेहळ्ळी या ठिकाणी आपली छावणी केली होती. तिचा उपयोग त्याला स्वसंरक्षणासाठी करता येणार होता. हैदरने आपल्या छावणीच्या संरक्षणाकरिता आपला सरदार मीर फैजुला यास ठेवले व स्वतः मराठयांवर छुपे हल्ले सुरू केले होते.यावेळी हैदरने जंगलाचा उपयोग स्वसंरक्षणासाठी केला त्यामुळे मराठयांना त्याच्याशी मैदानी लढाई करता येणे शक्य नव्हते. हैदरची मैदानात वाट पहात बसण्यापेक्षा व वेळ घालविण्याऐवजी माधवरावाने तुंगभद्रा ओलंडण्याचा निर्णय घेतला होता.[१२०] एप्रिल १७६४ मध्ये मीरफैजुलाने गोपाळराव पटवर्धनाचा पराभव करून त्याची फार नासाडी केली असे म्हैसूरचा इतिहास लिहीणाऱ्या कर्नल विल्कसने लिहले आहे. त्याचे अनुकरण विनाचौकशी मराठयांचा आद्य इतिहासकार ग्रँट डफने केले आहे.[१२१] परंतु ते योग्य नसून कृष्णेच्या उत्तरेला मिरज म्हणून किल्ला आहे. तेथील मराठा सरदार गोपाळराव पटवर्धन याच्या मदतीस पेशव्याने बरीच फौज पाठवून त्यास आदेश दिला होता की, तू कृष्णा उतरून थोरली फौज येईपर्यंत शत्रूस अडवून धर. गोपाळरावाने मीरफैजुलापेक्षा आपली फौज अधिक आहे ,म्हणून त्याच्याशी लढाई करण्याचा निश्चय केला त्यामुळे त्यांच्यामध्ये एखादी लहानशी चकमक झाली असेल. परंतु ती एप्रिल १७६४ मध्ये झाली असे कर्नल विल्क्स व ग्रँट डफ यांचे मत आहे .परंतू एप्रिल महिन्यात माधवराव पेशव्यांने हुबळीचे ठाणे घेऊन आपला मोर्चा हा सावनूरच्या नबाबाकडे वळविला आहे. गोपाळराव पटवर्धन ही पेशव्यांबरोबर होते.[१२२] त्यामुळे वरील दोघांचे ही लिखाण चुकीचे आहे असे वाटते.

माधवराव पेशवे सैन्यासह मनोलीहून कुच करून धारवाडकडे येऊ लागले. तेव्हा मीरफैजुला मागे हटत हटत सावनूरच्या दक्षिणेस दहा कोसावर हनगल म्हणून गाव आहे तेथपर्यंत गेला व तेथे त्याने छावणी केली. दोन्ही बाजूस दोन तळी व पिछाडीस झाडी असून पुढील बाजूस त्याने खंदक खणला व त्यावर बातेऱ्या बांधून तोफा ठेवल्या होत्या. मराठे अगदी जवळ आले आहे, तेव्हा या छावणीस राहणे धोक्याचे आहे, असे वाटून तो अनवडीस

हैदरअलीला जाऊन मिळाला. रावसाहेबांनी धारवाड समीप येऊन मुक्काम केला, तो किल्ला फार बळकट असून त्यात हैदरचे लढाऊ सामान व शिबंदी भरपूर होती,त्या ठिकाणी मीर फैजुलाचा भाऊ किल्लेदार होता. हा किल्ला घेण्याच्या भरीस पडलो तर मोहिमेचे दिवस निघून जातील व पुढील मनसूबे तसेच राहतील. हा विचार करून माधवराव पेशवे हुबळीस गेले.तेथे नवी व जुनी हुबळी अशी दोन भक्कम ठाणे होती. हैदरने जुन्या हुबळीचा बंदोबस्त हसनअलीखान व तुळजोपंत म्हणून ब्राह्मण अधिकारी होता. तुंगभद्रेच्या उत्तरेस मराठयांचे जेवढे राज्य घेतले होते. ते सर्व याच्या हवाली केले होते.तुळजोपंत हा त्या सर्व मुलखाचा वसूल करून हैदरअलीस देत असे. नव्या हुबळीस गोपाळरावाने वेढा घालून ते ठाणे लवकरच काबीज केले, तर जुन्या हुबळीवर माधवराव पेशव्यांच्या फौजेने हल्ला केला. तेव्हा किल्लेदारांनी तो मोडून काढला. त्याप्रसंगी पेशव्यांचे पन्नास लोक ठार झाले. तीन चारशे जखमी झाले.धनिसिंग म्हणून पेशव्यांच्या लोभातला एक शूर शिपाई होता.तो याच ठिकाणी पडला व रामचंद्र गणेश या सरदाराच्या मनगटास गोळीची जखम झाली.[१२३] दुसरे दिवशी किल्लेकरी शरण आले व नव्या हुबळीस पेशव्यांचे ठाणे बसले. तेथे हसनअली व तुळजोपंत सापडले त्यांना कैद करून कोपलच्या किल्ल्यावर पाठवून देण्यात आले. तेथून माधवराव पेशवे निघून सावशी व कुंदगोळ यामध्ये एक ओढा होता त्या ठिकाणी मुक्कामास उतरले. ही दोन्ही ठाणे गोपाळराव पटवर्धनाने जिंकून घेतली. विसाजी नारायण व नरसिंगराव धायगुडे यांनी गदग जिंकून घेतले. नवलगुंद, मुळगुंद, जालिहाळ, बेहट्टी व इतर पुष्कळ ठाणी थोडयाच दिवसात मराठयांच्या हाती आली. माधवराव पेशवे नंतर सैन्यासह एप्रिलमध्ये सावनुरास गेले. तेथील नबाब अब्दुल हकीमखन याचे हैदरने सर्वस्व लुटून घेतल्यामुळे त्याची इतकी हलाखी होती की, त्याच्याजवळ एक हत्ती होता, तो रोडका होता म्हणून श्रीमंतांनी आधी एक चांगला हत्ती त्याच्याकडे पाठवून दिला व त्यावर बसून नबाबाची स्वारी पेशव्यास भेटीस आली,त्यास आणावयास विंचुरकर व नारोशंकर गेले होते.[१२४]

श्रीमंत ही दुसऱ्या दिवशी नबाबाच्या भेटीस सावनुरास गेले,नबाबाने त्यांस मेजवानी करून त्यांचा बहुत सन्मान केला. तिसरे दिवशी नबाब पुन्हा भेटीस आला तेव्हा माधवरावांनी त्यास हत्ती, घोडे, शिरपेच व त्याच्या मुलास पदके दिली. त्या प्रसंगी पुढे मसलत कशी करावी. यासंबधी वाटाघाटी झाल्या. तो नबाब हैदरअलीस फार भीत असे. आपण मराठयांस मिळालो

याबद्दल हैदरअलीस फार संताप आला व तो केव्हाही अकस्मात झडप घालून दगा करील याचा क ाही नेम नाही, हे त्यास कळून चुकले होते.त्याच्या राजधानीच्या शेजारी बंकापुरास हैदरचे ठोणे होते. सदरहू ठाणे आधी काबीज करून तेथून शत्रूचा नायनाट करावा म्हणजे आपण काळजीतून मुक्त होऊ असे नबाबाचे पेशव्यांजवळ बोलणे होते. परंतु माधवरावास ही मसलत योग्य वाटत नव्हती. पेशव्यांनी शत्रूचे जल्दीने पारिपत्य करून मोहिम शेवटास नेण्याची मसलत योजली होती त्यानुसार, जोपर्यंत शत्रू झाडी धरून बसला आहे त्याचे पारिपत्य आपल्या हातून होत नाही. तोपर्यंत आपण कितीही ठाणी घेतली तरी, ती आपली झालीच असे म्हणता येत नाही. कारण आपण दूर गेलो म्हणजे शत्रू पुन्हा येऊन ती ठाणी घेण्यास चुकणार नाही. असे झाले म्हणजे घेतलेला मुलुख पुन्हा त्याच्या हाती जाणार नंतर पुन्हा आपण ठाणी व मुलुख जिंकूण घ्यावा असे हे किती दिवस चालणार याकरिता कसेही करून हैदरास झाडीतून मैदानात ओढून आणले पाहिजे, तुर्त सर्व गोष्टी बाजूस ठेऊन आपण तुंगभद्रा पार होऊन चित्रदुर्ग व हरपनहळ्ळी येथे जावे,तेथून खंडणी वसूल करून या संस्थानिकांना आपणास मिळवून घ्यावे. हैदरच्या पिछाडीचा मुलूख उध्वस्त करावा. गुत्तीहून घोरपडे चार हजार सैन्यासह आपणाकडे येत आहे त्याचा मार्ग सुलभ करून दयावा, आपण दूर गेल्याची हुलकावणी हैदरास दयावी, त्यामुळे हैदर मैदानात येऊन उपद्रव देवू लागेल, तर ताबडतोब दौड करून त्याचा संहार करावा ही पेशव्यांची मसलत यशस्वी ठरली होती. ठरल्याप्रमाणे पेशव्यांची फौज तुंगभद्रा तीरावर येऊन मुराराव घोरपडे चार हजार सैन्यासह फौजेस सामील झाले. सावनूरचा नबाबही सैन्य घेऊन पोहचला होता. यामुळे मराठयांच्या लष्करामध्ये उत्साह संचारला होता व एकूण फौज सत्तर हजारापर्यंत जमली होती.[१२५] माधवराव पेशव्यांना ऐवजाची तरतूद करण्याचे मोठे संकट येऊन पडले होते.त्यांची घोडेस्वाराची बहुतेक फौज होती.ती निरनिराळया जहागिरदारांनी आणली होती.त्याबद्दल पैक्याचे जोखीम नव्हते.हुजरातीपैकी काही फौज मात्र त्यांनी स्वतः ठेवली होती. तिची नालबंदीच्या रूपाने अर्धे वेतन आगाऊ दिल्याने तिची समजूत झालेली होती.परंतु गाड्दी, तोफखाना ,इतर कारखाने व शागीर्दपेशा वगैरे जात खर्च यांचे रोजमुरे दरमहा ठरवून दिलले होते. तो ऐवज अंदाजे दहाबारा लक्षाचा होता म्हणून त्यांनी पुण्यास नाना फडणीसाकडे व नाशिकास दादासाहेबाकडे वारंवार पत्रे पाठविली होती की, कसेही करून काही द्रव्य स्वारीत पाठवून दया. परंतु त्यांचा खर्च भागविता भागविता त्यास

पुरे झाले होते. तेव्हा तिकडून मदत येण्याचा मार्ग खुंटला होता म्हणून द्रव्यासाठी काही मसलत करणे पेशव्यांना आवश्यक होते. पेशव्यांची मसलत पक्की ठरली तेव्हा सावनूरचा नबाबाने श्रीमंतास विचारले की, तुम्ही तर मला सोडून दूर चालला, पण तुम्ही गेल्यावर इकडे हैदर येऊन माझा गळा दाबील. नबाब हा श्रीमंताच्या पदरी पडला होता म्हणून त्याचे संरक्षण करणे भाग होते .माधवरावाने त्याचे पाचशे स्वार व एक मुलगा यास स्वारी बरोबर घेऊन नबाबास सावनुरास जाण्याचा निरोप दिला. तूर्त त्याच्या रक्षणाकरिता महिपतराव कवडे, धोंडो दत्तात्रय व महिपतराव चिटणीस या सरदारांची तीन पथके मिळून दोन हजार स्वार सावनुरास पाठविले.[१२६]

गोपाळराव पटवर्धन हे शिरहट्टीला वेढा घालून बसले होते.त्यास ते काम झाल्याबरोबर सावनुरास जावून राहण्याविषयी ताकीद केली होती की, शिरहट्टी हस्तगत व्होवो अगर न होवो.आम्ही परत येईपर्यंत सावनुरास हैदरअलीचा उपद्रव न होईल ती तजवीज तुम्ही करावी आणि हैदर मैदानात उतरताच आम्हास ताबडतोब लिहून कळवावे अशी गोपाळरावास ताकीद होती. याप्रमाणे बंदोबस्त करून माधवराव पेशवे करजगीस गेले व पुढे तुंगभद्रा पार होऊन सावनुरावरून चित्रदुर्गाकडे चालले. ही बातमी हैदरास कळताच तो स्वार पायदळ, तोफखाना वगैरे जय्यत तयारी करून अनवडी सोडून सावनूरच्या राज्यात रट्टेहळ्ळी येथे आला व तेथे आपली छावणी केली.[१२७]

### ३.१३.१ रट्टेहळ्ळीची लढाई

रट्टेहळ्ळीस हैदरअलीने येऊन छावणी केली होती .परंतु मराठयांचे सैन्य अधिक असल्याने तो जंगलात दडून बसला होता. म्हणून माधवराव पेशवे त्याची जंगलातून बाहेर येण्याची वाट पाहत बसण्याऐवजी तुंगभद्रा पार करून चित्रदुर्गास गेले होते त्यामुळे हैदरने मीरफैजुला यास रट्टेहळ्ळीची जबाबदारी सोपविली. स्वतः पंचवीस हजार निवडक सैन्यासह गाड्दी, तोफा, स्वार बरोबर घेऊन तो बाहेर पडला आणि तुंगा व भद्रा या नदयांचा हरीहर येथे संगम होतो तेथपर्यत आला.[१२८] माधवरावाने गोपाळरावास शिरहट्टीचा वेढा उठवून येण्यास लिहले होते. त्याचप्रमाणे हैदर कोठे आहे? त्याच्या छावणीचा बंदोबस्त कसा आहे.? त्याची फौज किती आहे इत्यादी बातमी आणण्याचा हुकूम केला होता. त्याचप्रमाणे आठ–नऊ हजार सैन्यानिशी हैदरचा तपास काढीत चालले होते. माधवराव पेशव्यांनी आपल्या सरदारांच्या मदतीने हावेरी जिंकले.[१२९] सावनूरहून आठ–दहा दिवस लोटले नाही. तोच गोपाळरावाकडून

पेशव्यांस निरोप आल्याने ते तुंगभद्रा पार झालेले असतांना त्वरेने परत फिरले. हैदरला ही बातमी समजताच तो झपाटयाने मजल करीत रट्टेहळ्ळी समीप येऊन ठेपला. इतक्यात पटवर्धन व विंचूरकरांची फौज त्याच्या दृष्टीस पडली..मराठयांची एवढी लहानशी फौज पाहून व आयती आपल्याजवळ आली आहे. म्हणून हैदरने विचार केला की, हिला लढाईस गुंतवून हळूहळू आपल्या छावणीकडे ओढीत आणावे आणि एकीकडून आपण व दुसरीकडून मीरफैजुला असे एकदम तुटून पडावे व संबंध फौज कापून काढावी. परंतु गनिमी काव्यात मराठे हे हैदरअलीपेक्षा श्रेष्ठ होते. हे हैदरअलीस मैदानात ओढून आणण्यासाठी आले होते, हे त्यास ठाऊक नव्हते. दोघांची झटापट सुरू झाली आणि हैदर अगदी पक्का फसला. इकडे हैदरअलीस युद्धात गुंतवून गोपाळरावाने मागे रावसाहेब पाच–सहा कोसावर येऊन पोहचले असतांना त्यांना निरोप पाठविला की, 'आम्ही शत्रूस मैदानात आणीत आहोत. तुम्ही लवकर निघून यावे.' हैदरवर मराठयांची फौज तुटून पडण्याचा आव आणीत व तो तोफा मारीत पुढे चालून आला म्हणजे मागे सरकत ,पुन्हा तो मागे हटू लागला म्हणजे जाऊन त्यास बिलगत, असे करता करता बुणगे मागे राहून आपण तीन कोस पुढे मैदानात आलो हे हैदरअलीस कळले सुद्धा नाही.[१३०] गोपाळरावाचा निरोप येताच माधवराव पेशवे हावेरीहून तीन कोस पुढे आले व नंतर दौड करीत सायंकाळच्या चार घटका दिवसास समरांगणांत येऊन दाखल झाले.[१३१]

माधवराव पेशवे इतक्या घाईने आले होते की, त्यांनी फक्त दोनच तोफा बरोबर आणल्या होत्या. त्यांचा शत्रूवर तात्काळ मारा सुरू केला. एका घटकेपूर्वी मराठयांची लहानशी फौज समोर दृष्टीस पडत होती. पण चोहोकडे नजर टाकताच हे घोडेस्वाराचे असंख्य सैन्य आताच कोठून निर्माण झाले .असा हैदरअलीस विचार पडून त्यास भीती वाटली व तो छावणीकडे परत निघाला. शत्रूच्या फौजेने लगट केली म्हणजे उभे राहून तोफांची मारगिरी करावी व त्यास मागे सारावे आणि पुन्हा वाट चालू लागावे अशी त्याने शिस्त धरली होती. ३ मे १७६४ रोजी हैदरअली व मराठे यांच्यात घनघोर लढाईस सुरूवात झाली. यावेळी माधवरावांनी हैदरअलीला चारही बाजूने कोंडीत पकडण्याची योजना आखली होती त्यानुसार, उजव्या बाजूस गोपाळराव पटवर्धन, डावीकडे नारोशंकर, पिछाडीस विंचूरकर व तोंडावर हुजरातेसह स्वतः माधवराव पेशवे व विसाजी कृष्ण बिनीवाले या सारख्या सरदारांच्या मदतीने हैदरवर हल्ले करून शत्रूस चोहोकडून कोंडून धरले. हैदरचे गोलदांज फ्रेंच लोकांनी तयार केले

होते, त्याची दारू फार चांगली होती व तोफा ही लांब पल्ल्याच्या होत्या. परंतु त्याच्या मारगीरीने मरांठयाची फारशी हानी झाली नाही. मराठयांकडे दोनच तोफा होत्या तरी त्यांची गोळे हैदरच्या भरगच्च रांगात जाऊन पडत असल्याने त्याची अतोनात नासाडी झाली.[१३२] तरीही हैदरने आपला बंदोबस्त विस्कळीत होऊ दिला नाही व छावणीकडे जाण्याचा नेट ही सोडला नाही. सूर्यास्ताच्यावेळी शत्रूवर चोहोकडून एकाच वेळी हल्ला करण्याविषयी रावसाहेबांनी हुकूम केला. त्या प्रमाणे हल्लाही झाला परंतु  हैदरच्या सुदैवाने याचवेळी सोसाटयाचा वारा सुटून धुळीचे लोट उठल्यामुळे हल्ला करणाऱ्यास पुढे काही दिसेनासे झाले.याचाच फायदा हैदरला मिळाला व पळून जाण्यात यश मिळाले. मोठया वेगाने त्याने आपली छावणी गाठली. याप्रमाणे ही रट्टेहळ्ळीची लढाई झाली. या हल्ल्यात मराठयांचे पाच ते पन्नास माणसे ठार व जखमी झाले होते व शेवटच्या हल्ल्यात हुजरातीचे शंभर घोडे पडले होते. एकंदरीत फारसे नुकसान नव्हते परंतु हैदरअलीचे मात्र नुकसान फार मोठे झाले होते. हैदरचे १५० सैनिक ठार , ७०० सैनिक जखमी , १२५ घोडी ठार झाली. हैदरची कवायती गारदयांची फौज अस्ताव्यस्त झाली. या लढाई पासून हैदरअलीच्या फौजेस मराठयांची दहशत वाटू लागली.[१३३]

दुसऱ्या दिवशी मराठयांच्या फौजेने हैदरच्या छावणीवर हल्ला केला. मराठयांचा तोफखाना मागे राहिला होता. तो आता येऊन पोहचला होता. त्याचा मारा हैदरच्या लष्करावर करून सारे लष्कर हालवून दिले. वैशाख शुद्ध सप्तमीच्या दिवशी तो छावणी सोडून झाडीत शिरण्याकरिता निघाला असता मराठयांनी त्यास तोफांचा असा मार दिला की, त्यास घाईने पुन्हा छावणीत शिरणे भाग पडले.अष्टमीच्या दिवशी सावनूरकर नबाब व मुराररराव घोरपडे लष्करात येऊन दाखल झाले.मुरारारावांनी विशेष पराक्रम गाजविला म्हणून माधवरावांनी त्यांचा बहुत सन्मान केला. ‘आपले चुलते आजे संताजीराव घोरपडे यांनी असंख्य पराक्रम करून राज्य रक्षण केले असता.राजाराम महाराजांनी नाहक छळ करून त्यास ठार मारले  त्या संताजीरावांचे सेनापतीपद आता तरी मला मिळावे.’असे मुराररावांचे म्हणणे होते. ते मान्य करून माधवरावांनी सातारच्या छत्रपतीस लिहून सेनापती पद मुराररावांच्या नावे केले.[१३४]

### ३.१३.२ हैदरअली झाडीत व त्याची रसद तोडण्यात विसाजीला यश

रट्टेहळ्ळीच्या लढाईपासून हैदरने धडा घेतला व मराठयांची इतकी धास्ती घेतली की, मराठयांसमोर उघड सामना देण्याचे तो टाळू लागला व त्याने दाट झाडीचा आश्रय घेतला.[१३५]

अनवडीस पूर्वी हैदरची छावणी होती तेथून रट्टेहळ्ळीपर्यंत घनदाट झाडी होती. या झाडीस मासूरची बारी म्हणत असत.तेथे जाण्याचा रस्ता फार अडचणीचा होता.या बारीतून अनवडीकडून हैदरच्या लष्करास धान्य व युद्ध सामुग्रीचा पुरवठा होत असे. सावनुरकर व मुरारराव आल्यानंतर पेशव्यांनी ठरविले की, मासूरची बारी रोखून तिकडून शत्रूस मिळणारी रसद खंडीत करावी आणि त्याच्या छावणीस चोहोकडून घेरा घालून तोफांचा मारा देऊन जेरीस आणावे. ही कामगिरी माधवरावाने विसाजीवर सोपविली होती. ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी विसाजी कृष्ण बिनीवाले याने बारीत शिरून तिकडून हैदरची कही (रसद)येत होती. त्यावर छापा घालून सामान लादलेली उंट व तट्टे वळवून आणली.मराठयांच्या या धाडसामुळे हैदरच्या फौजेत अधिकच धास्ती निर्माण झाली. यापुढे या प्रदेशात आपण राहिलो तर आपणास उपाशी मरण्याची पाळी येईल असा विचार करून हैदरने एका रात्री हळूच साऱ्या लष्करासह मासूरची बारी सोडण्याचा विचार अंमलात आणला. बारीमध्ये दाट झाडी होती त्यात शिरला आणि मासूर पासून तीन कोसंवर मायनहळ्ळी येथे आश्रयास गेला.[१३६] हैदर अली छावणी सोडून गेल्यावर दुसऱ्या दिवशी त्याच्या पाठलागावर विंचूरकर, आबा पुरंदरे, बिनीवाले व सखाराम बापू यांची चार पथके बारी ओलांडून मासूरपर्यंत गेली. तेथे झाडी अतिशय दाट असल्याने ते सरदार एका टेकडीवर चढून हैदरचे लष्कर कोठे, कसे राहिले असावे याचा अंदाज काढीत होते. इतक्यात त्याने लपत–छपत भलत्याच वाटेने अकस्मात येऊन त्यावर तुटून पडून त्यास बारीपार हुसकावून लावले.[१३७] त्यावेळेस मराठयांची फौज सतर्क व सावध असल्यामुळे हैदरच्या हल्ल्यातून बचावले व त्यांचे फारसे नुकसान झाले नाही. हैदरअली झाडीत लपलेला पाहून माधवराव पेशव्याने त्यास निरोप पाठविला की, तुझ्या शौर्याच्या व पराक्रमाच्या कैक गोष्टी आम्ही पुण्यास ऐकलेल्या आहेत. त्या जर खऱ्या असतील तर तू भागूबाई सारखा रानात दडून न राहता, मैदानात येऊन आमच्यासी मुकाबला कर त्यातच तुझे शौर्य आणि मर्दुमकी आहे आणि असे जर तू केले नाहीस तर तू खरा सैनिक नसून, तुझ्या पराक्रमाच्या ऐकलेल्या गोष्टी खोटया आहेत असे मी समजेन आणि पुण्यास जाण्या अगोदर तुझ्या छावणीस आनंदाने भेट देईन.[१३८] पेशव्यांचे हे पत्र त्यास मध्यरात्री मिळाले वाचून हैदर हादरला व पेशव्यांच्या ८०,००० सैन्यापुढे आपल्या ४०,००० सैन्याचा टिकाव लागणार नाही. हे जाणून त्याने गुपचूप बारीहून पलायन करून मायेनहळ्ळी या डोंगरातील दाट झाडी

असलेल्या ठिकाणी जाऊन राहिला. ती जागा जंगलात कडेकपारीत असल्याने तेथे घोडेस्वार पोहचू शकत नव्हते आणि मे महिना संपत आल्याने पावसाळा ऋतू जवळ येऊन ठेपला होता. पर्जन्य पडू लागल्याने धान्याची अतिशय महागाई झाली होती. वैरण कोठेही मिळेना,जनावरांना चारा मिळणे दुरापास्त झाले त्यामुळे पेशव्यांना आपल्या लष्करास परत बोलावणे भाग पडले.[१३९]

### ३.१३.३ माधवराव पेशव्यांचा निश्चय व कर्नाटकात छावणी

पावसाळा सुरू झाल्याने यंदा हैदरचे झाले एवढे पारिपत्य बस झाले,म्हणून माधवरावाने आपले लष्कर परत बोलावले होते. पावसाळयात या प्रांतात छावणी करावी की परत पुण्यास जावे हा प्रश्न त्यांना पडला होता. हैदरने २५ ते ३० लाख रूपये खंडणी दिली तर तूर्त तह करून पुण्यास जाण्याचा सुरूवातीस त्यांचा विचार ठरला होता. हैदरअलीस ही आशा होती की, मराठयांचे लष्कर छावणीस या प्रांती राहणार नाही, ते परत जाईल व पुन्हा सारा मुलूख आपलाच होईल. हैदरअली व पेशवे यांच्यामध्ये हे जे युद्ध सुरू झाले होते. तिकडे साऱ्या हिंदुस्थानचे लक्ष लागले होते. हैदरच्या पराक्रमा विषयी व शहाणपणा विषयी आता कोणालाच संशय उरला नव्हता.मराठे लोक हे त्यास भारी आहेत हे ही सर्वांना कबूल होते. परंतु तिसऱ्या पानिपतच्या लढाईपासून त्यांचे दैव फिरले व साम्रांज्य नष्ट झाले.अशीच हिंदुस्थानातील इतर प्रांताच्या लोकांची चुकीची समजूत झाली होती.[१४०] आपल्या राष्ट्राचा जोम अजून पहिल्या प्रमाणेच आहे. हे कार्य लोकांना जाहीर करण्याकरिताच माधवराव पेशव्यांनी पक्का निश्चय केला असावा की, यंदा धारवाडच्या आसपास छावणीस राहावे आणि हैदरची पुरती खोड मोडल्याशिवाय परत जावू नये. हा निश्चय माधवरावाने आपल्या आईस पुढील प्रमाणे कळविला आहे– २४ मे १७६४ मु।। केरूर प्रांत सावनूर नजिक येथे वडीलांचे आशिर्वादे सुखरूप असो. विशेष इकडील वर्तमान हैदरनाईक माईनहळ्ळीस गेला . बाहेर निघून लढाई करण्याचे त्याचे मानस नाही. त्याचे मते चार दिवस झाडीचे आश्रयाने राहावे पुढे हे सहज जातील. यास्तव कुच करून माघारी आलो. पुढे छावणीचा प्रकार धारवाड नजीक होईल. पैक्याचा मोठा पेच व महागाई आहे. छावणी करणे प्राप्त झाले म्हणून तिर्थरूपास लिहून पाठविले आहे...[१४१] आपला निश्चय ठरल्यावर पेशवे कुंदगोळ प्रांत सावनूर पर्यंत आले व तेथे छावणीची व्यवस्था केली.[१४२] तरी सावनूरच्या नबाबाला धास्ती होती की,पावसाळयाात हैदर आपला सूड

घेतल्याशिवाय राहणार नाही.यासाठी माधवरावाने नबाबास राजधानी राखण्याकरिता एक हजार गाड्दी पाठविले व आणखी शिबंदी ठेवण्याकरिता पन्नास हजार रू पये दिले. याशिवाय सावनूरच्या मदतीस जाण्याकरिता गोपाळराव पटवर्धनास दहा कोसावर राहण्याचा हुकूम दिला. इतके केले तरी नबाबास सावनूरास राहण्याची छाती झाली नाही. त्याने फौज सावनूरास पाठविली व आपण पेशव्यांबरोबर राहिला.लक्ष्मेश्वरास नारोशंकर राहिला, विंचुरकर रास्ते व भोसले नवलगुंदास राहिले. धारवाड प्रांती हैदरच्या ताब्यात फक्त धारवाड, बंकापूर व शिरहट्टी हे तीन स्थळे व पटवर्धनांच्या जहागिरीपैकी श्रीमंतगड, येळवंती यासारखी लहान ठाणी राहिली होती. पावसाळा जवळ आला म्हणजे शिलेदार लोक कोणाचे काही एक न ऐकता लष्कर सोडून घरी जायचे, त्याप्रमाणे याही मोहिमेत प्रत्येक पथकातले काही लोक घरी गेले. मुलुखाच्या बंदोबस्ताकरिता १० ते१२ हजार लोक राहिले. माधवराव पेशवे त्यांना बरोबर घेऊन पूर्वेस मुद्गल सरकारात (जिल्हा) व गढवालाकडे खंडणी जमा करण्याकरिता गेले. पावसाळयात सुद्धा एका ठिकाणी बसून त्यांना विश्रांती घेण्यास फुरसत नव्हती.[१४३] यावेळी १८ जून १७६४ रोजी सखाराम बापूने नाना फडणीसास रसद त्वरीत पाठवावी, ऐवजाची ओढ आहे म्हणून पत्र पाठविले होते.[१४४] माधवराव पेशवे गढवाल व मुदगलकडून काही खंडणी वसूल करून २७ जून १७६४ रोजी गजेंद्रगड तालुक्यातील मुरडी मुक्कामी आले.पेशव्याने सावनूरच्या बचावास गोपाळराव पटवर्धनास ठेवले. विसाजी कृष्ण बिनीवाले यांना कर्नाटकात छावणी करण्याचा आदेश दिला. अशाप्रकारे पावासाळयात मराठयांनी कर्नाटकात छावणी केल्याने हैदरअलीचे सर्व मनोरथ धुळीस मिळाले व त्याचा भ्रम निरास झाला.[१४५] या विषयी गोपाळराव पटवर्धनाने नाना फडणीसास पुढीलप्रमाणे पत्र पाठविले आहे, ‘आपण  पत्र मिरजेस पाठविले ते मिळाले.महिना पंधरा दिवस माधवराव पेशव्यांचा मुक्काम हा नवलगुंद तालुक्यात आहे. तेथून दाणा वैरण मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे.तुर्त फौज सावनूरास आहे. हैदरअली हा हनुवटीवर होता.तेथून बिदनूरास गेला म्हणून वर्तमान आहे.[१४६]

### ३.१३.४ सावनूर व हावेरीची लढाई

माधवराव पेशव्यांनी जरी कर्नाटकात छावणी केली असली तरी, मराठयांच्या मुलुखास व सैन्यास चैन पडू दयावयाचा नाही असा हैदरने निश्चय केला होता. सावनूरवर हैदरचा रोष होता. सावनूर पासून तीन कोसावर बंकापूर येथे हैदरचे ठाणे होते. तिथे त्याने ३०००

घोडेस्वार व काही गारदी ठेवले होते. हैदरने लालमिया या सरदारास तोफा पाठवून त्यास हुकूम केला की, तू नेहमी बंकापूरस राहून सावनूरास उपद्रव देत जा. त्यावरून तो मिया स्वार, पायदळ व तोफा घेऊन नित्य सावनूर भोवती घिरटया घालीत, त्या शहरावर तोफा मारी, गुरे वळवून नेई, शहराबाहेर कोणी लोक सापडले तर त्यास लुटून मारून टाकीत असे. त्याने सावनूर व बंकापूर यांच्यामध्ये एक चौकी बसविली होती त्यामुळे सावनूरास धान्य, वैरण व इतर जिन्नस जाण्याचे बंद झाले. तेथील लोकांस उपाशी मरावे किंवा शत्रूच्या स्वाधीन व्हावे याखेरीज मार्ग राहिला नव्हता. ही दुर्दशा श्रीमंतास कळली तेव्हा ते नुकतेच मुदगल सरकारात जाण्याकरीता निघाले होते.[१४७] त्यामुळे पेशव्यांपुढे पेच निर्माण झाला होता. परंतु स्वारीचा कारभार हा सखाराम बापूकडे असल्याने त्या प्रांताची कायम स्वरूपी रक्षणाची उपाय योजना करण्याची गरज होती.कारण तो प्रांत पेशव्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा होता.सखाराम बापूने पेशव्यांना सल्ला दिला की, या कठीण परिस्थितीत गोपाळरावावर एखादी जबाबदारी सोपवावी. त्याने सावनूरास जाण्याचे कबूल केले. वैरणी बद्दल प्रत्येक घोडेस्वारास दररोज चार आणे सावनुरकरांनी दयावे. पंधरा दिवसापर्यंत कसेही झाले तरी आपण सावनूर सांभाळतो, त्यानंतर श्रीमंतानी मोबदला फौज सावनूरास पाठवून दयावी. या गोपाळरावाच्या शर्ती होत्या. माधवराव व सखारामबापूने त्या कबूल केल्या.त्यांच्या फौजेचा तळ यावेळी नवलगुंद येथे होता. वामनराव, नीलकंठराव, कोन्हेरराव, परशुरामभाऊ व नारायणरावासह फक्त १२०० स्वारांसह गोपाळराव पौर्णिमेच्या सुमारास सावनूरास आले.[१४८] तिथे गेल्यावर तिसऱ्याच दिवशी गोपाळराव, निलकंठराव व नारायणराव स्वारांची एक टोळी घेऊन लालमियाच्या चौकीवर चालून गेले व तीनशे स्वार ,गारदी कापून काढून चौकीचा विध्वंस केला. यावेळी बंकापूरच्या स्वारांची व गोपाळरावांची गाठ पडून एक लढाई झाली. त्यात गोपाळरावांनी शत्रूच्या स्वारास बंकापूर पर्यंत पिटाळीत नेले व त्यांचे पुष्कळ घोडे हिसकावून घेतले. पटवर्धनांची फौज दररोज सावनूरातून बाहेर पडे व बंकापूरपर्यंत दौड करून येई आणि शत्रूचे लोक तावडीत सापडले तर त्यास मारून टाकीत असे. यामुळे शत्रूच्या ठाण्यातील लोकांस बाहेर फिरकण्याची हिंमत होईना. धान्याचा व वैरणीचा दुष्काळ पडला. सर्वच प्रकारे लालमियाच्या नाडया आखडल्यामुळे त्याने आपल्या फजितीचे रडगाणे अनवडी येथे छावणी करून राहिलेल्या हैदरअलीस लिहून पाठविले.[१४९]

हैदरने गोपाळरावाचा नाश करण्याचा संकल्प करून १५ हजार गारदी,६ हजार स्वार व काही तोफा घेऊन सावनूर पासून दहा कोसावर हनगल येथे आला.जुलै १७६४ मध्ये एके दिवशी हैदरने सावनूर व बंकापूर यामध्ये एक ओढा होता. तिथे त्याने सैन्याच्या दोन टोळया केल्या व दबा धरून बसविले.पटवर्धनांची फौज दररोज सकाळी सावनूरहून निघून बंकापूरच्या रानात येऊन उभी राहत असे. त्याप्रमाणे ती आज ही येईल व सारी फौज जिवंत धरावी असा हैदरचा कावा होता. पण या काव्याची बातमी गोपाळरावास अगोदरच कळली होती म्हणून गोपाळरावाने फक्त १५० स्वार पाठवून दिले. परंतु ओढयाकडे काही झाले तरी जाऊ नये, टेहळणी करत दुरून फिरत राहावे अशी ताकीद दिली होती. रात्रभर जागून लांब मजल करून आलेला हैदर उपाशी उन्हात सैन्यासह शत्रू आता येईल. घटकेने येईल म्हणून आशेने वाट पाहत ओढयात संध्याकाळपर्यंत बसून, खजिल होऊन बंकापुरास परत गेला. त्या दिवशी त्याच्या जीवास इतका त्रास झाला की, रात्री तो कोणाशी एक शब्द ही बोलला नाही व जेवला नाही. आपण जाळे पसरले त्यात गोपाळराव पटवर्धन सापडले नाहीत. म्हणून हैदरास क्रोध आला होता की, प्राण गेला तरी बेहत्तर, पण सावनूर काबीज करून जमीनदोस्त केल्या शिवाय राहणार नाही असा त्याने निश्चय केला होता व त्याने तयारी चालविली होती.ती पाहताच सावनूरच्या लोकात मोठी भिती उत्पन्न होऊन जो तो पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. गोपाळराव पंधरा दिवासाच्या मुदतीने आला होता परंतु मुदत होऊन गेली तरी मोबदला फौज सोडावयास आली नाही व ठरल्याप्रमाणे पैका ही मिळाला नाही.[१५०]

सर्वच प्रकारे गोपाळरावाची हलाखी होती तरी आपल्या नाव लौकिकास शोभेल असा पराक्रम करून त्याने इतके दिवस टिकाव धरला.सावनूरचे लोक हैदरास घाबरून शहर सोडून जाण्याचा विचार करू लागले.तेव्हा गोपाळराव नबाबाच्या वाडयात सदरेस जाऊन बसला आणि तमाम लोकांस धीर देऊन हैदरच्या फौजेशी सावनूरकरानी झुंजविण्याची तयारी केली त्याने सर्वांना सांगितले की, नबाबाची मुले माणसे येथे आहेत, त्यांची जी गत होईल तीच माझी ही होईल. या संकटात मी तुम्हास सोडून कधी ही जाणार नाही. गोपाळरावाने पेशव्यांस वर्तमान लिहून कळविले होते त्यामुळे पेशव्यांनी शिदनूर येथून नारोशंकर, विंचूरकर व शहाजी भोसले यांना गोपाळरावाच्या मदतीकरीता पाठविले व आपण स्वतः लांब लांब मजली करीत सावनूरास

आले.त्यामुळे सावनूरास वेढा घालण्याचे हैदरअलीने सोडून दिले परंतु बंकापूर ही त्यास असुरक्षित वाटू लागल्याने त्याने जंगलात शिरून अनवडीचा आश्रय घेतला.[१५१]

वर्धा नदीच्या काठी सावनूरकरांचे हावेरी म्हणून लष्क री ठाणे होते. तिथे त्यांचे २०० प्यादे व मराठयांचे चारशे गारदी रखवालीकरिता ठेवले होते.त्या लोकांस हैदरच्या हेरांनी भाद्रपद वदय दशमीच्या दिवशी सायंकाळी शिंदी (दारू) आणून विकली.ती अतिशय स्वस्त मिळाली म्हणून हावेरीकर पखालीच्या पखाली विकत घेऊन पिऊन पहाऱ्यावर झिंगून पडले.[१५२] त्याच रात्री हैदरअली कडील सरदार मीरफैजुला व व्यंकटराव बार्की यांनी पाचहजार स्वार, सातहजार गारदी व सोळा तोफा सह नऊ कोसांची मजल करून पहाटे उजाडता उजाडता हावेरीवर छापा घातला. ठाण्याचे दरवाजे मोकळेच होते. कोणाची झिंग अर्धवट उतरली होती. शत्रू येताच पहारेकऱ्याच्या मुसक्या आवळून गावात प्रवेश केला, तेंव्हा काही लोक पळाले, तर काही गढीत शिरले. शत्रूने पेठ लुटून गढीस तात्काळ मोर्चेबंदी केली. ही बातमी सकाळच्या प्रहरी सावनूरास आली तेव्हा विठ्ठलराव विंचूरकर मोठया हुरूपाने स्वार होऊन निघाले.तो पितृपक्षाचा पंधरवडा असल्याने, पुष्कळ शिलेदारांची 'पितरे' यावयाची होती त्यामुळे विठ्ठलरावाबरोबर त्याच्या पथकातील सर्व लोक निघाले नव्हते.तथापि जितके आले तितके लोक बरोबर घेऊन रास्ते व भोसले यास लवकर निघण्याविषयी सांगून तो अती त्वरेने सावनूरहून निघाला.परंतु शत्रूकडे सैन्य व तोफा अधिक असल्याने थोडीशी चकमक झाल्यानंतर विंचूरकर, लक्ष्मणराव रास्ते व शहाजी भोसले येईपर्यत गावाच्या पाव कोसापर्यंत मागे आले. रास्ते व भोसले वर्धा नदी उतरून हावेरीजवळ येताच नदीला पूर येऊन मराठयांचा परत जाण्याचा मार्ग खुंटला. तेव्हा मराठयांनी शत्रूवर हल्ला केला. परंतु शत्रूने तोफा, बाण यांचा असा भयंकर मारा केला की, मराठयांची पुष्कळ घोडी व माणसे घायाळ होऊन त्यास मागे हटावे लागले. तेव्हा शत्रूने अधिक आवेश व उत्साहाने पुन्हा चाल केली. ही चाल करतांना त्याचा बंदोबस्त काहीसा विस्कळीत झालेला पाहून त्यावर मराठयांनी पुन्हा वेगाने हल्ला केला व तुंबळ युद्ध सुरू झाले. सकाळपासून मराठयांनी नऊ हल्ले केले. मराठयांचा सरदार जरी पतन पावला तरी त्याचे अनुयायी निरूत्साह न होता शौर्याने लढले. मराठयांची फौज सकाळपासून उपाशी व लांबून चालून आलेली होती. शिवाय जोमाने शत्रूशी तिला दोन प्रहर युद्ध करावे लागले होते. यामुळे संध्याकाळी शत्रूचा जोर कमी झाल्यानंतर विश्रांतीसाठी मागे सरली.[१५३] अशावेळी ऐन

समयी गुत्तीचे मुराररराव घोरपडे सैन्यासह मराठयांच्या वाटेस न जाता परत गावात गेले.गढीत मोर्चे बसले.[१५४] रात्रभर दोन्ही फौजा जवळजवळच होत्या. हैदरच्या सरदारांच्या मनात हावेरी घेऊन पुढे धारवाडच्या कुमकेस जावे असे होते. परंतु या एकाच लढाईने त्यांचा उत्साह भग्न होऊन ते गढी रिकामी टाकून सर्व फौजेसह परत गेले आणि मराठे सरदार ही नदीचे पाणी उतरताच सावनुरास आले. या लढाईत ध्यानात ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे, सत्तर वर्षाचा म्हातारा सरदार विठ्ठलराव विंचूरकर दहा कोसाची दौड करून दोन प्रहरपर्यंत निकराची लढाई लढला व त्यास त्याच दिवशी एकादशीचा उपवास होता त्यास सायंकाळपर्यंत पाणी ही मिळाले नव्हते.[१५५]

### ३.१३.५ धारवाडचा वेढा व जडीहनवटीची लढाई

माधवराव पेशवे मुदगल सरकारात असताना हैदरअली हा हनगल येथे होता. यावेळी पेशव्याने नाना फडणीसाकडे रसदेची मागणी केली होती,त्यामुळे स्वतः नाना फडणीस श्रीमंताना गजेंद्रगडाजवळ भेटले तिथे पेशव्यांचा मुक्काम हा आठ ते पंधरा दिवस होता.[१५६] त्यानंतर माधवराव पेशवे सावनूरला आल्यानंतर त्यांच्याकडे हैदरअलीने शामराव गोपाळ हा आपला वकील पाठविला. त्याने महादशेट वीरकर याच्यामार्फत श्रीमंताची भेट घेऊन तहाचे बोलणे लावले. हे बोलणे दीड महिन्यापर्यंत चालले होते परंतु त्यापासून काहीच निष्पन्न झाले नाही. पेशव्यांचा घेतलेला मुलूख किंवा त्यास खंडणी देऊन त्यांचे वर्चस्व कबूल करण्यास हैदरअली तयार नव्हता. त्याची लढाईची खुमखुमी अजून जिरली नव्हती व तह ठरत नाही म्हणून माधवरावाने धारवाडला वेढा घालण्याचा निर्णय घेतला.[१५७] तत्पूर्वी २५ ऑगस्ट १७६४ रोजी पेशव्यांनी मराठयांचे आरमार प्रमुख जानेजी धुळप यास पत्र पाठवून त्यास कोकण पट्टीतील हैदरने सोंधे, बिदनूर ही ठाणे घेतली आहे. ती काबीज करून हे प्रांत सरकारच्या अंमलात आणावे अशी ताकीद दिली आहे व या मसलतीसाठी तुम्ही फिरंगी व सावंत एकत्र येऊन जलमार्ग व खुष्कीच्या मार्गाने जिकडून साधेल तिकडून प्रांत सर करणे अशी आज्ञा केली आहे.सरकारी कामकाज झाल्यावर तुमचे मनोदयानुरूप उर्जित केले जाईल. कित्येक साहित्याविषयी विसाजी कृष्ण याने आज्ञा केली आहे. साहित्य व तालुक्याचे दोन हजार लोक दिले आहे. मसलतीस खर्च लागेल तो सरकारतून राजश्री मुराररराव घोरपडे यांच्या विदयमाने करीत जाणे.त्याप्रमाणे धुळपाने येऊन हैदरअलीस हैराण केले.[१५८] त्यामुळे धारवाडच्या

उदयोगास पेशव्यांना जोर आला. धारवाडचा किल्ला हा मजबूत असून तो हैदरअलीच्या कब्जात असल्याने पेशव्यास पुढील मुलखाावर चढाई करता येत नव्हती म्हणून कसे ही करून ते ठाणे काबीज करण्याचे पेशव्याने ठरविले. तेथे मीर फैजुलाचा भाऊ फाजल अलीखान मोठया शिताफीने टिकाव धरून होता. सप्टेंबर१७६४ च्या आरंभीच पेशव्यांनी धारवाडच्या किल्ल्यास वेढा घातला.[१५९] यावेळी दक्षिणेच्या राजकारणामध्ये दोन्ही पक्ष परकीय सत्तेची मदत घेण्याचा प्रयत्न करीत होते. हैदरअली हा निजामअलीशी मैत्रीचा प्रयत्न करीत होता. तर रघुनाथराव हा निजामअलीशी मैत्रीचे पत्रे लिहून माणसे आणि शस्त्रास्त्रे यांची कुमक मागत होता.[१६०]माधवराव पेशव्यांनी ही मद्रास संचालक मंडळास मदतीसाठी पत्र पाठविले आणि त्यात विनंती केली की, अर्काटच्या नबाबाला त्यांनी भरभक्कम मदत करावी. कारण तो हैदरअलीस घाबरलेला असून त्याहीपेक्षा मराठयांचा त्याने जास्त धसका घेतला आहे.मद्रास कौन्सिलने युद्धाचा खर्च नबाब देऊ शकत नाही व कंपनी युद्धात मग्न आहे आणि कंपनीस त्या प्रांतात नबाबाची शांतता हवी होती. माधवराव पेशव्यांनी मद्रास कौन्सिलची मदत मागितली होती परंतु ब्रिटिशांनी ती मात्र अति सभ्यतेने नाकारली.[१६१] परंतु मुंबई कौन्सिलने मात्र माधवरावास काही तोफा, बंदुका आणि दारूगोळा पुरविला होता.[१६२] यावेळी नाशिक येथे असलेला रघुनाथराव हा स्वार्थी लोकांच्या नादी लागून गृह कलहासाठी बंड करतील. त्यामुळे मराठी राज्याची राखरांगोळी होईल अशी पहिली भिती माधवरावास वाटत होती तर स्वारीत बोलवावे तर ते हैदरअलीकडे फितूर होऊन साऱ्या मोहिमेची मसलत नासून टाकतील असी दुसरी भीती होती. माधवरावांना दुसरी भीती पत्करणे योग्य वाटले म्हणून त्यांनी रघुनाथरावास लिहून पाठविले की, आपण फौजेची तरतूद करून पावसाळा संपताच या प्रांती यावे व ही मोहिम शेवटास नेण्याचे यश घ्यावे.पेशव्यांच्या घरामध्ये गृहकलह होता. हे लक्षात न घेता ग्रँट डफ लिहतो की, रघुनाथरावास बोलावून घेऊन त्यांच्यावर मोहिमेचा सर्व भार पेशव्यांनी टाकला ती राजनीतीच्या दृष्टीने मोठी चूक केली.[१६३] परंतु मला हे डफचे विधान योग्य वाटत नाही कारण त्यांनी मोठा अनर्थाचा प्रसंग टाळून लहान अनर्थ पत्करून शहाणपणाचे राजकारण केले असे वाटते. रावसाहेबांचे बोलावणे येताच रघुनाथराव फौज जमविण्याच्या उदयोगास लागले.

इकडे सप्टेंबर१७६४ मध्ये माधवरावांनी धारवाड किल्ल्यास वेढा दिला होता. जवळपास दोन महिने किल्ल्याला वेढा होता. यावेळी सखाराम भगवंतने नाना फडणिसास

२२सप्टेंबर १७६४ रोजी पत्र पाठवून लिहीले होते की, ऐवजाचा झाडा श्रीमंताकडे पाठविला तो त्यांनी अक्षरशः वाचून पाहिला.तुम्ही तेथे असता ऐवजाची काळजी करावी असे नाही. जी कष्टे होईल ती कराल यात संशय नाही. श्रीमंत या प्रांती आहे, तोपर्यंत करार करून टाकावे. इकडील वर्तमान धारवाडास मोर्चे लागले आहे, लवकरच कार्य सिद्धीस होईल. सर्व कारभार यंदाचा उत्तम झाला. कोठे कोठे काही कसर वोढीमुळे मात्र वाटते. आठ–पंधरा दिवसात निकाल होईल अशा आशयाचे पत्र पाठविले आहे .[१६४] माधवराव पेशव्यांनी धारवाडला वेढा दिला असताना नाना फडणीसाने त्यांना मदत केली होती हे त्यांच्याच पुढील पत्रावरून दिसून येते. 'श्री राजश्री या विराजित राजमान्य राजश्री, बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी. पोा माधवराव बलाल प्रधान नाा विाा उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिाा जाणे विशेष. तुम्ही दारूगोळयाच्या दोन रवानग्या केल्या, त्यास दारूगोळा लष्करात येऊन खर्च झाला. इकडे दारू चांगली मिळत नाही याजकरिता पुण्यात जी दारू तयार असेल ती पत्र पाठवताच भाडयाचे बैल करून धारवाडास पाठविणे व बाण पुण्यात तोफखान्यात तयार असतील ते झाडून पाठवणे. इकडे दारूगोळा मिळत नाही ,लढाईचे दिवस याकरिता जसजसी जमा होत जाईल ,तसतसी रवानगी करीत जाणे.बहुत काय लिहणे ही विनंती.' हे पत्र १५ नोव्हेंबर १७६४ चे आहे. यावरून नाना फडणीसाने दोनदा दारूगोळा पाठविला होता परंतु आणखी दारूगोळा व बाणाची मागणी माधवरावाने केली आहे.[१६५] तसेच धारवाडच्या वेढयामध्ये हरी परशराम सोमण यास बुधवारी रात्री मस्तकी गोळी लागून तो ठार झाला. त्यांचे घर पुण्यात आहे. मोठा मर्द माणूस व चाकरीची हाऊस मोठी होती .कामास आला तरी आपण जावून त्यांचे बहुत प्रकारे समाधान करून विवेकाच्या गोष्टी सांगून त्यांचे कुंटुबाचे दुःख दूर करून सांत्वन करावे व श्रीमंतानी खर्चास दिले आहे. त्याप्रमाणे आज्ञा करावी म्हणून हरी बल्लाळने नाना फडणीसाला पत्र लिहले आहे.त्याप्रमाणे नाना फडणीसाने जाऊन सोमण कुटुंबियांचे सात्वंन केले होते.[१६६] त्याचबरोबर धारवाडच्या वेढयामध्ये निकराची लढाई सुरू असताना भाद्रपद सप्तमीच्या दिवशी एक मोठी लढाई झाली. यात नारो कोन्हेर एकबोटे नावाच्या एकांडया शिलेदाराने पराक्रम केल्यामुळे माधवराव पेशव्यांनी त्यास पालखीची वस्त्रे दिली.

दोन महिन्यापर्यत धारवाडकरांनी किल्ला झुंजविला परंतु शेवटी त्यांचे प्रयत्न व्यर्थ होऊन ते जेरीस आले. रावसाहेबांनी सुरुंग खोदून आत दारूचे बुधले भरून त्यास बत्ती देऊन

किल्ल्याचे दोन बुरूज उडविले. तिसऱ्या बुरूजाची ही तीच दशा करणार, तो किल्लेदार फाजल अलीखान भयभीत होऊन कौलास आला.त्याने गोपाळराव पटवर्धनाच्या विदयमाने किल्ला हवाली करण्याचे कबूल केले.[१६७]या संघर्षामध्ये फाजल अलीखानच्या मदतीला हैदरने मीरफैजुला यास दोन हजार फौज ,गारदी,प्यादे,पाच सात हजार बंदुकधारी पाठविले होते. परंतु गोपाळराव पटवर्धन, आनंदराव रास्ते, शहाजी भोसले, विसाजी कृष्ण बिनीवाले, मुराररराव घोरपडे व आणखी पथके मिळून मजबूती चांगली केली. सावनूरहून हैदरची मदत धारवाडास येऊ दिली नाही. त्यामुळे किल्लेकरांनी कौल घेतला. धारवाडचा किल्ला कार्तिक शुद्ध त्रयोदशीच्या दिवशी फत्ते होऊन सरकारचे निशाण लागले.मीर फैजुला व लोकही किल्ल्यातून बाहेर आले.फाजल अलीला सन्मानाने मीर फैजुलाकडे पोहचते करून दिले व ६ नोव्हेंबर १७६४ रोजी मराठयांनी किल्ला ताब्यात घेतला.[१६८] याची माहिती माधवराव पेशव्यांनी पत्र पाठवून आरमार प्रमुख जानोजी धुळप यास धारवाड किल्ला घेतल्याचे वर्तमान सांगितले असून तुम्ही आरामाराची तयारी करून स्वारीस निघाले असेल तर तुम्ही कोठे आहेत. सोंधे व बिदनूर तालुक्यात कधी येणार ते सविस्तर कळविणे म्हणून लिहले होते.[१६९]

### ३.१३.६ अनवडीची लढाई

धारवाड काबीज केल्यावर माधवराव पेशवे तेथील बंदोबस्त करून १३ नोव्हेंबर १७६४ रोजी मिश्रीकोट या ठिकाणी पोहचले.तेथे काही दिवस मुक्काम झाले. या काळात त्यांनी तुंगभद्रेच्या अलिकडील हैदरने घेतलेली जी ठाणी होती.ती सर्व हस्तगत करण्यात आली. एक बंकापूर ठाणे मात्र हैदरकडे राहिले होते. मिश्रीकोटच्या मुक्कामीच हैदरने तहाची बोलणी सुरू केली पण काही निष्पन्न झाले नाही.[१७०] त्यामुळे रावसाहेब मिश्रीकोटहून निघून बंकापूर घेण्याचा त्यांचा बेत होता. परंतू तो तहकूब करून अनवडीस नोव्हेंबर १७६४ मध्ये हैदर छावणी करून राहिला होता. त्याचे आधी पारिपत्य करावे असे सर्व सरदारांचे मत पडल्यावरून माधवराव पेशव्यांनी तिकडे कुच केले. पावसाळा संपल्यानंतर केव्हा तरी आपणास त्या जंगलात जाऊन हैदरशी गाठ घ्यावी लागेल.म्हणून त्यांनी गाड्दी व तोफा जमविण्यास सुरूवात केली होती.[१७१] नाना फडणीसाने ही पुण्याहून शिसे, दारू व गोळे पाठविले होते. एकंदरीत चारशे साठ बैल दारू गोळी मिरजेहून धारवाडकडे गेली होती. बाण तयार होतील ते पाठवून देणे. गोळे व शिसे यांची तरतूद येथे आहे.दारू व बाण मिळत नाही. याकरिता लिहिले प्रमाणे

रवाना करणे म्हणून माधवराव पेशव्यांनी नाना फडणीसास पत्र पाठविले होते.[१७२] त्यानुसार नाना फडणीसाने या मोहिमेत माधवरावास मदत केली होती.

अनवडीस जात असतानाच मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थीच्या दिवशी हनगळास हैदरचे ठाणे होते.ते तोफा लावून त्याच दिवशी माधवरावांने सायंकाळी काबीज केले.दुसऱ्या दिवशी तेथेच त्यांचा मुक्काम झाला.नंतर माधवराव वर्धा नदीच्या काठी अलीकडे एक कोस हैदरची चौकी होती. मराठयांच्या लष्करामध्ये आघाडीला विंचूरकर व पटवर्धन होते.त्यांनी नदी पार जाऊन त्या चौकीवर हल्ला करून ती उधळून लावली व शत्रूचे पाऊणशे घोडे हिसकावून घेतले. तिथून हैदरची छावणी साडेतीन कोसावर होती .तिच्या दोन्ही बाजूस घनदाट जंगल होते.[१७३] माधवरावांनी हैदरच्या छावणीचा उत्तम बंदोबस्त केला होता. हैदरची छावणीची टेहळणी करण्याकरिता माधवराव पेशव्यांने पटवर्धन व विंचूरकर यांना सांगितले .छावणीच्या पूर्वेकडे नारोशंकर ,रास्ते व भोसले यांना पाठवले तर पश्चिमेस मुराराव घोरपडे यांना पाठवून दिले. पूर्वेकडे पटवर्धनांनी एक टेकडी पाहून ठेवली, तिथून हैदरची छावणी चांगली दिसत होती व तोफांचा मारा ही लागू होणार होता. ती जागा सखाराम बापूने जाऊन पसंत केली. माधवराव पेशव्यांने १६ नोव्हेंबर १७६४ रोजी अनवडीस छावणी केली होती. त्याच रात्री हैदर कडील लोकांनी लष्करावर बाण सोडले परंतू लष्कर सावध असल्याने मराठयांचे फारसे नुकसान झाले नाही. इतक्या रात्री विंचूरकर पटवर्धन व रास्ते आपल्या पथकासह नदीपार गेले. तेव्हा शत्रूचे लोक पळून गेले.[१७४]

दुसऱ्या दिवशी स्वतः माधवराव पेशवे तोफा घेऊन टेकडीच्या पायथ्याशी येऊन टेकडीवर तोफा चढविल्या.हैदर जंगलातून येईल म्हणून जंगलाच्या तोंडावर विंचूरकर, पटवर्धन व मुराराव घोरपडे यास ठेवले व स्वतः तोफांचा मारा सुरू केला. यामुळे शत्रूची अतोनात नासाडी झाली.तोफांचा मारा अगदी सोसवेनासा झाला.तेव्हा हैदरने आपल्या लोकांची हिंमत वाढवावी, शत्रूवर छाप पाडवी, आपला संहार करणाऱ्या मराठयांच्या तोफा हिसकावून घ्यावात असे त्याला वाटू लागले. त्याने आपल्या लष्कराचे दोन भाग केले. एकाचे नेतृत्त्व मीर फैजुलाकडे तर दुसऱ्याचे नेतृत्व स्वतःकडे घेतले.छावणीच्या रक्षणास त्याने मीर फैजुला यास ठेवल व तो झाडीतून एकदम गारदी, स्वार व तोफखाना घेऊन बाहेर आला आणि मराठयांवर तोफांची सरबत्ती करू लागला. गारदयांची पलटने ही त्वरेने उभी राहिली. त्यांनी ही बंदुकीचा

मारा भयंकर केला.हा सर्व मारा झाडीच्या तोंडावर उभा असलेल्या मुराररराव घोरपडे याजवर पडला.त्याच्या मदतीस विंचूरकर व पटवर्धन होते त्यांनी शत्रूवर हल्ले केले परंतू त्याच्या आगीच्या माऱ्यापुढे त्यांचे काहीच चालेनासे झाले.त्यांची फौज पळून गेली तरी पण मुराररराव घोरपडे त्याच जागेवर ठासून उभा राहिला होता. हैदरच्या गारदयाप्रमाणे मुराररावाचे गारदी उत्तम होते, परंतु थोडे होते. शत्रूच्या तोफांचा व गारदयाचा मारा एकटया मुराररावावर पडला तरी तितका मारा सोसून तो हैदरशी झुंजतच होता. या लढाईचे सर्व वर्तमान रावसाहेब टेकडीच्या पायथ्याशी होते. त्यास कळताच ते त्याच क्षणी घोडयावर स्वार होऊन हुजरातेसह धावून आले व मारामार करीत शत्रूच्या व्युहात शिरले व गारदयांची कत्तल करण्यास सुरूवात केली. तितक्यात मुराराराव घोरपडे, विंचूरकर व पटवर्धन यांनी ही एकदम हल्ला केला त्यामुळे हैदरअली फौजेसह पळून गेला.[१७५] त्यावेळी हैदरचे हजार बाराशे गारदी व पाच-सहाशे स्वार जागीच ठार झाले तर दोन हजारापर्यंत गारदी जखमी झाले होते.काही थोडे लोक मोठया कष्टाने जीव वाचून पळून गेले त्यात हैदरही होता. मराठयांनी झाडीत शिरून त्याचा पाठलाग केला आणि त्याच्या पाच तोफा, तीन हजार बंदुका व सातशे घोडे अशी लूट मिळवून आणली.[१७६] विठ्ठल शिवदेव विंचूरकर हे ऋग्वेदी ब्राह्मण असून त्यांचे उपानम दाणी असे होते.मराठयांच्या इतिहासात एक शूर सेनानी व मुत्सद्दी म्हणून त्यांची ख्याती होती. हे मुळचे राहणारे सासवडचे होते.शाहूच्या काळापासून त्यांना दहा हजाराची मनसब मिळाली होती. नानासाहेबांच्या सावनूरच्या मोहिमेत त्यांनी उत्तम कामगिरी बजावली होती.याही वेळी माधवराव पेशव्यांने त्यांना १६,८५,००० चा सरंजाम दिलेला होता.अनवडीच्या लढाईमध्ये हैदरअलीला चांगलीच झुंज देऊन त्यांनी चांगला पराक्रम गाजविला होता.[१७६.१]

यानंतर माधवराव पेशवे व हैदरअली यांच्यात काही चकमकी झाल्या परंतु १ डिसेंबर १७६४ रोजी जडीहनवटीला एक निर्णायक लढाई झाली.या लढाईत पेशव्यांनी दोन-तीन दिवस हैदरच्या सैन्यावर गोळाबारी केली.तेव्हा हैदरचे पाच-सहा हजार गारदी व पाच सात तोफा घेऊन चालून आले.तेव्हा मुराररराव घोरपडयांनी मार दिला व श्रीमतांनी ही खाजगी हुजरात सह मारगिरी केली. शत्रूकडील हजार-दीड हजार गारदी ठार झाले. हैदरअलीस जरब भारी बसली,मोठी फत्ते झाली. रावसाहेबांच्या पराक्रमाचा व कर्तृत्वाचा या दिवसापासून त्यावर इतका काही दरारा बसला की, कितीही सैन्य समागमे असले तरी ,त्याने म्हणून ते स्वतः ज्या फौजेत

असतील त्या फौजेशी झुंजण्याचे धाडस केले नाही व त्यांच्या लष्करापासून वीस पंचवीस कोसांच्या टापूत यापुढे कधीही तो फिरकला नाही.[१७७] ही लढाई झाल्यावर दुसरे दिवशी रावसाहेब सारे लष्करासह अनवडीस आले.तिथे हैदरची छावणी एका टेकडीच्या पायथ्याशी होती.टेकडीवर बातेऱ्या बांधून त्यावर तोफा ठेवल्या होत्या.छावणी भोवती भितांड बांधून खंदकही तयार केला होता.छावणीच्या तीनही बाजूस गर्द झाडी पसरली होती.तर उत्तरेकडील एक मार्ग दळणवळणासाठी त्याने मोकळा ठेवला होता.पण या मार्गावर एक ओढा होता.अशी बिकट जागा छावणीसाठी हैदरने उपयोगात आणली होती.मराठयांनी जर या छावणीवर हल्ला केला असता तर मराठयांचे अतिशय नुकसान झाले असते. हैदरअलीचा कायमचा बंदोबस्त कसा करावा याकरिता मराठा सरदारांमध्ये विचार विनिमय झाला.[१७८] कर्नाटकात विसाजी कृष्ण बिनीवाले व गोपाळराव पटवर्धन अनेक वर्षापासून गुंतले असल्याने त्यांचा सल्ला मोलाचा ठरणार होता.त्यानुसार हैदरअलीचा मुक्काम असलेल्या स्थळा भोवतालच्या प्रदेशाची नासधूस करून त्याची रसद पाणी तोडावी. हैदरच्या जाण्या–येण्याच्या वाटा व रसद पाणी पोहचविण्याच्या वाटेत झाडे तोडून व ती वेडीवाकडी सारून बंद करावी असा सल्ला माधवरावास विसाजी, गोपाळराव या सरदारांनी दिला होता.[१७९] या अनुभवी मराठा सरदारांच्या सल्ल्यानुसार असे ठरले की, हैदरला त्याच्या छावणीतच कोंडून उपासमारीने जेरीस आणण्याचा प्रयत्न करावा सर्व प्रथम मराठयांनी बिदनूरकडून मिळणारी रसद बंद केली व त्याने पळून जाऊ नये म्हणून झाडी तोडून रस्त्यात आडवी तिडवी पाडून वाटा बंद करण्यास सुरूवात केली. हे पाहून हैदर फारच घाबरला व त्याने मराठयांचा डाव ओळखला. तो तोफा, पायदळ, स्वार, बाजार बुणगे व डेरे राहुटया वगैरे सर्व सामान घेऊन बिदनूरकडे जानेवारी मध्ये पळाला. तथापि या पळण्यात हैदरअलीचे अतोनात नुकसान झाले. त्याचे सर्व युद्ध साहित्य, घोडे, खजिना, विसाजीच्या नेतृत्त्वाखाली असलेल्या मराठा फौजेने लुटला.[१८०] मराठयांचा हा हैदरवरील मोठा विजय होता.

धारवाडचा किल्ला घेल्याचे वर्तमान माधवराव पेशव्यांनी जानोजी धुळप यास सांगितले होते तसेच तुम्ही आरमारी तयारी करून कधी सोंधे व बिदनूर तालुक्यात येणार याविषयी आज्ञा केली होती.[१८१] व त्यानंतर अनवडीच्या लढाईत मराठयांचा हैदरवर मोठा विजय झाला व तो बिदनूरला पळून गेला. यावेळी पेशव्यांच्या आज्ञेवरून त्यांच्या आरमारातील सरदार रूद्राजीराव धुळप हा दोन तीनशे मचवे व काही मोठी लढाऊ जहाजे घेऊन होनावरच्या बंदरास

आला. त्याच्याजवळ आठ–दहा हजार पायदळही होते.ते जमिनीवर उतरून त्याने होनावरचा किल्ला व बंदर आणि भोवतालची ठाणी काबीज केली. होनावरच्या बंदरातच, हैदरचेही आरमार होते परंतु त्याचे मराठयांच्या आरमारापुढे काहीही चालले नाही. धुळपास बिदनूरकर व सोंधेकर आणि नायनार लोक तत्काळ मिळाले. त्यामुळे त्या प्रांती मराठयांचा अमंल बसत चालला व हैदरचा अमंल उठत चालला अशा बिकट प्रसंगी हैदरने आपल्या सरदारास मीर फैजुलास ताबडतोब बिदनूरास बोलावून घेतले.परिणामी सोंधेकरांनी आपले सर्व राज्य पुन्हा जिंकूण घेतले.[१८२] म्हणजेच मराठयांच्या आरमाराने हैदरच्या आरमारास चांगला शह दिला होता. या आरमारी लढाईत मराठयांनी हैदरचा पराभव केला होता त्यामुळेच मराठयांचा त्या प्रांती जम बसला असे दिसून येते.

## ३.१४ रघुनाथरावची भूमिका व अनंतपूरचा तह

मराठयांच्या आक्रमक धोरणाने व पराक्रमाने हैदरअली त्रस्त झाला होता.त्याला त्याचे भवितव्य धोक्यात वाटू लागले. अशावेळी त्याच्या सुदैवाने नियती त्याच्या मदतीला रघुनाथरावाच्या मदतीने धावून आली ,असे म्हटले पाहिजे.कर्नाटकच्या स्वारीत निघताना माधवरावाने त्यास आपल्या बरोबर येण्याचा आग्रह धरला होता.परंतु रघुनाथरावाने तो अमान्य करून नाशिक मधील चावंडस गावी वाडा बांधून राहिला होता.माधवरावाने गोविंद शिवराम खाजगीवाले व त्रिंबकराव पेठे या दोघांना दादाजवळ ठेवले होते.आपण कर्नाटकात गेल्यावर रघुनाथरावाने आपल्याविरूद्ध कोणतीही कारस्थाने करू नये. म्हणून माधवरावाने पुण्याची व्यवस्था आपल्या गैरहजेरीत पहावी, असा प्रस्ताव मांडला होता. त्याला रघुनाथरावाने समंती ही दिली होती.पण मनातून मात्र त्याची महत्त्वाकांक्षा त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. पेशव्यांच्या गैरहजेरीत पुरंदरावर कोळयांचे (सैनिकाचे) बंड झाले. याचे निमित्त हाती धरून रघुनाथरावाने पेशव्यांवर आरोप करणे सुरू केले.तेव्हा यावर उपाय म्हणून माधवरावाने रघुनाथरावास ताबडतोब कर्नाटकात बोलवून घेण्याचे ठरविले. हैदरअलीचा पेच निवारण्यासाठी तुमची गरज आहे असे त्यास भासविले.[१८३]

माधवराव आपल्या चुलत्यास (राघोबास) गोड पत्रे लिहून स्वारीची हकीकत कळवीत असे व सल्ला मसलत विचारत असे.निजाम, भोसले इत्यादी व पुण्याचे व्यवहार दादाच पहात असे.'दादा प्रस्तुत कोठे आहेत,मर्जी कशी आहे. बोलण्यात भाव काय आहे, इकडील वर्तमाने

तिकडे काय येतात. पुरंदरे वैगेरे तिकडे काय, मातोश्री व मामा यांच्या बोलण्याचा प्रकार काय झाला? अशा अनेक गोष्टीचा तपास माधवराव सारखा करीत असे. युद्धाचा व राज्याचा कारभार सांभाळून दादाच्या वृत्तीला बहकूं न देणे हे विलक्षण जोखीम त्यांना सारखे बोचत असे.[१८४] म्हणून माधवरावाने त्यास मुद्दामहून आपल्या जवळ कर्नाटकात बोलावून घेतले. सन १७६४ चा दसरा होताच रघुनाथराव कर्नाटकात येण्याकरिता नाशिकहून निघाले. त्यांनी तोफा, काही करोल म्हणजे बंदुकवाले व सुमारे पाच-सात हजाराचा सरंजाम(फौज)जमवली होती. नाशिकहून टोक्यास व तेथून पैठणास गेले.त्यांच्याबरोबर पेशव्यांचे कनिष्ठ बंधू नारायणराव, बाबूजी नाईक बारामतीकर व आबा पुरंदरे होते.कृष्णेवर पोहचल्यावर बाबूजी नाईक परत आला. गायकवाड व भोसले नागपूरकर यास रघुनाथरावाने बोलावले होते.परंतु भोसल्यांचे येणे झाले नाही व दमाजी गायकवाडाने स्वतः न येता आपला मुलगा सयाजी गायकवाड यास फौज बरोबर देऊन पाठविले होते.[१८५]

रघुनाथराव पैठणहून निघाले ते सीना नदीच्या तीरास येऊन त्याच नदीच्या काठाने काही मजली चालून आले. नंतर त्यांनी पानगावाकडे जाऊन निंबाळकरांच्या जहागिरीतून घासदाणा म्हणून पावणे तीन लक्ष रूपये खंडणी घेतली.पिराजी नाईक निंबाळकर यास स्वारीबरोबर घेतले. पानगावाहून थेट पश्चिमेचा रोख धरून नरसिंगपूर, पंढरपूर, सांगोले व नाझरे या गावावरून ते मिरज प्रांती आले. मिरजेकडे न येता हे दक्षिणेकडे रामतीर्थास गेले व तेथून त्यांनी तुंगभद्रेचा रस्ता धरला.तथापि लष्कराच्या उपद्रवापासून अजिबात मुक्त होण्याचे मिरज प्रांतीच्या लोकांचे यंदाही सुदैव नव्हते. दादासाहेबांचा तोफखाना घेऊन महिपतराव पानशे फलटण, विटे, भाळवणी या वाटेने मिरजेवरून गेला.त्याने जाताना लोकांस उपद्रव दिला.मागून सयाजी गायकवाडाची स्वारी लष्करासह याच वाटेने गेली.तिनेही या प्रांतातील लोकांस उपद्रव दिला.[१८६] रघुनाथरावाने पंढरपूरच्या मुक्कामाहून गोविंद शिवराम खासगीवाले यास माधवरावाकडे पाठविले होते. खासगीवाल्याबरोबर रघुनाथरावाने ज्या शर्ती सांगून पाठविल्या होत्या त्या माधवरावाने कबूल केल्या व मोहिमेचा सर्व कारभार ते येताच त्यांच्या हवाली करण्याचे कबूल केले होते. हैदर बिदनूरला पळून गेल्यानंतर त्याने सैन्याची पुन्हा जमवाजमव सुरू केली होती. म्हणून रघुनाथराव येईपर्यंत माधवरावांनी हैदरशी संघर्ष चालूच ठेवला होता. यावेळी माधवरावाने हैदरच्या ताब्यातील होनहळ्ळीचे मजबूत ठाणे काबीज केले. या ठिकाणी हैदरचे रोहिले, पठाण,

हबशी व गारदी मिळून साडेतीन हजार माणसे होती. त्या ठाण्यास रावसाहेबांची मोर्चे लावले तेव्हा हैदर बिदनूरहून मदत करण्याकरिता निघाला व सहा कोसापर्यंत आला ही परंतु पुढे येण्याची त्याची हिमंत झाली नाही. हैदरच्या देखतच किल्ल्यावर जरब बसून माधवरावांनी हे ठाणे घेतले. रघुनाथराव येईपर्यंत हैदरशी चालू असलेले युद्ध तहकूब करून त्यांनी संस्थानिकांच्या मुलखात खंडणी घेण्याकरिता कुच केले. हरपनहळ्ळी, चित्रदुर्ग, रायदुर्ग व बल्लारीच्या संस्थानिकांनी खंडणी देण्याचे कबूल केले.[१८७] २७ जानेवारी १७६४ रोजी रघुानथराव, नारायणरावासह थोरल्या लष्करास येऊन मिळाले. हरपनहळ्ळी या ठिकाणी चुलत्या–पुतण्याच्या भेटी झाल्या.[१८८] दुसऱ्या दिवशी हरपनहळ्ळीस लष्कर पोहचले तेव्हा संस्थानिकांचे वकील हजर होऊन खंडण्या ठरल्या. त्यात हरपनहळ्ळी संस्थानिकाकडून साडेतीन लाख रूपये, चित्रदुर्ग संस्थानिकाकडून साडे नऊ लक्ष रूपये देण्याचे गोपाळराव पटवर्धनाच्या मार्फत कबूल केले. रक्कमेच्या वसुलीची व्यवस्था महादशेट वीरकर याजकडे सोपविण्यात आली. रायदुर्ग व बल्लारी येथील संस्थानिकांचा खंडणीचा ठराव ही याच प्रसंगी झाला.[१८९] हैदरशी तह तीस लक्षावर होत होता परंतु त्याने ऐकले नाही. म्हणून त्याचे पुरे पारिपत्य करण्यासाठी बिदनूरवर चालून जाण्याची मसलत ठरली. त्यानंतर मराठयांनी हरपहळ्ळीचे ठाणे गोळीचा आवाज न होता जिंकून घेतले.तिथून सहा कोसावर अनंतपूर होते. तिथे मीर फैजुला सैन्यासह होता. श्रीमंत उदया कुच करून अनंतपूरास जाणार हे ठाणे घेतल्यावर किल्ला बळकवणार असे दिसते.श्रीमंताची फत्ते दिसते.हरपनहळ्ळी, चित्रदुर्गच्या खंडणीचा ऐवज आला व तो रोजमुऱ्यावर खर्च ही झाला. फौजेस वीस–पंचवीस दिवसांनी रोजमुरा मिळाला.अशा प्रकारे पत्र बाजी गोविंदाने धोंडाजी संभाजी जासूद याच्याबरोबर पुण्यास २८ फेब्रुवारी १७६५ रोजी पाठविले होते.[१९०]

माधवराव पेशवे व रघुनाथराव एकत्र झाल्यावर मोहिमेची सर्व सुत्रे दादासाहेबांकडे देण्यात आली. प्रथम त्यांचा बेत असा होता की, विंचूरकर ,नारोशंकर व काही हुजरात मिळून दहा बारा हजार फौज श्रीरंगपट्टणकडे रवाना करावी म्हणजे आपली राजधानी राखण्याकरिता हैदरअली बिदनूरची झाडी सोडून बाहेर पडेल. तसे झाले म्हणजे मैदानात गाठून त्याचे पारिपत्य करावे परंतु असे केले असता मोहिमेचे काम पुष्कळ दिवस पर्यंत चालून कदाचित या ही वर्षी पुन्हा या प्रांती छावणी करावी लागेल. असा विचार होऊन शेवटी सर्व सैन्यासह बिदनूरवरच

चालून जाण्याची मसलत ठरली. तेव्हा वाटेत हरीहर, येणूर व कुमसी ही ठाणी लागली. ती काबीज करण्यात आली. आबा पुरंदरे व नारोशंकर यांनी जाऊन मासूरचे ठाणे घेतले नंतर अनंतपूरास मोर्चे लावले. पाऊण महिना युद्ध झाले,शेवटी किल्लेकरी शरण येऊन त्यांनी किल्ला मराठयांच्या हवाली केला. आपले सर्व उपाय आता थकलेले पाहून हैदरअली हा मराठयांना शरण आला. त्याची या मोहिमेत इतकी दुर्दशा झाली होती की, मराठे म्हणतील ती खंडणी व मागतील तो मुलुख देण्यास तो तयार होता.[१९१]

***अनंतपूरचा तह (३० मार्च१७६५ )**

रघुनाथराव कर्नाटकात आला त्यावेळी लढाईची सर्व परिस्थिती बदललेली होती.हैदरअली समोर शरणागती शिवाय दुसरा मार्ग राहिला नव्हता. त्यामुळे हैदरने माधवरावाशी वाटाघाटी चालविल्या होत्या. वाटाघाटीचे सर्व सुत्रे वयाने ज्येष्ठ म्हणून रघुनाथरावाकडे सोपविली होती. रघुनाथरावाने पुन्हा राजकारण करण्याला प्रारंभ केला. विशेष म्हणजे हैदरअली व रघुनाथराव यांचे यावेळी जे एकदा सख्य जमले ते पुढे कधीही बिघडले नाही. तहाचे बोलणे पक्के करण्याकरिता रघुनाथरावाने नारोशंकरास हैदरअलीकडे पाठवून दिले. त्याने हैदरअलीचा जितका फायदा होईल तितका या तहात साधून दिला. ३० मार्च १७६५ रोजी हैदरअली–मराठे यांच्यात अनंतपूरचा तह झाला. हैदरअलीशी सौम्य अटीवर तह केला.[१९२] नारोशंकरने तहाच्या अटी ठरवून आणल्या त्या पुढीलप्रमाणे–

१. उत्तर कर्नाटकापैकी हैदरअलीने मराठयांचा जितका मुलूक घेतला होता.तितका सर्व परत दयावा आणि पुन्हा त्यांच्या राज्यास कधीही उपद्रव देऊ नये.
२. म्हैसूरच्या खंडणीबद्दल त्याने मराठयांस ३२ लक्ष रूपये द्यावे.
३. यापुढे त्याने सावनूरकर नबाब व मुरारराव घोरपडे यास कधी ही उपद्रव देऊ नये आणि त्या दोघांचा मुलूख अद्यापही त्याच्या ताब्यात काही असेल तर तो त्याने सोडून द्यावा.

वरील तीन कलमाची वाटाघाटी होत असताना हैदरने आढेवेढे घेण्याचे काम चालू केले होते. शेवटी तो इतक्यावर आला की, माझा मुलगा टिपू सुलतान यास श्रीमंतानी चाकरीस ठेवून बंकापूर व बसवापट्टण ही दोन ठाणी त्यास जहागीर दयावी. हे त्याचे मागणे मान्य करायचे असे रघुनाथरावच्या मनात होते. परंतु माधवरावाने सांगितले की, तुंगभद्रेच्या उत्तरेस बंकापूर सारखा बळकट किल्ला जर हैदरच्या हाती ठेवला तर तो पुन्हा उत्पात करून या

स्वारीत आम्ही इतक्या श्रमाने सोडविलेले राज्य पुन्हा हिसकावून घेण्यास तो कमी करणार नाही. बसवापट्टण तर बिदनूर राज्याची किल्ली आहे .ते राज्य आमच्या मांडलिकाचे असता हैदरने बळजबरीने घेतले आहे .तेव्हा बसवापट्टण त्याच्या हाती देणे चांगले नाही. रघुनाथराव व माधवराव पेशवे यांचे वेगवेगळे अभिप्राय पडले असता. सखाराम बापूने तडजोड काढली की, हैदर पासून बंकापूर घ्यावे व बसवापट्टण त्याजकडे ठेवावे.शेवटी याच प्रमाणे निश्चय करून हैदरशी तह झाला.[१९३] हा तह फेब्रुवारी १७६५ मध्ये झाला असे म्हैसूरचा इतिहास लिहणाऱ्या विल्कसनने म्हटले आहे.[१९४] परंतू पेशवे दप्तरामध्ये खंड ३७ मध्ये या तहाविषयी पत्र उपलब्ध आहे. त्यानुसार हा तह ३० मार्च १७६५ रोजी झाला आहे.[१९५] या विषयीचे पत्र माधवराव पेशव्यांनी नाना फडणीसास जासूद हरकारे,भिकाजी मार्फत पाठविले आहे त्यानुसार बिदनूरची ठाणी दोन चार घेऊन फौजसुद्धा बिदनूरच्या झाडीत शिरून अनंतपूरास मोर्चे दिले. ते ठाणे घेऊन पुढे जाऊन बिदनूरचे ठाणे घ्यावे. इतक्यात मजकूर आला की, हैदर नाईकाने वकील पाठवून तहाचा पैगाम केला.तीथरूपाचे विचारे मसलत लांबऊ नये त्याजवरून तह मीर फैजुलामार्फत केला त्यातील अटी अशा–

१. यैन २८ लक्षाची नजर व २ लाख दरबार खर्च याप्रमाणे तीस लक्ष रूपये हैदरने मराठयांना दयावे.
२. निम्मे रोख व निमेस सावकारी निशा करून मुदत केली. वसुलास राजश्री नारोशंकर व राजश्री गोपाळराव उभयेता कालच गेले.
३. बंकापूर वगैरे तुंगभद्रेच्या उत्तरेकडील सर्व मुलुख दयावा.ते घेण्यासाठी विसाजी नारायण गेला होता. त्याने ते ठाणे वैशाखच्या पहिल्या पंधरावडयात हस्तगत केले.
४. सावनूरकरांची ठाणी मुलूक व मुरारराव घोरपडे यांचे तालुके हैदरने परत दिले आणि मुरारराव घोरपडे व सावनूरचा नबाब हे मराठयांचे मित्र असल्याने त्यांना हैदरने कोणताही उपद्रव देऊ नये.
५. मेघश्यामराव पटवर्धन हैदरच्या कैदेत होते त्यास सोडवून आणले.[१९६] या तहालाच अनंतपूरचा तह असे म्हणतात.या तहातील खंडणीच्या रक्कमेविषयी मराठयांचा आद्य इतिहासकार ग्रँट डफने चुकीची माहिती दिली आहे. त्याने हैदरअलीने मराठयांना ३५ लाख रूपये देण्याचे कबूल केले असे म्हटले आहे.[१९७] माधवराव पेशव्यांनी या तहास

मान्यता का दिली. त्याला महाराष्ट्र ातील राजकारण कारणीभूत ठरले असावे असे वाटते कारण–

१. पेशव्यांच्या फौज दूर गेल्याने मोगलाकडील मराठे सरदार जगनाथ धोंडाजी व खंडागळे यांनी नाशिक प्रांतात धुमाकूळ घालण्यास सुरूवात केली होती.

२. कोळयांच्या दंग्यामुळे पुणे प्रांतात बरीच अस्वस्थता निर्माण झाली होती म्हणून माधवरावाने सालपेकर शिंदे,नरसिंगराव धायगुडे व आबा पुरंदेर यांची पथके पुण्यास रक्षणार्थ पाठविण्यात आली होती.

३. मालवणच्या बंदरात कोल्हापूरकरांचे आरमार होते.तेथील किल्ला इंग्रजानी जिंकूण घेतला होता.

४. वाडीकर सावंताचा ही रेडी म्हणून किल्ला इंग्रजांनी जिंकून घेतला होता.

म्हणून त्यांनी तहास मान्यता दिली होती.बसवापट्टण पूर्वी पटवर्धनांच्या जहागिरीत होते. हे आता हैदरकडे राहिल्याने पटवर्धानास व मराठी सरदारास बिलकूल आवडले नाही. तसेच हैदरचे नुकसान भरून काढण्यासाठी एक लक्ष त्रेसष्ठ हजारांच्या भरतीचा तालुका त्यास देण्याचे श्रीमंतानी कबूल केले होते.थोडक्यात या तहाने हैदरअलीस जीवनदान मिळाले. रघुनाथरावाच्या हाती मोहिमेची सर्व सूत्रे दिल्याने माधवरावास दादाच्या इच्छेप्रमाणे होणाऱ्या तहास मान्यता द्यावी लागली.[१९८] अशारीतीने रघुनाथरावाच्या अंतर्गत भूमिकेमुळे व राजकाराणाने हैदरअलीला पूर्णपणे मराठे नियंत्रित करू शकले नाहीत. ज्या सरादारांनी हया कर्नाटक मोहिमेमध्ये हैदरला नमवण्यास आपले शौर्य, धैर्य, परिश्रम खर्च केले होते. यामध्ये गोपाळराव पटवर्धन, मुरारराव घोरपडे, विसाजी कृष्ण बिनिवाले, यासारख्या सरदारांच्या मेहनतीवर पाणी फिरले गेले असे म्हणावे लागते. तसेच रघुनाथराव व माधवराव पेशवे यांच्यातील सत्ता स्पर्धा लक्षात घेता स्वतःच्या स्वार्थाकडे नजर ठेऊन कार्य करणाऱ्या सरदारांची संख्या ही यावेळी बरीच होती.सखाराम बापू, विंचूरकर, नारोशंकर हे रघुनाथरावांचे अनुयायी प्रत्येक संधीचा उपयोग आपले स्वतःचे महत्त्व वाढविण्याकरिता करीत असत. या पार्श्वभूमीवरती गोपाळराव पटवर्धन, मुरारराव, विसाजी कृष्ण बिनिवाले यांच्यासारखे प्रामाणिक, स्वामीनिष्ठ, शूर सरदार माधवराव पेशव्यांच्या पाठीशी सदैव राहिले म्हणूनच त्यांना हैदरअली सारख्या शत्रूस नामोहरण करण्यात यश मिळाले असे म्हणता येईल.

अनंतपूरचा तह झाल्यावर सावनूरकर,घोरपडे यांस आपापल्या स्थळास जाण्यास निरोप मिळाला.नंतर पूर्वीचे चित्रदुर्ग वगैरे संस्थानिकापासून जी खंडणी घ्यावयाचे ठरले होते. तिच्या वसुलीसाठी व हैदरअलीकडून जिंकलेल्या मुलखात स्वस्थता राखण्याकरिता गोपाळराव पटवर्धन, विठ्ठल शिवदेव व आनंराव रास्ते यांना दहा–बारा हजार फौजेसह ठेवून माधवराव, रघुनाथराव व नारायणराव हे त्रिवर्ग परत फिरले. श्रीमंत सोंडूर येथे जाऊन कार्तिक स्वामीचे दर्शन घेऊन पुढे अनागोंदी, हंपी, विरूपाक्ष या रोखे कूच करून गेले व तेथून पंचमहालात जाऊन तेथील खंडणी गोळा करून जून १७६५ अखेरीस पुण्यास येऊन दाखल झाले.[१९९] माधवराव पेशवे कर्नाटकच्या मोहिमेवरून परत येत असतानाच निजामअलीने बसालतजंगावर स्वारी करून त्यास कर्नूल शहरात कोंडून धरले होते. तेव्हा या संघर्षात निजामअलीने माधवरावाकडे मदत मागितली होती. म्हणून त्यांनी काही फौज बाबूराव हरीबरोबर परस्पर कर्नाटकातूनच निजामअलीकडे पाठविली होती. एकंदरीत या स्वारीत निजामअली व माधवराव पेशव्यांचे संगनमत होते.[२००]

### ३.१५ दुसऱ्या कर्नाटक मोहिमेचे यश

दुसऱ्या कर्नाटक मोहिमेचा मराठी राज्याला काय फायदा झाला. याविषयी सरदेसाई यांनी आपल्य रियासत खंड ५ मध्ये फक्त सावनूर व गुत्ती ही दोनच संस्थाने मराठयंच्या कब्जात आली. हाच या मोहिमेचा फलितार्थ होय असे म्हटले आहे.[२०१] परंतु या संस्थानिकाशिवाय दक्षिणेतील अनेक लहान लहान संस्थानिकांनी मराठयांचे मांडलिकत्व मान्य करून त्यांना खंडणी दिल्याचे उल्लेख सापडतात. संस्थान हरपनहळ्ळीच्या सोमेश्वर नाईकाने माधवरावांचे वर्चस्व मान्य करून दीड लक्ष रूपये खंडणी देण्याचे मान्य केले होते त्यापैकी एक लक्ष रोख व पन्नास हजारास मुदत दिली होती. या मोबदल्यात तुमच्या मुलकास उपसर्ग लागणार नाही म्हणून माधवरावाने त्यास सनद दिली आहे.[२०२] विदयानगरचा संस्थानिक चेनराज दलवाई याने माधवरावांशी ४० हजार रूपये खंडणीचा करार केला होता व माधवरावांचे वर्चस्व मान्य केले होते. परंतु संस्थानात ताकत नाही व संस्थान सरकारमध्ये साल दरसाल एकनिष्ठ रूजू आहे म्हणून माधवरावाने १७,००० रूपयाचा करार करून दोन महिन्यात सरकारमध्ये जमा करण्याचे सांगितले होते व त्यानंतर उरलेली खंडणी माफ केली जाईल व संस्थानास आजार लागणार नाही म्हणून संस्थानिकास कौल दिला आहे.[२०३] तसेच कनकगिरीच्या

संस्थानिकाने म्हणजेच रंगपा नाईकाने ही आपला प्रतिनिथी तुकोजी अनंत यास पाठवून त्याने एकनिष्ठेचा प्रकार सांगितला व विसाजी कृष्णने विनंती केली तेव्हा माधवरावाने १६,००० रूपये संस्थानिकाने सरकारात भरावे व कोपलकरच्या मामलेदारास ज्या समयी गरज लागेल त्यासमयी मदत करावी. त्याप्रमाणे करार करून वर्तवणूक केल्यास संस्थानास जाजती व आजार लागणार नाही म्हणून सनद दिली आहे.[२०४] रायदुर्गच्या संस्थानिकाने म्हणजेच तिमपा नाईकाने ही पेशव्यांचे वर्चस्व मान्य करून मराठयांना ४३,००१/– रूपये खंडणी देण्याचे मान्य केले होते. हैदरनाईकाने संस्थान खराब केले व खंडणी ही वसूल केली. परंतु तुम्ही सरकारशी एकनिष्ठ आहे म्हणून त्यास २१,५०० तूर्त व २१५०१ रूपये माघ शुद्ध दशमी पर्यंत देण्याची मुदत देऊन खंडणीचा करार केला आहे.[२०५] बल्लारी संस्थानच्या रामापा नाईक हाडे याने माधवरावांचे वर्चस्व मान्य करून, स्वारी त्या प्रांती गेल्यावर विसाजी कृष्ण व श्रीनिवास वकील यांनी संस्थान एकनिष्ठ आहे असे सांगितले म्हणून २०,००० रूपये खंड्णीचा करार करून एक महिन्यात रकमेचा सरकारात भरणा करावा व सखाराम बापू यास एक हजार रूपये नजर करावी म्हणून करार केला आहे.[२०६] याशिवाय संस्थान सिरगोपे च्या विरुपाक्ष गौडाने ही मराठयांचे वर्चस्व मान्य करुन पेशव्यांना ३५००१/– रूपये खंडणी देण्याचे मान्य केले होते व सालाबादप्रमाणे खंडणीचा भरणा सरकारात पावल्याचा जाब घेणे.याखेरीज कोणत्याही गोष्टीचा उपद्रव लागणार नाही.अभय असे म्हणून कौल दिला आहे.[२०७] इ.स.१७६४–६५ हैदरअलीखानाने ही माधवरावास जाब लिहून दिला आहे की, तुम्हाकडे साल मजूकरचे खंडणीचा ऐवज येणे. त्यापैकी तुर्तच्या हप्त्यापैकी साहुकरांनी हवाला घेतला.त्याचा भरणा गुजारत साहुकार जमा.

३,७५,००० गुजारत विरशेट कोळेकर हजर हवाला गुदचीनशेट

३,३६,९७३।।। जमा पोता छ.२१ जिल्काद होन

२७२६०७।।। होन हैदरी वगैरे ६४१४ दर ४।

८१४३ सनगिरी १९१६ दर ४।

३५७००।। धारवाडी १०२० दर ३।।

५११३ ।। सबदनअली १४६१ दर ३।।

३९३७।। पुतळी तोळे २२५ दर १७।।

११४७२ दुर्गी २८६८ दर ४,

एकूण – ३,३६,९७३।।।

३८०२६। रदकर्ज गुजारत लक्ष्मण अपाजी वरात छ.१४ सवाल

३,७५,०००

१०,२५,००० गुजारत लालदास वल्लभदास हस्ते हवाला भरणा गुजारत सेवकराम रूपये ६१५४९५।। जमा पोता छ.२१ जिलकाद होन नाणे

५०२७६६।। हैदरी ११८२९८ दर ४।

२६७७५ सनागिरी ६३०० दर ४।

५५९८६ नागरपट्टणी १५९९६ दर ३।।

२९९६८ दुर्गी १४९२ दर ४,

एकूण– ६१५४९५ ।।

४,०९,५०४ ।। रदकर्ज गुजारत साहुकार

१०६२५० गुजारतआबाजी नाईक वगैरे साहुकार छ.६ सवाल

१००००० गुजारत महादशेट वीरकर छ. ६ सवाल

२०३२५४।। गुजारत लक्ष्मण आपाजी छ.१४ सवाल

एकूण–४,०९,५०४।।

१०,२५,०००

१४,००,००० येणेप्रमाणे चवदा लक्ष रूपये सरकारात जमा झाले.खंडणीचे ऐवजी मजुरा असत म्हणून जाब लिहून दिला.[२०८]

इ.स.१७६४–६५ 'मोकादम व नाईकवाडी कसबे सिदनूर परगणे रोहिडा यांचे नावे कौल की, खासा स्वारी या प्रांते झाली तेव्हा तुम्ही हुजूर येऊन आपली खंडणी रूजू व्हावे, ते न केले सबब गावास मोर्चे लावून ठाणे सरकारात घेतले. त्यास तुम्ही रूजू होऊन जीवन माफीक खंडणी करार करून दिलिया उगवणी करून देऊ म्हणून अर्ज केला त्यावरून तुमचे जीवन पाहून साल मजकुराची खंडणी २५,००१ रूपये दरबार खर्च –५००० रूपये (३०,००१ ) एकूण तीस हजार एक रूपया करार करून दिला. त्या गावास मोर्चे बंदीमुळे गावची वस्तभाव दाणा वैरण लुटली गेली, बहुत खराबी झाली. त्यामुळै काही सोड द्यावी म्हणून महादजी बल्लाळ व रंगापा नाईक कनकगिरीकर व राणोजी गायकवाड खिजमतदार यांनी तुमच्या विषयी विनंती केली. त्यावरून लष्करामुळे गावचा तसनस जाहला ते जाणून व तुम्ही एकनिष्ठेने रूजू झाला. यामुळे तुम्हावर कृपाळू होऊन सदरहू करारापैकी सोड रूपये ६००० देऊन बाकी करार रूपये २२००१ ऐन,२००० दरबार खर्च(२४००१) एकूण चोवीस हजार एक रूपया करार करून दिला असे .सदरहू प्रमाणे पावते करून पावल्याचा जाब घेणे. सरकारात एकनिष्ठपणे रूजू राहाणे म्हणून कौलपत्र– १ दिले आहे.[२०९] याशिवाय किल्ला मर्दनगड मराठयांच्या ताब्यात आला. त्याविषयी बाजीराव खानविलकर यांनी किल्ले मर्दनगड येथे खूप मेहनत केली परंतु किल्ल्याची गोलमेल फिरंग्यानी केली. तेव्हा आपण आबरूने निघोन आला तरी आजपासून तैनात दरमहा १५ व अडसेरी खुद व कबिला व पोरगा पेशजीच्या नेमणुकीप्रमाणे पावीत जाणे म्हणून मोराजी शिंदे रत्नागिरी यास सनद दिली आहे.[२१०] वरील संस्थानिकाशिवाय या मोहिमेमध्ये मराठयांनी बंकापूरचा किल्ला ताब्यात आणला होता. तसेच रूद्राजीराव धुळपच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हैदरचा आरमाराच्या लढाईत पराभव व 'होनावर 'बंदरावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून' सोंधे' संस्थानची हैदरच्या वर्चस्वातून सुटका केली होती म्हणजेच मराठयांचा प्रादेशिक व आर्थिक फायदा या मोहिमेमुळे झाला होता. तसेच मराठयांचे वर्चस्व दक्षिणेत निर्माण होण्यामध्ये झाला होता हे मान्य करावे लागते.

## ३.१६ समारोप

पेशव्यांनी मराठी सत्तेचा जम बसविल्यानंतर हैदरअलीविरूद्ध पहिली मोहिम जानेवारी १७६२ मध्ये हाती घेतली. कर्नाटक मोहिमेला पार्श्वभूमी कारणीभूत होती तसेचा मोहिमेचे विविध उद्देश होते. पेशव्यांनी मोहिमेची प्रचंड तयारी केली. मोहिमेत मार्गदर्शक म्हणून

गोपिकाबाई वडूथपर्यंत होती. गोपाळराव पटवर्धन, नारोशंकर, सखाराम बापू व इतर सरदार बरोबर होते. इंदापूर, फलटण, सालप्याच्या घाटातून स्वारी सातारा प्रांतात आली होती. पुढे पेशव्यांनी मिरज पटवर्धनांच्या हवाली केली. चिकोडी मुक्कामी रघुनाथराव व पेशवे यांचे मतभेद झाल्याने रघुनाथराव पुण्यास आले. पेशव्यांनी मुरारराव घोरपडयांशी मैत्रीचे संबंध जोडल्याने यात सहभागी झाले होते. पेशव्यांनी बाळापूरच्या लढाईत हैदरचा पराभव केला. कित्तूर, बिदनूर इत्यादी खंडण्या वसूल केल्या होत्या. रघुनाथराव व गोपिकाबाई यांचे भांडण व पर्जन्यकाळ समीप आल्याने पेशव्यांनी ही मोहिम आटोपती घेतली. जेजुरी मुक्कामी करवीरच्या जिजाबाईच्या दत्तक विधानाचा प्रश्न सोडविला आणि १३ जून १७६२ रोजी पेशवे पुण्यास आले.

पेशव्यांनी रघुनाथरावाने निर्माण केलेला गृहकलहाचा प्रश्न संयमाने व कौशल्याने सोडविला. राक्षसभुवनच्या लढाईत निजामाचा पराभव केला. दक्षिणेत हैदरला मोकळीक मिळाल्याने आक्रमक कारवाया करून आपल्या राज्याची सरहद्द कृष्णा नदीपर्यंत आणली होती. परिणामी पेशव्यांनी ५ जानेवारी १७६४ रोजी हैदरविरूद्ध दुसरी कर्नाटक मोहिम हाती घेतली. या मोहिमेत पेंढारी, शिलेदार, बारगीर, मावळे, हेटकरी व विविध निवडक सरदारांना सामाऊन घेतले होते. पेशव्यांना मोहिमेच्या तयारीस तीन महिन्याच्या अवधी लागला होता. दुसऱ्या कर्नाटक मोहिमेचे हैदरच्या आक्रमणाला प्रतिबंध घालणे व खंडणी वसूल करणे यासारखे विविध उद्देश होते. पेशव्यांनी मुख्य कारभारी सखाराम बापू बोकील व मुत्सद्दी कृष्णराव काळे यांना बरोबर घेतले होते. सातारा, शिखर शिंगणापूर, जत प्रांती मोहिम गेली. पेशव्यांनी डफळे व पोळ यांच्या बंडाचा बिमोड केला. चिकोडी, मनोली व कागलची ठाणी जिजाबाईच्या हवाली केली व विजापुरात आपले ठाणे बसविले.

हैदरने व पेशव्यांनी वेगवेगळया मसलती योजलेल्या असतात. हैदरने जंगलाचा आश्रय घेतल्याने पेशव्यांनी तुंगभद्रा ओलांडण्याचा निर्णय घेतला. पेशव्यांनी शत्रुचे पारिपत्य करून मोहिम शेवटास नेहण्याची मसलत योजली होती व गोपाळराव पटवर्धनामुळे यशस्वी ही ठरली होती. माधवराव पेशवे व हैदरअली यांच्यात अनेक लढाया झाल्या. रट्टेहळीच्या लढाईत पेशव्यांनी हैदरचा पराभव केला व कायमची अद्दल घडवली. या लढाई पासून हैदरला मराठयांच्या फौजेची दहशत वाटू लागली. हैदरने झाडीत मायनहळ्ळीचा आश्रय घेतला होता. मासूरच्या बारीकडून मिळणारी हैदरची रसद तोडण्यात पेशव्यांना यश आले ,ही कामगिरी

विसाजी कृष्ण, मुराराव घोरपडे यांनी पार पाडली होती. पेशव्यांनी कर्नाटकात छावणी केल्याने हैदरचे सर्व मनोदय धुळीस मिळाले होते. सावनूर व हावेरीच्या लढाईत पेशव्यांनी हैदरचा पराभव केला त्यामुळे हैदरने अनवडीच्या जंगलाचा आश्रय घेतला. पेशव्यांनी धारवाडला वेढा दिला व दोन महिने संघर्ष करून किल्ला जिंकून घेतला. अनवडी व जडीहनवटीच्या लढाईमध्ये हैदरला चांगली झुंज देवून त्याचा पराभव केला. हैदर बिदनूरला पळून गेला. आरमारी युद्धात मराठयांनी हैदरचा पराभव करून सोंधे प्रांतात जम बसविला. इंग्रजांनी काही तोफा, बंदुका पेशव्यांना दिल्या होत्या. तसेच नाना फडणीसाने ही मदत केली होती. राघोबाच्या वृत्तीला बहकूं न देणे ही जोखीम पेशव्यांना सारखी करावी लागत होती. म्हणून स्वारीची हकीकत गोड पत्रे लिहून पेशवे त्यास कळवित असे. रघुनाथरावास कर्नाटकात बोलावून घेतले. हरपनहळळी या ठिकाणी दोघांच्या भेटी होऊन मोहिमेची सूत्रे रघुनाथरावाकडे दिली. नारोशंकरच्या मदतीने अनंतपूरचा तह सौम्य अटीवर झाला. महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीमुळे पेशव्यांनी तहास मान्यता दिली. पेशव्यांची ही मोहिम यशस्वी होवून मराठयांचा प्रादेशिक व आर्थिक फायदा झाला. हैदरने तीस लक्ष रूपये, मर्दनगड व बंकापूरचा किल्ला दिला. होनावर बंदर आणि सोंधा प्रांत मराठयांनी हैदरच्या वर्चस्वातून सोडविला होता.

## संदर्भ –


१) सरदेसाई गो.स, पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद, खंड – ४०, मुंबई १९४०, पृ.११६

२) खरे वा. वा.,ऐ.ले भाग–२ कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ पृ.२८२

३) Wilks Mark, Historical Sketches of the South of India Vol.I, London, 1810 ,P.433

४) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग–२ ,पृ.२८४

५) कित्ता, पृ.२८५

६) कित्ता, पृ.२८७–८८

७) Wilks Mark, Historical Sketches of the South of India, ,Vol.I,London, 1810, P.438

८) सरदेसाई गो.स, पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद, खंड–३८, मुंबई–१९३४, पत्र क्र. ७४

९) सरदेसाई.गो.स.(संपा.)स.मा.गर्गे,मराठी रियासत,छ.रामराजा:निग्राहक माधवराव खंड ५, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९० पृ.७६

१०) खरे .य.वा(संपा.),मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १,मिरज १९२७ पृ.५

११) सरदेसाई गो.स.,(संपा.)उपरोक्त , खंड ५, पृ.३४

१२) खरे वा. वा., उपरोक्त, खंड १, पृ.६

१३) कित्ता, पृ.६

१४) दिक्षीत,खोबरेकर मराठी सरदारांची हस्ताक्षरायुक्त पत्रे, पृ.३५

१५) वाड ग.चि.थो.मा.पे.रो. भाग १, इंदीरा प्रेस, पुणे १९११ पृ.३०६

१६) कित्ता, पृ.३०७

१७) कित्ता, पृ.३१०

१८) खरे वा. वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज १९२७ पृ.१४

१९) कित्ता, पृ.९

२०) कित्ता , पृ.१२१

२१) खरे वा. वा. ,उपरोक्त , भाग २,पृ.७१३

२२) Wilks Mark, Historical Sketches of the South of India,Vol.I,P.446-47

२३) Duff Grant, History of the Maratha, Vol.I,1921, P.536

२४) सरदेसाई गो.स पेशवा दफ्तरातून निवड्लेले कागद,खंड ३७, मुंबई १९३४, पत्र क्र.३

२५) भावे वा.कृ . पेशवेकालीन महाराष्ट्र,भा. इति. अनु.परिषद नवी दिल्ली, शके १८९८ पृ.४३७

२६) सरदेसाई गो.स उपरोक्त , खंड ३७, पत्र क्र.४

२७) सरदेसाई गो.स.(संपा.) उपरोक्त , खंड ५, पृ.४९

२८) पवार अप्पासाहेब,जिजाबाईकालीन कागदपत्रे,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर २०१२,पत्र क्र.८२

२९) कित्ता

३०) सरदेसाई गो.स ,उपरोक्त , खंड ३७, पत्रक्र.४

३१) पवार अप्पासाहेब, उपरोक्त , पत्र क्र.८२

३२) वाड.ग.चि .थो.मा.पे.रो. भाग १, इंदीरा प्रेस, पुणे १९११ पृ.१९०

३३) कित्ता, पृ.१९१

३४) सरदेसाई गो. उपरोक्त , खंड ३७, पत्र क्र.४

३५) खरे वा. वा.,ऐ.ले भाग १ कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ , पृ.६१–६२

३६) Duff Grant, History of the Maratha, Vol.I, 1921,536

३७) सरदेसाई गो. उपरोक्त , खंड ३७,पत्र क्र.५

३८) गर्गे स.मा.हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेकडील इतिहास, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे, १९८३ पृ.१५४–१५५

३९) सरदेसाई गो.स.,(संपा.) उपरोक्त , खंड ५, पृ.७६

४०) सरदेसाई गो.स उपरोक्त , खंड ३७, पत्र क्र.७

४१) वाड.ग.चि ., उपरोक्त , भाग१ पृ.४

४२) सरदेसाई गो.स, उपरोक्त, खंड ३७, पत्र क्र.८

४३) खोबरेकर वि.गो.,म.इ.मराठ ा क ालखंड भाग २,म.रा.सा.आणि सं.मं., मुंबई १९८८ पृ.२८४

४४) सरदेसाई गो.स.,(संपा.) उपरोक्त ,खंड ५, पृ.३६

४५) मोडक, बा.प्र .कोल्हापूर संस्थानचा इतिहास, भाग २, पुणे, १८९३ पृ.४७

४६) जोशी श.ना. माधवराव शकावली, भा.इ.स.म.पुणे, पृ.३९४

४७) खरे वा.वा. इचलकरंजी संस्थानचा इतिहास, पुणे १९३१ पृ.९३

४८) गाडगीळ ह. र. विंचूरकर घराण्याचा इतिहास, पुणे १८८३ पृ.५१,५२

४९) सरदेसाई गो.स, उपरोक्त,खंड३७,पत्रक्र.१३०, १३२

५०) खोबरेकर ,वि.गो.म.स्वा.मु.इतिहास मंडळ,मुंबई १९७६पृ.३०६

५१) सरदेसाई गो.स, पेशवा दफ्तरातून निवडलेले क ागद,खंड –१९,मुंबई१९३१,पत्र क्र.१४, १८

५२) खरे वा. वा., ऐ.ले भाग१ कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ , पृ.१०४

५३) कित्ता, पृ.१३७

५४) पवार अप्पासाहेब,जिजाबाईकालीन कागदपत्रे,शिवाजी विद्यापीठ,क ोल्हापूर,२०१२ पत्र क्र.८५

५५) खोबरेकर वि.गो., उपरोक्त , भाग२, पृ.२८७

५६) सरायकर सुनिता,विसाजीकृष्ण बिनीवाले काळ आणि कर्तृत्व, विजय प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती,२००७ पृ.४५

५७)सरदेसाई गो.स पेशवा दफ्तरातून निवडलेले क ागद,खंड२०,मुंबई१९३१,पत्र क्र.१३७

५८) खरे वा. वा., उपरोक्त , भाग १ , पृ.९३

५९) पगडी सेतु माधवराव,(संपा.व अनु.)निजाम मराठे :उर्दू फारसी साधने,पुणे १९६१ पृ.८४

६०) खोबरेकर वि. गो., म.स्वा.मुक्काम,इतिहास मंडळ,मुंबई १९७६पृ.३०७

६१) पवार अप्पासाहेब, उपरोक्त, पत्र क्र.३६

६२) पगडी सेतु माधवराव (संपा.व अनु.) उपरोक्त , पृ.६४

६३) खोबरेकर वि. गो., उपरोक्त,भाग २, पृ.२८८

६३.१) खरे वा. वा. मराठयांचा उत्तरार्ध, खंड१ मिरज १९२७ ,१९०८ पृ.४९

६४) सरदेसाई गो.स. उपरोक्त , खंड ५,पृ.६१

६५) The chronology of Modern Hyderabad P.30

६६) खरे वा. वा., ऐ.ले., भाग १, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ पृ.३४२

६६.१) खरे वा. वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज १९२७ पृ.४४

६७) खोबरेकर वि. गो. , उपरोक्त ,भाग२, पृ.२८९

६८) वाड. ग. चि, थो.मा.पे.रो. भाग१, इंदिरा प्रेस, पुणे १९११ पृ.३१५– ३१८

६९) कित्ता, पृ.३१४

७०) खरे वा. वा., ऐ.ले., भाग१, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ पृ.३६३

७१) सरदेसाई गो.स. उपरोक्त , खंड ५, पृ.६७

७२) खोबरेकर वि. गो., उपरोक्त,भाग २, पृ.३०८

७३) सरदेसाई गो.स.,न्यू हिस्ट्री ऑफ द मराठा, खंड २ मुंबई १९५८ पृ.११४

७४) आय.सी.एच.आर.खंड–७, पृ.४६

७५) खरे य .वा ,नाना फडणीसाचे चरित्र, मिरज १९२७ पृ.३३

७६) गर्गे स.मा. हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेकडील इतिहास, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे,१९८३पृ.१५४

७७) Wilks Mark, Historical Sketches of the South of India, Vol. I, London, 1810, P.447

७८) खरे वा.वा., ऐ.ले., भाग१, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ पृ.६९२

७९) कित्ता, पृ.६९४

८०) Wilks,Vol.I, P.694

८०.१) चिटणीस के.एन.,दि नबाब ऑफ सावनूर, पुणे १९८५,पृ.५४

८१) सरदेसाई गो.स.,(संपा.) उपरोक्त ,खंड–५, पृ.७७

८२) खरे वा.वा., ऐ.ले., भाग१, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ पत्र न.३१६

८२.१) चिटणीस के.एन., उपरोक्त , पृ.५४

८३) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग१, पत्र न.३४३, ३५२

८४) कित्ता , पत्र न.७०२

८५) Banerjee A.C.,Peshwa Madhavrao-I Calcutta,1968 P.44

८६) खरे वा.वा. ऐ.ले., भाग १, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ पत्र न.३७६

८७) खरे वा. वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज १९२७ पृ.६०

८८) सरदेसाई गो.स पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद,खंड३९, मुंबई,१९३४पत्र क्र.२१,२६,३१

८९) सरदेसाई गो.स पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद,खंड ३ मुंबई १९३४,पत्र क्र.१०४

९०) वाड.ग.चि .थो.मा.पे.रो. भाग १, इंदिरा प्रेस,पुणे १९११ , पृ.१९९–२०१

९१) कित्ता, पृ.३१८

९२) कित्ता, पृ.३२१

९३) कित्ता, पृ.३२४

९४) Sen S.N.,Administrative System of Marathas,Culcutta,1928.P.551-552

९५) वाड.ग.चि . उपरोक्त ,भाग १,पृ.३२५

९६) खरे वा. वा., ऐ.ले., भाग १, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ पत्र न.४०८९

९७) खरे वा. वा., ऐ.ले., भाग ६, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ पत्र न.३६७६

९८) सरदेसाई गो.स पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद,खंड ३७, मुंबई १९३४, पत्र क्र.४२

९९) खोबरेकर वि. गो.,म.स्वाऱ्यांचे मुक्काम, म.रा.सा .आणि सं.मं.मुंबई १९८८ पृ.३१९

१००) मे.स.डे.कॉ.रुमाल.८७, फाईल ५ पत्रे, ७६, ७७, १०५, १०७

१०१) वाड.ग.चि .थो.मा.पे.रो. भाग१, इंदिरा प्रेस, पुणे १९११, पृ.३२८

१०२) खरे वा.वा ऐ.ले.,भाग २, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८पृ.७१३, ७१४

१०३) Banerjee A.C Peshwa Madhavrao-I Calcutta,1968, P.45

१०४) सरदेसाई गो.स. उपरोक्त , खंड ५ पृ.७८

१०५) Grant Duff, History of the Maratha, Vol.I, 1921,P.544

१०६) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग २,पृ.३५०, ३५८

१०७) वाड. ग. चि . उपरोक्त , भाग १,पृ.१९९– २०१

१०८) खोबरेकर वि. गो., म.स्वाऱ्यांचे मुक्काम,म.रा.सा .आणि सं.मं.मुंबई १९८८ पृ.३१९

१०९) खरे वा. वा., उपरोक्त , भाग–२, पृ.७१३

११०) सरदेसाई गो.स. उपरोक्त , खंड ५ पृ.७८

१११) खरे वा.वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज १९२७ पृ.६२

११२) खरे वा. वा., उपरोक्त , भाग २, पृ.७१०

११३) सरदेसाई गो.स पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद,खंड३७,मुंबई१९३४,पत्रक्र.२५, २६

११३.१) पवार अप्पासाहेब, उपरोक्त , पत्र क्र.१८३

११३.२) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड३७,पत्र क्र.२६

११४) कित्ता, पृ.२७, २८

११५) खरे वा. वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज १९२७ पृ.६५

११६). सरायकर सुनिता, उपरोक्त , पृ.४९

११७) खरे वा. वा., उपरोक्त , भाग२, पृ.७१३

११८) कित्ता, पृ.७१६

११९) खरे वा.वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज १९२७ पृ.६९

१२०) खोबरेकर.वि.गो.,महाराष्ट्राचाइतिहास,खंड२,म.रा.सा.आणिसं.मं.मुंबई,१९८८पृ.२७३

१२१) Duff Grant, History of the Maratha, Vol.I, 1921,P.544

१२२) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड–३७,पत्र ले.क्र.३०

१२३) खरे वा. वा., उपरोक्त , भाग–२, पृ.७२०

१२४) कित्ता, पृ.७२१

१२५) गर्गे स.मा. हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेकडील इतिहास, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे,१९८३ पृ.१५५

१२६) खरे वा. वा., ऐ.ले., भाग१, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ पृ.३८७

१२७) कित्ता ,पृ.७२४

१२८) WilksMark, Historical Sketches of the South of India, Vol.I, P.463

१२९) सरदेसाई गो.स.,उपरोक्त , खंड ५, पृ.८१

१३०) खरे वा. वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज १९२७ पृ.७६

१३१) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड ३७ पत्र क्र.३२

१३२) खरे वा.वा.,ऐ.ले.,भाग १,कुरुंदवाडा भाऊ नाना छापखाना ,१९०८ पृ.४२५–२६
१३३) खरे वा.वा.,ऐ.ले., भाग २, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ पृ.७२७
१३४) गर्गे स.मा.हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेकडील इतिहास,पुणे,१९८३ पृ.१५६
१३५) खोबरेकर वि.गो. उपरोक्त ,खंड–२,पृ.२९३
१३६) सरायकर सुनिता, उपरोक्त , पृ.५१
१३७) खरे वा. वा., ऐ.ले.,भाग १,कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,१९०८ पृ.७२८
१३८) BanerjeeA.C.,Peshwa Madhavrao-I Calcutta,1968 P.48
१३९) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड ३७ पत्र क्र.३४
१४०) खरे वा. वा.,मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज १९२७ पृ.८०
१४१) माधवरावाचे गोपिकाबाईसपत्र दि.२४ मे १७६४
१४२) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड ३७,पत्र क्र.३४
१४३) खरे वा. वा., उपरोक्त , भाग २, पृ.७३०
१४४) सरदेसाई गो.स, उपरोक्त ,खंड ३७, पत्र क्र.३५
१४५) खोबरेकर वि .गो.,मराठयांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम,म.रा.स आणि सं.मं.मुंबई १९८८ पृ.३२०
१४६) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड ३७, पत्र क्र.३७
१४७) खरे वा. वा., उपरोक्त , भाग २, पृ.४५५
१४८) Banerjee A.C.,Peshwa Madhavrao-I Calcutta1968 P.50
१४९) खरे वा. वा., उपरोक्त ,भाग २, पृ.७३४
१५०) खरे वा. वा.,मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज १९२७ पृ.८५
१५१) खरे वा.वा.,उपरोक्त ,भाग २,पत्र क्र.४६२, ४६५
१५२) खरे वा. वा.,मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज १९२७ पृ.८८
१५३) कित्ता, पृ.८९
१५४) सरदेसाई गो.स. उपरोक्त , खंड ५ पृ.८३
१५५) खरे वा. वा., उपरोक्त , भाग २, पत्र क्र.७४०
१५६) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड ३७,पत्र क्र.३८
१५७) खरे वा. वा., उपरोक्त, भाग २, पत्र क्र.७३७

१५८) सरदेसाई गो.स उपरोक्त,खंड ३७, पत्र क्र.४२

१५९) सरदेसाई गो. स.,मराठी रियासत,उपरोक्त खंड ५, पृ.८३

१६०) खोबरेकर वि.गो.,उपरोक्त,खंड २,पृ.२९४

१६१) Madras Military consulatation,1761-72,Madras Record Office Vol.XXII-A¸ P.111

१६२) कित्ता, पृ.१४६

१६३) खरे वा. वा.,उपरोक्त , भाग २, पत्र क्र.७४२

१६४) सरदेसाई गो.स, उपरोक्त ,खंड ३७, पत्र क्र.४४

१६५) कित्ता, पृ.४५

१६६) कित्ता, पृ.५०

१६७) खरे वा. वा., उपरोक्त , भाग २, पत्र क्र.७४४

१६८) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड ३७,पत्रक्र.५१, ५२

१६९) कित्ता, पृ.५३

१७०) खरे वा .वा., उपरोक्त ,भाग २,पृ .५२२

१७१) कित्ता, पृ. क्र.७४४

१७२) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड३७, पत्र क्र.५४

१७३) खरे वा. वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज १९२७ पृ.९३

१७४) खरे वा. वा., उपरोक्त , भाग २,पृ.क्र.७४४

१७५) गर्गे स.मा.हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेकडील इतिहास,दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे,१९८३ पृ.१५६–५७

१७६) खरे वा. वा., उपरोक्त, भाग २,पृ.क्र.७४७

१७६.१) दिक्षीत/खोबरेकर,मराठेकालीन प्रसिद्ध व्यक्तीची हस्ताक्षरयुक्त पत्रे,पृ.२५

१७७) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड ३७,पत्र क्र.५५

१७८) सरदेसाई गो .स. मराठी रियासत उपरोक्त,खंड ५, पृ.८४

१७९) सरायकर सुनिता, उपरोक्त ,पृ.५३

१८०) खरे वा. वा., उपरोक्त, भाग २,पृ.क्र.७४८

१८१) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड ३७, पत्र क्र.५३

१८२) खरे वा .वा., उपरोक्त ,भाग २,पृ.क्र.७१३

१८३) सरायकर सुनिता, उपरोक्त , पृ.५४

१८४) सरदेसाई  गो.स.,मराठी रियासत उपरोक्त ,खंड ५,पृ.८५

१८५) खरे वा. वा., उपरोक्त ,भाग २,पृ.क्र.७४८

१८६) खरे वा. वा.,मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड  १, मिरज १९२७    पृ.९८

१८७) खरे वा. वा., उपरोक्त ,भाग २, पृ.क्र.७५०

१८८) सरदेसाई  गो. स.,मराठी रियासत उपरोक्त,खंड ५,पृ.८६

१८९) खरे वा. वा., उपरोक्त, भाग २, पृ.क्र.७५१

१९०) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड ३७ पत्र क्र.५९

१९१) खरे वा. वा., उपरोक्त, भाग २,पृ.क्र.७५५

१९२) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड ३७, पत्र क्र.६१

१९३) खरे वा. वा., उपरोक्त,भाग २,पृ.क्र.७५७

१९४) WilksMark, Historical Sketches of the South of  India,Vol. I, P.466

१९५) सरदेसाई गो.स उपरोक्त ,खंड ३७,पत्र क्र.६३

१९६) कित्ता, पत्र क्र.६०, ६१, ६३

१९७) Duff Grant, History of the Maratha, Vol.I, P.546

१९८) खोबरेकर वि.गो.,उपरोक्त,खंड २,पृ.२९६

१९९) सरदेसाई गो.स. उपरोक्त ,खंड ३७,पत्र क्र.६४,६५

२००) खरे वा. वा., उपरोक्त,भाग २,पृ.क्र.७५८

२०१)  सरदेसाई .गो. स., मराठी रियासत ,उपरोक्त,खंड ५, पृ.८७

२०२) वाड.ग.चि .थो.मा.पे.रो. भाग–१, इंदिरा प्रेस,पुणे १९११, पृ.२४८

२०३) कित्ता, पृ.२५०

२०४) कित्ता, पृ.२५१

२०५) कित्ता, पृ.२५२

२०६) कित्ता, सनद क्र. २७३, पृ.२४९

२०७) कित्ता, पृ.२५६

२०८) कित्ता, पृ.२२९

२०९) कित्ता, पृ.२८

२१०) कित्ता, पृ.३१, सनद क्र.२९३

# प्रकरण चौथे

## माधवरावांची कर्नाटकावरील तिसरी स्वारी

*प्रस्तावना

४.१ जानोजी भोसल्यांचा बंदोबस्त व तह

४.२ बाबूजी नाईकाचे बंड

४.३ भवानराव प्रतिनिधीचे बंड

४.४ निजामाशी मैत्रीचा तह व माधवरावांचे दक्षिणेकडील यशस्वी राजकारण

४.५ तिसऱ्या कर्नाटक मोहिमेची पार्श्वभूमी

४.६ स्वारीची तयारी व उद्देश

४.७ मोहिमेला सुरूवात

४.८ शिरे काबीज व मीररेझा शरण

४.९ मदगिरी व बाळापूरची प्राप्ती

४.१० चेनरायदुर्ग व इतर ठाण्यांची प्राप्ती

४.११ माधवराव पेशव्यांनी मोहिम आटोपती का घेतली

४.१२ हैदरअलीशी तह व माधवराव पेशव्यांचे पुण्यास आगमन

४.१३ समारोप

# प्रकरण चौथे

# माधवरावांची कर्नाटकावरील तिसरी स्वारी

## *प्रस्तावना–

या प्रकरणामध्ये माधवराव पेशवे दुसऱ्या कर्नाटक मोहिमेतून परत आल्यानंतर नागपूरच्या जानोजी भोसलेचा केलेला बंदोबस्त व तह , बारामतीच्या बाबूजी नाईकाचे बंड व त्याचा बंदोबस्त आणि भवानराव प्रतिनिधीचे बंड व त्याचा बंदोबस्त तसेच निजामाशी मैत्रीचा तह व माधवरावाचे दक्षिणेकडील यशस्वी राजकारण. तिसऱ्या कर्नाटक मोहिमेच्या उदयाची पार्श्वभूमी, माधवराव पेशव्यांनी स्वारीची केलेली तयारी व स्वारीचा उद्देश, मोहिमेला प्रारंभ, शिरे काबीज ,मदगिरी व बळापूरची प्राप्ती ,चेनरायदुर्ग व इतर ठाण्यांची प्राप्ती करून मराठयांनी हैदर अलीच्या तावडीतून संस्थाने कशी सोडवली.दक्षिण तुंगभद्रेचा तट कसा काबीज केला.माधवराव पेशव्यांनी आपली मोहिम आटोपती का घेतली. हैदरअलीशी तह व माधवराव पेशव्यांचे पुण्याला आगमन इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

## ४.१ जानोजी भोसल्यांचा बंदोबस्त व तह

नागपूरच्या जानोजी भोसल्यांनी सुरूवातीपासून माधवराव पेशव्यांना विरोध करण्याचे धोरण स्वीकारले होते.सातारच्या छत्रपतीची गादी बळकावून पेशव्यांच्या घरामध्ये संघर्ष उत्पन्न करण्याचे राजकारण जानोजीने निजामाशी सख्य जोडून सुरू केले. पेशव्यांचा द्वेष ते करीत होते व त्यांनी इ.स.१७६२ मध्ये पुणे जाळण्यास निजामास सक्रीय मदत केली होती. त्यावेळी माधवराव पेशव्यांनी वऱ्हाडातील काही प्रदेशाची लालूच दाखवून त्यास निजामापासून फोडून आपल्या पक्षात आणले होते. हैदरअलीवरील दुसऱ्या स्वारीत माधवराव पेशव्यांनी जानोजीला कर्नाटकात बोलावले असता त्याने सबबीने भरलेली पत्रे लिहून कालहरण केले. याचे कारण जानोजी हा पेशव्यांचा मनातून द्वेष करीत होता हे होय तसेच तो पेशव्यांविरूद्ध लढण्यास हैदरअलीस फूस देत होता.[१] जून १७६५ मध्ये कर्नाटकातून कारभार उरकून पेशवे माधवराव पुण्यास आले त्यावेळी त्यास जानोजीच्या कारस्थानाची नानाविविध हकीकत समजली. जानोजीने पेशव्यांचे शत्रू म्हणजे हैदर, निजाम, रघुनाथराव यांच्याशी संधान साधून माधवराव पेशव्यांना शह देण्याचा प्रयत्न सुरू केला होता व पेशव्यांशी शत्रुत्वाच्या भावनेने

वागण्यास सुरूवात केली होती. त्यामुळे माधवराव पेशव्यांपुढे नवीन समस्या निर्माण झाल्या होत्या.[२]

त्यातील एक महत्त्वाची समस्या म्हणजे रघुनाथरावाचा माधवराव पेशव्यांशी निर्माण झालेला गृहकलह होय.दुसऱ्या कर्नाटकच्या मोहिमेत माधवराव पेशव्यांने रघुनाथरावाला कर्नाटकमध्ये बोलावून घेतले होते व त्यांच्यावर मोहिमेची जबाबदारी सोपवून हैदरअलीबरोबर अनंतपूरचा तह घडवून आणला.इ.स.१७६५ मध्ये पुण्यास परत आल्यावर भाऊबंदकी रघुनाथरावाने सुरू केली आणि राज्याच्या विभाजनाचा प्रस्ताव मांडला.[३] माधवरावांनी उत्तर केले की, राज्य कोणाचे आम्ही वाटणार कोण, आमच्याने वाटवत नाही. सर्व राज्य तुमचेच आहे.[४] गृहकलहाच्या संदर्भात माधवराव पेशव्यांनी रघुनाथरावाच्या विश्वासातील एका खास माणसाला चिंतो विठ्ठल रायरीकरास १७ जून १७६५ रोजी लिहलेले पत्र फार खुबीदार आहे. त्यानुसार,' दौलतीची विभागणी झाल्याने ही चालणार नाही व दोन्ही जागा दौलतीच्या वाटे झाल्याने लौकिक ही वाईट,यास्तव सर्व वडिलांनीच करावे.आम्ही स्वस्थ भलते जागा राहू. आप आपसात भांडून दौलत बुडविली हा लौकिक कशास पाहिजे ? सर्व त्यांनीच करावे हे फार झाले हेच प्रस्तुत काळी बरे' [५] या पत्रावरून माधवराव पेशव्यांना मराठी राज्याची किती काळजी होती व वेळप्रसंगी त्यांनी रघुनाथरावापुढे नमती भूमिका घेतल्याचे दिसून येते.तसेच रघुनाथरावाच्या हस्तका करवी त्याला ही माघार घेण्यास भाग पाडले म्हणून माधवराव पेशव्यांनी रघुनाथरावास उत्तरेच्या मोहिमेवर शिंदे व होळकरांच्या मदतीस पाठवून या गृहकलहाची समस्या मिटवल्याचे दिसून येते.

दुसरी महत्त्वाची समस्या म्हणजे नागपूरच्या जानोजी भोसल्याची होय. त्याने आपला वकील बाबूराव रायाजी यास पुण्यास पाठवून महिपतराव चिटणीसामार्फत शिंदे, होळकरांना पेशव्यांविरूद्ध कागाळया करणे, जयपूरच्या माधोसिंहास आपल्या बाजूला वळविणे यासारखी कारस्थाने रचित होता.त्यामुळे पेशव्यांना जानोजीचे पारिपत्य करण्याची योजना ठरवावी लागली.[६] माधवराव पेशव्यांनी ६ जून १७६५ रोजी सर्व गोष्टीचा निकाल लावण्यासाठी त्याच्या वकिलामार्फत जानोजीस निरोप पाठविला की, 'हजार पाचशेनिशी जानोजीने पुण्यास येऊन आम्हास भेटावे, पुढे मसलत करणे ते त्याचे विचारे करू.आपले येणे होत नसेल तर पेशवे रावसाहेब फौजेसह वऱ्हाडात चालून येतील. तुमच्याने हजार राऊतानिशी यावयाचे असेल तर

यावे नाही तर आपले खबरदारीत राहावे आणि तमाम किल्ल्यांचा बंदोबस्त करावा.[७] या पत्राने जानोजी गडबडून गेला व तो पुण्यास येण्यास निघाला. गोदावरी नदी ओलांडून अलीकडे आल्यावर त्यास खबर कळली की, पेशवा आपल्यावर चालून येत आहे,भेटीच्यावेळी दगा करण्यास चुकणार नाही असा इशारा त्याचा कारभारी देवाजीपंत यांजकडून जानोजीस मिळताच तो परत वऱ्हाडमध्ये गेला व युद्धाच्या तयारीस लागला.[८]

जानोजी भोसल्याने रघुनाथरावाशी संधान साधून त्याचे साहय आपणास मिळवण्याचे प्रयत्न केले होते.माधवराव पेशव्यांनी रघुनाथरावाची नेमणूक उत्तर हिंदुस्थानच्या स्वारीवर केली त्यामुळे त्यांना उत्तरेच्या स्वारीवर जाणे भाग पडले.निजामअलीचा कारभार त्याचा धाकटा भाऊ मीर मोगल उर्फ रूकनदौला हा पहात होता.त्याच्याशी माधवराव पेशव्यांनी स्नेह जोडून आपल्या वकिलामार्फत निजामाची मदत जानोजीस होऊ नये अशी व्यवस्था के ली. १३ ऑक्टोबर १७६५ रोजी आपल्या प्रमुख मराठा सरदारासह पुणे सोडून स्वारीवर निघाले. विसाजी कृष्ण ही त्यांच्या स्वारीमध्ये सहभागी झाले होते.[९] माधवराव पेशव्यांनी जानोजीस वठणीवर आणण्याचा विचार पक्का केला होता.याचवेळी निजामाने ही जानोजी विरूद्ध पेशव्यांकडे मदत मागितली होती. ती देण्याचे कबूल करून माधवराव पेशव्यांनी वऱ्हाडकडे आपले प्रयाण सुरू केले.माधवराव पेशव्यांनी आपले धोरण समजावून देण्यासाठी आपला वकील रामजी बल्लाळ गुणे यास पुढे जानोजीकडे पाठविले. रघुनाथरावही नाशिकहून सैन्यासह निघून बाळापूर येथे पेशव्यास मिळाले.निजामाचा कारभारी आपल्या सैन्यासह पेशव्यांस गोदावरी नदीच्याकाठी येऊन मिळाला.जानेवारी १७६६ च्या अखेरीस निजामाचे सैन्यही नागपूरच्या जवळ आले.[१०] जानोजीने युद्धाची तयार केली होती. त्याचा सर्व ओढा हा रघुनाथरावाकडे व आपला कारभारी देवाजीपंत यांच्याकडे होता म्हणून सुरूवातीला त्याने वेळ मारून नेहण्याचे धोरण स्वीकारले होते.१ जानेवारी १७६६ रोजी जानोजी हा नागपूरच्या जवळ दहा कोसावर होता. तर श्रीमंतांनी वऱ्हाड प्रांत जप्त करून बाळापूर ,अकोला येथून खं डणी वसूल केली. श्रीमंताच्या या मोठया सैन्यापुढे आपला टिकाव लागणार नाही. हे जाणून त्याने पेशव्यांकडे तहाची बोलणी लावून कृपेची याचना केली.रघुनाथरावाने मध्यस्ती केली. माधवराव पेशव्यांनी दादाच्या म्हणण्यास मान देऊन शरण आलेल्या जानोजी भोसल्यास भेटीस बोलावले. १८ जानेवारी १७६६ रोजी

जानोजी व माधवराव पेशवे यांच्या भेटी दर्यापूर मुक्कामी झाल्या. बोलणी व वाटाघाटी होऊन अमरावती जवळ 'खोलापूर' येथे तह होऊन हा संघर्ष मिटला.[११] या तहानुसार –

१) जानोजी भोसल्याने २४ लक्षाचा मुलूख पेशव्यांस परत द्यावा.

२) पेशव्यांनी १५ लक्षाचा मुलूख निजामास देऊन बाकीचा नऊ लक्षाचा आपणास ठेवावा.

३) जानोजीने आपल्या सर्व फौजेनिशी इथून पुढे पेशव्यांच्या स्वारीत हजर असावे. हे जानोजीने मान्य केले याप्रमाणे हा तह ठरला.[१२]

जानोजी भोसल्याचा माधवराव पेशव्यांनी कायमचा बंदोबस्त खालील तीन कारणांमुळे केला नसावा.

१) भोसले बंधूनी विनंती केली की, आम्हांवर राग धरून श्रीमंत व-हाडात आले. आमचा अन्याय कोणता एक पुणे म्हणतील तर तो अन्याय आमचा नाही हे मोगलांनी जाळले, दुसरा आम्ही हैदर नाईकाकडे आलो नाही तर मनुष्यापासुन चूक होतच असते. त्यास दंड म्हणून ३० लाखाचा सरंजाम दिला तो आमचा घेऊन मोगलास दयावा,सर्पास दूध पाजावे ? आम्हास आज्ञा करावी, तुम्ही मोगलावर जाणे, जाऊन पारिपत्य करतो की नाही ते पहावे. आता आम्हास वडीलपणाने हाती धरावे. आम्ही ऐसे काम करून दाखवितो की, मागे झाले नाही, पुढे होणार नाही. स्नेह होईल हे करावे यात धन्याची मर्जी. दाती तृण धरून जानोजी शरण आल्याने त्याचे पारिपत्य करणे पेशव्याला शक्य झाले नसावे.[१३]

२) पेशव्यांनी जानोजी भोसल्यावर मर्जी राखावी म्हणून मल्हारराव होळकराने लिहिले होते.

३) रघुनाथरावाला उत्तर हिंदुस्थानच्या स्वारीवर जायचे होते आणि जानोजी भोसल्याने पेशव्यांच्या स्वारीत येण्याचे कबूल केले होते.[१४] म्हणून माधवराव पेशव्यांनी जानोजीचे कायमचे पारिपत्य केले नसावे असे वाटते. पेशवे–जानोजी संघर्षात मात्र ज्या सरदारांनी जानोजीचा पक्ष धरला होता.त्यास माधवराव पेशव्यांनी शिक्षा केल्या.१५ लक्षाचा मुलुख निजामास देऊन मोगलांशी कायमची दोस्ती करण्याचा इरादा माधवराव पेशव्यांनी दाखविला व यापुढे दक्षिण प्रांती मोहिम झाल्यास उभयतांनी मिळून करावी असे यासमयी ठरले. या करारात ज्या मर्यादा जानोजी भोसल्यास पेशव्याने घालून दिल्या त्या त्याने मुळीच पाळल्या नाहीत. तर पुन्हा पेशव्यांच्या विरोधी कारवाया सुरू केल्या त्यामुळे खोलापूरचा तह हा अल्पकालीन ठरला असेच म्हणावे लागते. व-हाडात निजामाशी सख्य

जोडून माधवराव पेशवे ग्रहणासाठी गोदावरीवर आले.हे चंद्रग्रहण २४ फेब्रुवारी १७६६ रोजी झाले नंतर ते टोक्यास गेले. तेथून पुढे गंगापूरास (नाशिक) जाऊन मातोश्रीचे दर्शन घेतले. तिथे दोन आठवडे राहून ते पुण्यास परत आले.[१५] माधवराव पेशव्यांसमोरील तिसरी महत्त्वाची समस्या म्हणजे बाबूजी नाईकाने केलेले बंड होते.

## ४.२ बाबूजी नाईकाचे बंड

माधवराव पेशव्यांचे जे विविध विरोधक होते त्यामध्ये पेशव्यांचा नातेवाईक व बारामतीचा प्रभावी सरदार (सावकार) बाबूजी नाईकाचा समावेश होता. त्याने आपली फौज वाढवून प्रसंग पडल्यास पेशव्यांशी दोन हात करण्याची तयारी सुरू केली. सोलापूरचा किल्ला त्याच्या ताब्यात होता. तो बंदिस्त करून त्याने पेशव्यांना विरोध सुरू केला त्याचा बंदोबस्त करण्यासाठी व सोलापूरचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी मार्च १७६६ च्या सुमारास एक मोहिम विसाजी कृष्ण बिनीवाले, रामचंद्र गणेश कानडे व शहाजी भापकर यांच्याकडे सोपविली होती.[१६] कारण माधवराव पेशव्याने रघुनाथरावास ९ मार्च रोजी पत्र पाठविले आहे त्यानुसार 'बाबूजी नाईकाने हैदरनाईकाशी स्नेह केला आहे. कागदपत्र यांचे त्यास त्यांचे यास आले, घोडे व राऊत चाकरीस पाठविले. सोलापूर व चंदन हे दोन किल्ले त्यांच्याकडे होते.किल्लेकरी किल्ले सोडीत नाही अशी पत्रे आले. नाईक हा दक्षिणेकडे हैदअलीस मिळेल म्हणून रामचंद्र गणेश याजबरोबर पाच हजार स्वारानिशी रवाना केले.[१७] त्यानंतर माधवराव पेशव्याने रामचंद्र गणेशच्या मदतीला नाना पुरंदरे यास फौज घेऊन १३ मार्च १७६६ रोजी पाठविले होते व त्यांना मार्गातील अंमलदाराना कैद करून कमाविसदार कायम करण्याची कामगिरी सांगितली होती. त्यामुळे त्यांनी सोलापूरास जाता-जाता पांगरी, शिरढोण व खानापूर येथे मराठयांच्या कमाविसदारांचा अंमल कायम केला आणि सोलापूर येथे बाबूजी नाईक आहे. याचे वर्तमान पेशव्यांस पत्राने कळविले आहे.[१८] त्यानंतर २५ मार्च १७६६ रोजी नाव अज्ञात असलेला एक वार्ता देणारा पत्रलेखक रामचंद्र नारायण गोरे हा गोपिकाबाई हिचा कारकून यांना कळवितो की, 'इकडील वर्तमान तर बाबूजी नाईक पळाले, त्यांच्या मागावर विसाजी कृष्ण, शहाजी भोसले, सरलष्कर पाठवित आहेत. नाईक प्रस्तुत सोलापुरी आहेत. ही फौज गेल्यावर बाहेरील ठाणी बस्तील, लोकांचे कबिले बाहेरील तालुक्यात आहेत. ते दस्त करतील व आतील बहुतेक करून किल्ला फितुराने यावासा आहे. नाईकाची माणसे व दोघे लेक बारामतीस सापडली आहेत.

यामुळे नाईकास ही मोठा पेच आहे.पहावे कसे होते ते कळावे ’[१९] बाबूजी नाईकांचा पाडाव करण्यासाठी विसाजी कृष्ण, रामचंद्र गणेश व शहाजी भोसले यांनी सोलापूरच्या किल्ल्याला वेढा दिला. पेशव्यांच्या सैन्यापुढे नाईकाचा निभाव लागू शकला नाही. नाईकाच्या कुटुंबातील सदस्यांना आपल्या ताब्यात घेतले. बाबूजी नाईकाचा सर्व सरंजाम विसाजीने जप्त केला.यादव जगताप या मातब्बर माणसाने नाईकास धीर देऊन किल्ल्यातून काढून दिले, त्याचा मराठयांनी शिरच्छेद केला. अशा बिकट स्थितीत बाबूजी नाईक आपल्या बचावाकरिता धारूरच्या घाटाच्या आश्रयाने मध्यरात्री पळून गेला व त्याने कळंबचे देशमुख दत्ताजी ठाकूर यांच्याकडे आश्रय घेतला.बाबूजी नाईकास आश्रय दिल्याबद्दल कळंबच्या देशमुखास कैद करण्यात आले.[२०] विसाजी कृष्ण, शहाजी भोसले, रामचंद्र गणेश या मराठा सरदारांच्या पराक्रमापुढे बाबूजी नाईकाचा निभाव लागला नाही. त्यामुळे त्याची सर्व संपत्ती जप्त करण्यात आली. शेवटी बाबूजी नाईकाला पेशव्यांशी समझोता करण्याचा प्रस्ताव पाठवावा लागला. या प्रकरणात विसाजी कृष्ण व गोविंद शिवराम खाजगीवाले यांच्यामार्फत बाबूजी नाईकांची समजूत घातली गेली.त्यानंतर बाबूजी नाईकाने शरणागती पत्करून,माधवराव पेशव्याने त्याची व्यवस्था न्यायरितीने ठरवून दिली. दोन महिने टोक्यास राहून नंतर नाईक पुन्हा बारामतीस गेला.[२१]

बाबूजी नाईकाच्या बंडाचे पारिपत्य करण्याची जबाबदारी विसाजी व इतर मराठा सरदारांवर सोपविल्यानंतर माधवराव पेशव्यांनी मोहिमेकडे दुर्लक्ष केल्याचे दिसत नाही.तर विसाजीने जे करार केले ते पूर्ण करण्यासाठी स्वतः माधवराव पेशव्याने विशेष लक्ष पुरविल्याचे दिसून येते.याविषयी पेशवे दप्तरामध्ये १५ जुलै १७६६ चा घडणी रूमाल क्र.५१२ चा एक कागद उपलब्ध आहे. त्यानुसार–

कलम–१. आपली वस्तभाव, घोडी, हत्ती, उंट, गुरे, कापड, पैका, दाणा, भांडी व सुतळीचा तोडा वगैरे जे आणले असेल ते माघारी दयावे काही ठेऊ नये.

कलम–२. आपल्यामुळे यादव जगताप, दत्ताजी ठाकूर वगैरे त्यांची वस्तभाव, घोडी, मुले, माणसे, वतन, पैका जो घेतला असेल तो माघारी द्यावा जप्ती मोकळी करावी.

कलम–३. कमाविसदार, सोयरेधायरे व चाकरलोक यांची वस्तभाव पैका घेतला असेल तो माघारे द्यावे, त्यास सोडावे.

कलम–४. सरकारात आले असेल ते माघारे द्यावे, त्यास सोडावे कतबे जमिनीपासून घेतले असेल ते माघारी द्यावे.

कलम–५. मागील हिशोबाचा लांझ्या(लफडा) आपल्यास पुसू नये. हिशोब पावल्याचे अभयपत्र देऊन हरयेक जागा, पोट भरावयास निरोप द्यावा.

कलम–६. सदरहू प्रमाणे तुम्ही विनंती केली, त्यावरून तुम्हास कब्ज दिले असे.

कलम–७. जाबसालास रामचंद्रगोविंद व दहा पाच कारकून येतील त्यास अभय असावे.

येणेप्रमाणे करार–७ कलमे होती.[२२]याशिवाय सरकारची ही तीन कलमे होती ती पुढीलप्रमाणे–

१) सोलापूरचा किल्ला सरकारात दयावा,मध्यस्थाच्या हवाली करावा.किल्ला हवाली झाला म्हणजे कराराप्रमाणे वस्तभाव फारकत द्यावी.

२) सरकारचे शिलेदाराची घोडी, वस्तभाव वगैरे जी नेली असेल ती सोडून द्यावी.सोलापूर व अहीरवाडी येथील तालुक्याचे पाटील व लोक नेले असतील ते सोडून द्यावे.

३) नव्वद हजार रूपये तिगस्ता कर्नाटकच्या स्वारीस सरकारात घेतले आहेत ते मागू नयेत, खते माघारे दयावे. येणेप्रमाणे हा करार स्वतः माधवराव पेशव्याने तयार करून बाबूराव सदाशिव यांच्याकडे पाठविला होता.[२३] तसेच दुसऱ्या एका पत्रात स्वतः माधवराव,नाना पडणीसास लिहीतात की, ' राजश्री बाबूजी नाईक यांनी सोलापूरचा किल्ला सरकारात देऊन, हुजूर दर्शनास यावे याप्रमाणे करार झाला. त्याजकडे राजश्री विसाजी कृष्ण याची रवानगी केली. त्यास नाईकाची चीजवस्तु सरकारात आली. त्यास आजमासे एक लक्ष तेरा हजार रूपये नख्त द्यावे, ते तूर्त दिले पाहिजेत. ऐवजाची तरतूद करून ठेवणे.... बारामतीत देखील दीड लक्षाची जहागीर दिली. पुढे कृपा संपादून इंदापूर मागावे. यैसे मानस आहे.....[२४] यावरून विसाजी कृष्णाच्या कर्तृत्वावर व त्याच्या वैचारिक परिपक्वतेवर माधवराव पेशव्यांचा पूर्ण विश्वास होता.विसाजीने बाबूजी नाकईकाची जी व्यवस्था लावली होती,ती पूर्ण करण्याचा माधवराव पेशव्यांचा प्रयत्न होता असे दिसून येते.नाईकांशी समझोता झाल्यानंतर विसाजीने नाईकाची व माधवराव पेशव्यांची प्रत्यक्ष भेट घडवून आणली.तिसऱ्या कर्नाटक मोहिमेच्या वेळेस म्हणजेच डिसेंबर१७६६ मध्ये.[२५] अशाप्रकारे माधवराव पेशव्याने आपल्या सरादारांच्या पराक्रमाच्या जोरावरती बाबूजी नाईकाच्या बंडाचा

बिमोड करून त्याच्या ताब्यातील सोलापूरचा किल्ला जिंकून घेतला, त्या भागामध्ये पाटील व कमाविसदार नेमून आपला अमंल बसविला. बाबूजी नाईकाला हैदरअलीशी होणाऱ्या दक्षिणेतील मैत्रीपासून परावृत्त केले आणि दुसऱ्या कर्नाटक मोहिमेमध्ये(१७६४) बाबूजी नाईकाकडून घेतलेले ९०,००० रूपये त्यास माफ करण्यास भाग पाडले तसेच पुढील तिसऱ्या कर्नाटक मोहिमेसाठी १,१३,००० रूपये खंडणीच्या रूपाने नगद वसूल केल्याचे दिसून येते.

## ४.३ भवानराव प्रतिनिधीचे बंड

माधवराव पेशव्यांचे जे विरोधक होते,त्यामध्ये भवानराव प्रतिनिधीचा ही समावेश होता. त्यामुळे राघोबादादा बरोबरचा गृहकलह, बाबूजी नाईकाचे बंड, जानोजी भोसल्याचे बंड याप्रमाणेच भवानराव प्रतिनिधीचे बंड ही पण एक समस्या माधवराव पेशव्यांपुढे होती. भवानराव प्रतिनिधीस माधवराव पेशव्यांनी पदभ्रष्ट केल्यामुळे ते बंड करण्याची संधी शोधत होते. माधवराव पेशव्यांची स्वारी वऱ्हाडात दूर गेल्याचे पाहून भवानरावाने भगवंतारावाशी दावा आरंभून मुलखात दंगा करण्यास सुरूवात केली.[२६]हे दोघेही शूर आणि फौजबंद होते. दोघांकडे ही प्रांतातले दंगेखोर लोक मिळाले, त्यामुळे त्यांच्यात पुष्कळ झटापटी झाल्या. वाई, सातारा, कऱ्हाड, पाटण या मुलखातील लोक दोघांच्या लुटीने बेजार झाले होते. भवानरावाच्या बाजूस डफळे व पोळ मिळाल्याने त्यांची सरशी होऊ लागली. पाटणजवळ दीड कोसावर दातेगड नावाचा किल्ला आहे. तो भवानरावाने जिंकून घेतला शिवाय कडेगांव, कोळे, मसूर, चरेगाव ही ठाणी घेऊन खुद्द कऱ्हाड ही काबीज केले व तो कृष्णा नदी उतरून विटे, भाळवणीकडे लोकांकडून तमाम खंडण्या वसूल करीत चालला होता तेव्हा भगवंतरावाने मसुरास मोर्चे लावून ते पुन्हा जिंकून घेतले.[२७]

या दंग्याची बातमी माधवराव पेशव्यांच्या कानी जाताच,त्यांनी भवानरावाच्या बंदोबस्तासाठी रामचंद्र गणेश कानडे या सरदारांची नेमणूक केली. त्याने भवानरावाचा पाठलाग करून, त्यास गाठून त्याचा पूर्ण पराभव केला व त्याने जिंकून घेतलेली सर्व ठाणी घेऊन ती भगवंतरावाच्या हवाली केली. तेव्हा निरूपाय होऊन भवानराव पेशव्यांस शरण गेला. माधवराव पेशव्यांनी त्यास गोपाळराव पटवर्धनांच्या मध्यस्थीवरून पन्नास हजार रूपयांची नक्त नेमणूक देऊन पुण्यात ठेवून घेतले व नंतर पाच लक्ष उत्पन्नाचा सरंजाम त्यास नेमून दिला.[२८]

अशाप्रकारे माधवराव पेशव्यांनी आपल्या समोरील असणारे विरोधक व त्यांच्या बंडाची समस्या सोडवली.

## ४.४ निजामाशी मैत्रीचा तह

त्यावेळी दक्षिणेत निजाम, मराठे, इंग्रज व हैदर असे चार प्रमुख सत्ताधिश होते परंतु त्यात मराठे हेच जास्त प्रबळ होते. निजामाबरोबर मैत्रीचा तह करण्यामध्ये माधवराव पेशव्यांचे बरेच हेतू असावे असे वाटते.

१) रघुनाथरावाच्या गृहकलहामध्ये निजामाचे त्यास साहाय्य मिळू नये.

२) आपले विरोधक जानोजी भोसल्यावर जरब बसविण्याकरिता निजामाचा उपयोग होईल.

३) दक्षिणेकडील हैदरअलीच्या मोहिमेत ही निजामचे आपणास साहाय्य होईल.

४) उत्तर हिंदुस्थानात एतद्देशीय व ब्रिटिश या शत्रूंशी झुंज देता यावी म्हणून निजामांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

५) सखाराम बापू बोकील,कृष्णराव काळे, शेरजंग इत्यादींच्या सल्ल्याने माधवराव पेशव्यांनी निजामास आपले मित्र बनविले.

निजामाने जो पेशव्यांशी मैत्रीचा तह केला होता, तो काही पेशव्यांबद्दल त्याला वाटत असलेल्या आपुलकीबद्दल नव्हे तर मराठयांचे त्याला भय वाटत होते.वेळ प्रसंग पडल्यास आपणास मराठयांची मदत मिळावी हा त्याचा हेतू होता.दक्षिणेत निजाम हा सर्वात कमी सामर्थ्यवान होता म्हणून त्याला नेहमी दुसऱ्या कोणाच्या तरी मदतीची अपेक्षा असे. याचाच फायदा घेऊन इंग्रजांनी पूर्व समुद्रकिनाऱ्यावरील राजमहेंद्री परगणा घेऊन त्या मोबदल्यात दोन पलटणे व सहा तोफा निजामास मदती करीता देण्याचा करार केला होता. त्यामुळे निजामाला मराठयांच्या मदतीची फारशी जरूरी नव्हती परंतु जोपर्यत हैदरअली नामशेष होत नाही . तोपर्यंत मराठयांशी विरोध करण्याची निजामाची तयारी नव्हती. इंग्रजांच्या मदतीने हैदरचा नाश केल्यावर मराठयांचा ही समाचार घ्यावा असे गुप्त खलबत निजाम व इंग्रज यांनी केले होते त्यामुळे निजामाने मराठयांस कळविले होते की, कर्नाटकात हैदरअलीवर स्वारी करण्याचे तुमचे आमचे ठरले होते ,पण आता इंग्रजांचा व आमचा सलोखा झाला आहे म्हणून तुम्ही,आम्ही व इंग्रज हैदरवर स्वारी करून जो फायदा होईल तो तिघांनी वाटून घेऊ.[२९] निजामाचा हा कावा रावसाहेबांनी तात्काळ ओळखला होता म्हणून त्यांनी जानोजी भोसले व

निजाम संघर्षात निजामाला लष्करी सहाय्य देण्याची अचूक राजकारणी खेळी खेळली आणि या राजकीय डावपेचात ते कमालीचे यशस्वी ठरले. आतापर्यंत दक्षिणेच्या राजकारणात पालखेडपासून राक्षसभुवनपर्यंत निजाम–पेशवे संघर्ष चालत आला होता. माधवरावाने त्या संघर्षाला पूर्णविराम देऊन निजाम– पेशवे मैत्रीच्या नव्या अध्यायास सुरूवात केली. माधवरावाला यावेळी जे पड्ते धोरण निजामाशी घ्यावे लागले याचे क ारण रघुनाथरावाशी चालू असललेला गृहकलह हा होता.ही मैत्री पुढे जवळजवळ वीस वर्षे पर्यत म्हणजेच खडर्याच्या लढाई पर्यत टिकलेली दिसून येते.[३०] जानेवारी १७६६ मध्ये पेशवे–निजामाची संयुक्त फौज वऱ्हाडात घुसली व जानोजीचा पराभव केला.निजाम पैनगंगेहून पुढे तीन कोसावर वासीम येथे आला ,बरोबर कारभारी रूकनुद्दौला ,राजश्री जगननाथ पंत व शेरजंग होते. नबाब व कारभारी यांना फार आनंद झाला म्हणू लागले की, श्रीमंताचा व आमचा अकृत्रिम स्नेह झाला व करार झाला आहे.त्यांचा अनुभव हाच की, आम्ही लिहीले नसता व सूचना केली नसता श्रीमंतानी आम्हाकडील कामाचे जाबसाल अगोदर भोसल्यांशी केले.[३१] श्रीमंताचा व आमचा स्नेह झाला व करार झाला आहे त्याप्रमाणे दोन्हीकडून अंतर नसावे ही गोष्ट थोर आहे. अंतकरणे शुद्ध असावी व जो निश्चय ठरला आहे.तो परिणाम पावेतो अमंलात यावा हीच दृढता पाहिजे. नबाब म्हणू लागला की,श्रीमंत त्या प्रांतात गेल्याने आमचे ही कितेक कामे आहेत ,ती श्रीमंतानी करून द्यावी.श्रीमंताचा आमचा स्नेह झाला तेव्हा श्रीमंताची कामे ती आमची, आमची कामे ती श्रीमंताची,नबाबाने यादी कामाची पाठविली आहे [३२] पुढे नंतर माधवराव पेशवे व निजाम यांच्या भेटी कुरूंदखेडयावर झाल्या व तेथे दहा मुक्काम झाले. परस्पर भेटी झाल्या,डेऱ्यास येणी जाणी झाली,श्रीमंत रावसाहेब कुच करून गंगातीरास ग्रहणाकरीता गेले. नबाबाने राजबंदरी,सिकाकोल प्रांती अथवा कर्नाटकात जावे,छावणी भागानगर अथवा बेदर येथे करावी. अवंदा नबाबास पैका मिळाला नाही. भोसल्यांकडील ९ लक्षाचा मुलूख राहिला तेथे जाऊन पैका घ्यावा तरी स्वामीची मर्जी नाही.याकरिता वऱ्हाडात उगीच आलो असे झाले.सेवेसी श्रुत विज्ञापना अशाप्रकारचे पत्र सेवक धोंडोरामाने २० फेब्रुवारी१७६६ रोजी रघुनाथरावास लिहीले आहे.[३३] यावरून माधवराव पेशवे व निजामअली यांची परस्पर भेट होऊन आपले मैत्रीपूर्ण सलोख्याचे संबंध जाहिर केले.नबाबास कोणताही

फायदा झाला नाही परंतु माधवरावाच्या या राजकीय खेळीने मात्र राघोबा दादास जबरदस्त हादरा बसला हे मात्र खरे.

माधवराव पेशवे व निजाम यांच्यामध्ये सलोख्याचा मैत्रीचा तह घडून आला त्यामध्ये शेरजंग या निजामाच्या पदरी असणाऱ्या सरदाराने महत्त्वाची भूमिका बजावली होती.त्याचे मूळ नाव हैदरयारखान होते व तो सालारजंग घराण्याचा मूळ पुरूष होता. सन १७५३ मध्ये बसालतजंगाने त्यास शेरजंग हा किताब दिला होता. तो सन १७६१ मध्ये पुण्यात येऊन दोन तीन वर्षे राहिला होता.यावेळी त्याचा सखाराम बापू, कृष्णराव काळे यांच्याशी स्नेह जमला. याच काळात पेशवे दरबाराला त्याचा चांगला उपयोग झाला. राक्षसभुवन येथे विठ्ठल सुंदर मारला गेल्यानंतर निजामअलीने पेशव्यांशी स्नेहाचा तह केला होता. पेशव्यांच्या आग्रहावरून निजामअलीने शेरजंगावरील आपला रोष सोडून त्यास पुन्हा आपल्या नोकरीत घेतले. निजाम–पेशवा यांचे सख्य जमवून आणणारा मुख्य दुवा म्हणजे शेरजंग होय. त्याच्या मार्फतच या दरबारामध्ये दिलजमाई झाली होती.दोन्ही पक्षातील व्यक्तींशी शेरजंगाचा निकटचा परिचय घडल्याने उभयतांची पूर्वीची तेड नष्ट पावली.[३४] निजामाचा दक्षिणेतून समूळ नाश करावा हा जो सुरुवातीचा माधवरावाचा हेतू होता,तो नष्ट झाल्याने शेजारधर्माने वागण्याची स्फूर्ती दोन्ही पक्षात निर्माण झाली त्यामुळे माधवरावाने निजामास स्पष्ट आश्वासन दिले की, 'तुमचे आमचे वैर असू नये, तुमचा राज्यांश आहे त्या स्थितीत तुम्ही सांभाळावा. आमचा आम्ही सांभाळू कोणी कोणास दुःखवू नये किंवा एकमेकांवर आक्रमण करू नये, तक्रारी उपस्थितीत होतील त्या सामवृत्तीने एकमेकांनी बोलून भागवाव्या, त्यासाठी वर्दळीस येण्याचे कारण नाही. स्नेह ठेवण्यातच उभयतांचे कल्याण आहे ,शत्रुत्त्व चालविण्यात दोघांचेही नुकसान. मराठयांच्या कागदपत्रात व हैद्राबादच्या दप्तरामध्ये शेरजंगाविषयी माहिती मिळते. हीच माहिती सरदेसाई यांनी आपल्या रियासती मध्ये पण दिली आहे.[३५] परस्परांनी एकमेकास मदत करावी, जो एकाचा शत्रू तो दुसऱ्याचा शत्रू या धोरणाने परस्पर वागणूक असावी,कर्नाटकात हैदरअलीवर स्वारी करायची ती मराठे व निजाम या दोघांनी मिळून करावी असे ठरले होते.त्यामुळे निजाम अली व त्याचा पुत्र पंधरा हजार फौज, तोफखाना व गारदी यासह माधवराव पेशव्यांस फेब्रुवारी १७६६ मध्ये सामील होतात.[३६]

## ४.५ तिसऱ्या कर्नाटक मोहिमेची पार्श्वभूमी

दुसऱ्या कर्नाटक मोहिमेवरून पुण्याला परत येताना माधवराव पेशव्यांनी गोपाळराव पटवर्धनास छावणीस ठेवले होते. आनंदराव रास्ते, मुराररराव घोरपडे, विठ्ठल शिवदेव, कर्नूल व कडप्पा येथील नबाब गोपाळरावांच्या मदतीस आले होते. गोपाळरावाने पूर्वी ठराव झाला त्याप्रमाणे हरपनहळ्ळी, चित्रदुर्ग, रायदुर्ग व बल्लारी वगैरे तमाम संस्थानिकांपासून खंडण्या वसूल केल्या तसेच तुंगभद्रा नदीच्या तीरास येऊन अनगुंदी, कनकगिरी, केचनगुड या संस्थानाच्या खंडण्या घेतल्या व नंतर पंचमहालात जाऊन चितापूर, यादगिरी, सुरापूर येथील खंडण्या घेऊन पावसाळा सुरू होण्यापूर्वीच तो मिरजेस येऊन दाखल झाला होता.[३७] यावेळी माधवराव पेशव्यांनी आपले विरोधक जानोजी भोसलेवर वऱ्हाडमध्ये मोहिम काढून त्याचा बंदोबस्त केला होता. रघुनाथरावाच्या गृहकलहाचा प्रश्न सोडवून त्याला उत्तर भारताच्या मोहिमेवर पाठविले होते.बाबूजी नाईक बारामतीकर व भवानराव प्रतिनिधी यांच्या बंडाचा बंदोबस्त करून, हैद्राबादच्या निजामअलीशी वाटाघाटी करून हैदरअलीवर स्वारी करण्याच्या बेतात होते. पेशव्यांचा हैद्राबाद येथील वकील धोंडोराम हा निजाम अली व रूकनुद्दौला या दोघांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्या मनातील माधवराव पेशव्यासंबंधीचे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करीत होता.[३८] माधवराव पेशव्यांची व निजामाची भेट कुरूंदखेडयावर झाली.दहा दिवस मुक्काम होता.परस्पर भेटी झाल्या,डेऱ्यास येणे जाणे होऊन, श्रीमंत गंगातीरास आले व निजामाने कर्नाटकामध्ये जावे व पुढे बेदर किंवा भागानगर येथे छावणी करावी असे ठरले. पेशव्याने निजामास भेटून जानोजीकडून घेतलेला १५ लाखांचा मुलुख दिला.यावेळी कोणत्याही प्रकारचा करार झाला नाही. नबाबास कोणताही आर्थिक पैका मिळाला नाही फक्त हैदरअलीवर कर्नाटक स्वारी ही दोघांनी मिळवून काढावी व मोहिमेची माहिती दुसऱ्यास दयावी यावर एकमत झाले होते.[३९] माधवराव पेशवे निजामाच्या भेटीनंतर पुण्याला आले व त्यांनी दरबारी कामे पार पाडली. नाना फडणीस, मोरोबादादा फडणीस, महादजीपंत गुरूजी, नारोआपाजी तुळसीबागवाले,हरीपंत फडके,गोविंद शिवराम खासगीवाले,कृष्णराव काळे, सखाराम बापू इत्यादी एकापेक्षा एक हुशार माणसे त्यांच्या भोवती होती.माधवरावाने हिशोब पाहण्याचे व नविन मामलती ठरवून देण्याचे काम सुरू केले होते.श्रीमंताना लबाडी बिलकूल आवडत नसे.आप्त असो की मर्जीतला असो,गुन्हेगार सापडला की, त्याला शिक्षा केल्याशिवाय ते कधीच राहत

नसे. बातमी राखण्याच्या कामात त्यांची कमाल होती. लक्ष्मण कोन्हेर म्हणुन गंगथडीचा मामलेदार होता,त्याने दरबारातील काही लोकांना पैसे चारून खोटे हिशोब सरकारात पाठविले होते. तेव्हा रावसाहेबांनी त्यांच्या घरावर जप्ती नेऊन कच्चे कागद जप्त केले व पाऊणे चार लाख खाल्ल्याचे शाबीत केले.आरमार व तोफखान्याच्या हिशोबात ही लबाडी झाली आहे. अशी कुणकुण लागताच तेथील रूमाल जप्त करण्यात आले.[४०] तसेच माधवराव पेशव्यांनी राजश्री निळकंठ यास पत्र पाठवून लढाईत ठार झालेल्या शिलेदाराच्या कुटुंबाची सोय केली ती पुढीलप्रमाणे, 'मुरारजी फालके शिलेदार हा राक्षसभुवनच्या लढाईत निजामाबरोबरच्या तांदुलज्याचे मुक्कामी ठार झाला होता.याच्या मुला–माणसास बालपर्वेसी सालमजकूरापासून रूपये शंभर दयावयाचा करार केला त्याप्रमाणे मौजे हारणी तालुका निरथडी प्रांत पुणे येथील मोकासा वरीलप्रमाणे पेशजी पासून आहे त्याचा आकार होईल तो सदरहू प्रमाणे वजा करीत जाऊन बाकी ऐवज प्रांत पुणे येथे पाठवित जाणे.[४१] मराठयांचे शिलेदार महादजी गोविंद चाकरीस राहून नालबंदी घेतली आणि चाकरीस गेले नाही व कहयांतही वर्तले नाही, म्हणून त्यांची घरे जप्त करण्याचा माधवरावाने करार करून सनदा सादर केल्या आहेत.१ वेंकाजी माणकेश्वर याचे नावे शिलेदारांची घरे –

१ आनंदराव फाळके वस्ती पाडळी  नजीक जरंडा येथे (सातारा)

१ राघोदेवजी धायगुडे वस्ती मौजे शिराळे नजीक सालपे घाट

१ राघो केशव निसबत अली बहादूर वस्ती निंबनजिक सातारा

३ वस्ती तडवळे प्रांत वाई – १ खानाजी जाधव,१ बाबाजी भोईटे,१ जयाजी भोईटे

२ मानाजी शिंदे व हणगोजी शिंदे वस्ती कणेरखेड प्रांत वाई नजिक रहिमतपूर

८  एकूण आठ आसामीची घरे जप्त करून ठेवणे म्हणून सनद

१. गणेश विठ्ठल यास रघोजी गाढवे शिलेदार वस्ती यांचे घर जप्त करणे म्हणून सनद

१. राजाराम गोविंद यास शिदोजी दखलकर शिलेदार वस्ती दौंड नजीक वीर वाल्हे याचे घर जप्त करणे. म्हणून सनद अशाप्रकारे तीन सनदा दिल्या आहेत.[४२]

त्याचप्रमाणे पटवर्धनांच्या जहागिरीचे हिशोब समजावून देण्याकरिता आबा उर्फ मोरोबल्लाळ हा पुण्यास आला होता.त्याने ही पेशव्यांची करडी आमदानी(नजर) पाहून गोपाळरावास लिहून पाठविले आहे की,'आता कागदपत्रास फार जपावे लागेल,तमाम रूमाल

आणू लागले. आम्हाकडील पत्रे ओळीने निराळी ठेवावी.केवळ कलमदानात न ठेवावी.'श्रीमंताची कामाची जल्दी फार आहे, एकदा बोलावून न गेल्याने फारच रागे भरतात. कागद कोणी माघारे टाकले तर फारच बेमर्जी होते,मग कोणाचे ही ऐकत नाही.[४३] यावरून माधवराव पेशव्यांचा दरबारी कामाचा उरक किती होता., गुन्हा करणाऱ्यास ते कठोर शिक्षा देत असे व हिशोबात ते किती चोख होते इत्यादी गुणांची माहिती दिसून येते.

माधवराव पेशव्यांना इ.स. १७६५ व १७६६ मध्ये दक्षिणेकडे लक्ष देण्यास वेळ मिळाला नाही कारण इतर कामात गुंतले होते.त्याचा हैदरअलीने फायदा घेण्याचे ठरविले व दक्षिणेच्या राजकारणात उपद्रव देण्यास सुरूवात केली.१८व्या शतकामध्ये दक्षिण भारतात हैदर, निजाम, फ्रेंच व मराठे आणि इंग्रज यांचे आर्थिक (व्यापारी) कारणासाठी हितसंबंध गुंतलेले होते. विशेषतः हैदरने पश्चिम किनाऱ्यावरील मोक्याची ठिकाणे जिंकून घेतली होती. त्यामध्ये होनावर हे एक महत्त्वाचे बंदर होते, तसेच हैदरने बिदनूर व अंजनदिव जिंकून घेतले होते. त्यावेळी हैदरने मद्रास इंग्रजांना सांगितले होते की तो फ्रान्सच्या कंपनीला कोणती ही व्यापार विषयक सुविधा देणार नाही.(१७६३) परंतु नंतर मंगलोरचा फ्रेंच कंपनीचा एक प्रतिनिधी हैदरअलीला भेटला त्यावेळी कंपनीला सर्व सुविधा देण्याचे हैदरने मान्य केले. त्या मोबदल्यात ७००० बंदुका फ्रेंच कंपनीने हैदरअलीला देण्याचे मान्य केले. त्यानंतर स्ट्रेसी हा इंग्रजांचा प्रतिनिधी हैदरअलीला भेटला व त्याचे हैदरने भव्य स्वागत केले आणि कंपनीला होनावर बंदरातून मसाल्याच्या व्यापाराचा अधिकार दिला,त्या ठिकाणी इंग्रजांना एक कारखाना उभारण्यास परवानगी दिली.या मोबदल्यात इंग्रजांना छोटी–मोठी हत्यारांची मागणी पूर्ण करण्याची शर्त ठेवली होती त्यावेळी स्ट्रेसी या प्रतिनिधीने हैदरअलीला संगितले की, मद्रास कंपनीने आतापर्यत कोणत्याही भारतीय शक्तीला अशा प्रकारची हत्यारे पुरविली नाही किंवा मदतही केली नाही. तसेच प्रतिनिधीने हैदरला हे पण सांगितले की, फ्रान्सचा कंपनीवर कोणताही दबाव नाही. मुंबईच्या इंग्रज सरकारने हैदरच्या मागण्या मान्य केल्या तर कंपनीला फायदाच होईल. परंतु यावेळी मुंबईच्या इंग्रजांनी भारताच्या राजकारणात हस्तक्षेप करण्यापेक्षा पश्चिम किनाऱ्यावरील व्यापारावर अधिक लक्ष दिले होते. मिरची,इलायची, चंदनाचे लाकूड, इत्यादीच्या व्यापाराचे मुख्य केंद्र होते. थोडक्यात इ.स.१७६१–१७६५ या कालावधीमध्ये हैदरअलीचे व इंग्रजांचे संबंध पूर्णपणे मैत्रीचे किंवा शत्रूत्वाचे नव्हते.[४४] परंतु नंतर मात्र एप्रिल

१७६६ मध्ये हैदरअली व मद्रासकर इंग्रज यांचे संबंध चांगले सुधारले होते. तत्पूर्वी माधवराव पेशव्यांनी  मार्च १७६५ मध्ये हैदरअलीक डे  हरीहर व बसवापट्टण ही दोन महत्वाची ठिकाणे मागितली होती त्याला हैदरने विरोध करून उलट बाबूजी नाईक बारामतीकर, रघुनाथराव यांना बंड करण्याचे प्रोत्साहन देऊन जानोजी भोसल्याशी पत्रव्यवहार सुरू केला होता. परंतु १७६६ मध्येच माधवराव पेशव्यांनी निजामाशी मैत्रीचा तह केल्याने हैदरअली हा चिंतीत होता व हा तह तोडण्याच्या प्रयत्नात होता.[४५]

हैदरने मराठे व निजाम या दोन प्रबळ शत्रूंच्या नियोजित स्वारी विरूद्ध त्याने मद्रासच्या इंग्रजाकडे दोस्तीसाठी प्रयत्न केले. जून १७६६ मध्ये त्याने मद्रास गव्हर्नरास लिहिले की, माझ्या जवळ जेवढी फौज आहे तेवढीच तुमच्याकडेही आहे. दोन्ही फौजा मिळून आपण जर निजाम व मराठयांच्या सैन्यावर चढाई केली तर आपल्यापुढे त्यांच्या सैन्याचे काहीच चालणार नाही. मद्रास इंग्रजांना गंजम, चिकाकोल, राजमहेंद्री, एलोर व गुंटूर हे पाच जिल्हे आपल्या ताब्यात पाहिजे होते. यांना त्याकाळी उत्तर सरकार असे संबोधले जात होते व ते निजामाच्या प्रदेशात मोडत होते म्हणून मद्रासच्या इंग्रजांनी या प्रस्तावाला मान्यता दिली नाही.[४६] त्यामुळे हैदरने आपले लक्ष मुंबईच्या इंग्रजाकडे वळविले. मुंबईच्या इंग्रजापुढे दोस्तीचा प्रस्ताव  ठेवला व त्यांनी जुलै १७६६ मध्ये हैदरअलीस आपल्याशी दोस्तीचा तह करण्यासाठी पाचारण केले. त्यांनी व्यापाराकरिता सवलती मागितल्या,हैदरने अर्काटचा नबाब व त्रावणकोरचा राजा यावर आक्रमण करू नये, यासारख्या अटी घातल्या होत्या. हैदरने नोंव्हबर १७६६ मध्ये काही अटी गाळून लिहिले की, ज्यावेळी कंपनी सरकारला गरज असेल किंवा आपल्या  सरकारला कंपनी सरकारच्या फौजेची गरज असेल तर प्रत्येकाने एकमेकास १० ते १५ हजार फौज जरूर लागेल तेव्हा पुरवावी.[४७] हैदरअलीला सहकार्य करण्याबाबत इंग्रजांचा विरोध का होता त्याची कारणे ग्रँट डफने आपल्या ग्रंथात पुढीलप्रमाणे दिली आहेत.१) इंग्रजाचा हेतू राज्यसंपादण्याचा आहे परंतु ते राज्य विना लढाई ,दगदग,विनाखर्च, धोक्या शिवाय जितके मिळेल, तितके पाहिजे होते.

२) दक्षिणेकडे त्यांचे लक्ष साष्टी बेटावर होते व ते मराठयांच्या ताब्यात होते.

३) इंग्रजांना पूर्व समुद्राच्या किनाऱ्यावरील उत्तर सरकार या नावाखाली मोडणारे पाच परगणे पाहिजे होते. ते निजामाच्या ताब्यात होते व मद्रासजवळ होते.

४) इंग्रजांनी हे परगणे आम्हास मक्त्याने दया असे निजामास सांगितले होते परंतु त्याने साफ नकार दिला होता.तसेच निजामाने गुंटूर सोडून उत्तर सरकार अर्काटच्या नबाबास दिले होते.

५) कंपनीला हे परगणे ताब्यात असणे आवश्यक वाटत होते म्हणून रॉबर्ट क्लाईव्हूने शहा आलमचे अधिकार मान्य करून शस्त्राच्या जोरावर राजमहेंद्री बळजबरीने ताब्यात घेतला होता.

६) मुंबई सरकारने मराठयांच्या हालचाली व इतर स्थानिक सत्तेचे हैदरअलीला असणारे सहकार्य इत्यादी कारणामुळे इंग्रजांनी हैदरचा मैत्रीचा प्रस्ताव अमान्य केला.[४८] परंतु वास्तविक पाहता हैदरअलीचे दक्षिणेच्या राजकारणावर बारीक लक्ष होते.मराठे व निजाम यांच्यामध्ये झालेल्या सलोख्याच्या तहामुळेच इंग्रजांनी आपल्याशी सलोखा करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे, हे हैदरने ओळखले होते की, आपल्या कामासाठी इंग्रज आपणाशी मैत्री करू इच्छितात परंतु त्यांची ही मैत्री नेहमी टिकणारी नाही. तसेच जेव्हा आपणावर काही आणी – बाणीचा प्रसंग येइल त्यावेळी इंग्रज आपणास काडीचीही मदत न करता स्वस्थ तमाशा पहात बसणार ,मग यांच्या मैत्रीचा क ाय उपयोग ? म्हणून हैदरअलीने सलोख्याचा तह नाकारला होता. [४८अ] निजामाच्या राज्यातील राजमहेंद्री मद्रासच्या इंग्रजांनी बळजबरीचे जिंकून घेतल्याने निजामास याचा फार राग आला परंतु इंग्रजांचे किंवा हैदरअलीचे पारिपत्य करण्याचे सामर्थ्य एकटया निजामात नव्हते म्हणून त्याने मराठयांशी सलोखा केला. ही बातमी इंग्रजास समजताच त्यांनी मराठे व निजाम सैन्याचा पाडाव करण्याकरिता हैदरअलीची मदत त्यांना हवी होती.पण हैदर त्यांना भलत्याच अटी घालू लागला म्हणून इंग्रजांनी आपले लक्ष निजामाकडे वळविले.[४९] मद्रासच्या कौन्सिलने मुंबईच्या कौन्सिलला सुचविले की,त्यांनी मराठयांच्या सत्तेला आवर घालावा नाही तर त्यांना सहकार्य करावे आणि दक्षिणेतील हैदरअलीची वाढती महत्त्वकांक्षा व सत्ता तेवढी मोडीत क ाढावी त्यामुळे त्यांची मैत्री अबाधित राहिल व त्यांच्यातील दरी ही कमी होईल.[५०] तसेच निजामाने मराठयांबरोबरचे मैत्रीचे संबंध तोडावे यासाठी इंग्रज अनेक मार्गाने त्याचे मत परिवर्तन करण्याचा प्रयत्न करीत होते परंतु निजाम मराठयांबरोबरचे मैत्रीचे संबंध तोडण्यास उत्सुक नव्हता. कारण म्हैसूरवर अधिकार मिळविणे त्याला मराठयांच्याच

मदतीने शक्य होणार होते.यावेळी मद्रास कौन्सिलने मुंबई सरकारला १८ नाव्हेंबर १७६६ रोजी लिहिले की, आम्ही म्हैसूर सरकारचे वजन कमी करण्यासाठी निजामाचे साहय घेत आहोत.[५१]

निजामअलीने सलोख्याचे बोलणे इंग्रजाशी करून एक दोस्तीचा तह केला त्यानुसार असे ठरले की, इंग्रजानी राजमहेंद्री वगैरे परगणे घेतले आहे ते त्यांच्याकडेच जहागीर म्हणून कायम रहावे.त्या मोबल्यात त्यांनी दोन पलटणे व सहा तोफासह निजाम सांगेल ती चाकरी करावी. शिवाय पावसाळा संपल्यानंतर दोघांनी आपापल्या फौजा गोळा करून हैदरअलीवर स्वारी करावी व त्याचे राज्य वाटून घ्यावे हा तह २२ जानेवारी १७६७ रोजी ठरला होता. याच तहात इंग्रज व निजाम यांनी अशी एक गुप्त मसलत केली होती की, प्रथम हैदरअलीला बुडविल्यानंतर मराठयांसही बुडवावे. कारण इंग्रजाच्या डोळयात हैदरअलीपेक्षा मराठेच जास्त सलत होते. हे पत्र मद्रास कौन्सिलने इंग्लडला २२ जानेवारीला पाठविले आहे.[५२] इंग्रज व निजाम यांच्यात झालेला सलोख्याचा तह पेशव्यांना आवडला नाही.माधवराव पेशव्यांनी हया युतीपासून आपणास पुढे धोका होणार आहे हे जाणले म्हणून हैदरअलीचे पारिपत्य करण्यास इंग्रज व निजामाची मदत न घेताच स्वसामर्थ्याच्या जोरावर मोहिम करण्याचे ठरविले होते. याचवेळी निजामाने माधवराव पेशव्यांस निरोप पाठविला होता की, हैदर व इंग्रजांवर स्वारी करण्याचा आपला बेत ठरला होता परंतु हल्ली इंग्रजांचा व आमचा सलोखा झाला असल्यामुळे आता इंग्रज व आपण दोघे मिळून हैदरवर मोहिम करू व या मोहिमेतील जो फायदा होईल तो तिघे मिळून सारखा वाटून घेऊ.[५३]

माधवराव पेशव्यांनी दुसऱ्या कर्नाटक मोहिमेच्यावेळी शेवटी हैदरअली बरोबर अनंतपूरचा तह केला होता परंतु माधवराव पेशवे व गोपाळराव पटवर्धन कर्नाटकातून परत आल्यानंतर हैदरने हा तह अमान्य करून तहाच्या अटीचे उल्लंघन सुरू केले.त्याचे म्हणणे असे होते की,गुत्तीचा मुरारराव घोरपडे हा आमच्या शेजारी असून त्यापासून मला नेहमी उपद्रव होतो म्हणून त्यास जरबेत ठेवण्यासाठी आम्ही त्याची ठाणी घेतली आहे ती त्यास परत देता येत नाही तसेच सावनूरच्या नबाबाला त्रास देण्यास सुरूवात केली.[५४] डिसेंबर १७६६ मध्ये कर्नाटकातून बातम्या आल्या की,हैदरने चित्रदुर्ग, रायदुर्ग, हरपनहळ्ळी इत्यादी संस्थानिकांकडून जबरदस्तीने खंडणी वसूल केली. कर्नाटकातील मराठयांच्या अंकित

प्रदेशातील मुलूख उद्ध्वस्त केला आणि महत्त्वाची ठाणी जिंकून घेतली.[५५] दक्षिणेकडील परिस्थितीची माहिती माधवराव पेशव्यांने रघुनाथरावास पुढीलप्रमाणे सांगितली आहे,'इकडील वर्तमान तर नबाब निजामअलीखान भागानगरीच आहेत. फिरंगियाचा त्याचा तह झाला. हैदरखान कोईमतूरास कोडग व अनंतसेनच्या राज्याचे शहरावर आहे. त्याजकडील मीर फैजुला व मीररेजा फौज सात-आठ हजार, बारा हजार गाडदी व तोफखाना घेऊन त्यांनी गुमनाडपाले घेऊन तेथे ठाणे बंदी करून रायदुर्ग प्रांती आले. संस्थानिकांस पैका खंडणी मागतात,राज्य खराब करू म्हणून लिहिले ,त्याजवरून कुल संस्थानिकांनी पत्रे पाठविली की, प्रतिबंध करावा,नाही तर येवनाक्रांत संस्थाने होतात. म्हणोन त्यास तेथून फौज पाठवून प्रतिबंध करावायस फौज कुठे आहे. जे आहे ते वडीलास विदीत आहे. उगाच दबाव टाकीत आम्ही कृष्णातीरास जातो, याने हैदरखानचे सरदार निघून गेले तर उत्तम आहे. केवळ गोपाळराव गोविंद पटवर्धन व आनंदराव रास्ते यांचेच दबावानी जातील असा प्रसंग नाही. महमंदअलीखान व इंग्रज चेनापटणास आहे.[५६] या पत्रावरून हैदरअली, मीरफैजुला व मीररेजा यांनी संस्थाने कशी खराब व खंडणी वसूल केली तसेच स्थानिक संस्थानिकांनी माधवरावास कशी मदतीचे खलिते पाठविले याची माहिती मिळते. या पार्श्वभूमीवर माधवराव पेशव्यांच्या तिसऱ्या कर्नाटक मोहिमेचा उदय झाला परंतु ग्रँट डफने चुकीची माहिती लिहून ठेवली आहे. तो म्हणतो की, मला शंका वाटते की, माधवराव पेशवे मैत्रीपूर्ण संबंध निजाम व ब्रिटिशांबरोबर स्थापन करण्याचे योजत होते व त्यांच्या हया हालचाली शंका निर्माण करत होत्या आणि हे स्पष्ट होते की, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत निजामाकडून सहकार्य घेण्याची आशा करावयास नको होती.[५७]

## ४.६ स्वारीची तयारी व उद्देश

इंग्रज व निजामाचा झालेला सलोखा माधवराव पेशव्यांना आवडला नव्हता. कारण मोगलास पंधरा लक्षाचा मुलूख देऊन त्याच्याशी पक्की दोस्ती केली असतांना, तो इंग्रजासारख्या परकीय लोकांच्या आश्रयाला गेला होता, त्यामुळे पुढे या युतीपासून आपणास धोका आहे हे माधवराव पेशव्यांनी जाणले होते म्हणून हैदरअलीचे पारिपत्य करण्यासाठी निजाम व इंग्रजांची मदत न घेता स्वतःच्या बळावर कोणाचीही पर्वा न कराता पाहिजे ती मसलत तडीस नेहण्याचे आपल्यात सामर्थ्य आहे. हे कृतीने दाखविण्याकरिता त्यांनी हैदरवर मोहिम करण्याचा निश्चय केला होता. आदल्या वर्षी (१७६५) माधवराव पेशव्यांनी मोठी

मुलूखगिरी केली नव्हती. भोसल्यावर स्वारी केली परंतु फौजेची जरूरी पडली नाही यावेळी त्यांनी पटवर्धन व रास्ते यांना कर्नाटकात स्वारी करिता गुंतविले होते आणि बाकी जहागिरदारास थोडी थोडी फौज ठेवण्यास सांगून ,बाकी फौजेचा पैका सरकारात भरण्याची ताकीद केली होती त्याप्रमाणे पैका वसूल झाला त्याचा उपयोग पेशव्यांनी यंदाची फौज ठेवण्यास केला.[५८] ९ सप्टेंबर १७६६ रोजी माधवराव पेशव्यांनी मराठी सरदारास बोलावणी पाठविली व नालबंदीस ही प्रारंभ केला आणि पुण्यापेक्षा कर्नाटकास मिरज जवळ असल्याने तिथे फौज जमा करण्याकरिता गोपाळराव पटवर्धनास सांगितले कारण फौज जमा होत आहे ही बातमी ऐकून हैदरास दहशत पडेल. तो संस्थानिकांकडून खंडण्या न घेता मराठयांची आपणावर स्वारी होणार हे समजून त्यांची खंडणी चुकती करण्याच्या उद्योगाला लागेल. या उद्देशाने माधवराव पेशव्यांनी निक्षून पुनः पुनः ताकीद केली होती की,तुम्ही दसऱ्यास डेरेदाखल झालेच पाहिजे. गोपाळरावांची (वडीलांची) प्रकृती ठीक नसेल तर त्याने आपले थाकटे बंधू वामनराव किंवा गंगाधरराव यातून एकास डेरेदाखल करावे व स्वतः गोपाळराव दसऱ्यास निघाले तरी चालतील टाकळीवर डेरे देऊन राहावे, लोकास जमा करावे, म्हणजे श्रीमंतास ही कळेल की,डेरे दाखल झाले आणि कर्नाटकातही आवई पडेल. श्रीमंत दसऱ्याच्या मुहूर्तावर निघणार आहे. आनंदराव रास्ते व तोफखान्यास वरचेवर (श्रीमंत) ताकीद देत आहे की,जल्दीने निघून जाणे.रास्त्यांची नालबंदी झाडून झाली. दौलतराव घोरपडयांनाही निकडीची पत्रे गेली आहेत की, लवकर फौजेसह येऊन गोपाळरावास सामील होणे. लष्कारास खर्चास ऐवज पाहिजे तो ही फेर मोबदला करून दिला जाईल. तूर्त गरज लागली तरी भास्करपंतास सांगोन पाच हजार होना पर्यत  घ्यावे विदित होय विज्ञापना हे पत्र मारोबा फडणीसाने गोपाळरावास पाठविले आहे. त्याप्रमाणे गोपाळराव व परशुराम दसऱ्यास मिरजेहून निघून आपली फौज जमा करीत कित्तूरकडे कूच करू लागले त्यास आनंदराव रास्ते व नरगुंदकर भावे,दौलतराव घोरपडे हे ही लवकर येऊन मिळाले.[५९]

इकडे पुण्यात ही माधवराव पेशव्यांनी आपली लष्करी तयारी सुरू केली होती. त्यांनी दुसऱ्या मोहिमेमध्ये इंग्रजाकडून तोफा घेतल्या होत्या व त्या तपासून घेण्यास महाप्रयास पडले होते. तसेच हाती आल्यावर त्या रणक्षेत्रावर पोहचण्यास अनेक अडचणी आल्या आणि ठिकाणी पोहचल्यावर असे आढळून आले की, इंग्रजांनी निरूपयोगी झालेल्या तोफा आपल्या

गळयात बांधल्या. हा अनुभव आल्याने त्यांनी यावेळी इंग्रजांचा नाद सोडून दिला. त्यांनी तोफा व दारूगोळा बनविण्याचे कारखाने सुरू केले.[६०] त्यांनी मौजे आंबेगव्हाण तर्फ ओतूर प्रांत जुन्नर येथे गरनाळयाचे गोळयाचा कारखाना घातला, त्यास त्याच्या बेगमीबद्दल साळीचा कोंडा खंडी पन्नास दिला असे तरी, शिवनेरीपैकी मौजे मजकूरी पोहचून देणे म्हणून रामचंद्र नारायण यास सनद दिली आहे.[६१] तसेच तोफखान्याप्रमाणेच माधवराव पेशव्यांनी दारूगोळयाकडे लक्ष दिले होते. आनंदराव भिकाजी रास्ते कमाविसदार परगणे बागलकोट यांच्या नावे सनद की, सरकारात दारूचे प्रयोजन आहे याकरिता बागलकोट येथे दारूचा कारखाना घालून नवीन दारू खंडी पन्नास जल्दीने तयार करून ठेवणे, सदरहू दारूस ऐवज लागेल तो परगणे मजकूर येथील बाकीच्या ऐवजा पैकी खर्च करून किफायतशीर पडेल असे करणे .[६२] तोफखाना व दारूगोळया प्रमाणेच माधवराव पेशव्यांनी मराठयांच्या आरमाराकडे लक्ष दिल्याचे दिसून येते त्यांनी सन १७६६ मध्ये आनंदरराव धुळप यास सनद दिली आहे की, ‘जगन्नाथ नारायण यास सुभा आरमार येथील कारभार सांगून पाठविले आहे, त्यास तैनात सालीना रूपये दोन हजार असून सिंहगडाकडे नेमणूक होती. अव्वल सालापासून आरमाराकडे नेमणूक करून दिली आहे याखेरीज दोन आसामी कारकुनाच्या लिहीण्यास, पांडुरंग संभाजी व हरी बल्लाळ यास तैनात सालीना चारशे रूपये नेमणूक केली असे[६३]माधवराव पेशव्यांनी मराठयांच्या मोडकळीस आलेल्या आरमाराकडे लक्ष दिले व दुरूस्तीचे कार्य हाती घेतले. बाळाजी हरी यास अमीन,जगन्नाथ हरी यास कारभारी व आनंदराव धुळप यास आरमार सुभा अशी रचना करून अमीनच्या अंकीत फडणीस,कारखानीस ,जमादार ,हशमीस इत्यादी अधिकारी नेमले होते.आरमार प्रशासनाची उत्तम निमावली तयार केली. अमीनास रोजचा हिशोब तपासणे, नोकरांची हजेरी तपासणे, रजा व रूजू होणाऱ्यांची नोंद ठेवणे, नवीन भरती, यादी सर्व देवघेवीचा विक्रीचा व खरेदीचा व्यवहार इत्यादी कामे त्यास नेमून दिली होती.[६४] अमीन हा सर्व सागरावरच्या सैनिकांची वर्षाच्या सुरूवातीला तपासणी करत असे व त्या संबंधीचा आपला सर्व अहवाल पेशवे सरकारला पाठवित असे.[६५] इंग्रजांच्या आरमारावरील लढाऊ लोक शिस्तवार व कामात वाकबर अशी मराठयांची खात्री होती. यास्तव त्यांच्याशी लढण्याचा प्रसंग आपल्या आरमारास आल्यास त्यातील आपली माणसेही तशीच पाहिजेत.[६६]याकरिता माधवराव पेशव्यांनी आनंदराव धुळप यास सनद दिली आहे, ‘राजकारणी कामाचे माणूस सरदार वगैरे काही

ठेवायचे असतील तर ते कदीम लोकांपैकी गहाळ असतील ते दूर करून त्याऐवजी बेहडयास जाजती (त्रास) न होता उपयोगी असतील ती ठेवणे व आंग्र्याचे शिलकी जर्जर झालेल्या आरमाराची मरामत करण्याची ताकीद दिली आहे.[६७]

माधवराव पेशव्यांनी हैदरवर स्वारी करण्यासाठी सर्व प्रमुख सरदारांना आपापली फौज घेऊन हजर राहण्याचे आदेश दिले होते.[६८]त्यामुळे मराठे सरदार आपापली फौज घेऊन येत होते.तिचा अजमास–हुजरात, पागा व हुजूराचे सरंजामी मिळून पंधरा हजार,शिवाय थोरली पथके पटवर्धन, रास्ते, विसाजी बिनीवाले,सखारामबापू,महिपतराव चिटणीस, धायगुडे, अक्कलकोटकर भोसले, मुधोळ व गजेंद्रगडकर घोरपडे, कवडे, भापकर, नरगुंदकर भावे, काळे, मुळे, बाबर, पायगुडे, खंडो गोमाजी, जगताप व आणखी काही पंचवीस हजार शिवाय मुराररराव घोरपडे पाच हजार ही सारी घोडेस्वाराची फौज होती. या खेरीज पायदळ व तोफखाना यांचे जुजबी सामान होते.इतक्या फौजेवर आपली मोहिम फत्ते होईल अशी माधवराव पेशव्यांना खात्री होती म्हणून त्यांनी मुलूखगिरीचे दिवस फुकट न घालविता जल्दीने निघण्याची तयारी चालविली होती.[६९] माधवराव पेशव्यांची स्वारीची जय्यत तयारी पुण्याला सुरू होती. त्यावेळी गोव्याचा प्रतिनिधी रामचंद्र गणेश चुनेकर व माधवराव पेशवे यांची भेट ७ नोव्हेंबर १७६६ रोजी मुंढवा या ठिकाणी झाली. मुंढवा हा गाव पुण्यापासून तीन कोसावर आहे. दुसऱ्या दिवशी त्यांनी श्रीमंताना एक मोठे झुंबर नजर केले ,त्यांना फार आनंद झाला. तिसऱ्या दिवशी सखाराम बापूची भेट झाली त्यांनाही एक झुंबर दिले ते त्यांना फार आवडले नंतर नाना फडणीसाची भेट झाली सांप्रत माधवराव पेशव्यांनी कर्नाटकातील हैदरवर लष्करी मोहिम सुरू केली आहे. श्रीमंत माझ्याबरोबर आपले प्रतिनिधी म्हणून चिंतोपंत यांना तिकडे पाठविण्याचा विचार करीत आहे. पूर्वी ते या कामगिरीवर गोव्यास दोनदा गेले आहेत. ते या कामासाठी लायक गृहस्थ असून दोन्हीही दरबाराची ते मर्जी संपादन करतील अशी आशा आहे. आपण त्यांना पत्र द्यावे व मैत्रीची इच्छा व्यक्त करावी.[७०] या पत्रावरून माधवराव पेशव्यांचे वर्चस्व इतके वाढले होते की, परकीय सत्तेला म्हणजेच पोर्तुगिजांना ही त्यांच्या मैत्रीची गरज वाटत होती हे दिसून येते. माधवराव पेशव्यांनी मुंढव्यास डेरे दिले हाते व बाजारबुणगे पुढे पाटसच्या मुक्कामी पाठवून दिले होते. मुंढव्यासच पेशव्यांची दिपावली झाली नंतर सिद्धटेक, जेजुरी, मोरेश्वर, थेऊर व कुरकुंभ येथील देवाची दर्शने घेण्यात सर्व कार्तिक मास गेला. या पाच देवांची दर्शने घेणे यास

'पंचयात्रा' करणे असे म्हणत असत. ही सर्व स्थाने पुण्याच्या आसपास असल्याने डेरेदाखल झाल्यावर पंचयात्रा करण्यासाठी महिना-पंधरा दिवस सहज जात असे. या मुदतीत चोहोकडून फौज येऊन मिळण्यास सोईचे होत असे.[७१] पुण्याच्या दरबाराकडे हैदरअलीचे बारिक लक्ष होते. माधवराव पेशव्यांची स्वारीची झालेली तयारी त्यास माहित झाली व पेशवे आपल्यावर स्वारी करणार ही बातमी हैदरास मिळाली होती म्हणून पेशव्यांची पुण्याहून स्वारी निघण्यापूर्वी हैदरने आपला वकील आपाजीराम यास पुणे दरबाराशी तह करण्यासाठी पाठवून दिले त्यावेळी हैदरअलीच्या वकिलास पेशव्यांनी सांगितले की,तुम्ही मुराररावास उपद्रव देऊ नये,अलीकडे तुम्ही त्यांची काही ठाणी घेतली असतील ती सोडावी.सरकारचे संस्थानिक त्या प्रांती चित्रदुर्गकर,रायदुर्गकर वगैरे आहेत त्यापासून खंडण्या घेऊ नयेत. क र्नाटक बालेघाटचा म्हणजे शिऱ्याचा सुभा तुम्ही बळकविला आहे तो परत द्यावा, शिवाय गेल्या व चालू सालची मिळून पाऊण कोट रूपये खंडणी द्यावी इतके तुम्हाला कवूल असेल तर आम्ही स्वारी करण्याचा बेत रहीत करतो.आपाजीरावाने सांगितले की,शिऱ्याच्या सुभ्यावर खरा वारसा आमचा आहे आणि तो सुभा आम्ही तुम्हाला देणार नाही,तिकडील संस्थाने त्या सुभ्याच्या अंमलाखाली पुर्वी पासून आहेत तेव्हा त्यांच्यापासून आम्ही खंडणी घेतो ते योग्यच आहे. मुरारराव घोरपडे आमचा शेजारी असून त्यापासून आम्हाला नेहमी उपद्रव होतो याकरिता त्यास जरबेत ठेवण्यासाठी आम्ही त्याची ठाणी घेतली आहेत ती त्यास परत देता येत नाहीत. शिऱ्यांचा सुभा, संस्थानिकांच्या खंड्ण्या व घोरपडयांची ठाणी या तीन गोष्टीबद्दल आम्ही जे वर्तन केले ते पेशवे सरकारातून मंजूर होईल तर फार बरे होईल.आम्ही बारा लक्ष रूपये खंडणी देतो. तेव्हा तहाच्या अटी पासून काही निष्पन्न होत नाही हे पाहून माधवराव पेशव्यांनी मोहिमेचे काम अधिक नेटाने सुरू केले.[७२]

*** स्वारीचे उद्देश –**

या तिसऱ्या कर्नाटक मोहिमेचे खालील प्रमाणे उद्देश होते.

१) शिऱ्याचा सुभा पुरातन स्वराज्यापैकी असून तो नानासाहेब पेशव्यांनी जिंकलेला असताना ही हैदरअलीने पुन्हा बळकाविला आहे.तो यंदाच्या स्वारीत जिंकून घ्यायचा.

२) मुरारराव घोरपडयांची ठाणी हैदरअलीने जिंकून घेतली आहे ती सोडवून मुराररावास परत द्यावयाची.

३) कर्नाटकातील संस्थानिकांकडून खंडणी वसूल करण्याचा आपला हक्क आहे, आपण त्या घेणार आहे हे हैदरअलीकडून कबूल करून घ्यायचे.

४) पाऊण कोट खंडणी घेण्याचे आपण बोललो आहोत तितकी घेण्याचा हेका न धरता तो तीस पस्तीस लाख रूपये देण्याचे कबूल केले तर तेवढी रक्कम घेऊन परत फिरायचे.

५) रायदुर्ग, बल्लारी, चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी इत्यादी संस्थानिकांनी पेशव्यांना खलिते पाठवून मदतीचे आव्हान केले होते त्यांना मदत करून संस्थानिकांची हैदरअलीच्या वर्चस्वातून मुक्तता करावयाची.

६) रायचूर व दुआबातील संस्थानिकाकडे खंडणी थकलेल्या होत्या, त्या वसूल करणे व मराठयांचे त्या भागामध्ये प्रभूत्व निर्माण करणे इत्यादी.

## ४.७ मोहिमेला सुरूवात

माधवराव पेशव्यांनी मोहिमेची जय्यत तयारी झाल्यानंतर आपल्या बरोबर पत्नी रमाबाई, बंधू नारायणराव, तसेच मोरोबादादा फडणीस, कृष्णराव बल्लाळ, हरीपंत फडके, विसाजीकृष्ण बिनीवाले इत्यादी सरदार व त्यांची पथके आणि हुजरात, घोडेस्वारांची फौज, पायदळ व तोफखाना यांचे जुजबी सामान बरोबर घेतले. राज्याचा कारभार पाहण्याची जबाबदारी नाना फडणीसावर सोपविली. तसेच त्यांना स्वारीसाठी लागणाऱ्या तरतुदीचे काम याही वेळी सोपविले आणि २६ ऑक्टोबर १७६६ रोजी प्रत्यक्ष मोहिमेला सुरूवात केली व डेरेदाखल झाले .तत्पूर्वीच बाबूराव हरी प्रभू यास मुजूमदारीची वस्त्रे दिली व त्याच्याकडून पेशव्यांस दीड लाख रूपये नजर मिळाली होती.[७३] त्यानंतर माधवराव पेशवे मुंढव्यावरून कूच करून लोणीस गेले, तेथून राजेवाडीस आणि जेजुरीस १८ नोव्हेंबर १७६६ रोजी जाऊन पोहचले नंतर मोरेश्वर व पुरंदरला गेले होते परंतु त्याचवेळी पर्जन्य पडू लागल्याने भिजतच डेऱ्यास गेले.मुहूर्त उत्तम नव्हता म्हणून मोरेश्वराहून पुन्हा पुण्यास परत गेले व चार दिवस राहून पुन्हा पंचमीस निघून लांब लांब मजला करून कर्नाटक प्रांतास येणार, तोफखाना व जामदारखाना पुढे दौंडजवळ पाटसला पाठवून दिला. सखाराम बापू हे सासवडास राहिले होते.[७४] माधवराव पेशवे पुण्याहून पंचमीस निघून जेजूरीहून पाटसला येतात. तिथून पुढे सिद्धटेक, कुरकुंभ, शंभू महादेव(सातारा प्रांत) या ठिकाणी येऊन पोहचतात, या ठिकाणी सासवडला मागे राहिलेला सखाराम बापू माधवरावास येऊन मिळतो.[७५] या ठिकाणी माधवराव

पेशव्यांचा मुक्काम चार दिवस होता. या चार दिवसात त्यांनी सातारचे छत्रपती रामराजा यांची भेट घेतली असली पाहिजे व दक्षिणेकडील राजकारणावर चर्चा झाली असली पाहिजे.कारण त्यांच्या रोजनिशीमध्ये ६ जानेवारी १७६७ रोजी त्यांनी गणेश विठ्ठल याचे नावे सनद दिली आहे की,किल्ले सातारा (अंजिक्यतारा) येथील किल्ल्यावरची सरकारची घरे व शहरातील राजवाडा (अदालतवाडा) मोडकळीस आला आहे त्यास सालमजकुरी राजश्री व दोन्ही राण्यांचे वाडे यांच्या मरामतीस (दुरूस्तीस) रूपये दोन हजार पर्यत घरे नीट करून देणे. या वरून असे दिसून येते की,माधवराव पेशव्यांनी छत्रपती रामराजाला किल्ल्याखाली शाहूनगरात राहू दयावे आणि स्वतःच्या व्यवस्थेपुरते त्याला स्वातंत्र्य दयावे, म्हणून कर्नाटक स्वारीला जाता येता छत्रपती रामराजाची भेट घेत असे व त्यास मदत ही करीत असे.[७६] महादेवाच्या मुक्कामाहून पुढे माधवराव पेशवे म्हसवडहून माणनदीवर मुक्काम करतात व दुसऱ्या दिवशी नाझऱ्याला कूच करतात. नाझरे, सांगोले माजरी, उटगी, उमदी या गावावरून विजापूर उजवे टाकून सुरापूरच्या मुलखात जातात.[७७]

माधवराव पेशव्यांचा मुक्काम हा जेटगी तालुक्यात सुरापूर याठिकाणी होता.तेथून मोरो बल्लाळ याने गोपाळरावास पत्र लिहीले आहे त्यानुसार गोपाळरावाने मागे येऊ नये तर तिकडेच केरूरचे संस्थान आहे त्यास वेढा द्यावा म्हणजे दरारा बसेल तसेच तुमचा दरारा चांगला आहे. मुदगल सरकार आहे. तमाम खंडण्या घ्याव्यात,मागाहून खासा स्वारी येते हा झाला एक प्रकार, दुसरा प्रकार तुमचा तिकडे दबाव चांगला आहे. संस्थानिकांची आर्थिक कु वत पाहून पैका निघेल तेवढा काढावा. मुदगल सरकारचे परगणे तमाम खंडावे. मुलूखावर दोन फौजांचा म्हणजे पेशवे व पटवर्धनांचा दरारा बसला आहे परंतु तोफा असल्याशिवाय काम होत नाही. पहिल्या पासून तोफा असत्या तर पन्नास लाख रूपये आजपर्यत मिळविले असते तेव्हा श्रीमतांच्या व कारभाऱ्यांच्या युक्तीस ही गोष्ट आली.तोफा असत्या तर सरकारी काम होते हा भाव ही सर्व समजला. आजच पाच तोफा,जेजाला व दोनशे बाण व दोनशे गारदी येणेप्रमाणे रवानगी वडीलांकडे झाली आहे, मरूल/मरूनच्या घाटाने येऊन पोहचतील. तमाम खंडण्या वसूल कराव्यात. सुरापूरकरांचे जेटगी म्हणून ठाणे श्रीमंतानी घेतले आहे.तेथे बेरड जातीचा संस्थानिक होता. त्याच्या घराण्यास औरंगजेबा कडून 'बहिरी बहादर' असा किताब मिळाला होता. या बेरडाने खंडणी देण्याचे नाकारल्याने माधवराव पेशव्यांनी जेटगीवर हल्ला करून ते

घेतले व गावावर सत्तर हजार रूपये खंड बसविला तेव्हा सुरापूरकर शद्धीवर आला व एक लक्ष पाच हजार रूपये खंडणी देऊन त्याने रावसाहेबास मार्गस्थ केले.[७८] याचवेळी विसाजी कृष्ण बिनीवाले,गोविंद शिवराम खासगीवाले यांच्यामार्फत एक फौज माधवराव पेशव्यांनी सोलापूरकडे पाठविली होती.बाबूजी नाईक सोलापूरचा किल्ला देण्यास तयार नव्हता व त्याने हैदरअलीशी संगनमत सुरू केले होते म्हणून त्याला जरबेत ठेवण्यासाठी माधवराव पेशव्यांनी फौज पाठविली. लवकरच पुढे खासगीवाल्यांच्या मध्यस्थीने सोलापूरचा किल्ला बाबूजी नाईकाने सरकारात दिला. नंतर त्यास एक लक्षाचा जात सरंजाम दिला व बाकीच्या पंच्याऐंशी हजारात त्याने अडीचसे स्वारांची पागा बाळगून सरकारी चाकरी करीत जावी असा ठराव झाला.[७९]

सुरापुराहून माधवराव पेशवे कूच करून मजल–दरमजल तुंगभद्रेकडे जात होते मार्गातच हुबळी या ठिकाणी हैदरखानाचा वकील करीमखान पेशव्यांना भेटला व पुण्यातील वकीलाचे जे बोलणे होते तेच बोलू लागला म्हणुन त्यास हैदरअलीकडे परत पाठविले. तुंगभद्रा तिरी भेटी होतील किंवा अलीकडे ते पहावे. रायदुर्ग, बल्लारी येथे कागद पाठवून संस्थानिकांचे वकील बोलीस आणावे. मुदगल, रायचूर, अदवानी पैका श्रीमंत आल्यावर घ्यावा.दिवस हंगामाचे आहेत,तोफाही पोहचतील. राजश्री बाबूराव कोन्हेर यांची पत्रे आली त्यास तोफांबरोबर पाठवून देतो. आणखी ही लोक नीळकंठराव यांच्याकडील येतात,तेही तोफा बरोबर पाठवून देतो हे पत्र मारोबल्लाळने गोपाळरावास पाठविले आहे.[८०]

माधवराव पेशवे सुरापुराहून कुच करून कृष्णा उतरून गुडगुट्टयावरून तुंगभद्रेच्या रोखाने चालले होते. तिकडून गोपाळराव पटवर्धन कित्तूरच्या देसायाकडून खंडणी घेऊन थोरल्या लष्करा समीप येऊन पोहचले. माधवराव पेशवे ही कृष्णा नदीच्या दक्षिणतीरी देवापूरच्या घाटात मुक्काम करून देवदुर्गाची खंडणी करून तिकडेच येत आहे. संस्थानास पत्रे गेली आहेत. मुदगल सरकार व रायचूर सरकारातील तमाम संस्थानिकांकडून खंडणी घ्यावी, पाळेगार लोकांस चांगली जरब द्यावी. अशी माधवराव पेशव्यांची मसलत होती.[८१] त्याप्रमाणे माधवराव पेशव्यांनी व गोपाळराव पटवर्धनांनी लष्कराचे दोन भाग करून,दोन रस्ते धरून रायचूरच्या हद्दीवर येताच खंडणीचे काम झपाटयाने सुरू केले.हरीराम नावाच्या गृहस्थाकडे त्या प्रांतातील काही परगण्याची मामलत नानासाहेब पेशव्यांनी सांगितली होती, परंतु हल्ली ते परगणे पाळेगार लोक बळकावून बसले होते. गोपाळरावांनी त्या पाळेगारांकडून,भोसकी, लिंगसूर

यासारखी मातब्बर ठाणी काबीज करून त्या प्रांतात मामलेदारांचा पुन्हा जम बसवून दिला तर दुसऱ्या मार्गाने नरसिंगराव धायगुडे पाच–सहा हजार फौज घेऊन गेले व त्यांनी ही अरकुल, येलबर्गे, दुसरी काही महत्त्वाची ठाणी जिंकून घेतली.[८२] माधवराव पेशव्यांच्या हैदरअली विरोधी मोहिमेच्या प्रगतीची माहिती हरीपंत फडक्याने नाना फडणीसास पुढीलप्रमाणे लिहून पाठविली आहे 'इकडील वर्तमान गढवालची खंडणी लाख रूपये झाली हे पूर्वी लिहीलेच आहे. अदवानीकडे सालोसालची बाकी येणे आहे त्याचा ठराव प्रथम तीन लक्षाचा झाला परंतु पैक्याची निशा न पडे,तेव्हा ती गोष्ट राहिली. मुलूख जबरदस्तीने पाच लक्षाचा घ्यावा असे ठरले. भनू, कवताळ, सिदनूर व रवडकुरा ही रायचूर दुआबातील ठाणी अदवानीकर, नबाब बसालतजंग याची होती. या चारही महालात पेशव्यांनी ठाणी घातली. भनूचा किल्ला चांगला एक दिवसात तोफांची मारगिरी करून घेतला. यामुळे तमाम ठाणी घेत चालले. तलालकोटा परगण्याचे ठाणे व किल्ला चांगला त्यास मोर्चे लागले आहेत.एक–दोन दिवसात फैसला करून, चित्रदुर्ग, हरपनहळ्ळीची खंडणी घेऊन शिऱ्यास जातील.मोगलांकडून राजश्री कृष्णराव आले. नबाब बाहेर निघाले ते भागानगरमध्ये आहे त्याचा येण्याचा प्रकार,तर श्रीमंताची पत्रे निकडीने यावे असी गेली तर येतील नाहीतर नाही असे आहे. इकडील अर्थ नबाबाने यावेच असाही नाही. हैदरनाईक कोईमतूरास आहे ,तोही पेचात आहे त्याच्यामते खंडणी उरकावी परंतु पैका अमका देतो असे बोलत नाही. यंदा पैका मिळावा असा डौल दिसतो.मीर फैजुला श्रीरंगपट्टणच्या रानात पाच हजर फौज व बारा हजार गाडदीसह आहे.शिऱ्याची कमर मोडल्याशिवाय वकील यथास्थित बोलत नाही.[८३] या पत्रावरून पेशव्यांची कर्नाटक माहिमेची प्रगती समजते तसेच निजाम, हैदरअली व मीरफैजुला यांच्या हालचालीकडे माधवराव पेशव्यांचे लक्ष होते व ते आपल्या हेराकरवी बिंत्तबातमी मिळवत होते याची ही माहिती मिळते.

अशाच प्रकारचे दुसरे एक पत्र लक्ष्मण नारायण, महादजी नारायण व बाबूराव केशव यांनी मु ।। रायचूर नजीक अडोनी येथून नाना फडणीसास लिहिले आहे त्यानुसार, अडोनी व रायचूर मिळून तीन लाख खंडणी झाली आहे. वसूलाचा जाबसाल होणे आहे. बसालतजंगा कडील जाबसाल झाल्यावर तुंगभद्रा तीरास जातील. राजश्री गोपाळराव पंधरा कोसावर आहे. प्रस्तुत लष्करात महर्गता फारच झाली. जोरी, बाजरी, तीन सेर, चार सेर याप्रमाणे झाली ,मकर संक्रांतीचे तीळ पाठविले आहेत पावलियाचे उतर पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे परंतु

नंतर मात्र माधवराव पेशव्यांनी अडोनीचा खंडणीचा करार हा ३,१५,००० रूपये केला आहे व त्यास हप्तेबंदीही दिली आहे. ७०,००० तुर्त व १००,००० सदर साल घ्यावे परंतु सावकारांनी निशा पक्की दयावी.१४५,००० तीन हप्तेबंदी ५०,००० माघ अखेर,५०,००० वैशाख ,४५,००० ज्येष्ठ मास.

सदरचा हवाला क रुन द्यावा नाही तर मुदगल व नलदुर्ग ओलीस द्यावा [८४] तसेच माधवराव पेशव्यांनी कर्नाटक मोहिमेची माहिती आपल्या मातोश्री गोपिकाबाईस ही दिली आहे. हे पत्र पेशव्यांनी ८ जानेवारी १७६७ रोजी लिहले आहे. तीर्थरूप मातुश्रीबाईसाहेब वडिलांच्या शेवेसी –अपत्य माधवरायाने चरणावर मस्तक ठेऊन सा.न.विज्ञापना येथील मु. देवदुर्ग येथे वडिलांचे आसिरवादे करून सुखरूप असो विाा. वडिलांकडून बहुत दिवस येऊन पत्र कळत नाही तरी पत्र पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान सुरापुराची खंडणी पाऊणे दोन लक्ष (१,७५,०००) झाली. देवदुर्गाची निशा खंडणी पन्नास हजार (५०,०००) झाली. गोपाळराव आदवानी प्रांती खंडणी करीत आहे. आम्ही ही मकरसंक्रात करून तुंगभद्रेवर गोपाळरावाच्या जवळ जातो. हैदरनाईक पेचात आहे. यंदा लवकर मुलूखात आलो यास्तव खंडणीचे निकाल लवकर होत आहे. प्रस्तुत आपली फौज पंधरा हजार जमली आहे. याखेरीज रास्ते,गोपाळराव व शहाजी भोसले देखील नऊ–दहा हजार होतील. बाबूजी नाईकास आणण्यास गोविंद शिवराम सोलापूरास पाठविले आहे [८५] परंतु त्यांच्याकडून परवा स्वार आला नाईक किल्ला सोडून बाहेर येऊन राहिले. किल्ला राजश्री गोविंद शिवराम यांच्या हवाली केला.सहा दिवस झाले नाईकास इकडे घेऊन यावयाच्या मनसब्यात होते,रास्ते गजेंद्रगडास गेले आहे.[८६] याचवेळी माधवराव पेशव्यांनी नरसिंगराव धायगुडे यांच्याकडे तीन हजाराची फौज देऊन त्यांना अरकूल व येलगिरे येथे वेढा घालण्यास पाठविले होते व त्यांच्या बरोबर पथके सहा दिली होती.खासगत,सखाराम बापू, धोंडो दत्तात्रय, महिपतराव कवडे, शहाजी भापकर, गोपाळपंत काळे, याशिवाय पाठीमागून सहा पथके पाठवुन देणार होते. स्वरूपजी मुळे, बाबर, पायगुडे, खंडो गोमाजी, सोयराजी नाईक निंबाळकर व जगताप पणदरेकर इत्यादी .नरसिंगराव ही तिकडील मसलत उरकून माधवराव पेशव्यांस येऊन मिळणार होते.[८७] माधवराव पेशव्यांनी देवदुर्गची खंडणी व सुरापूरची खंडणी करार करून, कडाप्याची निशा चिठ्ठी ही महादशेटजी वीरकर याच्याकडे दयावी अशी व्यवस्था लावून ते पुढे लष्करासह बल्लारीस १६ जानेवारीस

१७६७ रोजी येऊन पोहचले आणि खंडणी व करार श्रीमंताच्या मर्जीप्रमाणेच झाली तसेच केचनगुडची चाळीस हजार खंडणी त्यांच्या मर्जीप्रमाणेच झाली. याशिवाय दरबार खर्चाचे सालाबादप्रमाणे ऐवज नक्त द्यावा नाहीतर सरकारचा, दरकदारांचा पेच पडेल.[८८] यावेळी लष्करामध्ये महागाई फार झाली. दोन दिवस घोडयांना व उंटाना चंदी दिली नाही. दर रूपयास जोरी, बाजरी,चारशेर आहेत ,तांदूळ दर रूपयास दोन अडीच शेर प्रमाणे आहेत धान्य मिळत नाही. याकरिता चार गोण्या दाणे व दोन गोण्या तांदुळ येणे प्रमाणे वडिली समागमे राऊत देऊन आम्हांकडे पाठवून दयावे, तरी जरूर दाण्याची रवानगी करावी. अशी मागणी मोरोबा फडणीसाने पेशव्यांच्या वतीने गोपाळराव पटवर्धानास केली होती.[८९] त्यानुसार पटवर्धनांच्या लष्करातून पाच गोण्या व सात हल्ये भरून दाणे आले. वाणी,उदमी लोकांनी ही धान्य आणून पेशव्यांच्या लष्करास पुरविले . पेशव्यांच्या लष्कराने योवळी तीन गाव लुटल्यामुळे स्वस्ताई झाली होती तसेच गढवाल संस्थानिकांचा वकील मुरलीदास याने पत्र पाठवून तालुक्यास उपसर्ग देऊ नये, म्हणून लिहीले होते. यावेळी हैदरअलीचा वकील करीमखान आला होता परंतू तो लबाड आहे म्हणून त्यास निरोप दिला.[९०] तसेच यावेळी माधवराव पेशव्यांनी गढवाल संस्थानाशी खंडणीचा करार केला तो एक लाखावर ठरला. तूर्त महिन्यात (जानेवारी) निम्मे द्यावे आणि नंतर निम्मे तीन महिन्यांनी पुण्यात द्यावे याप्रमाणे मुरलीदास याने सावकारी निशा करून दिली.माधवराव पेशवे सिदनूरचे ठाणे घेऊन पुढे तुंगभद्रा नदीच्या तीरावर जाऊन पोहचले.[९१] रायचूर व दुआब मध्ये त्याकाळी 'केरू' नावचे छोटेसे संस्थान होते. ते घेण्यासाठी अडोनीचा नबाब बसालतजंग फार खटपट करीत होता. एकटयाच्याने ते काम होईना म्हणून त्याने गुत्तीच्या मुरारराव घोरपडयास मदतीस बोलविले होते.त्या दोघांनी येऊन त्या ठाण्यास वेढा घातला असताना गावकऱ्यांनी माधवराव पेशव्यांकडे मदतीसाठी प्रार्थना केली,त्यानुसार त्यांनी गोपाळराव पटवर्धनास आज्ञा केली की, केरूचा वेढा उठवून संस्थानिकास संकटातून मुक्त करावे. गोपाळरावांनी तात्काळ कूच करून केरूरच्या आसपास गेले व त्याने बसालतजंग ,मुरारराव घोरपडे यास सांगितले की,केरू संस्थान सरकारचे आहे ,तुम्ही वेढा उठवून चालते व्हावे तसे न कराल तर तुम्हास शत्रू समजून मी तुमचे लष्कर लुटीन त्याचे म्हणणे मान्य केल्यासारखे बसालतजंगाने दाखविले परंतु केरू विषयी त्याच्या मनात फार क्रोध असल्याने त्याने गोपाळरावास सलोखा करण्याच्या नादी लावून दगाबाजी करून केरूवर हल्ला केला. त्यावेळी

ठाण्यातील लोकांनी तो हल्ला मोडून काढला व त्याचे दीडशे लोक ठार मारले आणि पाचशे जखमी केले. गोपाळरावास हा दगाबाजीचा प्रकार पाहून संताप आला व त्याने दौड करून वेढा घालणाऱ्यांच्या कहीची घोडी , तोफांचे बैल हिसकावून घेतले नंतर बसालतजंग अडोनीस व मुरारराव गुत्तीस निघून गेला व पूर्वी ठरल्याप्रमाणे माधवराव पेशव्यांस येऊन मिळण्याकरिता सैन्याची तयारी करू लागला.[९२] अशाप्रकारे गोपाळरावाने केरूच्या संस्थानची आपल्यावर सोपविलेली जबाबदारी पार पाडली.

जानेवारी १७६७ मध्ये केचनगुड, गढवाल, बल्लारी, शिदनूर, अडोनी, कर्नूल, कनकगिरी, चित्रदुर्ग, देवदुर्ग, रायदुर्ग इत्यादी लहान मोठया संस्थानापासून खंडण्या वसूल केल्या. खंडण्या ठरविण्याचे काम गोपाळराव पटवर्धनाचे होते परंतु माधवराव पेशवे व सखाराम बापू यांच्या मर्जीस तो ठराव आला तरच खंडणीचा वसूल करण्याची तजवीज होत असे नाहीतर मर्जीप्रमाणे खंडणी न देणाऱ्याचा गाव,परगणा किंवा संस्थान सरसकट जाळून बेचिराख करण्याचा क्रम सुरू होत असे. माधवराव पेशव्यांचा मुक्काम संस्थान रायदुर्ग नजीक असताना सदाशिव अनंत याने नाना फडणीसास पेशव्यांच्या कर्नाटक स्वारीच्या हालचाली, हैदरअली व निजामाच्या हालचाली आणि कर्नाटक येथील संस्थानिकांच्या खंडणीचा ऐवज सांगितला आहे. त्यानुसार १,४३,००० सांा सुरापूर

५५,००० सांा देवदुर्ग

१०,००० सांा गुडगुटे

४,१०,०००सांा चित्रदुर्ग

४०,००० सांा बल्लारी

२५,००० सांा आनेगोंदी

३५,००० सांा केंचनगुड

४०,००० सांा रायदुर्ग

५०,००० खंडण्या गुदस्ता गोपाळराव

१,००००० सांा गढवाल

३०,००० को तलालकोट

२५,००० किरकोळ गावगन्ना

एकूण ९,६३,००० रू.[९३] याशिवाय हरपनहळ्ळीचा वकील आहे तो दीड लक्ष रूपये खंडणी बोलतो. पेशवे म्हणतात निदान तीन लक्षापर्यंत तरी घेऊ,या प्रकारचे वर्तमान आहे. अदवानीची खंडणी तीन लाख पंधरा हजार रूपये करार होऊन पैका वसूल नाही .याजकरिता कसबे भनूस मोर्चे लावण्याकरिता स्वारी गेली. प्रहरपर्यंत दहा तोफांचा मारा झाला आतील किल्लेदार ठार पडला तेव्हा लोकास धीर धरवेना.वकील पाठवून पंधरा हजार खंडणी देण्यास कबूल झाले परंतु ठाणे घालावे म्हणून श्रीमंताची मर्जी याजकरिता ठाणेदाराचे कबिले व शिपाई हत्यारानिशी काढून देऊन ठाणे घातले.भनूचे ठाणे पडताच तमान मुलकात दबाव पडला. संस्थानिकांचा गुंता उरकल्यावर दरकूच शिऱ्यास जाणार. निजामअलीखान भागानगरहून तोफखाना घेऊन पंधरा हजार तोफखान्यानिशी रायचूर नजीक आला आहे. दोन्ही सेनेतील सारा तोफखाना शिऱ्यास लावून किल्ला लवकर फत्ते करावा असा मनसुबा आहे.मीरफैजुल्याने दोन हजार माणसे किल्ल्यात ठेवून बंदोबस्त करून बिदनूर प्रांतास गेला. हैदरनाईक घाटाखाली पंधरा हजार राऊत, वीस हजार पायदल याप्रमाणे आहे. कडप्पेकर,मोगल मिलोन मार्ग धरला आहे.अदवानीच्या मुलखात स्वारी होती तेव्हा हैदरनाईकाचा वकील मुछदी पत्रे सहीत वस्त्रे व खासा व बाबू, गोपाळरावास हाती आणले. श्रीमंत वस्त्रे घेत नव्हते परंतु गोपाळरावांनी रदबदली केली यास्तव घेतली.[९४] अशाप्रकारे माधवराव पेशव्यांनी जानेवारी १७६७ अखेरपर्यंत रायचूर ते दुआब या प्रांतातील विविध संस्थानिकाकडून खंडण्या वसूल केल्या व त्या प्रांतात आपली ठाणी बसविली एकंदरीत एका महिन्यात या प्रांतात पंचवीस लाख रूपये पेशव्यांनी जमा केले होते. यात फडणीस, मुजुमदार, चिटणीस, पोतनीस, हरीपंत फडके, सखाराम बापू, यांच्या कारकूनीचा ऐवज धरलेला नव्हता .कारण त्यांचा वसूल हा निराळा होता व तो रोखीने मिळत असे. हुंडी किंवा सावकारी निशा किंवा हप्त्या हप्त्याने फेड ही खंडणीची होत असे. ‘कारकूनी’ ऐवज मात्र तात्काळ रोख घेतला जात असे.[९५] कर्नाटकातील संस्थानिकांकडून खंडणी वसुलीमध्ये गोपाळराव पटवर्धन, विसाजी कृष्ण बिनीवाले,सखाराम बापू बोकील यांचा या कार्यात मोलाचा सहभाग होता कारण या प्रदेशांची त्यांना जास्त माहिती होती म्हणूनच माधवराव पेशव्यांना या प्रांतात एका महिन्यात पंचवीस लाखापेक्षा जास्त खंडणी वसूल करता आली होती.

इंग्रजाशी दोस्तीचा तह केल्यामुळे निजाम आपल्या मदतीस येणार नाही हे पेशव्यांना माहित होते म्हणून त्यांनी निजामच्या मदतीची वाट पाहिली नाही. निजामअलीचा कित्ता सावनूरच्या नबाबाने गिरवला त्यानेही या मोहिमेत माधवराव पेशव्यांना मनापासून मदत केली नाही.[९६] तसेच कर्नल स्मिथला ही असे वाटत होते की इंग्रज सैन्याच्या मदती शिवाय माधवराव पेशवे कृष्णा नदी पार करणार नाही.त्याचप्रमाणे निजामअलीने ही मराठयांबरोबरच्या शर्ती कृष्णा नदी पार केल्यावर स्थिर ठेवण्याचा प्रस्ताव ठेवला होता म्हणून माधवराव पेशव्यांने आपल्या स्वसामर्थ्याच्या जोरावरती ही मोहिम सुरू केली होती.[९७] माधवराव पेशव्यांनी रघुनाथरावास २९ जानेवारी १७६७ रोजी निजामाच्या भेटी विषयी पुढीलप्रमाने पत्र लिहले आहे की,‘छ.२४ साबानी दरम्यान डेरे दाखल होऊन भेटी आमच्या व त्यांच्या झाल्या त्यावरून आम्ही छ.२५ रोजी त्यांच्या डेऱ्यास गेलो. दुसऱ्या दिवशी ते आमच्या डेऱ्यास आले. परस्पर शिष्टाचाराचे बोलणे झाले,वरकड करार मदाराचा ठराव अद्याप झाला नाही.[९८]

माधवराव पेशव्यांनी देवदुर्गच्या मुक्कामी (८ जानेवारी १७६७) तमाम सरदारांच्या गोटाच्या झडती घेतल्या. राजश्री रामचंद्र गणेश, महादजीपंत गुरूजी, हरीपंत फडके, मोरोबा फडणीस वगैरे मातब्बर पाठविले.समागमे खिजमतगार चोर बातमीने येणे प्रमाणे चौकशी करून पाठविले. राजश्री नारो कोन्हेर जितकर,अक्कलकोटकर शहाजीराजे भोसले यांची गणती घ्यावयास गेले. चांगली घोडी असता वाईट म्हणून निमित्त ठेवून घसघस के ली ,तेव्हा भोसल्यांनी शंभर रुपये कबूल केले, ते रात्री घेतले इतके श्रीमंतास कळले. बोलावून आणून चौकशी केली शेवटी अंगी लाविले रूजवातीने .पहिले एक दुसरे निमित्त होतेच,ढालाईत लावून लष्कराबाहेर लावून द्यावयाची आज्ञा झाली. आज जाईल अथवा उद्या जाईल. साल मजकूरी चौकशीची सीमा आहे.राजश्री नारो खंडेराव याजवर पेच येत होता परंतु काही घेतले नव्हते म्हणून पेच वारला.[९९] यामुळे सरदारात मोठी दहशत उत्पन्न झाली व शिस्त सुधारली. लहान–मोठे सर्व लोक पेशव्यांपुढे कापू लागले. देवदुर्गचा किल्ला हा रायचूरच्या वायव्येस १६ कोसावरच्या अंतरावर आहे.

## १.८ शिरे काबीज –

माधवराव पेशवे भनूचा किल्ला व सिदनूर घेऊन तुंगभद्रा तीरावर जाणार होते व गोपाळराव पटवर्धनास 'केरू ' चे संस्थान घेण्यास पाठविले होते ती कामगिरी त्यांनी उत्तमरितीने पार पाडली आणि मुराररराव घोरपडयास पेशव्यांना येऊन मिळण्याचे आव्हान केले होते त्यानुसार मुराररावाने गोपाळरावास पत्र पाठविली ,'राजश्री गोपाळरावजी दादा गोसावी यासी सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी अंलकृत राजमान्य स्नेहांकित मुराररराव हिंदुराव घोरपडे मामलतदार मदार सेनापती दंडवत. विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करावे .विशेष आपण चार पत्रे पाठविली ती प्रविष्ठ झाली.' राजश्री पंतप्रधान कृष्णापार होऊन गलगल्याच्या तळावरून आम्हास दोन पत्रे पाठविली. आमच्या पत्रातील सारांश भाव जे, खासा स्वारी मजल दर मजल तुंगभद्रातीरास येत आहे. राजश्रीराव सेनापती यांच्या ठाई (आमचा) दुसरा विचार कदापि नाही. या उपर त्यांनी मनात इतर संशय न आणता सत्वर भेटीस यावे याविषयी त्यास ही समर्पक लिहीले आहे व तुम्हीही लिहणे ते लिहून तुंगभद्रा तीरास परस्परे भेटीचा योग घडे तो प्रकार करावा म्हणून पत्र लिहिले .राजश्री नागोरायास (घोरपडयांचा वकील)दाखविले. आपले पत्र आपण पाहिल्यावर कळेल .याउपर पत्र पावताच तुंगभद्रातीरास यावे. हे पत्र आपणास पाठवते तो खासा स्वारी तुंगभद्रातीरास आली असे समजोन निघावे. भेटी झाल्यावर पुढील कर्तव्यता करणे ते आपल्या विचारे करावे.राजश्री पंतप्रधान यांचे मानस तर शीघ्रतेस मोल आहे.'सारांश राजश्री पंतप्रधान इंगिताग्र (मनातले जाणणारे तज्ञ)आहेत. प्रसंगानुरूप विचार सर्वही त्यांच्या ध्यानात आहे. आमचा विचार त्याशिवाय नाही,हे त्यांच्या ही प्रत्ययात असेलच. पंतप्रधान कृष्णापार होऊन पुढे आले. कर्नाटकच्या मनसुब्यास तेज दिले. या उपर सर्व गोष्टी चित्तानुरूप घडून येतील.आम्ही सत्वर स्वार होऊन आपण लिहल्याप्रमाणे हरग्रीवा नदीच्या सुमारे येऊन पुढे आपणास वरचेवर पत्रे पाठवितो. प्रस्तुत राजश्री पंतप्रधान यांची आमदानी कोणते ठिकाणी झाली हे लिहावे. आम्ही मजल दरमजल येऊन भेटून त्यास व आपणास समाधान होईल तोच प्रकार करतो.[१००]

इकडे माधवराव पेशव्यांनी रायदुर्ग प्रांतात खंडणी वसूल केली. यावेळी रायदुर्गचा वकील तिम्माजीपंत आला व गुदस्ता प्रमाणेच खंडणी देऊ म्हणत होता शेवटी चाळीस हजार वसूल केली.याचवेळी कडपेकरांचा कारकून राजश्री आबाजीपंत ही आला होता तसेच

हैदरखानाचा वकील करीमखान ही आला आणि कालपासून बोलू लागला की,(७फेब्रुवारी १७६७)संस्थाने सोडतो,त्यांच्या वाटेस जात नाही. राजश्री मुराररावाच्या मुलुखाचे तर करारात आलेच आहे,आता बेरीज ठरऊन सांगावी नाही तर निरोप द्यावा. आता उगच रहावयाचे प्रयोजन नाही असे आपले आपणच बोलू लागला आहे.[१०१] रायदुर्ग हे स्थल हैदरअलीच्या राज्याच्या ईशान्य सरहद्दीवर होते. येथून पुढे त्याचा मुलूख सुरू होत होता. कर्नोळकरांचा करार मदार करून सखोपंत व भिवराव कर्नोळास पाठविले.हैदरअलीचा वकील एकवीस लक्ष खंडणी म्हणत होता. श्रीमंतानी शिऱ्यास मोर्चेबंदी करावी हा सिद्धांत ठरला आहे. रविवारी तृतीयेस मुहूर्त आहे त्या दिवशी तोफा लागणार.दारूचा अगदी तोटा,याकरिता कृष्णाप्पा नाईक रायदुर्गचा संस्थानिक याचा खंडणीचा करार करून घेतला.होनू फकिराचा गाव आहे,फकिरास दिलेले इनाम गाव. तेथील रखवाली झाली पाहिजे म्हणून माधवराव पेशव्यांनी राऊत पाठवून दिले. आम्ही येथे येणार नव्हतो परंतु श्रीमंतानी दारूसाठी पाठविले. सहाखंडी दारू सरकारात आहे असे पत्र मोरोबाने गोपाळरावास १३ फेब्रुवारी १७६७ रोजी पाठविले आहे.[१०२] याचवेळी माधवराव पेशव्यांनी बल्लारीस सांडणीस्वार दारूसाठी पाठविला होता व त्याने निरोप पाठविला होता की, दारू फक्त सहाखंडी आहे. म्हणून पेशव्यांनी पुण्याहून दारू आणली पाहिजे यासाठी राजश्री बाळाजी पलांडे या सांडणी स्वारास पाठविले आहे. यावेळी पेशव्यांचा मुक्काम हा येडकिरे या ठिकाणी होता. याचवेळी हैदरअलीचा वकील करीमखान हा पेशव्यांचा निरोप घेऊन पंधरा दिवसात येतो म्हणून गेला होता. नाना फडणीसाने पुण्याहून ३६० दारूचे बैल पाठविले होते व ते बल्लारीपर्यत आले होते परंतु दारूच्या शोधासाठी माधवराव पेशव्यांनी बाळाजी पलांडे यास पाठविले. दारू कोठे आहे,काय वर्तमान आहे, दारूचे बैल आले असल्यास उत्तम झाले, बैल थकले असतील तर त्या मोबदल्यात भाडयाचे दुसरे बैल मिळतील ते घ्यावे कदाचित वडीलांचे (नानाचे) दारूचे बैल पोहचले नसल्यास एखादा मुक्काम करावासा झाला तर करावा आणि दारूचे बैल आपणाजवळ आणावे.आपणाजवळ दारूचा तोटा फार ,यास्तव श्रीमंतानी आम्हांस इकडे पाठविले.तो पुण्याहून दारू आली उत्तमच झाले दारूच्या कामासाठी एक मुक्काम वडिलांचा झाला म्हणजे श्रीमंत संतोषीच होतील.[१०३]

मराठे,मोगल व इंग्रज हे तिघेही आपणावर स्वारी करणार हे हैदरअली जाणून होता. यापैकी मोगल व इंग्रजास तो फारसा जुमानत नव्हता. मराठयांस मात्र खंडणी दिल्याशिवाय ते

परत जाणार नाही हे त्यास माहित होते परंतु अगदी हारीस आल्याशिवाय खंडणी द्यायची नाही असा त्याचा नेहमी प्रयत्न होता. मराठयांच्या टोळधाडीचे कसे निवारण करायचे या विवंचनेत हैदरअली होता. कारण मागच्या स्वारीत मराठयांनी आपली कशी दुर्दशा उडविली याची आठवण त्यास ताजी होती म्हणून त्यांच्याशी समोर येऊन झुंजावयाचे नाही हा निश्चय त्याने ठरविला होता . माधवराव पेशव्यांचे लष्कर यावेळी रायदुर्गापर्यंत आले होते म्हणून हैदरअलीला मराठयांना तोंड देणे भाग पडले.[१०४] हैदरने बंगळूर, बिदनूर व शिरे येथे उत्तम बंदोबस्त करून आपल्या सर्व फौजासह श्रीरंगपट्टणात राहिला. मराठयांच्या लष्कराची गती खुंटून त्यांनी अन्न पाण्यावाचून तडफडून मरावे व त्यांना परत जाणे भाग पडावे, दाणा, वैरण, पाणी मिळू नये, या उद्देशाने त्याने तळी फोडून रिकामी केली. विहीरीतून व ओढयातून निवडुंग टाकून पाणी नासून टाकले, वैरण काडी जाळून टाकली, धान्याचा नाश केला व काही जमिनीत पुरून टाकले, वाटेवरची गावे व शहरे उठवून वस्ती, गुरेढोरे दुसऱ्या प्रांतात हाकलून दिली व शेकडो कोसापर्यंत मुलूख  हा ओसाड करून टाकला.[१०५]

अन्न पाण्यावाचून मराठे पुढे येणार नाही अशी हैदरअलीची मसलत होती परंतु संकटांना घाबरणारे मराठे नव्हते हे त्यास लवकरच कळून आले.सर्व मुलूख बेचिराख झाला तरी, मराठयांनी हैदरअलीची सर्व मेहनत व्यर्थ ठरवली व हैदरच्या मुलूखात प्रवेश केला.मराठयांना कोणाच्याही हातून प्रतिबंध झाला नाही.त्यांचा जाण्याचा मार्ग एकच नव्हता तर आसपासच्या पंचवीस कोसापर्यंत लष्कर पसरून वेगवेगळया समांतर मार्गानी ते चालत असे. यामुळे कोठेना कोठे तरी पाणी,धान्य व वैरण थोडीफार मिळत असे. नाहीच वैरण मिळाली तर घरावरचा कुचका पाला, गवताच्या मुळया यावरही जनावरांचा काही दिवस तरी चरितार्थ चालत असे. लष्कर जेथे उतरेल त्याच्या जवळपासची गावातील घरे मोडून आणली म्हणजे पाहिजे तितके लाकूड फाटे मिळत असे. लष्करातील कित्येक लोकांचा धान्य शोधून काढण्याचा धंदाच होता.एक लांब लोखंडी गजबरोबर घेऊन अमूक ठिकाणी धान्य पुरले आहे असे ते नेमके सांगत असे. याशिवाय वंजारी लोक ही दूरदूरच्या ठिकाणाहून धान्य खरेदी करून मराठी लष्करास कधीतरी आणून पुरवीत असे,यामुळे या स्वारीत मराठयांचे बरेच हाल झाले व त्यांच्या लष्करात महागाई फार झाली परंतु उपासमार कधी झाली नाही.[१०६] मराठयांच्या लष्करातील साधी राहाणी व स्वभाव विशेष हे गुण माधवराव पेशव्यांच्या काळात ही दिसून येतात.

माधवराव पेशव्यांची स्वारी रायदुर्गाहून निघून ती हरग्रीवा नदीच्या तीराने थेट शिऱ्याच्या रोखाने चालू लागली. त्या नदीस उन्हाळयात पाणी मुळीच नव्हते परंतु वाळवंटात खणले असता, जागोजागी थोडेथोडे पाणी सापडत असे त्यावरच लष्कराचा निर्वाह चालत असे.[१०७] श्रीमंताच्या आज्ञेवरून गोपाळराव पटवर्धन ही थोरल्या लष्करास जाऊन मिळाले. मराठयांचे सैन्य एवढे अफाट होते की,ते आपल्यावर स्वारी करण्याशिवाय थांबत नाही म्हणून हैदरअलीने करीमखान हा आपला वकील पाठविला. आता तो बोलू लागला की,आपण घोरपडयांचा मुलूख परत देतो. संस्थानिकांच्या वाटेस परत कधी जाणार नाही, आता खंडणी काय घेता ती बोला. पेशव्यांनी पूर्वी पाऊण कोटी सांगितली होती, ती पाच लक्ष कमी करून सत्तर लक्ष सांगितली तेव्हा वकीलाने एकवीस लक्ष देतो तुम्ही परत चला असे बोलू लागला. पेशव्यांच्या अटी हैदरअलीस पसंत पडल्या नाहीत तसेच यावेळी फेब्रुवारी १७६७ मध्ये निजामअली व त्याचा पुत्र पंधरा हजार फौज, तोफखाना व गारदीसह पेशव्यांना सामील झाला म्हणून माधवरावांनी विचार केला की हैदरअलीच्या ताब्यातील शिरे जिंकून घेतल्याशिवाय हैदर काही आपणास शरण येत नाही.[१०८]

माधवराव पेशवे तुंगभद्रेच्या तिरावरील रायदुर्गाहून ७ फेब्रुवारी १७६७ रोजी निघाले व लांब लांब मजली करून १४ फेब्रुवारी रोजी शिऱ्यास पोहचले. सरदेसाई रियासत खंड ५ मध्ये १२ फेब्रुवारीस पोहचले असे म्हणतात ते योग्य नाही.[१०९] शिऱ्याचा किल्ला हा मुळातच चांगला बळकट असून त्याचा बंदोबस्त हैदरअलीने आपला मेहुणा मीररेझा यास आठ हजार गारदी, हजार बाराशे स्वार, काही प्यादे व सात तोफा देऊन त्यास सुभेदार म्हणून नेमले होते.तो फौजेसह डेरे ,राहुटया देऊन शिऱ्यास राहिला होता. तो तोफांची ही मारगिरी करीत होता व निवडक सैन्याच्या जोरावरती आपण किल्ला लढऊ असे त्यास वाटत होते परंतु हैदरअलीला खडे चारणाऱ्या माधवराव पेशव्यांपुढे मीररेझाचे काय चालणार. पेशव्यांनी आल्याबरोबर शिऱ्याला मोर्चे देऊन किल्ल्यावर हल्ला केला. तेव्हा त्याच्या फौजेचा मोड होऊन मीर रेझा मोठया प्रयासाने स्वतःचा जीव वाचवून किल्ल्यात शिरला.[११०] यावेळी शिऱ्याच्या मुक्कामी मुरारराव घोरपडे आपल्या खंडेराव व सिदोजी या मुलांसह श्रीमंतास भेटले ममतेची भाषणे झाली. सखाराम बापूची ही भेट झाली, सकाळी कूच करून जावे व मोर्चे चालावयाची लगट करावी, असा निश्चय ठरला. आपण ही उदया येथेच मुक्काम करावा. मुख्य आपण व आम्हांत

अंतर नाही. जे करणे ते उभयतांनी मिळून करावे असे ठरले नंतर गोपाळराव पटवर्धनांची ही भेट झाली व पुढील मजकूर ठरला.[१११] माधवराव पेशव्यांनी शिऱ्याची लढाई नेटाने सुरू केली. हातघाईची लढाई सुरू झाली. मोर्चे खंदकाजवळ गेले,दोनशे घोडे पाडाव झाले. डेरे राहुटया काही राहिल्या, तोफा खंदकात लोटून दिल्या. आपल्या फौजेने लढाई फार केली. दोन तीनशे त्यांचे माणूस जखमी झाले,चाळीस पन्नास ठार झाले.आपल्या कडील चाळीस पन्नास माणसे व पाच–सहाशे माणसे जखमी झाले.सिदोजी घोरपडे,मालोजी पिसाळ, अमृतराव यादव, बाबाजी पुरंदरे याजकडील कारकून व्यंकटराव यासारखे पंचवीस माणूस ठार झाले.निरापा खताळ व आपाजी मुढे जखमी झाले. मोर्च्यास व बुणग्यात अर्धा कोसाची तफावत आहे. हैदरनाईक श्रीरंगपट्टणास पंचवीस हजार गाडदी व सात हजार फौजेसह आहे.मीरफैजुला बसवापट्टणजवळ पाच–सहा हजार सैन्यानिशी आहे. रोज गोलागोली मातबर होत आहे. तोफा खंदकात लोटल्या होत्या त्या काल रात्री दोन–तीन तोफा मोठा यलगार (प्रयत्न) करून काढल्या. त्यात एक भारी आहे त्याच तोफेने मारगिरी आरंभली आहे परंतु राहिल्या त्याही काढणार.रास्ते मागे राहिले होते ते कालच आले. गोपाळराव मागे आहे एक–दोन दिवसात येतील. निजामअली हा आठ–पंधरा दिवसात येऊन सामील होईल. श्रीमंताचा दबाव भारी पडला आहे. प्रताप थोर झाला आहे. हैदरअलीचे पारिपत्य लवकरच होईल. पहिल्या दिवशी आपणाकडील लोकांनी शर्त केली. अशाप्रकारचे शिऱ्याच्या लढाईचे वर्णन बाजी गोविंद याने पुण्यास लिहून कळविले आहे.[११२] हैदरअलीने शिऱ्याचा बंदोबस्त उत्तम ठेवला होता. शिबंदी, धान्य, दारूगोळा व हरप्रकारचे इतर सामान याची काही एक उणीव नव्हती. या किल्ल्याला माधवराव पेशव्यांनी वेढा दिला तेव्हा त्यांच्या लष्करात फक्त सहा खंडी दारू शिल्लक होती परंतु त्यांनी रायदुर्ग व बल्लारी येथून दारू मिळविली व काही दारूची तरतूद पुण्याहून नाना फडणीसाने आगाऊच केली होती, ती ही आयत्यावेळी उपयोगी पडली.[११३]१७ फेब्रुवारी १७६७ रोजी मुरारराव घोरपडे आपल्या लष्करासह येऊन मिळाले तसेच गोपाळराव पटवर्धन ही येऊन मिळाले.

माधवरावांनी किल्ला घेण्याचे काम नेटाने चालू केले.[११४] याविषयीचे पत्र माधवराव पेशव्यांनी आपल्या मातोश्री गोपिकाबाईस पुढील प्रमाणे लिहून पाठविले आहे, ‘इकडील वर्तमान शिऱ्याच्या खंदकावर मोर्चे गेले या उपरी सुरूंगाचा लगाव होत आहे. आतील किल्लेदाराचा वकील आला आहे त्याचे बोलणे हेच की, मला चाकर ठेवावे,पाच लक्षाची जहागिर द्यावी आणि

चाकरी घ्यावी आम्ही ही करार करून याद पाठविली आहे सत्वर शिरे हस्तगत होईल. खासा नबाब आल्याने कारभारास हिसके फार बसतील. यास्तव पाच हजार फौजेनिशी रूकनुदोलास बोलावले आहे. ते ही सत्वर येणारच आहे. शिरे हस्तगत झाले म्हणजे हैदरअलीस देणे नाही त्याने आग्रह केला तर पन्नास लाख रूपये घ्यावे,तेव्हा फौजेस समजावे लागेल याप्रमाणे मजकूर आहे.[११५] शिऱ्याच्या किल्ल्यामध्ये हैदरअलीचा मेहुणा मीररेझा सैन्यासह होता.त्याला वाटत होते की, हैदरने आपणास कुमक पाठवावी परंतु हैदरअली हा एकदा श्रीरंगपट्टणास दडून बसला तो तोंड सुद्धा बाहेर काढीना त्यामुळे मीररेझाने अशा संकट प्रसंगी,आधीच पराजय झाल्याने नाउमेद होऊन त्याने गोपाळरावा मार्फत श्रीमंताकडे राजकारण लावले की,आपण हैदरअलीचे इतरांजीत आहोत. मजला पदरी घ्यावे त्यावरून श्रीमंताने कबूल केले,एक हजार राऊत, दर राऊतासी दरमहा तीस रूपये व एक हजार गारदी पंधरा शेऱ्याप्रमाणे ठेवायचे कबूल केले व इमान प्रमाण दिले. त्याप्रमाणे आपले इमान श्रीमंतास देऊन काल भेटीस आले,भेट झाली. गोपाळराव गोटास जाऊन राहिले. आज किल्ल्यातून प्यादे निघतील. श्रीमंताच्या पुण्यप्रतापे मोठी फत्ते झाली. मीर रेझा हैदर नाईकाचा चांगला माणूस, चारशे पठाण जवळ चांगले आहेत. यंदा श्रीमंताचा प्रताप या प्रांती फार आहे.[११६] मीर रेझाने गोपाळरावामार्फत कौल मागितला होता त्यावेळी असे ठरले की, मिराने आपली चिजवस्तू, मुले, माणसे व फौज यासह किल्ला सोडून श्रीमंताच्या लष्करात येऊन राहावे. त्या सुभ्यापैकी जितकी ठाणी, गुर्रमकोंडा, हुसकोट यासारखी ठाणी त्याने श्रीमंतांच्या हवाली करावी, या मोबदल्यात मीरास पाच लक्षाची जहागिर द्यावी, त्यामध्ये निम्मी या प्रांती द्यावी व निम्मी गुर्रमकोंडा या सरकारात द्यावी, त्याने दोन हजार स्वार बाळगून पेशवे सरकारची चाकरी करीत जावी.याप्रमाणे करार होऊन मीरास चाकारीस ठेवला.गोपाळराव, मुरारराव यांच्या ही विचारात ही गोष्ट आली की, मीर हा हैदरअलीचा मेहुणा असून मोठा मायेचा सरदार जेव्हा सरकारात आला तेव्हा हैदरअलीस पेचच आहे. दुसरे म्हणजे लढाईत तोफा गमावल्या हे ही हैदरअलीच्या दृष्टीने ठिक झाले नाही आणि तिसरे म्हणजे गुर्रमकोंडा किल्ला सरकारचा मीराने कावा, दावा करून घेतला .तो हैदरअली मागू लागला म्हणजे संघर्ष होईल व हैदरअली त्याची बरीगत ठेवणार नाही. सारांश झाला कारभार सरदारांच्या मनास आला. या पासून उपयोग कामाचा घडावा असाच आहे.[११७] कराराच्या शर्ती श्रीमंताकडून अमलांत येतील याबद्दल गोपाळराव जामीन झाला, तेव्हा

मीररेझा किल्ला सोडून मराठयांच्या लष्करात येऊन उतरला व मराठयांचे निशाण किल्ल्यावर २४ फेब्रुवारी १७६७ रोजी लागले व पेशव्यांची नोकरी करण्याचे त्याने मान्य केले.[११८] याप्रमाणे शिरे फत्ते झाल्याने माधवराव पेशव्यांची मोठी ख्याती होऊन त्यांचा दबाव बसला व त्या प्रातांचा बंदोबस्त करण्यासाठी मुकुंद श्रीपती यास ठेवले. मीररेझाची वस्तभाव झाडून दिली, गोपाळरावांच्या गोटाजवळ त्यास जागा दिली आणि श्रीमंताची महाशिवरात्र ही याच प्रांती झाली.[११९] अशाप्रकारे माधवराव पेशव्यांनी शिरे काबीज केले व मीर रेझास शरण आणले. शिरे प्रांताची मामलत मुकुंद श्रीपती यास सांगितली, फडणिसी राजश्री विनायकदास थथे यास, मुजुमदारी कृष्णाजी गंगाधर शेणवी यास, तर सबनिसी नारो मोरेश्वर सिवणेकर यास सांगितली याप्रमाणे अधिकाऱ्यांचे हुद्दे सांगितले मुकुंद श्रीपत याजवळ पागा व धोंडो दत्तात्रय मिलोन पाचशे स्वार आणि पाचशे गाडदी ठेवले तसेच आठशे प्यादे नवे त्या ठिकाणी ठेवावे याप्रमाणे तेथील नेमणूक झाली.[१२०]

## ४.९ मदगिरी व बाळापूरची प्राप्ती

शिरे जिंकून घेतल्यावर माधवराव पेशव्यांनी गोपाळरावास पुन्हा वेगळे करून बाळापूर वगैरे ठाणे घेण्यास पाठविले व स्वतः कूच करून ४ मार्च १७६७ रोजी मदगिरीस पोहचले.[१२१] श्रीरंगपट्टण प्रांतामधील मदगिरीचा किल्ला हा पहाडी असून चढण्यास फार अवघड आणि डोंगराच्या शिखरावर आहे. तो समुद्रसपाटीपासून चार हजार फूट उंचीवर आहे व त्यात पाण्याचे झरे आहेत. किल्ल्यास पूर्वी मातीचा कोट होता परंतु हैदरअलीच्या ताब्यात हा किल्ला गेल्यानंतर त्याने फारच भरभक्कम अशी तटबंदी तयार केली होती. हा किल्ला उंच असून त्याच्या तीनही बाजूनी सरळ भिंतीप्रमाणे कडे तुटलेले आहेत.तिकडून शत्रूचा काहीच इलाज चालण्याजोगा नाही. पूर्वेच्या बाजूने मात्र वर जाण्यास पाऊल वाट आहे. पण ती इतकी अवघड आहे की, जमीन जर कोरडी असली तरच त्यावर पाऊल ठेवता येत असे. शत्रू आला म्हणजे किल्लेकरी या वाटेवर तेल ओतून ठेवीत असे,इतका हा बिकट किल्ला होता. किल्ल्याच्या खाली शहरपन्हा चिरेबंदी (तटबंदी) होती व हैदरअलीचे ते विश्वासू स्थळ होते.माधवराव पेशव्यांनी त्या किल्ल्यास मोर्चे लावले व एकाच दिवसात हल्ला करून मदगिरीचा मजबूत किल्ला जिंकून घेतला. या विजयात विसाजी पंताचा मोठा वाटा होता. या संघर्षात मराठयांना दहा पंधरा वर्षात मिळाली नव्हती इतकी लूट मिळाली.किल्ल्यावरील लोक कौलास आले. त्यास खाली उतरून

सरकारचे निशाण चढले.[१२२] याच किल्ल्यावर हैदरअलीने १७६३ मध्ये बिदनूरचा राजा सोमशेखर व त्याची आई म्हणजेच बिदनूरची राणी यांना कैदेत ठेवले होते. माधवराव पेशव्यांना ती आता सापडली. पेशव्यांनी त्यांची सुटका करून बहुत बहुमान केला. अशाप्रकारे ज्या किल्ल्यास महिना-पंधरा दिवस सहज लागणार होते. तो पेशव्यांनी फार लवकर म्हणजे एकाच दिवसात जिंकून घेतला.[१२३] त्यानंतर माधवराव पेशव्यांनी मदगिरीच्या सुभ्याची व्यवस्था लावली. सुभेदार म्हणून लक्ष्मण बल्लाळ मेहंदळे यास नेमले, फडणिसी लक्ष्मण गोविंद नारो यास सांगितली. मुजुमदारी खंडेराव कारकून शिलेदार यास व रखवालीस स्वरूपजी खुले यास पथकासह ठेवले होते.अशाप्रकारे येथील बंदोबस्त करून पुढे बाळापूरास जाण्याचा मनसुबा ठरला होता. तोच हैदरनायकाकडील आपाजीराव व करीमखान हे दोन्ही वकील येथे आले, त्यांच्या व पेशव्यांच्या भेटी झाल्या, एक-दोन मुक्काम ही झाले परंतु माधवराव पेशव्यांनी गोपाळराव पटवर्धन व आनंदराव रास्ते यास पुढे चिकबाळापूराकडे रवाना केले. मुरारराव घोरपडे यांची फौज मडिकसरे घेण्यासाठी पाठविली. वकीलांनी खंडणीचा मजकूर सिद्धतेस नेहला नाही. मदगिरीचे ठाणे माघारी द्यावे व तुर्त तीस लाख रूपये घ्यावे असा त्यांचा भाव होता. परंतु श्रीमंताचा मानस मात्र पन्नासास उणे करू नये, सरकारचा तालुका व मुराररावाचा मुलूख झाडून सोडावा, कडप्पे तालुक्यात ठाणी घेतली होती ती सोडावी असा आहे. यंदा हैदरनाईक घाटाखालून फजिती पावून आला. इकडे श्रीमंतांनी येऊन ठाणी घेतली ,नबाबही आदवानी तालुक्यात आला आहे. यामुळे हैदरअलीच्या लोकांनी धास्ती खाल्ली आहे. फौजेचा दबाव चांगला पडला आहे. मदगिरीचा किल्ला लवकर आला म्हणून हैदरअलीने दहशत खाल्ली आहे . मातब्बर खंडणी देऊन मुलूख पहिल्या प्रमाणे सोडल्यास आइकावे ही येथील मर्जी आहे.[१२४] मदगिरी घेतल्यानंतर माधवराव पेशवे कूच करून चेनरायदुर्गाजवळ येऊन राहिले. तर राजश्री मुरारराव घोरपडे मदगिरीच्या पेठेलगतच राहिले. मीररेझा ही मदगिरीजवळच मुक्कामास पेशव्यांच्या नोकरीत हजर झाला होता. मुराररावाच्या मनात मीररेझा बद्दल विलक्षण घृणा ,वैषम्य होते म्हणून घोरपडयांच्या लोकांनी मीर रेझाच्या गोटावर ८ मार्च १७६७ रोजी हल्ला करून त्याची सर्व जिंदगी लुटली. घोडे, हत्ती, उंट झाडून सर्व फौज लुटली गेली. वरकड सर्व गेले व घोरपडयांचे सैन्य बायकांपर्यंत जाऊन पोहचले. ही बातमी माधवराव पेशव्यांस कळताच त्यांनी राऊत पाठवून ताकीद केली की, ज्यांनी घोडी, उंट ,बैल वगैरे नेहली असतील त्यांचे

हात तोडू ,त्यावरून सर्वच ज्या लोकांनी बांधिली होती त्यांनी सोडून दिली. मग चार दोनशे माणसे लावून जी सापडली ती धरली. मीर रेझास वस्त्र देखील राहिले नव्हते. माधवराव पेशव्यांस या घटनेचा परम क्रोध होऊन मुराररावाचा गोट लुटावा असे मनात आणले होते परंतु सखाराम बापूने विनंती केली की,एक झाले म्हणून दुसरे आता केल्याने वाईट,हे समजून कृपा करावी म्हणुन माघे घेतले .राजश्री कृष्णराव व रामचंद्र गणेश आणि बाळकोबा तात्या यास मिराकडे पाठवून त्याचे समाधान केले.आम्हास पाहिल्यावर श्रीमंत फार लज्जित होऊन बोलू लागले. कारण पटवर्धनांच्या विश्वासावर शिरे माधवराव पेशव्यांच्या हवाली करून मीररेझा त्यांच्या लष्करात येऊन राहिला होता. आम्ही उत्तर केले की, आम्ही दरम्यान होतो त्याचे सार्थक झाले म्हणून बोललो आणि डेऱ्यास निघून आलो. श्रीमंतानी बोलावून घेऊन सांगितले की, जी गोष्ट झाली ती फिरून येत नाही आता सांभाळावे.तुम्ही चार गोष्टी सांगून समाधान करावे.वस्त्रे, भांडी वगैरे सामान पाठविले आहे तुम्ही जाऊन यावे नंतर श्रीमंत ही जाऊन येणार आहे. सारांश माधवराव पेशव्यांनी अपराध्यास कडक शासन केले की,त्यामुळे मुराररराव घोरपडे ही पेशव्यांना चळचळा कापू लागला.[१२५] कारण श्रीमंतानी लष्कराच्या लोकांचे, माणसांचे अडीचशांचे हात, कान कापले होते.त्यांना राग आवरेना, केवल रूद्रावतार झाले. श्रीमंताना या गोष्टीचे कठीण वाटले. माधवराव पेशव्यांनी रातोरात वस्त्रे, भांडी, जेवणाचे साहित्य, मिठाई, घोडी, उंट, हत्ती, बैल, ढोरे, तमाम जमा करून मिराकडे पाठवून दिले तसेच नक्त जवाहीर ही दिले. शेवटी रात्री मिराच्या डेऱ्यास श्रीमंत ही गेले व बोलले की, जे झाले ते झाले. अतःपर तुम्ही चित्तात विपर्यास न मानावा तसेच ज्या लुच्च्यांनी केले त्यांचे पारिपत्य श्रीमंतानी केले. तुमचे सर्व प्रकारे उर्जित करणे श्रीमंतास जरूर आहे.[१२६]

मदगिरी काबीज केल्यावर माधवराव पेशव्यांनी चेनरायदुर्गास वेढा दिला व दुसऱ्या तुकडीने गोपाळरावाच्या नेतृत्त्वाखाली जाऊन थोरले बाळापूर घेतले.धाकटे बाळापूर मजबूत होते त्याच्या भोवती खंदक होता व आत दोन हजार शिपाई होते. परंतु गोपाळराव पटवर्धन व आनंदराव रास्ते यांनी तोफांच्या माऱ्याने तटबंदी पाडून हल्ल्याची तयारी केली ,तेव्हा किल्लेकरी शरण येऊन त्यांनी किल्ला हवाली केला नंतर त्यांनी चिकबाळापूरास शह दिला. किल्ल्याहून तोफांचा भडीमार चालला असतानाच हल्ला करून शहर घेतले आणि किल्ल्यास मोर्चे लावले. तेव्हा आतील लोक भयभीत होऊन शरण आले व तो किल्ला मराठयांच्या हाती आला. नंतर

त्यांनी चिकबाळापूरच्या भोवतालचे नंदीदुर्ग, इतिकालदुर्ग वगैरे पहाडी किल्ले आहेत. ते राजकारण करून किंवा जरब देऊन हाती येण्याजोगे होते परंतु तो बेत रहित केला व चिकबाळापूरच्या बंदोबस्ताकरिता आनंदराव रास्ते यास ठेऊन गोपाळराव थोरल्या लष्करास येऊन मिळाले.[१२७] तत्पूर्वीच हैदरअलीचा वकील गोपाळरावास येऊन भेटला. त्याची बोली की, शिरे ,बाळापूर घेतले ते घेतले आता दुसरी जागा घेऊ नये.मदगिरी, पटणची माघारी द्यावी. तीस लक्ष रूपये खंडणी देतो. श्रीमंताचा मानस की, पहिला सरकारचा तालुका(शिरे)सोडावा व मदगिरी नवा किल्ला घेतला हा सोडू नये. सटवोजीराव जाधव या संघर्षामध्ये मारला गेला, त्यास १७ मार्च १७६७ रोजी देवाज्ञा झाली, मातबर सरदार गेला.[१२८] यावेळी निजामअली हा रायदुर्गजवळ आला होता व खंडण्या घेत येत होता.

## ४.१० चेनरायदुर्ग व इतर ठाण्यांची प्राप्ती

मदगिरीचा किल्ला ताब्यात आल्यावर माधवराव पेशवे कूच करून दोन कोस जवळच असलेल्या चेनरायदुर्गास१० मार्च १७६७ रोजी आले. हा किल्ला श्रीरंगपट्टणच्या प्रांतात मोझ्त होता. या वेळी गोपाळराव व रास्त्यांनी थोरले बाळापूर व दोड्डबाळापूर यासारखी ठाणी जिंकून घेतली होती आणि माधवराव पेशव्यांनी चेनरायदुर्गास मोर्चे लावले होते, हा वेढा दहा दिवसापर्यत चालू होता.[१२९] नंतर दोन तीन रोज खासा स्वारी जात होती परंतु हल्ल्याची योजना होत नव्हती. दररोज तोफांची मारगिरी किल्ल्यावरच्या बुरूजावर होत होती.तटबंदी साफ ढासळून पडल्यावर जोराचा हल्ला करून माधवराव पेशव्यांनी मजबूत पहाडी किल्ला चेनरायदुर्ग काबीज केला.[१३०] मराठयांनी मारलेली मुसंडी लक्षात घेऊन हैदरअली तहाची बोलणी करण्यास सरसावला. विशेषतः मदगिरी किल्ल्याचे महत्त्व त्याला जास्त वाटत होते. माधवराव पेशव्यांनी हा किल्ला परत आपल्या ताब्यात दिल्यास त्यामोबदल्यात ३५लाख रुपये खंडणी देण्याचे त्याने कबूल केले होते परंतु पेशव्यांनी हा किल्ला परत देण्याचे नाकारले व आणखी ४० लाख रूपये मागितले.[१३१] चेनरायदुर्ग काबीज केल्यानंतर माधवराव पेशव्यांनी दोन बाळापुरे, देवनहळ्ळी, नंदीगड व हुसकोटे, कोलार याप्रमाणे महत्त्वाची ठाणी जिंकून घेतली आणि सर्व प्रांतात मराठयांचा अमंल बसविला. याचवेळी हैदरअलीचा वकील करीमखान येऊन भेटला व पुन्हा आठ दिवसांनी श्रीरंगपट्टणला जाऊन येतो म्हणून गेला. मोगल मदगिरीवर १६ कोसावर होता. लवकरच येऊन मिळणार पेशव्यांचा या प्रांती छावणीचा मनसुबा आहे परंतु देशी जाणे

जरूर यामुळे विस्कळीत दिसते.कारण लष्करात रोग फार झाला आहे.दिवस मसलतीचे नाही.मजला (पेशव्यांना) आठ–चार दिवस ताप येतो. केवळ शरीर अशक्त वरचेवर उपद्रव होतो म्हणून माधवराव पेशव्यांनी कर्नाटकात छावणी केली नाही.[१३२]

एकंदरीत मार्च व एप्रिल १७६७ मध्ये या दोन महिन्यात पंचवीस ते तीस लाख रूपये उत्पन्नाचा मुलूख माधवराव पेशव्यांनी मराठयांच्या राज्यास जोडला होता. नानासाहेब पेशव्यांच्या काळात या कर्नाटक प्रांती मराठयांची जितके राज्य होते. तितके सर्व आता पुन्हा त्यांच्या ताब्यात आले. याशिवाय चिकबाळापूर, गुडिबंडा, नामगुंडल यासारखी काही नवीन स्थळे हातास आली होती. या ठाण्यात माधवराव पेशव्यांनी मुराररराव घोरपडयांचे लोक शिबंदीकरिता ठेवले. ज्या उद्देशाने ही स्वारी करण्यात आली होती ते उद्देश आता बहुतेक पूर्ण झाले होते. घोरपडयांचा मुलूख व कर्नाटक बालेघाटचा म्हणजेच 'शिरा'सुभा हा माधवराव पेशव्यांनी हैदरअलीपासून हिसकावून घेतला होता.पेशव्यांचे मांडलिक संस्थानिक त्या प्रांतात होते, त्यास आपण उपद्रव देणार नाही. हे हैदर अलीकडे कबूल करत होता फक्त त्याकडून खंडणी यावयाची राहिली होती. ती आली म्हणजे त्या प्रांती राहण्याचे माधवराव पेशव्यांना काहीच प्रयोजन नव्हते. ते काम लवकर उरकून परत जावे असे त्यांच्या मनात होते.[१३३] कारण माधवराव पेशव्यांचे जवळजवळ सर्वच हेतू साध्य झाल्यासारखे होते. हैदरअलीच्या ताब्यात फक्त बिदनूर व श्रीरंगपट्टण ही दोनच स्थळे राहिली होती.[१३४]

## ४.११ माधवराव पेशव्यांनी मोहिम आटोपती का घेतली

यासाठी दक्षिणेतील निजाम, इंग्रज व हैदरअलीच्या हालचाली, माधवराव पेशव्यांची स्वारीची स्थिती, आणि रघुनाथरावाचा मराठयांच्या राज्यातील सुरू झालेला उपद्रव इत्यादी सारख्या घटना कारणीभूत झाल्या असाव्यात.हैद्राबादचा निजाम हा पेशव्यांच्या सांगण्यावरून डिसेंबर १७६६ मध्ये कर्नाटकच्या स्वारीवर निघाला होता व त्याच्या बरोबर ३६,००० हजार सैन्य होते तसेच इंग्रजाचा प्रतिनिधी स्मिथ होता परंतु इंग्रजांचे कवायती सैन्य अद्याप आले नव्हते.त्यांची गती एवढी मंद होती त्यामुळे स्मिथला वाटत होते की, इंग्रज सैन्य येऊन मिळाल्याशिवाय निजाम कृष्णा नदी पार करणार नाही ,पण याच दरम्यान त्याने आपले वकील पेशव्यांकडे रवाना केले आणि हैदरच्या वकीलास ही भेटीस बोलाविले. तेव्हा त्याने निजामाने या युद्धात तटस्थ राहण्याची किमंत बोलावी असा प्रश्न केला.[१३५] निजामअलीच्या वकिलास

हैदरअलीने लाच दिली असावी कारण निजामाचा कारभारी आता सांगू लागला की,आता पर्यंत पावसाळा समीप येऊन ठेपला तर ,आता स्वारीचा काय उपयोग, स्वारी आता रद्द करावी, पुढल्या वर्षी जावे. फेब्रुवारी १७६७ च्या अखेर पर्यंत निजामाकडे नियमबद्ध असा कोणताच कार्यक्रम नव्हता. निजाम हा मार्च मध्ये अनगुंदी व चितळदुर्ग पर्यंत येऊन पोहचला होता.[१३६] यावेळापर्यंत माधवराव पेशव्यांनी शिरे जिंकून त्या प्रांताची व्यवस्था लावली होती आणि मीररेझास आपल्या चाकरीत ठेवून घेतले होते.२७ फेब्रुवारी १७६७ मध्ये माधवराव पेशव्यांनी राजश्री धोंडाराम यास पुढीलप्रमाणे पत्र लिहीले की, तुम्ही विनंती पत्र छ.२७ रमजान मौजे मनरीकोटी परगणा गुडगुट्टा येथील मुक्कामाहून पाठविले ते छ.२ सवाली (मार्च) प्रविष्ट झाले. नबाब गुरगुटे यांचा खंडणीचा फैसला करून मुक्काम मजकुरास आले. अनगुंदी रोखे येतात.शिऱ्याचा मजकूर मीररेझाची फौजेची लूट व मोर्चेबंदीचा नबाबास व रूकनदौला आणि शेरजंग यास निवेदन केला संतोषी झाले. त्यांनी उत्तरे पाठविली आहेत त्याजवरून विदीत होईल म्हणून लिहिले ते कळले. ऐशास नबाबानी गुडगट्टे येथील खंडणीचा फैसला केला,उत्तम परंतु अनगुंदीकडे येणार तर खासा स्वारी इकडे येऊन – रायदुर्ग, हरपनहळ्ळी केंचनगुड, अनगुंदी, चितळदुर्ग, बल्लारी अशी सात संस्थाने खंडली आहेत. या संस्थानास नबाबाचा तिलप्राय उपद्रव न लागावा. या संस्थानात ताकद राहिली नाही. हैदरखानाच्या उपद्रवामुळे फार खराब आहेत. तरी उपद्रव न लागावा व या मार्गानेच यावे.आम्ही क ोलारच्या रोखे जातो,नबाबानी बागेनहळ्ळी ड ावी ट ाकू न यावे पुढे फ ौजा रूकनउद्दौलानी यावे म्हणून लिहिले आहे. तुम्ही त्यास सांगतिले असता अनगुंदीचा रोख धरावा असा अर्थ नाही. तरी उचित रितीने रूकनउद्दौला व शेरजंग यास सांगून पहिल्या लिहल्या प्रमाणे नबाबाचा रोख होय ते करणे[१३७] या पत्रावरून माधवराव पेशव्यांनी आपल्या वकीलास निजामाने आपल्या सैन्यापासून दूर राहावे. पुढे रूकनउद्दौलास व शेरजंगास सैन्यासह पाठवावे आणि मराठयांच्या अंकीत झालेल्या सात संस्थानिकांना निजामाने उपद्रव देऊ नये. ही जी कामगिरी सांगितली होती ती यशस्वी झाली असे दिसून येते.

निजाम भागानगरहून निघून रायचूरवरून खंडणी घेत बल्लारी पर्यंत आला होता. परंतु त्याचे सोबती मद्रासकर इंग्रज मात्र अद्याप ही मद्रास सोडून बाहेर निघाले नव्हते. निजामास एकटयाने शत्रूच्या प्रदेशात शिरावे तर त्यास धीर होईना.याकरिता पेशव्यांना येऊन

मिळण्याविषयी तो आता आतूर झाला होता. निजामाची मोहिम अद्याप सुरू होणार होती तर पेशव्यांची मोहिम संपत आली होती.तसेच पेशव्यांचा असा उद्देश होता की,आपले काम झाले आहे.आपण परत फिरावे. मोगल, इंग्रज व हैदरअली यांच्यात काय भानगडी असतील तर त्यांच्या ते पाहून घेतील ,आपणास त्यामध्ये पडण्याचे कारण नाही. शिवाय मोगल आपणाकडे आला म्हणजे त्याने स्वारीच्या कामात काहीच मदत केलेली नसून ही आपण जो जिंकलेला मुलूख, निदान खंडणी तरी त्यास दयावी लागणार. तेव्हा असला सोबती काय कामाचा म्हणून शिरे, मदगिरी, दोन्ही बाळापूरे घेतल्यानंतर निरोप पाठविला की, तुम्ही आमच्या लष्करापासून चाळीस कोसाच्या अंतराने राहावे व रूकनुद्दौला आणि शेरजंगास पुढे पाठवून देणे.[१३८] मोगलांच्या वकीलास चर्चेत गुंतवून माधवराव पेशव्यांनी एप्रिल १७६७ पर्यत देवनहळ्ळी, होसकोट, नंदीगड व कोलार ही ठाणी आपल्या ताब्यात घेतली. निजाम आपली आणखी फौज घेऊन पेशव्यांना मिळत आहे.ही बातमी कळताच हैदरअली घाबरला व त्याने पेशव्यांकडे वाटाघाटी  करण्यासाठी आपला वकील आपाजीराम यास गोपाळराव पटवर्धना मार्फत कळविले की, अर्काटचा महंमद अली व इंग्रज यांच्या विरूद्ध आपण संयुक्त लढाई देऊ.माधवराव पेशव्यांनी त्यास उत्तर दिले की, निजाम आपला मित्र असून ,निजामाचा मित्र जो इंग्रज तो ही आपला मित्र. आम्हा तिघांचे उत्तम रितीने ऐक्य असून,तिघांनी मिळून हैदरअलीचे पारिपत्य करण्याचा पूर्वीचा संकल्प अद्यापही कायम आहे. आम्ही मंगलोरवर चाल करून जाणार आणि निजाम श्रीरंगपट्टणला चाल करून जाणार,हे ऐकताच हैदरने आपले वकील मराठयांकडे पाठवून तहाचे बोलणे लावले.यावेळी पावसाळा समीप आलेला होता.पेशव्यांकडील पैशाची तरतूद संपुष्टात आलेली होती. निजाम आला म्हणजे त्यास अर्धा वाटा विनाकारण द्यावा लागेल.[१३९] तसेच मराठयांच्या राज्यामध्ये रघुनाथरावाने उपद्रव देण्यास सुरूवात केली होती इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन पेशव्यांनी आपली मोहिम आटोपती घेऊन हैदरअलीशी तह केला.

## ४.१२ हैदरअलीशी तह व माधवराव पेशव्यांचे पुण्यास आगमन

एप्रिल १७६७ मध्ये माधवराव पेशव्यांनी कोलार, होसकोट , आलूर, देवनहळ्ळी, मिडगेसी इत्यादी परगणे व ठाणी जिंकून घेतली. याचवेळी निजामअली हा मराठयांच्या मदतीस कर्नाटकामध्ये येण्यास निघाला आहे. या बातमीने हैदरअली घाबरला होता.यावेळी माधवराव पेशव्यांचा मुक्काम कर्नाटकातील बंगलोर जिल्हयातील निडगे तालुक्यातील आळूर येथे होता.[१४०]

यावेळी हैदरअलीने आपला वकील आपाजीराम यास बोलणीसाठी पाठविले होते. त्याच्याशी पेशव्यांची बरीच चर्चा झाली व तो सहा दिवसाचा वायदा करून गेला,आठ दिवस झाले तरी आला नाही.[१४१] हैदरच्या वतीने वकील म्हणत होता की, तुमचे सर्व मुद्दे मी कबूल करतो, अठ्ठावीस लक्ष रूपये खंडणी देतो, इतके कबूल केल्यावर तुम्ही ही कृपा करून माझी एक गोष्ट ऐकावी. माझा मुलूख तुम्ही घेतला आहे तो परत द्यावा, त्याबद्दल मी तुमची नोकरी बजावण्यास तयार आहे. ती नोकरी अशी होती की,महमंदअली व इंग्रज यांच्यावर तुम्ही स्वारी करीत असाल तर त्या कामी मी सर्व सैन्यानिशी मदत करतो.हे त्याचे बोलणे गोपाळरावा मार्फत चालले होते व श्रीमंतानी ते कबूल करावे असा गोपाळरावाचा आग्रह ही होता.परंतु त्या बोलण्यात हैदरअलीचा एक पेच होता तो असा की,इंग्रज आपणावर स्वारी करणार आहेत. त्या आधीच इंग्रज व मराठयांची झोंबी लावून द्यावी म्हणजे दोघेही आपोआप हीनबल होतील. त्यात मराठयांचा मोड झाला तर आपण मदत करणारे अर्थात दुय्यम दर्जाचे असल्याने आपली अपकीर्ती फारशी होणार नाही.शिवाय दुर्बल झालेल्या मराठयांपासून आपला मुलुख हिसकावून घेता येईल आणि मराठयांची सरशी झाली तर बोलून चालून मुलूख परत देण्याची त्यांनी बोलणीच केली आहे. हा अभिप्राय माधवराव पेशव्यांनी ओळखला होता.[१४२] म्हणून पेशव्यांनी हैदरअलीवरच डाव टाकला कि, निजाम आपला मित्र असून निजामाचा मित्र इंग्रज तोही आपला मित्र आहे. आम्ही तिघांनी पूर्वीच हैदरचे पारिपत्य करण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार आम्ही बंगळूरकडे सर्व सैन्यानिशी कुच केले, आता बंगळूर ही घेणार आणि निजाम आल्यावर श्रीरंगपट्टण ही घेणार यामुळेच हैदरने पेशवे सांगतील त्या शर्तीवर तह करण्याचे कबूल केले.[१४३]

याच दरम्यान पावसाळा सुरू झाला होता.नदयांवर नावा ही नव्हत्या. माधवराव पेशव्यांनी नाना फडणीसास पुण्याला सांडणी स्वाराबरोबर एक दोन पत्रे पाठविली होती, त्यात कपिलासंगम कृष्णा नदीच्या उत्तर तीरावरून मजल दरमजल स्वारी पुण्यास येत आहे. त्याचबरोबर ओझ्यास उंट नाही यामुळे खोळंबा झाला आहे. माधवराव पेशव्यांचे पत्र येताच नाना फडणीसाने पुण्याहून दहा उंट रवाना केले होते. ते आज सकाळी दाखल ही झाले असेल व तेथे राजश्री नारोशंक र वगैरे गृहस्थाचे उंट आहेत त्यांनाही पत्र पाठविले आहे. त्यावरून ही तरतूद झाली असेल आणि आपली स्वारी निघाली असेल.उंट विकत घेणार होतो परंतु मिळेनात व लोकांच्या ही जवळ नाहीत. दहा होते ते पाठविले,लवकर निघोन आल्यास फार

उत्तम अशाप्रकारचे पत्र नाना फडणीसाने गोपिकाबाईस ३० एप्रिल १७६७ रोजी पाठविले आहे.[१४४]

हैदरअली मराठयांशी तह करण्यासाठी फारच आतूर झाला होता. त्याने आपला वकील आपाजीराव व पेशव्यांतर्फे गोपाळराव पटवर्धन यांच्यात वाटाघाटी होऊन ३ मे १७६७ रोजी चर्चा झाली.यावेळी महादशेट(सावकार)निशेसाठी हैदर नाईकाकडे गेला. रूकनुउद्दौला येऊन भेटला. चार दिवसांनी महादशेट आल्यानंतर विसाजी कृष्ण या अनुभवी सरदाराच्या समवेतच ७ मे १७६७ रोजी तह घडून आला.[१४५] त्यानुसार असे ठरले की,१. नानासाहेब पेशव्यांच्या वेळी जितका मुलूख मराठयांच्या ताब्यात होता. तितका सर्व त्यांनी आपणाकडे ठेवावा याशिवाय शिरे, चेनरायदुर्ग, मदगिरी, थोरले बाळापूर, हुसकोट ही ठिकाणे माधवराव पेशव्यांनी स्वतःकडे ठेवावी.

२. या स्वारीत हैदरअलीचा जितका नविन मुलूख जिंकला असेल तितका परत करावा.यामध्ये चिकबाळापूर, नंदगिड, कोलार, बसवापट्टण इत्यादी ठाणी होती.

३. कोलार मराठयांनी जिंकले होते ते परत करावे. कारण कोलार ही हैदरअलीची जन्मभूमी असून तेथे त्याच्या बापाची कबर आहे, परंतु खंडणीची रक्कम फेडेपर्यत हे ठाणे मराठयांच्या ताब्यात ठेवावे.

४. हैदरअलीने पेशव्यांचे मांडलिक संस्थानिक असतील तर त्यांच्या वाटेस जाऊ नये व मुरारराव घोरपडयास ही उपद्रव करू नये.

५. हैदरअलीने ३३ लक्ष रूपये युध्द नुक्सानभरपाई खंडणी पेशव्यांस द्यावी. त्यापैकी निम्मे रोख, निम्मे अश्विन पर्यत दोन हप्त्याने द्यावे.

६. याशिवाय मोगलांची पेशकसी(नजराना)दरसाल सहा लक्षा प्रमाणे तीसाला अठरा लक्ष खंडणी हैदरअलीने द्यावी, निजामाने हैदरच्या मुलूखावर स्वारी करू नये.

७. कडप्पा व गुर्रमकोंडा ही दोन ठाणी मीररेझाच्या ताब्यात होती. तो सरंजाम त्याजकडेच करार करून दिला.अशाप्रकारच्या अटी होऊन हा तह कायम झाला.[१४६]

या करारातील खंडणी संबंधी निरनिराळे उल्लेख सापडतात व त्यात तफावत आहे. गोपाळरावाच्या पत्रात हैदरची खंडणी ३१ व मोगलांचे १४ असे एकूण ४५ लाख घेतले असे दिसून येते.[१४७] परंतु पेशव्यांनी ७ मे १७६७ रोजी पत्र लिहीले आहे– इकडील वर्तमान

अलीकडील मजकूर हैदरखानाचा तेहतीस लक्षाचा करार झाला. इतःपर इकडे गुंता राहिला नाही.मजल दरमजल पुण्यास येतो. आपणास कळावे बहुत काय लिहणे.[१४८] तर मराठयांचा इतिहासकार ग्रँट डफने ही खंडणीची रक्कम ३० लक्ष असल्याचे लिहिले आहे. तसेच कर्नल विल्कने व लुई राईसने ही रक्काम ३५ लक्ष होती असे लिहीले आहे.[१४९]

या खंडणीच्या कराराविषयी निजामाला पेशव्यांची मध्यस्थी मान्य नव्हती. कराराच्या शर्ती उरकून पेशवे साडे सोळा लक्ष रूपये रोख घेऊन लष्करासह परत फिरण्याच्या बेतात होते व मोगलास त्यांनी कृष्णराव बल्लाळ याकडे सांगणे पाठविले की, स्वारी केल्याशिवायच आमच्या मध्यस्थीवरून तुम्हास हैदरअली खंडणी देत आहे. ती घेऊन तुम्ही माघारी फिरावे. मोगलास हा मनसूबा आवडला नाही. कारण त्याची सारी भिस्त इंग्रजावर होती. इंग्रज स्वारीची तयारी झपाटयाने करीत होते. आपण मराठयांना फसविण्याचा बेत केला तो एकीकडे राहून त्यांनीच आपणास फसविले याचे त्यांना वाईट वाटले होते.कारण मराठयांनी आधी येऊन आपला हात उगवावा व कंटाळून फुटून परत जावे हे योग्य नाही. तथापि जाणे असल्यास त्यांनी मिळालेली खंडणी ,लूट व मुलूख यांची वाटणी आम्हा दोघांस दिली पाहिजे  असे ते बोलू लागले. पण मराठयांनी मुळीच जुमानले नाही.[१५०] याचवेळी मद्रासकर इंग्रज व हैदरअली यांच्यातील संघर्षाला सुरूवात झाली होती. इंग्रज हैदरच्या संघर्षाला एवढे कंटाळले होते की, त्यांनी माधवराव पेशव्यांची मनधरणी चालू केली होती. सन १७६७ मध्ये त्यांनी आपला एक वकील कर्नल टॉड याला कर्नाटकात माधवराव पेशव्यांच्या भेटीस पाठविले तो लिहीतो की,इंग्रजांच्या वकीलाला मराठयांकडून अशी अप्रतिष्ठा सहन करण्याचा अनुभव यावा, हे लिहीण्याची सुद्धा मला शरम वाटते. मुकाटयाने मला हे सर्व सहन करणे भाग पडले.मनात एवढा त्वेष वाटत होता पण तो सर्व गिळून बसलो.[१५१] तसेच एक मोगल सरदार व एक इंग्रज अमंलदार पेशव्यांकडे येऊन वाटणी देण्याविषयी बोलू लागले. तेव्हा दरबारात मोठा हशा पिकला होता. अशाप्रकारे माधवराव पेशव्यांनी खंडणीच्या मागणीची वाटणी फेटाळून लावली होती.[१५२]

माधवराव पेशव्यांनी हैदरअलीबरोबर तह झाल्यानंतर महादशेट(सावकार) श्रीरंगपट्टणास जाऊन ऐवजाची निशा करून घेतली. काही रोख ऐवज म्हणजे ९ लाख घेतले व उरलेले साडेसात लाख सावकाराला पुण्यास घेऊन येण्यास सांगितले व मे च्या सुरूवातीलाच आपल्या सैन्यास आणि तोफखान्यास पुण्याला पुढे पाठवून देण्याचा हुकूम दिला. छावणीस

फौज राजश्री गोपाळराव व रास्ते यांची ठेवली.[१५३] तसेच नवीन मिळालेल्या प्रदेशाची देखरेख मुराराव घोरपडे सेनापती यांच्याकडे पुढीलप्रमाणे लावून दिली.पाच सेनापतीस पाच लक्षाचा सरंजाम द्यावयाचा करार केला. त्यापैकी संस्थानच्या खंडणीचा ऐवज पेस्तर सालापासून सरंजाम करार करून दिला. तरी याशी रूजू होऊन खंडणीचा ऐवज देत जाणे म्हणून संस्थानिकास सनदा–

१. संस्थान रायदुर्ग निसबत तिमपा नाईक

१. संस्थान पावागड निसबत व्यंकटपती तिमपा नाईक

१. संस्थान हुसकोटे खुर्द, निसबत रामापा नाईक

१. संस्थान रत्नागिरी निसबत वीर रंगपानाईक

१. संस्थान नीलगड निसबत वीर तीमपा नाईक

एकूण पाच संस्थानचा पैका घ्यावा, संस्थान घेऊ नये येणे प्रमाणे करार तसेच परगणा वज्रकरू पाच लक्षाचा सरंजाम करार करून सरकारचा अमंल चालावा म्हणून जमिनदारास सनद, परगणे कोप्पल चालावा म्हणून हरीराम व आबाजी विश्वनाथ यास सनद, आणि पेठ बाळापूर बुद्रुक निसबत महिमानजी शिंदे याजकडून पंचवीस हजाराचा करार करून जहागीर दिला आहे.[१५४] या दक्षिण कर्नाटकच्या मोहिमेत पेशव्यांना अनेक मराठा सरदारांनी पूर्ण सहकार्य दिले होते. यावेळी मराठयांनी कर्नाटकमध्ये छावणी केली असती तर हैदरअलीला पूर्णपणे नेस्तनाबूत करता आले असते .परंतु याच वेळी माधवराव पेशवे व रघुनाथराव यांच्यामध्ये बिघाडाला सुरुवात झाली होती. क ारण रघुनाथराव उत्तरेच्या मोहिमेवरुन परत आले व त्यांनी राज्याची वाटणी मागण्यास सुरुवात केली . त्यामुळे पेशव्यांना रघुनाथरावाच्या उपद्रवामुळे कर्नाटकची मोहिमे आटोपती घ्यावी लागली. माधवराव पेशवे मजल दरमजल करत ते परत फिरले.[१५५] २७ मे १७६७ रोजी दक्षिणेकडील मोहिम पूर्ण होऊन माधवराव पेशवे तुंगभद्रा, कृष्णा नदी उतरून, फौजेचे नालबंदीचे काम उरकून २३ जून रोजी वानवडी येथे पोहचले व २८ जून १७६७ रोजी फौजेस निरोप देत देत ते पुण्यास येऊन पोहचले.[१५६]

## ४.१३ समारोप

पेशव्यांच्या अंतर्गत विरोधकात जानोजी भोसलेचा समावेश होता व त्याने रघुनाथरावाशी संधान सांधून पेशव्यांना आव्हान दिले होते म्हणून पेशव्यांनी त्यावर मोहिम काढून त्याचा बंदोबस्त केला व त्यास खोलापूरचा तह मान्य करण्यास भाग पाडले. बाबूजी नाईकने बंड केले. त्याचा बंदोबस्त पेशव्यांनी विसाजी कृष्ण, रामचंद्र कानडे व शहाजी भोसले यांना करण्यास पाठविले. भवानराव प्रतिनिधीने सातारा प्रांतात बंड केले. ही समस्या पेशव्यांनी रामचंद्र गणेश कानडे या सरदाराच्या मदतीने सोडविली. दक्षिण धोरणामध्ये निजामाचे साहय मिळावे यासारखे विविध हेतूने पेशव्यांनी निजामाबरोबर १७६६ मध्ये सलोख्याचा मैत्रीचा तह केला. यामध्ये हैद्राबादचा पेशव्यांचा वकील धोंडेराम व शेरजंग या सरदाराने महत्त्वाची भूमिका बजावली होती. परिणामी दोन्ही राज्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळालेली दिसून येते.

१८ व्या शतकात मराठे, निजाम, हैदर ,इंग्रज व फ्रेंच यांचे दक्षिणेकडे आर्थिक हितसंबंध गुंतले होते. सन १७६५–१७६६ पर्यत पेशवे इतर कामात गुंतल्याने दक्षिणेकडे लक्ष देण्यास वेळ मिळाला नाही. पेशवे निजाम मैत्रीचा तह इंग्रजांना आवडला नाही म्हणून इंग्रजांनी निजामाशी मैत्रीचा तह केला तर हैदरने ही इंग्रजाकडे प्रयत्न केले परंतु अपयश आले.पेशव्यांना इंग्रज–निजाम मैत्रीचा तह आवडलेला नसतो. परिणामी पुढे या युतीपासून आपणास धोका आहे हे ओळखून पेशव्यांनी  स्वसामर्थ्यावर तिसरी कर्नाटक मोहिम हाती घेतली होती. मोहिमेस दक्षिणेतील राजकीय पार्श्वभूमी कारणीभूत होती. यात प्रामुख्याने हैदरने अनंतपूरच्या तहाचे उल्लंघन व संस्थानिकांचा उपद्रव आणि खंडणी वसूल करणे यासारखी कारणे होती.

पेशव्यांनी मोहिमेची प्रचंड तयारी केली होती. तोफा, दारूगोळा यांचे कारखाने सुरू केले. सर्व प्रमुख सरदारांना आपली फौज घेऊन हजर राहण्याचे आदेश दिले होते. गोपाळरावास मिरज येथे फौज जमा करण्यास सांगितले. तिसऱ्या कर्नाट क मोहिमेचे शिरा सुभा जिंकू न घेणे, मुराररराव घोरपडयांना मदत करणे, रायचूर व दुआब प्रांतातील खंडण्या वसूल करणे, संस्थानिकांची हैदरच्या वर्चस्वातून मुक्तता करणे इत्यादी स्वारीचे उद्देश होते. नाना फडणीसावर राज्याची जबाबदारी सोपविली. पेशव्यांनी २६ ऑक्टोबर १७६६ रोजी प्रत्यक्ष मोहिमला सुरूवात केली. पुण्याहून जेजुरी, पाटस, सिद्धटेक, करकुंभ, शंभूमहादेव ,म्हसवड, नाझरे, सांगोले, माजरी, उटगी, उमदी या गावातून विजापूर उजवे टाकून सुरापूरच्या प्रदेशात

मोहिम पोहचते. सुरापूर, रायचूर व मुदगल सरकारातील तमाम संस्थानिकांकडून पेशवे खंडणी वसूल करतात. पाळेगारांना जरब देण्याची पेशव्यांची मसलत यशस्वी होते. कर्नाटकातील संस्थानिकांकडून खंडणी वसुलीमध्ये गोपाळराव पटवर्धन, विसाजी कृष्ण व सखाराम बापू बोकील यांच्या मोलाचा सहभाग होता. रायचूरच्या वायव्येस १६ कोसावर देवदुर्गमुक्कामी ८ जानेवारी १७६७ पेशवे तमाम सरदारांच्या गोटाच्या झडत्या घेतल्याने मोठी दहशत निर्माण होऊन शिस्त सुधारली. हैदर हा बिदनूर व शिरा येथे उत्तम बंदोबस्त ठेऊ न आपल्या मुलूखाची नासाडी करून श्रीरंगपट्टण येथे राहिला होता. पेशव्यांनी हैदरची सर्व मेहनत व्यर्थ ठरविली व हरग्रीवा नदीच्या तीराने शिरे येथे पोहचले. शिरे पेशव्यांनी जिंकले व मीररेझास शरण आले. या हातघाईच्या लढाई मध्ये सिदोजी घोरपडे, मालोजी पिसाळ व इतर पंचवीस माणसे ठार झाली होती.

शिरे प्रांताचा बंदोबस्त लावल्यानंतर पेशव्यांनी श्रीरंगपट्टण प्रांतातील मदगिरी हा किल्ला जिंकून घेतला. येथे प्रचंड लूट मराठयांना मिळाली. चिकबाळापूर गोपाळराव पटवर्धन व आनंदराव रास्ते यांनी पेशव्यांना जिंकून दिले. मदगिरीनंतर पेशवे चेनरायदुर्ग येथे येऊन पोहचले. मीररेझाचा गोट मुराररराव घोरपडयांनी लुटल्याची बातमी पेशव्यांना समजताच अपराध्यांना कडक शासन केले. चेनरायदुर्गनंतर पेशव्यांनी देवनहळळी, नंदीगड, कोलार, हुसकोट व इतर ठाणी जिंकून घेतली व सर्व प्रांतात मराठयांचा अमंल बसविला. हैदरच्या ताब्यात फक्त बेदनूर व श्रीरंगपट्टण राहिले होते. पेशव्यांनी विविध कारणांकरिता आपली मोहिम आटोपती घेतली होती. हैदरने आपले वकील मराठयांकडे लावून दिले होते. कारण तो तहास आतूर झाला होता. गोपाळराव, विसाजी कृष्ण व आपाजीराम यांच्यात वाटाघाटी होऊन ७ मे १७६७ रोजी तह घडून आला. यामध्ये प्रामुख्याने मराठयांचा आर्थिक व प्रादेशिक फायदा झाला . या मोहिमेत पेशव्यांना अनेक सरदारांनी सहकार्य दिले होते. कर्नाटकात छावणी केली असती तर हैदरला नेस्तनाबूत करता आले असते परंतु रघुनाथरावाने राज्याची वाटणी मागण्यास सुरूवात केली. परिणामी पेशवे फौजेस निरोप देत देत २८ जून १७६७ पुणे येथे येऊ न पोहचले.

## संदर्भ


१) सरदेसाई.गो.स., पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद खंड–२८,मुंबई,१९३३ ले.१५१

२) चितळे.वि.सि.संपा.पेठे दप्तर भाग १ भा.इ.स.मं स्वीय ग्रंथमाला क्र .ले.७३पुणे,१९४८ ले.३४,३५

३) कुलकर्णी अ.रा.,पुण्याचे पेशवे, राजहंस प्रकाशन पुणे, २००८ पृ.४९

४) खरे वा.वा.,ऐ.ले.,भाग ३ कुरुंदवाड भाऊनाना छापखाना ,१९०८ पृ.१०२२

५) राजवाडे वि.का.,म.इ.सा.खंड १३,पुणे,१८३४ पृ.८४

६) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत छ. रामराजा निग्राहक माधवराव खंड ५,पॉप्युलर प्रकाशन मुंबई ,१९९० पृ.१९१

७) चितळे वि.सि.उपरोक्त ले. ३७, ४०

८) खोबरेकर वि.गो.,महाराष्ट्राचा इतिहास,मराठा कालखंड भाग २ म.रा.सा.सं.मं.मुंबई ,१९८८ पृ.२९७

९) सरदेसाई.गो.स.पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद खंड २०,मुंबई,१९३१, ले.१५६

१०) कित्ता, ले.१६४, १७२

११) खरे वा.वा.,उपरोक्त भाग ३,पृ.१०३४

१२) सरदेसाई.गो.स.उपरोक्त ,खंड २०, ले.१७३

१३) सरदेसाई गो.स. उपरोक्त ,खंड ५ पृ.१९४

१४) सरदेसाई.गो.स. उपरोक्त ,खंड २०, ले.१७८

१५) सरदेसाई गो.स. उपरोक्त, खंड ५, पृ.२००

१६) सरदेसाई.गो.स.पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद खंड ३७,मुंबई,१९३४,ले.७२,७३

१७) कित्ता, पृ.९९

१८) कित्ता, पृ.८३

१९) आपटे द. वि.(संपा.),चंद्रचूड दप्तर, भाग १, भा.इ.स.मं ,पुणे शके, १८४२ ले.११५

२०) सरदेसाई गो.स., उपरोक्त , खंड ५ पृ.२२८

२१) सरदेसाई.गो.स.पेशवा उपरोक्त ,३७,ले.११६

२२) कित्ता, ले.१०७

२३) कित्ता, ले.१०७

२४) कित्ता, ले.११८

२५) खोबरेकर वि.गो.,उपरोक्त ,भाग २ ,पृ.३०६

२६) कित्ता, पृ.२९९

२७) खरे वा .वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १ मिरज,१९२७ पृ.११२

२८) कित्ता, पृ.११३

२९) सहस्त्रबुद्धे स.अ., श्रीमंत थोरले माधवराव पेशवे, मुंबई,१९३८ पृ.१११

३०) शेजवलकर त्र्यं.शं.,निजाम– पेशवे संबंध, पुणे,१९६३,पृ.८१

३१) सरदेसाई.गो.स.पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद खंड ३८,मुंबई,१९३४, ले.१५७

३२) कित्ता, पृ.१५८

३३) कित्ता, पृ.१६६

३४) पगडी सेतू माधवराव(संपा.)मराठे व निजामउर्दू–फारसी साधने,पुणे १९६१पृ.२२४,२५

३५)सरदेसाई.गो.स.उपरोक्त,खंड३८,ले.१४६,१२८,१६२

३६) खोबरेकर वि.गो., उपरोक्त भाग २ ,पृ.३०२

३७) खरे वा. वा., उपरोक्त ,भाग ३, पृ.१०१६

३८) सरदेसाई.गो.स.,उपरोक्त, खंड ३८,ले.१५७, १५८

३९) कित्ता, पृ.१६६.१६७

४०) खरे वा. वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज,१९२७ पृ.११५

४१) सरदेसाई .गो.स. उपरोक्त ,खंड ३८, ले. १७४

४२) वाड.ग.चि. थो.मा.पे.रो.भाग १, इंदीराप्रेस,पुणे १९११ पृ.३२९

४३) खरे वा. वा., उपरोक्त , खंड १ , पृ.११६

४४)बी.शेख अली, हैदर अली के साथ अंग्रजो के संबंध,भा.इ.अ.परिषद,दिल्ली,१९९९पृ.२२ व २३

४५) कित्ता, पृ.३९

४६) Banerjee A.C., Peshwa Madhavrao-I Calcutta,1968, P.76

४७) Madras Military Consultations, 1761-1772, Madras Record Office Vol.XXV, P.384

४८) Duff Grant, History of the Maratha, Vol. I, P.552-553

४८अ) खरे वा.वा., उपरोक्त , खंड १ , पृ.११९

४९) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग– ३, पृ.६१२

५०) Wilks Mark, Historical Sketches of the South of India, History of Mysoor,Vol.II,London, 1817 , P.4, 5

५१) Madras Military Consultations, 1761-1772, Madras Record office Vol.XXIV, P.615

५२) Banerjee A.C., Peshwa Madhavrao-I Calcutta,1968 P.78

५३) खरे वा. वा., उपरोक्त , खंड १ , पृ.१२०

५४) गर्गे स.मा.हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेकडील इतिहास, पुणे,१९८३ पृ.१५८

५५) खरे वा.वा.,उपरोक्त,भाग ३, पृ.६४०,६४३

५६) सरदेसाई. गो. स उपरोक्त , खंड३७,ले. १०९

५७) Duff Grant, History of the Maratha, Vol. I, P.554

५८) खरे वा.वा.,मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज,१९२७ पृ.१२०

५९) खरे वा.वा.,उपरोक्त,भाग ३ ,ले.६०६,पृ.१०८१

६०) सरदेसाई गो.स., उपरोक्त , खंड ५ , पृ.२४१

६१) वाड ग.चि., थो.मा.पे.रो.भाग१, इंदिराप्रेस,पुणे १९११ पृ.३३२

६२) कित्ता, पृ.३३५

६३) कित्ता, पृ.३४१,३४२

६४) Sen S.N.,Administrative System of the Maratha's,Culcutta,1928. P.436

६५) Banerjee A.C.,Peshwa Madhavrao-I, Calcutta,1968 P.189

६६) भावे.वा.कृ,पेशवेकालीन महाराष्ट्र,भा.इ.अ.परिषद.दिल्ली,१९७६,पृ.४२६, २७ पृ.४३३

६७) वाड.ग.चि उपरोक्त , भाग१, पृ.२३

६८) सरदेसाई गो.स., उपरोक्त ,खंड ५ ,पृ.८९

६९) खरे वा.वा.,मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज,१९२७ पृ.१२१

७०) पिसुर्लेकर पांडुरंग,मराठयांच्या इतिहासाची साधने,पोर्तुगीज,दप्तर खंड २,म.रा.सा.सं.मं. मुंबई,१९७४ पत्र क्र.६८

७१) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, पृ.१०८६

७२) खरे वा.वा., उपरोक्त , खंड १,पृ.१२५, १२६

७३) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, ले.६२०

७४) कित्ता, ले.६२८

७५) कित्ता, ले.६३०

७६) वाड ग.चि.,थोरले माधवराव पेशवे रोजनिशी ,भाग १, इंदिराप्रेस, पुणे १९११ पृ.५२

७७) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, ले.६३७

७८) कित्ता, ले.६४४

७९) सरदेसाई.गो.स.पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद खंड३७,मुंबई १९३४ले.१२६,१२७

८०) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, ले.६४४

८१) कित्ता, ले.६५१

८२) खरे वा.वा., उपरोक्त , खंड १, पृ.१२३

८३) सरदेसाई.गो.स. उपरोक्त , खंड३७, ले. १२२

८४) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, ले.६४८

८५) आपटे द. वि.(संपा.),चंद्रचूड दप्तर, भाग१,भा.इ.स.मं.पुणे ,शके१८४२ ले.१२१

८६) खरे वा.वा., ऐ.ले.भाग ३, कुरुंदवाड भाऊनाना छापखाना १९०८ ले.६६५

८७) कित्ता, ले.६६८

८८) कित्ता, ले.६६९

८९) सरदेसाई.गो.स. उपरोक्त , खंड३७,ले. १२८

९०) खरे वा.वा., उपरोक्त,भाग ३, ले.६७३

९१) कित्ता, पृ.११८२

९२) खरे वा.वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १ मिरज,१९२७ , पृ.१२४

९३) सरदेसाई.गो.स.पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद खंड३७,मुंबई,१९३४ ले. १३३

९४) कित्ता, ले.१३४

९५) खरे वा .वा., उपरोक्त , खंड १, पृ.१२३

९६) Banerjee A.C.Peshwa Madhavrao-I, Calcutta, 1968 P.83

९७) Madras Military Consultations, 1761-1772, Madras Record Office Vol.26A, P.65

९८) सरदेसाई.गो.स., पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद, खंड –३७, मुंबई,१९३४, ले. १२९

९९) खरे वा .वा. उपरोक्त ,भाग ३, ले.६५९

१००) कित्ता, ले.६७७

१०१) कित्ता, ले.६७९

१०२) खरे वा. वा., ऐ.ले.भाग ३, कुरुंदवाडा भाऊनाना छापखाना १९०८ पृ.११९०

१०३) कित्ता, ले.६८१

१०४) सहस्त्रबुद्धे स. अ., श्रीमंत थोरले माधवराव पेशवे, मुंबई, १९३८ पृ.११३

१०५) खरे वा. वा. उपरोक्त,भाग ३ पृ.१०५५

१०६) खरे वा. वा. मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज,१९२७ पृ.१२७

१०७) सरदेसाई.गो.स., पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद, खंड –३७, मुंबई,१९३४ ले.१३५

१०८) खोबरेकर वि.गो. उपरोक्त, मराठा कालखंड ,भाग २ पृ.३०७

१०९) सरदेसाई गो.स., उपरोक्त , खंड ५,पृ.९०

११०) सरदेसाई.गो.स. उपरोक्त , खंड३७, ले. १३६

१११) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, ले.६८६

११२) सरदेसाई.गो.स. उपरोक्त , खंड३७, ले. १३७

११३) खरे वा. वा., उपरोक्त , खंड १, पृ.१२९

११४) गर्गे स.मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेकडील इतिहास, पुणे, १९८३, पृ.१५८

११५) आपटे द.वि.(संपा.),चंद्रचूड दप्तर, भाग १, ,भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे ,शके १८४२ ले.१२३

११६) सरदेसाई.गो.स. उपरोक्त , खंड३७, ले. १४१

११७) आपटे द. वि. उपरोक्त ,भाग १, ले.१२४

११८) Banerjee A.C.Peshwa Madhavrao-I,Calcutta,1968 P.80

११९) सरदेसाई.गो.स., पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद, खंड –३७, मुंबई,१९३४, ले.१४२

१२०) कित्ता, ले. १४६

१२१) खरे वा.वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग–३, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना मिरज,१९०८ ले.६९१

१२२) सरदेसाई.गो.स. उपरोक्त , खंड३७, ले.१४७

१२३) Joshi P.M.,Selections from thePeshwa Daftar,New Series,Vol.III, Government Central Press,Bombay1962.P26

१२४) सरदेसाई.गो.स., पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद, खंड –३७, मुंबई, १९३४, ले.१४८

१२५) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, ले.६९२

१२६) कित्ता, ले.६९४, ६९६

१२७) सरदेसाई.गो.स., पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद, खंड –३७, मुंबई,१९३४, ले.१४९

१२८) कित्ता, ले.१५०

१२९) कित्ता ले. १५१

१३०) कित्ता ले. १५३

१३१) कित्ता ले. १५४

१३२) कित्ता ले. १५५

१३३) खरे वा.वा.,मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज,१९२७ पृ.१३२

१३४) सरदेसाई गो.स., उपरोक्त ,खंड५ पृ.९०

१३५) खरे वा.वा.,ऐ.ले.भाग ३, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना ,मिरज, १९०८ , ले. १४६, १५१
१३६) खोबरेकर वि.गो. उपरोक्त, भाग २ पृ.३०९
१३७) खरे वा.वा., ऐ.ले., अंक २९, पृ.११९४
१३८) खरे वा.वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १ मिरज,१९२७ , पृ.१३३
१३९) खोबरेकर वि. गो. उपरोक्त ,भाग २ ,पृ.३०८
१४०) खोबरेकर वि.गो.,म.स्वाऱ्यांचे मुक्काम,म.रा.सा.आणि सं.मं.मुंबई, १९८८ पृ.३४८
१४१) सरदेसाई.गो.स., पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद, खंड –३७, मुंबई,१९३४, ले.१५७
१४२) खरे वा.वा., मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १ मिरज,१९२७ , पृ.१३३
१४३) खरे वा.वा., उपरोक्त , भाग ३, ले.७०६
१४४) खरे वा.वा.,ऐ.ले.,अंक ३०,ले.७१६
१४५) सरदेसाई.गो.स., पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद, खंड –३७, मुंबई,१९३४ ले. १५८
१४६) कित्ता, ले. १५९
१४७) खरे वा.वा., उपरोक्त , भाग ३, ले.७२१
१४८) कित्ता, ले.७१८
१४९) Wilks Mark, Historical Sketches of the South of India, History of Mysoor,Vol.II,London, 1817 , P.13
१५०) सरदेसाई.गो.स., पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद, खंड –३७, मुंबई,१९३४, ले.१६१
१५१) BanerjeeA.C.Peshwa Madhavrao-I,Calcutta,1968 P.83
१५२) खरे वा.वा., उपरोक्त , खंड १, पृ.१३४
१५३) सरदेसाई.गो.स., पेशवा दफ्तरातून निवडलेले कागद, खंड३७, मुंबई, १९३४ ले. १६०
१५४) वाड ग.चि.,थोरले माधवराव पेशवे रोजनिशी भाग १, इंदिराप्रेस,पुणे १९११ , पृ.१९८

१५५) सरदेसाई गो.स., उपरोक्त , खंड ५, पृ.९१

१५६) वाड ग.चि., थोरले माधवराव पेशवे रोजनिशी भाग–२, इंदिरा प्रेस,पुणे १९११ ,पृ.४२०

प्रकरण पाचवे

# माधवरावांची दक्षिणेकडील चौथी व पाचवी स्वारी

५.१ प्रस्तावना

५.२ दक्षिणेकडील चौथ्या मोहिमेची पार्श्वभूमी

५.२.१ हैदरअलीचा मुराररावावर छापा

५.२.२ माधवराव पेशवे व इंग्रज संबंध

५.२.३ हैदरअलीच्या आक्रमक कारवाया

५.२.४ रघुनाथराव व जानोजी भोसल्यांचा बंदोबस्त

५.३ दक्षिणेकडील चौथ्या स्वारीचे हेतू

५.४ माधवराव पेशव्यांनी मोहिमेची केलेली पूर्वतयारी

५.५ मोहिमेला सुरूवात व महत्त्वाच्या लढाया

५.५.१ गुर्रमकोंडयाची लूटालूट व भैरवदुर्गची प्राप्ती

५.५.२ गोपाळराव पटवर्धनावर हैदरालीचा छापा व सुटका

५.५.३ चिकबाळापूर व इतर ठाण्यांची प्राप्ती

५.५.४ मुलबागल व कोल्हारची प्राप्ती

५.५.५ निजगल व देवरायदुर्गची प्राप्ती

५.६ माधवराव पेशव्यांस नाना फडणीसाने केलेली मदत

५.७ माधवराव पेशव्यांस मुरारराव घोरपडयांनी केलेली मदत

५.८ माधवराव पेशव्यांच्या चौथ्या मोहिमेचा शेवट

५.९ दक्षिणेची व्यवस्था व माधवराव पेशव्यांचे पुण्यास आगमन

५.१० दक्षिण मोहिमेचे नेतृत्व त्रिंबकमामा पेठयांकडे व हैदरला शह

५.१०.१ गुर्रमकोंडयाची मोहिम व मीररेझाची कैद

५.११ माधवराव पेशव्यांची दक्षिणेकडील पाचव्या स्वारीची तयारी

५.११.१ मोहिमेला सुरूवात व पेशव्यांचे पुण्यास आगमन

५.११.२ त्रिंबकमामा पेठयांची कामगिरी व पेशव्यांचे दक्षिण धोरण

५.११.३ मोतीतलावाची लढाई

५.११.४ हैदरची सर्वत्र दाणादाण व श्रीरंगपट्टणचा वेढा

५.११.५ माधवरावांच्या दक्षिण धोरणामध्ये परकीय सत्तेची मदत

५.११.६ हैदरअलीचा मराठयांशी तह व मराठी राज्याला झालेला फायदा

५.११.७ माधवराव पेशव्यांचा मृत्यू

५.१२ समारोप

# प्रकरण पाचवे

# माधवरावांची दक्षिणेकडील चौथी व पाचवी स्वारी

## ५.१ प्रस्तावना

या प्रकरणामध्ये माधवराव पेशव्यांनी दक्षिणेकडील चौथी मोहिम का आखली. या मोहिमेची पार्श्वभूमी, हैदरअलीचा मुराररावावर छापा व मुराररावाची समयसुचकता, माधवराव पेशवे व इंग्रज संबंध, हैदरअलीच्या आक्रमक कारवाया, रघुनाथराव व जानोजी भोसल्यांचा बंदोबस्त, दक्षिणेकडील चौथ्या स्वारीचे हेतू कोणते होते. माधवराव पेशव्यांनी मोहिमेची केलेली पूर्वतयारी, प्रत्यक्ष मोहिमेला सुरूवात व महत्त्वाच्या लढाया, गुर्रमकोंडयाची लूटालूट व भैरवदुर्गची प्राप्ती, गोपाळराव पटवर्धनावर हैदरअलीचा छापा व सुटका ,माधवराव पेशव्यांची योजना आणि मुलबागल व कोलारची प्राप्ती, पेशव्यांची योजना आणि निजगल व देवरायदुर्गची प्राप्ती, चिकबाळापूर व इतर ठाण्यांची प्राप्ती आणि विजयाची कारणे, माधवराव पेशव्यांस नाना फडणीसाने केलेली मदत, माधवराव पेशव्यांस मुराररराव घोरपडयांनी केलेली मदत,माधवराव पेशव्यांनी मोहिम आटोपती का घेतली .

माधवरावाने दक्षिणेची व्यवस्था कशी लावली. दक्षिण मोहिमेचे नेतृत्व त्रिंबक मामा पेठयांकडे व माधवराव पेशव्यांचे पुण्यास आगमन, मराठा सरदारांचा हैदरला शह, गुर्रमकोंडयाची मोहिम व मीररेझाची कैद, माधवराव पेशव्यांची दक्षिणेकडील पाचव्या स्वारीची तयारी, मोहिमेला सुरूवात व पेशव्यांचे पुण्यास आगमन, त्रिंबकमामा पेठयांची कामगिरी व पेशव्यांचे दक्षिण धोरण, मोतीतलावाची लढाई, हैदरची सर्वत्र दाणादाण व श्रीरंगपट्टणचा वेढा, माधवरावांच्या दक्षिण धोरणामध्ये परकीय सत्तेची मदत, हैदरअलीचा मराठयांशी तह व मराठी राज्याला झालेला फायदा, माधवराव पेशव्यांचा मृत्यू इत्यादी घटनांची माहिती या प्रकरणामध्ये देण्यात आलेली आहे.

## ५.२ दक्षिणेकडील चौथ्या मोहिमेची पार्श्वभूमी

मे १७६७ मध्ये माधवराव पेशव्यांनी कर्नाटकात गोपाळराव पटवर्धन व आनंदराव रास्ते यांना बंदोबस्तासाठी ठेवून आपली तिसरी मोहिम आटोपती घेतली होती. त्यानंतर कर्नाटकात हैदरअली , मोगल ,इंग्रज व अर्काटचा नबाब यांची लढाई चालली असताना इंग्रजांनी मोगलास पैका देऊन त्याची समजूत काढून त्यास आपल्या देशास लाऊन दिले होते. इंग्रजांना वाटले

की, हैदरअली हा एकटा पडला आहे .आपण त्याचे उत्तम पारिपत्य करून त्यापासून खूप पैका व मुलूख घेऊ परंतु हैदरअली हा इंग्रजांना घाबरणारा नव्हता. त्याने इंग्रजांस सांगितले की, मी तुम्हाला दहा लक्ष रूपये व बारा महाल प्रांत देतो. तेवढयावर संतुष्ट होऊन तुम्ही परत जावे. परंतु इंग्रजांना पैक्याची व मुलुखाची हाव सुटलेली होती त्यांनी ऐकले नाही.[१] परिणामी इंग्रजांचे म्हैसूरच्या हैदरअलीशी ऑगस्ट १७६७ मध्ये युद्ध सुरू झाले. याला भारताच्या इतिहासात पहिले इंग्रज–म्हैसूर युद्ध असे म्हटले जाते. त्यावेळी युद्धातील विजय हा मराठयांनी ज्याची बाजू घ्यावी त्यास विजय मिळणार असे होते. म्हणून इंग्रज कर्नाटकचा नबाब मराठयांच्या मदतीसाठी प्रयत्न करू लागले. तसेच निजाम व हैदरअली मराठयांनी म्हैसूरकरांना साथ द्यावी म्हणून आर्जवू लागले.[२] बंगालच्या इंग्रजांना मराठयांची सारखी भिती वाटत होती म्हणून त्यांनी मद्रासच्या इंग्रजांना लिहिले की, म्हैसूरकरांचा बिमोड करायचा असेल तर असा इलाज शोधून काढा की, मराठयांना आपण कोणत्या बाजूस जावे याचा विचार करून आपल्या विरूद्ध पक्षास मिळण्याची संधी मिळू नये. माधवराव पेशवे हे महमद अलीकडून चौथाई वसूल करण्यासाठी कर्नाटकात स्वारी करेल. तेव्हा त्यावर उपाय सुचविला की, पेशव्यांना त्यांच्या गृहकलहात गुंतवून ठेवणे किंवा अंतर्गत बंडाळी माजवून त्याचे लक्ष तिकडे वेधणे आणि तशा प्रकारचे कृत्य करण्यास जमले नाही तर मराठयांशी मैत्रीचा तह करणे.[३] पायदळ व तोफखाना याबाबतीत हैदरअलीपेक्षा इंग्रज कितीतरी पटीने श्रेष्ठ होते. हैदरअलीने ही दोन्ही साधने बाजूला ठेवून गनिमी काव्याने इंग्रजांना जेरीस आणण्यास सुरूवात केली. ही कला तो मराठयांक्डू न शिकला होता. त्याने या युद्धात मुद्दाम १० ते १२ मराठे स्वार चाकरीस ठेवले होते. त्यामुळे एकीकडून इंग्रजांनी हैदरचे किल्ले घेत पुढे जावे. तो दुसरीकडून हैदरने अर्काटच्या मुलूखात शिरून लुटालूट व जाळपोळ करावी आणि इंग्रजांनी घेतलेले किल्ले पुन्हा जिंकून घ्यावे. यामुळे इंग्रजांनी हैदरअलीचा घाटाखालील मुलूख घेण्याचे सोडून दिले आणि पुढे हैदरच्या राजधानीवर चालून जाण्याचा बेत केला. इंग्रज पुष्कळ सैन्य जमा करून चंद्रगिरीचा घाट चढून बालेघाट प्रांती दाखल झाले व गुत्तीच्या मुरारराव घोरपडयास आपणास येऊन सामील होण्याचा आग्रहाने निरोप पाठविला. त्याचे हैदरअलीशी हाडवैर असल्याने तो निवडक सहा हजार स्वार व काही गारदी बरोबर घेऊन इंग्रजांकडे जावून मिळाला. मुरारराव घोरपडे शत्रूकडे गेला याचा हैदरअलीस खूप राग आला होता.[४]

हैदरने मद्रासच्या इंग्रजाशी जोराने संघर्ष चालू ठेवला होता.परिणामी मद्रासच्या इंग्रजास हैदरअलीच्या भीतीने कापरे भरले होते. त्यांनी कलकत्त्याच्या इंग्रजास लिहिले की, हैदरशी मैत्री तरी केली पाहिजे किंवा शत्रू समजून त्याचा पूर्ण नाश तरी केला पाहिजे. रॉबर्ट क्लाईव्हने यावेळी हैदरअलीचा नाश करण्यासाठी मराठयांशी मैत्री जोडावी असा उपदेश केला. मद्रासकर इंग्रज मराठयांशी मैत्री जोडण्यास तयार होते. परंतु हैदरअलीचा पराभव झाल्यावर मराठयांना बिदनूरचा ताबा मिळावा. म्हैसूरचा हिंदू राजा इंग्रजांच्या साहाय्याने पुन्हा गादीवर बसवावा व त्याने मराठयांना चौथाई द्यावी. या अटी मराठयांना मान्य होत्या परंतु इंग्रजास नामुष्कीच्या वाटल्या.[५]

कर्नाटकात म्हैसूरचे पहिले युद्ध चालू असताना पेशव्यांनी गोपाळराव पटवर्धनास कर्नाटकात छावणी करण्यासाठी पाठवून दिले. गोपाळरावांची छावणी पडताच हैदरअलीने आपल्या वकिला मार्फत बोलणे लावले की, मी इंग्रजांशी लढाई करण्यात गुंतलो असल्याने माझे फार नुकसान होत आहे, यंदाची खंडणी मला माफ करावी व गोपाळरावाने आमच्या मुलुखास उपद्रव देवू नये. ही खंडणी माफ करावी असाच निजामाने ही पेशव्यांकडे आग्रह केला होता. कारण हैदरअली व निजामाचे सख्य होऊन त्यांनी अर्काटच्या नबाबा विरूद्ध लढाई सुरू केली होती. परंतु पेशव्यांनी ती अमान्य करून अदवानीच्या नबाबाकडून थकलेली खंडणी साडेतीन लाखाची मागणी केली. कर्नाटकात गोपाळरावाने चितळदुर्ग, रायदुर्ग, अनगुंदी येथील पाळेगारांकडून व अडोनी, कर्नूल, कडप्पा येथील नबाबा पासून खंडणी घेतली. गोपाळरावाने हैदरअली, निजाम व इंग्रज यांच्या वाटेस जावू नये. अशी पेशव्यांची ताकीद असल्यामुळे तो सन १७६८ पर्यत कर्नाटकात राहून खंडण्या घेऊन परत घेऊ लागला. येतांना गोपाळरावाने फ्रेंचाकडू न चार लाख रूपये खंडणी व पेशव्यांसाठी नजराणा घेतला. यादगिरी, सुरापूर, येथील खंडण्या घेत पंचमहालात आला . नंतर मे १७६८ मध्ये गोपाळराव गुलबर्ग्यास येऊन पोहचले. यावेळी रघुनाथराव व जानोजी भोसल्याने पेशव्यांविरूद्ध कलह सुरू केला होता. त्यांच्या पारिपत्यासाठी पेशव्यांनी गोपाळरावास गुलबर्ग्याहून ताबडतोब बोलावून घेतले.[६] गोपाळराव ससैन्य माधवरावास राहुरी मुक्कामी ४ जून १७६८ रोजी येऊन मिळतात.[७] कर्नाटकच्या संघर्षात हैदरअलीच्या विरोधात मुरारराव घोरपडे इंग्रजांस जाऊ न मिळाला होता. त्यांचा हैदरअलीला

अतिशय राग आला होता. म्हणून तो मुरारराववर छापा घालून त्याचा समुळ नाश करण्याची संधी पाहत होता. ती संधी त्याला गोपाळराव पटवर्धन कर्नाटकातून आल्यावर मिळाली.

### ५.२.१ हैदरअलीचा मुरारावावर छापा व मुरारावाची समय सुचकता

होसकोट या ठाण्याच्या तटबंदीच्या आश्रयाने इंग्रजांनी तळ दिला होता. जवळ उघडया मैदानात मुराराव घोरपडे उतरला होता. हैदरअली समीप आल्याची बातमी येताच इंग्रजांनी मुराररावास निरोप पाठविला की, काळोखी रात्र असून तुम्ही दूर उतरला आहात हे ठीक नाही. तुम्ही आम्हाप्रमाणे तटबंदीच्या आसऱ्यास आम्हां शेजारी उतरावे. हैदरअलीने तुम्हावर छापा घातला तर काय गत होईल. यावर मुराररावाने उलट निरोप पाठविला की, माझी काळजी तुम्ही करू नका. त्या नाईकाचा समाचार घेण्यास मी पुरा खबरदार आहे. येऊ द्या तर त्याला, त्याचा छापा, म्हणजे पहा कशी मजा करतो.[८] एके रात्री खरोखर हैदरअलीचा छापा आला. छापा घालणारी फौज घोडेस्वारांची होती. मुरारराव घोरपडयांचे लष्कर बेसावध होते. शत्रू आत शिरून, दोन अडीचशे माणसे मारून मुराररावाच्या तंबूपर्यंत शिरेपर्यत कोणासही छाप्याची बातमी नव्हती. शिवराव, मालोजीराव, खंडेराव वगैरे घोरपडे मंडळी यांनी मारामारी करून शत्रूपैकी पुष्कळांची कत्तल केली. या झटापटीत मुराररावाने स्वतःची तलवार चालवून अंगच्या शौर्यावर आपला जीव वाचवला. चौकशी केल्यानंतर त्यास कळले की, छापा घालणारी फौज फक्त घोडेस्वारांची आहे. हे ऐकताच त्याने आपल्या लष्करात जो एक सक्तीचा हुकूम फिरविला, त्यावरून त्याची समयसूचकता दिसून येते. तो हुकूम असा होता की, आपल्या लोकांपैकी कोणीही स्वार न होता आपापल्याा घोडयाआड उभे राहून, जो जो कोणी घोडयावर बसलेला दृष्टीस पडेल. तो तो शत्रू मनुष्य समजून त्यास बेलाशक मारून टाकीत जावे. काळोख्या रात्री आपला जीव वाचवून शत्रूस बिनचूक मारता यावे म्हणून ही युक्ती फारच योग्य होती व ती अंमलात येताच छापा घालावयास आलेले स्वार पळू लागले. पण ते चक्रव्यूहात अडकले. त्यांच्या तोफाचे गाडे, बैलांच्या माळा, उंट, घोडे, हत्ती, धान्यांच्या गोण्या वगैरे सामान सर्व अव्यवस्थित पसरलेले असून त्यातून अरूंद व आडव्या-तिडव्या गल्ल्या आखल्या होत्या. त्यातून काळोख्या रात्री त्यांना मार्ग सापडेना, बाहेर निघताना हजारो लोक मारले गेले. गोटाबाहेर पडल्यावर सुद्धा मुराररावाचा पाठलाग काही वेळ सुरूच होता. त्यामुळे आणखी काही लोक मेले. याप्रमाणे या छाप्याचा शेवट झाला.[९]

### ५.२.२ माधवराव पेशवे व इंग्रज संबंध

दक्षिण भारतात कर्नाटकात इंग्रज व हैदरअली संघर्ष सुरू असतांना तसेच निजामाशी मैत्रीच्या वाटाघाटी चालू असतानांच मुंबईकर इंग्रजांनी माधवराव पेशव्यांकडे थॉमस मॉस्टीन या वकीलास पाठविले होते. तो १९ नोव्हेंबर १७६७ रोजी मुंबईहून निघाला व २९ नोव्हेंबर रोजी गणेशखिंड येथे येऊन पोहचला. पेशव्यांकडून दामाजीपंत चिटणीस येऊन भेटल्यावर शहरात गोविंद शिवराम यांच्या बगीच्यात त्यांना उतरविण्यात आले.३डिसेंबर१७६७ रोजी शनिवारवाडयात दरबारच्या दिवाणखान्यात पहिली भेट झाली. यावेळी मॉस्टीनने माधवराव पेशव्यांस घोडा, घडयाळ, सोन्याची अत्तरदाणी, वासाची कुपी, शालजोडी, शिकारी बंदुक, पिस्तुल जोडी, पोषाख, जरतारी कापड, हिरवी व गुलाबी मखमल आणि चाकूब इत्यादी नजराणे भेट दिले होते.[१०] माधवराव पेशव्यांशी गोड बोलून पेशव्यांना इंग्रज – हैदरअली युद्धात निजाम व हैदरच्या मदतीस जाण्यापासून परावृत्त करणे हाच त्याचा उद्देश होता. तसेच मराठयांशी मैत्रीच्या तहात सोंधे, बिदनूर ही संस्थाने मराठयांकडे राहू देण्यास मॉस्टीनने कबूली द्यावी मात्र त्या मोबदल्यात वसई व साष्टी हे दोन प्रांत इंग्रजास द्यावे. शिवाय इंग्रजास त्या प्रदेशात होणारी मिरी, चंदन व वेलदोडे हे ही कराशिवाय निर्यात करण्यास परवानगी द्यावी. मंगलोरहून तेलीचरी व मुंबईहून तांदूळाने भरलेली तीनशे जहाजे दरसाल करमुक्त निर्यात करण्यास परवानगी द्यावी. या सर्व अटी सांगताना साष्टी बेताचा ताबा मिळविण्याचा मुख्य हेतू विसरू नये. अशा सूचना मॉस्टीन यास देण्यात आल्या होत्या. रघुनाथराव व माधवराव या चुलत्या पुतण्याच्या भांडणात लक्ष घालून हे भांडण विकोपास जाईल असे करावे.[११] यानंतर माधवराव पेशवे व मॉस्टीन यांची दुसरी भेट ही ११ डिसेंबर १७६७ रोजी झाली. यावेळी मद्रासकर इंग्रज व अर्काटच्या नबाबाने आपला वकील नागोराम पुण्याकडे पाठवून दिला होता. पेशव्यांनी गोपाळरावास कर्नाटकातून चौथाई वसुलीसाठी पाठविले होते.[१२] त्यानंतर मॉस्टीन व माधवराव पेशवे यांच्या तीन भेटी झाल्या त्यामध्ये फक्त चौल बंदरात इंग्रजांचे जहाज मराठयांनी दाबून ठेवले होते. ते सोडून देण्याचे पेशव्यांनी मान्य केले. तसेच पेशव्यांना हैदरअली व जंजिरा या बाबतीत आपल्याशी बोलावयाचे होते असे मत ही मॉस्टीनने व्यक्त केले. शेवटी ५ जानेवारी १७६८ रोजी पाचव्यांदा भेट झाली. माधवराव पेशवा हा स्वतःच्या आजारपणामुळे कोणाच्याही मदतीस जाणे शक्य नाही. या वेळी एक प्रतिनिधी चार्लस ब्रोम याला

रघुनाथरावाशी वाटाघाटीसाठी पाठवून दिले होते.[१३] मॉस्टीनला शेवटी रिकामे हाताने परत जावे लागले. कारण माधवराव पेशव्यांनी कोणताही त्याच्याशी तह केला नाही.

इकडे दक्षिण भारतात इंग्रज व हैदराअलीच्या पुष्कळ लढाया झाल्या होत्या. सुरूवातीला इंग्रजांनी धीर धरून हैदरअलीचा चंगप्पा व तिरूवन्नमलाई या दोन ठिकाणच्या लढाईत प्रथम पराभव केला. परंतु नंतर मात्र हैदरअलीने गनिमी युद्धाच्या तंत्राने तो इंग्रजास आटपेना.शेवटी लष्कराचे अवजड सामान, बााजार बुनगे, तोफा व पाायदळ म्हैसूरच्या हद्दीत पाठवून समोर लढणाऱ्या इंग्रजास हुलकावणी देऊन सहा स्वारानिशी हैदरअली हा लांब लांब मजला मारून मद्रासजवळ येऊन पोहचला. त्याची ही अचानक आलेली स्वारी पाहून मद्रासचा गव्हर्नर व कौन्सिलर याची त्रेधा उडाली.त्यांनी लगेच तह ठरविला त्यानुसार असे ठरले की, कोणी कोणास काही देऊ घेऊ नये. आापापला मुलूख सांभाळून सलोख्याने राहावे व परचक्र येईल तेव्हा एकमेकांस मदत करावी.[१४] १७६९ च्या पहिल्या म्हैसूर युद्धात इंग्लडचा पराभव झाल्याने कंपनीच्या ११० लाख रूपयांच्या (११ दशलक्ष पौंड) मालाची मोठी हानी झाली.इंग्लंडमधील कंपनीच्या गुंतवणुकदारांना मोठा फटका या मालाच्या नुकसानीने झाला. गॅनव्हिल या संसद सदस्याने अशाप्रकारे नुकसान सोसून इंग्रजांनी म्हैसूरमध्ये प्रवेश करणे गरजेचे आहे काय?असा प्रश्न पार्लमेंटपुढे उभा केला होता.आर्थिक नुकसान होत असेल तर कंपनीने भारतात राहणे कितपत योग्य आहे ,असा तात्विक मुद्दा उपस्थित केला. याचा इंग्लंडचा शेअर बाजारावर विपरीत परिणाम झाला.अलिकडेच हा नवा विचार डॉ.एच.आय.व्ही. बोव्हेन यांनी आपल्या '' रेव्हिन्यू अॅड रिफार्म दि इंडियन प्रॉब्लेम इन ब्रिटिश पॉलिटीक्स १७५७–१७७३'' या प्रबंधात मांडला आहे .परिणामी पुढील काळात इंग्रजांनी दक्षिणेतील सत्तांशी मैत्रीचे संबंध ठेवल्याचे दिसून येतात.[१५]

### ५.२.३ हैदरअलीच्या आक्रमक कारवाया

इंग्रजाशी जोपर्यत लढाई चालली होती तोपर्यत हैदरअलीने मराठयांच्या दक्षिण भारतातील मुलूखास उपद्रव दिला नाही. परंतु इंग्रजांशी तह करून मोकळा झाल्याबरोबर त्याने आपले राज्य वाढविण्याचा पुनः उपक्रम आरंभिला. गेल्यावर्षी मोगलांना अठरा लक्ष रूपये देऊन त्यांची कडप्पा व कर्नूल ही संस्थाने आपल्या ताबेदारीत राहावी असा करार करून घेतला होता. यंदा त्याने या संस्थानावर जबर खंडणी बसविली. गतवर्षी मोगलांशी तह करणे त्यास

आवश्यक होते. तेव्हा रामचंद्रराव जाधव व नबाब यास मध्यस्थीस घातले होते. त्यांनी आपल्या कामगिरीबद्दल दोन लाख रूपये मागितले. तेव्हा मोगलांशी आमचा तुम्ही तह करून दिला. त्याच्या शर्ती त्याजकडून पुऱ्या झाल्या नाहीत असे निमित्त सांगून त्याने कर्नूलच्या नबाबापासून यंदा हे रूपये सव्याज वसूल केले. हैदरअलीवरील तिसऱ्या स्वारीत मीररेझास माधवराव पेशव्यांनी शरण आणले होते.त्यास आपल्या नोकरीस ठेऊन घेतले व गुर्रमकोंडा प्रांत जहागीर दिला होता. अलीकडे तो मीर मराठयांना सोडून पुन्हा आपला मेहुणा हैदरअलीस जाऊन मिळाला होता. त्यामुळे त्यास जहागीर दिलेला गुर्रमकोंडा जप्त करण्यासाठी बाळापूरचा सुभेदार महिमाजी शिंदे तिकडे गेला होता. त्यावर मीररेझाने छापा घालून त्याची अर्धी फौज मारून त्यास पिटाळून लावलेले होते.[१६]

मुरारराव घोरपडयावर हैदरअलीचा पूर्वीपासून फार राग होता. त्यात अलीकडे हैदरअलीच्या प्रत्येक शत्रूस तो मदत करीत असल्याने त्याचा शेजार त्यास असाहय झाला होता. म्हणून सामोपचाराने बोलून एकतर त्यास आपला ताबेदार करावा, नाहीतर समूळ त्याचा नाश करावा या उद्देशाने ऑक्टोबर १७६९ मध्ये त्याने स्वारी केली व त्याची ठाणी जिंकून घेऊन त्यास निरोप पाठविला की, 'तू बऱ्या बोलाने मला भेटीस येऊन, माझी ताबेदारी कबूल करशील तर तुझे माझे सख्य होईल. भेटीस न येशील तर तुझे राज्य बुडविण्यासाठी मी आलोच आहे.' मुरारराव घोरपडे मुत्सद्देगिरीत कुशल होते. त्यांनी असा विचार पाहिला की,आपल्या मित्रापैकी जवळ कुणीच नाही . माधवराव पेशवे राहीले पुण्यास, इंग्रज ही मद्रासला निघून गेले.परंतु आपला शत्रू हैदरअली हा दाराशी येऊन उभा राहिला आहे. गुत्तीच्या किल्ल्यात राहून तो झुंजवावा तर पाण्याची कमतरता. अशा सर्व अडचणी लक्षात घेऊन त्याने हैदरअलीची भेट घेण्याचे ठरविले. त्याला भेटून वरकरणी त्याची ताबेदारी पत्करल्याचे दाखवावे आणि कशी तरी वेळ मारून न्यावी.[१७] मुराररावावर प्रसंग मोठा अवघड होता. दक्षिणेतील लहान मोठया संस्थानिकांचे लक्ष याकडे लागले होते. गोपाळराव पटवर्धनाने तातडीने पत्र पाठवून गुत्ती सोडून निघून जाण्याचे कळविले होते. परंतु मुराररावाने ऐकले नाही. गोपाळराव एका पत्रात लिहतो की, 'मुरारराव घोरपडे भेटीस गेल्यावर हैदरखान त्यास कैद करतो किंवा बरोबर घेऊन जातो यात संदेह नाही. कैद न करील तर , हैदरअली एवढा प्रामाणिक व मूर्ख कोणीच नाही, मुराररावास आम्ही चार पाच पत्रे लिहली की, गुत्तीस न राहावे राहिले आता भेटीस जातात.

याच्याएवढा मुर्ख त्रैलोक्यात नाही.[१८] मुरारराव हैदरअलीच्या भेटीस गेला तेव्हा त्याने त्यास कैद केले नाही, तर उलट त्याचा सन्मान केला व मेजवानीबद्दल त्याने मुराररावास पंचवीस हजार रूपये दिले. शिवाय तीन हत्ती, शिरपेच, मोत्याची कंठी व वस्त्रे देऊन दरसाल फक्त पन्नास हजार रूपये खंडणी घेण्याचा करार करून त्यास निरोप दिला.कारण मुराररावाने हैदरअलीच्या सैन्यावर झडप घालता यावी म्हणून शिवराम घोरपडे यांनी काही फौज तयार ठेवली होती.तसेच मुाररावाचा बक्षी (सैन्यमंत्री) इनीसखान ही काही फौज घेऊन तयार होता. हेतू हाच होता की, हैदरअलीने दगा फटका केल्यास सूड घ्यावा.[१९] गुत्तीचे वर्तमान गोपाळरावांनी माधवराव पेशव्यांस कळविले होते की, सर्व मुलूख गमावून घेऊन हात शेष राहिले.ते गुत्तीजवळच्या सिंगणमळयात आहेत. तूर्त त्यांचे तेजच गेले, काही उपाय चालत नाही .महमंद अलीखानाकडे इनिसखान यास त्यांनी पाठविले होते. महमंद अलीखान येतो येतो म्हणून आजपर्यत आवई होती. हे निश्चित कळले घाटमाथ्यावर मुराररावाचे ठाणे व्यंकटगिरी होते. ते ठाणे हैदरअलीने आपला मेहुणा मीररेझा यास पाठवून घेतले होते. गुत्ती मात्र एक तेवढी राहिली. तिकडे हैदरअली गेला नाही म्हणून राहिले बसावयास तेवढी एकच जागा आहे. प्रस्तुत घोरपडे बुडाले असे आहे. आज दक्षिण भारतात कर्नाटकामध्ये हैदरअली हा पातशहा झाला आहे. सर्वावर त्याची इभ्रत बसली आहे. या पत्रास मोरो बल्लाळने गोपाळरावास पत्र पाठविले की, मुाररावांनी हैदरखानाची भेट घेतली.याबद्दल श्रीमंताच्या (माधवराव पेशवे) मनात राग नाहीत,पाणी नाही, नाईलाज जाणून भेट घेतली. हेच श्रीमंतास समजले आहे. परंतु इनिसखान काही फौज व गारदी त्यासमागमे (मुरारराव) देणार याबद्दल श्रीमंताच्या चित्तांत संशय आहे.[२०] माधवराव पेशव्यांना चीड येईल असे हैदरअलीचे वर्तन सुरू होते. कर्नाटकची संस्थाने पेशव्यांच्या ताब्यात होती. त्यास हैदरअलीने उपद्रव देऊ नये असे पूर्वीच्या तहात ठरले होते. तथापि त्याने हुसकोट, बाळापूर, मदगिरी, चेनरायदुर्ग व शिरे आमची आम्हास चार महिन्यांनी द्यावे. ऐसा करार असताना दोन वर्षे झाली. तुम्हा सारखे उमदे माणूस दरम्यान असताना कार्यभाग होऊन येत नाही. यावरून काय म्हणावे? हल्ली श्रीमंतास विनंती करून आमचे जागे आम्हास प्राप्त होय ते करावे अशाप्रकारचे पत्र महिमाजी शिंदे यांनी नाना फडणीसास लिहले आहे. तसेच मी सरकारच्या पदरीचा आहे. खासा स्वारी दक्षिणेत कर्नाटकात आल्यावर सरकारचे पत्र घेऊन तुम्ही आपला कारकून मजकडे पाठवावा म्हणजे सरंजाम, तोफा, दारूगोळा व फिरंगी घेऊन

घाटमाथा येऊन, तमाम ठाणी हैदरकडून घेऊन सरकार दाखल करून देतो. सरकारी आज्ञा घेऊन काही कुमुक फौज घेऊन तुम्ही पुढे यावे म्हणजे ते कार्य मजकडे लागले.[२१]

हैदरअली हा प्रचंड सैन्य जमा करून हरिहर तालुक्यात आला होता. तेथे माधवराव पेशव्यांचा मामलेदार लक्ष्मण हरी लागू हा होता. त्यास त्याने निरोप पाठविला की, तू बऱ्या बोलाने माझ्या भेटीस ये नाही तर हरिहरास तोफा लावतो. तेव्हा निरूपायाने तो मामलेदार भेटीस गेला. त्याचा त्याने चांगला सन्मान करून जवाहिर व पोषाख देऊन त्यास परत हरिहरास लावून दिले. नंतर हैदरअलीची स्वारी तुंगभद्रा उतरून अलीकडे सावनूरच्या नबाबाच्या मुलूखात येऊन उतरली होती.[२२]

इकडे दक्षिण भारतात कर्नाटकात हैदरअलीची धामधूम सुरू होती. तिकडे याचवेळी हैदरचा वकील पुण्यात आपाजीराम व रेजा अलीखान तह प्रकरणी माधवराव पेशव्यांच्या दरबारात बोलत होते. माधवराव पेशव्यांनी त्यांना एकदाच सांगितले की, सन १७६८,१७६९,व १७७० या तीन सालाबद्दल चाळीस लाख रूपये खंडणी द्यावी. चितळदुर्ग संस्थानापासून घेतलेली खंडणी परत करावी.मीररेझा तुमच्या पक्षास मिळाल्यामुळे त्याजकडे असलेला गुर्रमकोंडा आमचा आम्हास परत द्यावा. मीररेझास स्वाधीन आमच्या करावा.खंडणी बद्दल ते जाब साल सांगू लागले की, दहा लक्षाची सावकारी निशा तूर्त करून देतो. सोळा लक्षाच्या फेडीबद्दल रेझा अलीखानास ओलीस ठेवतो. बाकी चौदा राहतात ते पेस्तर साली देऊ.बाकीच्या अटी तो कबूल करीना.मिळून सारे लबाडीचे व उडवा उडवीची उत्तरे होती. असला प्रकार माधवराव पेशव्यांच्या तापट स्वभावास बिलकूल खपणारा नव्हता म्हणून त्यांनी हैदरअलीच्या वकिलास निरोप देऊन तहाचे जमत नाही असे सांगून चौथ्या कर्नाटक स्वारीच्या तयारीला लागले.[२३] हैदरअलीने पेशव्यांना उपद्रव देण्यासाठी रघुनाथराव आणि जानोजी भोसले यांना पेशव्यांविरूद्ध उभे केले होते. परंतु माधवरावाने रघुनाथरावास कैदी बनविले तर जानोजीने हैदरअलीस मदत करण्यास नकार दिल्याने तो अस्वस्थ झाला होता.[२४]

## ५.४ कर्नाटक मोहिमेचे हेतू व तयारी

माधवराव पेशव्यांनी दक्षिण भारतातील कर्नाटकची चौथी मोहिम हाती घेण्यामध्ये खालीलप्रमाणे हेतू असल्याचे दिसून येते.

१) हैदरअलीचे पक्के व पुरे पारिपत्य करावे असा माधवराव पेशव्यांचा मुख्य हेतू होता. हे कलकत्तेकर इंग्रजांना ही ठाऊक होते.[२५]

२) हैदरअलीकडे सन१७६८,१७६९,व १७७० या तीन वर्षाची खंडणी थकलेली होती,ती वसूल करावी.

३) मुरारराव घोरपडयांना मदत करून त्याची ठाणी हैदरअलीकडून सोडवावी व मुराररावास परत द्यावी.

४) मीर रेझा हा हैदरअलीला जाऊन मिळाला होता त्यास शिक्षा करावी व गुर्रमकोंडा पुन्हा जिंकून घ्यावा.

५) दक्षिण भारतातील कर्नाटकातील पेशव्यांच्या ताब्यातील हुसकोट, बाळापूर, मदगिरी, चेनरायदुर्ग व शिरे या संस्थानिकांना हैदरअलीने उपद्रव दिला होता .ती सोडविण्यासाठी महिमाजी शिंदे यांनी माधवराव पेशव्यांना मदतीची मागणी केली होती.

६) हैदरअलीने चितळदुर्ग, हरपनहल्ली यासारख्या संस्थानाकडून खंडणी घेतली होती,ती त्यांना परत करणे.[२६]

७) हैदरअलीने तिसऱ्या कर्नाटक मोहिमेमध्ये माधवराव पेशव्यांबरोबर केलेल्या कराराचे उल्लंघन केले होते. मराठयांच्या मांडलिकांना त्रास देण्याचे धोरण स्वीकारले होते म्हणून त्याला धडा शिकवावा.

८) हैदरअलीने तुंगभद्रा ते कृष्णा नदीच्या दरम्यानची अनेक मराठयांची ठाणी जिंकून घेतली होती.ती पुन्हा मराठयांच्या राज्यात आणावी.[२७]

९) यवनास जरबेत आणून,पुरते पारिपत्य करावे,देव ब्राम्हणांची स्थापना करावी आणि संस्थाने सोडवावी हाच भाव होता. यासाठी माधवराव पेशव्यांनी कर्नाटक मोहिम हाती घेतली होती व हेच मराठी शाहीचे त्याकाळाचे धोरण ही होते.[२८]

## ५.२.४ रघुनाथराव व जानोजी भोसल्याचा बंदोबस्त

रघुनाथराव हे उत्तरेच्या स्वारीमध्ये अपयशी होऊन अहमदनगरला परत आल्यानंतर त्यांनी राज्याची वाटणी पेशव्यांस मागितली.पेशव्यांशी संघर्ष करण्यासाठी पंधरा हजाराची फौज जमविली होती तसेच इंग्रजाकडून आपणास मदत मिळेल अशी त्यांना आशा होती. इंग्रज ही चुलत्या–पुतण्यांच्या संघर्षाचा फायदा आपल्याला कसा घेता येईल याची वाट पाहत होते. रघुनाथरावाने पेशव्यांस निष्प्रभ करण्यासाठी हैदरअली, निजाम, जानोजी भोसले,दमाजी गायकवाड इत्यादीशी संधाने चालविली होती. हे लक्षात येताच इंग्रजांनी मॉस्टिनच्या वकिलातीत ब्रोम नावाचा अधिकारी रघुनाथरावाकडे पाठविला होता. मदत दिल्यास साष्टी व वसई इंग्रजांना देण्याचे आश्वासन दिले होते. त्याच्या या गुप्त वाटाघाटी सुरू होत्या तरीपण त्याची माहिती माधवराव पेशव्यांना समजली होती.[२९] माधवराव पेशव्यांनी संग्रामाची तयारी करुन १० जून १७६८ रोजी झालेल्या घोडपचे युद्धात रघुनाथरावाच्या फौजेचा पराभव केला. रघुनाथरावाने विनाशर्त माघार घेतली. आपला सर्व प्रदेश, चीजवस्तू व प्रदेश पेशव्यांच्या स्वाधीन केला. माधवराव पेशव्यांनी रघुनाथरावास नाना फडणीसाच्या देखरेखीखाली शनिवारवाडयात नजरकैदेत ठेवले आणि त्याच्या सर्व साथीदारांना कठोर शिक्षा देण्यात आल्यामुळे पेशव्यांची जरब निर्माण झाली.[३०] रघुनाथराव हा आपला प्रथम शत्रू आहे याची दखल माधवराव पेशव्यांनी घेतली नाही. बाहय शत्रूपेक्षा अंतर्गत शत्रू हा जास्त धोकादायक असतो याची उमग पेशव्यांना झाली नसावी. कारण ज्येष्ठ चुलता म्हणून अत्यंत सौम्य दयाळू व नमते धोरण त्यांनी नेहमीच स्वीकारल्याचे दिसून येते. परंतु रघुनाथरावाच्या घरभेदामुळेच मराठी राज्याचे काही अंशी नुकसान झाले असे मान्य करावे लागते. वास्तविक राघोबाच्या फुटीरपणाचे गंभीर परिणाम लक्षात घेऊन माधवरावाने त्यास डोंगरी किल्ल्यात बंद केले असते तर अनेक अनर्थ टळले असते. पण हिंदू मनाच्या कोवळया मायेपोटी राघोबास नजरकैदेत राहावे लागले या काळात राघोबावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी नाना फडणीसावर सोपविली होती.[३१] त्यानंतर पेशव्यांनी इ.स.१७६८ च्या अखेरीस नागपूरच्या जानोजी भोसल्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला व २३ मार्च १७६९ रोजी उभयपक्षी कनकपूरचा तह झाला त्यानुसार असे ठरले की, १) जानोजीने स्वतंत्रपणे वागू नये.

२) पेशव्यांच्या आज्ञेत राहावे.

३) फौज वाढवू नये.

४) पाच हजार फौज घेऊन पेशव्यांच्या चाकरीस राहावे.

५) दरसाल पाच लक्ष खंडणी पेशव्यांस द्यावी.

६) भोसल्याच्या अडीअडचणीत पेशव्यांनी सहाय्य करावे.

७) भोसल्याने बाहेरील सत्ताधिशांशी राजकारण करू नये.

८) पेशव्यांच्या वकिलामार्फत इतर सत्ताधिशांशी फक्त मामलती संबंधी व्यवहार करावा इत्यादी. अशाप्रकारे पेशव्यांनी जानोजी भोसल्यांचे पारिपत्य केले.[३२]

### कनकपूरच्या तहाचे महत्त्व –

या तहामुळे जानोजी भोसले व माधवराव पेशवे संबंधामध्ये नविनपर्व सुरू झाले. आपसातील अंतर्गत कलहामुळे स्वतःचे व सत्तेचे किती नुकसान होते याची जाणीव दोघांना निर्माण झाली. एकता व अंखडता यामुळे आपण नवीन काही तरी घडवून आणू शकतो हा आत्मविश्वास निर्माण झाला. पेशवे–भोसले संबंधात वितुष्ट निर्माण करणारा देवजीपंतास कैदेत टाकण्यात आले. फुटीरवृत्तीस पायबंद घातला गेला. केंद्रीय सत्ता बळकट करून मराठा मंडळातील सरदारांनी मराठी सत्तेचा सांभाळ केला पाहिजे. हे माधवराव पेशव्यांनी अखेरच्या काळात दाखवून दिले होते. माधवराव पेशव्यांने जून १७६८ मध्ये रघुनाथरावाचा व २३ मार्च १७६९ मध्ये जानोजी भोसले या विरोधांचे पारिपत्य करून बंदोबस्त केला होता. या कालावधीत इंग्रज – म्हैसूर युद्धाचा माधवराव पेशव्यांना फायदा घेता आला नव्हता. म्हणून अंतर्गत विरोधकांच्या बंदोबस्तानंतर माधवरावाने हैदरअलीविरूद्ध मोहिमेची आखणी केली होती.[३३]

## ५.४ माधवराव पेशव्यांनी मोहिमेची केलेली तयारी

हैदरअलीच्या हालचालीकडे सुरूवातीपासून माधवराव पेशव्यांचे लक्ष होते. त्यासाठी त्यांनी मोहिमेची उत्तमप्रकारे तयारी केल्याचे दिसून येते. माधवराव पेशव्यांनी मोगलास बोलावणे पाठविले की, तुम्ही व आमची फौज घेऊन हैदरअलीला तंबी पोहचवून त्यापासून खंडणी घेऊन ज्याप्रमाणे करार आम्ही गतवर्षी केला आहे तो देणे. तसेच राणोजी भोसले यास बालापूरकडे पाठविले होते.[३४] मराठयांच्या तोफखान्याकडे लक्ष देऊन तोफखान्याविषयी बारीकसारीक माहिती घेऊन माधवराव पेशव्यांनी नाना फडणीसास नव्या तोफा ओतावयाची आज्ञा केली

आहे. या तोफा स्वारीत चालताना भारी पडणार नाहीत.अशा लहान लहान तोफा सरासरी साडेतीन तसूच्या कराव्यात व पंचरसात तांबे फार पडते तो पंचरस चांगला करणे --- असे पत्र नाना फडणीसास १० मार्च १७६९ रोजी लिहिले आहे.[३५] तसेच मोहिमेसाठी तोफा व दारूगोळा पाहिजे यासाठी तोफांचे गोळे व दारू तयार करण्याचा कारखाना सिपरी (जि.धुळे) येथे तयार करण्यास स्थानिक अमंलदारांना सांगितले आहे. हे पत्र माधवराव पेशव्यांनी ८ ऑगस्ट १७६९ रोजी लिहिले आहे.[३६] तोफांच्या एक कारखाना अहमदाबाद येथेही होता. परंतु सन १७६९ मध्ये पेशव्यांनी पुण्याला ही एक मोठा कारखाना सुरू केला.हा शुक्रवार पेठेत पानशेच्या वाडयाशेजारी घातला होता.त्यामध्ये नव्या तोफा ओतीत व जुन्या दुरूस्त करीत असे. कारखान्यामध्ये ४ सुतार, ४ लोहार, ७ बाणाचे कारागिर, १ गोळ्याचा कारागिर, २ गोलंदाज, १६ खलाशी जामदार, २२ दर्यावर्दी, २६ गाडीवान, २ जेजालदार, ३ ढालाईत, १ संदुकाचा हवालदार, ५ बेलदार, १ घनकरी, २ जिनगर, २ भालदार, ३ जासूद, ३ खासदार, ९९ कामठी, ४ आरेकस, ६ बाणदार, १ शिंपी, २ पखालवाले, १ परीट, २ कलाल, ३ तबलेदार, १ फरास, ३ कोठावळे, २ रख्तवान, १२ गाडदी, १ बारगीर व सांडणीस्वार होते. दीडशे माणूस कामावर असून ते भिन्न जातीचे व व्यवसायाचे होते. म्हणजे स्वराज्यात नवे रोजगार मिळून शेकडो, हजारो लोक पोटाला लावले ते असे. या कारखान्यामध्ये विविध जातीची व व्यवसायाची १५० माणसे कामास होती.[३७] पुण्यास नव्या तोफा करावयाचा कारखाना घातला आहे. त्यासाठी चोंड्सी माती पाहिजेत. त्यास मौजे वडवली प्रांत साष्टी येथील माती चांगली असल्यास उत्तम, परंतु तेथे नसल्यास दुसऱ्या ज्या गावी माती उत्तम असेल तेथे कारखाना घालून चोंडसी सुमारे एक हजार पत्र मिळताच चांगल्या कारागिरापासून त्वरीत तयार करून पुण्यास पोहचविणे म्हणून रामजी महादेव यास सनद दिली आहे.[३८] लष्करी तयारी चालू असतानांच पेशव्यांनी कर्नाटकमध्ये हैदरअलीने गडबड सुरू केली होती. हे माहित झाल्यावर मदगिरी व चेनरायदुर्ग हे किल्ले त्याच्या सरहद्दीवर आहेत. तेथे पक्का बंदोबस्त असला पाहिजे याकरिता कर्नाटकी प्यादे किल्ल्यात आहेत. ते दूर करून देशाचे माणूस ठेवावे म्हणून मदगिरीसाठी २०० माणसे लक्ष्मण बल्लाळ याजकडे, चेनरायदुर्ग १०० माणसे चिमाजी रामचंद्र याजकडे असे एकूण तीनशे माणसे भरतीचे लागतील हे ठेऊन दोन्ही किल्ल्यास रवाना करणे तसेच सरकारच्या तालुक्याजवळ खुद्द हैदरअली येऊन राहिल्याचे वर्तमान पेशव्यांना मिळताच

किल्ले धारवाड व किल्ले बंकापूर येथील भरतीस पाचशे लोक ठेवण्याचा करार केला आहे, तरी हशमाचे शिरस्तेप्रमाणे पाचशे माणूस ठेवणे म्हणून चिंरजीव राजश्री नारायणरावास सनद दिली आहे. तसेच मुकुंद श्रीपत यास शिरे तालुकेसाठी ३०० आसामी किल्ल्यावर ठेऊन एतद्देशीय कानडे माणूस असेल ते दूर करावे म्हणून सनद दिली आहे.[३९]

सन १७६९ चा पावसाळा संपताच माधवराव पेशव्यांनी गोपाळराव पटवर्धनास सूचना केली की, मिरजेस फौज जमा करण्याचे तुम्ही खूफ अवडंबर माजवावे. पुण्यापेक्षा मिरज कर्नाटकास जवळ असल्याने तेथे लष्क री छावणी निर्माण के ली.मिरजेचे महत्त्व वाढवून माधवराव पेशव्यांनी गोपाळराव पटवर्धनास आपला विश्वासू सहकारी म्हणून राजकीय व लष्कारीदृष्ट्या सक्षम केले .फौज जमत असल्याचे वर्तमान ऐकून हैदरअलीस दहशत पडेल. परंतु हैदर हा तुंगभद्रेकडे येत असल्याचे वर्तमान येताच माधवराव पेशव्यांनी मिरज व अथणी येथे गोपाळराव पटवर्धन व आनंदराव रास्ते यांचे सैन्य जमा झाले आणि ते दक्षिणेकडे चालू लागले होते. इकडे पुण्यात ही माधवराव पेशव्यांनी स्वारीची तयारी जोरात सुरू केली होती. हैदरअली हा हरीहरास आला तेव्हा हे दोघे मराठा सरदार सैन्यासह नरगुंदाजवळ आले होते.[४०] हैदरअली हा तुंगभद्रा नदी उतरून सावनूर पासून वीस कोसावर येऊन उतरला होता. तेव्हा हे मराठा सरदार गदग परगण्यात सावनूरच्या पूर्वेला दहा कोसावर मुलगुंद येथे तळ देऊन राहिले. हैदरअलीने खंडणीची मागणी ठरविण्यासाठी तुमचा दिवाण खंडेराव किंवा तुम्ही आमच्या लष्करात यावे असा निरोप सावनूरच्या नवाबास पाठविला होता. तर गोपाळरावाने ही निरोप पाठविला की, पूर्वी हैदरने तुमचे राज्य काबीज केले असता माधवराव पेशव्यांनी (श्रीमंतानी) ते पराक्रमाने जिंकूण पुन्हा तुमच्या हवाली केले.सांप्रत तुमची मदत करण्यासाठी त्यांनी आम्हास पाठविले.तुम्ही हैदरास खंडणी द्याल किंवा त्याकडे कोणी मनुष्य पाठवाल तर श्रीमंताचा तुम्हावर राग होईल. त्याचे भय तुम्हास वाटत असेल तर आम्ही सावनूराजवळ येऊन उतरतो.एखादा परगणा त्याने लुटला तरी चिंता नाही. आम्ही पुन्हा तुम्हास जिंकून देऊ. परंतु तुम्ही त्यास खंडणी देता कामा नये.या दोन निरोपामुळे सावनूरच्या नवाबाची चांगलीच पंचाईत झाली. हैदरअली जबरदस्त सैन्य घेऊन दारात आला होता तर गोपाळराव पटवर्धन दहा हजार सैन्यासह दहा कोसावर होता. बाकीची मराठयांची फौज पुण्यास व अन्यत्र जमली असून निघण्याच्या तयारीत होती. एक सक्तीने खंडणी मागतो तर दुसरा ती देऊ नको म्हणतो.[४१]

दोघांचाही क्रोध परंतु तूर्त हैदरअलीचे बळ अधिक असल्याने त्याने खंडेरावास पाठवून दिले व गोपाळरावास निरोप पाठवून दिला की, श्रीमंताच्या इच्छेबाहेर आम्हास वागावयाचे नाही. आम्ही हैदरअलीस खंडणी देत नाही. परंतु गुप्तपणे चाळीस हजार होन पावते केल्याची बातमी मराठयांना थोडयाच दिवसात कळली होती.[४२]

इकडे माधवराव पेशव्यांनी मराठयांच्या राज्यकारभाराची जबाबदारी व रघुनाथरावावर नजर ठेवण्याची जबाबदारी नाना फडणीसावर सोपविली व दरबारातील दोन महत्त्वाची कामे आटोपली. एक म्हणजे फत्तेसिंग गायकवाडास सरदारकीची वस्त्रे व मालकी दिली आणि सयाजी गायकवाडास 'सेनाकर्ते'हे नवीन पद देऊन वडीलकीचा मान गोविंदरावाकडे कायम ठेवला. कारण फत्तेसिंग गायकवाडाने खंडणीची रक्कम, नजराणा व दक्षिण भारतातील कर्नाटकच्या मोहिमेत फौज देण्याचे कबूल केले होते. दुसरे महत्त्वाचे काम म्हणजे आरमाराची आजपर्यत जबाबदारी धुळपांच्या घराण्याकडे होती. परंतु ते आरमाराचा बंदोबस्त नीट ठेवत नाही व समुद्रात परकीय लोकांची गलबते लुटली जातात. त्याचा पैका सरकारात न देता आपणच खातात. अशा कागाळया श्रीमंताच्या कानावर वारंवार येऊ लागल्या होत्या. म्हणून माधवराव पेशव्यांनी जानोजी धुळपा कडून आरमाराचा सुभा काढून तो मोत्याजीराव विचारे याजकडे दिला होता.[४३] परंतु नंतर मात्र माधवराव पेशव्यांच्या ध्यानात ही चूक आली की, धुळपाशिवाय आरमाराचा बंदोबस्त नाही. त्यामुळे पुन्हा महिना–पंधरा दिवसातच जानोजी धुळप यास आरमाराचे काम सांगितले आहे. असा आशयाचे पत्र हे मोरोबा बल्लाळाकडून गोपाळराव पटवर्धनास ७ सप्टेंबर १७६९ रोजी पाठविले होते.[४४]

## ५.५ प्रत्यक्ष मोहिमेला सुरूवात व महत्त्वाच्या घटना

माधवराव पेशवे रघुनाथरावाच्या उपद्रव्यामुळे कर्नाटकची तिसरी स्वारी अर्धवट सोडून पुण्याला परत आले होते. राघोबाच्या व जानोजी भोसल्याच्या अंतर्गत कारवायामुळे पेशव्यांना दक्षिणेतील कर्नाटकावर लक्ष देता आले नव्हते. परंतु या दोघांचा ही बंदोबस्त केल्यानंतर व दरबारातील काही समस्या सोडविल्यानंतर पेशव्यांनी इ.स.१७६९ मध्ये चौथी कर्नाटक स्वारी आखली होती. मराठी राज्याचा सर्व कारभार हा नाना फडणीसावर सोपविलेला दिसून येतो. याचाच अर्थ असा की,माधवरावांना माणसांची पारख होती.त्यांनी प्रत्येकाचे गुण ओळखून त्यांना राज्यकारभारात सामील करून घेतल्याचे दिसून येते.तसेच माधवराव पेशव्यांचा

करारीपणा,कामाचा उरक, कठोरपणा, न्यायीपणा, प्रामाणिकपणा इत्यादी गुणांचा प्रभाव हा नाना फडणीसांच्या जीवनावर सखोल उमटलेला दिसतो. १७६८–१७६९ च्या सुमारास नाना फडणीस हा पुणे दरबारातील प्रमुख कारभारी मानला जावू लागला असे दिसून येते.[४५] इ.स.१७६९ मध्ये माधवराव पेशवे पुन्हा एकदा हैदरअलीच्या समाचारास निघाले होते. त्यावेळी परिस्थिती बरीचशी अनुकूल होती. राघोबा हा शनिवारवाडयात नाना फडणीसाच्या नजरकैदेत मंत्र जपत बसला होता. तर जानोजी भोसले हा स्वकीय प्रतिस्पर्धी ही नरम झाला होता. तर दक्षिणेत इंग्रज–म्हैसूर युद्ध सुरू झाल्याने हैदरअली हा विजयी झाला असला तरी त्याचे द्रव्यबळ व मनुष्यबळ बरेच कमी झाले होते. म्हणून माधवराव पेशव्यांनी स्वतःच्या सामर्थ्यावर दक्षिण भारतातील कर्नाटक प्रदेशावर चौथी मोहिम काढली होती.[४६]

माधवराव पेशव्यांनी चौथ्या कर्नाटक मोहिमेचा मुहूर्त हा दसऱ्याचा सहा घटका रात्रीचा काढला होता. दसऱ्याच्या दिवशी संध्याकाळच्या प्रहरी श्रीमंत सौभाग्यवती आनंदीबाई प्रसूत झाली. कन्या झाली यास्तव दसऱ्याचा मुहूर्त राहिला व नंतरचा वद्य अष्टमीचा मुहूर्त पाहून ठेवला होता.[४७] त्यानुसार ऑक्टोबर १७६९ मध्ये माधवराव पेशवे डेरेदाखल झाले. बरोबर नारायणराव होते. वाटेत थांबत थाबंत ते फौज जमा करीत चालले होते. २८ ऑक्टोबर रोजी माधवराव पेशव्यांचा मुक्काम हा श्री शंभू महादेव (सातारा प्रांत) येथे होता. परंतु फलटणच्या मालोजी नाईकाचा कज्ञा होता. यास्तव लष्करात आणले. पाऊण लक्ष रूपये नजर करार केली. पुण्यास मुदतीस भरणा करावयास त्याजकडील कारभारी नरसिंगराव कोनेरे व नारो भगवंत यास सांगितले.[४८] नंतर पेशवे लोणंद या ठिकाणी मुक्काम करतात व नारायणरावाबरोबर पाच हजार फौज देवून त्यास पुढे महादेव वीस कोसावर आहे. म्हणून हळूहळू चार मजली करण्याचे सांगून स्वतः वाई प्रांती गेले व पुढे १९ ऑक्टोबर १७६९ रोजी निरा उतरून नरसिंगराव धायगुडे यांच्या घरी मेजवानी झाली. त्यानंतर माधवराव पेशवे पुण्याला परत गेले तर नारायणराव पेशवे हे अकलूज तालुक्यातील उमदी येथे होते.[४९] पुण्याहून पेशवे हे ७ नोव्हेंबर १७६९ रोजी दक्षिण भारताच्या कर्नाटक मोहिमेवर निघतात बरोबर पत्नी रमाबाई होती. उभयता वाई, धोम, भुईंज, ओझर्डे करून नागोजी शिंदे आल्यावर साताराचे छत्रपती रामराजा यांच्याकडे दर्शनासाठी जातात. त्यावेळी कर्नाटकच्या मोहिमेसंबंधी चर्चा झाली असावी तसेच पेशव्यांनी पुण्याच्या बंदोबस्ताविषयी चौकशी करून समाधान व्यक्त केले.[५०]

सातान्याहून पेशवे पुढे म्हसवड, शंभू महादेव व पंढरपूर या ठिकाणी गेले. येथे त्यांचे पाच मुक्काम झाले .नंतर श्रीमंतानी कृष्णेचा रोख धरला व ते शिरहट्टी येथे गोपाळराव पटवर्धनाचा तळ असताना येऊन पोहचले.[५१] माधवराव पेशव्यांची हैदरअली विरूद्ध मोहिम चालू असतांना त्यांना तोफा व दारूगोळयाची किती काळजी होती हे त्यांच्या पंढरपूरहून कृष्णेच्या तिराने प्रवास चालू असतांना १८ डिसेंबर १७६९ च्या आबाजी गदाधर गोसावी यास लिहिलेल्या पत्रावरून दिसून येते. त्या पत्रानुसार 'बदरूद्दीन दारूवाला याजपासून कसबे वैजापूर व ममदापूर येथे दारू पाऊशे खंडी खरेदी करावयाचा करार साल गु ।। करून तुम्हास दारूचे कारखान्यावर पाठविले आहे. त्यास ५२ खंडी दारु तयार होऊन तुमचे पदरी माफ पडेल म्हणून तुम्ही लिहिले बाकी तेवीस खंडी दारू राहिली. ती हल्ली दर पावणेचार शेर प्रमाणे करार करून तुर्त ऐवज पाठविला येणे प्रमाणे-रूपये ५५३ रोख बदरूद्दीन दारूवाला याजजवळ दिले.रूपये १९०० हुंडी गंगाधर गोविंद याची, याप्रमाणे २४५३ रूपये पाठविणे आणि २३ खंडी दारू दुबारी सोऱ्याची चांगली पाहून माफ घेवोन पाठविणे ,दारू वाईट होती.याकरिता चौकशी करून घेणे अशा प्रकारचे पत्र पाठविले आहे.[५१.१]

या स्वारीमध्ये आतापर्यत विविध मराठे सरदार व त्यांची किती फौज गुंतली होती. या विषयी कागदपत्रात उल्लेख आढळतात ते पुढीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| ८००० – पटवर्धनांची तिन्ही पथके मिळून | १५,००० गारदी व प्यादे |
| १००० – धायगुडे | ३००० सावनूरच्या नबाबाचे |
| २००० – हरी गोपाळ | १५०० – कडप्पे व कर्नूल येथील नबाब |
| २५०० – आनंदराव रास्ते | १००० – धारवाडचा सुभेदार व कित्तूर मिळून |
| १००० – अक्कलकोटकर भोसले | २००० – सदाशिव रामचंद्र वगैरे |
| ५००० – नागपूरकर भोसले | ३००० – चित्रदुर्गकर |
| १००० – शहाजी भापकर | ४००० – मुरारराव घोरपडे |
| ५०० – गजेंद्रगडकर व नरंगुदकर | ८००० मोगलाकडून तहवारजंगा बरोबर साल अखेरीस आलेली |
| ४००० – फत्तेसिंगराव गायकवाड | |
| १५००० हुजरात व पागा व किरकोळ पथके | |
| ४०,००० – एकूण | ३७,५०० एकूण |

याप्रमाणे एकंदर पाऊण लक्ष फौज गुंतली होती. शिवाय सुमारे पन्नास तोफा होत्या.माधवराव पेशव्यांबरोबर चाळीस हजार व हैदरअलीवर नजर ठेवण्यासाठी गोपाळरावाची नेमणुक झाली होती. बाकीचे सैन्य मुलूख सांभाळण्यासाठी टोळया टोळयांनी जागोजागी वाटून दिलेली होती.[५२] हैदरअलीची फौज ही पाऊण लक्षावर होती. १५ ते २० हजार फौज ही निरनिराळया किल्ल्यात असून मीररेझा टिपू सुलतान, मखदुमअली, व्यंकटराव बार्की इत्यादी सरदाराबरोबर पंचवीस हजार फौज ही टोळया टोळयांनी फिरत असे.त्याच्याजवळ कवायती पायदलाचा भरणा मोठा होता व तोफखाना ही उत्तम होता. एकंदर स्वार हे पंचवीस हजारापर्यंत असून त्यात काही मराठे होते.विल्कसच्या मते माधवराव पेशव्यांचे लष्करी चातुर्य हे वाखणण्याजोगे होते. हैदरअलीने मराठयांच्या समोरासमोर लढण्याचे नाकारले व पूर्वीच्या सारखाच आपला प्रांत नष्ट केला.विहिरी, तलाव लाकूड फाटयाने भरून टाकले. आणि स्वतः अनवडीला व उडगणीच्या जंगलात सैन्यासह निघून गेला.[५३]

माधवराव पेशव्यांच्या कर्नाटक मोहिमेच्या हालचालीविषयी महादजी बल्लाळने नाना फडणीसास पुढील प्रमाणे १ जानेवारी १७७० रोजी पत्र लिहिले आहे. मु।। चित्रदुर्ग नजीक हैदरअली हा मसूरच्या बारीमध्ये आहे. झाडीत उपाय नाही म्हणुन त्याजकडे न जाता श्रीमंत इकडे आले व त्याच्या शहरावर गोपाळराव रास्ते मिळून दहा हजाराची फौज ठेवली आहे.सदाशिव पंत प्रतिनिधी अद्याप आले नाही. खाजगीकडील आनंदराव जिवाजी याजकडील नेमणूक होत आहे.श्रीमंताची फौज श्रीरंगपट्टणच्या मुलखात जाणार आहे. शिरहट्टी येथे गोपाळराव पटवर्धनांचा तळ असताना माधवराव पेशवे सैन्यासह तुंगभद्रेवर येऊन पोहचले व त्यांनी गोपाळरावास पुढे कशी काय मसलत करावी हे ठरविण्यासाठी बोलावून घेतले. माधवराव पेशव्यांनी रास्ते, गोपाळराव, मोरोबा इत्यादी मराठा सरदारांची मते विचारात घेऊन असे ठरविले की, पायदल व तोफखाना घेऊन हैदरअली हा अनवडी उडगणीच्या जंगलात बसला आहे. तेथपर्यत गोपाळरावाने त्याजपासून वीस कोसाच्या अंतराने राहावे व तो सावनूरकडे येऊ लागल्यास त्यास प्रतिबंध करावा, तेथून त्याने तळ हालविला तरी तो जिकडे जाईल तिकडे गोपाळरावाने त्याच्या पिछाडीस पंधरा वीस कोसाच्या अंतराने राहावे.बाकीचे सैन्य घेऊन श्रीमंतानी श्रीरंगपट्टणकडे जावे. याप्रमाणे ठरल्यावर गोपाळराव पटवर्धन परत आले व आपल्या सैन्याचा तळ हालवून सावनूर नजीक जाऊन उतरले.[५४] माधवराव पेशवे श्रीरंगपट्टणच्या रोखाने

चालले होते.मार्गातच हरीहर नजीक मुक्काम केला आणि मुरारराव घोरपडयांना आपणास येऊन मिळण्यासाठी पत्रे पाठविली. त्यास मुराररावाने ३ जानेवारी १७७० रोजी पत्र पाठवून गोपाळरावास सांगितले की, आम्ही आपल्या शिवाय दुसरे नाही.सत्वर येऊन चित्रदुर्गवाल्या समागमे येऊन सामील होणार असे घोरपडयांनी निरोप पाठविला होता. याचठिकाणी हैदरअलीचा वकील आला होता.परंतु पुण्यात जे बोलणे होते तेच होते.[५५] परिणामी माधवराव पेशव्यांनी आपला मोर्चा श्रीरंगपट्टणकडे चालू ठेवला होता. मार्गातच ६ जानेवारी १७७० रोजी बसवापट्टणनजीक त्याचा मुक्काम झाला. हरी बल्लाळ यांनी नाना फडणीसास पुण्याहून ही कागदपत्र पाठवून त्यास ताकीद करावी की, लक्ष्मेश्वरावरून हरपनहळ्ळी चित्रदुर्गावरून लष्करात यावे याप्रमाणे सांगावे म्हणजे येऊन पोहचतील. हरपनहळळी, चित्रदुर्गास श्रीमंतानी ही ताकीद केली आहे काही गुंता पडणार नाही. याप्रकारे पेशव्यांच्या मोहिमेची माहिती सांगितली आहे.[५६] पुढे श्रीमंतानी ८ जानेवारी १७७० रोजी बुधिहाळास जाऊन त्याच दिवशी ठाणे जिंकून घेतले.त्यानंतर पेशवे हे १२ जानेवरी १७७० रोजी चिकनाईकनहल्ली प्रांत श्रीरंगपट्टण या ठिकाणी पोहचले होते. प्रथम बुधिहाळास मुक्काम पडला त्याच दिवशी ते ठाणे काबीज केले.आत बाराशे प्यादे व पठाण होते,परंतु तोफांचे पाच सात बार होताच त्यांची हिमंत खचून गेली व त्यांनी निमूटपणे ठाणे हवाली केले. तेथे खंडोभरारी यास ठेवले, पुढे कंदीकिरेच्या लोकांनी ठाणे झुंजविण्याचा रोख दाखविल्यामुळे मराठयांनी तोफा लावून तटबंदी पाडून हल्ला केला व ते ठाणे लुटून फस्त केले. हंदिकिरे ठाणे घेतले. चिकनाईकनहल्ली मातब्बर ठाणे एक दिवस चार तोफा लागल्या होत्या कौलास येऊन ठाणे दिले. १,३५,००० रूपये खंडणी घेण्याचा ठराव केला होता. [५७] त्यानंतर माधवराव पेशव्यांनी हगलवाडी जिंकून घेतली व पुढे माधवराव पेशवे मु।। कसबे बेलूर परगणे मजकूर प्रांत श्रीरंगपट्टण येथे १ फेब्रु १७७० रोजी पोहचले. याविषयी कर्नाटक रूमाल नं.९६४ मध्ये पुढील मजकूर सापडतो.हैदर नाईक बसवापट्टणचे अलीकडे चेनगिरीवर आहे. आपाजीराम व मीररेझा यांनी भला माणूस त्याचकडे पाठविला आहे. तो येऊन बीत बसल्यास पटणकडे जाण्याचे तहकूब होईल. महिमाजी शिंदे याजबरोबर हजार बाराशे स्वार, करोल (बंदुकधारी सैन्य) व दोन तोफा देऊन आजच रवानगी मिराच्या तालुक्यात झाली. त्याचबरोबर बालाजीपंत फाटक दिले.ठाणी तमाम घेतात, कोणी ठाणी लढत नाही, काही ठाण्यात लोक ठेवतात, काही जमीनदोस्त करतात, खंडण्या जीव पाहून घेतात,

त्यात सोने, रूपे, होन रयतीचे करावे तेव्हा उत्पन्न होते .काही रयतेत जीव राहीला नाही. स्वामीनी म्हणजेच नाना फडणीसाने लाख रूपयाच्या हूंडया पाठविल्या त्या पावल्या. ज्याच्या त्यांनी कबूल केल्या ,मुदतीस भरणा होईल.[५८] माधवराव पेशव्यांनी चिकनाइकनहल्लीचे ठाणे घेतल्यानंतर चारशे प्यादे बंदोबस्तास ठेवले होते. परंतु गावकरी लबाड त्यास खंडणीचा पैका पडू लागल्याने, जाच होऊ लागल्याने त्यांनी हैदरनाईकाकडे भेद करून दीड हजार माणूस शुद्ध पौर्णिमा शनिवारी रात्री आणले व गावकुसावरून दोऱ्या टाकूण लोक आत घेतले. गाव मोठा काही कळले नाही. तो गावात शिरून सरकारचे माणूस,कारकून सुद्धा कापून काढले. काही लोक दरवाजा उघडून पळाले पण तीस पर्यत ठार झाले.मोरो खंडेराव जखमी झाला. हैदर नाईकाकडील लोकांनी गावातील रयत काढून, दुसरे गावी घालून आपली ठाणे ओस करून टाकली. चारशे माणूस ठाण्यात असतांना असे होऊ नये. परंतु आमचे लोक गाफील आणि गावकऱ्यांचा दंगा यामुळे ही गोष्ट झाली. ही गोष्ट माधवराव पेशव्यांस कळताच लष्कातून नरसिंग धायगुडे व शहाजी भोसले यास चिकनाइकनहल्लीस रवाना केले व महिमाजी शिंदे यास हजार फौज व तीनशे गारदी देऊन गुर्रमकोंडा घेण्यासाठी पाठविले होते. फिरोन सरकारी ठाणे घालावे असे सांगून रवाना केले. तीन–चारशे माणुस व ब्राम्हण मारले गेले वाईट गोष्ट झाली.[५९]

माधवराव पेशवे दक्षिणेच्या मोहिमेवर दक्षिणतीरावर आल्यापासून श्रीरंगपट्टण प्रांतातील दहा–बारा ठाणी सोडविली होती. याशिवाय मोहिमेची माहिती कृष्णराव बल्लाळ यांनी नाना फडणीसास पुढील प्रमाणे कळविली आहे.–'चित्रदुर्गावाले येऊन भेटले, कडप्पेकर याजकडील वकील आले. मंहमद अलीकडील राजकारणे घेऊन आला होता.त्यासी बोलून त्याची रवानगी केली . श्रीमंताचा मानस की, हैदरनाईकाशी सलोक न करिता तमाम इकडील पालेगार वगैरे मिळून पारपत्ये करावे ऐसे आहे. चित्रदुर्गकर पाच हजार प्यादा व दीड हजार फौज चांगली बाण, दारूगोळी,जंगी सामान आहे.चाकरी करावयाचे उमेद आहे. कित्तेक ठाणी आहेत .पाच – सहा लक्षाचा मुलूख लुटला आणि पाच–सात ठाणी चिकबाळापूर प्रो आहेत. ती सुटली म्हणजे चौधा–पंधरा लक्षाचा मुलूख सुटेल . राजश्री मुराररराव घोरपडे गुत्तीहून निघाले लवकरच येऊन पोहचतील.या प्रांती लष्करात कुलथ्या दाहा पायली, जोरी पाच पायली. ,बाजरी साडेचार ,हरभरे दोन, गहू दोन अडीच, तांदूळ खर्ची तीन पायली, तूप शेर, गुळ अडीच शेर, तेल चार शेर येणे प्रो आहे. तूर्त स्वारी नागमंगलवर आहे .[६०] माधवराव पेशव्यांनी श्रीरंगपट्टणच्या रोखाने

नागमंगलपर्यंत जाताना वाटेत पुष्कळ ठाणी घेतली आणि त्यापैकी काही आपणाकडे ठेऊन बाकीची पाडून टाकली,जमीनदोस्त केली. असे करण्याचे कारण म्हणजे पट्टणप्रांती ठाणी फार ती सर्व राखावयाची तर त्यात ठेवण्याकरिता गारदी पाहिजेत. श्रीमंताजवळ सुमारे पंधरा हजार गारदी होते. त्यापैकी कोठे दोनशे,तीनशे ,पाचशे असे प्रत्येक ठाण्यात ठेवल्याने थोडेच शिल्लक राहिले होते. त्यांची स्वारी बरोबर नेहमी राहण्याची आवश्यकता होती. यामुळे त्यांनी कोठे आपले लोक व कोठे चित्रदुर्गकडील लोक ठेवले होते. तर काही ठिकाणी ठाण्यातील जुनीच हैदरअलीची शिबंदी होती. तेच लोक आपल्या चाकरीस ठेऊन फक्त त्याजंवर पैरवी (पहारा) करण्यासाठी थोडी थोडी मराठी माणसे ठेवली होती. ज्या ठाण्यात थोडी बहुत खंडणी मिळाली त्यांचा बंदोबस्त श्रीमंतांनी असा केला. परंतु ज्यापासून काहीच मिळाले नाही किंवा जी अफाट असल्याने थोडया लोकांनी राखता येण्याजोगी नव्हती ती त्यांनी पाडून टाकली होती.[६१]

नागमंगल व बेलूर ही दोन्ही ठाणी पुढे लवकरच ताब्यात आली,त्यापैकी पेशव्यांनी नागमंगल पाडून टाकले व बेलूर आपणाकडे ठेवले. त्यात दारूगोळा व धान्यसामुग्री भरून शिबंदीची व्यवस्था उत्तम केली. भैरवदुर्ग ही पहाडी जागा फार चांगली होती.ती दोन दिवसात घेतली. मागडीच्या गढीचे ठाणे मुक्काम करून पाडून टाकले. झाडीत पहाडी दोन किल्ले होते त्यांच्या आश्रयाने काही बुणगे होते. ते एक दोन स्वाऱ्या पाठ्वून लुटून टाकले. हैदरअली जो एकदा मासूरच्या बारीत जाऊन दडून बसला तो काही केल्या तोंडच बाहेर काढीना.श्रीमंताचा ठाणी घेण्याचा उद्योग चालू आहे. बुधिहाळ व नागमंगल ठाणीही घेतली. तहाचा प्रकार हैदर बोलत नाही. मीराचे राजकारण आहे बहुधा घडेल. गोपाळराव त्याच्या सुमारावरच दुर्गाच्या मुलूखात आहे. अशा आशयाचे पत्र मोरोबा फडणीसाने १५ फेब्रुवारी १७७० रोजी हरकारा अलीबेग सांडणीस्वार याजकडे नाना फडणीसाला पाठवले होते ते पत्र त्यास पुण्याला ७ मार्च १७७० रोजी मिळाले.[६२] श्रीरंगपट्टण व बंगळूर या दोन किल्ल्याचा मात्र हैदरने पक्का बंदोबस्त केला होता.तो इतका की, शत्रूचा वेढा पडला तर चार-सहा महिनेपर्यंत त्या किल्ल्याचा सहज बचाव व्हावा. माधवराव पेशव्यांना मोहिमेवर गेल्यापासून जिकडे तिकडे विजय मिळत होता. हैदरअली मात्र मराठे घोडेस्वारांच्या तावडीत आपली फौज सापडेल व त्यांचा समूळ नाश होईल ही त्यास भीत वाटत होती. सन १७६४ पासून माधवराव पेशव्यांची त्याने जी एकदा दहशत खाल्ली होती ती त्याची अद्याप गेली नव्हती. यामुळेच मराठयांचा थोरल्या लष्करापासून पंचवीस

तीस कोसाच्या घेऱ्यात फिरण्याची त्याची हिंमत झाली नाही.[६३] हैदरअलीची मनापासून इच्छा होती की, माधवराव पेशव्यांना काही एक न देता वाटेस लावावे,तर पेशव्यांची हैदरअलीपासून निघेल तितका पैका काढावा ही होती. त्यामुळे तहाचा प्रकार काही होईना. तेव्हा माधवराव पेशव्यांनी विचार केला की, श्रीरंगपट्टण व बंगळूर ही दोन स्थळे असाध्य महीनो –महिने झोंबावे तेव्हा हाती आली तर येणार. नुकताच माघ महिना सुरू झाला असून मुलूखगिरीचे अजून तीन महिने शिल्लक आहे . एकच स्थळ घेण्याच्या भरीस पडून मुलूखगिरीचे इतके दिवस व्यर्थ घालवावे ,त्यापेक्षा जिताका मुलूख मिळेल तितका जिंकावा असा विचार करून [६४] हैदरअलीच्या तोंडावर पाच ते सात हजाराची फौज ठेऊन पाच सात ठाणी घेत माधवराव पेशवे श्रीरंगपट्टणजवळ बारा कोसापर्यत आले होते. तेथे सात मुक्काम झाले त्यानंतर बंगळूरनजीक आले. हैदरअलीचा वकील सुलूकाचा मजकूर बोलत होता,परंतु सुरळीत बोलत नव्हता. हैदरअलीने मात्र झाडी सोडून लढाईस येण्याचे नाकारले. पेशवे मात्र कोलार व चिकबाळापूरच्या रोखाने कूच क रु लागले.[६५] याच सुमारास सावनूरच्या नबाबाचा मुलगा व खंडेराव दिवाण हे दोन हजार फौज घेऊन आले.चित्रदुर्गक र तीन हजार उत्तम पायदळ व काही स्वार घेऊन आले.देशाहून सदाशिव रामचंद्र, नारोशंकर, बाजीपंत अण्णा, नागपूरहून मानसिंगराव वाघ व मजीदखान रोहिले हे आले. त्याचबरोबर आठ–नऊ हजार स्वार होते. मुरारराव घोरपडयास हैदरअलीचा निरोप गेला होता की, तुम्ही आम्हास येऊन मिळावे. तसे तुमच्याने होत नसेल तर निदान शत्रूकडे तरी जाऊ नये . जर शत्रूस मिळायचे असेल तर पुढचा परिणाम लक्षात आणून काय करणे ते करावे.पेशवे आज येथे आहे उद्या देशास जातील. मग तुम्हांस आमच्याशी गाठ आहे. या निरोपास न जुमानता मुरारराव घोरपडे चार हजार फौज व दोन तोफा घेऊन आला. तो पेशव्यांच्या लष्करापुढे येऊन देवनहळ्ळीच्या मुक्कामी २२ फेब्रुवारी १७७० रोजी येऊन मिळाला.[६६] तसेच बहीर्जी मोरे याजकडील प्यादे, परशुराम वगैरे आसामी ही लष्करात येऊन दाखल झाले. २५ फेब्रुवारी १७७० रोजी माधवराव पेशव्यांनी पांडुरंग गोडबोले यास कोकणातून चांगल्या तोफा आणावयास रवाना केले होते. तसेच मुंबईस ही जावे तेथून चांगल्या तोफा खरेदी करून आणाव्यात. याप्रमाणे आज्ञा देवून पाठविले होते.[६७]

## ५.५.१ गुर्रमकोंडयाची लूटालूट व भैरवदुर्गची प्राप्ती

हैदरअलीचे पूर्वेकडील सर्व राज्य जिंकावे म्हणून माधवराव पेशवे त्या प्रांती गेले होते. गुर्रमकोंडा प्रांतात लूटालूट करण्याकरिता तीन हजार फौज देऊन त्यांनी महिमाजी शिंदे यास पाठविले होते. ही मीररेझाची जहागीर असल्याने तो हैदरअलीच्या छावणीतून लांब लांब मजली करीत पाच हजार स्वारानिशी आला व त्याने शिंदयाची दुर्दशा केली. हे ध्यानात ठेऊन माधवराव पेशव्यांनी त्यास परत बोलावले व त्याच्या जागी राघो बापूजी , आनंदराव गोपाळ यांना पाच हजार फौजेसह पाठविले. तसेच नंतर पाच हजार सैन्य मीररेझाचा पाठलाग करण्यासाठी पाठविले होते.मराठ्यांचे सैन्य येताच मीररेझा परत गेला. त्यामुळे राघो बापूजी व आनंदराव गोपाळ यांनी सारा गुर्रमकोंडा प्रांत लुटून जाळून बेचिराख करून टाकला.[६८] चिकबाळापूरकडे आल्यावर माधवराव पेशव्यांनी प्रथम भैरवदुर्गला वेढा घातला होता.तो मजबूत पहाडी किल्ला बंगळूरपासून आठ कोसावर आहे. हा किल्ला इ.स.१६०९ मध्ये शहाजीराजे भोसले यांनी बांधला होता. तेथे भैरवाचे देवस्थान असून वस्तीही पुष्कळ होती. शिवाय भोवतालच्या गावाचे हजारो लोक तेथे आसऱ्याकरिता गोळा झाले होते. पेशव्यांनी त्या किल्ल्याला ११ फेब्रुवारी १७७० रोजी मोर्चे देऊन तोफा सुरू केल्या. चार दिवस झाले तरी किल्ला हाती येईना, तेव्हा मात्र माघ वद्य प्रतिपदेच्या दिवशी पहाटे हल्ला करून किल्ला घेतला. नंतर लुटालूट सुरू झाली ती दिवसभर चालली होती, त्यात रहिवाशी व बाहेरून आलेले सर्व लोक नागवले जाऊन, त्यास निराश्रीत स्थितीत बाहेर हुसकावून लाऊन किल्ला मोकळा करण्यात आला. अशा निराश्रीत झालेल्या लोकात पुष्कळ ब्राम्हणही होते. त्यांना माधवराव पेशव्यांनी रात्री बोलाऊन भोजन घातले व एक–एक वस्त्र देऊन सन्मानाने वाटी लाऊन दिले होते. हा किल्ला चांगला होता म्हणून येथे चारशे गारदी ठेऊन बंदोबस्त करून माधवराव पेशवे यांनी मागडी व देवनहळळीची पेठ लुटली व ते ठाणे पाडून टाकले. त्याच मुक्कामी मुराररराव घोरपडे त्यांना येऊन मिळाले होते. नंतर पेशवे हे चिकबाळापूरकडे गेले.[६९]

## ५.५.२ गोपाळराव पटवर्धनावर हैदरअलीचा छापा व सुटका

माधवराव पेशवे लांब गेल्याचे वर्तमान ऐकून हैदरअलीला धीर येऊन हातपाय हलविण्याची सुरूवात केली. तो तुंगभद्रेजवळ उडगणी येथे राहिला होता. तेथे सारे बुनगे ठेऊन तो सडया फौजेनिशी तरिकिऱ्यास आला. हैदरवर टेहळणी करण्याची जबाबदारी माधवराव

पेशव्यांने गोपाळराव पटवर्धनावर सोपविली होती. थोरली फौज चिकबाळापूरास पेशव्यांबरोबर तिकडील मुलूख,ठाणी व किल्ले घेण्यात गर्क होती. मधल्या पन्नास कोसाच्या पट्टयात मराठयांची फौज कोठेही नव्हती. ही संधी साधून हैदरअलीने आपली गेलेली ठाणी परत मिळवावी, चित्रदुर्गकरांचा मुलूख लुटून उध्वस्त करावा, शिरे, मदगिरी वगैरे मराठी मुलूखावर स्वाऱ्या कराव्यात असे त्याने बेत आखले होते.सुरूवातीस त्यास थोडेसे यश आले. चिकनाइकनहल्लीस अकराशे प्यादे होते. त्यात १२५–१५० पर्यत फक्त मराठे होते.बाकी चित्रदुर्गकरांचे व हैदरअलीच्या वेळेस असणारे लोक रखवालीस श्रीमंतानी ठेवले होते.[७०] हैदरअली यावेळी तरिकि रे येथे होता. तर गोपाळराव पटवर्धन व आनंदराव रास्ते यांचा मुक्काम बुधिहाळ म्हणून सरकारचे ठाणे होते.तेथून चार कोसावर होता . धारवाड व सावनूर लुटण्याचा हैदरचा बेत गोपाळरावाने साधू दिला नाही. यामुळे दोन–तीन महिने व्यर्थ गेल्याने तो कंटाळून तरिकिऱ्यास आला, तरी गोपाळराव येथे ही उभा होता.मैदानात उतरून एखाद्या मातब्बर ठाण्यास वेढा घालावा तर एकीकडून गोपाळरावाचा उपद्रव व दुसरीकडून लांब लांब मजली करून पेशवे आपणावर चालून येतील हा वचक त्यास  होता. शिऱ्याचा सुभा लुटण्याकरिता लहानसहान टोळी पाठवावी तर गोपाळराव ती मारून टाकणार. संबंध फौज घेऊन त्यावर चालून जावे तर तो घटकेत पळून जाणार. तेव्हा आपल्या शत्रूवर रात्रीचा छापा घालून त्याच्या सैन्याचा पूर्ण विंध्वस केल्याशिवाय आपल्या मागचे हे झेंगट सुटावयाचे नाही अशी त्याची खात्री झाली. पण छाप्याची मसलत साधणे दुरापास्त होते. कारण गोपाळराव व त्याची ओळख बारा वर्षापासून होती. गोपाळराव या स्वारीत सावधपणामध्ये बिलकूल कसूर करीत नव्हता. त्याची छबिन्याची (लष्कराभोवती पहारा करणारी फौज) फौज गोटापासून कोस–अर्धा कोसावर रात्रभर पहारा करीत हिंडत असे. तलाव्याची (टेहळणी करणारी फौज) फौज तरिकिऱ्याच्या बाजूस रोज दहा बारा कोस जाऊन परत येत असे.गोटापासून जवळ तरिकिरा व अजमपूर या तालुक्यांचे गाव लागत होते.लष्कराच्या दाणा वैरणीसाठी दररोज एक–दोन तर गावे लुटून उध्वस्त करण्यात येत असे. पण या कामावरसुद्धा तीन–चार हजाराची चांगली फौज व एखादा सरदार पाठविण्यात येत असे. तलाव्याकरिता एक दिवस स्वतः गोपाळराव, एकदिवस त्यांचे चुलतबंधू नीलंकठराव व परशुरामभाऊ आणि एक दिवस आनंदराव रास्ते याप्रमाणे जात असत.छबिन्यास सुद्धा पाळीपाळीने सरदार उभे असत. इतक्या तजविजी केल्याने हैदरअली

आपणावर रात्रीचा छापा घालणे अशक्य आहे असे गोपाळरावास वाटत होते. हैदरअली हा महाकपटी, हरहुन्नरी ,शूर, उद्योगी व दिर्घद्वेषी होता. तसाच तो कानडी मुलूख रयत व जमिनदार सर्व हैदरच्या बाजूचे त्यामुळे मराठयांना बातमी कळण्यास कठीण जात असे.[७१]

माघ वद्याच्या काळोख्या रात्री जवळ आल्यानंतर गोपाळरावास भूल पाडण्यासाठी त्याने जिकडे तिकडे पुकारा केला की, आपण थेट श्रीरंगपट्टणास जाणार,त्याप्रमाणे लष्कराचे सामान थोडेथोडे दररोज पट्टणकडे जाऊ लागले. एके दिवशी तो संकरपट्टणास जाऊन राहिला. मराठयांमध्ये व हैदरअलीमध्ये पूर्वी अठरा कोसाचे अंतर होते. ते आता चोवीस कोसाचे झाले. संकरपट्टणहून तो श्रीरंगपट्टणकडे गेल्याची अगदी खात्री पटण्याजोगी बातमी गोपाळरावास वारंवार कळू लागली. त्यामुळे गोपाळरावाच्या बंदोबस्तामध्ये काहीसा शिथिलपणा व बेसावधपणा आला हे त्यांनी कबूल केले होते. हैदरअली संकरपट्टणास तीन दिवस होता. तेथून माघ वद्य चतुर्थीच्या दिवशी तो कडूर येथे आला. दुसऱ्या दिवशी दोनप्रहरी बारा तेरा हजार गारदी, चार हजार स्वार, पंचवीस तोफा व बाणाचे पन्नास उंट बरोबर घेऊन तो एका आडवाटेने निघाला. दिवसभर व रात्रभर चालून पहाटेस पाच घटका रात्र असताना छबिने चुकवीत चुकवीत मराठयांच्या लष्करासमीप येऊन २५ फेब्रुवारी १७७० रोजी पोहचला.[७२]

आदल्या दिवशी नीलकंठराव व परशुरामभाऊ तरिकिऱ्याच्या बाजूस बारा कोसापर्यंत तलाव्याकरिता गेले होते. वाटेत गाव खेडयाची माणसे भेटत ,ती सुद्धा हैदर श्रीरंगपट्टणकडे गेला असेच सांगत. ते बारा घटका रात्रीस लष्करात परतले. तोच हैदरच्या लष्करातून फुटून एक मुसलमान गारदी पळत पळत मराठयांच्या लष्करात येऊन सांगू लागला की,तुम्हावर छापा आला सावध व्हा, पण तो शत्रूचा गारदी हे कळताच त्याचे सांगणे कोणास खरे वाटेना. जो तो त्याची टर उडवू लागला.त्याने सांगितले की, ही बातमी गोपाळरावास कळवावी . पण सांगावी की न सांगावी याकरीता चार घटका गेल्या. शेवटी कोणीतरी जावून गोपाळरावास ही बातमी सांगितली ,तेव्हा त्यांना पंचाईत पडली. एक अनोळखी व शत्रूच्या चाकरीस असलेल्या गारद्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन जर आपण संबंध लष्कराचा तळ हलविला आणि बातमी खोटी ठरली तर जनात आपले हसे व बदलौकिक होईल. जर ही बातमी खरी असून आपण वेळेवर सावध झालो नाही तर सर्वस्वी नाश होणार. म्हणून गोपाळरावाने गारद्यास विचारले की, तू बोलून चालून शत्रूचा नोकर तुझे सांगणे आम्ही कशावरून खरे धरावे ? त्याने उत्तर केले

की, मी पूर्वी नानासाहेब पेशव्यांजवळ चाकरीस होतो. त्यांचे मीठ मी खाल्लेले आहे. तुम्ही लक्षावधी लोकांचे पालनवाले, तुम्हास दगा न व्हावा ,म्हणून हे वर्तमान तुम्हास आगाऊ कळवित आहे. हे खोटे ठरले तर तुम्ही माझे हातपाय तोडा, जीव घ्या, काय पाहिजे ते करा? पण यावेळी स्वस्थ न बसता आपण बचाव करण्याच्या तयारीस लागा. हे बोलणे गोपाळरावास खरे वाटले व त्यांनी दोन तीन पथकास घोडयावर सामान घालून तयार होण्याची ताकीद दिली. इतके होते तोच तोफांचे बारांवर बार व बाणांच्या सरबत्ती होऊ लागल्या ,ती आणीबाणीची वेळ होती. गोपाळरावाने तोफेचा पहिला बार ऐकल्याबरोबर तो घोडयावर स्वार होऊन नौबत व निशाण घेऊन गोटाच्या आघाडीस हैदरच्या समोर येऊन उभा राहिला. यामुळे गोपाळरावाने सर्वांचा जीव वाचवला. त्यामुळे त्याची फार वाहवा झाली.[७३]

नौबत वाजू लागली तेव्हा फौज व सरदार पटापट जमा होऊन आघाडीस आले. त्या काळोखात नौबतीचा आवाज ऐकताच हैदरने ओळखले की,या ठिकाणी फौज उभी आहे. ती दूर हुसकून लावल्याशिवाय मराठयांच्या गोटात आपला प्रवेश होणार नाही. यासाठी त्याने तोफांचा व बाणांचा वर्षाव केला. तथापि मराठी फौज खंबीरपणे जागा धरून उभीच होती. गोपाळरावाजवळ त्याचा हुजऱ्या उभा होता. त्याच्या डोक्यास गोळा लागून ठिकऱ्यासारखे तुकडे झाले व त्याचे रक्त गोपाळरावावर उसळून त्यास रक्तस्नान झाले. तसेच त्याचा चुलतभाऊ माधवराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर जख्मी झाला. तो पुढे पंधरा दिवसाने शिरे येथे मरण पावला.लष्कर बचावले, जामदारखाना व डेरे, राहुटया व बाजार, लष्कराचे हर एक सामान सुरक्षितपणे निघून बुधिहाळच्या आश्रयास गेले.[७४]

२५ फेब्रुवारी १७७० रोजी हैदरअलीच्या जुन्या लोकांनी चित्रदुर्गकरांच्या लोकास फितवून आपणाकडे वळवून घेतले आणि रात्री हैदरखानाचे तीन हजार शिपाई भिंतीस शिडया लावून आत घेतले. मग या सर्व लोकांचा मारा या दीडशे लोकांवर पडला. चार घटका मराठयांनी खूप तरफेची लढाई केली.पहाटेची चार–पाच घटका रात्र राहताच हैदरअलीने तोफांची हाणामारी करून गडबड के ली. सबब दहा–वीस घोडी व माणसे जाया झाली. उभयतांनी आपली तयारी करून हैदरअलीस ठासून राखिले.[७५] चाळीसपर्यंत माणसे जखमी होऊन शिऱ्यास पळून गेले, बाकी ऐंशी जणास शत्रूच्या लोकांनी धरून हैदरअलीकडे तरिकिऱ्यास नेले होते. त्याने त्यांचे कान, नाक कापून सोडून दिले. ही बातमी ऐकताच

कंदिकिरे, हंदिकिरे या ठाण्यातील लोकांनी दहशत खाऊन पळ काढला होता. अर्थात ही ठाणी शत्रूच्या हाती गेली. या बातम्या माधवराव पेशव्यांच्या कानी जाताच त्यांनी तीन हजार स्वार ,नरसिंगराव धायगुडे, शहाजी भोसले अक्कलकोटकर व महिमाजी शिंदे यांना ताबडतोब रवाना केले व गोपाळरावासही हुकूम पाठविला की तुम्ही हरिहराहून मतोड येथे येऊन राहावे, म्हणजे ठाण्यातील लोकांस धीर येऊन ते ठाणी सोडून पळणार नाही व शत्रूसही वचक बसेल. त्याप्रमाणे तो तेथे येऊन तळ देऊन राहिला . थोरल्या लष्करातूनही धायगुडे वगैरे सरदार आले. तरीही त्या ठाण्यातील लोकांनी तत्काळ पलायन केले.पुन्हा त्या ठाण्यात लोक ठेवले तर आपणास राहिले पाहिजे. न रहावे तर पुनः मागच्याप्रमाणे शत्रु अकस्मात येऊन दगा करणार असा विचार करून गोपाळरावाने चिकनायकनहळळी ,कंदिकिरे, हंदिकिरे व तुरविकिरे ही चार ठाणी पाडून भुईस मिळविली व बाकीच्या ठाण्याचा चांगला बंदोबस्त करून तो तूर्त मतोड येथे राहिला.[७६] हैदरअलीने गोपाळरावावर अचानक हल्ला केला होता. त्यासंबंधी गोपाळराव लिहितो की, 'रविवारी अमावस्येस सडे सामान बारा तेरा हजार गारदी व चार हजार फौजेचा अजमास व पंचवीस तोफा येणेप्रमाणे छाप्यास आम्हाकडे आला. पहाटेच्या पाच घटका रात्रीस गोटा बाहेर उभा राहून गोळे व बाणांचा मारा करू लागला. अंबाऱ्या व नौबत मात्र लादलेली होती व वरकड घोडयावर जीनदेखील नाही. आमच्या घोडयावर एक दुसऱ्यावर जीन होते.त्याचा गोळा वाजताच घोडयावर बसून मागे नौबत याप्रमाणे आघाडीस येऊन उभे राहिलो. चार साडेचार घटका तोफांचा व बाणांचा मारा खाऊन उभे राहिलो. दिशा प्रकाश व्हावयाचे वेळेपर्यत तसेच उभे राहिलो.[७७] या छाप्यामध्ये गोपाळराव पटवर्धन व मंडळीने विलक्षण शौर्य व चिकाटी दाखवून आपली सुटका केल्याचे दिसून येते.

### ५.५.३ चिकबाळापूर व इतर ठाण्याची प्राप्ती

या स्वारीत हैदरअलीच्या सर्व सरदारात मीररेझाची सारखी चळवळ सुरू होती व त्यामुळे मराठयांना बराच त्रास भोगावा लागत होता. तो तीन हजार स्वार घेऊन शिऱ्याची पेठ लुटण्याकरिता आला होता. पण येथील किल्लेदार मुकंद श्रीपती सावध असल्याने त्याचे काहीही चालले नाही. नंतर त्याने बुकापट्टण म्हणून जवळचे दुसरे लहान ठाणे हल्ला करून जिंकून घेतले व निर्धास्तपणे लुटण्यास सुरूवात केली. त्यावेळी तेथील ठाणेदार साजो शामजीने मीरावर बंदुकांचा असा मारा केला की, त्यास तेथून पळ काढावा लागला. तेथून तो मीर निघाला तो

आसपासचे दहा–बारा गाव लुटून थोरल्या लष्करापासून अठरा कोसाच्या अंतरावर देवरायदुर्ग येथे जाऊन उतरला होता. पेशव्यांना सायंकाळी ही बातमी आपल्या गुप्तहेराकडून कळली. तेव्हा त्यांनी मीररेझास गाठण्यासाठी मल्हारराव पानशे यास सैन्यासह पाठविले. परंतु तो मीररेझा यावेळी मराठयांच्या हातून निसटून पळून गेला.[७७.१] इकडे मात्र मुलूख जिंकण्याचा व किल्ले काबीज करण्याचे पेशव्यांचे धोरण चालूच होते. ६ मार्च १७७० रोजी माधवराव पेशवे चिकबाळापूरास येऊन पोहचले. तिथे हैदरची शिबंदी पुष्कळ व चांगली होती. किल्ला फार दिवस झुंजेल असे वाटत होते. परंतु मोर्चे लागल्यापासून चौथ्याच दिवशी किल्लेकरी शरण येऊन त्यांनी किल्ला दिला. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी महिमाजी शिंदे यास ठेवले. महिमाजीपंत गोडबोले यास फडणीसी व हरी माणकेश्वर यास मुजुमदारी दिली.[७८] चिकबाळापूरा भोवतालचे सिधोट, गणेशगड व नंदीदुर्ग हे प्रख्यात व मजबूत पहाडी किल्ले आहेत व ते बंगळूर समीप आहेत. ते हाती आल्याखेरीज चिकबाळापूरचे ठाणे टिकणार नाही असे समजून ते घेण्याचा त्यांनी उपक्रम सुरू केला. त्यात सिधोट व गणेशगड हे दरडावणीच्या निरोपाने आले . परंतु नंदीदुर्गास वेढा बसवावा लागला.तो किल्ला ज्या पहाडावर आहे, तितका उंच पहाड त्या डोंगराळ प्रदेशात दुसरा नाही. तो किल्ला फार बळकट असून तेथे हैदरअलीने मुद्दाम उत्तम बंदोबस्त ठेवला होता. फाल्गुन शुद्ध नवमीच्या दिवशी श्रीमंतांनी तेथे मोर्चे लावले व त्याच दिवशी दरवाजापर्यंत जाऊन पोहचले. त्यामुळे किल्लेकऱ्यांस दहशत बसून त्यांनी किल्ला हवाली केला. तेथे श्रीमंतांचे अकरा मुक्काम होते. किल्ल्यात चारशे लोक व एक हवालदार आपल्या विश्वासाचा ठेऊन श्रीमंतांनी तेथील बंदोबस्त केला.तेथून त्यांनी चिकबाळापूराच्या सुभ्याखाली जितके किल्ले व ठाणी होती ती टोळया टोळयांनी फौज पाठवून ताब्यात घेऊन पाडून टाकली होती. या स्वारीत पेशव्यांनी इतके बिकट किल्ले व ठाणी घेतली पण त्यास अपयश कोठे आले नाही. [७९] माधवराव पेशव्यांचा मुक्काम नंदीगड येथे असतांना कृष्णराव बल्लाळने सांडणी स्वाराबरोबर ६ मार्च १७७० रोजी नाना फडणीसास पत्र पाठवून दक्षिण मोहिमेची माहिती सांगितली आहे. त्यानुसार इकडील दहा पंधरा ठाणे मातब्बर होऊन वीस लक्षाचा प्रांत सोडविला ३ मार्च १७७० रोजी नंदीगडास मोर्चे लावले. एक–दोन दिवसात गड फत्ते होईल. नंतर कोलाराचा किल्ला घेऊन त्या प्रांताचा बंदोबस्त केला. हा किल्ला सरकारात आल्याने पंचवीस लक्ष रूपयाच्या प्रांताची पट्टी सुटली, राहता पट्टण आणि बिदनूर राहिले श्रीमंताचा

मानस की, तमाम या प्रांतातील पालेगार व सरदार कडप्पेकर, कर्नोलकर पठाण आणून हैदरखानाचे पारपत्ये करून दोन–तीन करोड रूपयाचा प्रांत मध्ये त्याने दाबला आहे. तो सोडवावा ऐसा आहे. मुराररराव घोपडे येऊन भेटले. हैदरखानाचे ठाणे तरिकिरे येथे आहे. गोपाळराव व रास्ते बुधिहाळ सरकारचे ठाणे आहे, तेथून चार कोसावर आहे. तसेच हैदरने गोपाळरावावर रात्रीचा छापा घातल्याचा प्रसंग ही सांगितला आहे. यावेळी मीररेझा व टिपू सुलतान पाच हजार फौजेनिशी बंगळूर नजीक होते. हैदरने त्यांना आपल्याकडे बोलावले. यास्तव यांच्या पाठलागास पेशव्यांनी बाळाजी पलांडे यास दोन हजार सैन्यासह पाठविले आहे. हैदर थोडासा हावभरीत झाला आहे. तो बाहेर निघोन चांगली लढाई देतो असे झाल्यास खासा स्वारी त्या रोखे जाईल, सलूखाचा प्रकार नाही. श्रीमंताच्या लष्करामुळे हैदरखानाचा प्रांत खराब झाला आहे. बहुत काय लिहणे लोभ असो दीजे हे विनंती.[८०] माधवराव पेशवे जिकडे जावे तिकडे विजश्री हात जोडून उभी होती. या त्यांच्या विजयाची कारणेही तसीच होती.कारण यावेळी त्यांच्याजवळ पायदल व तोफखाना चांगला होता. पण मुख्य कारण त्यांची जवामर्दी व दक्षता हे होय. कितीही बिकट प्रसंग असला तरी आपला जीव धोक्यात घालण्यास त्यांनी कधी मागे पुढे पाहिले नाही. किल्ल्यास मोर्चे बसले की त्यांचा मुक्काम रात्रंदिवस मोर्च्यात असावयाचा ,हल्ला होऊ लागला तरी ते बरोबर असायचे. सुरूंग खोदण्यावर सुद्धा यांची पैरवी (पहारा) असायचा. सर्व तरतूद ते आपल्या नजरेने पहात. कोण सरदाराचे काम कसे चालले आहे, कोण कसा पराक्रम करतो, कोणाची काय कसूर होत आहे, याकडे त्यांचे नेहमी लक्ष असे.बक्षीस देण्यात त्यांचे जसे औदार्य मोठे असल्याचे दिसून येई.त्याचप्रमाणे अपराध्यास शिक्षा करण्यातही त्यांच्या स्वभावाची उग्रता वारंवार दृष्टीस पडत असे. [८१]

म्हैसूरचा इतिहास लिहिणारा कर्नल विल्कस म्हणतो की, माधवराव पेशव्यांनी आपल्या हालचाली अधिक तीव्र केल्या आणि संपूर्ण प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. सर्व महत्त्वाचे किल्ले मराठयांनी हस्तगत केले. मराठयांच्या कागदपत्रातून असे दिसून येते की, मराठयांच्या गनिमी काव्याच्या युद्ध तंत्राला हैदरअली कंटाळला होता. इंग्रज अधिकाऱ्यांनी १० मार्च १७७० मध्ये पाठवलेल्या पत्रात म्हटले की, माधवराव पेशव्यांनी दक्षिण तसेच उत्तरेकडे ही आपला दबदबा कायम ठेवला आहे. त्यांच्या बुद्धीचातुर्याचे कौतुक केले. परंतु त्यांनी अशी शंका उपस्थित केली की, माधवरावाने चौथाई न मागता पूर्ण प्रदेशाचा हक्कच मागितला की काय .माधवराव पेशव्यांनी

जानेवारी ते फेब्रुवारी १७७० या दोन महिन्यात अनेक प्रदेश काबीज केले. त्यात बुधिहाळ, चिकनाईकनहळळी, भैरवदुर्ग, नागमंगल, बाळापूर, नंदीगड व इतर काही यात पेशव्यांनी जातीने लक्ष घातले होते.[८२]

दक्षिणेमध्ये माधवराव पेशव्यांचे वर्चस्व वाढले होते. परकीय सत्तांना ही पेशव्यांच्या मैत्रीची गरज वाटत होती. हे मद्रास गव्हर्नर याने १० फेब्रुवारी १७७० रोजी पाठविलेल्या पत्रावरून दिसून येते.मेहरबान माधवराव साहेब यास विशेष यापूर्वी येथील माजी गव्हर्नर मिस्टर बुचर यांनी आपणाकडे पत्र ता. २९ रमजान रोजी लिहून स्वतःची गव्हर्नरी सोडण्याचा हेतू व गव्हर्नरीच्या अधिकारावर मला येथे नेमल्याची खबर कळविली आहे. मी स्नेहपत्राने कळवितो की, सदर अधिकाराची सुत्रे माझ्या हातात घेतली आहेत.आपण ,सरकार कंपनी व सरकार नबाब वालाजाह (अर्काट नबाब) यामधील परस्पर स्नेह वाढविण्यात व आपण व मी यामधील स्नेह दृढ करण्याकरिता मी मनापासून खटपट करीन. अशी आपण खात्री बाळगावी यापेक्षा जास्त काय लिहू? चिरायुष्य, वैभव व शांती आपणास चिरकाल लाभो, वरकड, त्याच दिवशी गव्हर्नर हे विलायतेस जाण्याकरिता जहाजावर स्वार झाले. आपल्या वकीलाची व माझी भेट होऊन फार आनंद झाला. अशाच प्रकारचे दुसरे पत्र हे जानेवारी १७७१ मध्ये लिहिलेले आहे. आशय मी हे पत्र कंपनी सरकार व आपण यामध्ये जुनी चालत आलेली मैत्री दृढ व्हावी या हेतूने पाठविले आहे.माधवराव  हे फार हुशार व बुद्धीमान आहेत. मद्रासकर इंग्रजांना पेशव्यांच्या मैत्रीची गरज वाटत होती.[८३]

गोपाळराव पटवर्धनावर हैदरअलीने रात्रीचा छापा टाकला होता. यामध्ये निळकंठराव पटवर्धनाचा शिरे येथे मृत्यू झाला. त्याविषयीचे माधवराव पेशव्यांचे २४ मार्च १७७०रोजीचे दुखवटयाचे पत्र --'राजश्री याविराजीत रा.रा.त्रिंबक हरी स्वामी गोसावी पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावे. विशेष नीळकंठराव हैदरखानच्या युद्धात निधन पावले. ईश्वरे मोठे अनुचित केले तुम्हास वृद्धापकाळी दुःखाच्या वेदना झाल्या. ईश्वरी तंत्रास उपाय नाही. ज्या काळी जे होणार ते अवश्य होते तथापि नीळकंठरावांनी स्वामी सेवेवर जीवीत्व तृणप्राय होऊन देह ठेवला. झाल्या गोष्टीचे श्रम केल्यास श्रमाची सार्थकता येत नाही. तुम्ही विवेकी आहात. विवेक करून परिमार्जन करावे नीळकंठरावांनी सर्वप्रकारे सार्थक केले. अतःपर श्रम न करावे बहुत काय लिहणे लोभ असो

दीजे हे विनंती .[८४] या पत्रावरून माधवराव पेशवे हे आपल्या सहकाऱ्यांची किती काळजी घेत होते याची जाणीव होते.

### ५.५.४ माधवरावांची मसलत आणि मुलबागल व कोलारची प्राप्ती

माधवराव पेशव्यांनी अशी मसलत योजली होती की, त्या प्रांतातील पाळेगार, सरदार, कडप्पेकर, कर्नूलकर, पठाण यांना एकत्र आणून हैदरअलीचे पारिपत्य करून दोन तीन करोड रूपयाचा प्रांत त्याने दाबला होता तो सोडवावा. गोपाळरावावरील छाप्याचे वर्तमान ऐकताच तेथून सोळा कोसावर नरसिंगराव धायगुडे व शहाजी भोसले येऊन मिळाले. त्यांनी बुधिहाळ,व कडब ही ठाणी पाडून हागलवाडीच्या ठाण्याचा मात्र पक्का बंदोबस्त करून फौजेचा तळ दिला. त्याखाली सोळा कोसावर मर्दनगडाखाली हैदर येऊन राहिला होता. पुन्हा एकदा छापा घालावा असा त्याचा हेतू होता. आता गोपाळराव सावध झाल्याने व धायगुडे, भोसले येऊन मिळाल्याने हैदरचा डाव काही साधला नाही. या स्वारीत मात्र गोपाळरावाच्या फौजेचे अतिशय हाल झाले. भोवतालचा मुलूख लुटून पोट भरावे तर एकीकडे चित्रदुर्गकरांचा मुलूख, दुसरीकडे शिरे, मदगिरी वगैरे सरकारी मुलूख ,समोर हैदरखानाचा मुलूख होता. त्यामुळे त्याच्या मुलूखात लुटालूट करणे सुरक्षित नव्हते.शिवाय श्रीमंताचे लष्कर एकदा तिकडून गेलेले असल्याने काहीही राहिलेले नव्हते. लष्कराच्या वाण्यांना त्याप्रांती कोठे धान्य मिळेना . लष्कराच्या लोकांस कोठे धान्य विकतही मिळेना व लुटीतही मिळेना हीच दशा वैरणीची होती. पण सर्वात मोठी अडचण पाण्याची होती. माघ महिना संपताच तिकडील नद्या व तळी आटून कोरडी झाली. यामुळे घोडी व माणसे बेजार होऊन अगदी थकून गेली होती.[८५]

हैदरचा मेहुणा मीररेझा मराठयांना उपद्रव देत होता.आता हैदरने आपला मुलगा टिपू सुलतान याला त्याच्या मदतीस पाठवून मराठयांची ठाणी उध्वस्त करण्याचा उद्योग आरंभिला. पेशव्यांची स्वारी यावेळी नंदीदुर्ग येथे होती. मीररेझाचा पाठलाग करून त्याला त्या मुलूखातून हाकलून देण्याकरिता पेशव्यांनी आप्पा बळवंत, बाळाजी पलांडे व सखारामहरी यांना फौजेसह पाठविले. या तिघांवर मीर व टिपूने पहाटेच्या वेळी अचानक छापा घातला होता. परंतु मराठे सावध असल्याने मीराला व टिपूला पळती भुई थोडी झाली. हे दोघेही दहशत खाऊन हैदरला जाऊन मिळाले. त्यामुळे हैदरची फौज वाढली होती. म्हणून पेशव्यांनी तिनही सरदारांना गोपाळरावास येऊन मिळण्याचा हुकूम केला आणि राघो बापूजी, आनंदराव गोपाळ व

मुराररावाचा पुतण्या मालोजी घोरपडे यासही गोपाळरावाच्या मदतीस पाठविले होते.[८६] तसे केले नसते तर गोपाळरावाचा हैदरपुढे टिकाव लागणे कठीण होते. नंदीदुर्गाहून पेशवे शिलगट्टयास आले. तो किल्ला पाडून वाटेत कैवारगडचा किल्ला लागला तोही पाडला व ते कोलारकडे वळले. त्यांना यावेळी महिपतराव पानशे येऊन मिळाले होते. त्यांनी कोलार परगण्यातील ठाणी हस्तगत केली. कोलारचा किल्लेदार घाबरून पळून जात असताना तो पेशव्यांच्या हाती लागला.तेथील लोकांनी पन्नास हजार रूपये खंड भरल्यामुळे तेथे लूट झाली नाही. परंतु किल्ल्यांत ठेवण्याजोगी शिबंदी नसल्याने श्रीमंतानी सुरूंग लावून तो किल्ला जमिनदोस्त केला. नंतर पेशवे २४ मार्च १७७० रोजी मूलबागलास आले. त्याचदिवशी किल्ल्यास तोफा लावून चार घटका दिवसास हल्ला करून, मराठयांनी शौर्याने लढून किल्ल्यावर झेंडा रोवला. मूलबागलचा किल्लेदार व पठाण मिळून तीस–पस्तीस लोक हल्ल्याच्या वेळी सापडली होती. ती दुसऱ्या दिवशी पेशव्यांनी हत्तीच्या पायाखाली देऊन मारून टाकली. हैदरने व्यंकटेशाची यात्रा लुटली होती व वाटसरूंना मारले होते. मराठे लोकांचे एकटे–दुकटे माणूस हाती लागले असता हे पठाण त्यास मारून टाकीत होते तसेच हैदरने ही चिकनायकनहळळीच्या ठाण्यातील लोकांना धरु न नेऊन त्यांचे कान व नाक कापले होते. हा राग त्यांच्या मनामध्ये होता. म्हणून त्यांनी मूलबागलच्या पठाणांना उग्र शासन केले होते. किल्ल्यावरील लोकांची पेशव्यांनी सरसकट कत्तल केली असे म्हैसूरचा इतिहास लिहिणाऱ्या कर्नल विल्कने म्हटले आहे [८७] व त्याचाच अनुवाद करणाऱ्या ग्रँट डफनेही असेच म्हटले आहे. परंतु वरील वस्तुस्थिती पाहता हे योग्य नाही असे दिसते.

### ५.५.५ निजगल व देवराय दुर्गाची प्राप्ती

माधवराव पेशव्यांची स्वारीची माहिती बालाजी गोविंद याने १० एप्रिल १७७० रोजी पत्र पाठवून नाना फडणीसास पुढीलप्रमाणे कळविली आहे. श्रीमंताची स्वारी मूलबागलाहून माघारी फिरली. बंगळूर वरून शिऱ्याचे रोखे येत आहे. बंगळूर मजबूद अखेरीचे दिवस वैरणीचा मोठा पेच ,यास्तव बंगळूरला मोर्चे लाविले नाहित. हैदर नाईक श्रीरंगपट्टणास गेला. खंडणीचे काही झाले नाही. गोपाळराव एक–दोन रोजी येऊन मिळतील. सरंजामी फौज छावणीस गोपाळरावा बरोबर ठेऊन खासा स्वारी देशी येणार. पुण्याहून पैका आला म्हणजे नालबंदी देणार. कापड फौजेस नालबंदीचे देत आहोत. श्रीमंताची शरीरप्रकृती थोडीसी बिघडली आहे.

यंदा यवन फौजसुद्धा भारी जमा झाली. परंतु हैदरचे पारिपत्य झाले नाही. गोपाळराव संकटास्तव छावणीस राहतील. भारी किला बंगळूर सारखा साध्य न झाला. पैका ही न मिळाला इकडे महर्गता मोठी वैरणीचे संकट ,--- [८८] या पत्रावरून पेशव्यांच्या मसलतीची माहिती मिळते की, हैदरअलीने भिऊन आपल्याला खंडणी तरी दिली पाहिजे यासाठी त्यांनी बंगळूरकडे जात असल्याची अफवा पसरविली होती. तसेच यावेळी मोगलांकडून तहवारजंग हा पेशव्यांच्या मदतीस सहा-सात हजार गारदी व आठ तोफा घेऊन आला होता. गोपाळरावाची फौज वाढविण्याचा तोच हेतू होता की,आपण किल्ले काबीज करण्यात गर्क होऊन गेलो आहे असे दाखवून, हैदर बाणावरास आहे तोच अकस्मात लांब मजली मारून त्यास जाऊन गाठावे.तिकडून गोपाळरावानेही यावे. मग दोघांनी मिळून हैदरची फौज मैदानात येताच हल्ल्यावर हल्ले करून मोडून ,तुडवून टाकावी ही श्रीमंताची मसलत होती. परंतु हैदरने ही तात्काळ ओळखून पोबारा केला होता. परिणामी पेशव्यांची मसलत फसली .तसेच लष्करात महागाई फार झाली आहे. शिबंदीस नालबंदीसाठी पैका नाही म्हणून पुण्याहून नाना फडणीसाने आर्थिक मदत पाठवून द्यावी व पेशव्यांची शरीरप्रकृती थोडीसी बिघडली आहे याची माहिती मिळते व माधवराव पेशव्यांची नजर कशी चौफेर होती याची जाणीव होते.[८९]

बंगळूरचा किल्ला मजबूत असून या किल्ल्यास वेढा घालण्यासारखी फौजेची तरतूद पेशव्यांजवळ नव्हती कारण त्यांची फौजही जागोजागी वाटली गेल्यामुळे स्वारीबरोबर फक्त तीस हजार सैन्य होते तर किल्ल्यात हैदरने सात हजार उत्तम गारदी , धान्य, दारूगोळा व इतर हरएक जिन्नस यांचा भरपूर साठा केला होता. पावसाळा सुरू होण्यास फक्त दीड महिन्याचा अवकाश होता. त्या अवधीत बंगळूरला वेढा दिला म्हणजे फत्ते झाल्याखेरीज तेथून हल्ल्याने लौकिक जाणार. किल्ल्यापासून पाणी तीन कोस दूर होते, तेथे लष्कर उतरून तेथून किल्ल्यास मोर्चेबंदी करीता सामान आणावयाचे तर तीस हजार फौजेपैकी सात हजार तलाव्याच्या कामावर नेमली पाहिजे. कही (शत्रूच्या मुलखात लुटालूट करून धान्य व वैरण मिळवून आणणारी फौज) व छबिना (लष्कराभोवती पहारा करणारी टोळी) मिळून आणखी सहा-सात हजार वाटली जाणार. जेथे लष्कर उतरणार तेथे रखवाली करिता पाच हजार तरी निदान लागली असती. बाकी दहा हजार राहिली तेवढी मात्र वेढा घालण्याच्या उपयोगी होती. पण तिने कार्य सिद्धीस जाणार नव्हते. याची जाणीव हैदरअलीला ही होती. त्यामुळे पेशवे

बंगळूर घेतील ही भीती त्यास नव्हती.[१०] असे असले तरी ही हैदरअलीने कालाहरण करण्यासाठी आपले वकील आपाजीराम व रेझा अल्लीखन यांना पुन्हा तह करण्यासाठी पेशव्यांकडे पाठवून दिले होते. परंतु हैदरचे पुण्याचे जे बोलणे होते त्यात अद्यापही फरक दिसून आला नाही. म्हणून पेशवे मनीकोलार वरून देवरायदुर्गपासून दोन कोसावर १६ एप्रिल १७७० रोजी येऊन उतरले होते. हैदरअली श्रीरंगपट्टणास गेल्याने त्याच्या टेहळणीवर वेगळी फौज ठेवण्याची गरज उरली नाही. म्हणून पेशव्यांनी गोपाळरावास फौजेसह आपणाकडे बोलावून घेतले व त्यास निजगलच्या किल्ल्यास वेढा घालण्यासाठी पाठविले. ते स्थळ मजबूत असून त्याच्या आसपास पाणी नव्हते. शिबंदी चांगली व पुष्कळ होती. तिने निकराने किल्ला झुंजविण्याची सुरूवात केली. गोपाळरावाने शेजारच्या एका टेकडीवर तोफा चढवून किल्ल्यावर मारा केला परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. शेवटी श्रीमंतांची स्वारी तेथे येऊन त्यांच्या सर्व लष्कराचा गराडा पडला असता किल्लेकरांनी माघार घेतली.वैशाख शुद्ध पंचमीच्या दिवशी किल्ला मराठयांच्या हाती आला.[११] माधवराव पेशव्यांनी निजगलवर हल्ला करून ते कसे जिंकले. या विषयीचे हरी बल्लालचे ३० एप्रिल १७७० चे पत्र पेशवे दप्तरात उपलब्ध आहे. 'त्यानुसार– मु।। निजगल इकडील वर्तमान निजगल किल्ला पहाडी अवघड तो घेणे याजकरिता राजश्री गोपाळराव, रास्ते व गायकवाडांची फौज यांस सांगून मोर्चे लावले. किल्ला थोर (मोठा) येक अंगे मोर्चे व हैदरखानाकडील कुमक हजार गारदी किल्ल्यावर आले.तेव्हा श्रीमंत देवरायदुर्गजवळ होते.तेथून कूच करून किल्ल्याजवळ मुकाम करून, चहूकडून किल्ल्यास मोर्चेबंदी करुन तोफांची मारगिरी सुरू केली. शेवटी हल्ला करावयाचे ठरले. त्यास आज प्रातःकाली सर्व लोकास ताकीद केली. श्रीमंत राजश्री रावसाहेब व श्रीमंत नारायणराव साहेब तोफाजवळ उभे राहून हल्ला केला. आतील लोकांनी निकडीची मारागिरी केली असता, आपले कडील लोकांनी फार निकड करून हल्ला चढविला, मोठया शर्तीने किल्ला घेतला . श्रीमत राजश्री नारायणरावसाहेब थोरले श्रीमंताचे पाठीमागे उभे होते.त्यास उजवे हाताचे मनगटास मण्याजवळ वरील अंगे गोली लागली, ती वरुन कातडयातून आतील आंगे नाडी जवळ पार जाली. हाड व सिरा काही जाया झाल्या नाहीत. जख्म हलकी आहे .भगवंताने मोठी खैर केली. बहुत लोक श्रीमंताजवळ उभे होते. श्रीमंताचा पुण्यप्रताप थोर, तेणे करून मोठी खैर झाली परंतु श्रीमंत नारायणराव यांनी काही काहिली (आवाज) केली नाही. दम हिंमत धरून बसले

होते. गोटात आले जखम सेकून बांधली. आपल्याकडील हजार माणूस हल्ल्याचे दिवसी जखमी व शंभर ठार याप्रमाणे झाले. परंतु असा हल्ला करून किल्ला कधी घेतला नव्हता. विदीत झाले पाहिजे हे विज्ञापना.[९२] या निजगलच्या लढाईत आपाजी मुंढे ,गंगाराम पिसाळ यास जख्मा भारी झाल्या आहेत वाचतील असे दिसत नाही. पोखरगीर गोसावी, मिराजी सरनोबत व कासी बलाल हे ठार झाले. हजार–बाराशे जखमी व दोन तीनशे पर्यत ठार झाले.[९३] परंतु कर्नल विल्कसने मात्र निजगल हे शुद्र ठिकाण होते. चित्रदुर्गकरांनी प्रतिज्ञा केली की, आज मी किल्ला घेणार. ही खोटी ठरल्यास माझा शिरच्छेद करावा. याप्रमाणे तो जीवावर उदार झालेला संस्थानिकाने आपल्या निवडक लोकासह आवेशाने हल्ला केला व तो किल्ला घेतला. ग्रँट डफने देखील वेगळी माहिती दिलेली नाही. विल्कसचेच तुणतुणे वाजविले आहे.

माधवराव पेशव्यांनी निजगलप्रमाणेच एप्रिल १७७० मध्ये देवरायदुर्ग जिंकून घेतला होता. त्याविषयीचे पेशवे दप्तरातील २० एप्रिल १७७०रोजीचे पत्र मु।। देवरायदुर्ग–– इकडील वर्तमान हैदरनाईकाकडील खंडणी अद्याप आली नाही. देवरायदुर्गला मोर्चे लावले किल्ला कठीण, सभोवताली झाडी व डोंगर ऐशी जागा कठीण, परंतु श्रीमंतांच्या पुण्यप्रतापेकरून लवकरच हस्तगत झाला. आणखी दोन किल्ले घ्यावयाचे आहेत. तेही किले देवरायदुर्गचे किल्लेदाराचे स्वाधीन आहेत. किल्लेदार आपला आहे. लष्करात महागाई फार झाली. मुरारराव घोरपडे, मोगलांची फौज, सावनूरकर पठाण व चित्रदुर्गाच्या फौजा सुद्धा आल्या आहेत.[९४] आतील लोकांशी राजकारण लागले आहे. सिद्धीस जाईल असे दिसते. या किल्ल्यामुळे सरकारचे तालुके बाळापूर, मदगिरी, चेनरायदुर्गला फार उपद्रव लागतो. किल्ला आला म्हणजे निर्वेध पट्टी झाली म्हणून माधवराव पेशव्यांनी देवरायदुर्ग जिंकून घेतला होता.[९५]

देवरायदुर्ग या ठिकाणी माधवराव पेशव्यांचा मुक्काम असताना त्यांनी १६ एप्रिल १७७० रोजी नाना फडणीसास पुढीलप्रमाणे पत्र लिहिले आहे. सांराश– तोफा तर यादीप्रमाणे झाल्या पाहिजेत. परंतु ऐकदाच साऱ्या करीन म्हटल्यास खरेदीस पैका फार लागेल. याजकरिता पुण्यात येक कनमुरडी व नारंजन दोन तोफा आहेत त्यांचे पंचरस काढावे. अहमदनगर, दौलताबादेस जायबंदी तोफा असतील त्याचे काढून आणावे. दोन्ही स्थळी नसल्यास पुरंदरचे माचीस गणेश तोफ ठेवली आहे ती खाली उतरून पंचरस काढावे. याप्रमाणे तिकडे तोफा असतील त्यांचे पंचरस काढावे . मदगिरीवर येक दोन तोफांचे पंचरस आहे. दुसरे लष्करात फेरोजंग तोफ जाया

झाली. त्याचे पंचरस काढिले आहे ते तुम्हाकडे पाठवून देऊ ,दोन महिन्यांनी तुम्हाजवळ पोहचेल. जस जसे जमा होत जाईल तसतसे काम चालीस लावणे. दहाखंडी कडक बिजली व जंबुरे मिलोन पंचरस जमा झाले. दुसरे तुम्ही चाळीस खंडीचा अजमास लिहला. त्यापैकी खरेदी करून दिले असेल ते इतक्याचेच काम चालीस लावणे.दुसरे खरेदी करून न देणे तीन हजार कारखान्याचा दरमहा आहे म्हणून लिहिले. त्यास तुम्ही सरंजाम तोफांचा केला असेल तितक्याचा कारखाना चालीस लावावयाजोगे कारागीर ठेवावे. जादा असल्यास दूर करावे. जसजसा पंचरसाचा सरंजाम सिलकी तोफांचा होत जाईल. तसे काम चालवावे. केवल खरेदी करून तोफा करीन म्हटल्यास पैका मुबलक लागेल. याकरिता लिहल्याप्रमाणे तोफांचा कारखाना चालविणे. कोलसे वगैरे जिनस हा तर खरेदी करून दिले पाहिजे तो द्यावा. यास्तव पत्र पावताच खरेदी झाली ती झाली या उपरी पंचरस खरेदी न करणे .सरंजाम सिलकी व खरेदी जमा झाला असेल त्याचे काम चालीस लावणे वर्तमान वरचेवर लिहून पाठवित जाणे. [९६]

या पत्रावरून माधवराव पेशवे जरी दक्षिणेत असले तरी त्यांचे लक्ष हे मराठी राज्याच्या आर्थिक हिताकडे होते हे दिसून येते. तसेच लष्करासाठी तोफा आवश्यक आहे. म्हणून यादी प्रमाणे तोफा कारखान्यामध्ये तयार झाल्या पाहिजेत. तोफाचे पंचरस केवल खरेदी करू नये तर पुणे, अहमदनगर, दौलताबाद, पुरंदर, मदगिरी इत्यादी ठिकाणी जायबंदी झालेल्या तोफा असतील तर त्याचे पंचरस काढावे. तोफखान्याचा कारखाना चालू ठेवावा जास्त कारागीर असतील तर ते दूर करावे. जो पंचरस खरेदी केला असेल तेवढयातच काम चालू ठेवावे. नवीन तोफा खरेदीला पैका फार लागतो इत्यादी सूचना नाना फडणीसास केलेल्या दिसून येतात. तसेच पेशव्यांच्या अंगी असणारे व्यवहारीपणा, काटकसर, प्रसंगावधनता, चौकस दृष्टी, दीर्घउद्योगीपणा, प्रामाणिकपणा इत्यादी गुणही दिसून येतात.

## ५.६ दक्षिण मोहिमेमध्ये नाना फडणीसाने माधवराव पेशव्यांस केलेली मदत

दक्षिणेत हैदरअली विरूद्ध लढणाऱ्या हरिपंत फडके व परशुरामभाऊ पटवर्धन यांना नाना फडणीस वेळच्यावेळी पैसे पाठवू शकला नाही. हैदरअलीची घोडदौड हे मराठी सेनापती रोखू शकले नाहीत. याचे मुख्य कारण त्यांची आर्थिक ओढ हे होते. तसेच एकटया मुरारराव घोरपडयाने एकाकीपणे शौर्याने त्याचा प्रतिकार केला आहे. हे वासुदेव शास्त्री यांचे मत योग्य वाटत नाही.[९६.१] कारण नाना फडणीसाने दक्षिणेच्या मोहिमेत माधवराव पेशव्यांना वेळोवेळी

मदत केली आहे. हैदरअलीची घोडदौड माधवराव पेशव्यांच्या नेतृत्त्वाखाली मराठी सरदारांनी रोखलेली दिसून येते. मराठी सरदारांनी हैदरअलीवर आपले वर्चस्व निर्माण केले . तसेच एकटा मुराररराव घोरपडे शौर्याने  लढला नसून इतरही मराठे सरदार या संघर्षात असल्याचे दिसून येते. स्वारीवर गेलेल्या पेशव्यांस पैसा,दारूगोळा  व अलंकार, औषधे तर नाना फडणीसाने वेळोवेळी पुरविली आहेत. तसेच पेशव्यांच्या कुटुंबातील स्त्रीयांची देखभाल व त्यांच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे, राघोबाच्या हालचालीवर नजर ठेवणे इत्यादी. देवरायदुर्गच्या मुक्कामी माधवराव पेशवे असतांना नाना फडणीसाने पुण्याहून एक लाख रूपयांची हुंडी पाठविली होती. ती सावकारांनी कबूल केली होती.[१७]

## ५.७ माधवराव पेशव्यांस मुराररराव घोरपडे यांची मदत व सल्ला

दक्षिण भारतातील कर्नाटकामधील एक मोठी शक्ति म्हणजे मुराररराव घोरपडे होते. पेशवे कर्नाटकच्या स्वारीवर आल्यापासून मुराररराव हा पेशव्यांच्या पक्षाला जाऊन मिळतील असा हैदरअलीचा अंदाज होता. म्हणून काही दिवसापूर्वी (ऑक्टोबर १७६९) हैदरअलीने मुराराव आपल्या बाजूला येण्यासाठी त्यास सत्कार करून परत पाठविले होते. पेशव्यांची स्वारी कर्नाटकावर होणार हे गृहीत धरून हैदरने मुराररावास उदारपणा दाखविला होता. पेशव्यांचा निरोप येताच मुराररावांनी हैदरअलीच्या धमकीला भीक न घालता चार हजार फौज आणि दोन मोठया तोफा घेऊन देवनहळळीच्या मुक्कामी पेशव्यांच्या लष्करास जाऊन मिळाले होते. तेथून सारे लष्कर चिकबाळापूरास हैदरअलीचा मुलूख जिंकण्यासाठी मुराररराव मराठयांच्या सैन्याबरोबर राहिले होते. या सैन्याने हैदरच्या राज्यातील एक कोट रूपये उत्पन्नाचा मुलूख जिंकला आणि लुटून फस्त केला. मार्च १७७० च्या पहिल्या आठवडयापर्यंत मराठयांचे सैन्य चिकबाळापूरास होते. तो किल्ला पडल्यानंतर त्याच्या सभोवतालचे गणेशगड, नंदीदुर्ग, देवरायदुर्ग, निजगल ही महत्त्वाची ठिकाणी पेशव्यांना मिळवून देण्यामध्ये मुराररावाचा मोठा सहभाग होता.[१८] मुराररराव व मराठयांचा किल्लेकरांना दरारा बसला होता. कारण त्या प्रदेशाची त्याला बारीक सारीक माहिती होती. चित्रदुर्गकर, कडप्पा, कर्नूल, कोलार इत्यादी ठिकाणचे नबाब व पाळेगार मुराररावास मानत असे म्हणून पेशव्यांनी मुराररावास आपल्या पहिल्या स्वारीपासून दक्षिण धोरणामध्ये सामावून घेतल्याचे दिसून येते.

हैदरअली हा तरिकिऱ्यापासून गोपाळरावाच्या तावडीतून निसटून संकरपट्टणास जाऊन राहिला होता. अशाप्रकारे जवळजवळ दोन ते तीन महिने मराठे व हैदर यांच्यात संघर्ष सुरू होता.मराठयांच्या ताब्यात बराच प्रदेश आला होता. गुर्रमकोंडा, बंगळूर व श्रीरंगपट्टण अद्याप मिळाले नव्हते. गुर्रमकोंडा जिंकण्याची तयारी सुरू होती. माधवराव पेशव्यांने त्या मोहिमेवर मुराराव घोरपडे व त्यांचे पुतणे मालोजी घोरपडे यांना पाठविले होते.

देवरायदुर्गचा किल्ला माधवराव पेशव्यानी जिंकून घेतला तो पर्यंत पर्जन्यकाळ जवळ आला. मुख्य ठिकाण बंगळूरचा किल्ला काबीज केल्याशिवाय हैदरचा पाडाव होणार नव्हता.[९९] आतापर्यंत या मोहिमेचा आढावा घेतल्यास असे दिसून येते कि, बहुतेक सर्व लढाया तुंगभद्रेच्या दक्षिणेस झाल्या, मराठयांनी हैदरअलीच्या राज्यापैकी एक कोटी उत्पन्नाचा मुलूख लुटून फस्त केला. कित्येक प्रांत ओसाड केले, किल्ले, शहरे काबीज केली,हैदरची लाखो रयत नागविली, कित्येक लोक प्राणास मुकले, पण हैदरअली तहास कबूल होईना.[१००] उलट हैदरअली आता म्हणू लागला, की माझी नुकसान व्हायची ती होऊन गेली.आता मी खंडणी का म्हणुन द्यावी. पावसाळयात मराठयांची छावणी या प्रदेशात होत नाही त्यांना परत तर गेलेच पाहिजे. दसरा झाल्यानंतर ते पुनः येतील तर त्यावेळचे त्या वेळेस पाहून घेऊ. हैदरचा तह न करण्याचा निग्रह पाहून पेशव्यांना मोठी पंचाईत पडली होती. श्रीमंताच्या मनात एकदा विचार आला की, पावसाळयात कर्नाटक प्रांतीच छावणी करून राहावे. त्याप्रमाणे आपला भाऊ नारायणराव व बायको रमाबाई यास देशी पाठविण्याचे ठरवून त्यांजकडून त्यांनी प्रस्थान ही केले होते.[१०१] परंतु पुन्हा त्यांना असे वाटू लागले की, आपण जर इकडे छावणीस राहिलो तर पैका जास्त खर्च लागेल तो आणावयाचा कोठून? शिवाय आपण एकाच मसलीस येथे गुंतून पडलो आणि राज्यात दुसरीकडे काही विघ्न उत्पन्न झाले तर त्याचे निवारण होण्यास मोठी अडचण पडेल. अशा स्थितीत त्यांनी सर्व मराठा सरदारांना बोलावून घेतले.सहकाऱ्यांशी विचार विनिमय केला. कर्नाटकचे प्रमुख माहितीगार आणि त्या परिस्थितीत योग्य डावपेच करू शकणारे मुरारराव घोरपडे हे होते. मुराररावाने स्पष्ट सांगितले की, कर्नाटकात छावणी केल्याशिवाय हैदरअलीचा पाडाव होणार नाही. एखाद्या मातब्बर सरदाराच्या हाताखाली छावणीस फौज ठेऊन माधवराव पेशव्यांनी परत जावे व दसरा झाल्यावर पुन्हा मोठया लष्करी तयारीनिशी कर्नाटकात यावे

म्हणजे मोहिमेची तड लागले. काही सरदारांची मते ही अशीच पडली. त्यामुळे माधवराव पेशव्यांना हा सल्ला पसंत पडला व त्यांनी तसेच करण्याचे ठरविले होते.[१०२]

## ५.८ माधवराव पेशव्यांच्या चौथ्या मोहिमेचा शेवट

माधवराव पेशव्यांनी मोहिम आटोपती का घेतली याची कारणे पुढीलप्रमाणे

१) आतापर्यत हैदरअलीच्या राज्यातील एक कोट रूपये उत्पन्नाचा मुलूख जिंकूण फस्त केला होता.

२) हैदरअली पेशव्यांची दहशत खाऊन जंगलात दडून बसला होता व बाहेर काही निघेना.

३) मराठयांनी हैदरअलीचे तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील बहुतेक प्रदेश, किल्ले जिंकून घेतले होते. फक्त गुर्रमकोंडा व श्रीरंगपट्टण बाकी होते.

४) मोहिमेचे जवळ जवळ सर्वच हेतू साध्य झाले होते.फक्त हैदरअलीकडून खंडणी येणे बाकी होते.

५) सैन्यामध्ये महागाई फार झाली होती.धान्य व वैरण मिळण्यास दुरापास्त झाले होते.

६) पावसाळा जवळ आला होता.

७) माधवराव पेशव्यांना मोहिमेची दगदग झाल्याने प्रकृती थोडीसी बिघडली होती.

८) मराठा सरदारांनी विचारविनीमय करून पेशव्यांना देशी जाण्याचा सल्ला दिला होता.

९) राज्यात इतर काही समस्या निर्माण झाल्या तर त्या सोडविता याव्यात. इत्यादी कारणांच्या परिपूर्ती करीता पेशव्यांनी आपली मोहिम आटोपती घेतली होती.

## ५.९ दक्षिणेची व्यवस्था व माधवराव पेशव्यांचे पुण्यास आगमन

वरील विविध कारणांच्या परिपूर्ती करीता पेशव्यांनी आपली मोहिम आटोपती घेण्याचे ठरविले होते. परंतु तत्पूर्वी त्यांनी मुरारराव घोरपडेच्या सल्ल्यावरून दक्षिणेची व्यवस्था लावून दिली होती. श्रीमंतानी त्रिंबकमामा पेठे यास कर्नाटकच्या फौजेवर मुख्य सरदार नेमले व मुरारराव घोरपडे, गोपाळराव पटवर्धन, आनंदराव रास्ते,बाजीपंत अण्णा,फत्तेसिंगराव गायकवाड,सखाराम हरी,आनंदराव गोपाळ इत्यादी सरदारांनी त्रिंबकराव मामाच्या हुकूमाप्रमाणे वागण्याची ताकीद दिली.[१०३]

त्रिंबक मामा पेठे, गोपाळराव पटवर्धन व आनंदराव रास्ते यांचा छावणीत राहण्याचा निश्चय झाला. सात आठ हजाराची फौज ठेवली. खर्चाची बेगमी पुण्याच्या ऐवजावर त्यास

आपणाकडून ऐवज आला म्हणजे रवाना क रु. [१०४] याच सुमारास धारवाड व सावनूर येथून ओरड आली की, हैदरअलीचा सरदार लालमिया याने सावनूरकरांच्या मुलूखात शिरून लुटालूट करून तिकडील प्रजेस अगदी हैराण केले आहे. त्यासाठी पेशव्यांनी लालमियाचे पारिपत्य करण्यासाठी नरसिंगराव धायगुडे, शहाजी भोसले यांना सावनूर प्रांती पाठविले व आणखी त्यांच्या कुमकेस भापकर, कवडे, शितोळे व काळे ही चार पथके नेमली. अशी व्यवस्था करून नंतर श्रीमंत काही हुजरात ,नारोशंकर, साबाजी भोसले,मल्हारराव पानशे, आप्पा बळवंत व इतर लहानसहान पथके यास बरोबर घेऊन देशी येण्याचा निर्णय घेतात. तसेच कोपलजवळ तुंगभद्रेवर सुवर्ण तुला करण्याचा निश्चय होतो. साहित्य आणण्यासाठी विठ्ठलपंत वाकेनीस यांना रवाना केले होते.[१०५] माधवराव पेशवे १३ मे १७७० रोजी परत येण्यास निघतात. वाटेत सावनूरच्या नबाबाचा मुलगा, मोगलाकडून मदतीस आलेला तहवारजंग व चित्रदुर्गकर संस्थानिक यांना आपापल्या ठिकाणी जाण्याचा त्यांनी निरोप दिला. वैशाख वद्य अमावस्येस सूर्यग्रहण होते. (२५ मे) याकरिता कृष्णा व घटप्रभा नदीच्या संगमावर निवृत्तीसंगम या ठिकाणी मुक्काम झाला. तेथे श्रीमंतानी सुवर्णतुला केली नंतर ते रामतीर्थ, वाळेखिंडी, नाझरे, शंभूमहादेव या ठिकाणी आले.[१०६] तेथून ६ जून १७७० रोजी दूधबावीचा घाट उतरून मुक्काम केला. नंतर दिंगची, म्हसवड, निरा यामार्गे १३ जून १७७० रोजी पुण्यास जाऊन पोहचले.[१०७]

## ५.१० दक्षिण मोहिमेचे नेतृत्व त्रिबंक मामा पेठयांकडे व हैदरअलीस शह

जून १७७० मध्ये माधवराव पेशव्यांनी त्रिंबक मामा पेठयांकडे दक्षिणेचा कार्यभार सोपविला होता. पेशवे पुण्याला परत गेल्यानंतर हैदरने पुन्हा आपल्या कारवाया सुरू केल्या. हैदरने गाड्दी, घोडदल, तोफखाना याची जमवाजमव सुरू केली. आपली गेलेली ठाणी परत मिळण्याचा प्रयत्न सुरू करून मराठी फौजेला अप्रत्यक्ष आव्हान दिले होते. सावनूर व धारवाड प्रांतातील ठाणी घेण्यासाठी त्याने आपला सरदार लालामिया यास पाठविले व त्यास मदत करण्यासाठी टिपू सुलतानला पाठविले होते. टिपूने हनगलचे ठाणे जिंकून घेतले परंतु धायगुडे वगैरे सरदारांनी पुन्हा ते सावनूरकरांच्या हवाली केले. त्रिंबक मामा पेठे व इतर मराठा सरदारांनी असा निश्चय केला होता की, सध्या दीड–दोन महिने नीलगड, पावगड, रायदुर्ग या तालुक्यात राहून गुजराण करावी ,पावसाळा संपेपर्यत एकमेकास जवळजवळ अशी छावणी करून रहावे. प्रथम त्यांनी शिऱ्यांचा बंदोबस्त केला. तेथे पेशव्यांनी महिमानजी शिंदे यास ठेवले

होते.तो शूर नव्हता व हैदरला भीत असे. म्हणून सखाराम हरीने बळवंतराव प्रभु यास व महमद इसफ या लष्करी अधिकाऱ्यास ४०० गारद्यासह तेथे ठेवले.[१०८]

हैदरने प्रथम कोलार, होसकोट, बाळापूर या मराठी मुलखात आपल्या सैन्याच्या टोळया पाठविल्या.या टोळयांना शासन करण्याचे काम मराठे सरदारांना करावे लागले. सुदैवाने तशी संधी मराठयांना चालून आली. त्यावेळी मराठयांची छावणी चिकबाळापूराजवळ होती. तो किल्ला मराठयांच्या ताब्यात होता. हैदरने आपले बळ अजमावून पाहण्यासाठी किल्ल्यावर तोफा डागण्यास सुरूवात केली. किल्ल्यात जानराव धुळप आपल्या फौजेसह होते.त्याने ही बातमी गोपाळराव व मुराराव घोरपडेयांना कळविली. तेव्हा रास्ते, मुराराव व गोपाळराव एका दिवसात पंचवीस कोसांची मजल करून शत्रूच्या फौजे जवळ पोहचले परंतु हैदर तेथे नव्हता.त्याच्या गारद्यांनी मराठी फौजेवर हल्ला केला. मराठयांनी ही तोडीस तोड संघर्ष केला. त्यामुळे हैदरच्या गाड्यांची पळापळ सुरू झाली. काहीना ठार मारले, काही जखमी झाले तर ज्यांनी दाती तृण धरले त्यावर मात्र कोणी वार केले नाही. त्यांच्या तोफा, बंदुका आणि पाचशे घोडे मराठयांच्या हाती लागले. या फौजेची दुर्दशा पाहिल्यावर शत्रूच्या बाकी टोळयांनी त्या प्रांतातून तात्काळ पळ काढला होता. मुराराव व गोपाळरावांनी ही कामगिरी मोठया शौर्याने यशस्वी केली होती व चिकबाळापूर मराठयांनी ताब्यात घेतले.[१०९]

## ५.१०.१ गुर्रमकोंडयाची मोहिम व मीररेझाची कैद

कडप्पा जवळ हा बळकट किल्ला असून हैदरचा शूर सरदार मीररेझा हा मराठयांच्या बाजूचा होता. पण या स्वारीत तो हैदरास सामील होऊन मराठयांना उपद्रव देत होता. म्हणून त्रिंबक मामाने पावसाळयात विश्रांती करण्याचा पूर्वीचा निश्चय रद्द करून गुर्रमकोंडा प्रांत काबीज करण्याच्या उद्देशाने तिकडे स्वारी केली. आघाडीला गोपाळराव होते. त्यांनी सभोवतालची दुबळ, चांभार टेकडी, तळपूर, मदनपल्ली ही ठाणे घेतली व त्रिंबकराव मामाने गुर्रमकोंडयास ऑगस्टमध्ये वेढा दिला. किल्ल्यात मीररेझाचा भाचा सैदुमिया हा जय्यत तयारनिशी उभा होता. त्याने निकराने किल्ला लढविण्याचा निश्चय केला. हैदरअलीकडून कुमक येण्याची भिती होती म्हणून त्रिंबकमामाने श्रीरंगपट्टणच्या वाटेवर गोपाळरावास ठेवले व वेढयाचे काम नेटाने सुरू केले. हुजरातीत रास्ते,आनंदराव गोपाळ,मुराराव ,हरपनहळळीकर संस्थानिक यांचेही मोर्चे होते. मराठयांना मुबलक दारू मिळाल्याने त्यांच्या तोफा सुरू झाल्या. आतील

इमारती दररोज ढासळत होत्या, शेकडो माणसे मरत होती. किल्ल्यात धान्य संपल्याने लोक गुरे व घोडी खाऊन प्राण वाचवित होती. हैदरकडून कुमक येईल असे सैदुमियाला वाटत होते. परंतु अडीच महिने झाले तरी मदत आली नाही. यामुळे त्याने निराश होऊन मुराररावामार्फत कौल मागितला.[११०] २ ऑक्टोबर १७७० रोजी किल्ल्याच्या एका बुरूजाला लावलेले सुरूंग उडाले व मोठे भगदाड पडून मराठे एकदम आत शिरले. मुराररावामार्फत करार ठरला की, किल्ल्यातील लोकांनी आपले कुटुंब, वस्तवानी व हत्यारासह बाहेर यावे व ते सांगतील त्या स्थळी मराठयांनी त्यांना सुरक्षितपणे पोहचते करावे . या अटी मान्य झाल्यावर १९ ऑक्टोबर १७७० रोजी गुर्रमकोंडयावर दिवाळीच्या  दिवशी मराठयांचे निशाण फडकू लागले. हा संग्राम सुमारे दोन महिने चालला होता. या विजयाने हैदरला मात्र मोठा धसका बसला होता.[१११]

हा वेढा चालू असतानाच हैदरची काही फौज माकलीदुर्गाजवळ येऊन उतरली होती. तिचा मुकाबला करण्यासाठी त्रिंबकराव मामाने सखाराम हरी, निंबाळकर व ढमढेरे या सरदारांना पाठविले होते. या मराठी फौजेने शत्रूच्या लोकांस पिटून लावले. शत्रूच्या मुलूखात शिरून बंगळूर पर्यत लुटालूट केली. या स्वारीमुळे बंगळूरमध्ये काही काळा पर्यत गडबड उडाली होती. तसेच गोपाळरावाने हैदरचे सरदार सैद महमंद, चंद्रोजी जाधव, बाळाजीपंत या फौजेवर हल्ला करून त्यांचा बंदोबस्त केला. या संघर्षात चंद्रोजी व बाळाजी मरण पावले तर आठशे गाड्दी व प्यादे ठार मारले गेले. बाकीचे लोक रानोमाळ पळत सुटले होते. त्यांच्या सर्व तोफा, जेजाला, बंदुका, तीनशे घोडे, पुष्कळ सामान मराठयांच्या हाती लागले. त्यानंतर गोपाळरावाने कोलार प्रांतातील अनेक ठाणी काबीज केली. या विजयाने मराठयांची प्रतिष्ठा वाढली व त्रिंबकरावांची मोठी वाहवा होऊ लागली. गुर्रमकोंडा सरकारात घेतल्यानंतर त्रिंबकराव मामा तिरूपतीच्या स्वारीस गेले. गोपाळरावाने येलवंतीचे ठाणे गोली न वाजता हस्तगत केले. आतील प्यादे, हत्यारे, बायकासुद्धा जातील तेथे पोहोचवून द्यायचा करार आहे.त्यानंतर तलकल घेण्यासाठी गेले होते. [११२] गुर्रमकोंडयाची व्यवस्था लावून गोपाळराव अडोनी व बल्लारीकडे खंडण्या घेण्यासाठी गेले होते. परंतु त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना मिरजेस यावे लागले. त्यांची फौज वामनराव यांनी सांभाळली. पण वामनराव येण्यापूर्वीच गोपाळराव मिरजेस घरी जाऊन पोहोचले व तिसऱ्या दिवशी ११ जानेवारी १७७१ रोजी मरण पावले. पेशवे व इतर सर्वांना दुःख झाले. गोपाळराव हा पटवर्धन घराण्यातील कर्ता पुरूष होता. पेशव्यांचा

दक्षिणेकडील मदतनीस व हस्तक होता. सर्व ब्राम्हणामध्ये गोपाळराव मुकुटमणि होते. पेशव्यांना बातमी समजताच चार दिवस चौघडे व दरबार बंद केला होता.

## ५.११ माधवराव पेशव्यांची दक्षिणेकडील पाचवी स्वारी

माधवराव पेशव्यांची शरीरप्रकृती उत्तम नव्हती व ते वारंवार आजारी पडत असे. हैदरअली वरील चौथ्या स्वारीत प्रकृती बिघडली होती व विविध कारणांच्या परिपूर्ती करीता पेशव्यांनी आपली मोहिम आटोपती घेतली होती. त्यामुळे ते छावणीस न राहता पावसाळ्याच्या प्रारंभी पुण्यास आले होते. परंतु त्यांच्या मनास स्वास्थपणा मिळाला नाही. कारण हैदरअलीचे पारिपत्य कसे होईल हाच विचार त्यांच्या मनात एकसारखा येत असतो. पावसाळा संपल्यानंतर आपल्याला कर्नाटकात जायचे असे ते म्हणत असे. श्रावण महिन्यापासूनच नालबंदीची घडामोडी सुरू होऊन शिलेदार लोकांच्या झुंडी चोहोकडून पुण्यास येऊ लागल्या. याचे कारण पेशव्यांच्या जीवास जरा बरे वाटू लागताच यंदाही स्वतःच स्वारीवर जाण्याचा इरादा त्यांनी जाहीर केला होता. यामुळे स्वारीची तयारी मोठया उत्साहाने व जल्दीने करण्यात येत होती. इकडे पुण्यात पेशव्यांनी दक्षिणेत युद्ध सामग्री पाठविण्यासाठी बंदुका ओतण्याचा कारखाना सुरू केला होता.[११३] पंधरा हजार नवीन गाड्दी, पठाण, आरब, हबशी रोहिले इत्यादी चाकरीस ठेवले होते. युरोपियन गोलंदाज हुशार व कसबी कारागिर चाकरीस ठेवले. यंदाच्या स्वारीत बिदनूर काबीज करण्याचा बेत असल्याने त्या प्रांताचे रान तोडून काढण्यासाठी सरकारांतून दहा हजार कुऱ्हाड ी तयार करवून रानतोडे लोकांच्या जमाती यंदा मुद्दाम चाकरीस ठेवल्या होत्या.[११४] ३ सप्टेंबर १७७० रोजी माधवराव पेशव्यांनी नरसिंगराव धायगुडे, शहाजी भोसले व जर्नाधनराव असे सरदार दक्षिणेत असतांना तिकडे सोंध्याचे गाव मारावयाचा विचार पडतो हे अपूर्व आहे. आपले गाव सोडून व राखून त्यांचे (हैदरचे) मारावे तर तारीफ अतः पर हे काम करणे,असे धायगुडे यांना पत्र पाठविले होते.

मावळे लोकांचा पायदलावरचा अधिकारी त्रिंबक सूर्याजी यास पेशव्यांनी कामगिरी सांगितली की, सोंधे प्रांताची कोकण किनारपट्टी,गोकर्ण महाबळेश्वर, होनावर बंदर, किल्ले, ठाणी व मुलूख यांच्या सनदा द्याव्यात, त्यावरून विजयदुर्गचे धुळप व वाडीकर सावंत यांना सनदा देण्यात आल्या होत्या. सदर प्रांतात सरकारचा अमंल होईल त्यासाठी कर्ज काढू न मसलत सुरू करावी. सरकारचा अमंल झाल्यावर कोणी रसदा घ्यावयास सिद्ध होतील ते न

व्हावे किल्ले, प्रांत, श्रम, साहस करून सोडल्यास तो तालुका सेवकाच्या ताब्यात असावा. जो कोणी कामावर उभा राहिल श्रम, साहस करील त्यास सेवक वचन देईल. धंदे ,रोजगार ,बक्षिसे वगैरे देऊन मसलत पूरी करून कार्य सिद्धी झाल्यावर स्वामी सेवकाचे वचन पार पाडणार ,स्वामी धनी समर्थ आहेत. भाऊबंद, पुत्र, पुतणे व सरदार कारकून सुद्धा मसलतीस जातो. मसलत सिद्धीस गेल्यानंतर सर्वाचे चालविणार खाविंद समर्थ आहे. याच सनदेत महत्त्वाची पाच कलमे आहेत. त्यानुसार सोंधे – कोकण किनारपट्टी मधील सर्व मुलूख हैदरचा काबीज करावा, खर्च सरकारात मागू नये, हैदरशी सुलूख झाला तर किल्ले सरकारात राहतील, तालुका तुम्हाकडे राहील. मसलतीस लोक चाकर लागतील त्यास काही बक्षीस द्यावे इत्यादी .त्यामुळेच विजयदुर्गचे धुळप, वाडीकर सावंत ,त्रिंबकजी सूर्याजी यांना सोंध्याच्या बाजूने हैदरवर रवाना केले होते व त्रिंबक सूर्याजीने हैदरकडून कॅनरा जिल्हा जिंकूण घेतला होता.[११५] मराठी आरमाराने जाऊन होनावर व मलबार किनाऱ्यावरील कित्येक बंदरे घेतली. हरिहरचा मालेदार लक्ष्मणराव लागू याने बसवापट्टण तालुक्यापैकी साठ गावे घेतली. गतवर्षी प्रमाणेच यंदाही नागपूकर भोसले व निजामअली फौजेसह पेशव्यांना येऊन मिळण्यास तयार झाले. तसेच पेशव्यांनी मुरारराव घोरपडयास ही पत्र पाठवून कळविले होते की, यवनास जरबेत आणून पुरते पारिपत्य करून देव ब्राम्हणांची स्थापना करावी ,संस्थाने सोडवावी हा भाव आहे दुसरा प्रकार नाही.[११६] तसेच त्रिंबकमामा पेठे पण पेशव्यांना पत्र पाठवून मोहिमेमध्ये पुढे काय करावे हे विचारात असे .तेव्हा पेशव्यांनी पेठयांना सांगितले होते की, या शत्रूचे पारिपत्य यथास्थित केल्याशिवाय चैन पडणार नाही. तसेच हैदरच्या जिव्हाळयाचा मुलूख असेल तो प्रथम मारावा असे पेशवे त्रिंबकराव मामास लिहित असे.[११७] या सर्व विवेचनावरून माधवराव पेशव्यांच्या फौजेची जय्यत तयारी वरून हैदरने ताडले की, यंदा आपला पुरता नाश होण्याचा प्रसंग येणार आहे. या भयाने त्याने आपला वकील आपाजीराम यास तह ठरविण्याकरीता तात्काळ पुण्यास रवाना केले होते. आपाजीरावास कसेही करून पेशवे म्हणतील त्या शर्तीवर एकदाचा तह ठरवून टाकावा असे हैदरने सांगितले होते. परंतु तो वकील फार चाणाक्ष होता. पुण्याहून श्रीमंताची स्वारी निघण्यापूर्वी तो तेथे दाखल झाला होता. तरी प्रथम भेटीत त्याने मागील वर्षाच्या तहाच्या अटी सांगितल्या होत्या. पेशव्यांच्या स्वारीचे दिवस जसजसे जवळ येऊ लागले

तसतसा वकीलाच्या बोलण्यातही फरक पडू लागला होता. पेशव्यांनी त्याला धुडकावून दिले होते.[११८]

### ५.११.१ मोहिमेला सुरूवात व पुण्यास आगमन

त्रिंबकमामा पेठयांनी गुर्रमकोंडा काबीज केला त्याच दिवशी पेशव्यांनी १९ ऑक्टोबर १७७० रोजी कर्नाटकात जाण्यासाठी सैन्यासह कूच केले. विजयादशमीच्या मुहूर्तावर गुलटेकडीवर मुक्काम करून राहिले. तेथून निघून फौज जमा करीत ते जेजुरीस आले. त्या ठिकाणी २७ ऑक्टोबर रोजी नागपूरहून साबाजी भोसले चार हजार सैन्यासह पेशव्यांना येऊन मिळाले.[११९] दहिगाव मुक्कामी पेशव्यांनी महिमतराव कवडे व त्र्यंबकराव कवडे यास तातडीने सैन्यासह पाचारण केले. तेथून पेशवे वाईला आले. तांदुळवाडीच्या मुक्कामी तर पेशव्यांचा क्षयरोग बळावला व ज्वरही येऊ लागला. पोटात तिडीक उठू लागली. शक्तीचा ऱ्हास होऊ लागला. अन्नावरची वासना नाहीशी झाली, त्यातून ते उठतील असे कोणासही वाटत नव्हते. परंतु ती वेळ निभावली व ते आणखी काही मजला करत वाईहून निघून ते रहिमतपूर, श्रीकोल्हेश्वर (ता.सातारा),कऱ्हाड व मिरजेपासून आठ–दहा कोसावर रामापूर कमळापूर पर्यंत स्वारी आली व तेथे आठ मुक्काम झाले. त्यांचे शरीर दिवसेंदिवस अधिकच क्षीण होऊ लागले. त्यामुळे त्यांनी पुण्याला परत जाण्याचा निर्णय घेतला. त्याबरोबर आपाजीरामाचा बोलण्याचा रंग बदलला तो आता म्हणू लागला की, सालाबादप्रमाणे आपण खंडणी देऊ ,आमचा मुलूख आजपर्यंत श्रीमंतानी जितका घेतला आहे तितका सर्व परत दिल्यास आणखी चौदा लक्ष रूपये देतो. पाच वर्षापासून मेहनत करुन जिंकलेला एक कोट रूपयाचा मुलूख चौदा लक्ष रूपये देण्याला पेशवे तयार नव्हते. हैदर हा दगाबाज मनुष्य आहे.[१२०]

सप्टेंबर १७७० मध्ये पेशव्यांनी धायगुडे व भीमराव पानशे यांना चिकोडी ,मनोली घेण्यास जावे असे पत्र पाठविले होते.त्यानुसार त्यांनी ती ठाणे घेतली होती. पेशवे जानेवारी १७७१ मध्ये मिरजेजवळ कमळापूरपर्यत आले होते. करवीरच्या जिजाबाईची पेशव्यांकडे बऱ्याच दिवसांची ही मागणी होती. त्यासाठी पुणे दरबारी अनेक पत्रे व माणसे पाठविली होती. मोरोबाने मनोली दिली पाहिजे असे पेशव्यांना सांगितले होते. मनोलीसाठी पेशवे करवीरास जाणार असे पत्रही पाठविले होते. ही सर्व पत्र डॉ.आप्पासाहेब पवार यांनी जिजाबाईकालीन कागदपत्रे या ग्रंथात छापलेली आहेत. यावेळी पुण्याला परत जाण्यापूर्वी माधवराव पेशव्यांनी चिकोडी व

मनोली दोन्ही संस्थाने करवीरच्या जिजाबाईना नजर केली. मनोलीस राणीकडून जमाव जाऊन ठाणे बसविले होते.[१२१] तह ठरत नाही असे पाहून त्यांनी आप्पा बळवंत व मल्हारराव पानशे बरोबर दहा हजार स्वार, पंधरा हजार गारदी व दहा तोफा देऊन त्यांना कर्नाटकात रवाना केले होते. गणोबा नाईक रास्ते यास सातशे राऊताची सरदारकी नवी सांगितली. पाटणकर, निंबाळकर, दरेकर, माने, घोरपडे इतके मानकरी यास समजावित सालमजकुराची नालबंदी पावली होती त्या फौजेला निरोप दिला. भोसल्यास नागपूरास जाण्यास निरोप देऊन आपण हळूहळू दोन–दोन कोसाच्या मजला करीत २१ जानेवारी १७७१ रोजी पुण्यास परत आले.[१२२]

### ५.११.२ त्रिंबकमामा पेठयांची कामगिरी व पेशव्यांचे दक्षिण धोरण

हैदरअलीचे पुरते पारिपत्य करण्याचे पेशव्यांनी ठरविले होते. म्हणून पेशव्यांना स्वारीस दक्षिणेत जाता आले नाही, तरी त्यावेळी त्रिंबक मामास पत्र लिहिले होते की,'ज्याअर्थी हैदरअली सरळपणे वागत नाही. त्याअर्थी त्याच्या पारिपत्याचा क्रम धरला आहे की, दरसाल त्याचा मुलूख सोडवित जावा असे करता मसलतीस दिवस लागले तरी काय चिंता आहे. चार महिन्यात मसलत शेवटास जाणे ती आठ महिन्यात जाईल. आठ महिन्यात जाणे ती दीड वर्षाने जाईल परंतु शत्रूचे पारिपत्य केल्याविना चैन पडणार नाही. तसेच हैदरअलीच्या जिव्हाळयाचा मुलूख असेल तो प्रथम मारावा. राजश्री मलबाबापू ,कृष्णराव बळवंत याजबरोबर दहा हजार फौज व तोफखाना मामाकडे रवाना केला आहे. यांना मिळून तुम्ही बिदनूरवर स्वारी करावी व तो प्रांत जिंकूण घ्यावा असा पेशव्यांनी त्रिंबकमामाला अनेक वेळा सल्ला दिला होता.[१२३] मराठयांचा बिदनूर प्रांतावर फार दिवसाचा डोळा आहे. हे हैदरअलीस माहित होते. आजपर्यंत या प्रांताला उपद्रव न लागल्याने रयेतची स्थिती भरभराटीची होती. शिवाय तो हैदरअलीचा आवडता प्रांत होता .बाकीचा मुलूख म्हैसूरच्या राजाचा आहे. पण बिदनूर हे माझे स्वराज्य आहे ,असे तो म्हणत असे. अशा प्रांतावर मराठयांची स्वारी येत आहे. मैदानात लढून आपला निभाव लागणार नाही. पण बिदनूरच्या झाडीत शिरून मराठयांवर छापे घालून त्यांना हैराण करावे ,असा त्याने बेत केला होता.यासाठी त्याने पंचवीस हजार गाड्दी, आठ हजार स्वार, पंचेचाळीस तोफा, जेजाला, बाणाचे उंट इतकी सेना घेऊन श्रीरंगपट्टणहून बाहेर पडला व पाच कोसावर मेलकोटा येथे येऊन राहिला. मराठयांची फौज काही तरिकिऱ्याला व काही चेनगिरी या ठिकाणी होती. त्रिंबकमामांनी बिदनूरकडे जाण्याचा मनसुबा केला होता व मार्गातील बेलूर,

नागमंगल, बाणावर, मर्दनगड वगैरे ठाणी  जिंकून घेतली व त्रिंबकमामाने सखाराम हरी गुप्ते याला हैदरअलीचा ठावठिकाणा काढण्यासाठी, निळकंठराव, भवानजी वाघ, महिमानजी मुंढे, अंतोजी माने या सरदारांना दोन हजार सैन्यासह रवाना केले होते. सखाराम हरीने मेलकोटयास (हैदरची छावणी) जाऊन हैदरची कही (रसद)मारली होती. हत्ती, उंट व पाच सात हजार बकऱ्या त्याने लांबविली. त्याने भाल्यास पासोडया बांधून मातबर फौज आली आहे. असा देखावा करून कही लुटून हैदरअलीवर मात केली होती. सखाराम हरीच्या या अद्‌भुत पराक्रमाची हकिकत अजरामर झाली आहे. त्यानंतर लगेच नागमंगल ही लुटून फ स्त केले व अतित्वरेने बेलूरास जाऊन पोहचला. दरम्यान वामनराव पेठयांनी हैदरची कही मारून अनेक उंट, घोडे, व बैल पळविले होते. सखाराम हरीने त्रिंबकमामांना अति त्वरेने फौजेसह निघून येण्याविषयी कळविले होते.[१२४]

### ५.११.३ मोतीतलावाची लढाई (६ मार्च १७७१)

६ मार्च १७७१ रोजी त्रिंबकमामा पेठयांच्या नेतृत्वाखाली मराठी सैन्याने मेलकोटयाच्या जवळच उंच डोंगर असेलेल्या अत्यंत बिकट जागी हैदरअलीचा पराभव केला. ही जागा श्रीरंगपट्टण  पासून अलीकडे तीन कोसावर मोती तलावाजवळ आहे म्हणून मराठयांच्या इतिहासात या लढाईला 'मोतीतलावाची लढाई ' असे म्हणतात. तर काही इतिहासकार तिला चिनकुलीची लढाई असे संबोधतात. चुरसीची लढाई झाली व मराठयांना विजय मिळाला असे असले तरी,विल्कस सारखे युरोपियन इतिहासकार ही  लढाई नसुन साधी चकमक होती. तो दिवस हैदरअलीच्या पराभवाचा नव्हता तसेच मराठयांना देखील विजय मिळालेला नव्हता.[१२५] परंतु पेशवे दप्तरामध्ये या लढाईचे नेतृत्व करणाऱ्या त्रिंबकराव विश्वनाथाने मोती तलावाच्या लढाईचे वर्णन माधवराव पेशव्यांना पुढीलप्रमाणे कळविले आहे.– (१० मार्च १७७१ ) हैदरखान श्रीरंगपट्टणच्या मार्गे चालला आहे. त्यावरून आम्ही त्याच समई नगारा करून फौज सुद्वा तयार होऊन तोफा बरोबर घेऊन श्रीरंगपट्टणच्या मार्गे चाललो. त्याचा श्रीरंगपट्टणच्या वाटेवर छबिना होता. त्याची व हैदरखानाची गाठ पडली तेव्हा त्यांनी आम्हाकडे वामनराव गोविंद याजकडे बातमी पोहचविली त्यास वर्तमान कळताच तेही तयार होऊन तिकडून येऊन पोहचले. चार घटका रात्र असता लढाई सुरू झाली.तो त्यांनी तोफा चौफेर पसरून, गारदी ,फिरंगी, बारवाले याचे बुरूज बांधून मोठे कवायातीने लढत लढत पट्टणच्या मार्गे चालला. तोफा, बाण व फिरंगी

यांची मारगिरी एक सतत होत होती.आम्ही जाऊन पोहचलो. चौफेर फौजा घातल्या परंतु त्याचे मारगिरी पुढे घोडे, हत्ती  तोंड न करी ते समई तोफा येऊन पोहचल्या नाहीत, यामुळे काही उपाय न चाले.

पट्टणपासून तीन कोसावर अलीकडे मोतीतले आहे याजवर आला. तो आम्ही त्याचे डावे बाजूस पाणी धरून चालत होतो. हैदरखान मध्यावरून चालत होता. पिछाडीस काही हुजरात व उभयता रास्ते व हिंदूराव सेनापती यांची फौज व दौलतराव घोरपडे यांचे पुत्र आनंदराव रास्ते होते. उजव्या बाजूस वामनराव गोविंद, आनंदराव गोपाळ, नरसिंगराव धायगुडेव गायकवाडचे पथक होते. कृष्णराव माधव यांनी कस्त करून जिलेबीच्या दोन तोफासह येऊन पोहचले. त्या तोफा सुरू केल्या तो मागाहून दुसऱ्या दोन तोफा येऊन पोहचल्या. त्यानंतर तोफांची व बाणांची मारगिरी केली. गोळे त्याच्या लष्करात पडताच लष्कर जमवून चालत होते. ते गलबलून गेले व कांही अंतर पडले. थोडेसे तोंड लाविले. इतका अवसर पाहून स्वामीचे नाव घेऊन निशाण चालविले. तो हुजरात पथके जलद निशाणा जवळ येऊन पोहचली. ते समई वामनराव गोविंद, आनंदराव गोपाल, गणपतराव रास्ते, धायगुडे, गायकवाडचे पथक, हिंदूराव घोरपडे, खंडेराव घोरपडे, मालोजीराव घोरपडे, दौलतराव घोरपडे, कडप्पेकर महिपतराव मल्हार इत्यादी सरदारांनी निकड करून घोडे चालविले. त्यास हैदरखान आघाडीस पुढे चालला होता. पिछाडीस तोफा व गाडदी,फिरंग्याचे गुरूज बांधून चालत होता. ते उधळून मारीत मारीत हैदरखानापर्यंत निशाण घेऊन पोहचलो. तेव्हा हैदरखानाने मोती तलावा समीप डोंगर होता त्याचा आश्रय करून डोंगरावर पाच सात हजार माणसासह सडा जीव घेऊन चढला.त्याची तमाम फौज मारून गारद केली. मोठी लढाई झाली. राव सेनापती यांच्याकडे तोफा आल्या त्यासुद्धा चाळीस पंचेचाळीस तोफा, वीस पंचवीस हत्ती, सात आठ हजार घोडे व खजाना, जवाहिर इत्यादी सारी सलतनत लुटून फौज मारून गारद केली. हजार दोन हजार माणूस कापून टाकले. हैदरखान मात्र जीव वाचवून डोंगरावर चढला.त्याजवर आम्ही इकडील बंदोबस्त राखून दोन हजार फौज घेऊन जलद डोंगराखाली जाऊन पोहचलो. इतक्यात चार घटकाचा अवकाश पडला. त्याजमुळे हैदरखानाने कलरूचे सोंग घेऊन अथवा येक घोडयानी पळून पट्टणास गेला. डोंगरावर लोक व सरदार होते. त्यांनी नाईलाजाने कौल मागितला. त्यावरून कौल देऊन हत्यारे वगैरे घेऊन सोडून दिले. लालमिया, मीररेजा व लालाबक्षी वगैरे

मोठे मोठे पाच सात सरदार पाडाव करून आणले व कित्येक लढाईत ठार झाले. वरकड लोकात हैदरखान पहावा तो ओळखीची माणसे घालून चौकशी केली परंतु न सापडला.हजारो माणूस दाती तृण धरीत असता त्यास आपले लोक मारीत नाही. या अर्थे सोडून दिले. मीर फैजूला बरोबर होता परंतु त्याचा ठिकाण लागला नाही. स्वामीच्या पुण्यप्रतापे स्वामीची आजीम अस्मानी फत्ते झाली .सरकारच्या फौजेतील माणूस ,घोडे फार जखमी व ठार झाले. आम्हास गोलीची जखम उजवे कानास लागली. गोली निघोन गेली खैर जाहली. लवकरच जखम बरी होईल. निलकंठराव त्रिंबक, गोपालराव गोविंद यांचे भाऊ व अंताजी माने पागेकडील कामास आले. मोठी शर्तीची लढाई झाली. हुजरात व संरजामी सरदार लोक यानी निकड केली. लोकांनी चाकरी मोठ्या तऱ्हेने केली .सरकारी निशाणीचा हत्तीच्या पायास गोळा लागला तो कापून काढला. लष्कराचे घोडे ठार फार झाले व मातबर लोक जाया जखमी फार झाले, कितेक ठार ही झाले. स्वामीची फत्ते झाली सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.[१२६]

मराठयांचा आद्य इतिहासकार ग्रँट डफ या लढाई विषयी म्हणतो की, हैदरअलीचे पहिल्यांदा एवढे खच्चीकरण मराठयांकडून झाले होते. त्याचा स्वतःबद्दल व शक्तिशाली सैन्याबद्दल असलेला आत्मविश्वास मराठयांनी धुळीस मिळविला होता. हैदरअलीला मराठयांनी जन्माची अद्दल घडविली व त्यास पुन्हा लढाई करण्याचा धोका पत्कारावा याची भिती वाटत होती. म्हणून शेवटी पलायन करावे अशी स्थिती त्याची झाली होती. डफने मराठयांच्या सैन्याबद्दल व युद्ध कौशल्याबद्दल प्रशंसोद्गार काढले आहे .हैदरअली हा उद्विग्न/निराश अवस्थेत पळून गेला याचा कुठेही पुरावा सापडत नाही .[१२७] परंतु त्रिंबकराव म्हणतो की, हैदरची मुद्रा ही भिक्षुकासारखी झाली होती.[१२८]

## ५.११.४ हैदरची सर्वत्र दाणादाण व श्रीरंगपट्टणचा वेढा

मोती तलावाच्या लढाई नंतर दुसऱ्याच दिवशी मराठयांनी मेलकोटयाचे ठाणे जिंकून घेतले. माधवराव पेशवे पुण्याला आजारी असले तरी त्यांचे अधिक लक्ष दक्षिणेकडेच होते. म्हणून त्यांनी त्रिंबकमामांना पत्र लिहून कळविले होते की,'तुम्ही तिकडे आहात, तिकडील राजकारणे, मनसुबा, कर्तव्य करणे न करणे तुमच्या चित्तीही येत असेल. श्रीरंगपट्टण ते सर्व प्रकारे बळकट, बिदनूर झाडीने अवघड, आवाईने घेता सोपे तरी ते आधी घ्यावे, परंतु मामानी मुरारराव घोरपडे यास दक्षिणेची माहिती होती. म्हणून विचार विनिमय करून हैदरची राजधानी

असलेला श्रीरंगपट्टणलाच वेढा देण्याचे ठरविले. १० मार्च १७७१रोजी मराठयांनी श्रीरंगपट्टणला वेढा दिला.[१२९] हा किल्ला बळकट असून त्याच्या सभोवती कावेरी नदी वाहत असल्याने जिंकून घेणे अवघड होते. किल्ल्यात हैदर, टिपू, मीरफैजुला व आठ दहा गाडदी व फौज दोन–चार हजाराची होती. हैदरचा सर्वत्र पराभव झाल्याने तो लवकर शरण येईल अशी त्रिंबकमामास खात्री होती. म्हणून तोफांचा मारा सुरू केला पण हैदरने मराठयांना दाणा वैरण मिळू नये म्हणून आजुबाजूचा सर्व प्रदेश उध्वस्त केला. तरी मराठयांनी वेढा जोरात चालू ठेवला होता. मराठे दिवसातून पट्टणवर शे–दोनशे गोळे मारीत होते परंतु त्याचा उपयोग होत नव्हता. श्रीरंगपट्टणात दुष्काळ पडला होता. मराठयांच्या लष्करात धान्य ,वैरण मिळवणे दिवसेंदिवस कठीण झाले होते. तांदूळ रूपयास चार शेर, गुळ सवाशेर, तुप अडीच रूपयास एक शेर शिवाय पर्जन्य समीप येत चालला होता. लोक वेढयाला कंटाळलेले, नद्यास पूर आले तर आपले नुकसान होईल म्हणून त्रिंबकमामाने वेढा उठविण्याचा निर्णय घेतला होता.[१३०]

श्रीरंगपट्टणहून दक्षिणेतील राजकारणाविषयी बाजी गोविंद याने १२ एप्रिल १७७१ रोजी पाठविलेल्या पत्रावरून दक्षिणेकडील पेशव्यांच्या धोरणावर, त्रिंबकमामाच्या कामगिरीवर व हैदरच्या परिस्थितीवर प्रकाश पडतो. मुा नजिक श्रीरंगपट्टण इकडील वर्तमान विशेष, हैदरनाईकाचा मोड होऊन पट्टणास येऊन तोफा सुरू करून गोळयाची मारगिरी दुतर्फा होत आहे. पंचवीस दिवस नित्य दुतर्फा तोफांची मारगिरी होत आहे. हल्ली हैदर नाईकाकडील वकील राजश्री शामराव गोपाळ नरसिंगपूकर, राजश्री आनंदराव रास्ते यांचे विद्यमाने सलुखाचा प्रकार बोलावयास आला. हैदरनाईकाचा हलाखीचा प्रकार,सर्व जिनगानी लुटली गेली. आता काहीही राहिला नाही. कृपा करून तीन साला खंडणी पैकी एक सालाची पायमल्ली मजला द्यावी, बाकी सोडावी आणि दुसाला अठ्ठावीस लक्ष रूपये घ्यावे .मदगिरी ,चेनरायदुर्ग सोडावे व नवा मुलूख घेतला आहे, तो सोडावा. याप्रमाणे बोलू लागल्यावर रास्ते यांनी फारच निषेध केला. हे लबाडीचे बोलणे तुम्हास बोलावयाचे असेल तर आमचे विद्यमाने बोलू नये. परभारे हरकोणाचे हाती बोलावे.'आमचे विद्यमाने बोलत असाल तर आमचे तीन साला खंडणी व दरबार खर्च व मागील बाकीचे दाहा व पाळेगारा पासून वसूल पंधरा घेतले आहेत ऐसे सत्तर होतात. वाजवी कराराप्रमाणे पैका पुण्यास पावता न केला. दोन साले सारीच फौज हया मसलतीस गुंतली त्याचा खर्च दोन कोटी झाला. ऐसा पैका मातबर होतो. त्याचा तुमचे विचारे निदान मामलतच

करावी असे असल्यास निदान एक करोड रूपये व सोंधे,बिदनूर सोडावे .याखेरीज पाळेगारांचा व सरकारचा मुलूख तुम्ही घेतला आहे ,तो सोडावा. फक्त श्रीरंगपट्टण मात्र तुम्हाकडे ठेवावे .. राजे यांचे आज्ञेप्रमाणे वर्तणूक करावी. पेस्तर सालापासून खंडणी करार होईल याप्रमाणे या प्रांती न येता पैका पुण्यास पावता करावा. ऐसे साफ सांगून वकिलास पाठविले.’ आणि सर्वाचे विचारे आज दोन वर्षे फौज खराब झाली. पुढे छावणी केल्यास हुजरातचे फौजेस कार्तिक मासपर्यंत पन्नास लक्ष रूपये ,याखेरीज सरंजामियातही हाल राहिला नाही. त्यास सत्तर पंच्याहत्तर लक्ष रूपये, कोलार व चिकबाळापूर सोडू नये. याप्रमाणे सर्व झाल्यावर तह करावा ऐसा सर्वानी विचार केला आहे.[१३१]

त्रिंबक मामा हैदरअलीशी तहाचे बोलणे हे पेशव्यांच्या वतीनेच बोलतो असे वाटते. राजे(पेशवे) च्या आज्ञेप्रमााणे वर्तवणूक करावी. तसेच त्रिंबकमामा हे मराठी राज्याची किती निष्ठेने सेवा करीत होते व पेशव्यांविषयी त्यांच्या मनामध्ये असणारी स्वामीनिष्ठा दिसून येते. श्रीरंगपट्टणचा वेढा उठविल्यानंतर त्रिंबकमामाने निश्चय केला होता की, कावेरीच्या काठची हैदरची जी ठाणे आहेत. ती घ्यावी व तो तालुका लुटून फस्त करावा, दसरा झाल्यावर घाटाखाली उतरून तिकडील मुलूख मारावा. पावासाळयात श्रीरंगपट्टण प्रांती छावणी करावी, पुन्हा बिदनूरवर स्वारी करावी.त्याप्रमाणे त्रिंबकमामाने चेन्नरायपट्टण, नरसिंहपूर, संक्रपट्टण इत्यादी ठाणी जिंकून घेतली. यावेळी हैदरने आपल्या सैन्याच्या दोन फौजा करून एक फौजेचे नेतृत्व टिपूकडे देऊन त्याला बिदनूरकडे पाठविले होते. तर दुसऱ्या फौजेचे नेतृत्व महमदअली कुमेदखान याजकडे देऊन त्याला घाटाखालचा प्रदेश सांभाळण्यास सांगितले होते. तेव्हा कुमेदखान व त्रिंबकराव यांच्यामध्ये लढाई होऊन त्याचा पराभव झाला, पुष्कळ लोक ठार व जखमी झाले. तो आश्रयासाठी एका ठिकाणी शिरला असता मराठयांनी त्यास गराडा घातला. तेव्हा कुमेदखानाने आपल्या सैन्याचे सांत्वन करून, एका रात्री त्यांच्यावर मारेकरी घालून सर्वांची कत्तल केली व स्वतःचा जीव वाचवून म्हैसूरला पळून गेला.[१३२] यावेळी दक्षिणेच्या मोहिमेत पाच हजार सैन्यासह चित्रदुर्गकर, दोन हजार सैन्यासह रायदुर्गकर व हजार बाराशे स्वारांसह कडप्याचा नबाब मराठयांना येऊन सामील झाले. रायदुर्गाहून त्रिंबक मामांनी नाना फडणीसास मोहिमेची हकीगत सांगून फौजेस बेगमीस ऐवज पाठविलेला मिळाला नाही. तूर्त मोठा पेच वैरणीचा आहे. त्रिंबकमामा, राजश्री मुरारराव व गोपाळराव यांचे विचारानेच सल्ला

मसलत करतात. सर्वांचे एक चित्त आहे. धन्याचे कार्यास काम पडल्यावर मन वाढविण्याविषयी कोणी मागे घेणार नाहीत. धन्याचे पुण्यप्रतापे सर्व यथास्थितच होईल.[१३३]

दक्षिणेकडील वर्तमान पेशव्यांच्या कानी गेल्यानंतर पेशवे आजारी जरी असले तरी त्यांचे लक्ष हे दक्षिणेकडेच होते. दक्षिणेत सैन्याला रसदेची गरज आहे हे समजताच पेशव्यांनी रसदेची तजवीज केली हे त्यांच्या १५ जून १७७१ च्या पत्रातून दिसून येते. श्री अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री सखाराम हरी गोसावी यासी श्री माधवराव बल्लाळ प्रधान आसीर्वाद..तुम्हास निरोप समयी रस्ते (रसद) विषयी सांगणे त्याप्रकारे सांगितले असता तुम्ही शिरे प्रांती स्वस्त जाऊन बसला. इकडे मनसुब्यास तोंड लागले असता दिवसात लष्करात महागाई फार तीन सेर प्रमाणे दाणे मिळत नाही. असे असता या दिवसात तुम्ही मेहनत करून रसद आणून पोहचवावी ते न झाले .ही गोष्ट तुम्हापासून चुकोन गेली असो. या उपरी वीस पंचवीस हजार रसदेचे बैल घेऊन दरमजल येऊन पोहचणे. गरूडगिरी कडील गुंता उरकलाच असेल . अंतःपर येक घडीचा विलंब न करीता रसद घेऊन पोहच करणे,जरूर जाणोन लिाा असे. बहुत काय लिहिणे[१३४]

दक्षिणेतील संस्थानिक सैन्यासह येऊन मिळाल्यामुळे व रसद पोहचती झाल्याने जुलै महिन्यात मराठयांनी हैदरचे प्रदेश ओसाड करण्याचे व ठाणे घेण्याचे काम सुरू केले.वामनराव पटवर्धनाने बाणावर पासून तीन कोसावर असलेला मर्दनगड नावाचा बळकट किल्ला जिंकून घेतला. त्रिंबकराव मामा व मुराररावांनी नागमंगल, देवळापूर व किकेरी ही ठाणी जिंकून घेतली. त्यामुळे हैदरचे धाबे दणाणले व त्याने तहा करिता आपला वकील आपाजीराम यास त्रिंबकराव मामाकडे पाठविले. हैदरचा वकील आपाजीराम हा पट्टणहून मराठयांच्या लष्करात व तेथून पुन्हा पट्टणास याप्रमाणे सारखे हेलपाटे मारीत होता. सोळा दिवसाचा वायदा करून तो पट्टणास गेला होता. कारण इकडे पुण्यास पेशव्यांच्या आजारपणाची त्यास जाणीव होती. म्हणून त्याने कालहरण करण्याचे ठरविले होते.[१३५] कारण पेशवे कालवशही होईल, पुण्याच्या कारभारात घोटाळे माजतील. रघुनाथराव पेशवा होईल. इत्यादी. या सुमारास तंजावरचे राजे तुळजाजी भोसले याने त्रिंबकमामास पत्र लिहून इंग्रजा विरूद्ध मदतीची याचना केली होती. इंग्रज सेनानी स्मिथ व कर्नाटकचा नबाब महंमदअली यांनी तंजावरला वेढा दिला दिला होता. नोव्हेंबर १७७१ मध्ये त्रिंबक मामा पाईनघाट ओलांडून त्याच्या मदतीला गेले. ही बातमी कळताच महंमदअलीने

तंजावरचा वेढा उठविला. तंजावरचे राजाने मामांना ४ लाख रूपये दिले होते. त्रिंबक मामा घाटाखाली उतरले हे हैदरला कळताच टिपूला मोठया सैन्यासह पाठविले. पण वामनराव पटवर्धन टिपूच्या अंगावर चालून आल्याने तो लगेच श्रीरंगपट्टणास परत गेला. मामाने बारामहाल प्रांतात लुटालूट करून हैदरची ठाणी हस्तगत केली व कडप्याच्या नबाबास आपले मांडलिक बनविले. कृष्णराव बळवंत मेहंदळे, सखाराम हरी इत्यादी मंडळीना कोईमतूरच्या रोखाने पाठवून दिले .१३ जानेवारी १७७२ रोजी कृष्णराव मेहंदळे व टिपूच्या सैन्याची सालेमच्या बारीमध्ये गाठ पडून लढाई होऊन टिपूचा पराभव झाला. त्रिंबक मामाची बिदनूर जिंकण्याची इच्छा होती.[१३६]

## ५.११.५ माधवरावांच्या दक्षिण धोरणामध्ये परकीय सत्तेची मदत

दक्षिणेत मराठे हे अतिशय प्रबळ होते. मराठा मंडळाची धुरा माधवरावांनी हाती घेतल्यापासून मराठयांचा पानिपतमध्ये पराभव झाल्यानंतर ही मराठयांना पूर्वीचे वैभव प्राप्त करून देण्यासाठी माधवरावांनी सर्व प्रयत्न केले. इंग्रजांचा बिमोड केल्याशिवाय मराठयांना आपले वैभव प्रस्थापित करता येणार नाही. याची त्यांना जाणीव होती व त्यासाठी फ्रेंचाची मैत्री व मदत त्यांना अपेक्षित होती. हैदरअली विरूद्ध हाती घेतलेल्या आपल्या मोहिमेत फ्रेंचानी मदत करावी अशी माधवराव पेशव्यांना अपेक्षा होती म्हणून त्यांनी १७७२ मध्ये त्रिंबकराव पेठेस फ्रेंच गव्हर्नरशी चर्चा करण्यासाठी पाठविले होते. तसेच हैदरअली व मराठे यांच्या लढयामुळे दक्षिणेत फ्रेंच व हैदरअली यांचे संबंध ताणले होते. फ्रेंचाना दक्षिणेत वर्चस्व निर्माण करण्यासाठी इंग्रजांचा अडसर होता. म्हणून फ्रेंचाना इंग्रजाविरूद्ध मराठयांच्या मदतीची गरज वाटत होती. परंतु हैदरअलीस मदत केल्यास ते मराठयांचे शत्रूत्व ओढवून घेणार होते ,अशी स्थिती निर्माण होऊ नये म्हणून लॉने हयुगील यास मराठयांबरोबर शांततेचा तह करावा व आपणास स्थिती अनुकूल बनवून घ्यावी असे सुचविले होते.[१३७] म्हणून पेशव्यांनी त्रिंबकमामास पाठविल्यानंतर चर्चा होऊन पुढील तह ठरला होता.

१) फ्रेंचानी फ्रान्स मधून मराठयांच्या मदतीसाठी दहा हजाराची फौज, शस्त्र व दारूगोळा मागवावा.

२) हैदरअलीकडून जिंकून घेण्यात आलेला सर्व प्रांत आणि ३० ते ४० लाखाचा वार्षिक उत्पन्न मिळवून देणारा मुलूख मराठयांनी फ्रेंचाना देण्याचे कबूल केले.

३) पाँडेचरी व इतर ठिकाणी असणाऱ्या सर्व फ्रेंच फौजांचा खर्च मराठयांनी करावा.

४) कोकण किनारपट्टीवरील वसई व त्याच्या आसपासचा प्रदेश मराठयांनी फ्रेंचास द्यावा.

५) भारतातील फ्रेंचाच्या शत्रूस मराठयांनी आपले शत्रू समजावे.

६) इंग्रज–फ्रेंचामध्ये संघर्ष निर्माण झाल्यास मराठयांनी इंग्रजांविरूद्ध फ्रेंचाना मदत करावी.

७) हैदरअलीचा पराभव करण्यासाठी फ्रेंचानी सैन्य,शस्त्रास्त्रे व दारूगोळयाचा पुरवठा करावा. इत्यादी.[१३८]

इंग्रजांच्या भेदनितीची पेशव्यांना जाणीव होती. म्हणून फ्रेंचाची मदत त्यांनी मिळवण्याचा प्रयत्न केला होता व हैदरचे पारिपत्य झाल्यावर फ्रेंचाच्या मदतीने इंग्रजांचा बंदोबस्त करण्याचा त्यांचा मानस होता. परंतु तूर्त हैदरचा बंदोबस्त करण्यासाठी त्यांनी ९ जानेवारी १७७२ रोजी माधवराव सदाशिव याला मद्रासचा गव्हर्नर चेन्नापट्टण याकडे पत्र घेऊन पाठविले होते व थोडयाच दिवसात तेथून संगीन फौजेसह जहाजे पोहचविण्याची आशा आहे. बाकी अर्काटचा नबाब आपणास कळवितीलच.[१३९] थोडक्यात परकीय सत्तांनी पेशव्यांची कर्तबगारी व मराठी सरदारांच्या पराक्रमामुळेच हैदरअलीविरूद्ध मराठयांना मदत करण्याचे ठरविले होते.

## ५.११.६ हैदरअलीचा मराठयांशी तह

जानेवारी १७७० पासून मराठयांशी चाललेल्या लढाईला व संघर्षाला हैदरअली कंटाळला होता. त्यात घाटाखालच्या मुलूखाची मराठयांनी केलेली दुर्दशा ऐकून त्याचा धीर खचला होता. हैदरअली मनाशी विचार करू लागला की, पेशवे मरण पावल्यावर आपणास काय लाभ व्हायचे ते होतील. परंतु तोपर्यत आपले राज्य राहील तरी कशावरून आपली फौज धुळीस मिळाली, दौलत गेली, बहुतेक राज्य ही शत्रूने घेतले. बंगळूर व श्रीरंगपट्टण ही दोन शहरे व बिदनूर प्रांत एवढेच आता शिल्लक राहिले होते. लढाई चार–सहा महिने चालली तर तेही हातून जातील आणि त्रिंबक मामाचा संकल्प तर बिदनूर घेण्याचा होता. तसेच दक्षिणेतील बहुतेक संस्थानिक व नबाब आणि इंग्रज, फ्रेंच या सत्तांही आपणास मदत करण्याची शक्यता नाही . म्हणून हैदरने आपला वकील आपाजीराम यास पाठवून पेशवे म्हणतील त्या अटीवर तह करण्यास सांगितले होते.[१४०] त्रिंबकमामास श्रीमंताची पत्रे गेली की, सल्ला करून लवकर येणे, हैदरखानाकडून अटी आल्या आहेत. हिंदुस्थान व कर्नाटक या दोन लष्करास मुबलक खर्च

होतो. हिंदुस्थान(उत्तर) पैका येत नाही. निदान पक्षी पंचवीस लक्ष रोख घेऊन कित्येक ठाणी, किल्ले सोडून हैदरचा सुलूक करावा. पेशव्यांचा आदेश आल्याने तह करण्याचे ठरले तरी त्यासाठी दोन महिने गेले. शेवटी लक्ष्मणराव रास्तेच्या विद्यमाने २२ जून १७७२ रोजी किकेरी मुक्कामी तहावर सहया झाल्या.

कर्नाटकात मराठयांचे स्वराज्य म्हणून जितके होते, ज्यासाठी जवळजवळ दहा वर्षे संघर्ष चालला होता. शिवाजी महाराजांच्या मृत्यूसमयी त्यांच्या ताब्यात जितका मुलूख होता, त्यास स्वराज्य अशी संज्ञा पडली होती. असा कर्नाटकातला मुलूख म्हणजे शहाजींची जहागीर शिरे, होसकोट, थोरले बाळापूर, कोलार हे परगणे मराठयांनी हैदरअली कडून जिंकून घेतले होते. ते आता या तहाने त्यांजकडे कायम राहिले. पाचवा परगणा बंगळूचा मिळाला नाही. पण त्याबद्दल मदगिरी मिळाला. शिवाय वीस लक्षाचा मुलूख गुर्रमकोंडयाचा त्यांनी घेतला होता. तो ही मराठयांकडे कायम राहिला. मात्र हैदरचा जितका मुलूख घेतला होता, तो त्याला परत दिला. यामध्ये नंदीदुर्ग, चिक्कबाळापूर, देवरायदुर्ग ही ठाणी होती. हैदरने पेशव्यांना खंडणीबद्दल पन्नास लाख रूपये द्यावे. त्रिंबकराव वगैरे सरदारास दरबार खर्चाबद्दल दहा लाख रूपये देण्याचे कबूल केले. त्यापैकी चार लाखाचे जवाहिर एकंदर एक लाख किमंतीचे वीस हत्ती व सत्तावीस लाख रूपये रोख याप्रमाणे ३२ लाख रूपयाची भरती करून दिली. बाकी २८ लाख राहिले त्याची सावकारी निशा करून दिली. मराठी राज्यावर येथून पुढे हैदरने आक्रमण करू नये. रास्ते व घोरपडे मध्यस्थ राहिले. आपाजीराम वकील याकडून करारात अंतर पडले म्हणून त्याला कैदेत टाकले.[१४१]

तह झाल्यावर हैदरअलीकडून निरोप आला की, तुंगभद्रा पार झाल्यावर ऐवज देऊ तो पर्यत रास्ते यास ठेवून जाणे. तेव्हा त्रिंबक मामांनी जबाब पाठविला की, टिपूस ओलीस दिल्यास रास्त्यास ठेवून आम्ही जातो. ऐवजासह रास्ते लष्करात येऊन पोहचल्यावर टिपूस सोडून देऊ .या उत्तराने हैदरअली थंडावला व त्याने रोख रक्कम ताबडतोब दिली.[१४२] वरील तह उरकून त्रिंबकमामा जूनच्या अखेरीस निघाले व १० सप्टेंबर १७७२ रोजी थेऊर येथे पेशव्यांना येऊन भेटले. त्यावेळी त्यांनी ३० लाख रूपये सरकारात भरले. त्याची स्वारी दोन वर्षे चालली, तिचा खर्च एक कोटी ३९ लक्ष झाला होता. सरदेसाई या तहाला निराशेचा तह तसेच मराठी राज्यात नवीन अशी काहीच भर पडली नाही असे म्हणतात. परंतु ते योग्य वाटत नाही

कारण पेशव्यांनी शिवाजी महाराजांनी पैदा केलेले स्वराज्य मराठी कब्जात आले. दक्षिणेतील शिरा, अर्काट, कडप्पा, सावनूर, कर्नूल, रायदुर्ग, चित्रदुर्ग इत्यादींनी मराठयांचे प्रभुत्व मान्य करून खंडणी देण्याचे कबूल केले होते. मुख्य म्हणजे मराठी राज्य जिंवत आहे, मराठे सरदार राज्याचे संरक्षण करू शकतात. याचा प्रत्यय मात्र दक्षिणेत सर्वांना आला होता. या दक्षिण धोरणामुळे अनेक कुटुंब युद्ध मोहिमामध्ये सहभागी झाल्याने त्यांना युद्ध मोहिमांचा अनुभव मिळून राष्ट्रउद्योगात सामील झाली होती.

## ५.११.७ माधवराव पेशव्यांचा मृत्यू (१८ नोव्हेबर१७७२)

पेशवे आजारी जरी असले तरी त्यांचे लक्ष मराठी राज्यकारभाराकडे होते. सर्व मुत्सद्दी यांनी सरकारचे वाडयांत कचेरीस जावे, कारभार करावा, कोणी आपले घरी सरदारी करू नये. नाना फडणीस वाईला होते तर त्यांना पुण्यास बोलावून घेतले होते. ऑक्टोबर १७७२ मध्ये सखाराम बापूनी थोर मनाने व राज्यहितार्थ दृष्टीने श्रीमंताच्या कर्जफेडीची गोष्ट सरदार मंडळीजवळ काढून म्हटले होते. एक सालाचा ऐवज सरक ारात घ्यावा. तोटयाचा जाबसाल म्हणू नये . श्रीमंतास रुष्ट करू नये. आपणही रूष्ट न होता गोडीने कारभार करावा. यावरून मराठी सरदारांमध्ये राजनिष्ठा निर्माण केल्याचे दिसून येते.

नाना फडणीस व हरिपंत फडके नेहमी श्रीमंताजवळ असत. त्यास ते बोलले की, माझे सरदार, मुत्सद्दी व रयत लोक मला पाहावेसे वाटतात. याकरिता मजकडे येण्यास कोणास ही बंदी घालू नका. हा हुकूम सुटताच हजारो लोक पेशव्यांच्या दर्शनास धावले. आपला अंतकाळ समोर आला आहे असे पाहून त्यांनी वैद्यांना प्रार्थना केली की, मरणासमयी मला कफ न व्हावा, अतिसार व्हावा अशी योजना करा. कारण कफ झाल्यास वाचा बंद होऊन परमेश्वराचे नामोच्चरणास मी अंतरेन. कार्तिक वद्य अष्टमीच्या दिवशी म्हणजेच १८ नोव्हेंबर १७७२ रोजी थेऊर येथे श्रीगणपती मंदिरातील ओवारीत देहावसन झाले. मरणापूर्वी त्यांनी नमस्कार केला व महायात्रेस आम्ही जातो. आमच्या स्वारीची तयारी करा. असे सांगून स्मृतीत 'गजानन, गजानन' असा नामघोष करीत मोठया योग्याप्रमाणे त्यांचा नेत्राद्वारे प्राण गेला. पूर्व संकल्पाप्रमाणे रमाबाई ही सती गेली.[१४३]

## ५.१२ समारोप

पेशवे पुण्याला आल्यानंतर दक्षिणेत पहिले इंग्रज–म्हैसूर युद्ध झाले. इंग्रज, निजाम हैदर व कर्नाटकच्या नबाबाने पेशव्यांकडे मदत मागितली होती. पेशव्यांनी गोपाळरावास कोणाच्याही मदतीस जावू नये अशी सक्त ताकीद दिली होती. रघुनाथराव व जानोजी भोसल्यांच्या पारिपत्यास गोपाळरावास कर्नाटकातून बोलावून घेतले होते. पहिल्या इंग्रज म्हैसूर युद्धात हैदरने इंग्रजांचा पराभव केला. नंतर मराठयांचा दक्षिण भारतातील प्रदेशास उपद्रव देण्यास सुरूवात केली. हैदरने रघुनाथराव व जानोजी भोसल्यांना पेशव्याविरूद्ध उभे केले. पेशव्यांनी रघुनाथरावास कैदेत टाकले व जानोजीचा पराभव करून त्यास हैदरअली विरूद्धच्या मोहिमेत सहभागी करुन घेतले. या पार्श्वभूमीवर चौथ्या कर्नाटक मोहिमेचा उदय झाला.

हैदरअलीचा समूळ नाश करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. मुराररावास मदत करणे, संस्थाने सोडविणे व खंडणी वसूल इत्यादी प्रमुख हेतू होते. याही वेळी पेशव्यांनी मोहिमेची प्रचंड तयारी केली होती. सन १७६९ चा पावसाळा संपताच गोपाळरावास मिरज येथे सैन्य जमा करण्यास सांगितले होते. नाना फडणीसावर राज्याचा कारभार सोपविला व पेशवे ७ नोव्हेंबर १७६९ रोजी पुण्याहून सैन्यासह निघून वाई, धोम, भुईंज, ओझर्डे, सातारा, म्हसवड, शंभू महादेव, पंढरपूर व पुढे कृष्णेचा रोख धरून शिरहट्टीला जावून पोहचतात. या मोहिमेत विविध मराठा सरदारांची एकूण पाऊणलक्ष फौज गुंतली होती. हैदरअलीने मराठयांसमोर लढण्याचे नाकारले. पूर्वीप्रमाणेच आपला प्रांत ओसाड केला व अनवडीच्या जंगलात निघून गेला. पेशव्यांनी सर्वानुमते मसलत आखली व तुंगभद्रेवरून श्रीरंगपट्टण प्रांतात गेले. पेशव्यांना सर्वत्र विजय मिळाला. दहा–बारा महत्त्वाची ठाणी जिंकून घेतली. हैदरअलीला पेशव्यांच्या लष्कराच्या २५ ते ३० कोसाच्या घेऱ्यात फिरण्याची हिमंत झाली नाही.

पेशव्यांनी हैदरअलीच्या तोंडावर काही फौज ठेऊ न गुर्रमकोंडा व भैरवदुर्ग जिंकून घेतला. पेशवे दूर गेल्याने हैदरने गोपाळरावावर रात्रीचा छापा टाकला परंतु पटवर्धन मंडळीने विलक्षण शौर्य व चिकाटी दाखवून आपली सुटका केली. शिऱ्याची पेठ लुटणाऱ्या मीररेझाची पेशव्यांनी गुप्तहेर यंत्रणेमुळे चांगलीच फजित केली होती. पेशव्यांनी चिकबाळापूर व इतर महत्त्वाची ठाणी जिंकून घेतली या विजयाची अनेक कारणे होती. पेशव्यांनी मसलत योजली होती की, पाळेगार, पठाण व संस्थानिक यांना एकत्र करून हैदरअलीने दाबलेला प्रांत सोडविणे

. मुलबागलहून पेशव्यांनी बंगळूरकडे जात असल्याची अफवा पसरविली  निजगल, कोलार व मुलबागल  महत्त्वाची ठाणी जिंकून घेतली. नाना फडणीसाने पेशव्यांना या मोहिमेत मदत केली होती. मुराररराव घोरपडेच्या सल्ल्यावरून पेशव्यांनी दक्षिणेची व्यवस्था लावली. पेशव्यांनी विविध कारणांमुळे आपली मोहिम आटोपती घेतली होती.

त्रिंबकमामा पेठे यांच्या नेतृत्वाखाली दक्षिणेची व्यवस्था लावून पेशवे १३ मे १७७० रोजी परत निघतात व निवृत्ती संगम, रामतीर्थ, वाळेखंडी, नाझरे, शंभूमहादेव, दूधबावीचा घाट, म्हसवड व निरामार्गे पुण्यास पोहचतात. इकडे त्रिंबकमामाच्या नेतृत्वाखाली मराठे सरदारांनी हैदरअलीला चांगला शह दिला व गुर्रमकोंडा प्रांत जिंकून घेतला. पेशवे पुण्याला आले तरी हैदरअलीचे पारिपत्य कसे होईल. हा एकच विचार त्यांच्या मनात सारखा असतो. म्हणून आजारातून जरा बरे वाटताच प्रचंड तयारीसह हैदरअली विरूद्ध पाचवी मोहिम हाती घेतात. १९ ऑक्टोबर १७७० रोजी पेशवे पुण्याहून निघतात. परंतु तांदुळवाडीच्या मुक्कामी क्षय रोग जास्त बळावला तरी मिरजेपर्यत जातात. आप्पा बळवंत  व मल्हारराव पानशे यांच्याबरोबर सैन्य व दहा तोफा कर्नाटकात पाठवून देतात व फौजेस निरोप देत ते २१ जानेवारी १७७१ रोजी पुण्यास येऊन पोहचतात. त्रिंबकमामा पेठयांनी पेशव्यांचे दक्षिण धोरण पूर्णत्वास नेहण्याचा प्रयत्न केला . ६ मार्च १७७१ च्या मोतीतलावाच्या लढाईत हैदरअलीचा पराभव केला व त्याला कायमची अद्दल घडवली.

मोतीतलावाच्या लढाईनंतर मराठयांनी हैदरअलीची सर्वत्र दाणादाण केली. श्रीरंगपट्टणला १० मार्च १७७१ रोजी वेढा दिला. दक्षिण धोरणामध्ये इंग्रज व फ्रेंच या परकियांची पेशव्यांनी मदत मिळविण्याचा प्रयत्न केला होता. दक्षिणेच्या वार्ता पेशव्यांना पत्राने कळत होत्या. ते आजारी असले तरी सैन्याला रसदेची मदत केली होती. त्रिंबकरावांना मोहिमेविषयी मार्गदर्शन करत होते. जानेवारी १७७० पासून मराठयांशी चाललेल्या लढाईला हैदर कंटाळला होता. बहुतेक प्रांत मराठयांनी जिंकून घेतले होते. संस्थानिक, नबाब, इंग्रज, फ्रेंच या सत्ता ही मदत करण्याची शक्यता नाही. पेशवे आजारी असल्याने ते मरण पावल्यावर आपणास काय फायदे व्हायचे ते होतील. म्हणून हैदरने आपाजीरामास पेशवे म्हणतील त्या अटीवर तह करण्यास सांगितले. २२ जून १७७२ रोजी किकेरीचा तह झाला. त्रिंबकमामा पेठे १० सप्टेंबर १७७२ रोजी पुण्यास पेशव्यांना येऊन भेटले. माधवराव पेशवे राजयक्ष्मा रोगाने आजारी होते. पेशव्यांनी

मृत्यूपूर्वी मराठी राज्यास कर्जमुक्त केले व १८ नोव्हेंबर १७७२ रोजी थेऊर येथे श्रीगणपती मंदिरातील ओवारीत त्यांचा मृत्यू झाला.

## संदर्भ


१)खरे.वा.वा.,ऐतिहासिक लेखसंग्रह,भाग३,कुरूंदवाड भाऊनाना छापखाना,मिरज,१९०८,पृ. १३७१

२) Daff Grant James, History of the Marathas. Vol. I, London,1921, P.57

३) Banargee A.C. Peshwa Madhavrao - I¸ Calcutta- 1943, P.101

४) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, पृ.१३७२

५) खोबरेकर वि.गो.,महाराष्ट्राचा इतिहास,मराठा कालखंड भाग २,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ.१९८८ पृ.३११,

६) कित्ता, पृ.३१७, ३१८

७) सरदेसाई गो.स.पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड १९, मुंबई १९३१,लेख. ७६

८) खरे वा.वा.,उपरोक्त, भाग ३,पृ.१३७३

९) कित्ता, पृ.१३७३

१०) केळकर य.न.,मराठे व इंग्रज, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, १९६३, पृ.४६

११)Forrest G.W.,Selection from the State Papers of the Governer General Warren Hasting Vol.II, Maratha Series¸ Bombay 1910, P.132

१२) खोबरेकर वि.गो.,महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड भाग २, मुंबई, १९८८, पृ.३१४

१३) Forrest G.W.,Selection from the State Papers of the Governer General Warren Hasting Vol.II, Maratha Series¸ Bombay 1910, P.159

१४) खरे य.वा.(संपा.),मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७, पृ.१७६

१५) सरदेसाई बी.एन. आधुनिक भारताचा इतिहास, कोल्हापूर, २००४, पृ.११०

१६) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, ले.८०९ पृ.१३७५

१७) गर्गे स.मा.,हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेकडील इतिहास,दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९८३, पृ.१५९

१८) खरे वा.वा., उपरोक्त , भाग ३ पृ.१३७६

१९) गर्गे स.मा.,उपरोक्त, पृ.१६१

२०) खरे वा.वा., उपरोक्त , भाग ३, ले.८१४, ८१५

२१) सरदेसाई गो.स.(संपा.),पेशवे दप्तरातून निवडलेले कागद,खंड ३७,मुंबई,१९३४, ले.१७२

२२) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, पृ.१३७७

२३) खोबरेकर वि.गो.,उपरोक्त, भाग २, पृ.३१८

२४) Banargee A.C. Peshwa Madhavrao - I¸ Calcutta- 1943, P.147

२५) Sinha N.K., Haidar Ali, Calcutta, 1941, P.157

२६) खरे वा.वा., उपरोक्त , भाग ३, पृ.१३७७–७८

२७) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त , खंड ३७, ले.६८

२८)खरे वा.वा,ऐतिहासिक लेखसंग्रह,भाग४,कुरूंदवाड भाऊनाना छापखाना,मिरज,१९०८,पृ. १०३५

२९) सरदेसाई गो.स.(संपा.),मराठी रियासत खंड ५, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९०, पृ.१७९

३०) सरायकर सुनिता, विसाजी कृष्णा बिनीवालेःकाळ आणि कर्तृत्व,विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ.६०

३१) सरदेसाई गो.स.(संपा.),पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड ५, मुंबई, १९३०, लेख, ३२

३२) सरायकर सुनिता ,उपरोक्त, पृ. ६२

३३)Daff Grant James, History of the Marathas.Vol.I, London,1921, P.566

३४) सरदेसाई गो.स.(संपा.)पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड ३७, मुंबई,१९३० लेख.१२७

३५) सरदेसाई गो.स.(संपा.)पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड ३९, मुंबई,१९३० लेख.१०८

३६) सरदेसाई गो.स.(संपा.)पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड २९, मुंबई, १९३३ पृ.२९५

३७) भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, भारत इतिहास अनु.परिषद, नवी दिल्ली, १९७६, पृ.४२६

३८) वाड.ग.चि.,थोरले माधवराव पेशवे रोजनिशी,भाग १,इंदिरा प्रेस, पुणे,१९११,पृ.३३५ व २३३

३९) कित्ता, पृ. २३२

४०) खरे वा.वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग ४, मिरज, १९०८, लेख, ८०६

४१) कित्ता, पृ.१३७९

४२) खोबरेकर वि.गो., उपरोक्त,भाग २, पृ.३१८

४३) खरे वा.वा., उपरोक्त , भाग ४, पृ.१३८१

४४) कित्ता, पृ.१४२०, १४२१

४५) कुलकर्णी मधुकर रामचंद्र, नाना फडणीसाच्या प्रशासन व्यवस्थेखालील मराठी राज्य शासनाचे स्वरूप, पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, १९८४, पृ.१९८४

४६) कुलकर्णी अ.रा.,खरे ग.ह.(संपा.),मराठयांचा इतिहास,खंड–३,कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, १९८६, पृ.२४

४७) खरे वा.वा., उपरोक्त , भाग ४, पृ.१४२१

४८) सरदेसाई गो.स.(संपा.),पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड ३७, मुंबई, १९३४, ले.१७५

४९) कित्ता, लेख– १७६, १७७

५०) वाड.ग.चि.,सिलेक्शन फॉर्म सातारा राजाज ॲण्ड पेशवाज डायरीज,थो.मा.पेशवे रोजनिशी भाग २, इंदिरा प्रेस, पुणे १९११, पृ.४३४

५१) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त ,खंड३७,ले.१७९, १८०

५२) खरे वा.वा., उपरोक्त , भाग ३, पृ.१३८२–१३८३

५३) Wilks Mark, Historical Sketches of the South of India, History of Mysoor,Vol.II,London, 1817 , P.132

५४) सरदेसाई गो.स.(संपा.),उपरोक्त, खंड ३७, ले.१८२, पृ.१८२, १८४

५५) कित्ता, ले.१८७

५६) कित्ता, ले.१८८

५७) सरदेसाई गो.स.(संपा.),उपरोक्त,खंड ३७,ले.१९०

५८) पुणे अभिलेखागार अप्रकाशित कर्नाटक रूमाल, नं ९६४, पत्र क्र.६४४९
५९) सरदेसाई गो.स.(संपा.),उपरोक्त , खंड ३७, ले.१९३
६०) कित्ता, लेख १९५
६१) खरे वा.वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग ३, मिरज, १९०८, पृ.१३८५
६२) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त ,खंड ३७, ले.१९५
६३) कित्ता, ले.१९६
६४) खरे य.वा.(संपा.) मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७, पृ.१८६
६५) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त, खंड ३७, ले.१९६
६६) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, पृ.९०३
६७) सरदेसाई गो.स.(संपा.) पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड ३९, मुंबई, १९३४, ले.१२७
६८) खरे य.वा.(संपा.) मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७, पृ.१८७
६९) खरे वा.वा., उपरोक्त , भाग ३, पृ.१३८८
७०) कित्ता, पृ.१३८९
७१) कित्ता, पृ.१३९२– ९३
७२) सरदेसाई गो.स.(संपा.) पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड ३७, मुंबई, १९३४, ले.१९८
७३) खरे य.वा.(संपा.) मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७, पृ.१९३, १९४
७४) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, पृ.१३९६
७५) सरदेसाई गो.स.(संपा.) उपरोक्त, खंड ३७, ले.१९८
७६) खरे वा.वा., उपरोक्त,भाग ३, लेख– ८९९, ९०१
७७) खरे य.वा.(संपा.) मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७, पृ.१८९,
७७.१) कित्ता, पृ.१९०
७८) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त , खंड ३७, ले.१९७
७९) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग – ३,पृ.१३९१
८०) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त ,खंड३७,ले.१९८,१९९

८१) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग – ३, पृ.१३९२

८२) Banargee A.C. Peshwa Madhavrao - I¸ Calcutta- 1943, P.148

८३) पोतदार दत्तो वामन, मुजुमदार गं. नारायण,इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचा पेशवे दरबाराशी फारसी पत्रव्यवहार, मूळ व मराठी रूपांतर, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, शके १८४५,पत्र क्र.३,५

८४) खरे वा.वा., उपरोक्त , भाग ३, लेख ११३४

८५) कित्ता, पृ.१३९८

८६) सहस्त्रबुद्धे स.अ., श्रीमंत थोरले माधवराव पेशवे, मुंबई, १९३८, पृ.१३१,१३२

८७) खरे वा.वा.,उपरोक्त , भाग ३, ले.९४४, ९६८

८८) सरदेसाई गो.स.(संपा.),उपरोक्त ,खंड ३७, ले.२०१

८९) कित्ता, ले.२०१

९०) खरे य.वा.(संपा.),मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७, पृ.१९९

९१) खरे वा.वा., उपरोक्त,भाग ३, पृ.१४०२, १४०३

९२) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त,खंड ३७, ले.२०६

९३) कित्ता, ले.२०७

९४) कित्ता, ले.२०४

९५) कित्ता, ले.२०३

९६) कित्ता, ले.२०२

९६.१)खरे वा.वा, ऐतिहासिक लेखसंग्रह,भाग ६,मिरज, १९१०, ले.१७६३ ,१७७१

९७) सरदेसाई गो.स.(संपा.) उपरोक्त , खंड ३७,ले.२०३

९८) गर्गे स.मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा इतिहास, पुणे, १९८३, पृ.१६२, १६३

९९) खोबरेकर वि.गो., उपरोक्त , भाग २, पृ.३२०

१००)सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड ५,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई नवीन आवृत्ती,१९९०, पृ.९६

१०१) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त ,खंड ३७,ले.२०५

१०२) गर्गे स.मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेकडील इतिहास, पुणे, १९८३, पृ.१६४

१०३) सरदेसाई गो.स.(संपा.),कुलकर्णी कृ.पा.,काळे य.मा.,ऐतिहासिक पत्रव्यवहार, पुणे १९३३, लेख १२५/पे.द.नवीन श्रेणी खंड– ३, लेख.६१

१०४) चितळे वि.सी.(संपा.),पेठे दप्तर भाग २,भारत इतिहास संशोधन मंडळ,स्वीय ग्रंथमाला क्र.७८, पुणे १९५०, पृ.१०२

१०५) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त , खंड ३७, ले.२०७

१०६) खरे य.वा.(संपा.), मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७, पृ.२०३

१०७) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त , खंड ३७, ले.२१३

१०८) खरे य.वा.(संपा.), उपरोक्त, खंड १, पृ.२०५

१०९) गर्गे स.मा., उपरोक्त, पृ.१६५

११०) खरे वा.वा., उपरोक्त , भाग ३,पृ.१००८

१११) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त ,खंड ५, पृ.९८

११२) सरदेसाई गो.स.(संपा.) उपरोक्त ,खंड३७ ,ले.२१९, २१७

११३) वाड.ग.चि. उपरोक्त, भाग २, पृ.३६८

११४) खरे वा.वा., उपरोक्त ,भाग ३, पृ.१०१३

११५) वाड.ग.चि.,श्रीमंत थोरले माधवराव पेशवे रोजनिशी भाग१,इंदिरा प्रेस,पुणे१९११,पृ.४८–४९

११६) सहस्त्रबुद्धे स.अ., श्रीमंत थोरले माधवराव पेशवे, मुंबई, १९३८, पृ.४७०

११७) चितळे वि.सी.(संपा.),पेठे दप्तर भाग२,भारत इतिहास संशोधन मंडळ,स्वीय ग्रंथमाला क्र.७८, पुणे १९५०,पृ.१०४

११८) खरे य.वा.(संपा.),मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७, पृ.१०४

११९) वाड.ग.चि. उपरोक्त, भाग २,पृ.१२

१२०) खरे य.वा.(संपा.), उपरोक्त , खंड १,पृ.२१२

१२१) पवार आप्पासहेब, जिजाबाईकालीन कागदपत्रे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २०१२, पृ.२९८ ते ३००

१२२) सरदेसाई गो.स. (संपा.), उपरोक्त, खंड ५, पृ.१०१

१२३) चितळे वि.सी.(संपा.), उपरोक्त, भाग २, पृ.१०५

१२४) खरे य.वा.(संपा.), मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७, पृ.२१८

१२५) Wilks Mark, Historical Sketches of the South of India, History of Mysoor,Vol.II,London, 1817 , P.146

१२६) सरदेसाई गो.स.(संपा.),पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड ३७, मुंबई, १९३४, ले.२२६

१२७)Daff Grant James,History of the Marathas.Vol.I,London 1921, P.568

१२८) Banargee A.C. Peshwa Madhavrao - I¸ Calcutta- 1943, P.157

१२९) चितळे वि.सी.(संपा.), उपरोक्त,भाग २, पृ.१०७

१३०) खरे वा.वा., उपरोक्त , भाग ३,लेख–११०२, ११२१

१३१) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त , खंड ३७,ले.२२७

१३२) खरे य.वा.(संपा.), मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७, पृ.२२६

१३३) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त , खंड ३७ ले.२२८

१३४) कित्ता, पृ.२३०

१३५) खरे य.वा.(संपा.),मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७, पृ.२२७

१३६) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त, खंड ५ पृ.१११

१३७) Hatalkar V.G.,Relation between the French and Marathas,(1668-1818), University of Bombay, 1958, P.11

१३८) कदम उमेश अशोकराव, फ्रेंच मराठा संबंध, १६६८– १८१८, पुणे, प्रथम आवृत्ती २०११, पृ.१५२, १५३

१३९) पोतदार दत्तो वामन, मुजुमदार गं. नारायण, उपरोक्त , पत्र क्र.१५

१४०) खरे य.वा.(संपा.), मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७, पृ.२२९,२३०

१४१) सरदेसाई गो.स.(संपा.), उपरोक्त , खंड ३७, ले.२३३

१४२) Banargee A.C. Peshwa Madhavrao - I¸ Calcutta- 1943, P.205

१४३) खरे वा.वा.,ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड ४, मिरज, १९०८, पृ.१२२८ व १२३०

# प्रकरण सहावे

# उपसंहार

या प्रकरणामध्ये उपलब्ध झालेल्या प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांच्या आधारे तसेच सर्व प्रकरणांच्या आधारे संशोधन प्रबंधाचे उद्देश व गृहितके स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. छत्रपती शाहूने ' मोगल पातशाही रक्षून राज्यविस्तार साधावा ' या प्रमाणे आपले दक्षिण धोरण आखले होते. छत्रपती शाहूच्या मृत्यूनंतर नानासाहेब पेशव्यांकडे कर्नाटक मामला आला होता. सन १७५० पासून मुखत्यारीने मराठी राज्याचा कारभार करण्यास मराठा मंडळाने अधिकृतपणे नानासाहेब पेशव्यांना संमती दिली होती. दक्षिणेत मराठी राज्याचा साम्राज्य विस्तार करणे व संस्थानिकांकडून खंडणी वसूल करणे या करीता नानासाहेबांनी आपले कर्नाटक धोरण आखले होते. इ.स.१७५२ ते १७५७ या कालावधीत त्यांनी पाच मोहिमा काढून दक्षिणेकडे मराठी राज्याच्या सीमा वाढविल्या होत्या.

नानासाहेब पेशव्यांच्या दक्षिण धोरणामध्ये काही चुका झालेल्या दिसून येतात.

१. नानासाहेब पेशव्याने कर्नाटक मामला स्वतःकडे घेतल्याने मुरारराव घोरपडे नाराज झाले होते. उत्तरेत जसे मुख्यअधिकार शिंदे, होळकर, बुंदेले यांना दिले होते तसेच कर्नाटकात मुरारराव घोरपडे व गोपाळराव पटवर्धन यांच्यापैकी एका सरदाराकडे दिले असते तर कर्नाटकात मराठयांच्या सत्तेला धक्का लागला नसता असे मला वाटते.

२. नानासाहेब तिसऱ्या कर्नाटक मोहिमेत निजाम व बुसीच्या सांगण्यावरून म्हैसूरकडून खंडणी न घेता पुण्याला परत आले. याचा पेशव्यांचे सरदार महादोबा पुरंदरे यांना राग आला व पेशव्यांपासून वेगळे होवून बेदनूरास गेले त्याला समशेरबहादूर, अंताजी माणकेश्वर, सैन्यासह मिळाले व त्यांनी सोंधे, बिदनूर, बसवापट्टण, चित्रदुर्ग या पाळेगारांपासून खंडण्या वसूल केल्या. या घटनेपासून महादजी पुरंदरे यांचे नानासाहेब पेशव्यांशी बिघडून त्याने मराठयांची कायमची नोकरी सोडली व श्रीरंगपट्टणच्या नोकरीत गेला. यानंतर कर्नाटकातील अनेक सत्ताधीश मराठयांशी मैत्रीचे संबंध तोडून पेशव्यांविरूद्ध एक गट निर्माण झाला व या गटाने सावनूरच्या नबाबास पेशव्यांविरूद्ध चिथावले होते.

३. नानासाहेब पेशव्यांचे सन १७५७ च्या सावनूर मोहिमेनंतर कर्नाटकाकडे दुर्लक्ष झाल्याने म्हैसूरच्या राज्यात हैदरअलीचा व इतर पाळेगारांचा उदय होऊन त्यांचा मराठयांना विरोध सुरू झाला. महादोबा पुरंदरे, मुज्ञफरजंग व सावनूरच्या नबाबाने कर्नाटकातून मराठयांची सत्ता उखडून टाकण्याचा प्रयत्न केला.

४. नानासाहेबांनी एकाचवेळी उत्तर व दक्षिण मोहिम आखल्याने मराठयांचा दक्षिणेत तुंगभद्रेपर्यंत साम्राज्यविस्तार झाला. दक्षिणेतील पैसा मराठयांना मिळाला परंतु पेशव्याने या प्रदेशात निश्चित स्वरूपाची कारभारविषयक यंत्रणा न राबविल्याने मुख्य सरदारांच्या अनुपस्थितीत कर्नाटकात बेबंदशाही माजली, परिणामी मराठयांनी केलेल्या परिश्रमाचे मूल्य धुळीस मिळाले. वास्तविक पाहता मराठयांनी कर्नाटकात एवढा जबरदस्त प्रभाव निर्माण केला होता की, तो प्रभाव नष्ट करणे युरोपियन शक्तिंना सहज शक्य नव्हते असे मान्य केले होते.

५. दक्षिण मुक्त करणे हे नानासाहेब पेशव्यांचे राजकीय धोरणाचे मुख्य सूत्र होते. हे प्रमोद ओक आपल्या 'पेशवे घराण्याचा इतिहास' या ग्रंथात म्हणतात परंतु ते योग्य वाटत नाही. राज्याची आर्थिक घडी बसविण्याचा प्रयत्न केला परंतु कर्ज कमी न होता वाढलेले दिसते. नानासाहेब पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरण काही अंशी अपयशी ठरले परिणामी माधवरावांनी पूर्वी झालेल्या मराठी सत्ताधिशांच्या दक्षिणेकडील धोरणातील चुका दुरूस्त करण्यासाठी आपले दक्षिण धोरण आखले होते.

माधवरावांना २० जुलै १७६१ रोजी पेशवाईची वस्त्रे प्राप्त झाली. जानेवारी १७६२ पर्यत मराठी राज्याला काही प्रमाणात स्थैर्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला. माधवराव पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरणाचा चिकित्सक अभ्यास करणे या अनुषंगाने शोध घेतला असता पेशव्यांनी उत्तरेऐवजी दक्षिणेची का निवड केली याची पुढील कारणे दिसून येतात.

१. पानिपतच्या संहारामुळे मराठयांचे सरदार उत्तरेत जाण्यासाठी व अंगार जोखीम घ्यायला पुष्कळांची मने करचत होती. उत्तरेकडे शिंदे, भोसले, होळकर, बुंदेले, खेर डोईजड असून त्यांच्यावर शह बसविणे अवघड होते. उत्तरेतील कारभार सुधारण्याची थोडी उत्कंठा फक्त रघुनाथरावाची होती.

२. पानिपतचे अपयश धुवून काढणे हा पहिला कार्यभाग माधवरावांच्या पुढे होता. कोणत्याही मोहिमेला पैशाची गरज होती परंतु पानिपतच्या युद्धाने आर्थिक व जीवित हानी झाल्याने मराठी राज्याची तिजोरी रिकामी झाली होती, ती भरून काढण्यासाठी दक्षिण धोरण स्वीकारले होते.

३. गोपिकाबाईना माधवरावांचे राज्य स्थिर करण्याविषयी चिंता होती. तिला दक्षिण भारतातील राजकीय परिस्थितीची माहिती होती. नानासाहेबांच्या मोहिमेमध्ये ती सहभागी झाली होती म्हणून तिने माधवराव पेशव्यांना दक्षिण मोहिमेसाठी तयार केले असावे. कारण माधवराव हा आईचा निस्सीम भक्त होता.

४. नानासाहेब पेशव्यांनी दक्षिण धोरण आखून मराठी राज्यासाठी पैसा हा कर्नाटकातून मिळविण्याचा प्रयत्न केला होता पण त्यांना काही अंशी अपयश आल्याने त्यांचेच धोरण पूर्णत्वास नेहण्यासाठी माधवरावाने दक्षिण धोरण आखले होते.

५. मराठी राज्याला कर्नाटक हा जवळ होता व त्याकाळी तो सधन होता. मराठी राज्याला पैशाची पैदास कर्नाटकातून व्हायची त्या पैदासीचे हस्तक म्हणजे गोपाळराव पटवर्धन, आनंदराव रास्ते, विसाजी कृष्ण बिनिवाले इत्यादी जिव्हाळयाचे व घरचे सरदार उत्तरेकडील कारभार निकडीचा परंतु दूरचा पल्ला, शत्रू अनेक, हस्तक विस्कळीत यामुळे चर्चा केल्यावर तुर्तास प्रथम वर्ष सहा महिने दक्षिणेचा कारभार उरकावा.

६. सन १७६० नंतर मराठयांचे दक्षिणेकडे दुर्लक्ष झाल्याने हैदरअलीचा उदय झाला होता. हैदरने मराठयांच्या मांडलिक संस्थानिकांकडून खंडण्या वसूल केल्याने संस्थानिकांमध्ये घबराहट निर्माण झाली होती व ते प्रदेश सोडून जाऊ लागले होते. श्रीरंगपट्टणजवळची मराठयांची ठाणी जिंकून घेतली होती ती ठाणी सोडवावी व मराठयांचे वर्चस्व निर्माण करावे.

७. कर्नाटकातील पाळेगार व कडाप्याच्या नबाबाने मराठयांचे वर्चस्व झुगारून तेथील सत्ताधिशांमध्ये संघटन घडवून आणण्याचा प्रयत्न चालविला होता. तो थांबविण्यासाठी दक्षिण धोरण स्वीकारणे आवश्यक होते.

८. दक्षिणेत हैदरप्रमाणेच निजामाचा उदय झालेला होता. बसालतजंग व हैदरअली दक्षिणेमध्ये ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न करत होते त्यांचे ऐक्य निर्माण झाले असते तर मराठयांना दक्षिणेत वर्चस्व निर्माण करणे अवघड गेले असते म्हणून त्यांचे ऐक्य निर्माण होण्याअगोदरच आपण दक्षिण धोरण स्वीकारावे.

९. पेशव्यांचे कर्नाटकातील वकील मुकुंद श्रीपती व लक्ष्मण वेकोजी यांनी माधवरावांना सैन्यासह दक्षिणेत संस्थानिकांच्या मदतीला बोलविले होते.

१०. दक्षिणेतील मराठयांचे अनेक संस्थानिक, पाळेगार व मामलतदार, कमाविसदार हे मराठयांची नोकरी सोडून हैदरला व निजामाला जावून मिळाले होते त्यांना पुन्हा मराठी राज्यामध्ये आणावे व हैदरचा बंदोबस्त करावा.

११. दक्षिणेत हैदर, निजाम प्रमाणेच इंग्रज व फ्रेंच या परकीय सत्ता होत्या. मराठयांचे व फ्रेंचाशी मैत्रीचे संबंध होते. या मैत्री कराराचे इंग्रजांनी उल्लंघन करून पानिपतच्या पराभवाच्या दुसऱ्याच दिवशी फ्रेंचाची पाँडिचरी जिंकून घेतली होती यामुळे दक्षिणेत फ्रेंचाना मदत करावी व इंग्रजांना धडा शिकवावा.

१२. दक्षिणेतील बल्लारी, अनंतपूर, अर्काट, हरपनहळळी, कणकगिरी, कर्नूल, सुरापूर, बंगळूर, श्रीरंगपट्टण इत्यादी संस्थानिकांनी मराठयांची खंडणी थकविली होती त्यामुळे थकलेली खंडणी वसूल करून मराठी राज्याची रिकामी झालेली तिजोरी भरून काढावी.

१३. म्हैसूरच्या हैदरने मराठयांना चौदा सुपिक परगण्यातून हुसकावून दिले होते. मराठयांच्या मांडलिकांना उपद्रव देण्यास सुरूवात केली होती परिणामी दक्षिणेतून मराठयांना मिळणारी पन्नास लाख रूपये खंडणी बुडाली होती.

१४. दक्षिणेकडील विविध संस्थानिकांची हैदरच्या कचाटयातून सुटका करावी व मराठयांचे पानिपतपूर्वीचे प्रभूत्व निर्माण करून हैदरचा बंदोबस्त करावा इत्यादी विविध कारणांच्या पूर्तीसाठी माधवराव पेशव्यांनी उत्तरेऐवजी आपले दक्षिण धोरण स्वीकारले होते.

माधवराव पेशव्यांनी दक्षिण धोरण विविध हेतूच्या पूर्तीकरिता आखले होते आणि राक्षसभुवनच्या लढाईत निजामाचा पराभव केल्यानंतर आपले धोरण पद्धतशिरपणे राबविले होते असे मला वाटते. दक्षिण भारतातील कर्नाटक या एकाच प्रांतावर माधवराव

पेशव्यांनी इ.स.१७६२ ते १७७२ या काळात वारंवार पाच मोहिमा का काढल्या यांचा शोध घेतला असता पुढील कारणे दिसून आली–

१. दक्षिणेतील हैदरअलीकडूनच माधवराव पेशव्यांच्या राज्याला उपद्रव होत होता. कारण हैदर हा रघुनाथराव, जानोजी भोसले, निजाम व इंग्रज यांच्या मदतीने मराठी राज्याला धोका उत्पन्न होईल अशी कृती करत होता.

२. दक्षिणेकडील कर्नाटक प्रांतातून संपत्ती मिळवावी व मराठी राज्याची आर्थिक विकास करावा तसेच दक्षिणेत पानिपतानंतर मराठे संपले हा जो एक गैरसमज निर्माण झाला होता तो दूर करून मराठयांचे वर्चस्व निर्माण करावे.

३. कर्नाटकातील लहान–लहान संस्थानिक मराठयांची खंडणी थकवित होते. मराठे त्या प्रदेशात गेल्याशिवाय देत नसत त्यामुळे पेशव्यांनी लहान–लहान संस्थानिकांना एकत्र करून हैदरअलीचा बंदोबस्त करणे व पानिपतपूर्वीचे मराठी सत्तेचे प्रभूत्व निर्माण करण्यासाठी कर्नाटक मोहिमा हाती घेतल्या होत्या.

४. पेशव्यांनी कर्नाटकावर मोहिम करावी व हैदरने तात्पुरता तह करावा परंतु पेशवे पुण्याला परत आल्यानंतर पुन्हा मराठयांच्या गुत्ती व सावनूर सारख्या मांडलिक संस्थानिकांना त्रास देणे, तहाचे उल्लंघन करणे, संस्थाने खराब करणे इत्यादी उदयोग सारखे करत असल्याने पेशव्यांना वारंवार मोहिमा काढाव्या लागल्या.

५. १८व्या शतकात मराठयांचे दक्षिणेकडे राजकीय व आर्थिक हितसंबंध गुंतले होते. कर्नाटक हा सधन प्रांत असून मराठी राज्याला जवळ होता म्हणून पानिपतने झालेली आर्थिक हानी भरून काढण्यासाठी कर्नाटक मोहिमा हाती घेतल्या होत्या.

६. हैदरअलीने मराठयांची वेळोवेळी प्रत्येक मोहिमेच्या वेळी कबूल केलेली खंडणी काही प्रमाणात थकविली होती तसेच मराठयांच्या मांडलीक संस्थानिकांना उपद्रव देण्याचे धोरण स्वीकारले होते. संस्थानिकांनी पेशव्यांकडे मदतीचे खलिते पाठविले होते परिणामी पेशव्यांना मोहिमा हाती घ्याव्या लागल्या.

७. प्रत्येक कर्नाटक मोहिमेमध्ये पेशव्यांच्या मोहिमेचे उद्देश हे वेगवेगळे असल्याचे दिसून येते. पहिल्या तीन मोहिमेमध्ये हैदरच्या उपद्रवाचा बंदोबस्त,रायचूर व दुआब प्रांतातील संस्थानिकांकडून थकलेली खंडणी वसूल करणे, मुराररावास मदत करणे या सारखे उद्देश

होते परंतु चौथ्या व पाचव्या मोहिमेत हैदरअलीचे संपूर्ण पारिपत्य करणे व संस्थाने यवनाच्या वर्चस्वातून मुक्त करणे हे मोहिमेचे उद्देश असल्याचे दिसून येते.

८. प्रत्येक कर्नाटक मोहिमेच्यावेळी काही ना काही अडचणी आल्याने पेशव्यांना मोहिम आटोपती घ्यावी लागली होती. रघुनाथरावाने हैदरशी सौम्य अटीवर केलेला तह, रघुनाथरावाने सुरु केलेला गृहकलह व मराठी राज्याची वाटणी मागणे, मोहिमेच्या शेवटी शेवटी पर्जन्यकाळ समीप येणे, हैदरअली हा पेशव्यांपुढे न येता जंगलात दडून बसणे, मोहिमेमुळे पेशव्यांना दगदग झाल्याने प्रकृती बिघडणे, सैन्यात महागाई निर्माण होणे इत्यादी विविध कारणामुळे पेशव्यांना हैदरअलीचा समूळ नाश करता आला नाही व वेळोवेळी कर्नाटक मोहिम हाती घ्याव्या लागलेल्या दिसून येतात.

माधवराव पेशव्यांनी मराठा सरदारांची एकजूट करून त्यांचे कर्तृत्व व मर्यादा ओळखून त्यांच्या मदतीने आपले दक्षिण धोरण राबविले होते परिणामी अनेक मराठा सरदारांनी दक्षिण धोरणामध्ये योगदान दिलेले आहे. संशोधनाचा उद्देश व सिद्धांत संकल्पनेला अनुसरून, पानिपतानंतर पेशव्यांच्या घरामध्ये निर्माण झालेल्या गृहकलहामुळे त्यांना उत्तर भारतात जाता आले नाही. दक्षिण भारतात कोणताही प्रबळ सरदार नसल्यामुळे माधवराव पेशव्यांनी स्वतः इतर सरदारांच्या मदतीने मराठयांचे प्रभुत्व दक्षिणेत कायम करण्यात यश मिळवलेले दिसून येते. मराठी राज्यामध्ये रघुनाथराव व माधवराव पेशवे हे दोन पक्ष निर्माण झाल्याने दुफळी निर्माण झाली होती. माधवराव पेशवे मराठे सरदारांना आपल्या पक्षास येऊन मिळण्याचे महत्त्व पटवून देण्यामध्ये यशस्वी ठरले. परिणामी अनेक मराठा सरदार पेशव्यांना येऊन मिळतात व रघुनाथरावाला पेशवाई मिळवू नये, यामध्ये माधवराव पेशव्यांची मुत्सद्देगिरी दिसून येते. मराठा सरदारांना माधवराव पेशव्यांविषयी आत्मविश्वास वाटत असतो की, आपण पेशव्यांच्या पक्षाकडे गेलो असता आपले नुकसान न होता फायदाच होईल म्हणून राक्षसभुवनच्या लढाईपासून अनेक सरदार पेशव्यांना जाऊन मिळतात व शेवटपर्यंत माधवराव पेशव्यांशी एकनिष्ठ राहिलेले दिसून येतात. कारण माधवराव पेशव्यांनी अनेक मराठा सरदारांचे स्वभाव भेद, कर्तृत्व व मर्यादा ओळखून त्यांना आपल्या दक्षिण धोरणामध्ये व राज्यकारभारात सामावून घेतले होते .त्यामुळे माधवराव पेशव्यांच्या काळात नवीन सरदारांची एक कर्तबगार

पिढी उदयाला आली. या सरदारांनीच पेशव्यांच्या मृत्यूनंतर पुढे जवळपास पन्नास वर्षे मराठी राज्याचे अस्तित्त्व टिकविण्याचे काम केलेले दिसून येते.

माधवराव पेशव्यांच्या काळात दक्षिण धोरणामुळे मिरज हे मराठी राज्य व कर्नाटकचे राज्य याचे सीमावर्ती ठिकाण म्हणून नावारूपास येऊन मिरजेचे महत्त्व वाढले. तेथे गोपाळराव पटवर्धनाच्या नेतृत्वाखाली लष्करी छावणी निर्माण केली. माधवराव पेशव्यांनी दक्षिणेत गोपाळराव पटवर्धनास आपला विश्वासू सहकारी म्हणून समर्थ बनवले. आपणास बेसकॅप(लष्करीतळ) पाहिजे म्हणून पटवर्धनास राजकीय व लष्करी दृष्टया सक्षम केले व त्यांच्याच मदतीने आपले दक्षिण धोरण यशस्वी केल्याचे दिसून येते.

गोपाळराव पटवर्धनाचे योगदान – पहिल्या कर्नाटक मोहिमेपासून पेशव्यांच्या दक्षिण धोरणामध्ये सहभागी झाले होते. बाळापूरच्या लढाईत हैदरचा पराभव व त्या प्रांतातील खंडण्या वसूल करणे व कोप्पलचा किल्ला जिंकून घेण्यामध्ये पेशव्यांना यश आले होते तर दुसऱ्या कर्नाटक मोहिमेच्या पूर्वीच डिसेंबर१७६३ मध्ये गोपाळरावास सैन्यासह कर्नाटकात रवाना केले होते. गोपाळरावाने नवी हुबळी, सावशी, कुंदगोळ जिंकून दिले होते. हैदरला हुलकावणी देवून पेशव्यांनी खंडण्या वसूल करून संस्थानिकास मिळवून आणले.गोपाळरावाने व विंचूरकरांनी गनिमी काव्याच्या पद्धतीने हैदरला मैदानात आणून पेशव्यांची मसलत यशस्वी ठरविली होती. रट्टेहळळीच्या लढाईत गोपाळरावामुळे पेशव्यांची व्युहरचना यशस्वी झाली व हैदरचा पराभव झाला. पेशव्यांनी गोपाळरावास सावनूर व बंकापूरच्या रक्षणास पाठविले होते.त्याने आपल्या नावलौकिकास शोभेल असा पराक्रम करून लालमिया या हैदरच्या सरदारास पिटाळून लावले परिणामी हैदरने सावनूरला वेढा घालण्याचे सोडून दिले व बंकापूर ही त्याला असुरक्षित वाटू लागल्याने जंगलाचा आश्रय घेतला होता. धारवाडच्या वेढयामध्ये गोपाळरावाच्या विद्यमाने किल्लेदार फाजल अलीखान कौलास आला होता.

तिसऱ्या कर्नाटक मोहिमेमध्ये माधवराव पेशव्यांनी गोपाळराव पटवर्धनास मिरज येथे लष्कर भरती करून फौज जमा करण्यास सांगितले होते. पेशवे तुंगभद्रेकडे चालले असताना गोपाळराव पेशव्यांस येऊन मिळाले. मुदगल व रायचूर सरकारातील तमाम संस्थानिकांकडून खंडणी घेण्यांची व पाळेगार लोकांस जरब देण्याची पेशव्यांची मसलत यशस्वी ठरली तसेच गोपाळराव पटवर्धनाच्या लष्करातून पेशव्यांच्या सैन्यास धान्य व तांदूळ पुरविले होते. केरू

नावाचे संस्थान गोपाळरावाने जिंकून दिले होते. रायचूर व दुआब या प्रांतातील पंचवीस लाख रूपये खंडणी पेशव्यांनी वसूल केली. त्यामध्ये गोपाळराव पटवर्धन, विसाजी कृष्ण व सखाराम बापू बोकील यांचा मोलाचा सहभाग होता. कारण या प्रदेशांची त्यांना जास्त माहिती होती. गोपाळरावाने चिकबाळापूर जिंकून घेतले होते तसेच हैदरचा वकील आपाजीराम यांच्यात वाटाघाटी होऊन तह ७ मे १७६७ रोजी ठरला होता त्यामुळे मराठयांचा प्रादेशिक व आर्थिक फायदा झाला होता.

पेशव्यांनी गोपाळराव पटवर्धन व आनंदराव रास्ते यांना दक्षिणेत बंदोबस्तासाठी ठेवले होते. गोपाळरावाने खंडण्या वसूल करून पेशव्यांच्या आदेशाचे पालन करून पहिल्या इंग्रज – म्हैसूर युद्धात निजाम, हैदर व इंग्रज यांच्या वाटेस गेले नाही. माधवराव पेशव्यांचे अंतर्गत जे विरोधक होते त्यांचा बंदोबस्त करण्यामध्ये गोपाळरावाचे योगदान महत्त्वाचे आहे. चौथ्या कर्नाटक मोहिमच्यावेळी पावसाळा संपताच मिरज, अथणी येथे गोपाळराव व आनंदराव रास्ते यांनी सैन्य जमा केले व ते दक्षिणेकडे चालू लागले होते. पेशव्यांनी सर्व सरदारांना तुंगभद्रेवर बोलावून घेतले व सर्वानुमते विचारविनिमय करून पेशव्यांनी योजना आखली त्यानुसार गोपाळरावाने हैदरवर नजर ठेवण्याची कामगिरी चांगल्याप्रकारे पार पाडली होती .त्यामुळे पेशव्यांना श्रीरंगपट्टण प्रांतातील दहा–बारा ठाणी जिंकता आली होती व पेशव्यांना सर्वत्र विजय मिळाला होता. धारवाड व सावनूर लुटण्याचा हैदरचा बेत गोपाळरावाने साधू दिला नाही व हैदरचा रात्रीचा छापा हा पटवर्धन मंडळीने विलक्षण शौर्य व चिकाटी दाखवून आपली सुटका केली होती. तसेच पेशव्यांनी हैदर हा श्रीरंगपट्टणला गेल्याने गोपाळरावास निजगल जिंकून घेण्यासाठी पाठविले होते. त्रिंबकमामा पेठयांच्या नेतृत्वाखाली गोपाळरावाने हैदरला चांगला शह देऊन चिकबाळापूर व गुरर्मकोंडा ताब्यात घेवून मीररेझाला कैद करण्यात आले होते त्यानंतर गोपाळराव बेल्लारीकडे खंडणी वसुलीसाठी जातात परंतु प्रकृती बिघडल्याने मिरजेस आले व ११ जानेवारी १७७१ रोजी मरण पावले. गोपाळराव पटवर्धन हे दक्षिणेकडील पेशव्यांचा मदतनीस व हस्तक होता.

शत्रूच्या फौजेतील बातम्या काढण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न लक्षात ठेवण्याजोगे आहे. गोपाळराव हैदरच्या स्वारीहून लिहितात की, चहूकडील बातमी चहू प्रकारची होते कोणाची खरी, कोणाची लटकी बातमी असे होते म्हणून दहा–पंधराकडून नित्य बातम्या आणीत असतो

व त्याचा पडताळा पाहून मग नक्की कोणती ते ठरवावे असा क्रम असतो. शत्रूच्या फौजेच्या आसपास सुमारे चार कोसावर बसवून मराठे लोक रोजच्या रोज बातम्या काढीत, त्यासाठी बातमीदार सोंगेही घेत. गोपाळरावाने बंकापूरच्या किल्लेदार शिवाजी गणेश यास गरीबाचे रूप देवून जासूद पाठवावा म्हणून लिहिले होते. तेव्हा तो उलट कळवितो की, आज्ञेप्रमाणे एक कारकून गरीब ब्राम्हणाचा वेश देऊन व दोन जंगम असे तीन आसामी पाठविले आहे. हैदरच्या मुलखात सरहद्देपर्यत जंगमानी रहावे. त्या अलीकडे सावनूरकरांच्या सरहद्देत आमच्या जासूदांनी दोन-दोन कोसावर राहावे याप्रमाणे बंदोबस्त केला आहे. कारकूनाने गरीब ब्राम्हणाच्या वेश घेऊन हैदरच्या हद्दीत रहावे. त्याने खरी बातमी जंगमास सांगावी व जंगमाने पेशव्यांच्या जासुदास सांगावी.

गुत्तीच्या मुरारराव घोरपडयांच्या सहकार्याशिवाय आपले दक्षिण धोरण यशस्वी होणार नाही म्हणून पेशव्यांनी पहिल्यापासूनच त्यांच्याशी मैत्रीचे संबंध जोडले होते व त्यास सातारच्या छत्रपतीकडून 'सेनापती' हे पद दिले होते. परिणामी नानासाहेब पेशव्यांच्या काळात मुरारराव नाराज झाले होते त्यांची नाराजी पेशव्यांनी दूर केली त्यामुळे सर्वच मोहिमेत मुराररावाने पेशव्यांना मदत केल्याचे दिसून येते. बाळापूर व रट्टेहळळीच्या लढाईत मुराररावाने विशेष पराक्रम गाजविला. तसेच मासूरच्या बारीकडून मिळणारी हैदरअलीची रसद खंडीत करण्यात मुरारराव घोरपडे व विसाजी कृष्ण बिनीवाले यांनी महत्त्वाची कामगिरी पार पाडली होती. शिऱ्याच्या वेढयामध्ये मुराररावाने आपल्या मुलासह पेशव्यांना सैन्यासह मदत केली होती. मुरारराव हा हैदरचा हाडवैरी असल्याने हैदरने मुराररावावर रात्रीच्या छापा घातला. त्यावेळी मुराररावाने स्वतःची तलवार चालवून केवळ अंगच्या शौर्यावर आपला जीव वाचवला व एक युक्ती योजून छापा घालावयास आलेल्या सैनिकांना पिटाळून लावले होते .तसेच हैदरने मुराररावास आपणास येऊन मिळावे या निरोपास न जुमानता पेशव्यांना चौथ्या मोहिमेत चार हजार सैन्य व दोन तोफा घेऊन देवनहळळीच्या ठिकाणी येऊन मिळाले होते. गणेशगड, नंदीदुर्ग, देवरायदुर्ग, निजगल ही महत्त्वाची ठिकाणे पेशव्यांना मिळवून देण्यामध्ये मुराररावांच्या मोठा सहभाग होता. कारण त्या प्रदेशाची त्याला बारीक सारीक माहिती होती. चित्रदुर्गकर, कडप्पा, कर्नूल, कोलार इत्यादी ठिकाणचे नबाब व पाळेगार मुराररावास मानत असे म्हणून पेशव्यांनी पहिल्या मोहिमेपासूनच त्यांना दक्षिण धोरणामध्ये सामावून घेतले होते. कर्नाटकचे ते

प्रमुख माहितीगार होते तसेच मोहिमेत मुराररावाने पेशव्यांना पावसाळा जवळ आल्याने एखाद्या मातब्बर सरदारांच्या हाताखाली छावणीस फौज ठेवून पेशव्यांनी परत जावे व दसरा झाल्यावर पुन्हा मोठया तयारीनिशी यावे ,हा सल्ला दिला होता व तो पेशव्यांना पसंत पडला होता. त्रिंबक मामा पेठयांच्या नेतृत्वाखाली हैदरअलीला शह देण्यामध्ये मुराररावांची कामगिरी महत्वाची होती.

दक्षिण धोरणामध्ये नाना फडणीसाने पेशव्यांना वेळोवेळी मदत केलेली दिसून येते. प्रत्येक मोहिमेच्या वेळी पेशव्यांनी नाना फडणीसवर मराठी राज्यकारभाराची जबाबदारी सोपविली होती त्यामुळे पेशव्यांना दक्षिणेकडे लक्ष देता आले होते. दुसऱ्या कर्नाटक मोहिमेत नाना फडणीसाने पुण्याहून धारवाडला बाण व दारूगोळा भाडयाचे बैल करून पाठविले होते. धारवाडच्या वेढयात हरी परशराम सोमण ठार झाला त्याचे सांत्वन करण्याचे काम पेशव्यांनी नाना फडणीसास सांगितले होते. तिसऱ्या मोहिमेत ही ३७० दारूचे बैल नाना फडणीसाने शिऱ्याला पाठवून दिले होते. माधवराव पेशव्यांनी नाना फडणीसास ओझ्यास उंट नाही यामुळे खोळंबा झाला आहे असे पत्र पाठविले होते. परिणामी पुण्याहून दहा उंट रवान केले होते. रघुनाथरावाला पेशव्यांनी शनिवारवाडयात नाना फडणीसाच्या देखरेखीखाली नजरकैदेत ठेवले होते. तसेच स्वारीवर गेलेल्या पेशव्यांना दारूगोळा, अलंकार, औषधे नाना फडणीसने वेळोवेळी पुरविली होती. पेशव्यांच्या कुटुंबातील स्त्रियांची देखभाल व त्यांच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे, राघोबाच्या हालचालीवर नजर ठेवणे. देवरायदुर्गच्या मुक्कामी माधवराव पेशवे असताना नाना फडणीसाने पुण्याहून एक लाख रूपयाची हुंडी पाठविली होती.

**इतर मराठा सरदारांचा सहभाग व पेशव्यांस केलेली मदत–**

महिपतराव कवडे, नारोशंकर, सखाराम बापू बोकील, नरसिंगराव धायगुडे, आनंदराव गोपाळ, रामचंद्र कानडे, शहाजी भापकर, वामनराव पटवर्धन, शहाजीराजे अक्कलकोटकर, आबा पुरंदरे, त्रिंबकमामा पेठे, जानोजीराव धुळप, बाबूराव फडणीस, कृष्णराव काळे, आनंदराव रास्ते, विसाजी कृष्ण बिनीवाले, आनंदराव सुपेकर, विठ्ठलराव विंचूरकर, इचलकरंजीकर घोरपडे, हरी परशराम सोमण, नारो कान्हेरे एकबोटे, धोंडो दत्तात्रय, गोपाळपंत काळे, स्वरूपजी मुळे, सोयराजी नाईक निंबाळकर, जगताप पणदरेकर, सिदोजी घोरपडे, मालोजी पिसाळ, अमृतराव यादव, बाबाजी पुरंदरे, सदाशिव रामचंद्र, मानसिंग वाघ,

मजीदखान रोहिले, महिमाजी शिंदे, मल्हारराव पानशे, नीळकंठराव पटवर्धन, आपाजी मुंढे, गंगाराम पिसाळ, मिराजी सरनोबत, कासी बल्लाळ, त्रिंबकजी पिसाळ, विजयदुर्गचे धुळप, वाडीकर सावंत, आपा बळवंत, सखाराम हरी गुप्ते, भवानजी वाघ, अंतोजी माने, वामनराव पेठे ,हरिपंत फडके, निळकंठराव त्रिंबक, दौलतराव गजेंद्रगडकर, फकीरजी फडतरे, महादजी शितोळे इत्यादी सरदार दक्षिण मोहिमेत सहभागी झाले होते.

पेशव्यांची हुजरात जमविण्याची व्यवस्था त्रिंबकमामा पेठे व बाबूराव फडणीस यांनी केली. कर्नाटकचा प्रमुख माहितीगार व मुख्य कारभारी म्हणून सखाराम बोकील यास व कृष्णराव काळे यास मुत्सद्दी म्हणून पेशव्यांनी स्वारीबरोबर होते. विठ्ठलराव विंचूरकराने हावेरीच्या लढाईत विशेष पराक्रम गाजविला होता. जानोजी धुळपने आरमाराच्या साहाय्याने हैदरला हैराण केले होते. नारो कान्हेरे एकबोटे या सरदाराने धारवाडच्या वेढयामध्ये विशेष पराक्रम केल्याने पेशव्यांनी त्यास पालखीची वस्त्रे दिली होती. बाबूजी नाईकाचा बंदोबस्त करून सोलापूरचा किल्ला जिंकण्याची कामगिरी विसाजी कृष्ण, रामचंद्र कानडे व शहाजी भोसले यांनी पार पाडली तर भवानराव प्रतिनिधीचे बंडाची समस्या रामचंद्र गणेश कानडे यांनी सोडविली. कर्नाटकातील संस्थानिकांकडून खंडणी वसूलीमध्ये गोपाळराव पटवर्धन, विसाजी कृष्ण बिनीवाले व सखाराम बापू बोकील यांचा मोलाचा वाटा होता. गुर्रमकोंडा प्रांताची लुटालूटकरण्याची कामगिरी महिमाजी शिंदे व आनंदराव गोपाळ यांनी पार पाडली होती. शिऱ्याची पेठ लुटण्यासाठी आलेल्या मीररेझाला पिटाळून लावले व त्याचा पाठलाग मल्हारराव पानशे यांनी केला होता. सन १७७० नंतर दक्षिण धोरण त्रिंबकमामा पेठयांच्या नेतृत्वाखाली मराठी सरदारांनी पूर्णत्वास नेहण्याचा प्रयत्न केला व हैदरला चांगला शह दिला. धुळप, सावंत व पिसाळ यांनी आरमाराच्या साहाय्याने होनावर व मलबार ही बंदरे जिंकून दिली होती. सखाराम हरी गुप्ते याने मेलकोटयास हैदरची छावणीची कही मारली होती व हत्ती, उंट, पाच सात हजार बकऱ्या लांबविल्या होत्या. त्याने भाल्यास पासोडया बांधून मातबर फौज आली आहे असा देखावा करून कही लूटून हैदरवर मात केली होती. या त्याच्या अद्भुत पराक्रमाची हकीकत अजरामर झाली आहे.

दक्षिण धोरणात अनेक मराठे सरदार ठार किंवा जखमी झालेले दिसून येतात. हुबळीच्या संघर्षात पेशव्यांच्या लोभातला धनीसिंग कामास आला, तर रामचंद्र कानडे यांच्या मनगटास

गोळी लागून जखमी झाले तसेच निळकंठराव पटवर्धन हैदरच्या छाप्यात जखमी होऊन शिरे याठिकाणी मरण पावले. शिऱ्याच्या हातघाईच्या लढाईत सिदोजी घोरपडे, मालोजी पिसाळ, अमृतराव यादव, बाबाजी पुरंदरे यासारखी पंचवीस माणसे ठार झाली होती. निजगलच्या लढाईत गंगाराम पिसाळ जखमी झाले. तर पोरखगीर गोसावी, मिराजी सरनोबत, कासी बल्लाळ हे ठार झाले होते. गोपाळराव पटवर्धन हैदरला शह देताना ठार झाले होते .मोतीतलावाच्या लढाईत मराठयांनी हैदरला कायमची अद्दल घडवली यामध्ये निळकंठराव त्रिंबक, अंतोजी माने ठार झाले होते व मातब्बर लोक जखमी झाले होते .यावरून पेशव्यांच्या दक्षिण धोरणामध्ये अनेक मराठे सरदारांनी आपले योगदान दिले होते. पेशव्यांनी मराठा सरदारांची एकजूट करून त्यासरदारांचे कर्तृत्व, स्वभाव व मर्यादा ओळखून त्यांच्या मदतीने आपले दक्षिण धोरण यशस्वी केले होते हे स्पष्ट होते.

माधवराव पेशवे दक्षिण धोरण आखत असताना स्थानिक महत्त्वाच्या घटना घडलेल्या दिसून येतात. या गृहितकाला अनुसरून–

१. दक्षिण धोरणामुळे मिरजेचे महत्त्व वाढवून ते सीमावर्ती ठिकाण म्हणून उदयास आले. तेथे गोपाळराव पटवर्धन व आनंदराव रास्ते यांच्या मार्गदर्शनाखाली लष्करी भरती केली जात होती. या ठिकाणी फलटण, अथणी, पुणे, अकलूज, सोलापूर, माणदेश, करकंब वगैरे व कानडे वळणाचे लोक लष्करात भरती होत असे. जी माणसे ठेवायची ती त्या त्या भागातील सरदारांच्या मदतीने युद्धाला लायक माणसाचा अंदाज घेऊन ठेवली जात असे.

२. पेशव्यांची मोहिम दक्षिणेकडे जात असताना मार्गातील सातारा प्रांतात काही महत्त्वाच्या घटना घडल्या यात प्रामुख्याने पेशव्यांनी छत्रपती रामराजास स्वातंत्र्य देऊन काही प्रमाणात अदालत वाडयाची डागडुजी केलेली दिसून येते. जत येथे डफळे व पोळ यांच्या बंडाचा बिमोड करून तो प्रांत आनंदराव रास्ते यांना जहागिर दिला होता .तसेच भवानराव प्रतिनिधीच्या बंडाने वाई, सातारा, कऱ्हाड, पाटण, कडेगाव, कोळे, मसूर, चरेगाव, विटे, भाळवणी इत्यादी मुलखातील लोक लुटीने बेजार झाले होते. पेशव्यांनी या बंडाची समस्या सोडविली होती. तसेच मार्गातील मराठे सरदारांना वठणीवर आणले. कारण शिलेदारांनी नालबंदी घेतली परंतु चाकरीस गेले नाही. आनंदराव फाळके, राघोजी धायगुडे, खानाजी जाधव, बाबाजी व जयाजी भोईटे इत्यादीना सातारा प्रांतातील जरंडा, सालपेघाट, निंब,

वाई, रहिमतपूर येथील घरे जप्त करण्यात आली होती. फलटणच्या मालोजी नाईक निबांळकराचा कब्जा सोडविलेला दिसून येतो .सातारा प्रांतातील परशराम नाईक अनगळ, भिकाजी नाईक रास्ते व सदाशिवराव नाईक रास्ते या सावकारांनी कर्ज रूपाने पेशव्यांना आर्थिक मदत केलेली दिसून येते.

३. पेशवे पुण्याला फौज जमा होईपर्यत सिद्धटेक, जेजुरी, मोरेश्वर, थेऊर व कुरकुंभ येथील देवांची दर्शन घेत अससल्याने त्याला पंचयात्रा करणे असे म्हटले जात असे. परिणामी ही धार्मिक ठिकाणे म्हणून नावारूपास आली व पुण्याचे महत्त्व वाढीस लागले.

४. कोल्हपूरच्या जिजाबाईच्या स्वच्छेनुसार खानवटकर भोसले घराण्यातील शहाजीराजे यांच्या मुलास करवीरचा राजा म्हणून मान्यता दिली व दत्तक विधानाचा प्रश्न सोडविला तसेच चिकोडी, मनोली व कागल जिजाबाईच्या हवाली केलेले दिसून येतात म्हणजेच दक्षिणेत जाताना पेशव्यांनी जिजाबाईला मदत केलेली दिसून येते. थोडक्यात दक्षिण धोरणांची अमंलबजावणी करत असताना पेशव्यांनी मराठी राज्यातील निर्माण झालेल्या सातारा, मिरज, पुणे व कोल्हापूर या ठिकाणच्या समस्या सोडविलेल्या दिसून येतात.

माधवराव पेशवे व निजाम यांच्या संबंधाच्या अनुषंगाने पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे जे दूरगामी परिणाम झाले त्यातील एक महत्वाचा म्हणजे दक्षिणेत हैद्राबादच्या निजामाचा झालेला उदय हा होता. निजामाने हैदरअली व रघुनाथराव यांच्या मदतीने आपले स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. माधवरावास पेशवाईची वस्त्रे मिळाली त्यावेळी या तरूण पेशव्याचे वय फक्त १६ वर्षाचे होते व असंख्य अडचणी होत्या. दक्षिणेत निजामाशी संघर्ष करुन पेशव्यांनी १७६२ च्या उरळीच्या तहानंतर आपले दक्षिण धोरण पद्धतशीरपणे राबविले होते. कर्नाटकच्या पहिल्या मोहिमेवरून पुण्याला परत आल्यानंतर पेशव्यांनी गृहकलहाचा प्रश्न संयमाने व कौशल्याने सोडविला होता. माधवराव पेशव्यांच्या विरोधात हैद्राबादच्या निजाम व नागपूरचे जानोजी भोसले रघुनाथरावास जाऊन मिळाले होते. तसेच अनेक मराठा सरदार ही निजामास जाऊन मिळाल्याने पेशव्यांना आपल्या दक्षिण धोरणामध्ये अडथळा वाटत होता म्हणून प्रथम मल्हारराव होळकर हा गनिमी काव्याच्या यद्धतंत्रात वाकबगार असल्याने त्याच्या मदतीने निजामाचा बंदोबस्त करण्याची योजना आखली, त्यानुसार पेशव्यांनी गोपाळराव पटवर्धन व जानोजी भोसले यांच्याशी संपर्क साधून त्यांना आपल्या बाजूला वळविले व १०

ऑगस्ट १७६३ च्या राक्षसभुवनच्या लढाईत निजामाचा पराभव केला. पेशव्यांनी विजयाचे पारडे आपल्या बाजूस झुकविल्याने रघुनाथराव व मराठा सरदारांनी पेशव्यांचे कर्तृत्व खुल्या मनाने मान्य केले. माधवराव पेशवेच मराठी राज्याचे नेतृत्व करू शकतात याची जाणीव निर्माण झाली व आदरभाव वाढला. या अर्थाने ही लढाई महत्त्वाची मानली जाते. राक्षसभुवनच्या लढाईत निजामाचा पूर्ण पराभव पेशव्यांना करता आला नाही .कारण दक्षिणेत हैदरअलीने आक्रमक कारवाया सुरू केल्या होत्या व म्हैसूरच्या राज्याची सीमा जवळ जवळ कृष्णा नदीला भिडली होती. पहिल्यांदा मराठी राज्यावर दक्षिणेकडून हैदरच्या रूपाने आक्रमणाचा धोका निर्माण झाला होता. यापूर्वी उत्तरेकडून मराठी राज्यावर आक्रमणे होत होती. या आक्रमणाचा बंदोबस्त करण्यासाठी हैदरवर दुसरी मोहिम हाती घेण्यासाठी पेशव्यांनी निजामाशी तह केला होता.

१८व्या शतकात दक्षिणेत निजाम, मराठे, इंग्रज व हैदरअली हे चार प्रमुख सत्ताधिश असून त्यात मराठे हेच जास्त प्रबळ होते. पालखेडपासून राक्षसभुवन पर्यत पेशवे–निजाम संघर्ष चालत आला होता. माधवराव पेशवे यांनी त्या संघर्षाला पूर्णविराम देऊन निजाम–पेशवे मैत्रीचा तह केला. निजामाबरोबर मैत्री करण्याचे पेशव्यांचे विविध हेतू होते. यामध्ये प्रामुख्याने दक्षिणेत हैदरअली विरूद्ध मोहिमेत निजामाचे सहाय्य मिळावे, रघुनाथराव व जानोजी भोसले यावर जरब बसविण्याकरीता निजामाचा उपयोग होईल, उत्तर हिंदुस्थानात एतद्देशीय व इंग्रज सत्तेशी झुंज देता यावी इत्यादी. पेशव्यांच्या या राजकीय खेळीने मात्र राघोबास जबरदस्त हादरा बसला होता. सुरूवातीला निजामाचा दक्षिणेतून समूळ नाश करावा हा पेशव्यांचा हेतू होता. तो नष्ट करण्यासाठी व मैत्रीचा तह घडून आणण्यासाठी निजामाच्या पदरी असणाऱ्या शेरजंग या सरदाराने महत्त्वाची भूमिका बजावली होती. पेशव्यांचा हैद्राबाद येथील वकील धोंडोराम हा निजामअली व रूकनुद्दौला यांच्या मनातील पेशव्यासंबंधीचे गैरसमज दूर करतात. पेशवे व निजाम यांची भेट कुरूंदखेडयावर झाली व हैदरअलीवर दोघांनी मिळून स्वारी काढावी यावर एकमत झाले होते.

शेजार धर्माने वागण्याची स्फूर्ती दोन्ही पक्षात निर्माण झाली. माधवरावाने निजामास स्पष्ट आश्वासन दिले की, 'तुमचे आमचे वैर असू नये, तुमचा राज्यांश आहे त्या स्थितीत तुम्ही सांभाळावा आमचा आम्ही सांभाळू, कोणी कोणास दुःखवू नये, एकमेकावर आक्रमण

करू नये, स्नेह ठेवण्यातच उभयताचे कल्याण आहे, शत्रूत्व चालविण्यात दोघांचे नुकसान.' पेशवा–निजाम या नवीन मैत्री संबंधामुळे दक्षिणेत शांतता निर्माण झाली परिणामी दोन्ही राज्याचा आर्थिक व सामरीक(लष्करी) फायदा झाला. राज्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळालेली दिसून येते.

सन १७६६ चा पेशवे–निजाम मैत्रीचा तह हैदरला आवडलेला नसतो परिणामी तो तह तोडण्याच्या प्रयत्नात असतो. इंग्रजांचे किंवा हैदरअलीचे पारिपत्य करण्याचे सामर्थ्य एकटया निजामात नव्हते म्हणून त्याने मराठयांशी सलोखा केला होता. मराठयांबरोबरचे मैत्रीचे संबंध निजामाने तोडावे यासाठी इंग्रजांनी त्याचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु म्हैसूरवर अधिकार मिळविणे त्याला मराठयांच्या मदतीनेच शक्य होणार होते. तसेच २२ जानेवारी १७६७ रोजी झालेला इंग्रज–निजाम सलोखा पेशव्यांना आवडलेला नसतो. म्हणजेच १८ व्या शतकात दक्षिणेत हैदर, निजाम, इंग्रज व मराठे यांचे आर्थिक(व्यापारी) हितसंबंध गुंतलेले होते.

तिसऱ्या कर्नाटक मोहिमेत निजाम आपली फौज घेऊन पेशव्यांस मिळणार होता. या बातमीने हैदरअली मात्र घाबरला व त्याने पेशव्यांकडे वाटाघाटीसाठी आपला वकील आपाजीराम यास पाठवून दिले. निजामाची मोहिम सुरू होणार होती तर पेशव्यांची संपत आली होती. पेशव्यांचा असा उद्देश होता की, निजाम, इंग्रज व हैदर यांच्यात काय भानगडी असतील तर त्यांच्या त्या पाहून घेतील. आपणास त्यात पडण्याचे काही कारण नाही. परिणामी मदगिरी व शिरे जिंकल्यानंतर पेशव्यांनी निजामास निरोप पाठविला होता की, तुम्ही आमच्या लष्करापासून चाळीस कोसाच्या अंतराने रहावे. रूकनुद्दौला व शेरजंगास पुढे पाठवून देणे. मराठयांच्या अंकीत झालेल्या सात संस्थानिकांना निजामाने उपद्रव देवू नये ,ही कामगिरी पेशव्यांच्या वकीलाने चांगल्याप्रकारे पार पाडली होती. तसेच मोहिमेतील खंडणीची रक्कम देखील पेशव्याने निजामास दिली नाही. पहिल्या म्हैसूर युद्धात देखील निजामास पेशव्यांनी मदत केली नाही म्हणजेच पेशवे–निजाम मैत्री संबंधीच्या उपयोग माधवरावाने फक्त हैदरवर प्रतिडाव टाकण्यासाठी व रघुनाथरावास पेशवेपदापासून दूर करण्यासाठी करून घेतला होता. परिणामी दक्षिणेत शांतता निर्माण होऊन मराठी राज्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली होती असे मला वाटते.

माधवराव पेशवे व हैदरअली यांनी दक्षिण धोरणामध्ये कोणकोणती युद्धनिती वापरली यांचा शोध घेतला असता पुढील बाबी दिसून आल्या–

१. हैदरअलीला गनिमी कावा युद्धतंत्राची जरी माहिती असली तरी माधवराव पेशव्यांनी त्यावर मात केलेली दिसून येते. पेशव्यांनी गनिमी कावा तंत्राचा वापर अधिक प्रभावीपणे केला होता.

२. हैदरअलीने जंगलात छावणी केली असता त्याला मैदानात ओढवून आणणे. यासाठी पेशव्याने निरोप पाठविला होता की, तुझ्या पराक्रमाच्या व शौर्याच्या गोष्टी कैक आम्ही पुण्यास ऐकलेल्या आहेत. त्या जर खऱ्या असतील तर तू भागूबाईसारखा रानात दडून न राहता मैदानात येऊन आमच्याशी मुकाबला कर, त्यातच तुझे शौर्य आणि मर्दुमकी आहे आणि असे जर तू केले नाहीस तर तू खरा सैनिक नसून, तुझ्या पराक्रमाच्या ऐकलेल्या गोष्टी खोटया आहेत. असे मी समजेन आणि पुण्याला जाण्याअगोदर तुझ्या छावणीस आनंदाने भेट देईल.' ही पेशव्यांनी हैदरला बाहेर काढण्यासाठी केलेली योजना होती.

३. हैदरअलीवर देखरेख ठेवण्याची कामगिरी मराठा सरदारांवर सोपविणे, हैदरला मिळणारी रसद खंडीत करणे व लूटून आणणे, एकदम चारही बाजूने शत्रूवर मारा करणे, घेरा घालून तोफांचा मारा देऊन जेरीस आणणे. हैदरच्या गोटातील बातमी आपल्या गुप्तहेर व जासुदांमार्फत काढणे व त्याचे मनोरथ धुळीस मिळविणे.

४. व्युहरचना आखणे व हैदरअलीला कोंडीत पडणे.उदा.रट्टेहळ्ळीची लढाई उजव्या बाजूस गोपाळराव, डावीकडे– नारोशंकर, पिछाडीस विंचूरकर व तोंडावर स्वतः माधवराव पेशवे आणि विसाजी कृष्ण बिनीवाले. पेशवे आपण दूर गेल्याची अफवा पसरविणे व मोहिमेचे हेतू साध्य करण्याचा प्रयत्न करीत असे. संस्थानिकांकडून खंडणी वसूल करणे व त्यांना आपणास मिळवून आणणे.

५. हैदरअलीकडील अधिकारी व शिपाई शरण आले असता त्यांना माफ करून युद्ध मोहिमेत सहभागी करून घेणे. युद्धमोहिमेचा वेळ वाया न घालविता, हैदरच्या तोंडावर थोडीशी फौज ठेवून आपण इतर कामे पार पाडणे यावरून पेशव्यांनी मोहिमेचे केलेले नियोजन, घेतलेली दक्षता व नेतृत्व हे गुण दिसून येतात.

६. हैदरकडील काही ठाणी जिंकून घेतली असता त्या ठाण्यामध्ये मराठी अंमल बसविणे .महत्त्वाची ताब्यात ठेवणे व काही ठाणी जमीनदोस्त करणे. मोहिमेचा प्रादेशिक व आर्थिक हेतू साध्य झाला असताना संकट समयी मोहिम आटोपती घेणे व पुन्हा नव्या दमाने मोहिम आखणे.

७. पेशव्यांनी हैदरअली विरूद्ध पाश्चात्यांच्या युद्धतंत्राचा वापर केलेला दिसून येतो यामध्ये प्रामुख्याने बंदुका, तोफा, दारूगोळा ही शस्त्रास्त्रे व गाडदी यांचा समावेश होता.

८. पेशव्यांनी आरमारी युद्धतंत्राचा वापर करून हैदरला तह करण्यास भाग पाडलेले दिसून येते. पेशव्यांनी मोहिमेत मराठा सरदारांना वेगवेगळया कामाची विभागणी करुन दिली होती. त्यानुसार मराठा सरदारांनी किल्ले, ठाणी व प्रांत जिंकल्याने हैदरअलीला युद्धमोहिमेत अपयश आल्याचे दिसून येते.

९. माधवराव पेशव्यांनी दक्षिणेच्या राजकारणात हैदरअलीला एकटे पाडण्याची युद्धनिती आखली होती. त्यानुसार त्या प्रांतातील पाळेगार, सरदार, कडप्पेकर, कर्नूलकर, रायदुर्गकर, सावनूरकर, चित्रदुर्गकर व पठाण इत्यादींनी हैदरला मदत केली नाही. तसेच इंग्रज, निजाम व फ्रेंच यांच्याशी मैत्रीचे करार केल्याने त्यांनी ही हैदरला मदत केली नाही. यामध्ये पेशव्यांचा युद्धकौशल्य हा गुण दिसून येतो.

यावरून माझ्या मते, माधवराव पेशव्यांची युद्धनिती ही गनिमी काव्याची युद्धनिती व आधुनिक युद्धतंत्राचा वापरून करून आपली वेगळी अशी स्वतंत्र 'सर्वसमावेशक युद्धनिती' तयार करून तिचा वापर हा दक्षिण धोरणामध्ये केल्याचे दिसून येते. तसेच हैदरअली व माधवराव पेशवे यांच्या संघर्षातून माधवरावाचे युद्धकौशल्य, नेतृत्व, नियोजन, दक्षता, अवघड प्रसंगी जीव धोक्यात घालणे, किल्ल्यास मोर्चे दिल्यावर व सुरूंग खोदल्यावर रात्रंदिवस पहारा देणे, सर्व तरतुदी आपल्या नजरेने पहाणे, चांगल्या पराक्रमास बक्षीस तर अपराध्यास शिक्षा यावरुन त्यांचा उग्र स्वभाव इत्यादी गुण ही दिसून येतात.

**दक्षिण धोरणामध्ये माधवराव पेशवे व परकीय सत्ता यांच्या संबंधाच्या अनुषंगाने –**

हैदरअली विरूद्ध हाती घेतलेल्या मोहिमेमध्ये फ्रेंचानी मराठयांना मदत करावी अशी पेशव्यांची इच्छा होती. पण ती आपल्या आयुष्याच्या शेवटच्या आजारपणाच्या काळात कारण पेशवे १७७० पासून दक्षिणेकडे जावू शकले नव्हते म्हणून १७७२ मध्ये त्यांनी

त्रिंबकमामा पेठे यास पाँडेचरीच्या फ्रेंच गव्हर्नरशी चर्चा करण्यासाठी पाठविले होते. त्यानुसार फ्रेंचानी फ्रान्समधून मराठयांच्या मदतीला १० हजार फौज,  दारूगोळा व शस्त्रास्त्रे यांचा पुरवठा करावा. इंग्रज–फ्रेंच संघर्ष सुरू झाल्यास मराठयांनी फ्रेंचाना मदत करावी. भारतातील फ्रेंचाच्या शत्रूंना मराठयांनी आपले शत्रू समजावे. फ्रेंच फौजांचा खर्च मराठयांनी करावा इत्यादी महत्त्वाचे मुद्दे होते. कारण उत्तर व दक्षिण भारतातील इंग्रजाच्या कारवायास खीळ बसेल. इंग्रज मराठयांच्या, निजामाच्या व बंगालच्या राज्यामध्ये कारस्थाने करणार नाहीत अशी पेशव्यांना खात्री होती. वास्तविक पाहता माधवराव पेशव्यांस हैदरअलीचा पराभव करून इंग्रजांची भारतातून हकालपट्टी करावयाची होती परंतु ऐन तारूण्यात राजयक्ष्माच्या रोगाने त्यांचा मृत्यू झाला.

१८व्या शतकात दक्षिणेत इंग्रज, फ्रेंच, निजाम, हैदर व मराठे यांचे आर्थिक (व्यापारी) हितसंबंध गुंतलेले होते. पेशव्यांच्या दुसऱ्या कर्नाटक मोहिममध्ये मुंबईचे इंग्रजानी काही तोफा, बंदुका व दारूगोळा पुरविला होता. सन१७६६ मध्ये पेशवे–निजाम मैत्रीचा तह हैदरला आवडलेला नसतो व तो मद्रासच्या इंग्रजाकडे मराठयांविरूद्ध दोस्तीचा प्रयत्न करतो परंतु त्याला अपयश येते. तसेच २२ जानेवारी १७६७ रोजी इंग्रज–निजाम यांच्यात झालेला सलोख्याचा तह पेशव्यांना आवडलेला नसतो. परिणामी पेशवे स्वसामर्थ्यावर तिसरी मोहिम हैदरच्या विरोधात हाती घेतात. इंग्रज ही आपणावर स्वारी करणार असे हैदरला वाटत असते .त्या आधीच मराठयांची व त्यांची झोंबी लावून दयावी असा हैदरचा डाव होता परंतु पेशव्यांनी हैदरवर प्रतिडाव टाकला होता की, निजाम आपला मित्र असून इंग्रज ही आपला मित्र आहे. आम्ही तिघांनी पूर्वीच हैदरचे पारिपत्य करण्याचा संकल्प केला आहे.यामुळेच हैदरने पेशवे सांगतील त्या शर्तीवर तह करण्याचे कबूल केले होते. इंग्रजांना वाटत असते की, मराठयांना फसविण्याचा आपण प्रयत्न केला पण तो फसला. कारण पेशव्यांनी आधी येऊन आपला हात उगवावा व परत जावे हे योग्य नाही. तथापि त्यांनी खंडणीची लूट, मुलूख याची वाटणी आम्हा दोघास दिली पाहिजे म्हणून मोगल सरदार व एक इंग्रज अंमलदार पेशव्यांकडे येऊन वाटणी देण्याविषयी बोलू लागले तेव्हा दरबारात मोठा हशा पिकला होता. पेशव्यांनी इंग्रजांची खंडणीची मागणी फेटाळून लावली होती.

सन१७६७ च्या इंग्रज–म्हैसूर युद्धात मराठयांनी ज्याची बाजू घ्यावी त्यास विजय मिळणार होता. इंग्रज, निजाम, हैदर व कर्नाटकचा नबाब पेशव्यांकडे मदतीसाठी प्रयत्न करतात. पेशव्यांनी गोपाळरावास कर्नाटकात छावणीकरीता पाठविले परंतु हैदर, निजाम व इंग्रज यांच्या वाटेस जावू नये अशी सक्त ताकीद दिली होती. पहिले म्हैसूर युद्ध चालू असताना इंग्रजांनी मुंबईहून मॉस्टीन या वकीलास पेशव्यांकडे मैत्रीसाठी, हैदरला मदतीपासून परावृत्त करणे, तसेच रघुनाथ व पेशवे यांच्यातील गृहकलह विकोपास कसा जाईल याकरिता पाठविले होते.२१ नोव्हेंबर १७६७ ते ५ जानेवारी १७६८ या काळात मॉस्टीन व पेशवे यांच्या पाच भेटी झाल्या परंतु पेशव्यांनी कोणताही तह केला नाही .परिणामी मॉस्टीनला रिकामे हाताने परत जावे लागले. म्हैसूरच्या युद्धात हैदरने गनिमी काव्याने इंग्रजांचा पराभव केला. ईस्ट इंडिया कंपनीची आर्थिक हानी झाली त्यामुळे इंग्रजांनी पुढील काळात दक्षिणेकडील सत्तांशी मैत्रीचे संबंध ठेवल्याचे दिसून येतात.

कारण दक्षिणेमध्ये माधवराव पेशव्यांचे वर्चस्व वाढले होते व परकीय सत्तांना पेशव्यांच्या मैत्रीची गरज वाटत होती हे मद्रास गव्हर्नरच्या फे ब्रुवारी १७७० च्या पत्रावरून दिसून येते. कंपनी सरकार व आपण यामध्ये जुनी चालत आलेली मैत्री दृढ व्हावी. दक्षिण धोरणात पेशव्यांना फ्रेंचाची मदत हैदर व इंग्रजांविरूद्ध अपेक्षित होती तसेच परकीय सत्तांनी पेशव्यांच्या कर्तबगारी व मराठी सरदारांच्या पराक्रमामुळेच हैदरविरूद्ध मराठयांना मदत करण्याचे ठरविले होते. इंग्रजांच्या साम्राज्यवादी धोरणाची व भेदनितीची पेशव्यांना जाणीव होती. परिणामी प्रथम हैदरचे पारिपत्य झाल्यावर फ्रेंचाच्या मदतीने इंग्रजांचाही बंदोबस्त करण्याचा त्यांचा मानस होता. सन १७७० नंतर पेशवे आजारी असताना त्यांनी दक्षिणेतील बहुतेक संस्थानिक व नबाब, इंग्रज आणि फ्रेंच या सत्तांना ही हैदरला मदत करू दिली नाही. परिणामी हैदरला दक्षिणेच्या राजकारणात एकटे पाडले त्यामुळे हैदरअली हा १७७२ च्या किकेरीच्या तहास तयार झाला. पेशव्यांनी परकीय सत्तांशी सलोख्याचे संबंध ठेवून दक्षिण धोरणामध्ये दुरूस्ती केली होती. दक्षिणेतील स्थानिक सत्ताधीश व परकीय सत्ता यांच्याशी मुत्सद्देगिरीच्या जोरावर आपले दक्षिण धोरण यशस्वी करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. माधवराव पेशव्यांनी मराठी राज्याच्या संकटसमयी इंग्रजांशी यशस्वी राजकारण करून मराठी राज्याला स्थैर्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला.माधवराव पेशव्यांच्या१८व्या शतकातील

कामगिरीमुळेच दक्षिण भारतातील इंग्रज ,पोर्तुगीज व फ्रेंच या परकीय सत्तांना जरब निर्माण होऊन त्यांनी मराठयांशी मैत्री निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता असे मला वाटते.

**दक्षिण धोरणाचे मराठी राज्याला झालेले फायदे व परिणाम या अनुषंगाने –**

१. माधवराव पेशव्यांनी दक्षिणेत काढलेल्या पाच मोहिमांमुळे महाराष्ट्रातील सरदार, शिलेदार, सैनिक, तरूण व सैन्यातील बिन हत्यारी लोक व कारागीर यांना रोजगार मिळाला होता. कारण सैन्यामध्ये पेंढारी, मावळे, हेटकरी, खिजमतगार, परीट, शिंपी, पखाली, हलालखोर, दिवटे, कोठावळे, जमादार, जिनगर, चोपदार, जासूद, कर्णेकरी, पोतदार, कामाठी, नोकर, आचारी इत्यादी लोक असून त्या सर्वांना बुणगे अशी संज्ञा होती. हैदरवरील चौथ्या स्वारीत पेशव्यांनी पंधरा हजार गाडदी तयार केले होते. तोफाबरोबर दर्यावर्दी, खलाशी, सुतार, लोहार, बेलदार, व्यापारी व उदमी यांनाही लढाईवर जावे लागत असल्याने त्यांना वर्षानुवर्षे काम मिळत असे. कारण एक एक मोहिम वर्ष दोन वर्ष चालत असे. चौथी मोहिम ही अडीच वर्षे सुरु होती. थोडक्यात विविध जातीच्या लोकांना व व्यावसायिकांना पेशव्यांनी रोजगार मिळून दिला होता.

२. पेशव्यांना दक्षिणेतील बागलकोट, कडाप्पा व बल्लारी या ठिकाणाहून बंदुकीची दारू, (सोरा) तोफा व बंदुका मिळाल्याने परिणामी मराठयांचे लष्करी सामर्थ्य वाढण्यास मदत झाली होती.

३. पानिपतपूर्वीचा दरारा दक्षिण धोरणामुळे मराठी राज्याला प्राप्त झाला. पेशवे–निजाम मैत्री संबंधामुळे दक्षिणेत शांतता निर्माण होऊन निजाम व मराठे या दोन्ही राज्यांचा आर्थिक व सामरिक(लष्करी) फायदा झाला परिणामी दोन्ही राज्याच्या विकासाला चालना मिळालेली दिसून येते.

४. माधवराव पेशव्यांच्या काळात सोलापूर, हैद्राबाद, नागपूर व कर्नाटकातून अनेक कुशल कारागिर वर्ग महाराष्ट्रात येऊन स्थायिक झाला. देशाच्या कानाकोपऱ्यातून विद्वान, पंडित, कसबी कारागिर, व्यापारी, कलावंत, यांचा ओघ पुण्याकडे वाहू लागला त्यातूनच नवीपेठा उदा. रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरूवार, शुक्रवार, गणेशपेठ इत्यादी उदयास आल्या व लोकसंख्या वाढत गेली. या वाढत्या लोकसंख्येबरोबरच शांतता, सुव्यवस्था व आरोग्याचे प्रश्न पेशव्यांना सोडवावे लागले. पुणे शहराची अंतर्गत व्यवस्था पाहण्यासाठी

स्वतंत्र अधिकाऱ्याची गरज भासू लागली. पेशव्याने नारायण केतकरांस पुणे शहराचे कोतवाल म्हणून नेमले. तसेच दक्षिणेतील तेलगू ब्राम्हण महाराष्ट्रात आलेले दिसून येतात. परिणामी माधवराव पेशव्याच्या काळात पुणे हे राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक उलाढालीचे केंद्र बनले व विकासाला चालना मिळाली.

५. माधवराव पेशव्यांनी सत्तेवरती आल्यानंतर आपले दक्षिण धोरण यशस्वी करण्यासाठी आरमाराकडे लक्ष दिले. मराठी राज्याची पडझड सावरण्यासाठी जानोजी धुळपच्या नेतृत्वाखाली मराठी आरमाराचे पुनर्रजीवन केले व पश्चिम किनारपट्टी सुरक्षित केली त्यामुळे मराठयांच्या राज्यामध्ये इग्रजांना हस्तक्षेप करण्याचे धाडस झाले नाही. पेशव्यांनी आरमार दुरूस्तीचे कार्य हाती घेऊन बाळाजी हरी यास अमीन, जगन्नाथ हरी यास कारभारी व आनंदराव धुळप यास आरमार सुभा अशी रचना करून, अमीनच्या अंकीत फडणीस, कारखानीस, जमादार, हशमीस इत्यादी अधिकारी नेमले होते. आरमार प्रशासनाची उत्तम नियमावली तयार केली. अमीनास रोजचा हिशेब तपासणे, नोकरांची हजेरी घेणे, नवीन भरती करणे, सर्व देव–घेव व खरेदीचा व्यवहार इत्यादी कामे नेमून दिली. अमीन हा सर्व सागरावरच्या सैनिकांची वर्षाच्या सुरूवातीला तपासणी करून आपला अहवाल पेशवे सरकारला पाठवीत असे. पेशव्यांनी आपले आरमार हैदरवरील दुसऱ्या स्वारीत पश्चिम किनाऱ्याने म्हैसूरच्या समुद्रापर्यंत नेले व हैदरचा पराभव केला .पेशव्यांनी जानोजी धुळपच्या नेतृत्वाखाली आरमाराची सज्ञता ठेवल्यानेच २४ ऑक्टोबर १७६८ मध्ये पोर्तुगीज–सावंतवाडीकर यांच्यामध्ये मैत्रीचा तह झालेला दिसून येतो. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजानंतर आरमाराचे महत्त्व इतर पेशव्यांपेक्षा माधवरावाने जाणले होते म्हणून त्यांनी या सुधारणांकडे लक्ष दिले.आरमाराच्या सहाय्याने दक्षिण भारतात मराठयांचे पानिपतपूर्व प्रभूत्व निर्माण केले आणि हैदरअली व निजाम यांना निष्प्रभ केल्याचे दिसून येते.

६. दक्षिण धोरणामुळे पेशव्यांना तोफा व दारूगोळयाची गरज भासू लागली परिणामी पेशव्यांनी काळाची पावले ओळखून तोफखाना व दारूगोळा तयार करण्याचे उपक्रम हाती घेतले होते. तंत्रज्ञानाची त्यांना जाण होती. मुंबईहून माणसे पाठवून त्यांनी इंग्रजांकडून सन १७६४ मध्ये तोफा आणल्या त्यामुळे 'हंड्रेडवेट' हे वजन मराठयांना माहित होते त्याला मराठे

'हंडरवट'असे म्हणत.एका तोफेस १९ रूपये पडत होते. इंग्रजांनी निरूपयोगी झालेल्या तोफा आपल्या गळयात बांधल्या आहेत. परिणामी पेशव्यांनी लांब पल्ल्याच्या तोफा तयार करण्याचे कारखाने आंबेगाव प्रांत जून्नर, अहमदाबाद, पुणे या ठिकाणी सुरू करून सर्व जाती जमातीच्या लोकांना राज्यकारभारात सामावून घेऊन रोजगार मिळवून देण्याच्या प्रयत्न केला होता. जय, फत्ते मुबारक, जयवंती ,ज्वाला भवानी व रणमंडळ तोफ पुण्याहून म्हैसूरकडे नेण्यात आली होती. ती वीसशेर गोळयाची होती. हरएक तोफ ओढण्यास दीडशे बैल लागत होते. जायबंदी झालेल्या विविध तोफांचे पंचरस काढून कारखाने चालू करावे,नवीन खरेदी करू नये यासारखे आदेश पेशव्यांनी नाना फडणीसास दिलेले दिसून येतात.यावरून माधवरावांनी आपले तोफखाना विषयक धोरण हे काटकसरीने राबविल्याचे दिसून येते.

७. दक्षिण धोरणामुळे मराठी राज्याला आर्थिक फायदा झाला होता. कारण हैदरने प्रत्येक मोहिमेच्यावेळी लाखो रूपये दिले होते. विविध संस्थानिकांकडून खंडणीच्या रूपाने ही लाखो रुपये मिळाले होते. शिवाय लुटीतील रक्कम ही वेगळीच होती. दक्षिणेतील शिरा, अर्काट, कडप्पा, सावनूर , कर्नूल, रायदुर्ग, सोंधे, चित्रदुर्ग, विद्यानगर, हरपनहळळी, कनकगिरी, बेल्लारी, लोचनगड इत्यादी संस्थानिकांनी मराठयांचे वर्चस्व मान्य केल्याने मराठयांच्या प्रादेशिक फायदाही झाला होता. तिसऱ्या मोहिमेत मदगिरीच्या किल्ल्यामध्ये मराठयांना प्रंचड संपत्ती मिळाली होती. १५ वर्षात मराठयांना मिळाली नव्हती, ती इतकी होती. संपत्ती वाहून नेण्यासाठी पुण्याहून उंट मागवले होते. मुख्य म्हणजे मराठी राज्य जिवंत आहे. मराठे सरदार राज्याचे संरक्षण करू शकतात याचा प्रत्यय मात्र दक्षिणेत सर्वांना आला. दक्षिण धोरणांमुळे अनेक कुटुंबे युद्ध मोहिमेमध्ये सहभागी होऊन त्यांना युद्धाचा अनुभव मिळून राष्ट्रउद्योगात सामील झाली होती. पेशव्यांनी मराठी सरदारांमध्ये राजनिष्ठा निर्माण केलेली दिसून येते.

८. दक्षिण धोरणामध्ये पेशव्यांनी आपले मराठयांचे वकील हे तेथील सत्ताधिशांच्या दरबारी नेमल्याने पेशव्यांना आपले दक्षिण विषयक धोरण हे अधिक आक्रमकपणे राबविता आले होते. हैदराबादच्या दरबारात गोविंदराव काळे, धोंडेराम व शेरजंग तर हैदरच्या दरबारात आपाजीराम,करीमखान व शामराव गोपाळ हे वकील होते. तसेच दक्षिणेतील संस्थानिकांच्या

पदरी व त्या भागामध्ये मराठे मामलतदार, कमाविसदार, किल्लेदार नेमल्याने दक्षिणेतील माहिती पेशव्यांना मिळण्यास मदत झालेली दिसून येते.

९. दक्षिण धोरणामुळे मराठी राज्याची आर्थिक स्थिती सुधारली त्यामुळे शेतीच्या विकासासाठी धरणे, तलाव, बंधारे व विहिरी या सारख्या काही सुधारणा करून पडीक जमिनी लागवडीखाली पेशव्यांना आणता आल्या. मालशेजचा घाट दुरूस्त करून जकात वाढविण्याचा प्रयत्न केला. खंबाटकी घाटात प्रवाशांच्या सोईसाठी विहिर खोदली व धर्मशाळेची डागडुजी केली.उद्योगधंदे व व्यापाराला उत्तेजन देता आले. तोफा, दारूगोळा, बाणांचे कारखाने व आरमारविषयक सुधारणा राबविता आल्या तसेच महसूल व कर आकारणी करतांना लोकांना अनेकवेळा सुट दिलेली दिसुन येते. पेशव्यांनी आपले धोरण पद्धतशीर राबविल्याने सन १७७२ पर्यत मराठी राज्याचा महसूल हा दहा कोटीपर्यत गेलेला दिसून येतो. तसेच माधवराव पेशव्यांनी मृत्यूपूर्वी मराठी राज्यास कर्जमुक्त केले होते.

१०. माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणामुळे गायी, घोडे, उंट व हत्ती या सारख्या प्राण्यांचे संकरीत पशुधन महाराष्ट्रात आले. या प्राण्यांचा उपयोग विशिष्ट कारणासाठी असल्याने त्यांचा फार मोठा संग्रह पेशव्यांनी केला होता. उत्तम गुरांची अवलाद जवळ बाळगून त्याचा प्रसार शेतकरी वर्गात करणे हे राज्यकर्त्यांचे कर्तव्य होते. पेशव्यांना स्वतःच्या प्रपंचासाठी दुभत्या गाईची गरज होती त्याकरिता त्यांनी शेकडो गाई जवळ बाळगल्या होत्या. शनिवार वाडयात पश्चिमेस त्यांची स्वतंत्र गोशाला होती. हणमगाई या जातीवंत ते खरेदी करीतच परंतु लढाईत शत्रूच्या मुलखातून लुटालूट सुरू असल्याने त्यात अनेक मौल्यवान वस्तूंबरोबर गाई ही मिळत असे. गायीचा उपयोग बैल तयार करण्यासाठी व बैलांचा उपयोग वाहतुकीसाठी केला होता.पेशव्यांची हुजूर पागेची जागा आजही प्रसिद्ध आहे. शनिवारवाडयात, गोशाळा व शेजारी घोडयाची पागा होती. महाराष्ट्रात घोडे चांगले असले तरी काही चांगले घोडे परमुलखातून आणावे लागत होते. सगळया घोडयांचा पुरवठा बाहेरुन करणे दुरदर्शीपणाचे नसल्याने जातीवंत घोडयाची अवलाद निपजण्याकरिता पेशव्यांनी सरदार मंडळीनी वळू घोडे पदरी बाळगण्यास सांगितले होते. तसेच पेशव्यांपाशी वळू घोडे होते या ' वळू ' घोडयाचा दररोजचा खुराक सव्वा पायली हरभरे, एक शेर मीठ, अर्धा शेर तूप, पावशेर साखर, दोन टाक मिरे, असा होता. पीलखाना ही पेशव्यांचा स्वंतत्र

होता. हत्तीच्या चाऱ्यापाण्याची सोय ही विशेष प्रकारची करावी लागत असे. त्याकरिता माधवराव पेशव्यांनी नाना फडणवीसास आज्ञा केली होती की, पुण्याचे आसपास हत्ती करिता ऊस लावावा. मौजे कोलवडीस तीस बिघे, मौजे हडपसर वीस बिघे यावरून पेशव्यांच्या दक्षिण धोरणामुळे संकरीत पशुधन हे महाराष्ट्रात आले व शेतकऱ्यांना माहित झाले.

माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणाचे मराठी राज्यावर जसे परिणाम झाले तसेच कर्नाटक प्रांतावर ही झालेले दिसून येतात. युद्धमोहिमांमुळे काही मराठे सरदार सोंडूर, गुत्ती, रायदुर्ग, तंजावर व चित्रदुर्ग, गजेंद्रगडकर इत्यादी ठिकाणी दक्षिणेत स्थायिक झाले तसेच व्यापारी व उदमी लोकांचा दक्षिणेशी संबंध येऊन काही प्रमाणात व्यापारास चालना मिळाली. पेशव्यांनी दक्षिणेत काही प्रांतामध्ये बंदोबस्तासाठी कमाविसदार, मामलेदार, किल्लेदार व शिबंदी ठेवल्याने ते त्याच ठिकाणी राहिल्याने मराठी संस्कृतीचा दक्षिणेतील कर्नाटक संस्कृतीशी समन्वय साधला गेला. हैद्राबादमध्ये आजही मराठे घराणी दिसून येतात तसेच हैद्राबादमधून विणकर समाज उदा. कोष्टी, साळी, इत्यादी महाराष्ट्रात व्यापाराच्या निमित्ताने आले व त्यांनी महाराष्ट्राचा कापड उद्योग हा वृद्धिगत केलेला दिसून येतो.

दक्षिण धोरणाच्या अनुषंगाने माधवराव पेशव्यांच्या कार्यकर्तृत्वाचा शोध घेणे.पानिपतच्या तिसऱ्या युद्धाने भारताच्या इतिहासाला कलाटणी मिळाली. नानासाहेबांच्या मृत्यूनंतर माधवरावांस पेशवाईची वस्त्रे प्राप्त झाली त्यावेळी मराठी राज्याची स्थिती वाईट होती. राज्यात अस्थिरता व गोंधळ निर्माण झालेला होता. मराठयांचा राजकीय वर्चस्व संपुष्टात आले होते. मराठी राज्याची जिवीत व आर्थिक हानी झाल्याने तिजोरी रिकामी होती. राज्यावर दीड करोड रूपयांचे कर्ज होते. कर्तबगार मराठी सरदारांची एक पिढी गारद झाली होती. उत्तर भारतात जाट, रोहिले, बुंदेले यांनी डोके वर काढले होते तर दक्षिण भारतात हैदरअलीचा व निजामाचा उदय झाला होता. पेशव्यांच्या घरामध्ये रघुनाथरावाने गृहकलह सुरू केला होता. रघुनाथरावाला पेशवे पदाची तर जानोजी भोसल्यांना सातारच्या छत्रपती पदाची हाव सुटली होती. परिणामी रघुनाथरावाला पेशवेपद मिळवून देण्यासाठी निजाम, हैदरअली, जानोजी भोसले सहकार्य करीत होते. पेशव्यांचे अनेक अंतर्गत विरोधक होते. यामध्ये बाबूजी नाईक बारामतीकर, भवानराव प्रतिनिधी यासारख्यांचा समावेश होता. अशा बिकट परिस्थितीमध्ये

माधवरावास मराठी राज्याची जबाबदारी मिळाली होती. यावेळी या तरूण पेशव्यांचे वय फक्त सोळा वर्षाचे होते.माधवरावास असंख्य अडचणी होत्या त्यावर मात करून पेशव्यांनी आपले दक्षिण धोरण आखले. या पार्श्वभूमीवरती पेशव्यांच्या कार्याचा व कर्तृत्वाचा अभ्यास केला असता आपणास त्यांचे मोठेपण मान्य करावे लागते. इ.स.१७६२ ते १७७२ या काळात पाच मोहिमा काढून अल्पकाळात दक्षिण भारतात मराठयांचे प्रभूत्व निर्माण केले व पानिपतच्या पराभवाचा कलंक धुवून काढला. आपल्या कर्तृत्वाची व बुद्धीमत्तेची चमक दाखवून मराठयांच्याच इतिहासात नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानमध्ये आपली कारकीर्द अविस्मरणीय ठरविली यामुळे मला माधवराव पेशव्यांचे स्थान हे श्रेष्ठ असल्याचे वाटते.

माधवराव पेशवे आपल्या चुलत्यास(राघोबास) गोडपत्रे लिहून दक्षिण स्वारीची हकीकत कळवित असे व सल्ला मसलत विचारत असे. दादा कोठे आहे ? मर्जी कशी आहे ? बोलण्यात भाव काय आहे? इकडील वर्तमान काय येतात ? मातोश्री व मामा यांच्या बोलण्याचा प्रकार काय झाला ? अशा अनेक गोष्टींचा तपास पेशवे सारखा करीत असे. दक्षिण मोहिमेचा व राज्याचा कारभार सांभाळून राघोबादादाच्या वृत्तीला बहकूं न देणे हे विलक्षण जोखीम त्यांना करावे लागत होते. हैदरअलीवरील दुसऱ्या मोहिमेत राघोबादादाला बोलावून घेतले व असे भासविले की, हैदरचा पेच निवारण्यासाठी तुमची गरज आहे. कर्नाटकात आल्यावर मोहिमेची जबाबदारी मोठया मनाने त्यांच्या हाती दिली होती. तसेच राघोबादादाने मराठी राज्याच्या दौलतीच्या वाटणीचा प्रयत्न चालविला होता. तो माधवराव पेशव्यांनी चिंतो विठ्ठल रायरीकरास पत्र ,'ही दौलत मोठी या दौलतीचे सर्व लहान मोठयांनी अनुकूल असून जेणेकरून दौलत नीट होय तेच सर्वांनी करावे.ते एकीकडे राहून दौलत दोहो जागा करावी हेच तीर्थरूपाने मानस त्यास आम्हास काही करणे नाही. कारण की ही दौलत पहिल्या पासून एकानीच करावी, वरकडांचा भार करणारावर असावा .याप्रमाणे चालत आले असता आता वडीलांचे मानस की, आम्हास गुजराथ द्यावी आणि सर्व किल्ल्यांचा बंदोबस्त आम्हीच करू म्हणतात ,त्यास आम्हास काही करणे नाही अशाने ही दौलत चालणार नाही व दोहो जागा दौलतीची वाटणी केल्याने लौकिकही वाईट, यास्तव सर्व वडिलांनीच करावे. आम्ही स्वस्थ भलते जागा राहू आपापल्यात भांडून दौलत बुडविली हा लौकिक कशाला पाहिजे .सर्व त्यांनीच करावे हे फार चांगले. आम्ही स्वस्त राहू वडिलांनी नीट केल्यावर आम्हास सांगतील तेव्हा

आम्ही जवळच आहोत हेच प्रस्तुत काळी बरे.' अशा प्रकारचे पत्र लिहून राघोबादादाचा प्रयत्न हाणून पाडला होता. तिसऱ्या कर्नाटक मोहिमेवर जाण्यापूर्वी राघोबादादाला उत्तरेच्या मोहिमेवर पाठवून दिले होते तर चौथ्या मोहिमेपूर्वी त्याचा पराभव करून सन १७६८ मध्ये शनिवार वाडयात नाना फडणीसाच्या नजरकैदेत ठेवले होते.राघोबादादा सारखा घरच्या शत्रूवर मात करून वेळप्रसंगी नमते घेऊन संयमाने गृहकलहाचा व राज्याच्या वाटणीचा प्रश्न सोडवून तर शेवटी कठोर होऊन त्यास नजरकैदत टाकून माधवराव पेशव्यांनी आपले दक्षिण धोरण पूर्णत्वास नेहले , यात त्यांचे स्वतःचे कर्तृत्व असल्याचे मला वाटते.

दक्षिण धोरणामध्ये नागपूरचे जानोजी भोसले व हैदराबदचा निजाम आणि म्हैसूरचा हैदरअली हे राघोबादादाला सहकार्य करणारे होते त्यामुळे माधवराव पेशव्यांचे दक्षिण धोरण अयशस्वी ठरत होते. परिणामी माधवराव पेशव्यांनी जानोजी भोसल्यावर मोहिमा काढून त्याचा बंदोबस्त करून त्यास रघुनाथरावाला मदत करण्यापासून परावृत्त केले व हैदरअलीच्या विरोधात सैन्यासह येऊन मिळण्यास भाग पाडले. तसेच निजामाचा सुरूवातीला राक्षसभुवनच्या लढाईत पराभव करून नंतर त्यांच्याशी १७६६ मैत्रीचा करार करून त्याचा उपयोग रघुनाथरावास पेशवाईपासून दूर ठेवणे व हैदरअली विरूद्धच्या मोहिमेत करुन घेतला परिणामी दक्षिणेत शांतता निर्माण होऊन दोन्ही राज्याचा आर्थिक व लष्करी विकास झालेला दिसून येतो. हैदरअलीला दक्षिण भारताच्या राजकारणामध्ये एकटे पाडून त्यावर पाच मोहिमा काढून प्रत्येक मोहिमेत त्याचा पराभव केला आणि मुबलक खंडणी वसूल केली. तसेच दक्षिणेतील शिरा, अर्काट, कडप्पा, सावनूर, कर्नूल, रायदुर्ग, चित्रदुर्ग, गुत्ती, सोंधा, यासारखी संस्थाने त्याच्या तावडीतून सोडविली. दक्षिणेकडील पाळेगारांचा बंदोबस्त केला व त्यांना मराठयांचे वर्चस्व मान्य करण्यास भाग पाडले. दक्षिणेत मराठयांचे पानिपतपूर्वीचे प्रभुत्व निर्माण करण्यात पेशवे यशस्वी ठरले यातच त्यांचे कर्तृत्व असल्याचे दिसून येते.

दक्षिण धोरण यशस्वी करण्यासाठी लष्कराची व फौजेची कमतरता होती.माधवराव पेशव्यांनी मुरारराव घोरपडे व गोपाळराव पटवर्धन, आनंदराव रास्ते व त्रिंबकमामा पेठे इत्यादी मराठे सरदार आपले हस्तक व मदतनीस तयार केले. दक्षिणेत आर्थिक व लष्करी दृष्टया त्यांना सक्षम बनविले व त्यांच्या मदतीने आपले दक्षिण धोरण पूर्णत्वास नेले. परिणामी या दक्षिण धोरणामुळे अनेक नव्या दमाचे मराठे सरदार, विसाजी कृष्ण बिनीवाले, नाना फडणीस,

त्रिंबकमामा पेठे इत्यादी तयार झाले. त्यांच्यामध्ये राजनिष्ठा निर्माण केली व त्यांना युद्ध मोहिमेचा अनुभव मिळून राष्ट्रउद्योगात सामील करून घेतले म्हणून माधवराव पेशव्यांची कारकीर्द म्हणजे माणसे तयार करण्याची शाळाच बनली होती असे म्हटले पाहिजे. कारण माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर पेशव्यांच्या फळीत तयार झालेल्या अनेक मराठा सरदारांनी जवळपास पन्नास वर्षे मराठी राज्याचे रक्षण केले. त्याचे श्रेय त्यांना दिलेच पाहिजे असे मला वाटते .पानिपतच्या युद्धाने निर्माण झालेली पोकळी पेशव्यांने भरून काढली व सक्षम नवीन पिढी तयार केली होती.

दक्षिण धोरणाच्या अनुषंगाने माधवराव पेशव्यांच्या अंगी विविध गुण असल्याचे दिसून येतात. माधवराव पेशवे हे अतिशय चारित्र्यवान पेशवे होऊन गेले. बहुजन समाजाच्या कल्याणाची तळमळ समान न्यायीपणा, काम करण्याची पद्धती ,स्वायत्त विचार करण्याची वृत्ती, तलवारबाजी, मुत्सद्देगिरी सर्व मराठे सरदारंची एकजूट करून आपले धोरण यशस्वी केले यातून नेतृत्व ,दिर्घोद्योगीपणा, प्रामाणिकपणा, न्यायीवृत्ती, कामाचा उरक, हिशोबीपणा, प्रजाहितदक्षता, निर्भिडवृत्ती,कडक शिस्तीचा भोक्ता,संयमीपणा, चौफेरदृष्टी, व्यवहारीपणा, काटकसरवृत्ती, प्रसंगावधानता, चौकसदृष्टी इत्यादी यशस्वी राज्यकर्त्याला आवश्यक असणारे सर्वच गुण त्यांच्या अंगी होते यावरून त्यांच्या कार्याची व कर्तृत्वाची कल्पना आपणास येते.

१८ व्या शतकातील मराठी राज्याचे वसाहतवादाचे धोरण यशस्वी करण्याकरिता माधवराव पेशव्यांना हैदरअली व निजाम यांना दक्षिणेत शांत करणे गरजेचे होते त्यामुळे माधवरावांनी आपले दक्षिण धोरण आखले होते. परिणामी मराठयांच्या वसाहती हया ओरिसा व बंगालमध्ये निर्माण होऊ शकल्या आणि त्या सन १८०३ पर्यत होत्या त्याचे श्रेय माधवराव पेशव्यांना दिले पाहिजे असे बी.सी.रे. यांनी आपल्या 'ओरिसा अंडर दी मराठाज इ.स .१७६१-१८०३' या ग्रंथात स्पष्ट केले आहे व ते योग्य आहे असे मला वाटते.

राघोबाला इंग्रज प्रतिनिधी चार्लस ब्रोम मदत करतो आहे, हे समजताच माधवराव पेशव्यांनी राघोबाचा बंदोबस्त केला. इंग्रजांची निती सफल होऊ दिली तसेच मॉस्टीनला रिकामे हाताने परत पाठविले व मराठी राज्यकारभारामध्ये इंग्रजाना हस्तक्षेप करू दिला नाही. हैदरअली विरूद्ध मोहिमेवर गेले असता बाबूजी नाईकाने बंड केले व हैदरअलीशी गुप्त संधान बांधले, सोलापूर व चंदन किल्ल्यावर दारूगोळा खरेदी करुन ठेवला होता याची पेशव्यांना

माहिती समजताच त्याचा बंदोबस्त केला आणि पुन्हा असे होणार नाही असे बाबूजी नाईकाकडून वदवून घेतले. परिणामी बाबूजी नाईकांनी पेशव्यांची इतकी धास्ती घेतली की त्याने पुन्हा मराठी राजकारणात भाग घेतला नाही. त्याचप्रमाणे माधवराव पेशव्यांनी मराठी राज्यामध्ये गुप्तहेरखाते हे कार्यक्षम केले. न्याय व्यवस्था चोख ठेवली , तोफखाना, दारूगोळा आरमार या सुधारणांकडे लक्ष दिले होते.

माधवराव पेशव्यांची कारकिर्द ही फक्त एकूण अकरा वर्षाची होती. वयाच्या सोळाव्या वर्षी पेशवेपदाची जबाबदारी त्यांच्या अंगावर आली होती. त्यातील पहिली व शेवटची वर्षे राघोबादादा यांच्याबरोबर संघर्षात व आजारपणात गेली होती. पेशव्यांनी अखंड उद्योग करून सात ते आठ वर्षाच्या अल्प काळात उत्तर व दक्षिण दोन्ही बाजू सक्षम केल्या. दक्षिण भारतात पटवर्धन, रास्ते, घोरपडे, त्रिंबकमामा पेठे यांना उभे करुन बलवान बनवले होते. मराठे पानिपतानंतर संपले हा जो गैरसमज निर्माण झाला होता तो पुसून टाकला. मराठे हे १८ व्या शतकात स्वतःच्या राज्याचे व इतरांचे संरक्षण करू शकतात व तेच प्रबळ आहेत. पहिल्यापेक्षा जास्त तेजाने चमकू शकतात हे माधवराव पेशव्यांनी आपल्या कार्य कर्तृत्वाने सिद्ध करून दाखविले.

दक्षिण धोरण माधवराव पेशव्यांचे यशस्वी झाले परंतु हैदरअलीचा समूळ नाश झाला नाही. याचे कारण राघोबादादा हा आपला प्रथम शत्रू आहे याची जाणीव पेशव्यांना झाली नाही. बाहय शत्रूपेक्षा अंतर्गत शत्रू जास्त धोकादायक असतो हे पेशव्यांना समजले नाही. केवळ वडीलधारा ज्येष्ठ चुलता म्हणून अंत्यत सौम्य दयाळू धोरण स्वीकारले होते, ही पेशव्यांच्या स्वभावातील एक उणीव दाखविता येईल. तसेच स्वतःच्या क्षय रोगाच्या आजारपणामुळे पेशव्यांना हैदरअलीचा समुळ नाश करता आला नाही. माधवराव पेशव्यांनी वारंवार मोहिमा केल्या असल्या तरी राजकीय वर्चस्व कायम झालेले दिसत नाही .परंतु हैदरअलीला श्रीरंगपट्टणला स्वस्थ बसविण्यामध्ये व निष्प्रभ करण्यामध्ये माधवराव पेशव्यांना यश आलेले दिसून येते.

माधवराव पेशव्यांची योग्यता ठरविताना मराठयांचा आद्य इतिहासकार ग्रँट डफ म्हणतो, ‘पानिपतच्या संकटामुळे मराठा राज्याचे जे नुकसान झाले त्यापेक्षा अधिक पटीने ते माधवरावाच्या मृत्यूने झाले हे मत अगदी सार्थ आहे. रियासतकार सरदेसाई म्हणतात की,

'समरांगणावर ठासून उभा लष्करी मोहिमा त्वरेने व नेटाने सिद्धीस नेणारा, सर्वाचे ऐकून स्वतःच्या निश्चयाने तात्काळ कृति करणारा, अनेक बिकट कारभार व भानगडी तडकाफडकी पार पाडणारा, सर्व राज्यावर सतत नजर फिरवणारा, खऱ्याचा पुरस्कर्ता व खोटयाचा कर्दनकाळ, रयतेचा कनवाळू असा हा पेशवा माधवराव सर्वाहून वरचढ होय आणि यास्तव मराठी राष्ट्राचा तो एक निरंतरचा दैदिप्यमान हिराच म्हणता येईल. बाळाजी विश्वनाथाने दूरदृष्टीने मराठी राज्याचा पहिला नकाशा आखला, बाजीरावाने धडाडीने त्याच्या मर्यादा गाठल्या. नाानासाहेबाने दमखाऊ वृत्तीने त्याला मासलत्व आणले आणि अशा या राज्यशरीरास माधवरावाने आपल्या नेकीने परमोच्च भाग्य मिळवून दिले. लोक बाळाजी विश्वनाथाची तारीफ करत, बाजीरावास नमत, नानासाहेबास भजत आणि माधवरावास वचकत.' नाना व भाऊ जे उद्‌गीर पानिपतावर करू शकले नाहीत ते माधवरावाने अल्पावधीत सिद्धीस नेहले. हैदरअलीवर शह बसविला भोसले, निजामास भजनी लावले, चुलत्यास नरम केले, बादशहास स्थानावर बसविले. मराठेशाहीत शिवछत्रपतीनंतर बऱ्याचअंशी त्यांचे अनुकरण करून राष्ट्राचा भाग्योदय करणारे दुसरे माधवराव पेशवे होते.

वरील दोन्ही मत योग्य असून त्यावरून. माधवरावांच्या कर्तृत्वाची व कार्याची जाणीव होते. माधवराव पेशवे क र्तबगार असून,प्रामाणिक ,जिद्दी व लोकहितशासक म्हणून त्यांचे नाव मराठयांच्या इतिहासामध्ये सदैव अजरामर व तरूणांना प्रेरणा देत राहिल असे मला वाटते. सन १७६१ पूर्वीची मराठी राज्याची स्थिती कशी होती. दक्षिणेत माधवरावांनी विविध सरदारांच्या नेतृत्वाखाली मराठयांचे वर्चस्व कसे निर्माण केले त्यामुळे आपल्या पूर्वजांनी केलेल्या कार्याची माहिती आताच्या समाजाला झाली. १८व्या शतकामध्ये मराठयांची सत्ताही दक्षिणेकडे प्रबळ होती. परिणामी पाश्चात्य इतिहासकारांनी आतापर्यत केलेल्या लिखाणात पानिपतच्या पराभवाने मराठयांचे पानिपत झाले व मराठे संपले हे विचार योग्य नसून खऱ्या अर्थाने १८ व्या शतकाचा इतिहास म्हणजे मराठयांच्या कर्तृत्वाचा इतिहास आहे. छ त्रपती रामराजा व कोल्हापूरची जिजाबाईला पेशव्यांनी मदत केली होती तसेच अनेक सुधारणा करून रोजगार मिळवून दिला होता आणि मराठी राज्याला कर्जमुक्त केले होते. मराठयांचा इतिहास हा निराशाजनक नसून तो अधिक चैतन्यमय,प्रेरणादायी व गौरवशाली होता. माधवराव व

हैदरअली यांच्यातील झालेल्या विविध लढाया,त्यांनी आखलेल्या योजना,टाकलेले डाव–प्रतिडाव, पेशव्यांच्या अंगी असणारे विविध गुणांची समाजाला माहिती होण्यास मदत होईल.

माधवराव पेशव्यांचे दक्षिणेकडील धोरण या माझ्या अभ्यासाअंती मी खालील निष्कर्ष मांडू शकतो.

१. माधवराव पेशव्यांनी सत्तेवरती आल्यानंतर विविध हेतूच्या पूर्तीकरिता आपले दक्षिण धोरण आखले होते व राक्षसभुवनच्या लढाईनंतर ते पद्धतशीरपणे राबविलेले दिसून येते.
२. दक्षिण धोरणामध्ये माधवरावास मुराररराव घोरपडे, गोपाळराव पटवर्धन, नाना फडणीस, विसाजी कृष्ण बिनीवाले व इतर मराठे सरदारांनी मदत केली ते पेशव्यांचे हस्तक व मदतनीस होते हे माझ्या अभ्यासातून दिसून आले.
३. पानिपतानंतर पेशव्यांना घरच्या गृहकलहामुळे उत्तरेत जाता आले नाही. दक्षिणेत कोणीही प्रबळ सरदार नसल्याने स्वतःच इतर सरदारांच्या मदतीने मराठयांचे वर्चस्व दक्षिणेत कायम करण्यात यश मिळविल्याचे दिसून येते.
४. माधवराव पेशव्यांना दक्षिण धोरणात गोपिकाबाईने मदत केली होती.नानासाहेबाच्या काळात दक्षिणेतील राजकारणाची तिला चांगली माहिती होती म्हणून दक्षिण भारतात मराठी सत्ता स्थिर करायला गोपिकाबाईने माधवरावास मार्गदर्शन केले व पहिल्या मोहिमेत वडूथपर्यंत सोबत होत्या.
५. दक्षिण धोरणामुळे मराठा राज्याला अनेक प्रादेशिक व आर्थिक फायदे झाले परिणामी मराठी राज्याचे कर्ज निवारण करण्यात व आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली होती.
६. दक्षिण धोरणाची अमंलबजावणी करताना माधवराव पेशव्यांनी पुणे, सातारा, कोल्हापूर, मिरज इत्यादी ठिकाणच्या अनेक स्थानिक समस्या सोडविल्याचे दिसून आले.
७. दक्षिणेत पानिपतपूर्वीचे प्रभूत्व निर्माण करण्यात आणि हैदरअलीच्या आक्रमणाला प्रतिबंध घालण्यात व त्यास निष्प्रभ करण्यात पेशवे यशस्वी ठरल्याने त्यांचे दक्षिण धोरण यशस्वी झाले होते.

८. माधवराव पेशव्यांच्या १८ व्या शतकातील कामगिरीमुळे दक्षिणेतील इंग्रज, पोर्तुगीज व फ्रेंच या परकीय सत्तांना जरब निर्माण होऊन त्यांनी मराठयांशी मैत्रीचे संबंध जोडले होते.

९. माधवराव पेशव्यांनी मराठी राज्याची पडझड सावरण्यासाठी तोफखाना, आरमार या सुधारणांकडे लक्ष देऊन ठिकठिकाणी कारखाने काढून सर्व जाती जमातीच्या लोकांना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

१०. दक्षिण धोरणाच्या अमंलबजावणीमध्ये पेशव्यांना रघुनाथराव, जानोजी भोसले, निजाम, बाबूजी नाईक यासारखे अनेक विरोधक होते व त्यांचा बंदोबस्त केल्याचे दिसून आले.

११. माधवराव पेशव्यांच्या अंगी राज्यकर्त्याला आवश्यक असणारे सर्वच गुण होते. परिणामी अल्पकाळात ही कामगिरी केली त्यामुळे माधवरावांचे स्थान श्रेष्ठ असल्याचे दिसून आले.

१२. दक्षिण धोरणामुळे पुण्याच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक विकासाला चालना मिळालेली दिसून येते.

१३. १८व्या शतकामध्ये मराठी राज्याचे वसाहतीचे धोरण यशस्वी करण्यासाठी पेशव्यांना हैदरअली व निजामास शांत करणे गरजेचे होते.

# संदर्भ ग्रंथसूची

## प्राथमिक साधने (इंग्रजी)

## ( Maharashtra State Archives, Mumbai)


1) Bombay Archives, Public Department Diary No.-37 of 1761

2) Bombay Archives, Public Department Diary No.-8, of 1762

3) Joshi P.M,(Ed.) Selections from the Peshwa Daftar (New Series) Vol. III, Revival cf Maratha Power (1761-1772) Government Central Press, Bombay,1962

4) Madras Military Consultations,1761-1772,Madras Record Office Vol. XXV

5) Madras Military Consultations,1761-1772, Madras Record Office Vol.XXVI-A,

6) Madras Military Consultations,1761-1772,Madras Record OfficeVol. XXII-A


### अ) प्राथमिक साधने (मराठी –अप्रकाशित)


१) पुणे अभिलेखागार अप्रकाशित रूमाल क्र.७ पुडके नं. ५, पत्रं क्र.३७९२

२) पुणे अभिलेखागार अप्रकाशित रूमाल क्र.१२ पुडके नं ४, पत्र क्र.७९४९

३) पुणे अभिलेखागार अप्रकाशित कर्नाटक रूमाल,क्र.५६७,बंडल क्र.२ पत्र क्र.१

४) पुणे अभिलेखागार पेशवे दफ्तर भाग३८,पत्र क्र.३२

५) पुणे अभिलेखागार अप्रकाशित रूमाल क्र.१५ ,पत्रं क्र.८६७१,८४८१

६) पुणे अभिलेखागार अप्रकाशित कर्नाटक रूमाल, क्र. ९६४, पत्र क्र.६४४९

७) पुणे अभिलेखागार अप्रकाशित दप्तर क्र.१७, पुडके नं १,पत्र क्र.९१२८

८) पेशवे दफ्तरक्रमांक–५४पुडका क्र.१,पत्र क्र.२४०७७–२४१९८

९) त्रिंबकराव विश्वनाथाचे माधवरावास पत्र दि.१० मार्च १७७१

१०) माधवरावाचे गोपिकाबाईसपत्र दि.२४ मे १७६४

११) माधवरावाचे नाना फडणीसास पत्र दि.१६ एप्रिल १७७०

१२) माधवरावाचे राजश्री रामशास्त्री यांना पत्र दि.६ एप्रिल १७६२

१३) माधवरावाचे राजश्री आबाजी गदाधर गोसावी यांना पत्र दि.१८ डिंसेबर १७६९

१४) मेणवली संग्रह डेक्कन कॉलेज रुमाल.८७, फाईल–५ पत्रे, ७६, ७७,१०५,१०७

**प्राथमिक साधने (मराठी –प्रकाशित)**

१) आपटे द.वि.(संपा.),चंद्रचूड दप्तर, भाग १, भा.इ.स.मं पुणे शके, १८४२

२) खरे वा.वा.,ऐतिहासिक लेखसंग्रह भाग१ कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना , मिरज,१९०८

३) खरे वा. वा., ऐतिहासिक लेखसंग्रह भाग ६, कुरुंदवाड भाऊ नाना छापखाना, मिरज, १९०८

४) खरे.वा.वा,ऐतिहासिक लेखसंग्रह,भाग २,कुंरुदवाड भाऊनाना छापखाना, मिरज ,१९०८

५) खरे वा.वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग ३ कुरुंदवाड भाऊनाना छापखाना , मिरज, १९०८

६) खरे वा.वा., ऐतिहासिक लेखसंग्रह,भाग ४, कुरूंदवाड भाऊ नाना छापखाना ,मिरज,१९०८

७) गर्गे स.मा.करवीर रियासतीची कागदपत्रे , खंड–१ ,पुणे, १९७०

८) गर्गे स.मा.करवीर रियासतीची कागदपत्रे , खंड–२ ,पुणे, १९७२

९) गुजर मा.वि (संपा.)करवीर घराण्याच्या इतिहासाची साधने, भाग–२,

१०) चितळे.वि.सि (संपा.)पेठे दप्तर,भाग१ भा.इ.स.मं स्वीय ग्रंथमाला क्र.ले.७३पुणे,१९४८

११) चितळे.वि.सी.(संपा.) पेठेदप्तर भाग२,भारत इतिहास संशोधन मंडळ,स्वीय ग्रंथमाला क्र. ७८, पुणे १९५०

१२) पगडी सेतु माधवराव,(संपा.अनु.) मराठे व निजाम उर्दू फारसी साधने पुणे,१९६१

१३) पवार अप्पासाहेब,जिजाबाईकालीन कागदपत्रे,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर २०१२

१४)पिसुर्लेकर पांडुरंग,मराठयांच्या इतिहासाची साधने,पोर्तुगीज,दप्तरखंड२,म.रा.सा.सं.मं.मुंबई, १९७४

१५) पिसुर्लेकर पांडुरंग,(संपा) पोर्तुगीज मराठे –संबंध, भाग–६,

१६) पुरंदरे कृ.वा.(संपा.), पुरंदरे दप्तर, भाग–१, पुणे १९२१

१७) पोतदार दत्तो वामन, मुजुमदार गं. नारायण, इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचा पेशवे दरबाराशी फारसी पत्रव्यवहार, मूळ व मराठी रूपांतर, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, शके १८४५

१८) बेंद्रे.वा.सी.(संपा.),महाराष्ट्र इतिहासाची साधने,खंड१,प्रथम आवृती, मुंबई मराठी ग्रंथालय, मुंबई १९६६

१९) बेंद्रे.वा.सी.(संपा.),महाराष्ट्र इतिहासाची साधने,खंड २,प्रथम आवृती,मुंबई मराठी ग्रंथालय,मुंबई १९६७

२०) राजवाडे वि.का., मराठयांच्या इतिहासाची साधने ,खंड १ (१७५०–१७६१), वाई १८९८

२१) राजवाडे वि.का.,(संपा),मराठयांच्या इतिहासाची साधने खंड–२,वाई १९००

२२) राजवाडे.वि.का,संपा.(वि.गो.विजापूरकर)मराठयांच्याइतिहासाची साधने,खंड३,क ोल्हापूर १९०१

२३) राजवाडे वि.का., मराठयांच्या इतिहासाची साधने ,खंड–८,

२४) राजवाडे वि.का.,मराठयांच्याइतिहासाची साधने खंड १३,पुणे,१८३४

२५) राजवाडे वि.का.(संपा.)वा.गो.आपटे,मराठयांच्या इतिहासाची साधने खंड–१० पुणे, १९०९

२६) राजवाडे वि.का.,मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड १८, मुंबई, १९१४

२७) राजवाडे वि.का.,मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड –२१,

२८)राजवाडे वि.का.,(संपा.)शं.श्री.देव,मराठयांच्या इतिहासाची साधने खंड२०,पुणे शके१८३७

२९)वाड. ग.चि.द.ब.पारसनीस(संपा.)श्री छत्रपती शाहू महाराजांची रोजनिशी,भाग१,मुंबई १९१७

३०) वाड.ग.चि,द.ब.पारसनीस(संपा.)पेशवा बाजीराव रोजनिशी, भाग२,मुंबई ,१९०६

३१) वाड. ग.चि .द.ब.पारसनीस (संपा.)श्री छत्रपती शाहू महाराजांची रोजनिशी,भाग १,मुंबई १९१७

३२) वाड.ग.चि,द.ब.पारसनीस(संपा.)पेशवा बाजीराव रोजनिशी, भाग२,मुंबई ,१९०६

३३) वाड.ग.चि.,सिलेक्शन फॉर्म सातारा राजाज ॲण्ड पेशवाज डायरीज, थो.मा.पेशवे रोजनिशी भाग–२, इंदिरा प्रेस, पुणे १९११

३४) वाड.ग.चि.सिलेकशन्स फ्रॉम सातारा राजाज ॲण्ड पेशवाज डायरी थोरले माधवराव पेशवे, रोजनिशी भाग १,संपा.डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, इंदिराप्रेस पुणे, १९११

३५)सरदेसाई गो.स, पेशवे दफ्तरातून निवड्लेले कागद खंड–२,गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस मुंबई १९३०

३६)सरदेसाई गो.स, पेशवा दफ्तरातून निवड्लेले कागद,खंड३ गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस मुंबई१९३४

३७) सरदेसाई गो.स.(संपा.),पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड ५, मुंबई, १९३०

३८) सरदेसाई गो.स.,पेशवे दफ्तरातून निवड्लेले कागद खंड– ७, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस मुंबई १९३१

३९) सरदेसाई गो.स.,पेशवे दफ्तरातून निवड्लेले कागद ,खंड–२१,गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस मुंबई

४०) सरदेसाई गो.स. पेशवे दफ्तरातून निवड्लेले कागद , खंड–१०, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस मुंबई

४१) सरदेसाई गो.स.,पेशवे दफ्तरातून निवड्लेले कागद ,खंड१५, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस मुंबई,१९८८

४२)सरदेसाई गो.स, पेशवा दफ्तरातून निवड्लेले कागद,खंड१९,गव्हर्नमेंट सेंट्रलप्रेस मुंबई१९३१

४३)सरदेसाई गो.स पेशवा दफ्तरातून निवड्लेले कागद,खंड २०,गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस मुंबई,१९३१

४४)सरदेसाई गो.स.,पेशवे दफ्तरातून निवड्लेले कागद,खंड–२८गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३३

४५)सरदेसाई गो.स.,पेशवे दफ्तरातून निवड्लेले कागद,खंड–२७ गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई,१९३३

४६)सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड २९, मुंबई, १९३३

४७)सरदेसाई गो.स पेशवे दफ्तरातून निवड्लेले कागद.,खंड–३९ गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस मुंबई, १९३४

४८)सरदेसाई गो.स पेशवे दफ्तरातून निवड्लेले कागद.,खंड ३७ गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस मुंबई,१९३४,

४९)सरदेसाई गो.स पेशवे दफ्तरातून निवड्लेले कागद.,खंड ३८ गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस मुंबई, १९३४

५०) सरदेसाई गो.स पेशवा दफ्तरातून निवड्लेले कागद, खंड–४०, मुंबई १९४०

## दुय्यम साधने (इंग्रजी)


1) Banerjee A.C.,Peshwa MadhavraoI, A Mukherjee & Company Limited, Calcutta 1968.

2) Chitanis K.N.,Glimpses of Medieval Indian Ideas and Institutions, Sadashiv Peth, Pune 1974

3) Duff Grant James, History of the Marathas.Vol. I, London,1921

4) Duff Grant James, History of the Marathas Vol.III,Cosmo Publications, 1999

5) Forrest G.W., Selection from the state papers of the Governer General Warren Hasting Vol.II, Matatha Series¸ Bombay 1910

6) Hatalkar V.G.,Relation between the French and Marathas,(1668-1818), University of Bombay, 1958

7) Kulkarni A.R.The Maratha History of Medieval Deccan, Vol.I, 1989

8) Kulkarni G.T.The Mughal-Maratha Relations: Twenty Five Faithful Years(1682-1707), Pune, 1983

9) Pawar A.G. Maratha History Seminar Papers, Shivaji University, Kolhapur,1970

10) Sardesai G.S.(Ed.),Selection from the Peshwa Daftar, Vol.XXXXII, Government Press, Mumbai, 1934

11) Sardesai G.S.,New History of the MarathasVol.II(1707-1772) Second Edition, Phonix Publication,Bombay,1958

12) Sardesai G.S.New History of the Maratha's,Vol.I,Dhaval Publication, Mumbai, 1971

13) Sarkar J.N., History of Aurangajeb, Vol.V,Calcutta,1948

14) Sen Surendranath, Administrative System of the Maratha's,Calcutta K.P.Bagchi & Company, 1928

15) Shastri K.N.,A History of South India, Delhi, Oxford University Press, Forurth Ed., 1976.

16) Sinha N.K.,Haidar Ali, Calcutta,Ed.1941
17) The Chronology of Modern Hyderabad 1720-1890 Published by the Central Records Office Hydrabad,1954
18) Wilks Mark, Historical Sketches of the South of India, History of Mysoor,Vol.I,London, 1810
19) Wilks Mark, Historical Sketches of the South of India, History of Mysoor,Vol.II,London, 1817

**दुय्यम साधने (मराठी –प्रकाशित)**

१) आचार्य धनजंय, थोरले माधवराव पेशवे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर ,प्रथम आवृती, २०११
२) ओक प्रमोद, पेशवे घराण्याचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,२००१
३) कदम उमेश अशोकराव, फ्रेंच मराठा संबंध,१६६८– १८१८, पुणे, प्रथम आवृत्ती २०११
४) किंकडे आणि पारसनिस, 'हिस्ट्री ऑफ मराठा पिपल', खंड–२, १९२२
५) कुलकर्णी अ.रा.,खरे ग.ह.,मराठयांचा इतिहास खंड–२,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५
६) कुलकर्णी अ.रा.,खरे.ग.ह.(संपा.) मराठयांचा इतिहास, खंड३, कॉन्टिनेन्टल, प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती,१९८६
७) कुलकर्णी अ.रा.शिवकालीन महाराष्ट्र,मराठयांचा इतिहास,खंड१ कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे १९८४
८) कुलकर्णी अ. रा. पुण्याचे पेशवे राजहंस प्रकाशन, पुणे ,१९९९
९) केळकर य.न.,मराठे व इंग्रज, मॉर्डर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, १९६३
१०) खरे य.वा.(संपा.),मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १, मिरज, १९२७
११) खरे वा.वा. इचलकरंजी संस्थानचा इतिहास, आर्यभूषण पुणे,१९३१
१२) खरे य .वा , नाना फडणीसाचे चरित्र, मिरज १९२७
१३) खोबरेकर वि.गो.,महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड भाग – २, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ. १९८८
१४) खोबरेकरं.वि.गो.मराठ्यांच्या स्वा–यांचे मुक्काम,मुंबई मराठी ग्रंथालय ,मुंबई १९७६

१५) गर्गे स.मा.,हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेकडील इतिहास, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९८३

१६) गाडगीळ ह. र.,विंचूरकर घराण्याचा इतिहास,पुणे,१८८३

१७) गायकवाड, हणमाने व सरदेसाई, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर, २०००

१८) चिटणीस के.एन.,दि नबाब ऑफ सावनूर, भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे,१९८५

१९) जोशी श.ना. माधवराव शकावली, भा.इ.स.म.पुणे,

२०) टिपणीस.म रा.(संपा.)का.ना.साने,शाहू महाराजांचे चरित्र,आर्यभूषण पुणे ,शके १८४२

२१) दिक्षीत.एम.जी./खोबरेकर,वि.गो.मराठेकालीन प्रसिद्ध व्यक्तीची हस्ताक्षरयुक्त पत्रे,

२२) देशपांडे सु.र., मराठेशाहीतील मनस्विनी, मेहता प्रकाशन ,पुणे २००५

२३) पगडी सेतू माधवराव (संपा.),मोगल आणि मराठे(तारिखे दिल्कुशा),ग.ल.ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६३

२४) पारसनीस.द.ब.(अनु.)देशपांडे.सु.र., पेशवेकालीन पुणे,डायमंड प्रकाशन,पुणे २००७

२५) पारसनिस द.बा.,इतिहास संग्रह व ऐतिहासिक चरित्रे, खंड–२,

२६) फाटक न.र.,व पगडी (संपा.), पानिपतचा संग्राम, मुंबई ,१९६१

२७) भावे वा.कृ.पेशवेकालीन महाराष्ट्र,भा.इ.अ.परिषद दिल्ली, १९७६

२८) मोडक, बा.प्र .कोल्हापूर संस्थानचा इतिहास,भाग– २ पुणे,१८९३

२९) रानडे म.गो., मराठी सत्तेचा उत्कर्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, १९८९

३०) शेख अली बी.,हैदरअली के साथ अंग्रजो के संबंध,भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, दिल्ली,प्रथम हिंदी संस्करण १९९९

३१) शेजवलकर त्र्यं.शं.,निजाम– पेशवे संबंध, पुणे,१९६३

३२) सरदेसाई गो.स.(संपा.), कुलकर्णी कृ.पा.,काळे य.मा.,ऐतिहासिक पत्रव्यवहार, पुणे १९३३

३३) सहस्त्रबुद्धे स.अ., श्रीमंत थोरले माधवराव पेशवे व्ही.डी.बापट ॲन्ड कंपनी मुंबई ,१९३८

३४)सरदेसाई गो.स.मराठी रियासत,खंड२,पेशवा बाळाजी विश्वनाथ,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,१९४२

३५) सरदेसाई गो.स.मराठी रियासत पेशवा बाळाजीराव,खंड ४,सुधारितआवृत्ती,पॉप्युलर प्रकाशन मुंबई ,१९९०

३६) सरदेसाई गो.स. मराठी रियासत ,पेशवा बाजीराव खंड–३, पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९४२

३७) सरदेसाई गो.स.(संपा.)स.मा.गर्गे मराठी रियासत,छ.रामराजा निग्राहक माधवराव खंड–५ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९०

३८) सरायकर सुनिता,विसाजी कृष्णा बिनीवालेःकाळ आणि कर्तृत्व, विजय प्रकाशन, नागपूर, २००७

३९) सरदेसाई बी.एन.,नलावडे,आधुनिक भारताचा इतिहास, कोल्हापूर,२००४

४0) सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९ .

४१) सरदेसाई गो.स.,काळे या.मा.(संपा.) ऐतिहासिक कागद पत्रे यादी वैगरे लेख, पुणे १९३०

### पीएच.डी. शोध प्रबंध

१) Karnik S.D.,Economic life in Maharashtra Under Peshwa Madhavrao I, unpublished Ph.D. Thesis, Bombay University, Bombay 1976

२) कुलकर्णी मधुकर रामचंद्र, नाना फडणीसाच्या प्रशासन व्यवस्थेखालील मराठी राज्य शासनाचे स्वरूप, पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, १९८४

### मासिके, त्रैमासिके, नियतकालिके

१) खरे वा.वा.,ऐतिहासिक लेख.,अंक २९, ३०

२) इंडियन हिस्ट्री कॉंग्रेस,प्रोसिडींग.१७,१९६०

३) भारत इतिहास संशोधन मंडळ,त्रैमासिके ,पुणे

४) भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिके मुंबई

५) राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिके, धुळे.

६) निवडक शोधनिबंध संग्रह ,शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद ,कोल्हापूर

७) शोधनिबंध संग्रह ,अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

८) शोधनिबंध संग्रह , संशोधन ,सातारा इतिहास संशोधन मंडळ ,सातारा

परिशिष्ट १

# पेशवे घराण्याची कारकीर्द

**बाळाजी विश्वनाथ**

पेशवेपद १७ नोव्हेंबर १७१४, मृत्यू २ एप्रिल १७२०

**बाजीराव (थोरले)**

पेशवेपद १७ एप्रिल १७२०, मृत्यू २८ एप्रिल १७४०

**बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब**

पेशवेपद २५ जून १७४०, मृत्यू १३ जून १७६१

**माधवराव (थोरले)**

पेशवेपद २० जुलै १७६१, मृत्यू १८ नोव्हेंबर १७७२

संदर्भ–सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड –३

## परिशिष्ट २

पुणे अभिलेखागार

पेशवे दफ्तर क्रमांक –३७

पत्र क्र.०८ श्री दि. १६ एप्रिल १७६२

छ.२० रमजान सु।। इसने सितैन मया अलफ

वेदशास्त्र संपन्न राजश्री रामशास्त्री स्वामीचे सेवेशी विद्यार्थी माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावे विशेष खासा स्वारी कर्नाटकच्या बंदोबस्तास आली .कित्तूकर देसायाचे पारिपत्य करून खंडणी घेऊन सोंध्याच्या सरहदेस आलो तेथील खंडणीचा निर्गम करून घेतला बिदनूरची ही मातब्बर झाली. खंडणी विल्हे लाविली लहानमोठी संस्थाने राहिली ती चुकऊन घेऊन पर्जन्यकालाचा आवकाष पाहून माघारी फिरोन देशास येऊ, आपल्यास कलावे यास्तव लिहले आहे. आपले संतोष वृत्त वरिचेवरी लिहित जावे बहुत काय लिहू हे विनंती

## परिशिष्ट ३

पुणे अभिलेखागार

पेशवे दफ्तर क्रमांक –३७, पत्र क्र.१८० श्री दि. १८ डिसेंबर१७६९

राजमान्य राजश्री आबाजी गदाधर गोसावी स्नाो. माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद सुहूर सन सबैन मया व अलफ, बदरूद्दीन दारूवाला याजपासून कसबे वैजापूर व ममदापूर येथे दारू पाऊणशे खंडी खरेदी करावायचा करार साल गुाा करून तुम्हास दारूचे कारखान्यावर पाठविले आहे त्यास बावन खंडी दारू तयार होऊन तुमचे पदरी माप पडेल म्हणून तुम्ही लिाा ते कळले .बाकी तेवीस खंडी दारू राहिली ते हल्ली दर पावणेचारशे प्रमाणे घ्यावयाचा करार करून तुर्त ऐवज पाठविला येणे प्रोा. रूपये ५५३ रोख बद्रुद्दीन दारूवाला याज जवळ दिले. रूपये १९०० हुंडी गंगाधर गोविंद याची येथे घेऊन गोविंद भिकाजी याजवर वैजापूरची हुंडी अलहिदा पाा असे, तरी घेऊन जरूर पावल्याचे उत्तर पाठविणे आणि तेवीस खंडी दारू दुबारी सोऱ्याची चांगली करावायचा करार केला असे, तरी चांगली दारू दुबारी करवून माप घेऊन लिहून पाठविणे.दारू वाईट होती म्हणून हुजूर विदित झाले. याकरिता चौकशी करून घेत जाणे छ.साबान आज्ञाप्रमाण .

## परिशिष्ट ४

पुणे अभिलेखागार

पेशवे दफ्तर क्रमांक –३७,पत्र क्र.२०६ दि.१६ एप्रिल १७७०

श्री

राजश्री या विराजित राजमान्य राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी– पोष्य माधवराव बल्लाल प्रधान नमस्कार विनंती उपरी तुम्ही छ.३ जिल्हेजचे पत्र पाठविले.ते छ.१९ जिल्हेजी देवरायदुर्ग मुकामी मिळाले लिहले वर्तमान कळले या तोफाचे कारखान्या करिता बालाजी वामन दामले यांनी नवे घर बांधले फार करून तयार जाले. पाच हजारापर्यत अजमासे लागतील कडक बिजली तोफ फोडून साडेपाचखंडी पंचरस काढिले. आनंदवल्लीस जंबुरे पंचरसी बारा तेरा आहेत ते ही मोडून आणविले.चार साडेचार खंडी पंचरस काढावयास तांबे कथील, जस्त मिळोन चाळीस खंडी देविले.त्यास पन्नास हजार रूपये लागतील काही ऐवज दिला व काही द्यावयाचा आहे.याखेरीज कोलसे, रायवल व खैराचे मिलोन दीडसे खंडी व मेण राल, तेल, तूप, सुंभ, काथा वगैरे सात हजार एकूण एंकदर सदुसष्ट हजार अजमासे लागतील. याशिवाय कारागिराच्या दरमहा अडसेरी सुद्धा तीन हजार अदमासे आहे.काम जलदीने चालत आहे. म्हणून लिहले ते सविस्तर कळले. यैसियास कडक बिजली व जंबुरे मिलोन दहा खंडी पंचरस जाले. पुढे चालीस खंडी पाहिजे ते सारेच खरेदी करून घ्यावयाचे नव्हते आणखी फुटक्या तोफा असतील त्याचे काढावयाचे होते. केवल खरेदी करून देईन म्हटल्यास पैका फार होतो, याजकरिता पैका देऊन जितके खरेदी केले असेल तितकेच पुरे करणे.तुम्ही पैकेचा अजमास लिहला. त्यापैकी पैका देऊन पंचरस घेतले असेल ते घेतले, याऊपरी खरेदीस पैका न देणे. सांराश– गोष्ट, तोफा तर यादीप्रमाणे झाल्या पाहिजेत. परंतु ऐकदाच साऱ्या करीन म्हटल्यास खरेदीस पैका फार लागेल.याजकरिता पुण्यात येक कनमुरडी व नारंजन दोन तोफा आहेत त्यांचे पंचरस काढावे. अहमदनगर, दौलताबादेस जायबंदी तोफा असतील त्याचे काढून आणावे दोन्ही स्थळी नसल्यास पुरंदरचे माचीस गणेश तोफ ठेवली आहे.ती खाली उतरून पंचरस काढावे.याप्रमाणे तिकडे तोफा असतील त्यांचे पंचरस काढावे .मदगिरीवर येक दोन तोफांचे पंचरस आहे.दुसरे लष्करात फेरोजंग तोफ जाया झाली. त्याचे पंचरस काढिले आहे ते तुम्हाकडे पाठवून देऊ ,दोन महिन्यांनी तुम्हाजवळ पोहचले. जस जसे जमा होत जाईल

तसतसे काम चालीस लावणे. दहाखंडी कडक बिजली व जंबुरे मिलोन पंचरस जमा झाले. दुसरे तुम्ही चाळीस खंडीचा अजमास लिहिला. त्यापैकी खरेदी करून दिले असेल ते इतक्याचेच काम चालीस लावणे. दुसरे खरेदी करून न देणे तीन हजार कारखान्याचा दरमहा आहे म्हणून लिहिले. त्यास तुम्ही सरंजाम तोफांचा केला असेल तितक्याचा कारखाना चालीस लावावया जोगे कारागीर ठेवावे,जादा असल्यास दूर करावे. जसजसा पंचरसाचा सरंजाम सिलकी तोफांचा होत जाईल तसे काम चालवावे. केवल खरेदी करून तोफा करीन म्हटल्यास पैका मुबालक लागेल. याकरिता लिहल्याप्रमाणे तोफांचा कारखाना चालविणे. कोलसे वगैरे जिनस हा तर खरेदी करून दिले पाहिजे तो द्यावा. यास्तव पत्र पावताच खरेदी झाली ती झाली या उपरी पंचरस खरेदी न करणे .सरंजाम सिलकी व खरेदी जमा झाला असेल त्याचे काम चालीस लावणे वर्तमान वरचेवर लिहून पाठवित जाणे.

## परिशिष्ट ५

पुणे अभिलेखागार

पेशवे दफ्तर क्रमांक – ३७, पत्र क्र.२२६ दि. १० मार्च १७७१

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेशी विनंती सेवक त्रिंबकराव विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता.छ.२२ जिल्काद मुा मोतीतले नजीक श्रीरंगपट्टण तीन कोस पावेतो. स्वामीच्या आज्ञेप्रमाणे तुमकूराहून कूच करून हेबूरावर आलो .तो हैदरखान सात आठ हजार फौज, पंचेचाळीस तोफा, पंधरा हजार गाडदी व बारवाले ,फिरंगी या शिवाय कर्नाटकी प्यादे वगैरे बाण घेऊन मोठे तरतुदीने मागडीकर आला. चोरी छपीने सरकारच्या फौजेवर छापा घालावा. याअर्थी एक दोन वेळा तयार होऊन यावयाचा विचार केला. एकदा तर तीन कोस निघोन आला. हजार दोन हजार दिवटीचे पोत करून बैलाचे शिंगास बांधून लष्कराकडे पिटावे त्यारोखे आमचे फौजानी जावे आणि आपण निराले येऊन गोटावर पडावे इत्यादी मायावी कर्तृत्त्व .आमच्या तर बातम्या येऊन पोहचताच येकदा तर फौजेची तयारी करून गोटाबाहेर जाऊन उभे राहिले. त्यास वर्तमान कळताच माघारे जाऊन मागडीच्या रानात जावून राहिला. आम्ही कूच करून त्याचे सुमारे भैरवदुर्ग जवळ येऊन हेबुराजवळ येक दोन मुक्काम केले. हैदरखान बिदनूरच्या झाडीत शिरल्यानंतर मग आम्हास झाडीत शिरू देईल.हा भरवसा न पुरे यामुळे बिदनूरचा रोख सोडून तुरुविकिऱ्यावर आलो .तो हैदरखान मागडीच्या झाडीतून निघोन नागमंगला वरून मेलकोटे देवाचे स्थल चौफेर बिकट जागा त्याच्या आश्रयास जाऊन राहिला.ती बातमी आम्हास कळताच सडी फौज करून राजश्री कृष्णराव बलवंत याजबरोबर राजश्री सखाराम हरि, नीलकंठराव थोरात, भवानजी वाघ, महिमाजी मुढे, अंतोजी माने, दोरगे, निगडे मंडळी वगैरे फौज देवून रवाना केले.तेव्हा वर्तमान हैदरखानास कळताच दीड हजार फौज गोट सोडून पुढे आली. तेव्हा हैदरखानाच्या फौजेस उधळून मारीत मारीत गोटात नेऊन घातले.२५०–३०० घोडे हैदरचे पाडाव करुन आणले.तो हैदरखानाने तोफा,गाडदी पुढे घालून तोफाची व बाण ,जेजालाची मारगिरी फार केली.ते समई सखाराम हरिस डोईवर तलवारीची चोट लागली. ३०–४० घोडी ठार झाली.१००–५० माणूस जखमी व ठार झाले.

इतक्यात आम्ही फौजसह जाऊन पोहोचलो.सूर्यास्त  झाल्यामुळे लढाई थांबवली आणि कोसाचे अंतराने मुकाम केला.

दुसऱ्या दिवशी आम्ही मेलेकोट डावे टाकून,त्यांनी तोफा पसरून राहिले होते. तिकडून कसे आहे हे पाहावयास गेलो. तो झाडीची बारी आठ कोस, येक्या घोडयांनी जावे. झाडीत गेल्यानंतर आत दीड कोस चौफेर मैदान होते व चहूकडून डोंगर व कोठे कोठे कडे तुटले होते. त्या मैदानात तोफा नेहून सुरू करण्यात, तो हैदरखाना सारखा शत्रू समयोचित चालून आला तर तोफा बाहेर येणे कठीण होते. याअर्थी चौफेर फिरोन मुकामास आलो.श्रीरंगपट्टणास त्यास जावयाची वाट होती. तेथे छबिना ठेविला. वामनराव गोविंद, आनंदराव गोपाळ,नरसिंगराव धायगुडे व गायकवाडांचे पथक सुद्धा सारी फौज पश्चिमेस मैदानात ठेवली. आम्ही मेलकोटयाच्या पूर्वेस राहून डोंगरावर तोफा चढवून तेथून त्यांचे लष्करावर तोफांचा मार दिला. तेव्हा त्यांनी ती जागा सोडून किल्ल्याचे पोटात नाले पाहून तोफांचा मार चुकावून डेरे दिले. तेव्हा पुढे डोंगर होते त्याचवर चौक्या बसवून बाण लाविले व जेजाला चढवून तोफाचा मारा केला. परंतु आपला काही परिणाम नाही हा अर्थ, हैदरने चितात आणून रात्रीच तयार होऊन कूच केले. तो आम्हाकडे बातमी नाही .वामनराव वगैरे सरदार पश्चिमेकडे होते, ती वाट चुकवून दक्षिणेकडे खिंड होती. त्यामार्गे श्रीरंगपट्टणास चालला. डोंगरावर सरकारच्या चौक्या होत्या. त्यास हैदरखानाच्या तळावर सामसूम पाहून हैदरखान गेला. ही बातमी घेऊन सरकारची माणसे आली.परंतु कडूरबाणावरच्या मार्गाकडे काही फौज व श्रीरंगपट्टणच्या मार्गे कृष्णराव फौजसुद्धा मध्य रात्रीस रवाना केले. इतक्यात हैदरखान तळ सोडून कोस दीड कोस चालला त्यातून त्याचे लष्कराचे दोन स्वार पळून आले.त्यांनी बातमी सांगितली की हैदरखान श्रीरंगपट्टणच्या मार्गे चालला आहे.त्यावरून आम्ही त्याच समई नगारा करून फौज सुद्धा तयार होऊन तोफा बरोबर घेऊन श्रीरंगपट्टणच्या मार्गे चाललो. त्यास श्रीरंगपट्टणच्या वाटेवर छबिना होता. त्याची व हैदरखानाची गाठ पडली. तेव्हा त्यांनी आम्हाकडे वामनराव गोविंद याजकडे बातमी पोहचविली त्यास वर्तमान कळताच तेही तयार होऊन तिकडून येऊन पोहचले. चार घटका रात्र असता लढाई सुरू झाली.तो त्यांनी तोफा चौफेर पसरून, गारदी ,फिरंगी, बारवाले याचे बुरूज बांधून मोठे कवायातीने लढत लढत पट्टणच्या मार्गे चालला. तोफा, बाण व फिरंगी यांची मारगिरी एक सतत होत होती. आम्ही जाऊन पोहचलो. चौफेर फौजा घातल्या परंतु त्याचे मारगिरी पुढे

घोडे, हत्ती  तोंड न करी, ते समई तोफा येऊन पोहचल्या नाहीत यामुळे काही उपाय न चाले. पट्टणपासून तीन कोसावर अलीकडे मोतीतले आहे याजवर आला. तो आम्ही त्याचे डावे बाजूस पाणी धरून चालत होतो. हैदरखान मध्यावरून चालत होता. पिछाडीस काही हुजरात व उभयता रास्ते व हिंदूराव सेनापती यांची फौज व दौलतराव घोरपडे यांचे पुत्र आनंदराव रास्ते होते. उजव्या बाजूस वामनराव गोविंद, आनंदराव गोपाळ, नरसिंगराव धायगुडे व गायकवाडचे पथक होते. कृष्णराव माधव यांनी कस्त करून जिलेबीच्या दोन तोफासह येऊन पोहचले. त्या तोफा सुरू केल्या तो मागाहून दुसऱ्या दोन तोफा येऊन पोहचल्या. त्यानंतर तोोफ ांची व बाणाची मारगिरी केली. गोळे त्याच्या लष्करात पडताच लष्कर जमवून चालत होते. ते गलबलून गेले व कांही अंतर पडले. थोडेसे तोंड लाविले. इतका अवसर पाहून स्वामीचे नाव घेऊन निशाण चालविले. तो हुजरात पथके जलद निशाणा जवळ येऊन पोहचली. ते समई वामनराव गोविंद, आनंदराव गोपाल, गणपतराव रास्ते, धायगुडे, गायकवाडचे पथक, हिंदूराव घोरपडे, खंडेराव घोरपडे, मालोजीराव घोरपडे, दौलतराव घोरपडे, कडप्पेकर महिपतराव मल्हार इत्यादी सरदारांनी निकड करून घोडे चालविले. त्यास हैदरखान आघाडीस पुढे चालला होता.पिछाडीस तोफा व गाडदी,फिरंग्याचे गुरूज बांधून चालत होता.ते उधळून मारीत मारीत हैदरखानापर्यत निशाण घेऊन पोहचलो. तेव्हा हैदरखानाने मोती तलावा समीप डोंगर होता. त्याचा आश्रय करून डोंगरावर पाच सात हजार माणसासह सडा जीव घेऊन चढला. त्याची तमाम फौज मारून गारद केली. मोठी लढाई झाली. राव सेनापती यांच्याकडे तोफा आल्या त्यासुद्धा चाळीस पंचेचाळीस तोफा, वीस पंचवीस हत्ती, सात आठ हजार घोडे व खजाना, जवाहिर इत्यादी सारी सलतनत लुटून फौज मारून गारद केली. हजार दोन हजार माणूस कापून टाकले. हैदरखान मात्र जीव वाचवून डोंगरावर चढला. त्याजवर आम्ही इकडील बंदोबस्त राखून दोन हजार फौज घेऊन जलद डोंगराखाली जाऊन पोहचलो. इतक्यात चार घटकाचा अवकाश पडला.त्याजमुळे हैदरखानाने कलरूचे सोंग घेऊन पाई उतारा अथवा येक घोडयानी पळून पट्टणास गेला.डोंगरावर लोक व सरदार होते. त्यांनी नाईलाजाने कौल मागितला. त्यावरून कौल देऊन हत्यारे वगैरे घेऊन सोडून दिले. लालमिया, मीररेजा व लालाबक्षी वगैरे मोठे मोठे पाच सात सरदार पाडाव करून आणले व कित्येक लढाईत ठार झाले. वरकड लोकात हैदरखान पहावा तो ओळखीची माणसे घालून चौकशी केली परंतु न सापडला. हजारो माणूस दाती तृण


धरीत असता त्यास आपले लोक मारीत नाही या अर्थे सोडून दिले. मीर फैजूला बरोबर होता परंतु त्याचा ठिकाणा लागला नाही. स्वामीच्या पुण्यप्रतापे स्वामीची आजीम अस्मानी फत्ते झाली .सरकारच्या फौजेतील माणूस ,घोडे फार जखमी व ठार झाले. आम्हास गोलीची जखम उजवे कानास लागली. गोली निघोन गेली खैर जाहली. लवकरच जखम बरी होईल. निलकंठराव त्रिंबक, गोपालराव गोविंद यांचे भाऊ व अंताजी माने पागेकड ील कामास आले. मोठी शर्तीची लढाई झाली. हुजरात व संरजामी सरदार लोक यांनी निकड केली. लोकांनी चाकरी मोठ्या तऱ्हेने केली .सरकारी निशाणीचा हत्तीच्या पायास गोळा लागला तो कापून काढला. लष्कराचे घोडे ठार फार झाले व मातबर लोक जाया जखमी फार झाले ,कितेक ठार ही झाले. स्वामीची फत्ते झाली सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

## परिशिष्ट ६

पुणे अभिलेखागार

सं. नि.का.रुमाल क्र.१५

पत्र क्र.८६७१ दि. २१ मार्च १७६६




**मराठी भाषांतर –** दि.२१ मार्च १७६६ – श्री.वेदशास्त्र संपन्न राजश्री रामशास्त्री स्वामीचे सेवेसी विद्यार्थी माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणे. विशेष पुण्यास श्री. केदारेश्वर याचे देवालयास उत्तरेस जागा सिवराम भट चित्राव यानी देवालय बांधिले ते समयी देऊल उत्तरेकडे घोडयांनी सारून निखालस जागा देवाची केली. आवार सिवराम बावानी घातले असे असता हाली त्या जाग्यावर सोफा केला आहे. म्हणोन हुजूर विदित जाले. यैसास ते जागा देवालयाखाले दिल्ही. हे प्रमाण असता तेथे सोफा बांधिला आहे. तो मोडून लाकडे त्याची त्यास देणे भिंतीस विटा वगैरे खर्च लागला असेल त्याचा अजमास पाहून जो ठरेल रूपया तो राजश्री नारो आपाजी याजकडून देविला आहे. त्या जाग्यावर देवालय बांधावयास माारनिलेस आज्ञा केली आहे. देवालये बांधतील घोडे कटकट करितील त्यास बरे वजने ताकीद करून कार्य करणे राा छ ९ सवाल सुाा सीत सितैन मया व अलफबहुत काय लिहिणे ही विनंती. पो. छ.२८ जिलकात सुाा सीत सितैन मया व अलफ चैत्र वद्य अमावशा

## परिशिष्ट ७

पुणे अभिलेखागार

सं. नि.का.रुमाल क्र.१५

पत्र क्र.८४८१ दि. २ मे १७६९




**मराठी भाषांतर –** दि. २ मे १७६९ श्री.पौ छ. २९ जिल्हेज तिसा चैत्र हा रामजी जथे बनाजी नाईक सेवेसी हरी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ.२४ जिल्हेज मंगळवार मुाा नजिक आलजापूर वर्तमान यथास्थित असे विशेष आजच आप्पाजी बाा पत्रे पाा त्यांत गंगापुरास जावे लागेल म्हणून लिाा होते. त्यास गंगापुराहून पत्रे आली. श्रीमंत मातोश्रीबाई पुण्यास येतात. याजकरिता तिकडे जाणे मजकूर राहिला. आतां आज कूच झाले गुरूवारी टोक्यास जाऊ. शुक्रवारी मुकाम शनिवारी कुच करून दरमजल वैशाख शुध षष्ठीचे मुहूर्तास पुण्यास येणार कलले पाहिजे. फकीरजी फडतरे याचे वतनाची जप्ती केली असे श्रीमंतास लिहिले होते. त्याचे जाब मागाहून पाठऊ व पुण्यात माणसे किती आहेत. ते लिहीणे असे श्रीमंतानी लिहिले होते. त्याचे कारण काही लिहिले नाही म्हणून त्यास श्रीमंत पुण्यास येणार, माणूस आहे किती त्यात नेहमी ठेवावे किती, दूर किती करावे हा अजमास कलावायाकरितां मात्र लिहून आणविले होते. दुसरा कांही अर्थ नाही सेवशी श्रृत होय हे विज्ञापना.

## परिशिष्ट ८

पुणे अभिलेखागार

पेशवे दफ्तर क्रमांक – ३८

पत्र क्र.३२ दि.२९नोव्हेंबर १७६१



( मराठी भाषांतर )


दि. २९ नोव्हेंबर १७६१ – श्री लक्ष्मीकांत राजश्री रघुनाथपंत दादा गोसांवी यांसी

सकलगुणालंकरण अंखडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्नोा जानोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिले पाहिजे विशेष गोसांवियानी पत्र पाठविले ते प्रविष्ठ होऊन लेखानार्थ अवगत जाहला. यावयासी दिरंग लागला आहे. याजविसी विस्तारे लिहिले व मोगलांनी देवस्थानी उध्वंस केला हे हिंदू धर्मास उचित नाही. मंगळवारी युद्ध नेमिले आहे. यास्तव रातोरात भेटीस यावे म्हणोन लिहिले ऐशियांस पैठणचे मुक्कामी गोसांवियांचे पत्र आले की गुजाल्याचा घाट चढून यावे. आम्ही आगडीस घाट चढून जातो. याजवरून यासुमारे यावे तरी आपण घाट चढून गेलियावर मोगलाचा मुक्काम घाटांखाली होईल. आमचा बुनगीचा गुंता म्हणोन करंजीच्या घाटाचे सुमारे आज छ.१ जमादिलोवली सोला सतरा कोसाची मजल करून तिसगांवावर आलो. तो आजच भेटीस यावायाविसी निकडीने पत्र आली ती संध्याकाली पोहचली. येथून सडे होऊन बुनगे ठेवून रातोरात यावयाचे करावे. तरी आपल्यास आम्हास फारच अंतर व बुनगीही ठेवावयाचे ठिक नाही. त्याजवरून उदईक सोमवारी करंजीचा घाट चढून नगरा आसपास बुनगे ठेऊन सडे होऊन मंगळवारी येऊन पोहचतो. वरकड मोगलांनी बहुत बदराहा वर्तणूक केली. याचे पारिपत्य निक्षून व्हावे यास्तव बहुत विषदे लिहिले. त्यास हाच दृढोतर विचार केलीया आपलेच प्रतापे होऊनही येईल. रा छ मजकूर + सुज्ञा प्रति विशेष काये लिहिणे कृपालोभ असू दिला पाहिजे हे विनंती **मोर्तब सुद.**

( + येथून जानोजी भोसले यांच्या हातचे अक्षर आहे.)


# SOUTH EXPEDITION ROUTE OF MADHAVRAO PESHAVE

## First Expedition (January 1762 – June 1762)




# SOUTH EXPEDITION ROUTE OF MADHAVRAO PESHAVE


## Second Expedition (5 January 1764 – 8 June 1765)





# SOUTH EXPEDITION ROUTE OF MADHAVRAO PESHAVE

## Third Expedition (26 October 1766 – 28 June 1767)




SOUTH EXPEDITION ROUTE OF MADHAVRAO PESHAVE
Forth Expedition (7 November 1769 – 13 June 1770)
Pune
Nira
Dhom
Wai
Ozarde
Bhuinj
Satara
Dudhebavi cha Ghat
Maharashtra
Pandharpur
Mhaswad
Mhaswad
Nazare
Devdurg
Nivrutti Sangam (Krishna-Ghatprabha River)
Andhra Pradesh
Goa
Shirhatti
Karnataka
Arabian Sea
Harihar
Budhihal
Chikkanayakanahalli
Chikkaballapur
Nijagal Fort
Devanhalli
Belur
Kolar
Mulbagal
Magadi
Nagmangal
Kerala
Tamil Nadu
Legend
Places
International Boundary
State Boundary
Km 50 25 0 50 100 150 Km



SOUTH EXPEDITION ROUTE OF MADHAVRAO PESHAVE
Fifth Expedition (19 October 1770 - 21 January 1771)
73°0'0"E
74°0'0"E
75°0'0"E
76°0'0"E
18°0'0"N
17°0'0"N
Pune
Gultekadi
Wai
Dahigaon
Shri Kolheshwar, Satara
Maharashtra
Tandulwadi
Rahimatpur
Karhad
Kamalapur
Miraj
Karnataka
Arabian Sea
N
W
E
S
Km 30 15 0 30 60 90 Km
Legend
Places
International Boundary
State Boundary




**Banrjee A.C., Peshawa Madhavrao I**





**Banrjee A.C., Peshawa Madhavrao I**





**माधवराव पेशवे आणि हैदर यांच्या लढायांची कर्नाटकातील काही प्रमुख गावे दर्शविणारा नकाशा**

संदर्भ–सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड –५




संदर्भ–सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड –५



संदर्भ–सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड –५



माधवराव पेशवे शिकार करताना

संदर्भ– खोबरेकर वि.गो.,महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड भाग – २,

## श्रीमंत थोरले माधवराव पंतप्रधान



जन्म : शक १६६६ माघ वद्य १२. मृत्यु : शक १६९४ कार्तिक वद्य ८.

आ. भू. प्रेस, पुणें.

भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे